
पाश्चात्य तत्त्ववेत्ता

हर्बर्ट स्पेन्सर ह्याचें चरित्र



Herbert Spencer

किंमत २॥ रुपये

कर्त्यानें
संस्थेस नजर केलेलें
पुस्तक

हर्बर्ट स्पेन्सर ह्यांचें चरित्र व पत्रें.

हा ग्रंथ

प्रोफेसर डंकन ह्यांचें ग्रंथाधारें

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए.

ह्यांनीं मराठींत उतरिला.

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर

४६८ नारायण पेठ, पुणें सिटी.

पुणें पेठ शनिवार–मेहुणपुरा येथें केशव रावजी गोंधळेकर

ह्यांनीं आपले " जगद्धितेच्छु " छापखान्यांत छापिला.

शके वर्ष १८३७–इ० सन १९१५.

दक्षिण हैद्राबाद एथील जहागीरदार
श्रीमंत रा० रा० वामन रामचंद्र नाईक ह्यांनीं
आमचे ग्रंथमालेचे मदतीकरितां रकम रुपये शंभरची
देणगी दिल्याबद्दल सदर जहागीरदारसाहेबांचे
आम्ही अत्यंत आभारी आहों.

ब० ग० दाभोळकर.

श्रीमंत

आबाजीराव कृष्ण पंडित पंतप्रतिनिधि

चीफ आफ विशाळगड

ह्यांस हा ग्रंथ

परमादरानें अर्पण केला आहे.

अनुक्रमणिका.

हर्बर्ट स्पेन्सर यांचें चरित्र व पत्रें

प्रकरण पहिलें

---:०:---

कुलपीठिका

सोळाव्या शतकाच्या अखेरीस टॉमस व बालथझार डे हेन्झू आणि इतर कांहीं ह्यूजिनो लोक (फ्रान्सांतील प्रॉटेस्टंट लोक) रोमन क्याथलिकांनीं केलेल्या धर्मछलास कंटाळून लॉरेन प्रांत (फ्रान्सांतील) सोडून इंग्लंदांत स्टूरब्रिज शहरानजीक येऊन राहिले. हे लोक मूळ लारेन प्रांतांत बोहिमियामधून आलेले होते असें दिसतें. हेमूस नांवाचे दुसरे कांहीं बोहिमियामधील लोक याच सुमारास स्वदेश सोडून तेथें राहावयास आले. ब्रेटेल आडनांवाचे लोक सरासरी एक शतकापूर्वीं ह्याच ठिकाणीं येऊन राहिलेले होते.

आतां अशा रीतीनें राहावयास आलेल्या कुटुंबांमध्यें विवाहसंबंध घडून यावे हें स्वाभाविकच आहे. ब्रेटेल व हेन्झू ह्या दोन घराण्यांचे असले संबंध सोळाव्या शतकांत झालेले नमूद केलेले आढळतात, आणि स्टूरब्रिज येथील गांवरजिस्टर चाळून पाहातां असे हे संबंध पुढच्या दोन शतकांत फारच झालेले दिसून येतात. १७४० च्या जून महिन्यांत बर्डस्ले येथील शेतकरी ब्रेटेल यानें इलिझाबेथ हेमूस हिच्याशीं लग्न केलें. हीं दोघें स्पेन्सरसाहेबांचीं त्यांच्या आजोळचीं पणजा–पणजीं होत. ही गोष्ट स्पेन्सरसाहेबांस विशेष महत्त्वाची या कारणास्तव वाटे कीं, ह्या दोन्ही कुटुंबांनीं फ्रेंच राजाच्या धर्मविषयक जुलमी अधिकारास विरोध केलेला होता. ह्या दोघांस जेन नां-

वाची एक मुलगी होऊन शिवाय जेरिमिया व जॉन असे दोन मुलगे होते; आणि हे दोघेहि वेस्लियन पंथाचे धर्मोपदेशक बनलेले होते.

जेन ब्रेटेलनें जॉन होल्म्स ह्याच्याशीं लग्न केलें. हीं स्पेन्सरसाहेबांचीं आजोळचीं आजाआजीं होत. आजास स्पेन्सरसाहेबानीं पाहिलेलें असून त्या वेळीं तो वृद्ध विधुर बनलेला होता, पण त्याची कर्तव्यनिष्ठा आणि जबाबदारीची जाणीव शेवटपर्यंत कायम होती. आपल्या आजीविषयीं *आत्मचरित्रांत साहेबानीं जें प्रतिकूल मत दिलेलें आहे तें मुख्यत्वेंकरून त्यांच्या बापानें केलेल्या वर्णनावरून दिलेलें आहे; आणि ती आपल्या मुलीचें (ह्यांच्या आईचें) त्याच्याशीं (यांच्या बापाशीं) लग्न करण्यास पुष्कळ दिवस प्रतिकूल होती म्हणून तिजबद्दल त्याचा ग्रह वाईट झालेला होता.

डार्बी प्रांतांतील ज्या स्पेन्सर घराण्यांत साहेबांचा जन्म झाला तें घराणें कित्येक शतकें कर्कआयर्टन नामक गांवांत रहात असे. स्पेन्सर हें आडनांव तेथील गांवरजिस्टरांत १९८१ सालीं नमूद केलेलें आढळतें. पण स्पेन्सरसाहेबांच्या वंशाचा पत्ता सातव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धाच्या पलीकडे खात्रीचा लागत नाहीं. त्या वेळीं टामस व विलियम स्पेन्सर असे दोघे बंधु रहात असत. पैकीं टॉमसपासून १७६२ पर्यंत वंशावळ लागते; त्यावर्षीं स्पेन्सरसाहेबांचा आजा मॅथ्यू याचा जन्म झाला. ह्या वेळीं त्या कुटुंबाची इस्टेट म्हटली म्हणजे थोडींशीं घरें आणि दोन शेतें इतकी असे. मॅथ्यू हा लहान वयांतच डार्बी येथें येऊन राहिला, आणि सेंटपीटरच्या शाळेंत आसिस्टनाची नोकरी त्यानें धरिली. तेथील हेडमास्तर, फिवर नांवाचा गृहस्थ असून १७९० सालीं त्यानें पेन्शन घेतलें, तेव्हां मॅथ्यूची आपल्या जाग्यावर त्यानें शिफारस केली. पुढें बारा महिन्यांनीं आपल्या

*" ग्रंथमालें"त छापून प्रसिद्ध झालेलें " स्पेन्सरचरित्र " पहा.

घरीं विद्यार्थी ठेवून वर्षास तेरा गिनी ह्या दरानें आपण त्यास जेवावयास घालून विद्या शिकविण्यास तयार आहों, अशी मॅथ्यूनें जाहिरात दिलेली आढळून येते. पुढें तो १८३१ त निवर्तला; तेव्हां त्यानें त्याची कर्कआयर्टन येथील आपली इस्टेट आपला मुलगा जॉर्ज यास आपल्याजवळ पुष्कळ वर्षें राहून आपली शाळा चालविण्याच्या कामीं त्यानें मदत केली म्हणून बक्षीस दिली; आणि ग्रीनलेनमधील घर चिरंजीव विलियम यांस दिलें.

मॅथ्यू स्पेन्सरची बायको, म्हणजे यांची आजी, क्याथराइन टेलर, हिची यांना सर्वांत उत्तम आठवण असे; कारण ती हे तेवीस वर्षांचे झाले तेव्हां निवर्तली. तिच्यासंबंधानें हे म्हणतात:— "तिच्या ठिकाणीं ठळक रीतीनें श्रेष्ठ अशी बुद्धि मुळींच दिसत नव्हती; ह्यासंबंधानें माझी आई वरचेवर असें म्हणत असे कीं, अशा आईबापांपासून एकंदरींत ठळक रीतीनें हुशार असे मुलगे कसे निपजले याचें आश्चर्य वाटतें." पण तिची नैतिक घटना श्रेष्ठ असल्याबद्दल मुळींच शंका नाहीं; कारण तिच्या ठिकाणीं सर्व घरगुती सद्गुण मोठ्या प्रमाणावर असल्याबद्दल तिचे मुलगे व नातू ह्या दोघांचीहि साक्ष पडते. वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं तिला जॉन वेस्लेचीं डार्बी येथील मार्केटांत झालेलीं धर्मपर संभाषणें प्रथम ऐकावयास सांपडलीं, व त्यांचा तिच्या मनावर चांगला ठसा उमटला; आणि तेव्हांपासून त्याच्या सहवासांत ती बराच काळ घालवूं लागली.

तिला सहा मुलें झालीं, आणि तीं सर्व शरीरानें सुरेख असत; कारण एकखेरीज बाकीचे सर्व मुलगे पांच फूट दहा इंच ते सहा फूट उंच असत, आणि दिसण्यांतहि सुरेख असून, एकंदरींत बरेच सशक्त असत. त्या सर्वांमध्यें व्यक्तिवैशिष्टय पूर्ण असून तें विक्षिप्तपणाच्या जवळ जवळ गेलेलें दिसे; कारण ते सर्व आपलीं मतें जो-

रानें प्रतिपादित असत, आपला हक्क असेल तेथें तो दाखविण्यास कमी करीत नसत, आणि केवळ बाबावाक्याला जुमानीत नसत. त्यांच्यापैकीं हेन्री हा विनोदी असल्यामुळें त्याच्यामध्यें हे स्वभावविशेष इतरांपेक्षां अमळ कमी ठळक दिसत, आणि जॉन हा अहंमन्य व गर्विष्ठ असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं ज्यास्त ठळक दिसत. हेन्री हा स्पेन्सरसाहेबांशीं ममतेनें वागत असल्यामुळें त्यांनींहि पुढें त्याच्या मुलांनातवंडांशीं ममतेचेंच वर्तन ठेविलें होतें, आणि जॉनविषयींचा वाईट ग्रह त्यांच्या मनांतून पूर्णपणें निघून गेला नाहीं. ह्यांच्या सर्व चुलत्यांपैकीं ह्यांच्या मनावर ज्यानें आपला ठसा सर्वांत ठळक व कायमचा उमटविला तो टॉमस होय. विलियम या चुलत्याचीं मतें रूढ मतांपासून सर्वांत कमी भिन्न होतीं, आणि म्हणून त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल ह्यांच्या मनावर विशेष ठसा उमटलेला नव्हता; पण त्याचा स्वभाव सुंदर व उमदा असल्याबद्दलची आठवण यांना शेवटपर्यंत राहिलेली होती.

स्पेन्सरसाहेबांचा बाप जार्ज हा विलक्षण सुंदर असे असें त्याचें वर्णन आढळतें. त्याचें लग्न झाल्यावर एक दोन वर्षांनीं त्याची प्रकृति ढांसळली, आणि शेवटपर्यंत वाईट प्रकृतीनें त्याची पिच्छा पुरविली होती; तरी तो ७६ वर्षें जगला. लग्न करण्यापूर्वीं त्यानें पैसे सांठवून कित्येक लहान लहान घरें विकत घेतलीं होतीं, आणि टॉमसला केंब्रिज येथें कालेजांत जाण्यासाठीं पैसे दिले होते. पण १८२४ सालाच्या सुमारास वाईट प्रकृति आणि फितीच्या यंत्राच्या व्यापारांत अपयश यांनीं तो पैशाच्या बाबतींत खालीं आला. पण इकडे टॉमसला उद्योग लागून त्याची स्थिति बरीच सुधारली. तेव्हां जॉर्ज त्यास म्हणाला, आतां तुमच्या आमच्या नशिबाचीं पारडीं फिरलीं आहेत; तेव्हां तूं सावकार हो, आणि मी कर्जदार होतों. त्यांच्यामध्यें कांहीं प्रकारचीं बौद्धिक सामर्थ्यें जरी विलक्षण होतीं,

तरी व्यावहारिक शहाणपण फार कमी असे. कांहीं बाबतींत त्याचा हात विलक्षण सढैल असून कांहीं बाबतींत विलक्षण कंजूष असे. साध्य व साधनें ह्यांचें मोल तो बरोबर ध्यानांत आणीत नसे. तो जरी नेहमीं उद्योगांत असे तरी त्याचे उद्योग महत्त्वाच्या गोष्टींपेक्षां क्षुल्लक गोष्टींच्या संबंधाचेच जास्त असत. मोठ्या गोष्टींकडे पाहून त्याच्या बुद्धीला जणूं काय पक्षघातच होई. त्यानें स्वतांच ही गोष्ट एके ठिकाणीं कबूल केली आहे. तो शास्त्राचा व्यासंग विशेष करीत असे, आणि तो, सृष्टींत कार्यकारण–भाव स्वाभाविक आहे, दैविक नाहीं, ह्या धोरणावर करी. नैतिक, राजकीय, आणि अध्यात्म विषयांचा त्यानें पद्धतशीर अभ्यास कधींच केला नाहीं. वाङ्मयाच्या संबंधानें पाहतां पुस्तकांचा अभ्यास त्यांच्यांतील प्रतिपाद्य विषयाचे गुणदोष पाहाण्याच्या दृष्टीनें करण्यापेक्षां त्यांत वापरलेल्या भाषेंतील गुणदोष पाहण्याच्याच दृष्टीनें तो विशेष करी. त्याची भाषासरणी जरी जोरदार नसे, तरी योग्य, स्पष्ट, आणि शुद्ध अशी असे. हट्टवादीपणा हेंच नांव बहुतेक शोभेल असा दृढपणा, कोटिक्रम करण्याची हौस, बाबावाक्याचा अनादर, आणि दोषैकदृष्टि, हे विशेष त्याच्यांत जाड्या प्रमाणावर असत. तो स्वतः सदसद्विवेकबुद्धीस नमून वागणारा असून इतरांबद्दल मात्र संशय घेण्याकडे त्याचा कल असे. विशेषतः सार्वजनिक कामांत एकाद्या कृत्याचें कांहीं तरी गुप्त काळेंबेरें कारण असेल असें समजण्याकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति ज्यास्त असे. मतांप्रमाणेंच पोषाक आणि सामाजिक चालीरीती ह्या बाबतींतहि त्याचा स्वच्छंदीपणा व्यक्त होत असे. त्याची इतरांशीं वागण्याची पद्धति जरी गोड आणि मोकळेपणाची असे, तरी समाजाच्या ठराविक पद्धतींस तो फारच अल्प मान देत असे. याच्या काळीं ज्या मोठाल्या चळवळी चालल्या होत्या त्यांतील बहुतेक चळवळींत त्याचें अंग असे. एकादी वाईट गोष्ट सुधरावयाची

असेल किंवा चांगलें कृत्य करावयाचें असेल तर तें तो मोठ्या उत्सुकतेनें करी.

त्याच्यासंबंधानें स्पेन्सरसाहेब म्हणतात:—" लहानपणीं धर्मविषयक बाबतींत त्याच्या भावांप्रमाणेंच त्याच्या मनावरहि बळकट ठसे उमटलेले होते; आणि वयाच्या पस्तिसाव्या वर्षापर्यंत नेहमींचे धर्मविधि तो नियमानें करीत असे; मात्र ते कुटुंबाबरोबर करीत नसे. पण सर्व दिशांनीं त्याचे स्वतंत्र विचार जसे वाढत चालले, तशीं त्याचीं धर्मविषयक मतें त्याच्या बंधूंच्या मतांपासून भिन्न होत चाललीं. म्हणून तो वेस्कियन पंथाच्या देवळांत प्रार्थनेस जावयाचें सोडून केकर पंथाच्या देवळांत जाऊं लागला. ह्याचें कारण त्या लोकांचीं विशिष्ट मतें त्यास पसंत होतीं हें नव्हे, तर त्याच्या स्वतांच्या मतांना तेथें पूर्ण अवकाश सांपडे हें होय. त्याचें मत सर्व प्रकारच्या उपाध्येवर्गाविरुद्ध फारच दृढ झालें होतें, आणि वेस्लियन पंथाच्या धर्मोपाध्यांविरुद्ध विशेषच झालें होतें. म्हणून केकरपंथाच्या लोकांत कोणत्याहि प्रकारचे उपाध्ये नसल्यामुळें तो पंथ त्यास विशेष पसंत पडला होता. उत्तर वयांत त्याचीं धर्मविषयक मतें रूढ मतांहून ह्याच्यापेक्षांहि ज्यास्त भिन्न झालीं, आणि शेवटीं एतद्विषयक मीं प्रतिपादिलेलीं मतेंच त्यास बरोबर वाटूं लागलीं. आतां त्यानें असें कधीं स्पष्ट बोलून दाखविलें होतें असें नाहीं; पण रूढ धर्माबद्दल त्याच्या अखेरच्या वर्षांत त्याच्या तोंडून निघालेल्या उद्गारांवरून त्यानें तो सोडून दिला आहे असें व्यक्त होत होतें आणि त्याच्या स्वभावाचा मोठ्याच प्रमाणावर जो एक विशेष होता त्याचें ह्यावरून चांगलें निदर्शन होतें. तो हा कीं, पुष्कळ वृद्ध होईपर्यंत मतविषयक बाबतींत तो लवचीक राहिला होता. बहुतेक पुरुष, आणि त्यांच्यापेक्षांहि ज्यास्त प्रमाणानें बहुतेक स्त्रिया ह्या बाबतींत लवकरच घट्ट बनून जात असतात; (म्हणजे, पुराव्यावरून स्वमत बदलण्याची त्यांची शक्ति

गेलेली असते.) पण याचें तसें झालें नाहीं. त्याच्यांत यासंबंधानें सारखे बदल होत राहिले, आणि बदलण्याची ही वृत्ति त्याच्यांत अखेरपावेतों कायम राहिली. "

स्पेन्सरसाहेबांची आई हॅरियट होल्म्स मध्यम उंचीची असून अंगानें सडपातळ असे, आणि तरुणपणीं चांगलीच सुरेख दिसे. ती अठरा वर्षांची असतां एका वर्षाहून ज्यास्त दिवस तिनें आपली रोजनिशी लिहून ठेविली आहे. तिजवरून तिचा स्वभाव गोड असून नैतिक दृष्ट्या फार बळकट असे असें दिसतें. जॉर्ज स्पेन्सरबरोबर तिनें लग्न करावें ह्या गोष्टीस तिचीं आईबापें प्रथम प्रतिकूल होतीं; त्यासंबंधानें तिनें त्यांस लिहिलेल्या एका पत्रावरून देखील ही गोष्ट व्यक्त होते. त्यांत ती म्हणतेः—"मला कितीहि वाईट वाटो, ह्या बाबतींत तुमच्या इच्छेविरुद्ध न वागण्याचा मीं पहिल्यापासून दृढ निश्चय केला आहे; आणि ह्या बाबतींत तुमच्या मताशीं माझें मत जरी कधींहि जुळणार नाहीं, तरी तो विचार मीं अगदीं सोडून दिला आहे असें जें मी तुम्हांस खात्रीनें सांगतें त्याबद्दल बिलकूल शंका मनांत आणूं नका. " कित्येक बाबतींत तिचें शील ह्युजिनो लोकांच्या शीलाशीं जुळत नसे. कारण तिचा कल इतरांशीं मतविरोध दाखविण्यापेक्षां मतैक्य दाखविण्याकडेच विशेष असे. तिचा नवरा किंवा मुलगा ह्यांच्या बौद्धिक व्यासंगाच्या संबंधानें तिला बहुतेक मुळींच सहानुभूति नसे. ती अगदीं शुद्ध मनाची असल्यामुळें मनाला न वाटणाऱ्या सहानुभूतीचें ढोंग तिच्यानें करवत नसे. वाङ्मयाचा अभ्यास जरी ती फारच अल्प करीत असे, तरी तिची भाषासरणी विशद असून, तिच्या बोलण्यांत सौंदर्यहि नसे असें नाहीं. स्वभावाची समता आणि गोडपणा, कर्तव्यें बजावण्यामध्यें मनस्तत्परता, इतरांकरितां आत्मत्याग करण्याची तयारी, हे गुण तिच्यांत अखेरपावेतों कायम होते. तिच्या रोजनिशींत देवळासंबंधाच्या बातम्या

आणि धर्मोपाध्ये यांचेच उल्लेख फार आढळतात. एके ठिकाणीं ती असें म्हणते:—"रविवारीं देवळास जावयाचें चुकविणें मला कधींहि आवडणार नाहीं; कारण तसें केल्यास रविवारसा मला मुळींच भासणार नाहीं." तिचा नवरा तिच्याबद्दल मन:पूर्वक काळजी करीत नसे असें जरी नाहीं, तरी नादुरुस्त प्रकृति आणि पैशाची टंचाई ह्यांचा जेव्हां त्यास उपद्रव होऊं लागला, तेव्हां तिच्या गृहसुखाला ग्रहण लागूं लागलें. मग प्रेमाचे आविर्भाव वरचेवर अदृश्य होऊं लागले; ह्यास तिच्या बाजूचें कारण त्याच्या बौद्धिक व्यासंगांविषयीं तिच्याठायीं सहानुभूतीचा अभाव हें होतें, आणि त्याच्या बाजूचें कारण, प्रत्येक गोष्ट म्हटल्याप्रमाणें करून घेण्याचा त्याचा हट्ट आणि चुक्यांबद्दल शिव्या देण्याची हौस हें होतें.

प्रकरण दुसरें

बाळपण व तरुण वय

ज्या घरांत जॉर्ज स्पेन्सर आणि त्याची बायको ह्यांनीं आपल्या विवाहित कारकीर्दीस सुरवात केली आणि ज्यांत त्याचा मुलगा (प्रस्तुत चरित्रनायक) ता० २७ एप्रिल १८२० रोजीं जन्मला तें डार्बी शहरीं एक्सीटर रो या रस्त्यावरील १२ नंबरचें घर होतें; हल्लीं त्यावर २७ नंबर पडलेला आहे. त्याला बाप्तिस्मा देऊन त्याचें नांव ठेवण्याचा विधि ता० १९ जून रोजीं जॉन कर्शा नामक उपाध्यानें केला, आणि त्याचें नांव हर्बर्ट असें ठेविलें.

या मुलाच्या अगदीं पहिल्या वर्षांबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तथापि तीं त्यास विशेष सुखाचीं गेलीं नसतील असें अनु-

मान करण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं त्याच्या आईबापांची प्रकृति चांगली नसून तीं फार काळजींत असत, आणि तो स्वत:हि सशक्त नव्हता. शिवाय त्याला बहीणभावांचें संगतिसुख नव्हतें. कारण त्याच्या मागून जरी त्यास चार भाऊ व चार बहिणी झाल्या, तरी त्यांपैकीं एक बहीण लुइसा खेरीज करून बाकीचीं थोड्याशा दिवसांहून अधिक काल जगलीं नाहींत; आणि लुइसाहि ह्याच्यापेक्षां एक वर्षानें लहान असून, पावणेतीन वर्षांचीच होऊन वारली. एकंदरींत मुलाची ह्या वेळची परिस्थिति किती धीर खचविणारी होती हें बापाच्या वेळच्या पत्रांवरून स्पष्ट दिसतें. उदाहरणार्थ, १८२३ सालीं भावास लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतो:—" प्रस्तुतची वेळ माझ्या कारकीर्दींतील आणीबाणीची दिसते. आतां कदाचित् माझी परिस्थिति आणि प्रकृति बरीच सुधारेल, किंवा पुन: प्रकृति बिघडून माझी स्थिति अगदीं दीनवाणी, बहुतेक वेड्यासारखी होऊन जाईल." पुढें १८२४ च्या जानेवारींत तो लिहितो:—" माझी अगदीं पक्की खात्री झाली आहे कीं, हल्लींचा धंदा शिक्षकाचा करीत असतां माझी प्रकृति कधीं चांगली रहावयाची नाहीं. तो करीत असतां जें वांकावें लागतें, व कोंडून घ्यावें लागतें, तेंच तेंच काम करावें लागतें, आणि स्वभाव व सहनशीलता यांस वरचेवर हिसका द्यावा लागतो, त्याचा परिणाम प्रकृतीवर वाईट होतो..... आह्मी घरीं गेलों तेव्हां आमचीं मुलें बरीं होतीं. मला बरें वाटतें हें पाहून हॅरिएटला (बायकोला) ज्यास्त सुख होत आहे. ती मला फारच ममतेनें वागविते, आणि मी मात्र तिच्या ममतेची योग्य फेड करीत नाहीं. किती कोणीं केलें तरी समाधान वाटूं नये असा माझा स्वभावच दिसतो."

नवीन धंदा शोधून काढणें हें जसें उदरनिर्वाहाचें साधन या दृष्टीनें महत्त्वाचें होतें तसें त्याच्या दु:खांचा विसर पाडण्याचें साधन ह्या दृष्टीनें त्याहूनहि ज्यास्त महत्त्वाचें होतें. त्यास जे नवे धंदे लोकांनीं

सुचविले त्यांत जमिनीची मोजणी करणें, चामडी रंगवणें, आणि फ्रान्सच्या दक्षिण भागांत एजन्सी पत्करणें हे होते. कोणीं त्यास धर्मखातेंहि सुचविलें. पण त्याच्या मनाचा कल फीतीचा कारखाना काढणें ह्या धंद्याकडे सर्वांत ज्यास्त होता, कारण त्या वेळीं जो तो त्याच धंद्यांत शिरूं लागला होता, आणि शिवाय त्याच्या शोधक बुद्धीला त्यांत अवकाश सांपडण्यासारखा होता. १८२३ सालीं लंडनांत नव्या यंत्रांचे परवाने कोणाकोणास काय काय मिळाले आहेत हें तो पहाण्यांत गुंतला असतां आपल्या बायकोस लिहितोः—" तूं आणि मीं जसलें नवें यंत्र शोधून काढण्याच्या बेतांत आहों तसल्या यंत्राचा परवाना आधींच कोणीं घेतलेला आहे कीं काय हें मी मुख्यत्वेंकरून पह त आहें." ह्या नूतन शोधाचें पुढें काय झालें तें समजत नाहीं; पण पुढच्या वर्षीं तो टॉमसला असें लिहितो कीं, मी व माझे दुसरे भाऊ मिळून एक यंत्र विकत घेतलें आहे. हल्लीं आमचा विचार आमची शाळा काढून तेथें फीतीचे माग स्थापन करावे, आणि ते चालवण्यास स्वतांच शिकावें, असा आहे. दुसऱ्या कोणत्या तरी मार्गानें उदरनिर्वाहाचें साधन मिळवणें शक्य असल्यास पुनः शिकवण्याचें काम करावयाचें नाहीं असा माझा बेत आहे. माझ्या डोक्यांत कल्पना अशा कांहीं येत आहेत की, त्या तुला कदाचित् मनोराज्यापैकीं वाटतील, पण माझ्या सध्यांच्या प्रसंगांत माझें धैर्य खचूं न देण्याचा तो एक मार्ग आहे.

वरील बेत फिसकटल्यामुळें हें कुटुंब १८२४ च्या जून—जुलईच्या सुमारास नाटिंग्हाम एथें गेलें; त्याचें मुख्य कारण फितीच्या धंद्याचा तो एक केंद्र होता हें होय. व्यापारी दृष्टीनें ह्या स्थलान्तरापासून फायदा झाला नाहीं, पण इतर दृष्टींनीं झाला. त्याची व त्याच्या बायकोची प्रकृति तेणेंकरून सुधारली, आणि त्याबरोबर त्याची उमेदहि वाढली. मुलाचा ह्यापासून काय नफातोटा झाला

हें तेव्हांच्या थोड्याशा उपलब्ध पत्रांवरून फारसें ध्यानांत येत नाहीं, पण एकंदरींत त्याची स्थिति, ह्या वेळीं त्याची एकुलती एक बहीणहि वारल्यामुळें, केविलवाणीच होती असें दिसतें. तथापि डार्बीपेक्षां एथें त्यास खेडेगांवच्या राहणीचें सुख ज्यास्त मिळालें; कारण तो शेजारच्या गवताळ जमिनीवर मनःपूर्वक बहुतेक एकटाच खुशाल भटकावयास जात असे. धड्यांचा त्रास मागें नसल्यामुळें पुस्तकी ज्ञानांत तो आपल्या वयाच्या इतर मुलांहून मागें असे. वयाच्या सातव्या वर्षीं त्याचें लिहिणें आणि रेखाटणें चांगलें आहे म्हणून त्याचा बाप व इतर लोक ह्यांनीं म्हटलेलें आढळतें, आणि त्याच्या बापानें त्याचें पहिलें ड्राइंगचें पुस्तक, त्यानें स्वतः पसंत करून आणि मुख्यत्वेंकरून स्वताच्या कल्पनेनें आकृति काढलेलें म्हणून, जपून ठेविलें होतें. पण त्याच्या वाचनाबद्दल त्याची किंचितहि स्तुति केलेली कोठें आढळत नाहीं.

१८२७ च्या प्रारंभीं लवकरच हें कुटुंब डार्बी शहरीं परत आलें, आणि विलमट रस्त्यावर ८ नंबरच्या घरांत राहिलें. त्याचा बाप पुनः पोरें पढवूं लागला. सरासरी तीन वर्षेंपर्यंत हर्बर्ट मेथरच्या शाळेंत गेला, आणि नंतर त्याचा चुलता विलियम यानें घातलेल्या शाळेंत गेला. त्या वेळीं त्याची विद्या किती झाली होती ह्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हटला म्हणजे त्यानें १८२८ सालीं लिहिलेलें एक कॉपीबुक किंवा पुस्त्यांची वही आढळते; त्यांतील अक्षराबद्दल एक शिक्षक असें म्हणतो कीं, असलें अक्षर ह्याहून कित्येक वर्षांनीं मोठ्या मुलाचें देखील आढळावयाचें नाहीं. दुसरें एक स्तोत्रांचें पुस्तक सांपडतें, आणि त्यांत तीं पाठ केल्याच्या १८२८ व २९ ह्या सालच्या तारखा घातलेल्या आढळतात. त्यांच्या संख्येवरून पाहतां त्याची स्मरणशक्ति सामान्यतः बरी होती असें दिसतें. त्याच्या ठिकाणीं बाबावाक्याची पर्वा न बाळगण्याची प्रवृत्ति विशेषच बळकट होती;

कारण त्याच्या बापाची लहर लागेल तेव्हां वळण लावण्याची पद्धति, आणि त्याच्या आईचें सौम्य सांगणें, ह्यामुळें त्याच्या स्वच्छंदीपणाला योग्य आळाबंदा पडला नव्हता. घराबाहेर त्याला स्वेच्छेप्रमाणें वागण्याची मुभा असे. यामुळें एके प्रसगीं त्याच्या जीवावरच बेतली होती. तो प्रकार असा. डर्वेंट नदी डार्बी शहरांतूनच वहात असल्यामुळें मासे धरण्याचा त्यास फार नाद लागला होता. एके दिवशीं ह्या नदीच्या कांठीं तो मासे धरीत बसला असतां त्याचा तोल गेला, आणि तो नदींत पडला. तेथें नदीचा प्रवाह जोराचा असल्यामुळें तो झपाट्यानें खालीं वहात चालला, तेव्हां शेजारीं उभ्या असलेल्या लोकांनीं ओरड केली. जॉर्ज होलम हा मुलगा त्याच्याहून कांहीं वर्षांनीं मोठा असून तो समोरच्या तीरावर होता, त्यानें ती ओरड ऐकिली; आणि एक मुलगा वहावत चाललेला आहेसें पाहून तो तसाच त्या तीरानें पुढें धांवत गेला, आणि जातां जातां अंगांतील ज्याकेट काढून टाकून त्या मुलाच्या नजीक आल्यावर त्यानें प्रवाहांत उडी घातली, आणि समोरच्या किनाऱ्याकडे पोहत जाऊन त्या मुलास पकडिलें, आणि मोठ्या पराकाष्ठेनें कांठावर आणिलें. पुढें १८९३ सालीं ह्या गृहस्थास स्पेन्सरसाहेबानीं आपल्या एकंदर ग्रंथांची उत्तम बांधणीची एकेक प्रत नजर केली आणि, त्यांतील पहिल्या ग्रंथाच्या पहिल्या (कोऱ्या) पानावर पुढील कृतज्ञताप्रदर्शक शब्द लिहिले:—" हर्बर्ट स्पेन्सर यांजकडून त्याचा फार दिवसांचा मित्र जॉर्ज होलम यास, ज्याच्या लहानपणीं केलेल्या धैर्ययुक्त सहाय्याशिवाय हा ग्रंथ किंवा ग्रंथाबरोबरच्या ग्रंथांपैकीं कोणताहि ग्रंथ कधींच आस्तित्वांत आला नसता."

यांच्या वयाच्या सात ते तेरा या वर्षांची हकीकत देण्यास यांचें " आत्मचरित्र " आणि बापानें करून ठेविलेलीं टिपणें यांवरच मुख्यत्वेंकरून अवलंबून रहावें लागतें. आणि हीं दोन्हीं पुढें लिहिलेलीं

असल्यामुळें बापाच्या लिहिण्यावर मुलाच्या मोठेपणाची, आणि स्पेन्सरसाहेबांच्या लिहिण्यावर त्यांच्या अनुभवाची, कांहीं तरी छाप पडलीच असली पाहिजे. असो. त्यांवरून असें दिसतें कीं, ह्या अमदानींत शाळेंतील ठराविक धडच्यांमध्यें मुलानें फारच अल्प प्रगति केली होती, तथापि इकडची तिकडची माहिती मात्र इतरांपेक्षां बरीच संपादन केली होती. ह्यामुळें तेरा वर्षांचा होण्यापूर्वींच, मुलांना शिकविण्यासाठीं पदार्थविज्ञान आणि रसायन ह्या दोन शास्त्रांतील प्रयोग करण्याच्या कामीं, तो बापास मदत करूं लागला. ह्याच्यापूर्वीं तो अकरा वर्षांचाच असतांना डा० स्पर्झीम याचीं कपाल विद्येवरील व्याख्यानें त्यानें ऐकिलीं होतीं. कीटक आणि वनस्पति ह्यांची इतर मुलांपेक्षां त्यास फारच ज्यास्त माहिती झाली होती, आणि सृष्टींतील वस्तूंकडे पाहून त्यांचे नमुने रेखाटण्यांत तो कुशल झाला होता. कादंबरीरूपी ग्रंथ तो आवडीनें वाचीत असे. पुष्कळ काळपर्यंत तो एकटा (भाऊ–बहिणी यांच्या संगतिविना) असल्यामुळें आपल्या विचारांत गर्क होऊन जाण्याची प्रवृत्ति त्याच्यांत बळावत होती. बौद्धिक बाजूनें पहातां, बापानें त्यास दिलेल्या शिक्षणाचा एक मुख्य परिणाम हा झाला कीं, बाबावाक्यावर विश्वास ठेवण्याच्याऐवजीं कोणत्याहि चमत्काराचें स्पष्टीकरण करणारें कारण पहात बसण्याची, म्हणजे, प्रत्येक गोष्ट दैविक रीत्या न घडतां स्वाभाविक रीत्या घडत असते असें मानण्याची त्यास संवय लागली. मुलाचें शील बनविण्यास जीं अनेक कारणें झालीं तीं ध्यानांत आणतांना ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, तो आपल्या वयाच्या इतर मुलांबरोबर फारसा खेळत नसे, आणि त्यामुळें एकमेकांच्या सहवासानें मुलांच्या मनावर जे परिणाम घडतात ते त्याच्या मनावर फारच अल्प घडलेले होते. त्याला मोठ्या माणसांचाच सहवास फार असे, आणि त्यांपैकीं बहुतेकांचे ठिकाणीं ठळक व्यक्तिवैशि-

ष्टच असे. आपल्या आजाआजींबद्दलच्या ज्या आठवणी त्यानें दिल्या आहेत त्यांवरून असें अनुमान निघतें कीं, त्यांची त्यांना अमळ भीतिच वाटत असे, आणि असें असलें म्हणजे निकट आणि प्रेमळ सहवास अल्पच घडतो. तो म्हणतो:—" माझा वृद्ध आजा (बापाचा बाप) उद्विग्न दिसत असे; मी त्याला हंसतांना कधींच पाहिलें नाहीं." सामान्य मुलाच्या ठिकाणीं, वृद्ध नातेवाईकांच्या क्षीण होणाऱ्या इंद्रियांमुळें किंवा विक्षिप्तपणामुळें उमटणारा ठसा तरुणांच्या उत्साही वर्तनानें पुसटला जात असतो. पण बहुतेकांशीं मोठ्याच माणसांच्या सहवासांत असणाऱ्या आणि त्यांचें गंभीर संभाषण लक्ष्यपूर्वक ऐकून, तें चाललें असतां आपणहि आपले विचार प्रकट करणाऱ्या मुलाची गोष्ट निराळी असते. त्याचे चुलते आणि बाप ह्यांचें त्याच्यावर नैतिक आणि बौद्धिक वजन फारच असे. रूढ मतांच्या संबंधानें ते नेहमीं विचारैकदृष्टि असत. कारण ते त्यांच्या संबंधानें जे सिद्धान्त बनवीत ते बाबावाक्याच्या आधारावर न बनवितां त्यांच्या बुडीं असलेल्या तत्त्वांच्या आधारावर बनवीत असत. त्यांच्या गंभीर वादविदांना विनोदयुक्त भाषण किंवा थट्टा यांनीं रंगेल स्वरूप क्वचितच येत असे. ते हे वादविवाद अगदीं मनःपूर्वक करीत असल्यामुळें त्यांत केवळ वादविवादाची हास किंवा विजय मिळविण्याची हौस फारच अल्प असे. वाङ्मय, इतिहास आणि उदात्त कला ह्यांपेक्षां शास्त्र, धर्म, आणि समाज एतद्विषयक विषयांची आस्था त्यांस जास्त असे, आणि त्या विषयांची चर्चा ते दररोज त्याच्या देखत करीत असत. एवंच सामाजिक, राजकीय आणि धार्मिक विषयांच्या संबंधानें जी आस्था त्याच्या ठिकाणीं अखेरपर्यंत दिसत असे, तिचें बीज अशा रीतीनें त्याच्या मनांत अगदीं लहानपणींच पेरिलें गेलें होतें.

इकडे त्याच्या शिक्षणाचा प्रश्न दररोज ज्यास्त ज्यास्त निकडीचा होत चालला. आतां तो तेरा वर्षांचा झालेला असून स्वतंत्र आणि

स्वच्छंदी बनलेला होता; त्या वेळच्या शाळांच्या अभ्यासक्रमांत नसलेल्या कांहीं विषयांची त्यास ठळक आवड उत्पन्न झालेली होती, आणि त्यांत असलेल्या कांहीं विषयांची त्यास ह्याहूनहि ज्यास्त ठळक ओकारी आलेली होती; शब्दांपेक्षां वस्तूंची आवड त्यास ज्यास्त वाटूं लागली होती, आणि इतरांच्या विचारांची माहिती करून घेण्यापेक्षां स्वतांच विचार करण्याची प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं ज्यास्त उत्पन्न झालेली होती. अशा मुलाची व्यवस्था कशी लावावी हा त्याच्या बापास व चुलत्यांस मोठाच विचार पडण्यासारखा होता. " ते जर कमी शहाणे आणि कमी आत्मनियंत्रण करणारे असते, तर त्यांनीं त्यांच्या कुटुंबांत उत्पन्न झालेल्या ह्या विलक्षण मुलाचें मातेरें केलें असतें " असें यांच्या " आत्मचरित्रां"तील ह्यांच्या मूलवयाची व तरुणवयाची हकीकत वाचून जें हक्स्लेनें म्हटलें तें अगदीं बरोबर आहे.

या मुलाचें काय करावें म्हणून त्यांना जी पंचाईत पडली होती तींतून पार पडण्याचा उपाय त्याचा चुलता रेव्हरंड टामस स्पेन्सर हिन्टन एथें असे त्यानें सुचविला. त्यानें भावास लिहिलें कीं, " आपला एक पुतण्या आपल्याजवळ ठेवावा असें माझ्या व माझ्या बायकोच्या मनांत फार आहे; पण ज्या अर्थीं हर्बर्ट हा आपल्या आईला पुष्कळ मदत करीत असल्यामुळें, तुम्हां दोघांनाहि तो विश्रांतिस्थान असल्यामुळें तुम्ही पाठवूं शकणार नाहीं, त्या अर्थीं हेन्री यास (दुसऱ्या एका भावाच्या मुलास) आणण्याचा आह्मी विचार करीत आहों. " यावर हर्बर्टच्या बापानें त्यास लिहिलें कीं, " आह्मीं हर्बर्टला तुमच्याकडे पाठवितों, आणि त्याबद्दल हेन्रीला इकडे आणितों. " ही व्यवस्था दोघांनाहि पटली, पण हर्बर्टला त्याबद्दल कांहींच सांगितलें नव्हतें. म्हणून आईबाप त्यास जेव्हां टामसकडे घेऊन गेलीं, तेव्हां आपण मजेनें कांहीं दिवस इकडे

आलों आहों असें त्यास वाटलें. अर्थात् तो आल्यावर कांहीं दिवसांनीं चुलत्यानें जेव्हां त्यास भूमिति शिकविण्यास बसविलें, तेव्हां त्यास कसेंसेंच वाटलें; आणि पुढें एक महिन्यानें आपल्यास आईबापांबरोबर परत जावयाचें नाहीं असें जेव्हां त्यास समजलें, तेव्हां तर तो अधिकच चिडला. घरच्या कामांचा विचार चालला असतां त्यांत तोंड घालण्याची त्यास आजपर्यंत संवय झालेली असल्यामुळें, आणि ह्या कामांत, त्याच्या मताप्रमाणें, त्याची सल्ला घेणें तर विशेषच अगत्याचें असल्यामुळें, त्याला न विचारतां दोन महिन्यांपूर्वींच त्यांनीं ही गोष्ट ठरवून टाकिली म्हणजे काय ! सारांश, ह्या बाबतींत त्यास आपला मोठा अन्याय झाला असें वाटलें; आणि अभ्यासाविषयीं कंटाळा व दुसऱ्याच्या कह्यांत राहण्याची नावड यांची त्यांत भर पडली. ह्याचा परिणाम लवकरच दिसून आला. आईबापें घरीं परत गेल्यानंतर दोन आठवड्यांच्या आंतच एके दिवशीं पहांटेस आपल्या बेताचा सुगावा कोणास लागूं न देतां तो चुलत्याच्या घरांतून निघाला, आणि त्यानें डार्बीचा रस्ता धरिला. त्या दिवशीं आणि पुढच्या दोन दिवशीं त्यानें जे जे पराक्रम केले त्यांचें हुबेहुब वर्णन " आत्मचरित्रांत " त्यानें दिलेलें आहे; तें वाचून तें पुष्कळांस यथार्थ वाटेल. तो म्हणतोः—" तुमच्या नंतरच्या पराक्रमांकडे पाहून जरी मोठेंच आश्चर्य आणि कौतुक वाटतें, तरी तेरा वर्षांच्या मुलानें उद्विग्न आणि उपाशीं असतां एक दिवस ४८ मैल चालावें, दुसरें दिवशीं ४७ मैल चालावें, आणि तिसरे दिवशीं राहिलेलें अंतर चालून जावें ही हकीकत वाचून जें आश्चर्य व कौतुक मला वाटलें त्यापुढें तें कांहींच नाहीं. हा तुमचा पराक्रम खरोखरच अद्भुत होता. "

पळून गेलेल्या आपल्या पुतण्यास पकडून परत आणण्याचा यत्न

चुलताचुलतीनें मुळींच केला नाहीं. ह्याचें कारण त्यानें असें करून आपला मोठा अपमान केला असें त्यांस वाटलें हें होय. पण ह्यावरून त्यांचें वर्तन न्याय्य ठरत नाहीं. " हर्बर्टचें हें गैर वर्तन पाहून मला लाज व मानखण्डना झालेली वाटते " असें त्याच्या आईनें लिहिलें; आणि " आपल्या गैरवर्तन करणाऱ्या मुलाचें शील कसें बनणार आणि पुढें काय होणार हा विचार करण्यांत मला सर्व रात्र झोंप आली नाहीं, " असें बापानें लिहिलें. आणि मुलगा बहुतेक वेडाच होऊन गेला आहे असें लिहून त्याच्या चुलताचुलतीची त्याच्याबद्दल सहानुभूति उत्पन्न करण्याची खटपट त्यानें केली.

त्याच्या बापाच्या पत्रांत आणखी असा मजकूर होता:—" मीं त्याला विचारिलें, ' तुला आपल्या चुलत्यानें अशा निष्ठुरपणानें वागविलें तरी कसें ? ' त्यानें उत्तर दिलें, ' मी मोठी चूक करीत आहें असें मला तेव्हांच वाटलें, पण मला असेंहि वाटलें कीं ही गोष्ट माझ्या स्वाधीनची नाहीं. मी इकडे येत असतांना सारखा रडत होतों, आणि माझें पुढें काय होणार हे विचार माझ्या मनांत येत होते. माझें बरें व्हावें अशीच माझ्या चुलताचुलतीची इच्छा आहे हें मी जाणतों, आणि तेथें मी राहिलों असतों तर मला शिकण्याच्या बाबतींत पुष्कळ फायदा झाला असता हेंहि मी समजतों. पण तेथें प्रत्येक गोष्ट इतकी निराळी आहे कीं मला ती सहन होत नाहीं, आणि तुम्हीं मला घरीं राहूं दिलें तर पूर्वीं कधींहि केला नाहीं इतका कसून अभ्यास करण्याचें माझ्या मनांत आहे. ' मी त्याला म्हणालों, ' पण तुला माहीत आहे कीं तुझ्या चुलत्याला लातिन माझ्यापेक्षां पुष्कळ ज्यास्त समजतें, आणि तें तुला फार आवश्यक आहे. ' त्यानें उत्तर केलें, " खरेंच, मला घराची इतकी आठवण झाली ती त्या लाटिनमुळें झाली, कारण मला वाटलें, सगळा हिंवाळा माझें लाटिन व्याकरण शिकत माझ्या खोलींत बसणें माझ्या हातून कधींहि हो-

णार नाहीं. माझ्या भूमितीची स्थिति निराळी होती. मला युक्लिदची फार आवड वाटूं लागली होती.....पण तेथें सर्व गोष्टी इतक्या निराळ्या आहेत कीं आपलें घर म्हणजे काय याची किंमत मला आतांपर्यंत कळली नव्हती, आणि मला जर तुम्ही येथें राहूं द्याल तर मी एथून जाण्यापूर्वी होतों त्याहून फारच निराळ्या प्रकारचा मुलगा होईन."

एका पंधरवड्याच्या आंत त्याची पुनः हिन्टन येथें रवानगी झाली. नंतर कांहीं दिवसांनीं त्याच्या चुलत्यानें लिहिलें कीं, "तो एथें परत आल्यापासून त्याची वागणूक विशेषच समाधानकारक आहे. तो थंडपणानें वागत आहे, आणि आपणास एथें सुख होतें असें दाखविण्याची त्याची इच्छा दिसते." आपल्या लाटिनविषयीं मुलगा बापास लिहितो; "मला पूर्वींपेक्षां लाटिन भाषा ज्यास्त आवडूं लागली आहे हें ऐकून तुला कदाचित् आश्चर्य वाटेल." नूतन वर्षारंभीं त्यानें फ्रेंच शिकण्यास सुरवात केली, आणि मार्चांत ग्रीक शिकण्यास आरंभ केला. त्याला ह्या जुन्या भाषांची अभिरुची नसून केवळ कर्तव्य दृष्टीनें तो त्यांचें अध्ययन करीत होता, हें पावसाळ्यांत तो घरीं गेला होता तेव्हां त्यानें आपल्या चुलत्यास लिहिलेल्या पत्रावरून दिसतें. तो म्हणतो, "ह्या मृतभाषा बहुतेक प्रत्येक शास्त्राच्या अध्ययनांत इतक्या उपयुक्त आहेत हें मला आतां कळूं लागल्यामुळें मी त्यांचा अभ्यास करीत आहें; जमल्यास त्या हस्तगत करण्याचा मीं निश्चय केला आहे." असा निश्चय त्यानें केला होता तरी अखेरीस अवश्य म्हणून तें काम त्यास सोडून द्यावें लागलें.

आपली भाषासरणी शुद्ध, स्पष्ट आणि जोरदार असणें फार महत्त्वाचें आहे असें बाप त्यास वरचेवर लिहीत असे; पण आश्चर्य हें कीं, सामान्य वाचन बरेंच ठेवावें, असें त्याचा बापहि त्यास म्हणत नसे, किंवा चुलताहि म्हणत नसे. त्याच्या पत्रांत स्पेलिंग,

व्याकरण, वाक्यरचना ह्यांच्या चुक्या जरी वरचेवर दिसत, तरी तेरा ते सोळा वर्षांच्या मुलाच्या मानानें पाहतां त्यांतील मजकूर व त्याची जुळणी हीं विलक्षणच असत. आपल्या स्पेलिंगाच्या चुक्या आपल्यास कळाव्या ह्याबद्दल तो फार उत्सुक असे, आणि बापहि त्या दाखविण्यास कमी करीत नसे. चुलत्याकडे परत गेल्यावर त्यानें बीजगणिताचा अभ्यास हौसेनें सुरू केला; आणि लवकरच त्याच्या चुलत्यानें लिहिलें कीं, ' माझ्या मतें त्याची गणितांत बुद्धि फारच चालते.' ' त्रिकोणमितीचा अभ्यास करतांना मला आनंदच होतो, ' असें मुलगा म्हणे. युक्लिडच्या पहिल्या चार पुस्तकांइतकें सहावें पुस्तक त्यास आवडलें नाहीं, कारण त्यांतील सिद्धान्तपद्धति पहिल्या इतक्या स्पष्ट त्यास वाटल्या नाहींत. अंकगणिताच्या संबंधानें तो म्हणतो:— मी ह्या विषयाच्या ठोकळ तत्त्वांमध्यें मुख्यत्वेंकरून कच्चा आहें; आणि " मी कधीं शिक्षकाचा धंदा पत्करिल्यास ज्या अर्थीं ह्यामुळें मला फार अडचण पडेल, त्या अर्थीं संधि मिळाली म्हणजे ह्या तत्त्वांचा चांगला अभ्यास करण्याचा माझा बेत आहे. " बापाच्या देखरेखीखालीं त्यानें यथार्थदर्शन चित्रकलेचा अभ्यास सुद्धां केला, आणि त्यासंबंधानें तो म्हणता कीं, ' ह्या कलेचें मूलतत्त्व इतकें सरळ आहे ह्याचें मला आश्चर्य वाटतें, आणि मला जी अडचण पडते ती त्या तत्त्वाच्या योजनेच्या संबंधानें होय; कारण ही योजना बहुतेक प्रत्येक उदाहरणांत निरनिराळी दिसते; पण कल्पकताशक्ति माझ्यांत निद्रिस्थ दिसते ती जागृत करण्यास ह्या गोष्टीचा फार चांगला उपयोग होईल. " ह्यापूर्वीं १८२९ च्या मे महिन्यांत त्यानें असें लिहिलें होतें:—समीकरणांपेक्षां बीजगणितांतील कूट उदाहरणें सोडविणें मला ज्यास्त साधतें. ह्यास कारणें दोन आहेत: एक हें कीं, " हीं उदाहरणें सोडविणें केवळ यांत्रिक कामासारखें ठराविक नसून त्यांत चातुर्य खर्च करावें लागतें; आणि दुसरें हें कीं, नुसतीं समीकरणेंच

म्हणून सोडवावयास जीं उदाहरणें दिलेलीं असतात तीं जितकीं घोंटाळ्याचीं असतात, तितकीं हीं उदाहरणें सोडवितांना मांडावीं लागणारीं समीकरणें नसतात. "

त्याचा बाप त्यास वरचेवर असा उपदेश करीत असे कीं, सृष्टींतील वस्तूंचे नकाशे रेखाटण्याची कला प्रथम शीक. त्याप्रमाणें १८३४ सालीं त्यानें आपल्या चुलत्याच्या घराचा एक नकाशा रेखाटिला, आणि तो आपल्यास बराच साधला असें त्यास वाटलें. पुढें एक वर्षानें तें घर आणि सभोंवतालची जागा याचा नकाशा काढून त्यानें घरीं पाठविला, आणि लिहिलें कीं, " मला वाटतें तो पाहून माझ्या आजीस कदाचित् बरें वाटेल, हेन्रीला (त्याच्या घरीं त्याच्या बदली आलेला त्याचा चुलत भाऊ, ज्यास तो विनोदानें घरांतील आपली जागा " बळकाविणारा " म्हणे) मजा वाटेल, आणि माझी कदाचित् सुधारणा होईल. "

१८३९ च्या पावसाळ्यांत घराहून आपल्या चुलत्यास त्यानें असें लिहिलें:—" मीं तुला पूर्वीं पत्र लिहिलें तेव्हांपासून मुख्यत्वेंकरून रसायनशास्त्राचा अभ्यास करीत आहें.....स्फटिकघटनेचा विषय मला खरोखरच फार मजेदार वाटला. मी घरीं आल्यापासून सृष्टपदार्थविज्ञान आणि नीतिशास्त्र या विषयांवर बापाशीं माझे पुष्कळ वेळां वादविवाद झालेले आहेत. आपण हिन्टन येथें असतांना एक दिवस ज्या विषयाची चर्चा करीत होतों त्याविषयीं एके प्रसंगीं बाबाचें मत मीं विचारिलें. तो विषय हा कीं, आकर्षणानें कधीं कधीं घर्षण उत्पन्न होऊं शकतें कीं काय ? "

जो वेळ तो मानसिक सुधारणेकडे खर्च करीत नसे, तो तो ज्या व्यासंगांत घालवी त्यांपैकीं थोड्यांसच करमणुकी हें नांव देतां येईल. त्याच्या चुलत्याला खेळाची किंमत जरी कळत नसे असें नाहीं, तरी जीवितविषयक त्याची कल्पना फार गंभीर असल्यामुळें हल्लीं

ज्यास आपण खेळ म्हणून समजतों त्यांत मुलास तो निमग्न होउं देईल असा संभवच नव्हता. म्हणून " कर्मणूक करून घ्या " ह्या धड्याच्या या भावी उपदेशकास कांहीं तरी उपयुक्त काम करण्यांत आपली कर्मणूक करून घ्यावी लागत असे; आणि त्याचीहि बागेंत किंवा घरांत काम करण्याची नेहमीं तयारी असे. ह्यासंबंधानें तो एका पत्रांत लिहितो:—" दरवाज्यांना रंग देतांना माझे रोजचे कपडे इतके मळून गेले कीं मला नवा जोड घेऊन देणें माझ्या चुलत्यास भाग पडलें. " आतां त्यास चुलत्याचें घर आपलेंसें वाटूं लागलें; कारण तो एका पत्रांत म्हणतो:—" घरांत केलेले कांहीं फेरबदल " आम्हांस " फार सोईवारसे वाटतात." या वेळीं मासे धरावयास जाण्याची किंवा घोड्यावर बसून फेरफटका करण्याची संधि आल्यास तो बहुधा फुकट दवडीत नसे. शिवाय तो बर्फावरून लोखंडी जोडे घालून वसरत जाण्यासहि ह्या वेळीं शिकत होता. त्या संबंधानें तो बापास लिहितो:—" मी ' स्केट ' (हें त्या चालण्याचें इंग्रजी नांव) करावयास शिकत आहें, आणि मी जरी आजपर्यंत त्या कलेचा सात तासांपेक्षां अधिक अभ्यास केलेला नाहीं, तरी माझी त्या विद्येंत बरीच प्रगति झाली आहे, आणि लवकरच मी तिच्यांत प्रवीण होईन. काका म्हणतो, मी तसा झालोंच पाहिजे, कारण तूंहि त्या कलेंत फार प्रवीण होतास. " त्याच्यासाठीं चुलत्यानें " क्॑ॉइटस् " नांवाच्या दोन लोखंडी कड्या खेळावयास घेतल्या, तेव्हां तो त्यास म्हणाला:—" पण जेव्हां तुझें कांहीं काम करावयाचें असेल त्या वेळीं मी हा खेळ बाजूस ठेवून तें करीन अशी मी आशा करितों, आणि तसें करणें हें माझें कर्तव्यच आहे असें मला वाटतें. "

त्याचा स्वभाव स्वच्छंदी असल्यामुळें त्याचा सभोंवतालच्या माणसांशीं वरचेवर बेबनाव होत असे. मोठ्या माणसाच्या अधिकाराvि-

षयीं त्याच्या मनांत खोल गेलेला जो अनादर तो त्याच्या चुलत्याच्या कडक अमलामुळें बेतांत राहिलेला होता हें तो (चुलता) १८३३ सालच्या अखेरीस जें लिहितो त्यावरून दिसतें. तो म्हणतो:–" पूर्वीच्या वर्तनांत गेल्या दोन महिन्यांत फार फरक पडला होता; तो हल्लीं अगदीं मऊ आलेला आहे, आणि आज पुष्कळ दिवस तो रागावल्याचें चिन्ह मला कांहींच दिसलेलें नाहीं. " पुनः एकदां तो म्हणतो:—" त्याच्यावर माझा अधिकार फार चालतो, आणि तो माझ्या आज्ञेंत इतका वागतो कीं, त्याचें मला समाधान वाटतें, पण तो दुसऱ्या कोणाचा अधिकार इतका मानील किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटते. " त्याच्या चुलत्यास वरचेवर बाहेर जावें लागे, आणि त्या वेळीं तो कोणाचें ऐकत नसे. पण पुढें जेव्हां तो हिन्टनहून घरीं गेला तेव्हां त्याचा चुलता लिहितो:–" तो हल्लीं इतरांच्या मतांला पूर्वींहून ज्यास्त योग्य मान देतो..... तो आपल्या आईपाशीं कांहीं दिवस राहिल्यानें, पूर्वीं त्याच्या ठिकाणीं दिसणारा हेकेखोरपणा कदाचित् पुनः त्याच्या ठिकाणीं दिसून येईल..... त्याला आपल्या अकलेबद्दल जी घमेंड वाटते ती थोडीशी कमी झाली पाहिजे."

ह्या घमेंडीमुळें तो आपल्याहून लहान मंडळीशीं अधिकारपूर्वक वागण्याचा आव घाली; मात्र त्यांच्यावर जुलमी अधिकार चालविण्याची इच्छा त्यास मुळींच नसे. त्याला एकाद्या मोठ्या शाळेंत घातलें असतें तर ही वृत्ति त्याची कमी झाली असती; कारण तेथें हुशार मुलांशीं ज्यास्त संबंध येऊन त्याची स्वताविषयींची घमेंड कमी झाली असती. प्रत्येक नवीच कला साध्य करतांना प्रथम प्रथम त्यास बहुधा त्याबद्दल फुशारकी वाटत असे. उदाहरणार्थ, 'स्केट' करण्याची कला आपल्यास लवकर चांगली साधली याबद्दल त्यास अहंपणा वाटे. बुद्धिबळांच्या संबंधानें तो म्हणतो:—ह्या खेळांत मी इतका प्रवीण झालों आहें कीं कधीं कधीं काकावर देखील मी डाव

करितों. पुनः एकदां तो म्हणतोः—मी येथें आल्यापासून पांच सहा मोठाल्या मेजवान्यांस गेल्यामुळें अशा प्रसंगीं कसें वागावें हें आतां मला कळून आलें आहे. त्रिकोणमिति शिकावयास लागल्यावर लवकरच तो लिहितोः—मला वाटतें हा विषय आतां माझ्या अगदीं मुठींत आला आहे, मी त्यांतील पाहिजे तो प्रश्न सोडवूं शकेन. म्हणून बापाला त्यास एकदां असें सुचविण्याचा प्रसंग आलाः—" तुझ्या विद्येबद्दल तुला फार घमेंड वाटते म्हणूनच तुझ्या हातून चुक्या होतात." त्याची बुद्धि जाडी असून तिला स्वव्यापार करण्यास कांहीं अडथळा नसल्यामुळें ही आत्मप्रत्ययबुद्धि त्याच्यामध्यें स्वाभाविकपणें उत्पन्न झालेली होती. विलक्षण कल्पकबुद्धीच्या माणसास ठराविक वेळीं आणि ठराविक रीतीनें ज्ञान संपादन करण्यास लाविलें असतां, त्याच्या हातून पुष्कळ ज्ञान संपादन होत नाहीं, आणि त्याबद्दल त्यास गोडी लागत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्याची आत्मप्रत्ययबुद्धिहि ढांसळण्याचा संभव असतो. आणि ह्या मुलाच्या ठिकाणीं देखील त्याच्या नेहमींच्या आत्मविश्वासाशीं अगदीं विसंगत असा स्वताविषयींचा संशयितपणा कधीं कधीं दिसून येई. उदाहरणार्थ, तो एका पत्रांत म्हणतो—" मी शिकलों असेन तें इतकें लवकर विसरूं लागलों आहें ह्याबद्दल अलीकडे मला फार काळजी वाटते, आणि असें कां होतें हें समजण्याची मीं वरचेवर खटपट केली आहे पण अद्यापि तें माझ्या लक्षांत आलेलें नाहीं. माझा बाप म्हणतो, मी विशिष्ट विषयांत सारखा जीव घालीत नाहीं, म्हणजे मी शिकलों असेन त्याचा विचार करण्यांत आपलें मन सारखें व्यापून ठेवीत नाहीं, म्हणून असें होतें; आणि मला वाटतें, तो म्हणतो तें बरोबर आहे." पुनः एकदां तो म्हणतोः—" हल्लींपेक्षां ज्यास्त उत्साहानें अभ्यास करण्याचा मीं बेत केला आहे, आणि मी आशा करितों कीं हा माझा निश्चय ढळणार नाहीं. मला वाटतें कीं माझी

प्रगति लवकर होत नाहीं ह्यास कारण मी करावा तितक्या जोरानें अभ्यास करीत नाहीं हें आहे, आणि म्हणून मीं अशी आशा करितों कीं कसून अभ्यास करण्याचा तिटकारा मीं काढून लाविला म्हणजे तूं आणि बाबा मजविषयीं अपेक्षा करतां तशा प्रकाराचा मी बहुतेक अंशीं होऊन जाईन. " आणि १८३६ सालीं तो म्हणतोः— कोणत्याहि विषयाच्यामागें सतत लागण्याचें सामर्थ्य मजमध्यें नाहीं असें मला वाटतें असें जें मीं मागच्या पत्रांत म्हटलें होतें तो मनोविकार अद्यापि मला माझ्या मनांतून काढून टाकतां आलेला नाहीं; माझ्या मनाचा निरुद्योगी रहाण्याकडे असलेला कल घालवून देण्याइतकी माझ्या मनाला कुवत नाहीं असें मला वाटतें, आणि मला अशी भीति पडूं लागली आहे कीं, मी शिकलों आहें त्यांतील बरेंच विसरून जाईल.

या उत्साहाभावाचा तो वरचेवर उल्लेख करितो, आणि तो कसा उत्पन्न झाला आहे हें आपल्यास कळत नाहीं असें म्हणतो. १८३३ व ३४ ह्या सालीं लिहिलेल्या पत्रांतून आपल्या सुधारण्याच्या बेतांचें त्यानें चमत्कारिक रीतीनें प्रदर्शन केलेलें आढळतें; कारण त्यांच्या खालीं " तुझा आज्ञाधारक होऊं म्हणणारा मुलगा, " किंवा " तुझा प्रेमपूर्ण आणि सुधारणारा मुलगा " अशा सह्या त्यानें केलेल्या आढळतात. तेरा ते सोळा वर्षांच्या मुलापासून नैतिक व बौद्धिक बाबतींत त्याचे वडील बेताबाहेर अपेक्षा करीत होते, आणि त्याच्या व्यक्तिवैलक्षण्याकडे त्यांचे लक्ष्य फारच कमी होतें, असें दिसतें. पण त्या व्यक्तिवैलक्षण्याच्या अभावीं त्याच्यावर उपदेशाचा जो सारखा वेळीं अवेळीं वर्षाव होत असे त्यांतून तो बचावूं शकला नसता.

आपल्या बापाविषयीं लिहित असतां सर लेस्ली स्टीफेन म्हणतोः— " माझा बाप सुंदर अभिरुचीचा आणि नाजूक स्वभावाचा माणूस असल्यामुळें एक भीति त्याच्या मनांत फारच तीव्र रीतीनें जागृत

असे. तो आह्मास आमचे धर्मविषयक मनोविकार व्यक्त करून दाखविण्याचा मोह कधीं पाडीत नसे. त्यास व माझ्या आईस असें वाटे कीं, विनाकारण हे विशेष खोल मनोभाव व्यक्त करणें हा एक अध्यात्मविषयक असभ्यपणाच होय. " पण हर्बर्ट स्पेन्सरच्या बापाची गोष्ट अशी नव्हती. " तुझ्या मनांतील अगदीं खोल मनोभाव मला कळींव " असा तो मनःपूर्वक त्यास आग्रह करी, पण मुलगा मात्र त्यास बहुतकरून दाद देत नसे. पण आईस लिहिलेल्या एका पत्रांत (आक्टोबर १८३३) तो बापाच्या ह्या आपल्याविषयींच्या काळजीबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करितो. त्यांत तो म्हणतो, " तो ह्या बाबतींत जी इतकी उत्कंठा दाखवितो ती माझें कल्याण व्हावें अशी त्यास अंतःकरणपूर्वक इच्छा असल्याचें फल होय; आणि तो मला सदुपदेश करितो त्यावरून माझी अशी खात्री होते; आणि त्या उपदेशाप्रमाणें वागण्यास त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या साहाय्यानें मी समर्थ होईन अशी मी आशा करितों. " हें त्याचें लिहिणें त्याच्या आईस अर्थात् मोठें समाधानकारक वाटलें. त्या वर्षीं त्याचा चुलता नाताळांत हजर असता त्यानें सुवर्तन केलें होतें. " तें कोणत्या मुख्य तत्त्वाच्या आधारांवर त्वां केलें " म्हणून बापानें त्यास पृच्छा केली. त्यावर हर्बर्टनें दिलेलें उत्तर उपलब्ध नाहीं, पण त्या उत्तरास बापाच्या पत्रांत उल्लेख सांपडतो, आणि तें वाचून त्याच्या दुखणाईत आईस फार आनंद झाला असहि त्यांत म्हटलेलें आढळतें. ८३९ च्या फेब्रुवारींत बाप त्यास लिहितो कीं, " तुझ्या मनाची घटना आणि स्थिति ह्यांचें त्वां परीक्षण करणें फार अगत्याचें आहे, आणि त्याबद्दल तूं अजून मौन सोडीत नाहींस ह्याचा मला राग येतो. ह्याबद्दल तूं मला लिही, आणि तुला मी काय म्हणतों हें समजत नसलें तर मला कळीव. " ह्यावर तो उत्तरीं लिहितोः— " तूं मला विचारितोस कीं, पुनर्जीवनविषयक मनोभाव तुला क-

ळतात किंवा नाहीं, आणि ते तुझ्या स्वताच्या उदाहरणाला लावतां येतात किंवा नाहीं? ते मला कळतात, आणि माझ्या स्वताच्या उदाहरणाला ते मला लावतां येतात; पण आतां मला फारसा वेळ नाहीं म्हणून हें पत्र पुरें करितों, आणि माझ्या मनोभावांविषयीं मी आपल्या पुढच्या पत्रांत ज्यास्त लिहीन. ”

त्याच्या पुढच्या पत्रांत, किंवा निदान उपलब्ध पुढच्या पत्रांत त्याच्या वरील मनोभावांविषयीं त्यानें लिहिलेलें नसल्यामुळें बाप पुनः त्याच्यावर रागावला. तो म्हणतोः—“पत्रें लिहिण्याच्या बाबतींत तूं चांगला आहेस हें माझें पूर्वींचें मत कायम राहिलेलें नाहीं. मी आशा करितों कीं पुढच्या पत्रांत राहिलेल्या सर्व प्रश्नांचे जबाब तूं लिहिशील. आतांपर्यंत तुला मीं पुष्कळ फुरसत दिलेली आहे. ” धर्मसंबंधी आपले विचार आईबापांस कळविण्यास तो जो नाखूश होता त्याचें कारण त्याच्यावर त्याचें प्रेम नव्हतें, किंवा त्यांचा त्याला विश्वास नव्हता, हें नव्हे. धर्माच्या बाबतींत लांबलचक लिहिण्याचा बहुधा सर्वच मुलांना कंटाळा असतो तसा त्यालाहि होता, पण बाकी सर्व बाबतींत तो त्यांस अत्यंत मोकळ्या मनानें लिहीत असे. त्याच्या आईबापांचीं बोलणीं आणि करणीं यांबद्दल त्यास नेहमीं फार आस्था वाटे. ह्यासंबंधानें एकदां तो बापास लिहितोः—“ तुझें पत्र मला मिळालें तेव्हां मला फारच संतोष वाटला; आणि त्यांतील मजकूर वाचून तर त्याहूनहि ज्यास्त संतोष वाटला; आणि ती माझी छकुली बहीण अद्यापि जिवंत आहे किंवा नाहीं, ती जगण्याचा संभव आहे किंवा नाहीं, आणि माझ्या आईची प्रकृति आतां कशी काय आहे हें जाणण्यास मी फार उत्सुक झालों आहें. ” पुढें जेव्हां ती बहीण वारली तेव्हां त्यानें आपल्यासंबंधानें आणि आईबापांच्याहि संबंधानें त्याबद्दल दुःखप्रदर्शित केलें. तो म्हणतोः—

" मी घरीं येईन तेव्हां माझी कर्मणूक करण्यास एक लहानशी बहीण मला असती तर फार बरें झालें असतें. "

१८३५ च्या अखेरीकडे वर्तमानपत्रांत लिहिण्याचा त्यानें अगदीं प्रथमचा प्रयत्न केला. प्रथम आपला लेख छापून आलेला पाहून त्यास काय वाटलें हें पुढील पत्रावरून दिसून येतें, आणि तेव्हांचे त्याचे मनोविकार, आणि पुढें साठ वर्षांनीं आपली " संघटनात्मक मीमांसा " पुरी केल्यावरचे त्याचे मनोविकार ह्यांची तुलना करण्यासारखी आहे. असो. तें पत्र १८३६ च्या जानेवारींत लिहिलेलें असून त्यांतील मजकूर असा आहेः—" आतां अलीकडे ज्या विषयामध्यें माझें मन निमग्न झालें आहे त्याबद्दल लिहितों. काका छोटीं चोपडीं लिहीत असतो, आणि वर्तमानपत्रांत वगैरे लेख लिहीत असतो, हें तुला माहीतच आहे; तेव्हां त्यावरून माझ्या मनांत असा विचार आला कीं, आपणहि कांहीं लिहून पहावें. नुक्तेंच एक नवें मासिक सुरू झालें आहे. (त्याचें नांव बाथ मागाझीन असून तें १८३६ च्या जानेवारींत सुरू झालें होतें.)....कांहीं वेळ विचार करून, मी मिठाचे स्फटिक बनविण्याचा यत्न करीत असतां ज्या लहान होड्या आपण शोधून काढिल्या त्यांच्यावर एक लेख लिहून या संपादकाकडे पाठविला. तो त्या मासिकांत कदाचित् प्रसिद्ध होणार नाहीं ह्या भीतीनें ही गोष्ट मीं काकाकाकींस कळविली नाहीं; पण हल्लीं तो प्रसिद्ध झाला आहे, आणि थोडासा तलास केल्यानंतर जेव्हां तो अंक मला मिळाला, तेव्हां माझा लेख फार चांगला दिसतोसें मला आढळून आलें. जेव्हां तो लेख माझ्या प्रथम दृष्टीस पडला तेव्हां मला किती आनंद झाला ह्याची तूंच कल्पना कर. मी असा कांहीं ओरडावयास लागलों आणि खोलींत उड्या मारावयास लागलों कीं काकाकाकींस वाटलें, " झालें तरी काय ? " पण मीं जेव्हां यांस माझा लेख दाखविला तेव्हां त्यांस फार आश्चर्य

वाटलें आणि संतोषहि झाला.....आणि ज्या अर्थीं मीं अशा रीतीनें लिहिण्यास सुरवात केली आहे त्या अर्थीं कधीं कधीं या मासिकास लेख लिहून पाठविण्याचा माझा विचार आहे; आणि त्याच्या पुढच्या अंकास मी माझा दुसरा लेख पाठविणार आहें. ज्या अंकांत माझा लेख प्रसिद्ध झाला, त्यांतच " भिकाऱ्यांच्या कायद्या"वर फार अडाणी व एकपक्षीय लेख आलेला आहे, आणि त्यावर उत्तर लिहिण्याचा माझा बेत आहे. मला वाटतें, मी लवकरच फार गर्विष्ठ बनून जाईन. फार कशाला ? हेंच पत्र पुनः वाचून पाहतां यांतच गर्विष्ठपणाची छटा बरीच दृष्टीस पडते असें मला वाटतें. पण त्याबद्दल होईल तेवढी खबरदारी मला घेतली पाहिजे. "

आतां घरीं परत जाण्यास तो उत्सुक झाला होता, पण त्यासंबंधानें त्यानें बापास जें पत्र लिहिलें तें त्याच्या चुलत्याला टाकून लिहिलें आहे असें त्याच्या बापास वाटून त्यानें तसें कळविलें. त्यावर तो बापास लिहितो:- " मला वाटतें, तूं माझ्या पत्राचा बरोबर अर्थ केला नाहीं, आणि माझ्या मनांत होता त्याहून त्यांतून ज्यास्त अर्थ निघतो असें तुला वाटलें; मीं लिहिलें त्यांत माझें एवढेंच म्हणण्याचा हेतु होता कीं, घरीं माझा वेळ माझ्या अधिक स्वाधीन राहील, आणि म्हणून तेथें येणें मला अधिक बरें वाटतें. मी कबूल करितों कीं, पत्राच्या कांहीं भागांत मी वापरावी त्याहून ज्यास्त कडक भाषा वापरली आहे, आणि त्यामुळें एकंदर गोष्ट खरोखर आहे त्याहून ज्यास्त जोरदार दिसते, आणि त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. "

तो १८३६ च्या जून–जुलैच्या सुमारास घरीं गेला आणि लागलाच नियमितपणानें अभ्यास करूं लागला; तो मुख्यत्वें गणित, अक्षर, व निबंधलेखन ह्यांकडे ज्यास्त लक्ष देऊं लागला. हल्लीं त्याचें वय सोळा व सतरा यांच्या दरम्यान होतें, आणि पुढें त्यानें

काय धंदा करावयाचा हें ठरविणें आतां अगत्याचें झालें होतें. याबद्दल पूर्वींच्या तीन वर्षांत वरचेवर बोलणीं निघालेलीं होतीं. १८३४ च्या मार्च महिन्यांतच त्यानें आपल्या बापास असें लिहिलें होतें कीं, " काकी म्हणते, वैद्यकीचा धंदा मला फारच योग्य आहे; आणि माझ्यासंबंधानें म्हणशील तर तो किंवा तूं करतो आहेस तो धंदा मला पसंत वाटतो. या दोहोंपैकीं तुला उत्तम कोणता वाटतो तें मला तुझ्या पुढच्या पत्रीं कळीव. " त्याच्या चुलत्याचें मत यानें शिक्षकीच करावी असें फार होतें. पण महत्त्वाचा व्यावहारिक प्रश्न आला म्हणजे त्याच्या बापाला ठाम मत बनवणें कसें जड जात असे हें त्याच्या एतद्विषयक पत्रावरून दिसून येतें. त्यांत तो म्हणतो:—" एकंदरींत ह्या प्रश्नाचा प्रत्यक्ष संबंध इतरांपेक्षां तुझा तुझ्याशींच विशेष आहे.....हा प्रश्न कठीण आहे, आणि त्याचें उत्तर घाईनें देतां कामा नये." त्याचें उत्तर घाईनें मिळालेंच नाहीं; कारण तो हिन्टन गांव (चुलत्याचें घर) कायमचें सोडून आला तरी त्याचें उत्तर द्यावयाचेंच होतें. तो घरीं गेल्यावर लवकर एका मित्रानें इंजिनियरचा धंदा सुचविला; आणि त्याबद्दल सुटींत बाप बाहेरगांवीं गेला होता त्यास मुलानें असें लिहिलें:—" हा धंदा मला पूर्वीं सुचला नव्हता, पण आतां त्याबद्दल विचार करून पाहतां मला वाटतें तो मला फार योग्य आहे.....कारण आजपर्यंत ज्या विषयांचा अभ्यास मीं केला आहे ते त्या धंद्यालाच उपयुक्त आहेत. " पण त्याच्या मित्राच्या ह्या सूचनेचा प्रत्यक्ष उपयोग करण्यास त्यास आणखी सोळा महिने थांबावें लागलें. तोंपावेतों आपल्या बापाच्या इच्छेस अनुसरून, त्यानें प्रथम काकाच्या शाळेंत असिस्टणाचें काम केलें, आणि मागून मेथरच्या शाळेंत केलें. हा धंदा त्यानें कायमचा पत्करिला असता तर त्यांत त्यास यश आलें असतें किंवा नसतें ह्या प्रश्नाचा विचार त्यानें " आत्मचरित्रांत " केला आहे. त्या प्रकरणास त्यानें " एक चु-

कीचा आरंभ " असें नांव दिलें आहे, त्यावरूनच असा तर्क करतां येतो कीं त्यांत यश येणें त्यास फारसें संभवनीय वाटत नव्हतें.

प्रकरण तिसरें

इंजिनियरी

तो लंडन व बार्मिंग्राम रेलवेच्या हपीसांत १८३७ च्या नवंबरमध्यें लागला, आणि त्यानंतर लवकरच असें दिसून आलें कीं, तो विचार न करतां रुळलेल्या मार्गानें कधीं जावयाचा नाहीं. उदाहरणार्थ, ओतीव लोखंडाच्या नकाशांच्या रंगांत मी सुधारणा केली आहे असें तो लवकरच घरीं पाठविलेल्या एका पत्रांत लिहितो. पुढें थोड्या महिन्यांनीं हॅरोरोड एथील पुलाच्या नजीकच्या रस्त्याचें काम त्याला देऊन ८० माणसें त्याच्या हाताखालीं दिलीं. तेव्हां तेथील बांधकाम मोजण्याच्या कामाचा अनुभव घेतल्यावर फुटाच्या मापाचे इंचाइंचाचे असे बारा भाग न पाडतां दहा पाडण्याचा त्यानें निश्चय केला, आणि असें लिहिलें कीं, अंकगणितांत दशांशपद्धतीचा उपयोग होईल तेवढा करण्याचें मीं योजिलें आहे. तेथें त्यास जो फुरसतीचा वेळ मिळे तो तो फुकट घालवीत नसे. त्यासंबंधानें तो लिहितो:--" दिवसाचा कांहीं वेळ गणिताचा अभ्यास करण्यांत घालविला म्हणजे मला नेहमीं बरें वाटतें आणि माझें डोकें स्वच्छ राहतें, असा माझा नेहमीचा अनुभव असल्यामुळें अलीकडे तशा रीतीनें दररोज कांहीं वेळ घालविण्याचा मीं अगदीं नेमच करून टाकिला आहे. "

पुढें ती रेलवे तयार करण्याच्या कामावरील नोकर मंडळी जेव्हां

कमी केली तेव्हां त्याची हुशारी आणि मनःपूर्वक काम करण्याची पद्धति, आणि फॉक्स (त्या रेलवेवरील मुख्य इंजिनियर) व स्पेन्सर ह्या दोन कुटुंबांची पुष्कळ दिवसांची दोस्ती, ह्यांचा त्याला फार उपयोग झाला. कारण त्यास त्यामुळें "ग्लॉस्टर व बर्मिंघाम रेलवे"वर नोकरी मिळाली. त्याबद्दल तो घरीं लिहितोः—"ह्या नवीन नोकरींत फायदे असे आहेत कीं पगार ज्यास्त, बढती मिळण्याचा फार संभव, आणि धनी चांगला; आणि सर्वांत विशेष गोष्ट ही कीं, फॉक्ससाहेब म्हणतो तुला ती न आवडल्यास तूं पाहिजे तेव्हां माझ्याकडे परत ये. म्हणून या कामांत तुझें मत व सल्ला मला पाहिजे; तेव्हां होईल तितकें लवकर उत्तर पाठीव. " नेहमींच्या पद्धतीस अनुसरून आपण कामांत आहों ह्या सबबीवर बापानें ही जबाबदारी अंगावर घेण्याचें टाळिलें, आणि त्याचा भाऊ विलियम यास उत्तर लिहावयास सांगितलें; त्यानें "ती नोकरी पत्करावी " म्हणून ह्यास लिहिलें. त्याप्रमाणें तो १८३४ च्या सपटंबरांत वूर्स्टर मुक्कामीं तें काम पाहूं लागला; पण त्या वेळेस आपण केलें हें शहाणपणाचें काम केलें कीं काय असे त्याच्या मनांत विचार घोळूं लागले असें दिसतें. कारण तो म्हणतोः—"फॉक्ससारख्या निःसंशय हुशार माणसापाशीं राहून मला ज्यास्त फायदा होण्याचा संभव आहे किंवा क्यापटिन मूरसम (नवीन मुख्य) सारख्या सामान्य माणसाशीं राहून होण्याचा संभव आहे ! " तेथें थोड्या वेळांत पुष्कळ काम करावें लागत असून संध्याकाळीं उशीरापर्यंत त्यास अडकवून ठेवीत ह्याबद्दल जरी त्याची कूरकूर होती, तरी तो म्हणतोः— "मला इंजिनियरचा जसा ज्यास्त ज्यास्त अनुभव येत आहे, तसतसें तें काम मला ज्यास्त ज्यास्त आवडूं लागलें आहे; दुसरा कोणताहि धंदा मला इतका योग्य झाला नसता. " त्यानें पूर्वीं तयार केलेले नकाशे आतां त्यास घाणेरडे वाटूं लागले, आणि त्यांसंबंधानें तो म्हणतो कीं,

" आतां ते माझे आहेत म्हणून सांगण्याची देखील मला लाज वाटेल. हल्लीं मला ' सर्वांत ज्यास्त जलद नकाशे काढणारा ' म्हणून जरी कदाचित् समजत नाहींत, तरी ' फार उत्तम नकाशे काढणारा ' म्हणून समजतात. " पुनः तो लिहितोः—" छाया कशी काढावी ह्याबद्दल आमच्या हपीसांत वाद झाला, आणि त्यास कारण मी होतों. " ह्याच्यासारखा तीक्ष्ण बुद्धीचा, तोंड कधीं बंद न ठेवणारा, आणि प्रमाणयुक्त बोलणारा माणूस असला म्हणजे हपीसांत वाद उत्पन्न होणें साहजिकच होतें. तेथें त्याच्याबरोबर काम करणारांपैकीं मॉसे नांवाचा एक गृहस्थ १९०४ सालीं ह्या संबंधानें लिहितोः—" सरासरी १८ महिने मी व तो एकाच टेबलापुढें बसून काम करीत होतों..... आह्मांला तो जरी जरासा इतरांस राग येईल अशा रीतीनें आपलेंच म्हणणें प्रतिपादित बसणारा वाटत असे, आणि त्याच्या तयार होत असलेल्या ग्रंथाच्या संबंधानें जरी आह्मी वरचेवर त्याची थट्टा करीत असूं, तरी एकंदरींत तो आह्मांस बरा माणूस वाटे. " त्याचें उद्योगी मन जगांतील अनेक गंभीर प्रश्नांच्या विचार करण्यांत गुंतलेलें असल्यामुळें हपीसांतील इतर लोकांच्या विनोदाकडे लक्ष्य देण्यास त्यास वेळ नसे. आपल्या बापाशीं चर्चा करणें ह्यापासून त्यास सर्वांत ज्यास्त सुख होत असे, आणि तसें करण्याच्या प्रत्येक संधीचा तो पूर्ण फायदा घेत असे. तो हिन्टनमध्यें असतां आपल्या प्रश्नांचीं उत्तरें न पाठविल्याबद्दल बाप त्यास रागावत असे त्याबद्दल जणूं काय सूड घेण्याकरितां तो आतां बापास त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें न लिहिल्याबद्दल वरचेवर लावून लिहूं लागला. तो घरीं जीं पत्रें लिही तीं ज्या शास्त्रीय, धंदेविषयक, आणि मनुष्यविषयक प्रश्नांमध्यें त्याचें मन गुंतलेलें असे त्यासंबंधाच्या प्रश्नांनीं भरलेलीं असत. " ह्यासारख्या गणितविषयक पत्रासंबंधानें माझी आई काय म्हणेल कोण जाणे " असें त्यानें एका

पत्राच्या संबंधानें जें म्हटलेलें आढळतें तें म्हणणें त्याच्या बऱ्याच पत्रांस लागू पडलें असतें. ता० १९ जानेवारी १८३० रोजीं तो लिहितो:—" सपाटीवर छाया कशा काढाव्या ह्याचें महातत्त्व मीं शोधून काढिलें आहें..... तें बरोबर असल्याबद्दल मला बहुतेक खात्री वाटते. पण आपल्या मनाची याहूनहि ज्यास्त खात्री करण्याकरितां मी सपाटीवरील छायेच्या नकाशाचा एक जाड पुठ्याचा नमुना केला आहे, आणि मला असें आढळून येतें कीं, वास्तविक छाया मीं तयार केलेल्या नमुन्याशीं अगदीं तंतोतंत जुळते. " ता० १८ नवंबर १८३९ रोजीं तो लिहितो:—" मीं शेवटचा जो नकाशा काढिला तो पन्नास फूट गर्भीचा दुबार झुलत्या पुलाचा होय......... त्याच्या दोन्हीं बाजू त्याच्या मध्यावर तोलून रहाव्या अशा रीतीनें तो तयार करण्यास मला बरीच अडचण पडली हें तुझ्या लक्ष्यांत आलेंच असेल. पण तसें करण्याची मीं फार सोपी व छानदार सरणी शोधून काढिली आहे, आणि येत्या नाताळांत मी तुला ती स्पष्ट करून सांगेन. मी लवकरच दुसरा एक काढता पूल तयार करावयास सुरवात करणार आहें, आणि तो झुलत्या नमुन्याचा करावयाचा आहे. " ता० ४ मार्च १८४० रोजीं लिहितो:— " हें वूर्स्टर येथील पुलाचें माझें काम नामी रीतीनें चाललें आहे. मीं मोजमाप करून त्याचा ठोकळ नकाशा पुरा केल्यानंतर कांहीं दिवसांनीं मूरसमनें आपल्या कांहीं विशिष्ट योजनेबरहुकूम नवे नकाशे तयार करण्याचा हुकूम मला केला. ही त्याची योजना मला अगदीं पसंत पडून, आणि त्याच्याहून ज्यास्त मजबूत व कमी खर्चाची अशी रचना करतां येईल असें मला वाटून, मीं त्यास त्या बाबतींत लिहिण्याचा व आपली योजना त्याच्यापुढें मांडण्याचा धीर केला. मला अशी भीति वाटत होती कीं इतका फाजीलपणा केल्याबद्दल तो मजवर रागावेल, पण त्याबद्दल त्यानें फार सहानु-

भूति दाखविली, आणि त्याला त्याच्या योजनेपेक्षां माझी योजना ज्यास्त पसंत आहेशी दिसते; निदान दोन्ही योजनांबरहुकूम त्यानें नकाशे तयार करण्यास मला सांगितलें आहे, आणि त्यांतील कोणती स्वीकारावयाची हें मागाहून तो ठरवणार आहे. ''

श्रुस्बरीच्या जुन्या किल्ल्याची नदीचा कांठ संरक्षण करणारी भिंत कायम ठेवण्याकरितां तयार केलेल्या योजनेवर क्यापटिन मूरसमनें यांचें मत विचारलेल्या संबंधानें तो म्हणतो:—" ती मला बरीच पसंत वाटली, कारण तेवढ्याच पैशांत ज्यास्त चांगली सरणी माझ्या ध्यानांत येईना. पण आज सायंकाळीं टीम नदीच्या कांठानें मी फिरत असतां, आणि निरनिराळ्या परिस्थितींत तिच्या प्रवाहाचीं कार्यें काय होतात ह्याबद्दल कांहीं निरीक्षणें करीत असतां, आणि ते सर्व चमत्कार इंजिनियरच्या दृष्टीनें ध्यानांत घेत असतां माझ्या एकदम असें लक्ष्यांत आलें कीं, " श्रुसबरीच्यासंबंधानें ज्यास्त चांगली आणि कमी खर्चाची अशी योजना करतां येईल. '' पण क्यापटिन मूरसमला आपलीच योजना अधिक चांगली वाटली, आणि तिचा वर्णनात्मक लेख तयार करण्याचें त्यानें स्पेन्सरला सांगितलें. त्याबद्दल तो लिहितो, " अशा प्रकारचा हा माझा पहिलाच प्रयत्न होता, आणि पूर्वींचा कांहीं आधार मला नव्हता; म्हणून मला माझ्या कल्पनाशक्तीचाच पूर्ण उपयोग करावयाचा होता, आणि हीच गोष्ट मला आवडते. ''

त्याची टीका करण्याची प्रवृत्ति जशी त्याच्या बरोबरीच्या हपिसरांच्या संबंधानें दृष्टीस पडत असे तशी त्याच्या वरिष्ठांच्याहिसंबंधानें दिसून येत असे. उदाहरणार्थ, एका पत्रांत तो म्हणतो:— " त्यांच्या आपल्या धंद्यांतील निष्णातपणाबद्दल माझ्या तोंडून किंवा ज्याला पडद्याच्या आंतील माहिती आहे अशा दुसऱ्या कोणाकडून स्तुतीचा शब्द निघत नाहीं. '' पुष्कळ वेळां चुकीचें गणित

किंवा भौतिक तत्त्वांचें अज्ञान ह्यांमुळें झालेल्या त्यांच्या कामांतील फजितवाड्याचा तो उल्लेख करितो. तो अगदीं सदसद्विवेकशक्तीस स्मरून काम करणारा असल्यामुळें कोणतीहि गोष्ट होईल असें म्हणून तो कधीं स्वस्थ राहूं शकत नसे. कांहीं कामें करावयाचीं राहिलीं होतीं तीं करावयास त्यास पाठविलें असतां तो त्यासंबंधानें बापास लिहितो:—" हें काम मला सुखानें करतां येईल असें मला वाटत नाहीं; दुसऱ्या लोकांनीं अर्धवट टाकिलेलीं कामें हातीं घेणें कांहीं मोठी सुखाची गोष्ट नव्हे; म्हणून मला जर तेथील काम माझ्या शक्तीच्या बाहेरचें वाटलें, किंवा तेथिल गोंधळामुळें माझें मन अस्वस्थ होण्याचा संभव आहेसें वाटलें, तर मी तें सोडून येईन." डेफर्ड येथें आव्हन नदीवरील आगगाडीचा पूल पुनः बांधण्याच्या संबंधानें त्यास इतकी काळजी वाटत असे कीं, त्यावरून त्याच्या हपीसांतील लोक त्यास 'डेफर्ड' असें थट्टेनें म्हणूं लागले.

१८४० च्या मे महिन्यांत तो आपल्या बापास सांगतो कीं, "माझ्या कल्पकशक्ती बऱ्याच वाढत चालल्या आहेत. मीं दोन छानदार नवीं यंत्रें तयार केलीं असून तीं मी तुला काय आहेत तें स्पष्ट करून सांगणार आहें." पैकीं एकाचें नांव 'वेगमापक' आणि दुसऱ्याचें नांव 'आकर्षणशक्तिमापक' होतें, आणि पहिल्याचा उपयोग आगगाडीचा वेग मोजण्याचा असून दुसऱ्याचा इंजिनाची गाडी ओढण्याची शक्ति मोजण्याचा होता. नवंबरांत तो लिहितो:—" मी नुकतेंच एक नवें लहान यंत्र बनविलें आहे. सदृश त्रिकोणविषयक जें मोठें तत्त्व त्याची ती एक नवी योजना आहे, ज्या तत्त्वाचा उपयोग करण्याच्या कामीं मी कांहींसा भाग्यवानच दिसतों. त्याचा उद्देश एका मापाच्या कोणत्याहि संचयांना दुसऱ्या मापाच्या तितक्याच मूल्याच्या संचयांचें स्वरूप देतां यावें." विद्युच्चुंबनशक्तिविषयक एक योजना त्याच्या बापाच्या डोक्यांत

घोळत होती तिजकडे त्यानें आपल्या कल्पकशक्ती या वेळीं लाविल्या होत्या. त्यासंबंधानें मे महिन्यांत तो लिहितो:—" माझी हल्लींची नोकरी संपल्यानंतर दुसरी चांगली जागा मिळण्याचा जर संभव नसला, तर मला वाटतें, त्या योजनेबद्दल मन:पूर्वक खटपट करण्यांतच आपला वेळ घालविणें फायद्याचें होईल. " आगगाडीवरील इंजिनियरचा धंदा सोडून ह्या उद्योगास लागण्यांत नुकसान नसून कदाचित् मोठा फायदाच होण्याचा संभव आहे असें त्याचें मत होतें. म्हणून १८४१ च्या प्रारंभीं तो प्रयोग करण्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्याच्या कामांत तो गढून गेला, आणि आपला उद्योग गुप्त ठेवण्याबद्दल बापानें त्यास आग्रहपूर्वक लिहिलें.

कलाविषयक अभ्यासास त्याला या वेळीं फारशी फुरसत नव्हती, पण १८४० च्या आक्टोबरांत तो लिहितो:–" मी आलीकडे चेहरे काढण्याचा यत्न करीत आहें, आणि तें काम मला अजमासाबाहेर साधत आहे, हें तुला ठाऊक आहे काय? " पुन: तो लिहितो:—" मी चेहरे काढीत आहें ह्याला पाहिजे तर तूं हंस, पण मी तुला खात्रीनें सांगूं शकतों कीं, त्या कामीं मला बरेंच यश येत आहे. "

त्याचें वर्तमानपत्रांना लिहिणें हल्लीं बंद होतें. फॉक्सच्या हपीसांतील नोकरी पत्करिल्यावर " मेक्यानिक्स मागाझीन " या मासिकास तूं कांहीं लिहून पाठविलें आहेस काय, असें बापानें विचारलें तेव्हां त्यानें असें लिहिलें होतें:—" हल्लीं इतर गोष्टींकडे माझें लक्ष्य इतकें लागलेलें आहे कीं तूं त्याबद्दल लिहिलेंस तोंपर्यंत मला त्याची आठवण झाली नव्हती. त्यानंतर मीं त्याबद्दल विचार केला आहे, आणि मला वाटतें, मीं एक लहानसा शोध लाविला आहे त्याची हकीकत लंदनास आल्यावर तयार करून, तुला दाखवून ती मी पाठवूं शकेन. " पण ही हकीकत त्यानें पाठविली

नाहीं; कारण त्याचें असें मत झालें कीं, पुढें येणाऱ्या तरुण इंजिनियरानें आपले लेख पाठविण्याच्या योग्यतेचें तें मासिक नाहीं. यासंबंधानें तो लिहितोः—" मला 'मेक्यानिक्स मागाझीन' अर्धवट आवडत नाहींसें झालें आहे, कारण त्यांत जरी कांहीं चांगले लेख येतात तरी त्याच्यांत बराच कचरा छापून काढितात अशी त्याची ख्याति झाली आहे, आणि त्यामुळें त्यांत येणाऱ्या वास्तविकपणें चांगल्या लेखांची किंमत कमी होऊन जातें." म्हणून त्यानें १८३९ च्या मे महिन्यांत "स्क्यू कमानी" ह्याविषयावर एक निबंध "सिव्हिल इंजिनियर व आर्किटेक्टर्स जर्नल" या मासिकांत प्रसिद्ध केला, आणि १८४० च्या जुलैंत "भूमितिविषयक सिद्धान्त" ह्या विषयावरील लेख त्यांतच प्रसिद्ध केला.

त्याला आपल्या प्रकृतीची इतर तरुणांपेक्षां जरी ज्यास्त काळजी वाटत असे तरी एकंदरींत ती समाधानकारक होती. शरीर व मन यांच्या स्परस्परांवर क्रिया होत असतात ह्या विषयावर त्याच्या पत्रांत याच्या अगोदरच उल्लेख येऊं लागले होते. उदाहरणार्थ, कांहीं दिवस कसून काम केल्यानंतर एकदां तो लिहितोः—" ह्या श्रमातिरेकाचा परिणाम मनाची हलाकी, आणि आपला आपल्याबद्दलच सारखा असंतोष, या रूपांनीं दृग्गोचर होऊं लागला आहे; आणि गेलीं चार पांच वर्षें जी मला भीति राहून राहून वाटत होती ती आतां ज्यास्त वरचेवर वाटूं लागली आहे; ती ही कीं, पूर्वीं होतें तितकें माझें मन हल्लीं उत्साही व उद्योगी नाहीं, आणि माझी स्मरणशक्ति पूर्वीं होती तितकी टिकाऊ हल्लीं नाहीं." १८४० च्या प्रारंभीं तो म्हणतोः—" माझें वजन हल्लीं जें वाढलें आहे तेंच गेले सहा महिने मी जडबुद्धि होऊन गेल्याचें कारण होय असें मला खात्रीनें वाटतें."

अशी ही शंका या वेळीं जरी त्यास वाटत होती तरी नेहमीं

त्याच्यामध्यें आत्मविश्वास किंवा आपल्या मानसिकशक्तीचा भरंवसा दिसत असे. उदाहरणार्थ, एका पत्रांत तो म्हणतो, "माझें आकर्षणशक्तिमापक यंत्र डाक्टर लार्डनर व त्यांचे प्रयोग यांस मागें सारील. कारचें यंत्र काय आहे तें मला माहीत नाहीं, पण माझें यंत्र अगदीं बरोबर चालतें आणि सोईवार आहे अशी मी खात्री देऊं शकेन." "इंजिनियरस क्लब" नामक संस्थेपुढें कमानी तयार करण्याच्या विषयावर एक निबंध त्यानें वाचिला होता त्याबद्दल तो अशी फुशारकी मारितो कीं, ही संस्था सुरू झाल्यापासून इतका सर्वांगपूर्ण निबंध तिच्यापुढें कोणींच वाचिला नसेल. पुनः एकदां तो म्हणतोः— "मला वाटतें, कामाच्या सामान्य रुळींची जर मला जरा ज्यास्त माहिती असती, तर मी रेसिडेंट इंजिनियरचें काम ह्या रेलवेच्या दोन्ही शाखांवर जितक्या वाकबगारीनें हल्लीं होत असेल तितक्या वाकबगारीनें करूं शकेन." ता० ११ मार्च १८३९ रोजीं तो आपल्या बापास लिहितोः—"ज्या गोष्टींत मी कमी आहें म्हणून तूं नेहमीं म्हणत असस त्यांपैकीं पुष्कळ गोष्टींत मी इतरांपेक्षां कांकणभर ज्यास्तच पुढें असल्याचें मला आढळून आलें आहें, हें तुला ठाऊक आहे काय? उदाहरणार्थ, तुझें नेहमीं असें मत पडे कीं, मला आपल्या कल्पना चांगल्या रीतीनें स्पष्ट करून दाखवितां येत नाहींत; पण हपिसांतील कोणालाहि एकादी गोष्ट जेव्हां समजून घ्यावयाची असेल तेव्हां तो मजकडे येतो, कारण ते म्हणतात, "तूं केलेलें स्पष्टीकरण आह्मांस सर्वांत उत्तम समजतें." ता० १९ एप्रिल १८४० रोजीं तो लिहितोः—"एकंदरींत माझी प्रगति जरी बऱ्याच चांगल्या रीतीनें होत आहे तरी माझें मला पूर्ण समाधान वाटत नाहीं. मी जाणून आहें कीं, अभ्यासाच्या बाबतींत मला माझ्या वेळाचा ज्यास्त चांगला उपयोग करतां आला असता, आणि सुधारण्याच्या किंवा ज्ञानसंपादन करण्याच्या पुष्कळ संधि मीं आजपर्यंत गमाविल्या आहेत; आणि सर्वांत वाईट

गोष्ट ही कीं, अशा रीतीनें जरी मी स्वताशीं असंतुष्ट आहें तरी त्याचा कांहीं हितकारक परिणाम झाल्याचा दिसून येत नाहीं. " ता० १८ जानेवारी १८४१ रोजीं तो लिहितोः—" ज्ञानसंपादनाच्या पूर्वीं आलेल्या संधींचा मीं ज्यास्त काळजीपूर्वक उपयोग केला असता तर बरें झालें असतें असे विचार हल्लीं माझ्या मनांत कितीदां तरी येतात! एकदां धंद्याउद्योगास आपण लागलों म्हणजे आपल्या हातून ह्या बाबतींत पहिल्या मानानें फारच अल्प होतें. मन व शरीर ह्यांस थकवा आलेला असल्यामुळें, आणि सामान्यतः उत्साहाची उणीव वाटत असल्यामुळें, फुरसतीच्या वेळीं अभ्यास होऊं शकत नाहीं. ज्ञानसंपादनाचीं साधनें नष्ट झाल्यानंतर त्यांच्या किंमतीचें योग्य ज्ञान आपणास होतें ही मोठी दुःखाची गोष्ट होय. माझा बहुतेक असा सिद्धान्त झाला आहे कीं, लवकर धंद्यांत शिरणें, आणि शिकावयाचें पुष्कळ शिल्लक राहणें ह्यापेक्षां धंद्यांत शिरण्याच्या अगोदर अभ्यास पुरा करून मग त्यांत शिरणें अधिक चांगलें होय, मग तसें करण्यास जरा उशीर झाला तरी हरकत नाहीं. " ता० ९ एप्रिल १८४१ रोजीं तो पुनः लिहितोः—" आज कांहीं दिवस माझें मन जणूं काय अगदीं निद्रिस्त झालें आहे, आणि कसून अभ्यास करून ही मनोवृत्ति मी लवकर काढून टाकीन असें म्हणत आहें. "

पण ज्यांच्या संगतींत त्याचें काम चाललेलें होतें त्यांच्या लिहिण्यावरून मात्र ह्याची अशी ही हलाकी झालेली होती असें दिसत नाहीं. उदाहरणार्थ, क्यापटिन मूरसम त्याच्या बापास ता० ३१ मे १८४० रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत त्यासंबंधानें आपलें मत असें देतोः—" तुझा मुलगा हर्बर्ट याचें शिक्षण चांगलें झालेलें आहे, व त्यास कारण तूंच असला पाहिजेस असें मी समजतों; तो ह्या शिक्षणाचा योग्य उपयोग करील आणि दिवसेंदिवस ज्यास्त

ज्यास्त सुधारत जाईल, असें दिसतें. तो आपला विषय झटकन आणि स्पष्ट व निश्चित रीतीनें ध्यानांत घेतो, व त्यामुळें त्यांतील मुद्याच्या गोष्टी त्याच्या बरोबर लक्ष्यांत येतात; आणि मग ती गोष्ट पूर्णपणें बनवून आणण्यास जरूर त्या सामर्थ्याची किंवा उत्साहाची वाणहि त्याच्यांत कधीं दिसत नाहीं. मला भरंवसा आहे कीं हे सर्व उद्योग अनंत जीविताची (परलोकाची) तयारी करणें हा जो ह्या जन्मांतील मोठा उद्देश त्याच्या मानानें गौण आहेत हें ध्यानांत ठेवण्याबद्दल तूं त्याला लिहिशील.....हर्बर्टला गृहप्रेमाच्या आणि सभ्यगृहस्थासारख्या संवयी लागलेल्या असल्यामुळें तो पुष्कळ मोहांपासून मुक्त दिसतो, आणि मला अशी आशा आहे कीं, आपल्या स्वताच्याच शक्तीवर भरंवसा ठेवणाऱ्या माणसाच्या मनाला होणाऱ्या मोहापासून तो आपलें संरक्षण करूं शकेल. ”

तो हिन्टन येथें असतां त्याच्या बापाच्या पत्रांत धर्मविषयक उपदेश जितका दिसे तितका ह्या वेळच्या पत्रांत दिसत नाहीं. धर्म ह्या सामान्य विषयावर वाद करण्यास जरी तो नेहमीं तयार असे, तरी स्वताच्या धर्मविषयक स्थितीविषयीं लिहिण्याबद्दल बापानें केलेल्या विनंत्यांस तो अजूनहि दाद देत नव्हता, आणि त्याच्या मनांत नैतिक ध्येय फार उच्च असे, आणि जीविताचा गंभीर उद्देश पूर्णपणें ध्यानांत आणण्यास तो प्रयत्न करी, ह्याविषयींचा पुरावा जरी पुष्कळ सांपडतो, तरी आपला नीतीचा कित्ता ठरविण्याकरितां त्यानें कधींहि कोणत्याहि धर्ममताकडे धांव घेतल्याचा, किंवा नीतीला आधार म्हणून धर्मविषयक मनाच्या उकळींवर विसंबल्याचा, पुरावा दिसत नाहीं. वूर्स्टर येथें असतां पहिल्या वर्षीं त्यानें राजकीय चर्चेसहि फांटा दिला होता; ह्याचें एक कारण ती त्याच्या कामाच्या आड येई, आणि दुसरें कारण त्याची अशी खात्री होती कीं, सुधारणेच्या प्रगतींत मध्यें मध्यें कितीहि फांदीं आलीं तरी आ-

पलीं सारखी अधिकाधिक चांगल्या स्थितीकडे प्रगति होणार. समाजांत सुधारणेच्या स्वाभाविकच प्रवृत्ती असतात ही कल्पना ह्याच्या अगोदरच त्यास परिचित झालेली होती. वयाच्या सरासरी विसाव्या वर्षीं जेव्हां त्यानें धर्म व राजनीति ह्या विषयांच्या चर्चेस आरंभ केला, तेव्हां तद्विषयक आतांपर्यंतची ठराविक विचारपद्धति काय आहे ह्याबद्दल पर्वा न करतां त्यांचीं मूलतत्त्वें शोधून काढण्याकडे तो लागला. त्याचीं ह्या विषयांवर ह्या वेळीं मतें काय होतीं तें समजण्याचा अप्रत्यक्ष मार्गच आतां खुला आहे; म्हणजे, ह्याच्या पत्रांना त्याच्या मित्रांनीं लिहिलेल्या उत्तरांवरूनच तीं ताडावीं लागतात, कारण ह्याचीं पत्रें त्या मित्रांनीं दुर्दैवानें राखून ठेविलेलीं नाहींत.

तसेंच, १८४० मध्यें राजकीय, सामाजिक आणि धर्मविषयक प्रश्नांच्या संबंधानें ह्यास विशेष आस्था वाटूं लागण्यास काय कारण झालें असावें हें केवळ तर्कावरून ताडिलें पाहिजे. लहानपणीं घरीं असतां प्रथम उत्पन्न झालेली, आणि हिन्टन एथं जागृत ठेविलेली, जी एतद्विषयक त्याची आस्था, तीच आतां पुनः जागृत झाली असेल असें कांहीं अंशीं म्हणतां येईल. इंजिनियरीच्या कामांत पुढें जाण्याची आशा जशी कमी होत चालली तशी मनुष्य व समाज एतद्विषयक जी त्याच्यामध्यें वंशपरंपरेनेंच आलेली कळकळ तिनें पुनः जोर धरिला असावा; कारण रेलवेवरील नोकरीच्या त्याच्या शेवटच्या वर्षांत तो हपिसांतील इतर लोकांशीं आणि मित्रांशीं ह्या विषयांची चर्चा वरचेवर करूं लागला असें दिसतें. क्यापटिन मूरसमसाहेबानें त्याचा तत्त्वविवेचनाचा छंद कांहीं कमी व्हावा ह्या उद्देशानें एक त्रासदायक काम त्यास नेमून दिलें, पण फुकट. त्या वेळची इंग्लंडची सामाजिक व राजकीय स्थितिहि विचार करण्यास पुष्कळ अवकाश देणारी होती. ह्या वेळीं शिक्षणाचा आवांका आणि उद्देश ह्याबद्दलहि तो कांहीं विचार करणार होता असें दिसतें, पण शिक्षणाकरितां सरकारानें आपली

देणगी वाढवून त्याच्या व्यवस्थेकरितां प्रिव्ही कौन्सिल बनविल्यामुळें शिक्षणाशीं सरकाराचा संबंध काय असावा या विषयाकडे त्याचें लक्ष्य वळलें. तद्वतच इंग्लंड, स्काटलंद व आयर्लंड ह्या देशांत ज्या धर्मसंस्थाविषयक चळवळी चालल्या होत्या तिकडे त्याचें लक्ष्य या वेळीं जाऊं लागलें.

असो. तीन महिन्यांनीं तुझी नोकरी आह्मांस नको म्हणून जेव्हां १८४१ च्या जानेवारींत त्याला नोटीस मिळाली तेव्हां त्यानें रोजनिशींत असें लिहून ठेविलें:—" नोटीस मिळाली—फार आनंदाची गोष्ट. " त्याच्या मनाची वृत्ति ह्या वेळीं अशा प्रकारची असल्यामुळें चालू असलेल्या आगगाडीच्या खात्यांत कायम नोकरी त्यास देत होते ती त्यानें नाकारिली, आणि बापास लिहिलें कीं, ती काय आहे तें न विचारतांच मी ती नको म्हटली. हें त्याचें करणें बापास अर्थात् आवडलें नाहीं; व त्याबद्दल त्यानें त्याची चांगली कानउघाडणी केली. क्यापटिन मूरसमनें त्याचें इतकें कल्याण केलेलें असतां, व त्याच्याशीं इतके दिवस हाहि फार चांगल्या रीतीनें वागत असतां, अलीकडे त्याजबद्दल ह्याचें मन कलुषित झालें होतें; ह्याबद्दलहि त्याच्या आईबापांस फार काळजी वाटूं लागली; आणि पुढें खुद्द स्पेन्सरलाहि त्याबद्दल वाईट वाटत असे. वास्तविक गोष्ट अशी होती कीं, आगगागाड्या बांधण्याच्या कामास हल्लीं मंदी आली असल्यामुळें त्या खात्यांतील सर्वच नोकरांचें नुकसान झालें होतें, आणि तें जणूं काय आपलें स्वताचेंच्र झालें आहे अशा रीतीनें इतर हपिसरांचा पक्ष ह्यानें घ्यावा हें ह्याच्या विशिष्ट स्वभावास अनुसरूनच होतें. मात्र हें नुकसान मूरसमनें मुद्दाम केलें आहे असें जें त्यास वाटत होतें तें गैर होतें. त्यानें शिफारसपत्र मागण्याकरितां क्यापटिन मूरसमला ता० २४ एप्रिल १८४१ रोजीं वूर्स्टर एथून लिहिलेल्या पत्रांतील पुढील उताऱ्यावरून त्याला स्वताला

त्याच्याविरुद्ध तक्रार करण्यास बहुतेक मुळींच कारण नव्हतें हें स्पष्ट दिसून येतें. तो म्हणतोः—" तूं मला नेहमीं प्रेमपूर्वक वागवीत असस व माझ्या कल्याणाकडे तुझें सारखें लक्ष्य असे ह्याबद्दल मी तुझें मनःपूर्वक आभार मानितों, आणि तुझ्या मजविषयींच्या सदिच्छेची मजमध्यें जर कधीं योग्य जाणीव दिसली नसेल, तर त्यास कारण मजमध्यें योग्य मनोभावाचा अभाव हें नसून, आपले विचार प्रदर्शित करण्याच्या शक्तीची मजमध्यें असलेली उणीव हें होय असें तूं समजशील अशी मी आशा करितों. तुझ्या हाताखालीं नोकरी करीत असतां माझें कल्याण व सुख ह्याबद्दल जितकी निर्हेतुक काळजी तूं वाहिली आहेस तितकी वाहणारे लोक जर मला माझ्या पुढील कारकीर्दींत भेटले तर मी आपल्यास फारच दैवाचा समजेन. "

त्याच्या ओळखीच्या लोकांची संख्या फार अल्प होती. कारण त्याच्या हपिसांतील लोकांपलीकडे त्याच्या ओळखीचें क्षेत्र बहुतेक मुळींच गेलेलें नसून, त्यांमध्यें त्याचे स्नेही असेहि तीन किंवा चार असामी होते. स्त्रीमित्रांच्या संबंधानें पाहतां मिसेस मूरसमशीं गांठ पडेपर्यंत स्त्री–मित्र त्यास मुळींच नव्हता म्हटलें तरी चालेल. पुढें क्यापटिन मूरसमच्या एका पुतणीशीं त्याची ओळख झाल्यावर, त्याला आजपर्यंत अपरिचित असा अनुभव कसा आला हें त्यानें " आत्मचरित्रांत " सांगितलेंच आहे. डार्बीला परत आल्यावर तिला पाठविलेल्या एका पत्रांत तो म्हणतोः—" तुझी माझी ओळख झाली असतां तूं मजबद्दल जी मोठी दयार्द्रबुद्धि व सदिच्छा दर्शविलीस तिजबद्दल माझ्या आभारांचा स्वीकार कर. तूं मजबद्दल जो स्नेहभाव दाखविलास तो मला मोठाच मान दिलास असें मी नेहमीं समजेन, आणि तुझ्या संगतींत जो माझा वेळ गेला त्याबद्दल मला सुख व दुःख ह्यांनीं असें स्मरण होत राहील असें जें मी म्हणतों तें विश्वसनीय समज. "

त्याची वादविवाद करण्याची संवय, बेफिकीरपणें टीका करण्याची प्रवृत्ति, आणि इतरांस न रुचणारीं कांहीं मतें, इत्यादि विशेष त्याच्यामध्यें असतांहि क्यापटिन मूरसमनें म्हटल्याप्रमाणें त्याच्या संवयी गृहप्रेमाच्या व सभ्यपणाच्या असल्यामुळें त्याची ज्यांना निकट माहिती होती ते त्याची वाखाणणी करीत. नवीन मित्र करण्याची जरी त्याची फार तयारी नसे तरी थोड्या कारणावरून तो जुने स्नेह तोडीत नसे. १८३८ सालीं हॅरो मुक्कामीं एकटाच असतां त्यानें असा सिद्धान्त ठरविला कीं, आपणास वनवाशीपणानें कधीं राहतां येणार नाहीं. वूर्स्टर येथें असतां संगत नसली तर त्यास उद्विग्नपणा वाटत असे, आणि आपल्या जीवितास जराशी खळबळ केव्हां प्राप्त होईल असें त्यास होत असे. पोविक येथें असतां मात्र ह्या बाबतींत त्याची चैन असे; कारण मूरसमच्या मुलांचा तेथें त्यास सहवास प्राप्त होत असे. ह्यासंबंधानें तो म्हणतो:— " आईच्या अंत:करणाला तिच्या मुलांच्या द्वारां वाट सांपडते अशी जी म्हण आहे ती पोलिक येथें आल्यापासून मीं कसोटीस लावून पाहिली आहे; कारण मला वाटतें, मी मिसेस मूरसमच्या मुलांचा मोठा आवडता बनल्यामुळें तिचाहि बनलों आहें. " मुलांबद्दल त्यास शेवटपर्यंत जी फार आवड असे ती व्यक्त होण्याची ह्यापूर्वीं केव्हांच संधि आलेली नव्हती. त्यांतल्यात्यांत मुलांपेक्षां मुलींची आवड त्यास ज्यास्त असे.

त्याचा एकविसावा वाढदिवस पडण्याच्या सुमारासच तो घरीं परत आला. साडेतीन वर्षांपूर्वीं त्यानें घर सोडिल्यापासून जे त्यास अनेक प्रकारचे अनुभव आलेले होते त्यांचा परिणाम त्याच्यावर झाल्याखेरीज राहिला नव्हता. त्याचें शील अनेक तऱ्हांनीं प्रौढ होत चाललें होतें. गणित व पदार्थविज्ञान या विषयांच्या मूलतत्त्वांचें त्यानें आकलन केलें होतें. त्याच्या कल्पनाशक्तीस स्वव्यापार कर-

ण्यास अवकाश मिळाला होता, इंजिनियरिंगच्या कांहीं शाखांचें त्यास बरेंच ज्ञान झालें होतें, महत्त्वाच्या कामांच्या रुळींची माहिती झाली होती, आणि उपयुक्त अशा व्यावहारिक काम करण्याच्या संवयी त्यास लागल्या होत्या. त्याच्या हपिसांतील कामामुळें योग्य क्रमानें विचार करण्याची शक्ति त्याजमध्यें आली होती, आणि सफाईनें व स्पष्टपणें लिहिण्याची संवय लागली होती. त्याचें काम केवळ तात्त्विक विचार करण्यास त्यास अवकाश देत असून शिवाय व्यावहारिक गोष्टींचाहि परिचय त्यास करून देणारें होतें. त्याच्या ग्रंथांतून तात्त्विक विचार आणि त्यांचीं प्रत्यक्ष उदाहरणें यांचा संयोग जो इतका स्पष्टपणें दिसतो तो बनविण्याची संवय त्यास यामुळेंच लागली. त्याच्या सगळ्या जीविताला पुरणारें काम जें पुढें त्यानें शिरावर घेतलें तें करण्यास लायक होण्यास मानसिक वाढीच्या अनेक पायऱ्या त्यास अद्यापि क्रमावयाच्या होत्या हें खरें आहे; पण त्याच्या बौद्धिक व नैतिक शीलाचीं मुख्य अंगें त्याच्या ठिकाणीं या वेळीं वाढीस लागलीं होतीं, आणि त्याच्या अत्यन्त अर्थप्रचुर कल्पनांपैकीं थोड्याशा कल्पनांच्या संदिग्ध रूपरेखा त्याच्यामध्यें उमटावयास लागल्या होत्या. आतां, १८३९ सालीं सामाजिक, राजकीय व धार्मिक प्रश्नांच्या संबंधानें त्याजमध्यें अनादर दिसत असून पुढच्याच सालीं तो त्यांत कसा मग्न होऊन गेला हें सांगणें कठीण आहे. कॉबडेनप्रमाणें त्याचें शील थोड्या कालांत विस्तार व पक्कपणा पावलें असेल. कॉब्डेनचा चरित्रकार जॉन मोर्ले त्यासंबंधानें असें म्हणतो: "ज्या तरुण माणसास उदरनिर्वाहाचें साधन प्राप्त करून घ्यावयाचें आहे त्याच्या ठिकाणीं स्वाभाविक व हितपरिणामी अशी जी स्वार्थबुद्धि दिसत असते, तिच्या ऐवजीं चांगल्या नागरिकाची विस्तृत कळकळ आणि उदार अशी सार्वजनिकहिताची बुद्धि त्याच्यामध्यें एकच पायरी वलांडल्यानें

उत्पन्न झालेली दिसून येते. तसें याच्यासंबंधानें कदाचित् झालें असेल; तें कसेंहि असलें तरी, त्याच्या जीविताची एकंदर दिशा बदलून टाकणारी क्रान्ति त्याच्यांत यावेळीं होऊन गेली हें उघड आहे.

प्रकरण चवथें.

वाग्देवीची पहिली प्रार्थना

१८४१ च्या वसंतांत जेव्हां त्यानें वूर्स्टर सोडिलें तेव्हां इंजिनियरिंग सोडून देण्याचा त्याचा कायमचा निश्चय मुळींच नव्हता. त्याचा तात्कालिक हेतु विद्युच्चुंबनविषयक यंत्राच्या शोधाच्या कामीं बापास मदत करण्याचा होता; कारण त्या शोधापासून आपणास पुष्कळ द्रव्यप्राप्ति होईल म्हणून त्यास वाटत होतें, पण तो उद्योग त्यास निरुपयोगी म्हणून लवकरच सोडून द्यावा लागला. मग तो जो वाङ्मयाकडे वळला तो त्याच्या स्वाभाविक आकर्षणामुळें नव्हे; तर समाज आणि धर्म ह्यांच्या स्थितीविषयींच्या विचारांची जी खळबळ त्याच्या मनांत चालली होती ती व्यक्त करून दाखविण्याची जी त्यास जरूर भासली त्यामुळें होय. तो घरीं परत आल्यावर त्यास फुरसत व अनुकूल परिस्थिति असलयामुळें त्याची ह्या विषयांबद्दलची कळकळ वाढली. त्याचा चुलता टॉमस हा सुधारणाप्रसार करण्याच्या कामीं पूर्णपणें गुंतलेला होता; आणि त्याचा बापहि सांपडेल ती फुरसत महत्त्वाच्या सार्वजनिक कामाकडे स्वशक्त्यनुसार लावीत असे. इंग्लंडची सांपत्तिक स्थिति त्या वेळीं विचारणीय होती, आणि धर्मसंस्थाविषयक वातावरण फारच क्षुब्ध झालेलें होतें. शिवाय आगगाड्या बांधण्याच्या धंद्यास या वेळीं उतरती कळा लागलेली होती.

त्यानें अभ्यासाचें वेळापत्रक या वेळीं तयार केलें होतें तें असें:– " पांच वाजतां उठणें; सहा ते आठ, फिरावयास बाहेर जाणें; न्याहारीच्या वेळापर्यंत नकाशे काढणें किंवा तसलाच कांहीं उद्योग करणें; नऊ ते एक, गणित; दोन ते तीन, विद्युच्चुंबनविषयक प्रयोग; तीन ते चार, भूमितिविषयक आकृति काढणें; चार ते सहा, फ्रेंच. सहा ते सात, बाहेर फिरावयास जाणें, चहा आणि कांहीं नियमित विषयांवर संभाषण; आठ ते नऊ, इतिहास किंवा पदार्थविज्ञान ह्यांचें अध्ययन; नऊ ते साडेदहा, रोजनिशी लिहून काढणें. " हें वेळापत्रक केवळ मनांतील योजनारूपी असून त्याप्रमाणें अगदीं अक्षरशः तो क्वचितच वागत असे. उदाहरणार्थ, जें यंत्र फार फायदेशीर होईल म्हणून त्यास वाटत होतें तें काम करीत नाहींसें झाल्याबरोबर विद्युच्चुंबनविषयक प्रयोग बंद झाले. विद्युच्छक्तीनें चित्रें काढणें आणि रासायनिक फेरबदल करणें ह्याबद्दलचे प्रयोग मात्र पुढच्या वर्षापर्यंत सुरू राहिले. प्रथम ते यशस्वी होतीलसें वाटत होतें, पण अखेरीस त्यांजपासून कांहींच फलनिष्पत्ति झाली नाहीं. गणिताखेरीज भूगर्भशास्त्र आणि पदार्थविज्ञान ह्यांचें अध्ययन केव्हां केव्हां लहरीनुरूप तो करीत असे. झाडांच्या निरनिराळ्या पन्नास प्रकारच्या पानांच्या आकृती त्यानें ह्या वेळीं काळजीपूर्वक काढिलेल्या पाहून त्याला वनस्पतिशास्त्राची अभिरुची फार लागली होती हें स्पष्ट दिसतें. सुतारकाम करणें, फ्रेंच शिकणें, चेहरे रेखाटणें, गाणीं गाणें, नवीन जोडलेला स्नेही लॉट ह्याच्याबरोबर होडी वल्हवीत जाणें, आणि मासे धरणें, हे त्याचे ह्या वेळचे कर्मणुकीखातरचे व्यासंग होते. मि० होलम, मिसेस ऑर्डिश, आणि मि० लॉट ह्यांच्या त्यानें काढिलेल्या तसबिरींवरून त्यानें चित्रकलाचातुर्यहि बरेंच संपादन केलें होतें असें दिसून येतें. थोड्या खर्चानें पूल बांधण्याची योजना जी त्यानें केली होती ती " नदीवरील पुलांचा एक

नवीन प्रकार " नामक निबंध लिहून त्यानें प्रसिद्ध केली. " बहालांचा आडवा ताण " ह्यावरहि त्यानें एक निबंध लिहून प्रसिद्ध केला; व त्याबद्दल त्याचा मित्र ज्याकसन त्यास असें लिहिता झाला:– " मी कबूल करितों कीं, तुझा निबंध व त्यावरील " हर्बर्ट स्पेन्सर सी. ई. (सिव्हिल इंजिनियर) " ही सही पाहून मी अगदीं चकित होऊन गेलों. तूं अशा राक्षसी पावलांनीं पुढें जात आहेस कीं त्यामुळें मी फारच मागें पडलों आहें. " त्याच्या सहीच्या पुढची " सी. ई. " हीं अक्षरें त्यानें घातलेलीं नसून त्या मासिकाच्या संपादकानें घातलेलीं होतीं. अशी चूक पुन: होऊं नये म्हणून स्पेन्सरनें संपादकाला असें लिहिलें कीं, ह्यापुढें माझ्या नांवापुढें धंद्याचें कोणतेंच नांव घालूं नको. पण त्याबरोबर असेंहि म्हटलें कीं, " सिव्हिल इंजिनियर असें जे आपल्यास म्हणवितात, त्यांपेक्षां त्या पदवीस मी कदाचित् ज्यास्तच योग्य आहें. " शिल्पविषयक नकाशे काढण्यासहि त्यानें मोठे प्रयत्न केले, आणि ज्याकसनच्या मतें त्यांत त्याच्या अभिरुचीपेक्षां त्याची कल्पकशक्तिच ज्यास्त दिसत होती. ' आर्किटेक्स्टस जर्नल ' नामक शिल्पविषयक मासिकांत त्यानें ' शिल्पविषयक दाखला ' ह्या नांवाचा निबंध १८४२ च्या जानेवारींत प्रसिद्ध केला. त्यांत तो म्हणतो कीं, " पुरातनाबद्दल पूज्यबुद्धि ही शिल्पशास्त्राच्याच प्रगतीस आड येते असें नाहीं, तर सर्व प्रकारच्या प्रगतीस आड येते. ह्याचें कारण हल्लींची जी जुन्या भाषा शिकविण्याची पद्धति तिच्यांत आहे. " पुढें वेगमापक यंत्रावर एक निबंध लिहून तो त्यानें त्याच मासिकाच्या जुलैच्या अंकांत प्रसिद्ध केला.

त्या वेळीं जे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक वादविवाद चालत त्यांच्यांतहि तो धैर्यानें आणि अगदीं मन:पूर्वक पडूं लागला. त्याचे मित्र ज्याकसन व " ई. ए. बी. " ह्यांच्या पत्रांवरून असें

दिसतें कीं, बाप्तिस्मा देणें, प्रभुभोजन करणें, दीक्षा देणें, ह्या सर्व विधींच्या संबंधानें ह्या वेळीं त्याचें असें मत होतें कीं, ते ज्या लोकांना प्रथम सांगितलें त्यांनाच ते उद्दिष्ट असून हल्लींच्या काळास ते योग्य नसल्यामुळें बंद करावे. शिवाय त्या पत्रावरून असेंहि दिसतें कीं, तेव्हांची राजकीय स्थिति त्यास पसंत नव्हती, कारण तो म्हणतो, " हल्लीं राजांचें आणि लोकांचें हिताहित एकच नाहीं, आणि सरदारवर्ग लोकांचे न्यायदानविषयक सर्व यत्न फुकट घालवीत आहे." इंग्लंडांतील स्थापित धर्मसंस्थेंतील धर्माधिकाऱ्यांवर प्रतिकूल टीका केलेलें एक पत्र त्यानें " ई. ए. बी. " स लिहिलें; त्यावर तो उलट लिहितो कीं, इतकें शिव्यांनीं भरलेलें पत्र मीं पूर्वीं कधीं वाचिलें नव्हतें. त्याचा चुलता टॉमस याच्यावर या धर्माधिकारी लोकांनीं निष्कारण हल्ला केल्यामुळें तो क्रुद्ध होऊन त्यानें तें लिहिलेलें होतें. त्याचे हे दोघे मित्र त्यास निर्भीडपणें लिहीत असत, आणि त्यांच्या टीका कितीहि कडू असल्या तरी तो त्यांजवर रागावत नसे. " ई. ए. बी. " त्यास एकदां लिहितो:—" तूं लिहितोस कीं अगदीं थोड्या सामुग्रीवर मला लांबलचक पत्र लिहितां येतें; पण अगदीं अल्प आधावर एकादी प्रचंड कृति बांधण्याची जी तुझी सफाई तिच्यापुढें हें कांहींच नाहीं." त्यानें या सुमारास पांच शिलिंग खर्च करून कपालशास्त्रज्ञाकडून आपल्या डोक्याची परीक्षा करून घेतली; त्यासंबंधानें त्याच्या मित्रांचें मत असें पडलें कीं, हे पांच शिलिंग त्यास ज्यास्त चांगल्या रीतीनें खर्च करतां आले असते; आणि हें त्यांचें म्हणणें तेव्हां नाहीं तरी पुढें त्यास बरोबर वाटलें असावें. ' ई. ए. बी ' त्याला " अगदीं पुरा जहाल " म्हणून म्हणत असे, व त्यांत अतिशयोक्ति नव्हती. त्यानें पोषाकासंबंधानें एक लोकविरुद्ध तऱ्हा १८४२ च्या जानेवारींत सुरू केली, तिच्यासंबंधानें एका बाईस तो असें लिहितो:—" मी बसकी

टोपी घालितों ह्या माझ्या भयंकर स्वतंत्रपणाबद्दल डार्बीच्या लोकांनीं प्रथम आश्चर्य व्यक्त केलें, आणि त्यावरून मला चार्टिस्ट नामक बेकायदेशीर चळवळयांचा नाईक समजूं लागले; तरी मी त्यास न जुमानतां तोच प्रघात मोठ्या धिमेपणानें सुरू ठेविला; आणि त्यामुळें अखेरीस माझ्या ह्या चांगल्या उदाहरणाचा सुपरिणाम झालेला पाहून मला समाधान वाटलें; कारण डार्बीतील बरेच तरुण माझ्यासारखीच बसकी टोपी हल्लीं घालूं लागले आहेत. एवंच ही नवीन तऱ्हा प्रथम काढल्याचा मोठा मान घेण्यास मला हक्क पोहोचतोसें दिसतें."

१८४२ च्या मे व जून महिन्यांत, तो हिन्टन एथें चुलत्याकडे गेला असतां "सरकाराची योग्य कर्तव्यमर्यादा" या विषयावर 'नॉन् कन्फॉर्मिस्ट' या वर्तमानपत्रास पत्रें पाठविण्यास त्यानें सुरवात केली. त्याच्या पुढील कामाच्या दृष्टीनें हीं पत्रें फारच अर्थप्रचुर होतीं, आणि त्यांचा लोकांनीं फार आदर केला; त्यामुळें इंजिनियरी सोडून वाङ्मयाकडे जावयाचा जो त्याच्या मनाचा अगोदरचाच कल तो बळकट झाला. ह्या सर्व गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी उदरभरण कसें करावयाचें हा प्रश्न सोडविण्यास त्यांच्यापासून त्यास मुळींच मदत झाली नाहीं. "नॉनकन्फॉर्मिस्ट" वर्तमानपत्र वाढवण्याचा, आणि एक नवें मासिक काढण्याचा मि० जोसेफ स्टर्ज वगैरे मंडळीचा ह्या वेळीं विचार चालला होता. त्या कामीं आपल्यास उदरनिर्वाहाचें साधन प्राप्त होईल अशी कांहीं काळ त्यास आशा उत्पन्न झाली. शिवाय, स्वताचें एक मासिक काढण्याचाहि त्याचा ह्या वेळीं विचार चालला होता; पण त्यास स्टर्जसाहेबानें संमति दिली नाहीं. त्याचा चुलता टॉमस यानें आणि त्याच्या बापानेंहि त्यास उत्तेजन दिल्यामुळें त्या काळच्या सर्व सुधारणाविषयक चळवळींत तो पूर्णपणें पडूं लागला. ह्यांपैकीं एक च-

ळवळ निवडणुकीच्या वेळीं होणारी लांचलुचपत बंद करण्याच्या-संबंधानें होती. त्यासंबंधानें अर्ज वगैरे त्यानें बरेच तयार केले. मत-दारांचा पूर्ण हक्क मिळविण्याची खटपट करणारी एक सभा त्या वेळीं स्थापन झालेली होती तिच्या डार्बी एथील शाखेचा कांहीं दिवस तो सेक्रेटरी झाला, आणि १८४९ च्या डिसेंबरांत बर्मिंघाम एथें भर-लेल्या परिषदेस तो प्रतिनिधि म्हणूनहि गेला.

ह्या वेळेस त्यानें शिक्षण, नीति, राजकारण, धर्म इत्यादि वि-षयांवर कच्चीं टिपणें करून ठेविलीं होतीं; तीं पाहतां, त्यावरून त्याची मानसिक चळवळ किती चालली होती हें स्पष्ट दिसून येतें. इंग्रजीचे स्वाभाविक मूलवर्ण बनविणें आणि दहांच्या ऐवजीं बारांची अंकपद्धति सुरू करणें ह्यासंबंधाचेहि विचार त्याच्या डोक्यांत ह्या वेळीं घोळत होते. शिवाय नवीन यंत्रें सुरू केल्यापासून नुकसान झालें अशी जी ओरड चालली होती त्यावर कांहीं लेख लिहिण्याचें त्यानें योजिलें होतें; त्यांपैकीं प्रास्ताविक लेखाच्या कच्च्या टिपणाचा कांहीं भाग उपलब्ध आहे, तो असाः—" आमच्या राष्ट्रीय विपत्तीचें कारण काय ?" ह्या प्रश्नाच्यासंबंधानें जितके तर्क आणि क्लृप्त्या निघाल्या आहेत तितक्या कदाचित् कोणत्याच प्रश्नाच्यासंबंधानें निघाल्या न-सतील.....ह्या क्लृप्त्यांविरुद्ध आह्मी कडक टीका करीत नाहीं ह्याचें कारण ह्या विपत्तीच्या कारणासंबंधानें आणि ती काढून टाकण्याच्या-संबंधानें आमचीहि विशिष्ट कृति आणि लाडकी उपयोजना आहेच. आह्मास असें वाटतें कीं, राष्ट्रीय भरभराटीवर जीं अनेक संकटें इतके दिवस येत आहेत, आणि लोकांचा उत्साह आणि साधनसं-पत्ति ह्यांचा नाश करीत आहेत, तीं सर्व आजपर्यंत कोणाच्याच ध्यानांत न आलेल्या अशा एका मूल कारणापासून उत्पन्न झालेलीं आहेत, आणि तें कारण फाजील (जरूरीहून ज्यास्त) कायदे हें होय. लोकांचें जीवित आणि वित्त ह्यांचें रक्षण करणें हें जें अधि

कार्यांचें मुख्य कर्तव्य तेंच त्यांनीं करावें असा कडक नियम करण्याशिवाय आमच्या सामाजिक रोगांना अन्य खात्रीचा उपाय आह्मास दिसत नाहीं. हें सिद्ध करण्याची पूर्व तयारी म्हणून ह्या विपत्तीचीं कारणें कोणतीं नाहींत हें प्रथम सांगूं. ह्यासंबंधानें यंत्रें हीं राष्ट्राच्या विपत्तींचीं कारणें आहेत अशी जी लोकांची समजूत आहे ती खोटी आहे हें प्रथम दाखविण्याचा आमचा विचार आहे. "

वाङ्मयाच्या व्यासंगापासून उदरनिर्वाह होतो किंवा नाहीं हें नीट रीतीनें पहावयाचें असा निश्चय करून १८४३ च्या मे महिन्यांत तो लंदनास आला, आणि ' मला यांत यश येण्याची बरीच आशा आहे ' असें तेथून त्यानें आईस लिहिलें. दुसऱ्या एका पत्रांत एका बाईस तो लिहितो:—" इंजिनियरिंगच्या धंद्यानें मला रामराम ठोकल्यामुळें मींहि त्या धंद्यास रामराम ठोकण्याचा बहुतेक कायमचाच निश्चय केला आहे, आणि वाङ्मय ह्या नव्या धंद्याकडे मी लक्ष्य देत आहें, आणि ज्यांस " छापखान्यांतील हमालमंडळ " म्हणून लोक म्हणतात त्यांपैकीं एक होण्याच्या मार्गास लागलों आहें, हें कदाचित् तूं ऐकिलें असशील. " ह्यासंबंधानें " सरकाराची योग्य कर्तव्य मर्यादा " ह्या विषयावावरील त्याचीं पत्रें एकत्र करून छापून काढण्याचें काम त्यानें प्रथम हातीं घेतलें. त्यासंबंधानें जूनच्या अखेरीस तो म्हणतो, " मी आज साप्ताहिक लिबरलपक्षीय वर्तमानपत्रांच्या हपिसांत त्याच्या प्रती नेऊन देण्यासाठीं लंदनमध्यें भटकत आहें. मी प्रकाशकाकडेहि गेलों, आणि माझ्या पुस्तकाच्या प्रती बऱ्याच खपत आहेत असें माझ्या नजरेस आलें. " त्याचें उत्पन्न अगदीं बेताचें असल्यामुळें हें निबंधप्रकाशनाचें काम त्यास फार जड गेलें; कारण छापखानेवाल्याचा हिशेब पुरा द्यावयास १८४९ चा एप्रिल महिना उजाडावा लागला.

लंदनास आल्यावर थोड्याच दिवसांनीं तो मियालसाहेबास

भेटला होता; त्यासंबंधानें ता० १४ मे १८८३ रोजीं बापास लिहितो:– " त्यानें माझें म्हणणें स्नेहपूर्वक कळकळीनें ऐकून घेतलें, आणि माझे हेतु पूर्ण करण्यास होईल ती खटपट करण्याची इच्छा दर्शविली. तो असेंहि म्हणाला कीं, नॉनकन्फॉर्मिस्ट पत्राचा हल्लीं खप आहे त्याहून ज्यास्त असता तर मी तुला संपादकीचा कांहीं भाग आनंदानें द्यावयास तयार झालों असतों. ' ईक्लेक्टिक रिव्ह्यू ' चा संपादक डा० प्राईस याजकडे घेऊन जाण्याकरितां त्यानें मला शिफारसपत्र दिलें, आणि त्याला माझा विचार काय आहे तें सांगून तुझ्या मासिकास ह्याला निबंध लिहावयास सांग असें त्यास सुचविलें.....तूं आपल्या पहिल्या निबंधाला कोणत्या विषयाची योजना करीत आहेस असें मला त्यानें विचारतां " शिक्षण " म्हणून मीं त्यास सांगितलें." ता० २ जून रोजीं तो लिहितो:–" शिक्षणविषयक निबंधाबद्दल काय म्हणावयाचें तें मला कांहीं बरोबर समजत नाहीं. मला वाटतें त्यांतील विवेचन बहुतेक पूर्णपणेंच अगदीं नवें आहे, पण तें " इक्लेक्टिकच्या वाचकांस पसंत पडेल किंवा नाहीं तें मला मुळींच सांगता येत नाहीं." ता० २८ जुलै रोजीं तो लिहितो:– "माझ्या सांपत्तिक स्थितीच्या हल्लींच्या स्वरूपाकडे पाहून मी जरासा निरुत्साह झालों आहें. अमुक अमुक मासिकांत अमुक अमुक लेख प्रसिद्ध होणार आहेत अशा वर्तमानपत्रांतील जाहिरातींवरून पहातां " इक्लेक्टिक रिव्ह्यू "च्या या महिन्याच्या अंकांत माझा लेख प्रसिद्ध होणार नाहीं."

ता० ३० आक्टोबर रोजीं तो बापास लिहितो:–" डा० प्राइसकडून मला स्पष्ट असें कांहींच उत्तर आलें नाहीं, आणि त्याची माझ्याशीं ही वागणूक जरा बेपर्वाईची आहे असें मला म्हटलें पाहिजे; कारण मी त्यास दोन चिठ्या लिहिल्या होत्या त्यांपैकीं एकीकडेहि त्यानें लक्ष्य दिलें नाहीं. एकदोन दिवसांनीं त्याच्याकडे

जाऊन माझा लेख परत मागण्याचा माझा बेत आहे. त्यानें तो छापिला नाहीं हें एक अर्थीं बरेंच आहे, कारण वेस्लियन लोकांनीं शिक्षणाच्या विषयावर उत्तम निबंध लिहिण्यास बक्षीस लाविलें असून, तसला निबंध मीं लिहिल्यास ह्यांतील कांहीं कल्पना माझ्या फार उपयोगी पडतील. तो तपासणारे वेस्लियन धर्माधिकारी परीक्षक जर त्यांच्या नेहमींच्याच विचारसरणीचे असले, तर माझी त्या विषयाच्या विवेचनाची पद्धति त्यांस फारशी आवडणार नाहीं. ते जर तात्त्विक विचाराचे माणूस असले, तर मला बक्षीस मिळण्याचा बराच संभव आहे; कारण ह्या प्रश्नाचा माझ्याइतका व्यापक विचार फारच थोड्यांनीं केला असेल..... त्यांतील कांहीं विचार तुला देखील अपरिचित आहेत."

ता० ३१ आक्टोबर रोजीं तो लिहितो:—"बक्षिसासाठीं लाविलेल्या निबंधाच्या स्वरूपाबद्दल माझी अगदीं चूक झाली असें मला आढळून आलें, व त्याबद्दल मला फार राग आला. कारण "सरकारी शिक्षण" हा निबंधाचा मुख्य विषय नसून, अमेरिकेंत व युरोपांत काय शिक्षणपद्धती आहेत वगैरे गोष्टींचा विचार त्यांत मुख्यत्वेंकरून करावयाचा आहे हें मीं अगदीं विसरलों, आणि मला वाटतें कीं शिक्षणविषयक महत्त्वाचें तात्त्विक दृष्ट्या परीक्षण करण्यास त्यांत मला अवसर सांपडेल."

"टेट्स् मागाझीन"चा त्यास उत्तेजनकारक अनुभव आला नाहीं. ता० २ जून रोजीं तो आपल्या बापास लिहितो:—"मी टेट्स् मागाझीन"ला पाठविण्याकरितां एक लेख सुरू करण्याच्या बेतांत आहें. त्याचें नांव "अप्रतिबंध व्यापाराची चळवळ, आणि तिजपासून आपण काय शिकावें?" हें आहे. तो लेख लिहीत असतांना "प्रामाणिकपणा ही उत्तम नीति होय" असें त्यानें त्याचें नांव बदलून ठेविलें. त्यासंबंधानें तो म्हणतो:—"ह्या लेखाचा उद्देश असें दाख-

विण्याचा आहे कीं, प्रामाणिकपणा ही उत्तम नीति होय" ही गोष्ट जशी व्यक्तींच्यासंबंधानें खरी आहे तशीच राष्ट्रांच्या संबंधानेंहि आहे. मला वाटतें, मी आजपर्यंत लिहिलेल्या लेखांपेक्षां ह्या लेखांत दृष्टान्त, अलंकार आणि उपमा ज्यास्त चांगल्या आहेत."

हा लेख त्या मासिकानें स्वीकारिला नाहीं; पुढें तो बर्मिंघाम एथील " पायलट " नामक पत्राचा थोडे दिवस दुय्यम संपादक असतां त्यांत प्रसिद्ध झाला.

लंदनास जाऊन पोहोंचल्यावर लवकरच त्यानें आईस लिहिलेल्या एका पत्रावरून त्याला जगाचा अनुभव अद्यापि यावयाचा होता हें व्यक्त होतें. त्या पत्रांत तो म्हणतो:—" इंजिनियरीमध्यें आश्रयाविना माझें चालत नाहीं. पण वाङ्मयांत बुद्धीचीच काय ती जरूर असते." पण वाङ्मयाच्या संबंधानें हें म्हणणें मुळींच खरें नाहीं हें त्याच्या अनुभवास लवकरच आलें. ता० ७ जुलई १८४३ रोजीं तो बापास लिहितो:– 'टेट' कडून मला पत्र आलें, त्यांत माझ्या लेखाची पोंच आहे, पण तूं कोण आहेस, असें तो मला विचारतो. मीं त्यास माझ्या परिस्थितीची कांहीं हकीकत लिहिली, आणि हिन्टनच्या स्पेन्सरशीं (चुलता टॉमस याशीं) माझें नातें काय आहे तें कळविलें. मी इतर गोष्टींबरोबर असें लिहिण्याच्या अगदीं बेतांत आलों होतों कीं, मी स्वतः लेखांचा विचार त्यांचा लेखक कोण आहे इकडे लक्ष्य न देतां, त्यांच्या आंगच्या मगदुरावरून करीत असतों, आणि इतर लोक तसें करतील तर बरें असें मला वाटतें; पण मला वाटलें कीं, त्यापासून त्यास विनाकारण राग येईल, आणि म्हणून मीं आपली लेखणी आवरली."

त्याच्या ह्या वेळच्या पत्रांवरून असें दिसतें कीं, तो ह्यावेळीं मानसिक व्यापारांचें अध्ययन कपाललक्षणविद्येच्या द्वारा करीत असे, आणि तें केवळ विचारदृष्ट्या नसून निरीक्षणरीत्याहि करी.

"सत्कार्येच्छा आणि अनुकरण एतद्विषयक नूतन कृति" ह्या विषयावर "कपालविद्याविषयक मासिका"करितां तो एक निबंध लिहित असतां, त्याबरोबरच त्यानें दुसरा एक निबंध "आश्चर्य" ह्या विषयावर सुरू केला. पण 'इक्लेक्टिक्' व 'टेट' ह्यांप्रमाणें ह्या मासिकानेंहि त्याचे लेख नाकारिले. यावरून त्याची आतां बहुधा खात्री झाली असावी कीं, इंजिनियरिंगप्रमाणें वाङ्मयांतहि आश्रयाविना केवळ बुद्धि लुळी पडते.

कधीं कधीं तो 'नॉनकन्फॉर्मिस्ट'ला लिहीत असे. 'रेबेका रायट्स्' नामक दंगे या सुमारास झाले होते त्यांवरून त्या विषयावर त्यानें एक लेख लिहिला. इंग्लंदच्या पूर्वेकडील प्रांतांत कोणीं मुद्दाम आगी लाविल्या होत्या, त्यावरून त्या आगी व त्यांचीं कारणें यावर त्यानें एक लेख लिहिला. स्काटलंदांत फ्रीचर्च पंथाच्या लोकांस देवळें बांधण्यास स्थापित धर्माच्या पक्षानें जोरानें निरोध केला होता, व त्यावरून तेथें दंगे झाले होते, त्यावरहि त्यानें एक लेख लिहिला. "मि० ह्यूम व सरकारी शिक्षण" ह्या विषयावर एक लेख लिहून, लोकांस शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य होय, हें जें प्रचलित मत तें त्यानें खोडून काढिलें.

"सरकारची योग्य कर्तव्यमर्यादा" ह्या विषयावरील त्याच्या एकत्र छापिलेल्या निबंधांबद्दल त्याचा मित्र लॉट यानें त्यास लिहितांना त्यास "राजकीय गोळ्या" किंवा "स्पेन्सरचे राष्ट्रीय रामबाण" म्हणून नांव दिलेलें आढळतें. तो आपल्या पत्रांत म्हणतोः—"जुलूम आणि टोरि मत ह्यांना या गोळ्या उत्तम गुणकारी आहेत, आणि त्यांचें योग्य पचन झालें म्हणजे अर्धवट कल्पना हाकलून लावण्याचें आणि शरीरास जोर आणण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य आहे. निदान त्या शोधून काढणाराचा तरी तसा आव आहे." लॉटनें त्यास सावधगिरी ठेवण्याबद्दल शिवाय त्या पत्रांत उपदेश

केला होता; त्यासंबंधानें त्यास तो ता० १४ आक्टोबर रोजीं लिहितो:—" हल्लींच्या काळीं माझें 'रामबाण' राष्ट्रास पाजणें सोईचें नाहीं असें जें तूं म्हटलें आहेस, तें ज्या नीतिविषयक वर्तनाच्या नियमवादाच्या आधारावर तूं लिहिलें आहेस, तें मी ओळखीत नाहीं. मला वाटतें, तूं मला असें म्हणतांना ऐकिलें आहेस कीं, जेव्हां जेव्हां आपली विशिष्ट वर्तनसरणी बरोबर म्हणून आपणास वाटेल तेव्हां तेव्हां तिचा परिणाम काय होईल ह्याबद्दल आपल्या भ्रंशशील मनास गोंधळांत न पाडतां तिचें अनुकरण करणें हें आपलें कर्तव्य आहे; कारण त्या परिणामाबद्दल योग्य विचार करण्याचें आपल्यास फारच अल्प सामर्थ्य असतें. ती वर्तनसरणी बरोबर आहे, एवढीच ती सोईवार असल्याबद्दलची खात्री पुरे आहे; आणि ह्याच्यावर माझा विश्वास असल्यामुळें मी त्यावरून असें म्हणतों कीं, राष्ट्रीय वर्तनाचा एकादा योजिलेला क्रम न्याय्य असेल, तर तो स्वीकारणें कितीहि वेडेपणाचें दिसलें तरी तसें करणें हें आपलें कर्तव्य आहे. पुष्कळ लोक ह्यास मूर्खपणाचें मत म्हणून म्हणतील, आणि कदाचित् तूंहि त्यांच्यापैकीं एक असशील. तथापि "सरकारची योग्य कर्तव्यमर्यादा" ह्या लेखांत प्रतिपादिलेलीं तत्त्वें सामान्यतः सर्वांनीं स्वीकारलीं जाण्यास, (समाजामध्यें) काय काय फेरबदल झाले पाहिजेत, आणि त्याप्रमाणें प्रत्यक्ष स्थिति घडून येण्यास किती वेळ लोटला पाहिजे, ह्याचा तूं विचार करशील तर, मला वाटतें, ती स्वीकारण्यास राष्ट्राच्या सध्याच्या अपात्रतेविषयींचा तुझा आक्षेप नाहींसा होऊन जाईल. ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, असले फेरबदल नैतिक साधनांनीं घडवून आणावयाचे आहेत; आणि म्हणून लोकांपैकीं बहुपक्षाची त्यांच्या सत्यत्वाबद्दल खात्री झाल्याविना तीं (तत्त्वें) कधीं अमलांत आणतां यावयाचीं नाहींत; आणि त्यांच्या सत्यपणाबद्दल लोकांची खात्री

झाली म्हणजे राष्ट्र त्यास योग्य बनेल.....माझ्या निबंधांत पूर्ण मतदान हक्काचा जो मीं विचार केला आहे तो ह्याच दृष्टीनें केला आहे. मी कबूल करितों कीं, लोकांस जर तो हक्क कोणीं जबरीनें ह्या क्षणीं दिला तर त्याचा परिणाम हानिकारक होईल. तसें केल्यास कांहीं लोक जसल्या राष्ट्रीय क्रांत्या होतील म्हणून भविष्यें करितात तसल्या होतील असें मला वाटतें अशांतील गोष्ट नाहीं, पण लोकसत्ताक अधिकारपद्धतींत कायमची स्थिरता उत्पन्न करण्यास माणसामध्यें जे उच्चतर मनोभाव बनले पाहिजेत त्यांची वाढ तसें केल्यास बंद पडेल. मी असें समजतों कीं, जुलमी अधिकारी, सरदारी सत्ता, धर्मोपाध्यायमंडळें, आणि मानवजातीस पीडणारीं इतर सर्व दुःखें, हीं माणसाच्या मनास वळण लावण्यास आवश्यक साधनें आहेत; आणि मला वाटतें कीं, कोणतेंहि राष्ट्र कायमचें स्वतंत्र होण्यास योग्य बनण्याला पूर्ण एकतंत्री सत्ता आणि लोकसत्ता ह्यांमधील सर्व पायऱ्यांवरून तें गेलें पाहिजे; आणि जर एकादें राष्ट्र शारीरिक शक्तीनें आपल्यास स्वतंत्र करील, आणि या नैतिक क्रियांतून न जातां अंतिम उद्देश साध्य करील, तर त्याचें स्वातंत्र्य टिकाऊ होईल असें मला वाटत नाहीं."

जरी तो धान्याच्या कायद्यांविरुद्ध चाललेल्या चळवळींत, गुलामगिरीच्या विरुद्ध चाललेल्या चळवळींत, आणि सरकारी धर्मसंस्था ह्यांच्याविरुद्ध चाललेल्या चळवळींत आंग मोडून पडत असे तरी त्यांजबद्दलच्या सभांत तो क्वचित् बोलत असे. त्यांबद्दल लेखनद्वारा आपलें मत प्रसिद्ध करणें त्यास अधिक मानवे. उदाहरणार्थ, ता० ११ आक्टोबर १८४३ रोजीं तो बापास लिहितोः—" सरकारी धर्मसंस्थांच्याविरुद्ध चळवळ करण्यासाठीं स्थापन केलेल्या सभेसाठीं जें संभाषण मी लिहीत आहें तें हल्लीं छापत आहे. त्यास इतका वेळ लागला ह्याचें कारण हें कीं, कमिटीच्या इतर सभासदांप्रमाणें मला-

हि जरी तें तयार करावयास सांगितलें होतें, तरी कित्येक वेळां यत्न करूनहि मनासारखें कांहीं वठेना; म्हणून मीं तें तसेंच विश्रांति खात ठेवून दिलें. पण कित्येकांनीं जीं लिहून आणिलीं त्यांपैकीं कोणाचेंच पसंत पडलें नाहीं; आणि ह्याचा परिणाम असा झाला कीं कमिटीनें तीं सर्व माझ्या हातांत ठेविली, आणि त्यांचें एक संभाषण बनवावयास सांगितलें. पण तसें करण्यास जेव्हां मीं सुरवात केली तेव्हां मला असें आढळून आलें कीं, ही योजना चालणार नाहीं; म्हणून मला अगदीं नवेंच संभाषण लिहावें लागलें, व तें सर्वानुमतें पसंत ठरलें. तथापि मला तें स्वतःला पसंत आहे असें मुळींच नाहीं, आणि वस्तुतः असल्या कामांत मी इतका चिकित्सेखोर बनत चाललों आहे कीं, मी लिहितों तें मला क्वचितच पसंत पडतें."

इंग्लंदच्या नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांना उद्देशून लिहिलेल्या ह्या विनतिपत्रकावर "आक्टोबर ८४३" अशी तारीख असून त्याच्यावर आनररी सेक्रेटरी मियाल व सिमन्स यांच्या सह्या आहेत, पण स्पेन्सरची नाहीं; तथापि त्याच्या छापील प्रतीवर "रागाच्या भरांत असतां स्वतः लिहिलेलें" असें त्यानें पेन्सिलीनें खरडलेलें आहे. आपल्या रचनाविषयक सफाईच्या संबंधानें तो बापास लिहितोः--"लिहिण्याच्या कामांत हल्लीं माझी ज्या प्रमाणावर सुधारणा होत आहे त्याच प्रमाणावर चालल्यास मला लवकरच ती कला कांहीं तरी साध्य होईल. लेखनाच्या संबंधानें अलीकडे माझ्या डोक्यांत एक नवीन कल्पना आली आहे, व तिच्या साह्यानें पूर्वींपेक्षां ज्यास्त जोरदार रीतीनें लिहिण्यास मी समर्थ होईन असा माझा अंदाज आहे." 'लेखनपद्धतीची मीमांसा' ह्या त्याच्या निबंधाचें हें बहुधा बीज असावें.

वाङ्मयांत आपल्याला यश येईल ह्या आशेनें तो कांहीं दिवस लंदनांत राहिला असें दिसतें. कारण तेथें जाऊन दोन महिने झाल्यावरहि त्याच्या लिहिण्यानें जरी त्यास एका पैचीहि किफायत झाली

नाहीं, तरी तो लिहितो कीं, " कशी तरी मला सिद्धि येईल ह्याबद्दल मला संशय वाटत नाहीं. निदान झगडा केल्याशिवाय हें काम सोडणार नाहीं. " तथापि सौदाम्पटन एथील गोदीसाठीं नकाशे तयार करण्याचें प्रिचर्डसाहेबाकडून काम आलें तें त्यानें शहाणपणानें पत्करिलें तें आक्टोबरच्या प्रारंभीं पुरें झालें; आणि त्या गोदीविषयीं डिरेक्टर काय ठरवितात ह्याची तो वाट पहात असतां, डोव्हर एथील बंदरावरील धक्क्याचा नकाशा तयार करण्याचें काम आलें, व तो नकाशा अधिकाऱ्यांस पसंत पडला. हा उद्योग केवळ हंगामी आहे हें तो जाणून होता; पण त्यासंबंधानें तो म्हणतोः— " वामङ्याच्या समुद्रांत माझें तारू ढकललें जाईपर्यंतचा वेळ घालविण्यापलीकडे हा उद्योग चालावा अशी माझी इच्छा नाहीं. "

हलके व्यासंग किंवा सामान्य वाचन हीं तो ह्या वेळीं साधेल तितकीं करीतच असे असें दिसतें. कारण त्यासंबंधानें तो आपल्या बापास विचारतोः—" तुला " पंच "पत्र वाचावयास मिळतें काय ? तें फारच उत्तम आहे, कारण ज्यांस इतर कोणत्याहि द्वारा योग्य मनोभाव प्राप्त व्हावयाचे नाहींत त्यांच्यामध्यें त्याचा प्रसार करून तें खरोखर फार चांगली कामगिरी बजावीत आहे. " हर्क्युलिसचे उद्योग " ह्या नांवाचे मोठे उत्तम निबंध त्यांत नुक्तेच पुरे झाले आहेत, त्यांत फारच सुनीतिपोषक अशीं मतें गोंविलेलीं आहेत. " पुनः एकदां तो म्हणतोः—" मी अलीकडे पोपचें ' होमर ' वाचीत आहें....माझ्या मतें त्याच्यांत खरें काव्य फारच थोडें आहे.....त्याची मिल्टनच्या काव्याशीं मुळींच तुलना करतां येत नाहीं. " इतर मोठ्या माणसांप्रमाणें त्यालाहि ह्या वेळेस कविता रचण्याचा रोग जडला होता; कारण ज्यांच्यांत थोडेसें तरी बौद्धिक पाणी आहे त्यांच्यावर ह्या रोगाचा हल्ला बहुधा होतच असतो. " ढगांतील

देव " ह्या विषयावर त्यानें सरासरी पन्नास ओळी कविता ह्या सुमारास लिहिलेली आढळते.

ह्या वेळची त्याची परिस्थिति यांत्रिक नूतन शोध लावण्यास प्रतिकूल असूनहि तो त्या दिशेनें कांहीं तरी करीतच होता. उदाहरणार्थ आगगाडीच्या मालाच्या डब्याचा त्यानें एक नवा नमुना बनविला होता, पण त्यानें तो नोंदिला नाहीं, कारण तो नवा नाहीं म्हणून चार्लस फॉक्सनें त्यास सांगितलें. बूट आणि जोडे यांच्या तळव्यांना पोलादी पट्ट्या घालण्याबद्दलचीहि योजना तो करीत होता व ती यशस्वी होईल अशी त्यास फार आशा होती.

वाङ्मयांत आपल्यास सिद्धि प्राप्त होईल अशी जी त्यास प्रथम फार आशा होती ती जाऊन हळू हळू निराशेचें पटल त्याच्या मनावर कसें येऊं लागलें आणि त्याचा भ्रमनिरास कसा होत गेला हें पाहिल्यास त्याच्याविषयीं मोठा कळवळा उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं. लंदनास येऊन पोहोंचल्यावर एक दोन दिवसांनीं त्यानें त्यासंबंधानें असें लिहिलें होतें:—" एकंदरींत मला फारच आशा वाटण्याकडे माझ्या मनाचा कल आहे, आणि अखेरीस मी यशस्वी होईन याबद्दल मला मुळींच शंका घेण्यास जागा दिसत नाहीं. " नंतर दोन महिन्यांनीं त्यानें असें लिहिलें:—" जर मी थोडा दम धरून असाच आपला उद्योग चालवीन तर मला खात्री वाटते कीं या धंद्यांत माझें चालेल. " पण आगस्टच्या पहिल्या आठवड्यांतच त्याचे पैसे संपले तेव्हां त्यासंबंधानें तो बापास लिहितो:—" मला वाटतें हें पत्र मला " नाटपेड"च पाठविलें पाहिजे, कारण माझ्यापाशीं एकहि पेन शिल्लक राहिली नाहीं. " नंतर दोन दिवसांनीं बापानें पाठविलेली अर्धी नोट पोहोंचल्याचें कळवितांना तो लिहितो:—" अद्यापि माझ्या खिशांत एकहि पेनीशिवायच मी आहें, आणि ज्या अर्थीं उद्यां पोस्ट निघण्याची वेळ

होई तोंपावेतों दुसरी अर्धी नोट घातलेलें तुझें पत्र मला पोहोंचण्याचा संभव नाहीं, त्या अर्थीं हेंहि पत्र पहिल्याच्या स्थितींत (नाटपेड) पाठविणें मला भाग आहे." ह्या वेळेस त्यास एक शिकवणी आलेली त्यानें नाकारिली, कारण वर सांगितलेला इंजिनियरिंगचा हंगामी उद्योग ज्यास्त किफायतशीर होता, आणि त्यास वाटत होतें कीं, तो संपेल तोंपावेतों एकादा लिहिण्याच्या कामाचा उद्योग न आल्यास, दुसरा एकादा तसलाच (इंजिनियरीचा) उद्योग त्यांत अडकून राहिल्यास मिळण्याचा संभव ज्यास्त आहे. त्यासंबंधानें तो म्हणतो:—"वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, वाङ्मयाच्या धंद्यांत आपला पाय शिरकण्यासाठीं साधल्यास अशीच खटपट करीत राहण्याचा मीं आपल्या मनाचा निश्चय केला आहे; आणि भागच पडल्याशिवाय मी आतां या क्रमांत आणखी फेरबदल करणार नाहीं."

ता० २८ आक्टोबर १८४३ रोजीं तो बापास लिहितो:—"मी जरासा गोंधळांत पडलों आहे. जेव्हां मी प्रिचर्डसाहेबाचा उद्योग पत्करिला तेव्हां कपड्यांच्या संबंधानें माझी स्थिति जरा चमत्कारिक झालेली होती; ती इतकी कीं, माझा एकच डगला असून तोहि रविवारीं घालण्यास अगदीं अयोग्य बनलेला होता. तो उद्योग कांहीं दिवस चालेल ह्या कल्पनेनें मीं नवा डगला करविला, कारण, मला वाटलें, त्याची किंमत मला लवकरच द्यावयास सांपडेल. पण ती नोकरी माझ्या अजमासाच्या अगोदरच संपल्यामुळें मला तसें करतां आलें नाहीं, आणि ती सुरू असतां जे थोडेसे पैसे मीं सांठविले होते ते आतां अगदीं संपण्याच्या बेतांत आले आहेत; आणि इतक्यांतच शिंप्याच्या वकिलाकडून ह्या पत्राबरोबर पाठविलेलें पत्र मला आलें आहे, आणि त्याचे पैसे मी कां देत नाहीं म्हणून मला त्यांत तो विचारतो. सौदाम्प्टन एथील गोदीच्या संबंधानें मला पुनः

उद्योग लागण्याच्या बाबतींत मला असें आढळून येतें कीं, त्याला इतका अवधि लागण्याचा संभव आहे कीं, मला वाटतें, तेथपर्यंत मला धांवतां येणार नाहीं. 'टेट'कडून मला कांहीं पैसे येतील अशी वेडेपणाची आशा मी करीत बसलों होतों, पण त्यासंबंधानें माझी निराशा झाली आहे. एवंच मी जरासा कचाटच्यांत सांपडलों आहें, कपड्यांच्या संबंधानें हल्लींहि माझी जराशी धांदलच आहे, आणि रविवारीं घालून जाण्यास योग्य अशी पाटलोण माझ्यापाशीं नसल्यामुळें गेले चार पांच रविवार मला घरीं बसून रहावें लागत आहे. मला वाटतें, सध्यां घरीं परत येण्याखेरीज मला अन्य मार्ग नाहीं. कांहींच न करितां एथें आणखी रहाणें मला अशक्य आहे. सध्यांच लिहिण्याच्या संबंधानें मला कांहीं उद्योग मिळण्याचा संभव दिसत नाहीं, तरी कांहीं दिवसांनीं कदाचित् तें द्वार मला खुलें होईल. एकदां जर माझा वाङ्मयांत प्रवेश झाला, तर मी आपला पुढचा मार्ग त्यांत आक्रमूं शकेन असा मला अद्याप भरंवसा वाटतो, आणि तो बरोबर आहे असें तुलाहि वाटत असेल असें मी समजतों."

त्याची किती दीनावस्था ह्या समयीं झाली होती हें ह्या पत्रावरून दिसेल. त्याला घरीं परत येतां यावें म्हणून त्याच्या बापानें त्यास पांच पौंड पाठविले. त्यांची पोंच झाल्यावर तो लिहितो:—माझें येथें बरोबर न चालल्यामुळें मला तुला त्रास द्यावा लागतो ह्याबद्दल मला अत्यन्त वाईट वाटतें. ह्याच्या अगोदरच जे पैसे मी तुजपासून घेतले होते ते ह्या सुमारास मी परत करूं शकेन अशी मला मोठी आशा होती. पण त्याऐवजीं तुजपाशीं पुनः पैसे मागावयास मला भाग पडलें, आणि विशेषतः तुझीच पैशासंबंधानें अमळ चणचण असतां भाग पडलें, ह्याबद्दल मला फारच दिलगिरी वाटते. तें टाळतां आलें असतें तर बरें असें मला वाटतें, आणि मला साधन असतें तर मी तें टाळलें असतें असें मला मनःपूर्वक वाटतें ही गोष्ट

तूं खोटी समजणार नाहींस.....मियालकडून माझ्या लेखांबद्दल पैहि कधीं मिळालेली नाहीं, आणि त्याची मी कधीं अपेक्षाहि केली नाहीं, कारण त्यानें मला दयाळूपणानें वागविलें आहे हें माझ्या लक्षांत असून त्याचे उपकार फेडण्यास आपल्या हातून होईल तें करावें अशी माझी इच्छाच होती.....लिहिण्याच्या कामाबद्दल मला आजपर्यंत जे वेतन मिळालेलें आहे तें प्रिचर्डसाहेबाकडून त्याचें हस्तलिखित शुद्ध केल्याबद्दल साडेसात शिलिंग त्यानें दिले तेवढेंच.....छापखानेवाल्याचा हिशेब सध्यां चुकता न करतां तसाच ठेवणें भाग आहे."

नवंबरच्या प्रारंभींच तो घरीं परत आला. नंतर ' फ्रेनॉलॉजिकल जर्नल ' नामक मासिकानें ' अनुकरण आणि सत्क्रियेच्छा ' या विषयावरील जो निबंध नाकारिला होता तो प्रसिद्ध करण्याच्या उद्योगास तो लागलाच लागला. तेव्हां ' झॉइस्ट ' मासिकाच्या १८४३ च्या जानेवारीच्या अंकांत त्यास जागा सांपडली. ' कामेच्छा ' या विषयावर दुसरा एक निबंध जुलैच्या अंकांत प्रसिद्ध झाला, आणि तिसरा ' आश्चर्य ' या विषयावर आक्टोबरच्या अंकांत प्रसिद्ध झाला. ' प्राणिकोटी आणि वनस्पति कोटी यांचें परस्परावलंबन ' या विषयावर एक निबंध ' फिलॉसाफिकल मागाझीन ' नामक मासिकाच्या फेब्रुवारीच्या अंकांत प्रसिद्ध झाला.

लंदन सोडण्यापूर्वीं त्याच्या बापाची ' लघुलिपि ' प्रकाशनाकरितां तयार करण्याचें वचन त्यानें दिलें होतें. याबद्दल त्याची तयारी ठीक होती, कारण ती त्यानें श्रमपूर्वक वळविली होती; उदाहरणार्थ लंदनाहून बापास पाठविलेल्या पत्रांपैकीं एकच त्यानें दीर्घलिपींत लिहिलें होतें. ह्या पद्धतीचें एक स्पष्टीकरण त्यानें तयार करून लिहून काढिलें, आणि १८४४ सालीं तें प्रसिद्ध होईल अशी त्यास आशा होती. पण त्याच्या बापाची शेवटच्या पायरीवरील

नेहमींची निश्चयाची वाण या ठिकाणींहि आडवी आली. म्हणून हें चोपडें प्रसिद्ध होण्यास आणखी पन्नास वर्षें लोटावीं लागलीं. ”

‘ तत्त्ववेत्ता ’ नामक एक मासिक काढण्याचें त्यानें योजिलें, आणि त्याचा पहिला अंक ता० ३ जानेवारी १८४४ रोजीं काढण्याचें ठरविलें. त्याचें उद्देशविधान म्हणून जें दिसतें तें असें आहेः—
“ आत्म्याला नीच करणारीं पूर्वग्रहरूपी बंधनें माणसें ज्या काळीं तोडून टाकितील तो सुधारणेचा काळ लवकरच येणार अशीं चिन्हें दिसत आहेत. बेलगामी मनोवृत्तींच्या अनिर्बंध हुकुमांप्रमाणें मानव-जाति एकसारखी दुःशासित रहावयाची नाहीं. मनुष्य विचारशील आहे ही पुष्कळ दिवस कबूल केलेली गोष्ट, आणि मनोविकारांपेक्षां विचारशक्तीच्या धोरणानें तो चालावयाचा हा त्याजवरून काढि-लेला सिद्धांत, ह्यांस शेवटीं व्यावहारिक संमति मिळत आहे. केवळ पुराण अधिकाराचें नियंत्रण सहन न करणारा असा चवकशी कर-ण्याचा हितकारक मनोधर्म प्रत्येक ठिकाणीं आणि प्रत्येक वर्गा-मध्यें उत्पन्न होत आहे; आणि म्हणून ह्यापुढें लोकांच्या मनाचें समाधान होण्यास विद्वानांच्या केवळ अधिकारपूर्वक सांगण्यापलो-कडे कांहीं तरी ज्यास्तीची जरूरी लागूं लागेल. पूर्वीच्या दाखल्या-ला मान देणें कमी होत चाललें आहे; आणि निरर्थक रूढीबद्दल लोकांस जी पूज्यबुद्धि वाटत असे ती तेथून निघून त्याहून ज्यास्त योग्य अशा विषयांवर जाऊन बसत आहे. उदाहरणार्थ, कोठें ती सत्याच्या अन्वेषणाबद्दल वृद्धिंगत होणाऱ्या उत्साहाच्या रूपानें व्यक्त होत आहे, आणि कोठें तत्त्वांना अत्यन्त मूल्यवान् समजणें हा जो खऱ्या सुधारकांचा विशेष त्याच्या रूपानें व्यक्त होत आहे.”

ह्या उद्गारांमध्यें रसरसणारा पूर्ण आशावादीपणा, आणि पुढें प-न्नास वर्षांनीं त्याचें जीवित आणि त्याचें कार्य हीं दोन्हीं संपाव-याच्या बेतांत आलीं असतां त्या दरम्यान लोकांनीं संपादिलेल्या

नैतिक आणि बौद्धिक प्रगतीचें वर्णन आणि तेव्हांच्या सामाजिक व राजकीय क्षितिजाकडे पाहून त्यानें केलेला अंदाज, ह्या दोहोंमधील महदंतर मोठें हृदयद्रावक आहे.

असलें मासिक काढण्याची कल्पना त्याच्या मनांत आली ह्यावरून, आपल्या कल्पनांच्या प्रसारार्थ आपल्यापाशीं कांहीं साधन असावें अशी त्यास किती उत्कट इच्छा होती, हें स्पष्ट दिसतें. उदरनिर्वाहाच्या साधनार्थ, छापण्याचे खिळे ओतण्याचें यंत्र काढण्याच्या उद्योगास तो हल्लीं लागला होता; आणि तो कारखाना सुरू करण्यास पांच ते सात हजार पौंड भांडवल लागेल असा अजमास त्यानें केला असून, तें मिळाल्यास त्याच्यावर धनदवलत आपण कमावूं असें त्यास वाटत होतें. त्याचा चुलता टॉमस याच्या सल्ल्यावरून त्यानें लॉरेन्स हेवर्थ यास असें विचारलें कीं, तुझ्या व्यापारी स्नेह्यांमध्यें आपलें भांडवल उद्योगांत घालूं पाहणारा कोणी धाडसी गृहस्थ आहे काय? ह्यावरून त्याचा ह्याचा जो पत्रव्यवहार झाला त्यांतून भांडवलाच्या दृष्टीनें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पण दुसऱ्या एका दृष्टीनें द्रव्यापेक्षां ज्याची त्यास ज्यास्त किंमत वाटत होती असें दुसरें कांहीं निष्पन्न झालें; तें मिस्तर व मिसेस पॉटर व त्यांचीं मुलें व नातवंडें ह्यांचा स्नेह हें होय; कारण तो स्नेह त्याची एकंदर पुढील कारकीर्द सुखावह करण्यास पुष्कळ अंशीं कारणभूत झाला.

शिक्षणावरून त्यानें आपली दृष्टि पूर्णपणें कधींच काढिलेली नसून तिकडे त्याचें लक्ष्य पुनः जोरानें जाण्यास ह्या वेळीं कारण झालें. तूं बापापासून स्वतंत्र रीतीनें विद्यार्थी पढविण्यासाठीं बाळग असा त्याच्या चुलत्यानें त्यास सल्ला दिला, पण तो त्यास फार जोखमीचा वाटला, आणि खासगी शिकवणीपासून कायमचें निर्वाहसाधन कांहींच प्राप्त होणार नाहीं असेंहि वाटलें. यासंबंधानें त्याची स्वताची योजना अशी होती कीं, बापानें सध्याचा आपला

क्रम सुरू ठेवावा, आणि आपण मुलें शिकवावयास घेऊन तीं आपल्या आईबापांकडे जेवणाखाणाकरितां ठेवावीं. ह्या उद्योगांत यश आल्यास कांहीं काळानें बापानें खासगी शिकवण्या सोडून देऊन आपलें सर्व लक्ष्य घरांत जेवावयास राहणाऱ्या मुलांकडेच द्यावें. ह्याबद्दलची एक जाहिरातहि त्यानें तयार करून चुलत्याकडे पाठविली, पण ही योजना तुमच्या अगदीं आवांक्याबाहेर आहे असा तिजवर चुलत्यानें आक्षेप घेतला, व ती तितकीच राहिली.

ह्या सुमारास ह्यापेक्षां ज्यास्त आवडता उद्योग त्यास मिळण्याचा संभव उत्पन्न झाला. बर्मिंघाम एथें एक नवें वर्तमानपत्र काढण्याचा बूट निघाला होता; त्याच्या दुय्यम संपादकाची जागा तूं पत्करतोस काय अशी विचारणा मि० स्टर्जच्या द्वारा यास झाली. त्या पत्राचें नांव ' पायलट ' असें असून ती जागा त्यानें सपटंबरच्या प्रारंभींच पत्करिली, पण त्या पत्राचा पहिला अंक त्या महिन्याच्या अखेरपर्यंत प्रसिद्ध झाला नाहीं, आणि त्या सुमारास ही जागा त्याच्या बापास व मि० स्टर्ज यास इतकी अशाश्वत वाटली कीं, ती सोडून एक शिकवणी पत्करण्याविषयीं त्यांनीं त्यास सल्ला दिली. हातीं घेतलेल्या नवीन उद्योगाच्या पहिल्या पायरीवरील त्याच्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें त्याला स्वताला वरील संपादकीबद्दल पूर्ण खात्री वाटत होती. तो लिहितो कीं, विल्सन आणि मी हल्लीं निश्चित व्यवस्था ठरविण्यांत गुंतलों आहों. पण त्यानें प्रथम पगार वगैरे न ठरवितां ती वेड्यासारखी एकदम पत्करिलीं हें त्याच्या चुलत्यास मुळींच पसंत पडलें नाहीं. तो लिहितो:—" प्रथम एकादें काम पत्करावयाचें आणि मागून पगार ठरवायाचा यांत हर्बर्टनें खरोखर वेडेपणा केला आहे. पण त्यास पत्राच्या द्वारा मीं स्पष्टपणें सल्ला दिली होती कीं, कायमचा पगार ठरविल्याविना असलें काम तूं पत्करूं नको. " मि० स्टर्ज लिहितो:—" या वर्तमानपत्राशीं माझा ने-

हमींच्या अर्थीं संबंध नाहीं, आणि " संपूर्ण मतदार–सभे"शींहि त्याचा संबंध नाहीं. पण तें सुरू करण्यासाठीं उभारलेल्या फंडांत माझा भाग आहे, आणि त्यांत कांहीं विशिष्ट तत्त्वांचें प्रतिपादन होईल ह्या समजुतीवर मीं तो घातला आहे. " तारीख १ आक्टोबर १८४४ सालीं स्पेन्सर एडवर्ड लॉट यास लिहितो:-"विल्सन मला कसा काय आवडतो असें तूं मला विचारितोस.....त्याचें माझें साधारणपणें बरेंच जमतें; राजकीय तत्त्वांच्या संबंधानें आमचें फारच चांगलें जमतें असें म्हणण्यास हरकत नाहीं, आणि धार्मिक प्रश्नांवर त्याचीं मतें बहुतेक लोकांपेक्षां ज्यास्त उदार आहेत. पण निकट स्नेहाचा पाया जो अगदीं मित्रत्वाचा मनोविकार तो आह्मां दोघांमध्यें आहे असें मला म्हणतां येत नाहीं; आमची एकमेकांशीं 'सहानुभूति' नाहीं.....साध्या व नेहमींच्या गोष्टींची व्यवस्था तो नीट ठेवितो; तो जलद लिहितो; पण जेथें–उदाहरणार्थ, आमच्या पत्राचा पहिला अंक काढण्याच्या कामीं बऱ्याच महत्त्वाचें आणि भानगडीचें काम करावयाचें असेल, आणि जेथें बरीच व्यवस्था लावावयाची असेल व बऱ्याच गोष्टींवर नजर ठेवावयाची असेल, तेथें तो सामान्यपणें दुर्बल झाल्यासारखा, हात मोडल्यासारखा, आणि गोंधळल्यासारखा होतो..... आह्मां दोघांमध्यें माझें डोकें ज्यास्त मोठें असल्यामुळें मीच मुकाट्यानें पुढाकार घेतोंसें दिसतें. "

त्याच्या ह्या अशाश्वत स्थितींत त्याच्या सुदैवानें आगगाडीच्या कामाची हंगामी नोकरी त्यास पुनः आली. कांहीं आठवडे पावेतों त्यानें ती आणि संपादकी हीं दोन्ही संभाळिलीं. त्यानें त्या पत्रांत जे लेख लिहिले त्यांतील थोडेसे नमुनेदार उतारे खालीं देतों.

" चांगली राज्यव्यवस्था संपादण्यास आपल्या राजकीय संस्था तत्त्वाच्या पायावर उभारिल्या पाहिजेत. व्हिग व टोरी हे पक्षभेद नाहींसे झाले पाहिजेत. राडिकल पक्ष जेव्हां हा विषवृक्ष उपटून

काढील, कायदेविषयक ज्या अशुद्धतेंत आमचे शास्ते हल्लीं वास करितात तो किल्ला जेव्हां तो पक्ष पायापर्यंत पाडून टाकील, आणि त्याच्या ऐवजीं सत्य आणि न्याय यांची इमारत उभारील, तेव्हां त्याचें कार्य पुरें होईल."

"मानव जाति जेव्हां सोईच्या तत्त्वाच्या काळोखांत ठेंचा खात राहणार नाहीं, जेव्हां लोक आपल्या चुकीच्या मार्गांनीं जावयाचे बंद होतील, आणि सृष्टिनिर्माता जे मार्ग उत्तम म्हणून म्हणतो त्या मार्गांनीं जाऊं लागतील; जेव्हां ते आपल्या सांसारिक शहाणपणाची ताठ मान दैवी कायद्यांच्या व्यावहारिक स्वरूपापुढें लववूं लागतील; ईश्वरानें आपल्याला जी शुद्धाशुद्धतेची बुद्धि दिलेली आहे ती उपयोगांत आणण्यासाठीं दिलेली आहे, सामान्य सुखाची तीच खरी मार्गदर्शिका आहे, आणि तिची अवज्ञा केल्यामुळें आजपर्यंत नेहमीं शासन झालेलें आहे आणि पुढेंहि नेहमीं होणार आहे, असें ज्या दिवशीं त्यांस आढळून येईल, असा दिवस जलद येत आहे."

"इंग्रज लोकांची आपल्या शासनसरणीबद्दलची पूज्यबुद्धि नाहींशी झाल्याला पुष्कळ काळ होऊन गेला—ते तिची थोरवी गाण्याचें बंद झाल्याला कांहीं काळ होऊन गेला—त्यांनीं आतां तिचा मान ठेवण्याचें सोडून दिलें आहे—आणि ते हळू हळू तिचा तिरस्कार करूं लागतीलसें दिसतें. म्हणून, पुष्कळ काळ निघून जाण्याच्या पूर्वींच, सध्याची वस्तुस्थिति नष्ट झालीच पाहिजे."

ह्या लेखांतून गत आणि प्रस्तुत ह्यांच्या पूर्ण निषेधाबरोबर भविष्याबद्दल पूर्ण आशायुक्तपणा भरलेला दिसून येतो: लॉटला त्या लेखांतील कांहीं भाग पसंत न पडून त्यानें त्यास असें लिहिलें:—

"तुमच्या पत्राच्या नांवावरून (पत्राच्या 'पायलट' ह्या नांवावरून, कारण त्याचा अर्थ 'खडकांतून जहाज संभाळून नेणारा' असा आहे) जरी तुम्ही सर्व खडक आणि इतर भयें ह्यांतून निभा-

वून आपली नाव हाकलण्यास समर्थ झालेंच पाहिजे, तरी एका गोष्टीबद्दल मी तुम्हांस सांगून ठेवितों.....' फसव्ये सरदार ' अशा प्रकारच्या शब्दांचा उपयोग करूं नका. त्यांपासून फायदा कांहींच होत नाहीं, तर एका वर्गाला दुसऱ्या वर्गाविरुद्ध क्रुद्ध करण्यास मात्र ते कारण होतात. "

प्रकरण पांचवें

—:o:—

इंजिनियरीच्या धंद्यांत पुनः प्रवेश

आगगाडीच्या कामासंबंधानें त्यास पुनः हंगामी नोकरी या सुमारास मिळाली म्हणून गेल्या प्रकरणाच्या अखेरीस सांगितलें आहे. ती नोकरी वुल्व्हर हॅम्पटन शहरास जावयाच्या आगगाडीच्या फांट्याची मोजणी करण्याच्या संबंधाची असून ती एक महिनाभर चालेलसा जरी अंदाज होता, तरी सुदैवानें कित्येक महिने लांबली, आणि ' पायलट ' पत्रावरील त्याची नोकरी नोटिशीशिवाय संपली. नंतर तो आपल्या नोकरीच्यासंबंधानें एप्रिलांत लंदनांत गेला, आणि कामन्स सभेच्या ग्यालरींतून भटकण्याच्या व इतर कांहीं लंदनांतील सौख्यांचा त्यानें अनुभव घेतला. तेथें त्या आगगाडीसंबंधाचें पार्लमेंतापुढील बिल (कायद्याचा मसुदा) मेच्या पंधरावीच्या सुमारास काढून घेतल्यामुळें तो पुनः बेकार झाला. पण ह्या प्रसंगीं फाक्सनें त्यास पुनः नोकरी दिली. तिच्यासंबंधानें तो बापास लिहितो:— " या नोकरीवर हपीसांतील व बाहेरील अशा दोन्ही कामांचें मजेदार मिश्रण होणार असून देशाच्या निरनिराळ्या भागांत फिरण्याची संधि मला येणार आहे; आणि माझ्या कल्पकशक्तीच्या उपयोगाला

विपुल अवकाश सांपडणार आहे..... मला प्रथम सालाचा १३० पौंड पगार मिळणार आहे, आणि फॉक्ससाहेब म्हणतो, मीं चांगलें काम केलें तर तो बहुतेक पाहिजे तितका वाढेल." ही नोकरी केवळ कांहीं आठवडेपर्यंतच राहिली, आणि ह्याचें कारण हें कीं कराराबाहेरचें काम करण्यास तो कबूल होईना. किफायतशीर उद्योग मिळण्याच्या कामीं ह्याची वरचेवर निराशा झालेली असल्यामुळें एकाद्यास असें वाटलें असतें कीं हा कराराप्रमाणेंच काम करण्याचा आग्रह न धरतां देवघेवीच्या तत्त्वाप्रमाणें वागण्यास कबूल झाला असेल; पण तसें झालें नाहीं. पुढें ह्याविषयीं लिहितांना तो म्हणतोः— "कितीहि नुकसान होवो, अन्यायाविरुद्ध बंड करावयाचेंच हा जो माझ्या मनाचा कल त्याचा हा साहजिक परिणाम होता." सुदैवानें ह्याच वेळीं प्रिचर्डसाहेबानें एबरिस्मिथ आणि क्रचू ह्या दोन ठिकाणांमध्यें आगगाडी करण्याची योजना चालली होती त्यासंबंधानें त्यास नोकरी देऊं केली; व ती त्यानें पत्करिली. त्यासंबंधानें तो लिहितोः—"एथें माझी स्थिति नवीन प्रकारची आहे, आणि मोठाल्या कामांची व्यवस्था करण्याची संधि मला मिळणार आहे. आजपर्यंत माझें अगदीं ठीक चाललें आहे. मी आलों तेव्हां एथें अगदींच गोंधळ होता, आणि व्यवस्था म्हणून कांहींच नव्हती; आतां मी सर्व जरूर ती व्यवस्था केली आहे, आणि आतां सर्व मुकाट्यानें चाललें आहे." १८४६ सालीं प्रिचर्डसाहेबानें केलेल्या फिर्यादीसंबंधाच्या कामांत त्यास पुनः उद्योग मिळाला, व तो १८४७ च्या दुसऱ्या सहामाहीपर्यंत चालला.

हा उद्योग चालू असतां त्याला जी फुरसत मिळे ती तो नूतन योजना करण्यांत आणि मनोराज्यांत स्वैर विहार करण्यांत घालवीत असे. त्यानें बर्फावरून चालण्याचा नवीन नमुन्याचा जोडा योजिला, तो सर्वथैव पोलाद वं लोखंड यांचा बनविलेला असून

अशा रीतीनें केलेला होता कीं, बर्फ आणि बुटाचा तळवा ह्या दोहोंमध्यें त्या जोड्याच्या पुढच्या पात्याशिवाय कांहीं नव्हतें, आणि त्यामुळें तो घालून चालणारास विशेष सफाईनें चालतां येत असे. दुसरी एक कल्पना तो अशी बसवीत होता कीं, हवेंत टांगलेलें पण जमिनीवरून ओढावयाचें असें एक वहनसाधन तयार करावयाचें; पण तिच्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तथापि बूट व जोडे बनविण्याबद्दलची जी त्याची कल्पना तिच्याविषयीं अद्यापि त्यास फार आशा वाटत होती.

ता० १६ सप्टंबर १८४९ रोजीं तो डॅव्हेन्ट्री येथून बापास लिहितो:— माझ्या यंत्राचा परवाना घेण्यास जरूर ती फी भरण्याइतका पैसा या पावसाळ्यांत जमेल असा माझा अंदाज आहे. तसें जर झालें, आणि तूं जर त्या परवान्यांत घालवतील तितके माझे नूतन शोध घातलेस, तर, मला वाटतें, त्यांपासून कांहीं तरी किफायत होईल. माझे सर्वच नूतन शोध फुकट जाणार नाहींत अशी मला बरीच खात्री वाटते. शिवाय जातां जातां असें सांगतों कीं, तुझी माझी गांठ पठली तेव्हांपासून मीं कित्येक नव्या युक्त्या काढिल्या आहेत, त्यांपैकीं दोन मीं प्रत्यक्ष उपयोगांत आणून पाहिल्या आहेत, आणि ज्यांनीं त्या पाहिल्या त्यांनाहि त्या फार पसंत पडल्या आहेत. आणखी एक हातानें छापण्याचें नवें यंत्र मीं बनविलें आहे, तें पूर्वींच्या यंत्राहून ज्यास्त साधें असून ज्यास्त काम देणारेंहि आहे.

ता० १८ सपटंबर १८४९ रोजीं तो लिहितो:—" पाणी काढण्याच्या माझ्या यंत्राच्या संबंधानें मला असें कळतें कीं त्याबद्दलचा आधींच कोणीं परवाना काढिला आहे."

ता० २३ आक्टोबर रोजीं तो लिहितो:—" अलीकडे घेतलेल्या परवान्यांची बारीक तपासणी करतां मला असें आढळून येतें

कीं, छपर घालण्याच्या माझ्या नव्या युक्तीसारख्या युक्तीचा परवाना कोणीं घेतलेला नाहीं; तेव्हां तसला मीच प्रथम घेणार असें दिसतें."

" बाइन्डिंग पिन " किंवा " बांधण्याची टांचणी " तयार क-
रण्याच्या कामीं त्यास ज्यास्त यश आलें; ती १८४७ च्या एप्रि-
लांत बाजारांत आली, आणि मेच्या आठ तारखेपर्यंत त्या व्यापारांत
त्यास ४९ पौंड फायदा मिळाला. पण पुढच्या वर्षाच्या प्रारंभा-
च्या सुमारास तिची विक्री कमी होऊं लागली, आणि पुढें लवकरच
अगदीं बंद पडली. त्यानें तयार केलेलें ह्याच्यापेक्षां ज्यास्त महत्त्वाचें
यंत्र लांकडाला रंधा मारण्याचें होतें, आणि त्या कामीं त्याचा
मित्र ज्याक्सन त्यास येऊन मिळाला. १८४७ च्या सर्व सालांत
त्याचें सर्व लक्ष्य तिकडेच लागलें होतें. त्याचा नमुना त्यानें उप-
योगांत आणून पाहिला, आणि तो एकंदरींत बरा निघाला. पण
त्याच्यायोगानें लांकडावर वाटोळ्या खुणा उठत हा त्याच्यांत क-
मीपणा होता. त्याबद्दलचे प्रयोग डार्बी एथेंहि त्यानें सुरू ठेविले,
आणि नव्या नव्या उत्पन्न होणाऱ्या अडचणी काढून टाकण्यासाठीं
त्यांत नवे नवे फेरफार करून पाहिले. त्यांत सिद्धि येईल किंवा
नाहीं ह्याबद्दल ज्याक्सन यास संशय येऊं लागला, आणि आजप-
र्यंत झालेल्या खर्चाचा आर्धा भाग देऊन तो तो उद्योग सोडून दे-
ण्यास तयार झाला. असें करूं नको म्हणून त्यास स्पेन्सरनें पुष्कळ
सांगितलें पण फुकट; आणि पुढें लवकरच तो या देशीं आला. अशा
रीतीनें या कामाची वासलात लागली. टाईप जुळण्याचेंहि यंत्र बनवि-
ण्याचा त्याचा बेत चालला होता, आणि डार्बी येथें तो त्याचे कांहीं
प्रयोग करून पाहणार होता असा त्याच्या पत्रांत उल्लेख सांपडतो.

त्याच्या मिश्र वाचनाबद्दल आणि वाङ्मयात्मक आवडीनावडीं-
बद्दल कोठें कोठें कांहीं उल्लेख सांपडतात, त्यांवरून त्याविषयीं
कांहीं कल्पना होते. शेले हा त्याचा आवडता कवि होता. उदाहर-

णार्थ, ता० १ आगस्ट १८४९ रोजीं लंदनाहून तो एडवर्ड लॉट यास लिहितोः—" शेलेच्या काव्यांतून जी विलक्षण बुद्धि चमकते तिचें कांहींच चिन्ह त्याच्या निबंधांतून दिसत नाहीं. त्याच्या काव्यांचा मी ज्यास्त ज्यास्त भक्त व चाहता बनत चाललों आहें. त्याचें " प्रोमेथियस अनबाउंड " हें काव्य सगळ्या इंग्रजी भाषेंत उत्तम असेल असें मला खात्रीनें वाटतें. "

ता० ३० आक्टोबर रोजीं तो लिहितोः—" मी हल्लीं (जर्मन कवि) गटेची ' विल्हेल्म मिस्टर ' ही कादंबरी वाचीत आहें, आणि ती मला फार आवडते असें मला म्हणतां येत नाहीं. कांहीं बाबतींत ती स्वाभाविक आहे, आणि वाढीस लागलेल्या मनाच्या बदलणाऱ्या अवस्थांचें चित्र तिच्यांत बऱ्याच चातुर्यानें रेखाटलेलें आहे; पण संविधानकाच्या बाबतींत तिच्यांत मोठेंच व्यंग आहे, आणि तिच्यांतील बरेच तात्त्विक विचार प्रगल्भ असे मुळींच दिसत नाहींत. "

कार्लाइलच्या " क्रामवेलच्या चरित्रा "बद्दल त्याचें मत चांगलें नव्हतें; त्याविषयीं ता० १० मार्च १८४६ रोजीं तो लिहितोः— " तूं ज्याला ' तमाशेवाला ' म्हणतोस तो कधीं कधीं कांहींसा फाजीलपणा करितो. क्रामवेलच्या पत्रांमध्यें तो जे आपले विचार व उद्गार घुसडून देतो ते सदभिरुचीस अगदीं सोडून आहेत, आणि माझ्या मतें चरित्रनायकविषयीं अनादरदर्शक आहेत. "

१८४६ चे अखेरचे क्षण—डिकन्सची " नाताळची गोष्ट " तूं पाहिलीस काय ?....ती अगदींच नीरस दिसते, आणि तिचें तात्पर्य इतकें फाजील दयोत्क्षोभक आहे कीं तें वेडेपणाचेंच दिसतें. कारण तें आपल्या शेजाऱ्यावर आपल्या स्वताइतकी प्रीति करावी म्हणूनच शिकवीत नाहीं, तर त्याच्यावर आपल्यापेक्षांहि ज्यास्त प्रीति करावी म्हणून शिकवितें. "

ह्या वेळीं लंदनांत असतां आपल्यास कोणाचें सहवाससुख मिळत नाहीं ह्याबद्दल तो आपल्या पत्रांतून वरचेवर दुःखाचे उद्गार काढितो. पण १८४६ त किंवा ४७ त त्याची प्रकाशक चापमन ह्याशीं ओळख झाली, आणि त्याच्याद्वारा इतर प्रसिद्ध माणसांशीं झाली. ह्याबद्दल तो पुढें लिहितोः—"एका पिढीच्या अगोदर लंदनांत लिबरलपक्षीय प्रकाशक ग्रीन हाच होता; तो एकेश्वरी पंथाचा असून न्यू गेट स्ट्रीट या रस्त्यावर त्याचें दुकान होतें. माझ्या चुतत्यानें आपलीं कांहीं चोपडीं त्याच्याकडूनच प्रसिद्ध करविलीं होतीं. १८४६ त मी त्याच्या दुकानीं एकदां गेलों होतों तो त्याच्या चोपड्याच्याच संबंधानें कांहीं कामाबद्दल गेलों होतोंसें मला वाटतें, आणि तेव्हां ग्रीनच्या ऐवजीं चापमनचें नांव मला त्या दुकानाच्या पाटीवर आढळलें. ग्रीन हा धंद्यांतून निघाला असून चापमननें त्याचा व्यवहार विकत घेतला होता.....त्या काळीं लंदनांत माझें मित्रमंडळ बनलेलें नव्हतें, आणि म्हणून चापमन या भेटीपासून मला पहिला स्नेही लंदनांत प्राप्त झाल्यामुळें मला त्या गोष्टीचें विशेष स्मरण होतें. चापमन लंदनाबाहेर क्लापटन येथें रहात असे, आणि १८४६ त, किंवा कदाचित् १८४७ त मी त्याच्याकडे तेथें ईव्हिनिंग पार्टीस (संध्याकाळच्या फराळास) गेलों होतों. ह्या गोष्टीची मला ह्यावरून आठवण होते कीं, तेथें त्या समयीं इतर मंडळींबरोबर मिस इलीझा लिन्न ही आलेली होती; तीच पुढें मिसेस लिन्न लिन्टन ह्या नांवाची कादंबरीकार बनली."....

राजकीय विषयांकडे ह्या वेळीं त्याचें लक्ष केव्हां केव्हां जाई हें पुढील पत्रावरून दिसतें. तें ता० ३ सपटंबर १८४६ रोजीं बापास लिहिलेलें आहे. त्यांत तो म्हणतोः—"धर्माधिकारी आणि सनिर्बंधव्यापारमतवादी पाहिजे तितके पार्लमेंतांत शिरले तर त्यास माझा प्रत्यवाय नाहीं, उलट, ते शिरावे अशीच माझी इच्छा आहे. माझी

फार इच्छा अशी आहे कीं, लॉर्ड जॉन रसेल (त्या वेळचा मुख्य प्रधान) ह्याच्या शिक्षणविषयक व धर्मसंस्थांना द्यावयाच्या मदतीसंबंधाच्या बिलांत खो बसावा..... नॉनकन्फॉर्मिस्ट लोकांचा दृढनिश्चय त्याच्या व एकंदर लिबरल पक्षाच्या अनुभवास आल्यास त्यांत त्यांचें एकंदरींत हितच आहे."

धर्मविषयक प्रश्नांच्यासंबंधाचे जे त्याचे अनेक कोटीक्रम ते पसंत करणारा त्याला बहुधा कोणी मिळत नसे, कारण त्याचीं पाखंडी मतें अगदीं ठळक असत. उलट त्यामुळें त्याचा एक मित्र कसा सुटला हें त्यानें 'आत्मचरितां'त सांगितलें आहे. पण बाकीच्या बहुतेक मित्रांशीं एणेंकरून त्याचें वांकडें आलें नाहीं, किंवा त्याच्या इतर मतांविषयीं आपली सहानुभूति दर्शविण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं.

१८४६ च्या दिजंबरांत " आधीं न्याय मग औदार्य " याविषयावर नॉनकन्फॉर्मिस्ट पत्रांत त्यानें एक लेख लिहिला, त्यापलीकडे या वेळीं दुसरें कांहीं त्यानें प्रसिद्ध केलेलें दिसत नाहीं. आज पुष्कळ दिवस त्याच्या मनांत एक पुस्तक लिहावयाचें असून त्याची तयारी करण्याकरितां तो ह्या वर्षीं निरनिराळे ग्रंथ वाचण्यांत गुंतलेला होता, आणि त्यासंबंधानें एप्रिलपर्यंत त्यानें बरीच सामुग्री गोळा केली. " सरकारच्या कर्तव्याची योग्य मर्यादा " या विषयावर आपण पूर्वीं लिहिलेलीं पत्रें असावीं तितकीं खोल व स्पष्ट नाहींत असें त्यास वाटावयास लागून त्याचें मन आज कांहीं दिवस असंतुष्ट झालेलें होतें. म्हणून त्याला आतां अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, आपण एक नवें पुस्तक लिहून त्यांत ह्या पत्रांत प्रतिपादिलेलीं मतें सामान्य नीतितत्त्वांशीं जुळवून द्यावीं. त्यानें आपली लेखनसरणी सुधारण्याकरितां कोणत्या उपायांची योजना केली हें त्यानें ता० १६

जून १८४७ रोजीं बापास लिहिलेल्या पुढील पत्रावरून अचानक-रीत्या चांगलें दिसून येतें.

"मीं लेखनपद्धतीवरील आपला अभ्यास चालविला आहे, आणि तसें करण्यांत माझा उद्देश लवकरच माझ्या 'नीतिमीमांसे' ला सुरुवात करावी असा आहे. नमुनेदार वाक्यें सांपडली म्हणजे तीं लिहून काढण्याचा उपक्रम मीं सुरू केला आहे. जेव्हां जेव्हां स्पष्टपणा, सुसंगतता, जोरदारपणा, संक्षिप्तपणा, नावीन्य, ह्यांपैकीं एकाद्या गुणानें किंवा दुसऱ्या एकाद्या विशेष गुणानें विशिष्ट असें एकादें वाक्य मला सांपडतें तेव्हां तेव्हां तें मी लिहून काढितों. ज्यांच्यांत कांहीं तरी चांगलें आहे अशा निरनिराळ्या प्रकारच्या सर्व शक्य त्या स्वविचार मांडण्याच्या पद्धतींचे नमुने गोळा करण्याची मला इच्छा आहे. अशाच प्रकारचीं विशेषतः ध्यानांत ठेवण्यासारखीं वाक्यें तुझ्या दृष्टीस पडल्यास तूं तीं मेहेरबानी करून माझ्यासाठीं साधल्यास लिहून काढ."

ता० ३० सपटंबर रोजीं तो पुनः लिहितो:—माझ्या पुस्तकाला जरूर ती माहिती मिळविण्याच्या हेतूनें ब्रिटिश म्यूझियम (पदार्थसंग्रहालय) मधील पुस्तकालयांत मीं प्रवेश करून घेतला आहे. तो मीं पार्लमेंताचा सभासद ब्राइट (जॉन ब्राइट) यास मला शिफारसपत्र देण्याविषयीं लिहून मिळविला.

ह्या सुमारास प्रिचर्ड साहेबाच्या फिर्यादीसंबंधाचा उद्योग संपला, तेव्हां पोटाला कसें मिळावयाचें हा जो सारखा पाठीस लागलेला प्रश्न तो पुनः उभा राहिला; आणि तो सोडविण्याच्या कामीं ह्या ग्रंथलेखनाचा उपयोग त्यास फारच थोडा होता हें सांगावयास नकोच. तो सोडविणें १८४१ त जितकें दुरापास्त दिसत होतें तितकें आतांहि दिसूं लागलें म्हणून त्यासाठीं न्यूझीलंद येथें निघून जाण्याचें त्यानें मनांत आणिलें; आणि शिक्षकीचा धंदा करण्याचेंहि

पुनः एकदां मनांत आणिलें. त्यासंबंधानें डार्बी एथून ता० १० एप्रिल १८४८ रोजीं तो आपल्या चुलत्यास (टॉमस यास) लिहितोः— "शिक्षकीचा धंदा केल्यापासून पोटास मिळण्याचा कांहींहि संभव असता, तर मी बापास त्या कामीं आनंदानें जाऊन मिळालों असतों; पण त्यालाच पुरेशा शिकवण्या नसल्यामुळें त्याला जाऊन मिळण्याकडे माझ्या मनाचा कल होत नाहीं. बाथ येथें गणितविषय शिकविणाराची जरूरी आहे काय ? आणि तो धंदा मला करण्यास प्रत्यवाय आहे काय ? गणिताखेरीज यथार्थदर्शन, यांत्रिक चित्रकला आणि सृष्टपदार्थविज्ञान ह्या विषयांच्या शिकवण्या पत्करल्यास पोटाची सोय मला कदाचित् लावतां येईल, आणि एकदां प्रथम बऱ्याच शिकवण्या आल्यास अखेरीस मी त्यांत यशस्वी होईन याबद्दल मला फारसा संशय वाटत नाहीं."

यासाठीं बाथ येथें थोडे आठवडेपर्यंत तो गेला, तेथें त्यानें चुलत्याचें मत घेतलें, आणि शिकवण्या मिळतील किंवा नाहीं ह्याची टेहळणीहि करून पाहिली, पण त्यांत कांहीं आशा दिसली नाहीं. म्हणून तो लंदन येथें परत आला.

तेथून ता० २२ मे १८४८ रोजीं तो बापास लिहितोः— "ह्यापूर्वीं बाथ येथून तूं कदाचित् ऐकिलें असशील कीं, लंदनांत टेहळणी करून कांहीं करण्यासारखें आहे कीं काय तें पहावें यासाठीं मी येथें आलों आहें. लेखनाच्या संबंधाचा कांहीं तरी उद्योग मला येथें मिळेल अशी मला चांगलीच आशा वाटते."

ता० १० जून रोजीं तो पुनः लिहितोः—'स्टँडर्ड आव्ह् फ्रीडम' या नांवाच्या पत्रांत अग्रलेख लिहिण्याचा उद्योग मला मिळण्याचा संभव आहे, आणि अजमासाप्रमाणें करार बनून आल्यास आठवड्याच्या एका लेखाबद्दल दर लेखास एक गिनी मिळण्याचा संभव आहे.

हा उद्योग त्यास मिळाला नाहीं; तथापि 'इकॉनॉमिस्ट' पत्राचा संपादक विल्सन ह्याशीं झालेल्या एका संभाषणावरून त्यास तेथें आशा उत्पन्न झाली. पण त्या पत्राच्या दुय्यम संपादकाची जागा तुला पाहिजे काय अशी विचारणा त्यास नवंबरपर्यंत झाली नाहीं. म्हणून तो दरम्यान बापाकडे जाऊन राहिला.

प्रकरण सहावें

त्याचा पहिला ग्रंथ

१८४८ अखेर 'इकानॉमिस्ट' पत्राच्या दुय्यम संपादकाचें काम तो करूं लागल्यानंतर लवकरच आपल्या आईस लिहितो:—"आजपर्यंत माझें काम फारच चांगलें चाललें आहे आणि वि-ल्सनला मीं खुश केलें आहे—खरोखरच, मी काम पाहूं लागल्या-पासून, विशेषत: बातम्या देण्याच्या बाबतींत, त्याच्या वर्तमान-पत्रांत सुधारणा झाल्याबद्दल त्यानें मला शाबासकी दिली आहे." मागच्या प्रकरणांतील एका पत्रांत उल्लेखिलेला त्याचा उद्दिष्ट ग्रंथ तयार करण्यास एथें त्यास बरीच फुरसत मिळत असे. पण त्या कामांत त्याची प्रगति मंद चालली होती असें दिसतें; कारण तो एका पत्रांत म्हणतो:—"शिवाय मीं जें लिहिलें आहे तें मला समाधानकारक वाटत नाहीं, आणि थोडेंच लिहून झाल्याबद्दल मला जितकें वाईट वाटतें त्याहून ह्या गोष्टीबद्दल ज्यास्तच वाटतें."

ता. १ एप्रिल १८४९ रोजीं तो आपल्या बापास पुन: लिहितो:—"मी आतां माझ्या ग्रंथाच्या राजकीय भागाचें ग्रथन करावयास लागलों आहें, आणि आतांपर्यंतचा भाग चांगला वठला आहेसें मला

वाटतें. 'मुलांचे हक्क' म्हणून जें प्रकरण मीं नुक्तेंच पुरें केलें तें मात्र मला सर्वांत कमी समाधानकारक वाटतें. त्याची लेखनसरणी तेच तेच शब्द वगैरे येऊन जरा कंटाळवाणी झाली आहे. अखेरची तपासणी करतांना मला तें प्रकरण सुधारावें लागेल.... हा ग्रंथ लोकांच्या महत्त्वाकांक्षेला इतका रुचणारा, आणि इतका वक्तशीर असल्यामुळें, आणि सामान्य वाचकाला आवडेल अशा सोप्या भाषेंत लिहिलेला असल्यामुळें, तो प्रसिद्ध करण्याची जबाबदारी घेण्यास भिण्याचें कारण मला दिसत नाहीं."

ता० २४ आगस्ट रोजीं लिहितोः—"मला माझ्या पुस्तकांतील मजकूर जरी समाधानकारक वाटतो, तरी भाषासरणी अद्यापि वाटत नाहीं."

बापाकडून तो लेख सुधारण्याच्या सूचना मिळविण्यासाठीं तो तयार होईल तसा तो त्याच्याकडे पाठवीत असे; तो वाचून त्यानें एकदां त्यास लिहिलें:—"राष्ट्रीय शिक्षणावरील प्रकरण मला सर्वांत ज्यास्त आवडलें, आणि त्याच्या खालोखाल स्वच्छताविषयक नियमनावरील आवडलें. स्थापित धर्मावरील प्रकरणांत कांहीं मुद्दे असे आहेत कीं, ते तूं सिद्ध न करतां गृहीत केले आहेस..... दुसऱ्या कांहीं ठिकाणीं विनाकारण बराच कटुपणा दिसून येतो." पुनः एकदां तो लिहितोः—"तुझी आई म्हणते, तूं आपल्या भाषासरणीनें विनाकारण शत्रू करून घेत आहेस असें मला वाटतें, आणि व्हाल्टेअर (पाखंडी फ्रेंच तत्त्वज्ञ) चें काम तूं आपल्या ग्रंथांत मुळींच सांगावयास नको होतें. ह्यावर तो उत्तरीं लिहितोः—"व्हाल्टेअरचें नांव पूर्वींच्या एका प्रसंगीं काढून टाकिलें होतें, आणि ह्या वेळींहि काढून टाकीन."

ह्या पुस्तकास नांव काय द्यावयाचें हें त्यानें १८९० च्या वसंतांपर्यंत ठरविलें नव्हतें, पण तें ठरविणें तेव्हां जरूरच झालें. स-

रासरी सहा महिनेपर्यंत ह्या प्रश्नाची चर्चा त्यानें आपले आप्त व मित्र ह्यांशीं चालविली होती, आणि त्यांत त्यास अनेक नांवें सुचविण्यांत आलीं होतीं. शेवटीं त्याचा चुलता टॉमस व प्रकाशक चापमन ह्यांना स्टॅटिक्स (Statics) हा शब्द पसंत नसतांहि 'सोश्यल स्टॅटिक्स' (सामाजिकस्थिति शास्त्र) असें ठेविलें. त्याचा अर्थ समाजाची प्रगति होऊन त्याला पूर्णावस्था प्राप्त झाली म्हणजे जें शास्त्र त्यास पूर्णपणें लागू होईल तें शास्त्र असा आहे. 'केवल नीति किंवा पूर्ण नीति' असें त्यानें ज्यास पुढें नांव दिलें तेंच हें होय.

त्यानें 'आत्मचरिता'चें पंचविसावें प्रकरण लिहिलें तेव्हां, ह्या ग्रंथावर वर्तमानपत्रांतून आतां अभिप्राय काय येतात ते पाहवे अशासंबंधानें त्याच्या मनांत काय विचार आले होते हें त्यास आठवत नव्हतें, आणि आलेले अभिप्राय वरवरचे आहेत असें पाहून त्याची निराशा झाली होती कीं काय हेंहि आठवत नसे. पण त्याच्या पत्रांवरून ह्या प्रश्नांचा उलगडा होतो. त्यांवरून असें दिसतें कीं, अगदीं अगोदर अभिप्राय आले त्यांतील एक ह्याच्याच वर्तमानपत्रांतील ('इकानामिस्ट' पत्रांतील) होता (८ फेब्रुवारी १८५१). त्यासंबंधानें एका पत्रांत तो म्हणतो:—"मला तो अगदीं समाधानकारक वाटतो; कारण त्यांत पुष्कळ स्तुतीबरोबर थोडासा दोषहि त्या ग्रंथास दिलेला आहे, आणि तो तो अभिप्राय मींच स्वतः लिहिला नाहीं हें दाखविण्यास जरूर तेवढाच दिलेला आहे." कित्येक अभिप्राय वाचून तो दुसऱ्या एका पत्रांत म्हणतो कीं "अभिप्राय देणारांनीं पुस्तक वाचिलें नाहीं." ता० १२ मार्च रोजीं नॉनकन्फॉर्मिस्ट पत्रांत त्यावर अभिप्राय आला त्यासंबंधानें तो तिसऱ्या एका पत्रांत म्हणतो:—"हा अभिप्राय लिहिणें शक्य होतें तितका चांगला लिहिला गेला नाहीं. चार्लस मियालनें मला सांगितलें, अभिप्राय देणारा म्हणतो कीं, ह्याचें कारण त्या वेळीं

माझें डोकें फार दुखत होतें ! " ' लीडर ' वर्तमानपत्रांत जोरदार अभिप्राय येतील असा त्याचा अंदाज होता त्याप्रमाणें त्यांत त्या-संबंधानें तीन लेख आले. ' नार्थ ब्रिटिश ' व ' ब्रिटिश क्वॉर्टर्ली ' या दोहोंमध्येंहि एकंदरींत बरे अभिप्राय आले. ' प्रॉस्पेक्टिव्ह रिव्ह्यू' नामक मासिकाच्या जानेवारी १८९२ च्या अंकांत रिचर्ड ह-टन यानें त्यावर एक लेख लिहून त्यांत असें म्हटलें:—" या ग्रंथका-राच्या एकाद्या क्लृप्तीचा परिणाम अयुक्तिक, अव्यावहारिक, अथवा नैतिक किंवा दुसऱ्या कसल्या पुराव्याचा पाठिंबा नसलेला म्हणून दाखविल्यास, त्याचें कारण दाखविण्यास एक क्लृप्ति त्याच्याजवळ नेहमीं तयार आहे, आणि ती ही कीं, आपण पूर्ण माणसाचेच हक्क व कर्तव्यें त्यांत सांगितलीं आहेत. " या लेखाच्या संबंधानें स्पे-न्सर सामान्यत: म्हणतो:—" या लेखांत एकच काय ती योग्य टीका आहे. बाकी सर्व गेरसमजूत आहे किंवा गैर कथन आहे. "

आपल्या ग्रंथांत निरूपिलेली नीति पूर्ण माणसांची आहे ह्या विधानाचा आधार पळून जाण्यास हा नेहमीं घेतो असा आक्षेप हटननेंच केवळ घेतला असें नाहीं. लॉट यानें तोच आक्षेप पुढें आ-णिला, व तो खोडून काढण्यासाठीं स्पेन्सरनें त्यास एक पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो:—" एक डाक्टर सारखें असें म्हणत असे कीं, मी ज्याची प्रकृति योग्य स्थितींत आहे त्यालाच औषध देत असतों; अशा डाक्टराशीं तूं माझी तुलना करितोस, आणि म्हणतोस कीं, मीं नेहमीं नियमित स्थितीचा विचार करीत असतों, आणि म्हणून नियमबाह्य स्थितीबद्दल मला ओकारी येते, आणि ती मला असह्य होते. ह्यावर मी असें म्हणतो कीं, तूं एक हा ग्रंथ वाचिला नाहींस, किंवा त्याचा बराच भाग विसरून गेला आहेस. तात्त्विक नियमांप्रमाणें चालणें अशक्य आहे, आणि वाढीच्या मंदसरणीनें गेल्याशिवाय योग्य स्थिति प्राप्त होणें अशक्य आहे, ह्या गोष्टीवर त्या ग्रंथांत

इतके वेळा मी जोर दिलेला आहे कीं, आपण हात जोडून बसावें आणि कांहीं करूं नये असें मी यांत शिकवितों असा मजवर लोक आरोप आणितात. अस्तित्त्वांत असलेल्या संस्था मीं नेहमीं लक्षांत घेतलेल्या आहेत, आणि सर्व सामाजिक स्वरूपांचा उपयोग आहे हें मीं नेहमीं ध्यानांत वागविलें आहे, असें तुला त्या ग्रंथांत आढळून येईल." या ग्रंथांत त्यानें धर्मविषयक नेहमींची भाषा वापरली आहे, म्हणजे 'ईश्वर' वगैरे शब्द घातले आहेत. हें त्याचें करणें त्याचीं धर्मविषयक मतें बापास माहीत असल्यामुळें त्यास उमजेना, तेव्हां या आपल्या करण्याच्या समर्थनार्थ त्यानें त्यास लिहिलें:—"या बाबतींत मला नेहमींच कांहीं अडचण भासलेली आहे, पण इतर शब्दांइतकेच नेहमींचे शब्द या बाबतींत मला योग्य वाटले आहेत. वस्तूंचें अंतिम सत्त्व किंवा तत्त्व किंवा कारण दर्शविण्यास कांहीं तरी शब्दांचा उपयोग करणें मला जरूर होतें, आणि रूढशब्द इतर शब्दांइतकेच मला चांगलें वाटत असल्यामुळें, निष्कारण विरोध उत्पन्न करण्यापेक्षां त्यांचाच उपयोग करणें उत्तम असें मला वाटलें."

त्या ग्रंथांतील 'राष्ट्रीय शिक्षणा'वरील प्रकारणाविषयीं पहिल्यापासूनच वाद उत्पन्न झाला; आणि म्हणून त्यावर व्याख्यान देण्याची त्यास विनंति करण्यांत आली; पण ती त्यानें नाकारिली. त्यासंबंधानें तो म्हणतो:—" मीं व्याख्यान दिल्यास माझ्या वजनास धक्का बसणार आहे. एकाद्याच्या ग्रंथांवरून त्याच्याबद्दल जो ग्रह झालेला असतो, तो त्याच्या प्रत्यक्ष भाषणानें क्वचितच दृढ होतो." " न्याशनल पब्लिक स्कूल असोसिएशन " ही राष्ट्रीय शिक्षणवादी संस्था त्यास ह्या प्रकरणाबद्दल शिव्या देऊं लागली; पण 'कॉंग्रिगेशनल बोर्ड आव्ह एजुकेशन' ह्या शिक्षणसंस्थेला तें इतकें पसंत पडलें कीं, त्या संस्थेनें साम्युएल मोर्लेच्या खर्चानें तें प्रकरण " स-

रकारी शिक्षण–स्वोद्देशविघातक " या नांवानें पुनः छापून काढिलें. पुढें त्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं त्यानें त्या प्रकरणास सहा पानांचें परिशिष्ट जोडून दिलें, व त्यांत त्यावर घेतलेल्या आक्षेपांचें खण्डन केलें.

हें स्वतंत्र लहानसें पुस्तक इतरांबरोबर सर एवडवर्ड बुलर लिटन या प्रसिद्ध ग्रंथकाराकडे जेव्हां पाठवून दिलें, तेव्हां त्यानें त्यांतील विषयाच्या प्रतिपादनाबद्दल असें लिहिलें कीं, " त्यांतील धिटाई, नूतनपणा, आणि खोट्या विचारसरणीचा व भपक्याचा अभाव हीं मला विलक्षण वाटलीं. " तथापि शिक्षणांत सरकारानें मुळींच हात घालूं नये हा जो स्पेन्सरचा सिद्धान्त तो त्यास मान्य झाला नाहीं, व ही गोष्ट आपणास जराशी निरुत्साहजनक वाटते असें तो म्हणतो. ह्याबद्दल तो स्पेन्सर यास असें लिहितो:–" कदाचित् तुझा माझा मुळाशींच मतभेद आहे. राष्ट्राचे विलक्षण विशेष मुलाच्या मनास लावणें हें तुला नकोसें दिसतें; मला राष्ट्राचा जीवटपणा व स्थाइकपणा कायम ठेवण्यास तसें करणें आवश्यक वाटतें. "

या ग्रंथामुळें त्याची चहा वाढत चालली व त्याचें नांव जॉन स्टुअर्ट मिल्लच्या नांवाबरोबर लोक घेऊं लागले. त्याच्या सहीबद्दल त्याजकडे मागण्या येण्यास सुरवात झाली. हा अनुभव पुढें त्यास फारच येऊं लागला. आपल्या ग्रंथाचें नांव वरचेवर निघतें असें पाहून तो असें म्हणतो कीं, " हें पुस्तक जर मनोरंजक झालें आहे तर तें किफायत करून देईल याबद्दल मला संशय वाटत नाहीं. "

यासंबंधानें ता० २९ मार्च १८५२ रोजीं तो बापास लिहितो:– " मिसेस चापमननें मला सांगितलें कीं, एका दगड बसवणाराकडून आह्मास नुक्तेंच असें पत्र आलें आहे कीं, ' तुमचें कौटुंबिक स्मारक दुरुस्ती करण्यास झालेलें आहे; म्हणून ' सोशल स्टॅटिक्स ' या

नांवाच्या ग्रंथाची जर एक प्रत मला तुम्ही द्याल तर मी त्याची दुरुस्ती करीन '.... मी पर्वा चापमनबरोबर प्रकाशक चार्लस नाइट ह्याजकडे गेलों. तेव्हां तो म्हणाला, 'तुमच्या पुस्तकापासून मला पुष्कळ माहिती प्राप्त झाली, व त्याबद्दल मी तुमचा आभारी आहें.' अशा रीतीनें माझे माझ्या तोंडावर उपकार मानणें अलीकडे बरेंच वरचेवर घडून यावयास लागलें आहे."

ह्या सर्व गोष्टींवरून त्याला अशी आशा उत्पन्न झाली कीं, या पुस्तकाची नवी आवृत्ति काढण्याचा प्रसंग लवकरच येईल. म्हणून तो १८९१ च्या मार्चांतच त्याची दुरुस्ती करूं लागला, आणि त्यांतील भाषासरणी सुधारण्याकडे विशेष लक्ष्य देऊं लागला. त्यासंबंधानें तो म्हणतो, "इतके दोष मला यासंबंधानें त्यांत दिसतात ह्याचें आश्चर्य वाटतें. हल्लीं मी आपल्या भाषासरणीकडे ज्या बारीक दृष्टीनें पहात आहें, त्याच दृष्टीनें मेकालेच्या लेखनसरणीकडे पाहूं लागलों आहें, आणि त्यावरून मला असें आढळून आलें कीं, ह्या कसास ती मुळींच उतरावयाची नाहीं."

१८४३ त तो प्रथम लंदनास गेला तेव्हां जो पूर्ण आशावादीपणा त्याच्यांत दिसत असे, तो आतां इकॉनॉमिस्ट पत्रांतील लेखक झाल्यावर फारसा दिसत नसे. पुढें आपलें काय होईल ह्यासंबंधानें त्यास अद्यापि संशय वाटत असे. हें ह्यावरून दिसतें कीं, न्यूझीलंदला निघून जावें किंवा काय ह्या प्रश्नाची चर्चा त्यानें आतां पुनः सुरू केली. त्यासंबंधानें तो आपल्या आईस विचारतो, "आपण सर्वांनीं एकदमच तिकडे निघून जावें असा विचार केल्यास त्याबद्दल तुझें म्हणणें काय आहे?" पण त्यांना इतक्या लांबच्या पल्ल्यावर नेणें धोक्याचें आहे, आणि त्यांस एकटीं सोडून जाणें तर आपणास आवडत नाहीं, ह्या मुद्यावर त्यानें तो विचार सोडून दिला. शिवाय, त्याच्या ग्रंथांत त्याचें लक्ष्य जसें ज्यास्त रमूं लागलें,

आणि लेखकाच्या धंद्यांत यश येण्याचा संभव ज्यास्त दिसूं लागला, तशी देशान्तरीं जाण्याची कल्पना त्यास कमी आकर्षक वाटूं लागली.

ह्या वेळीं त्याचें सामान्य वाचन काय चाललें होतें याची फारशी माहिती उपलब्ध नाहीं. काय वाचणें योग्य आहे ह्याबद्दल मात्र त्याचीं निश्चित मतें बनलेलीं होतीं. त्यासंबंधानें तो म्हणतो:—"लढाया, राजकीय प्रकरणांतील पक्के लेख व कच्चीं टिपणें इत्यादिकांपेक्षां कार्पेंटरचें "शारीरशास्त्राचीं तत्त्वें" हें पुस्तक आपल्यास बरेंच ज्यास्त उपयुक्त आणि फारच ज्यास्त मनोरंजक वाटतें. चालू गोष्टींबद्दलच्या ह्या गप्पा वाचून आरोग्यरक्षण करून सुखानें कसें रहावें हें शिकण्यास मुळींच मदत व्हावयाची नाहीं, किंवा वस्तूंच्या घटनेचें ज्यास्त ज्ञान व्हावयाचें नाहीं." तद्वतच ज्यास इतिहास म्हणून समजतात त्याची त्यास मुळींच किंमत वाटत नसे.

ह्यासंबंधानें ता० २३ एप्रिल १८९२ रोजीं तो एडवर्ड लॉट यास लिहितो:—" ह्यासंबंधानें थोडक्यांत माझें म्हणणें असें आहे कीं, मानवी स्वभावाच्यासंबंधानें योग्य क्लृप्ति बसविल्याविना इतिहासाची उपपत्ति लावतां यावयाची नाहीं; आणि तशी क्लृप्ति प्राप्त झाली म्हणजे इतिहासाची आपल्यास जरूरी नाहीं. इतिहासांतील खऱ्या किंवा खोट्या गोष्टींपासून कोणतेंहि अनुमान काढावयाचें म्हटलें म्हणजे त्या अनुमानांत मानवी स्वभावाबद्दलच्या तुमच्या कल्पना शिरल्याच पाहिजेत; म्हणून त्या तुमच्या कल्पना बरोबर नसल्यास तुमचीं अनुमानें चुकण्याचा संभव आहे. दुसऱ्या पक्षीं मानवी स्वभावविषयक तुमच्या कल्पना बरोबर असल्यास तुम्हांस मार्ग दाखवण्यास इतिहासावरून काढिलेल्या कोणत्याच अनुमानाची जरूरी नाहीं. आतां तूं जर विचारशील कीं, मानवी स्वभावाबद्दल योग्य कल्पना कशी बनवावयाची, तर त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, तसें करण्यास आपल्या सभोवतीं दिसणाऱ्या गोष्टी आणि

जीवितविषयक सामान्य नियम यांचें निरीक्षण केलें पाहिजे. माझ्याविषयीं म्हणशील तर मी मानवजाति म्हणजे पृथ्वीवरील एकंदर जिविताच्या उत्क्रमणाचें आजपर्यंतचें अत्युच्च फल समजतों, आणि म्हणून हें निरीक्षण करतांना प्रारंभापासूनचे जितके चमत्कार उपलभ्य असतील तेवढे सगळे लक्ष्यांत घेणें मला बरें वाटतें. मीहि इतिहासाचा भोक्ता आहें, पण तो सगळ्या विश्वाच्या इतिहासाचा होय. एकाद्या माणसाचा पूर्व इतिहास कांहींच माहीत नसतां त्याच्याकडे केवळ एक तास पाहून त्याच्या स्वभावाचें ज्ञान होईल अशी अपेक्षा करणें जितकें सयुक्तिक आहे, तितकेंच मानवी स्वभावाच्या उत्क्रमणाच्या शेवटच्या कांहीं हजार वर्षांचें निरीक्षण करून त्याचें योग्य ज्ञान होईल अशी अपेक्षा करणें सयुक्तिक आहे."

१८९० च्या वसंतांत त्यानें इकॉनॉमिस्टच्या हपिसांतच राहण्याचें सोडून दिलें, आणि ज्याकसनबरोबर पॅडिंगटन एथें बिऱ्हाड केलें. तेथें असतां, त्याच्याप्रमाणें केवळ वनस्पत्याहार करून काय होतें हें तो पाहूं लागला. ह्या प्रयोगाच्या संबंधानें तो आपल्या आईस लिहितो:—"मी स्वयंपाक करण्याच्या बाबतींत अगदीं प्रवीण होत चाललों आहें, आणि दररोज खाण्याच्या पदार्थांचे नवे नवे संयोग बनवीत आहें, आणि त्यांपैकीं कांहीं फार नामी जुळत आहेत. मी कांहीं दिवसांनीं आह्मी एथें खातों त्या जिनसांचें कोष्टक पाठवून देईन, आणि मला अशी खात्री वाटते कीं, कांहीं काळानें ते जिन्नस जसे पोषक आहेतसें दिसून येईल, तसे रुचकरहि लागूं लागतील, आणि कंटाळवाणेहि होणार नाहींत." पण हा आहार (वनस्पत्याहार) त्यास त्याच्या आजमासाप्रमाणें पुष्टिकारक न वाटल्यामुळें दुसरा महिना पुरा होण्यापूर्वींच त्यानें तो सोडून दिला.

त्यानें दोन वर्षें कसून मेहनत केल्यामुळें १८९१ सालीं अवश्यच त्याच्यामध्यें आळस उत्पन्न झाला. म्हणून त्या सालास " आ-

ळसाचें वर्ष " असें नांव त्यानें 'आत्मचरितां'त दिलेलें आहे. पण, वास्तविक रीत्या पाहतां, पुढें जी फलोत्पत्ति त्याच्या हातून व्हावयाची होती तिच्याकरितां ह्या वर्षीं जणू काय तो जमिनीची मशागत करीत होता. हें साल लंदनांतील भव्य प्रदर्शनाचें होतें, आणि तें प्रदर्शन सर्वांच्या अंदाजापलीकडे उत्तम वठलें होतें. त्याच्या आईला असले देखावे पाहण्याची फार हौस असल्यामुळें तिनें तें पाहण्यास लंदनास आल्याशिवाय राहूं नये अशी त्याची फार इच्छा होती. शिवाय त्यानें बापास व चुलत्यास असें लिहिलें कीं, तुम्ही निरनिराळ्या वेळीं आल्यास तें पाहण्याच्या कामीं तुम्हांस मला ज्यास्त मदत करतां येईल. तो आतां वाङ्मयाकडे लागला तरी इंजिनियरीकडे त्याचें लक्ष्य होतेंच हें ह्यावरून दिसतें कीं, ता० २० दिजंबरच्या 'इकॉनॉमिस्ट'च्या अंकांत 'पाण्याच्या प्रश्नाचा एक उलगडा' ह्या नांवाचा एक लेख त्यानें लिहिला; त्यांत त्यानें लंदनास स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याविषयीं आणि तेम्स नदी सुधारण्याविषयीं सूचना केल्या होत्या. त्याच्या सूचनांपैकीं एकीस अनुसरून एक योजना नुक्तीच लंदनच्या लोकांपुढें आलेली होती, मात्र पाणी अडवण्यासाठीं धक्का बांधावयाचा तो ग्रीनीजच्या ऐवजीं ग्रेव्हसेंड येथें बांधण्याची त्यांत सूचना केलेली होती.

या एकदोन सालांत त्याचे बरेच लोकांशीं स्नेह बनूं लागले. 'सोश्यल स्टॅटिक्स' ह्या ग्रंथावरून आक्टेव्हियस स्मिथशीं त्याचा प्रथम परिचय झाला. ह्या ओळखीस लवकरच निकट स्नेहाचें स्वरूप आलें, आणि त्यापासून योग्य क्रमानें, त्याच्या जीवितांतील सुखांपैकीं कांहीं अति मोठीं सुखें त्यास अनेक तऱ्हांनीं प्राप्त झालीं. दर आठवड्याच्या शेवटीं चापमनकडे तो जो संध्याकाळच्या फराळास जात असे तेणेंकरून दुसरे स्नेही त्यास लाधले; त्यांपैकीं

जॉर्ज हेन्री ल्युइसशीं त्याचा सर्वांत अगोदर स्नेह जमला, पण त्यास पुढच्या वर्षीपर्यंत फारसें निकट स्वरूप आलें नाहीं.

ता० २२ सपटेंबर १८५१ रोजीं तो बापास लिहितोः—"टेम्स नदीच्या दरींतून गेल्या शनिवारीं, रविवारीं, सोमवारीं आणि मंगळवारीं ल्युइसबरोबर मजेनें सहल करण्यास मी गेलों होतों. आह्मी स्लॅाफ नजीक या सहलास सुरवात केली, आणि आबिंग्डनपर्यंत मजल मारिली. त्यापासून आह्मांस फार फायदा झाला, आणि अत्यंत आनंद झाला. वनस्पतींच्या वृद्धीच्या नियमाच्या संबंधाची माझी कल्पना मीं ल्युइस यास कळविली आणि अनेक प्रकारच्या वनस्पतींचें प्रत्यक्ष परीक्षण त्या कल्पनेस अनुसरून आह्मीं वाटेनें केल्यामुळें त्या सहलास ज्यास्तच रमणीयता प्राप्त झाली. तें मत त्यास फारच आवडलें."

ता० ३ आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—"ल्युइस सरासरी चवतीस किंवा पसतीस वर्षांचा असून मध्यम उंचीचा आहे, त्याचे केंस फिके पिंगट असून लांब आहेत, त्याच्या चेहऱ्यावर देवीचे खोल वण आहेत, आणि त्याची मुद्रा जराशी थकल्यासारखी दिसते. तो फार चतुरस्र आहे; त्यानें कांहीं चांगलीं नाटकें व कादंबऱ्या लिहिल्या आहेत; कधीं कधीं तो कविताहि रचितो, व नाटकांत सोंग घेतो; त्यास भाषा पुष्कळ येतात; रिव्ह्यूंतून तो लेख लिहितो; परकी भाषेंतील नाटकांचीं भाषान्तरें करितो; गाण्यांतील मर्म जाणतो; आणि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांचें ज्ञान तर त्यास फारच खोल आहे. त्याचा सहवास मला फार मजेचा वाटतो. त्याचें लग्न झालेलें असून त्यास तीन मुलें आहेत."

१८५१ च्या जून–जुलईच्या सुमारास मिस मेरियन ईव्हान्स (प्रसिद्ध कादंबरीकार जार्ज ईलियट) हिच्याशीं स्पेन्सरची प्रथम गांठ पडली; ती चापमनच्या घरीं होय. त्याच वर्षीं पुढें कांहीं का

ळानें तीस भेटण्याकारितां ल्युइसला तो घेऊन गेला. १८९२ त त्याची डेव्हिड मेसन व हक्स्ले यांशीं ओळख झाली. त्यानें १८४७ सालींच लोकसंख्या–वृद्धिविषयक एक क्लृप्ति बसविली होती; तिच्यासंबंधानें माहिती मिळवीत असतां त्याचा हक्स्लेशीं प्रथम परिचय झाला. ह्यासंबंधानें १८९१ च्या सपटंबरांत तो बापास लिहितो:—" लोकसंख्येवरील माझ्या ग्रंथाचा सांगाडा रेखाटण्यास मीं सुरवात केली आहे, आणि तो तुला लवकरच पाठवीन. मला वाटतें तो सुंदर रीतीनें पूर्ण, आणि अगदीं निर्णायक असा बनणार आहे." त्याच्या मनांत तें सरासरी वीस प्रकरणांचें पुस्तक करावयाचें असल्यामुळें, त्यावर एक छोटा निबंध लिहिण्याविषयीं चापमननें त्यास केलेली विनंति त्यानें प्रथम अमान्य केली. शेवटीं "वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू"मध्यें तो त्या विषयाचा रेखाटा लिहिण्यास कबूल झाला, आणि मिस्तर व मिसेस पॉट यांजकडे नाताळांत जाऊन येऊन त्यानें तो तयार करण्यास सुरवात केली.

त्यासंबंधानें १८९२ च्या एप्रिलांत तो बापास लिहितो:—" लोकसंख्येवरील माझ्या निबंधाच्या संबंधानें तूं अद्यापि आपलें कांहीं मत दिलें नाहींस.....परवां रात्रीं रॉबर्ट चेंबर्सची व माझी गांठ पडली तेव्हां त्यानें मला त्याबद्दल फार शाबासकी दिली. ग्रेगला तो नापसंत आहे, आणि चापमनला त्यानें त्याच्याविरुद्ध आपले अनेक आक्षेप कळविले आहेत, पण ते सहज खोडतां येण्यासारखे आहेत."

त्याच संबंधानें तो मे महिन्यांत बापास पुनः लिहितो:—" माझ्या लोकसंख्याविषयक क्लृप्तीच्या विरुद्ध प्रो॰ ओवेन कांहीं आक्षेप घेत नाहीं हें ऐकून तुला आनंद वाटेल. चापमननें त्यास सामान्यतः त्या लेखाच्या संबंधानें त्याचें मत विचारिलें तेव्हां तो म्हणाला, 'तो फार चांगला लेख आहे.' चापमननें नंतर त्यास त्यां-

तील कृतीबद्दल आपलें मत सांगण्याबद्दल आग्रह केला. पण तसें करण्याचें त्यानें नाकारिलें; आणि म्हणाला कीं, 'मीं तें जलद वाचिलें असल्यामुळें ठाम मत देण्याची माझी तयारी नाहीं.' नवीन मतांविषयीं आपलें मत देण्याच्या कामांत तो फार सावधगिरी ठेवितो हें प्रसिद्ध असल्यामुळें हें त्याचें म्हणणें मनापासूनचें असलें पाहिजे, आणि तो त्यावर आक्षेप काढीत नाहीं ही गोष्ट समाधानकारक मानण्यास हरकत नाहीं. प्रोफेसर फोर्बिस ह्या विषयांत कदाचित् ओवेनच्या खालोखाल असून तो म्हणतो कीं, 'मला वाटतें ह्या क्लृप्तीस कांहीं आधार आहेत.' तो सावध स्काचमन असल्यामुळें बहुधा तो म्हणतो त्याहून त्याच्या मनांतील अर्थ ज्यास्त असावा."

ता० २८ मे रोजीं तो पुनः लिहितो:—"प्रोफेसर फॉर्बिसची व माझी गांठ रविवारीं पडली. त्यानें मला सांगितलें कीं, मीं लोकसंख्येवरील लेख दोनदां वाचिला आणि तिसऱ्यानें वाचण्याच्या बेतांत आहें. तो म्हणाला, माझ्या मनांत त्याच्यासंबंधानें तुझ्याशीं कांहीं बोलावयाचें आहे."

'लीडर'पत्रांत ह्या लेखावर ल्युइसचा एक अभिप्राय आला, आणि त्यावरून ल्युइस व स्पेन्सर ह्यांजमध्यें कांहीं गैरसमज उत्पन्न झाला. आपले विचार आपले स्वताचेच आहेत ह्याबद्दल कोणीं शंका घेतल्यास स्पेन्सरला तें किती खपत नसे ह्याचें पहिलें उदाहरण ह्या प्रसंगीं त्या दोघांमध्यें जो पत्रव्यवहार झाला त्यावरून दिसून येतें. वरील लेखांत ल्युइसनें अशी कांहीं भाषा वापरली होती कीं, तिजवरून स्पेन्सरला असें वाटलें कीं जे लोक तो लेख वाचतील त्यांचा त्यावरून असा समज होईल कीं, त्या विषयावरील ल्युइच्या कल्पना त्यास स्पेन्सरपासून प्राप्त झाल्या नसून त्या ल्युइसनें स्वतः प्रथम शोधून काढिल्या आहेत. स्पेन्सरनें त्या प्रथम शोधून काढिल्याचें आपण कबूल केलें नाहीं अशी त्याची कल्पना झालेली

पाहून ल्युइस यास वाईट वाटलें. पण हा गैरसमज स्पेन्सरचें समाधान होईल अशा रीतीनें त्यानें दूर केला, आणि म्हणून त्यांच्या स्नेहांत तेणेंकरून कमीपणा आला नाहीं. ह्या लेखाच्या योगानें स्पेन्सरनें एक नवा स्नेही (हक्स्ले) जोडिला हें आधीं सांगितलेंच आहे. त्या संबंधाची पहिली चिठी स्पेन्सरनें ता० २९सपटंबर १८९२ रोजीं त्यास लिहिली होती; आणि तिच्या संबंधानें पुढें चाळीस वर्षांनंतर हक्स्ले त्यास असें म्हणाला कीं, ती चिठी तूं पाठविलेल्या एकंदर चिठ्यांमध्यें अत्यन्त सभ्यपणाची होती. अशा रीतीनें त्याचा हक्स्लेशीं स्नेह जमल्यावर पुढच्या वर्षीं हक्स्लेनें त्याची टिंडालशीं ओळख करून दिली.

' सहल आणि संभाषण ' ह्या मथळ्याखालीं ' लीडर ' पत्रांत कांहीं लेख लिहिण्याचें त्यानें मनांत आणिलें; त्यांत जे विचार त्याच्या मनांत आज पुष्कळ दिवस घोळत होते ते प्रदर्शित करण्याचा त्याचा बेत होता. ते लेख " हेनॉर्थ पेपरस् " ह्या नांवानें त्याच्या सहीखेरीज त्या पत्रांत प्रसिद्ध होऊं लागले. सही न देण्याचें कारण तें पत्र सोश्यालिस्ट होतें, तेव्हां त्याच्याशीं आपला संबंध प्रसिद्धपणें असूं नये असें त्यांस वाटलें हें होय. या लेखांपकीं पहिला "उपयोग आणि सौंदर्य " या विषयावर ता० ३ जानेवारी १८९२ रोजीं प्रसिद्ध झाला. दुसरा, ' वाढीची क्लृप्ति ' हा ता० २० मार्च रोजीं प्रसिद्ध झाला. तो कित्येक वर्षांच्या विचारव्यापाराचें फल होता. त्यासंबंधानें ता० २९ मार्च १८९२ रोजीं तो बापास लिहितो:—" हेनॉर्थ पेपर नंबर २ यानें बरीच चळवळ उडवून दिली आहे. त्याजबद्दल पुष्कळ लोक माझें अभिनंदन करीत आहेत. तो लेख ज्या अंकांत आला त्या अंकाच्या प्रती, ओवेन, लायेल, सेजविक इत्यादिकांना पाठविल्या आहेत. ' रीझनर ' पत्रांत तो पुनः छापण्याबद्दल माझी परवानगी मागण्यांत आली आहे;

आणि रॉबर्ट चेम्बर्स यानें ल्युइसशीं त्याची वाखाणणी करून असें म्हटलें कीं, माझ्या मनांत त्यासंबंधानें लायेलला लिहावयाचें आहे. अशीच स्थिति राहिल्यास माझ्या लेखांना मागणी वाढत जाण्याचा संभव आहे."

ह्या मागणीचा पुरवठा करण्याकरितां तो आंग मोडून काम करूं लागला. त्यामुळें त्यावर्षीं " अश्रु व हास्य एतद्विषयक एक क्लप्ति " " बांधकामाच्या नमुन्यांचे उगम " " शोभिवंतपणा " हे लेख प्रसिद्ध झाले, आणि पुढच्या वर्षाच्या जून–जुलईंत " पुराव्याची किंमत ठरविणें " ह्या विषयावरील त्याचा लेख प्रसिद्ध झाला.

स्पष्ट आणि जोरदार भाषासरणीचें महत्त्व त्याचा बाप त्याच्या मनावर वेळींअवेळीं ठसवीतच होता, आणि त्या विषयावरील याचीं टिपणें आज कित्येक वर्षें जमत चाललीं होतीं. म्हणून तो १८५२ च्या आगस्टांत त्या विषयावर एक निबंध तयार करूं लागला. त्या-संबंधानें ता० १ आक्टोबर १८५२ रोजीं तो बापास लिहितोः— " या निबंधास मी ' भाषासरणीची मीमांसा ' असें नांव दिलें आहे. तो चांगला वठला आहे, पण जरा फाजील शास्त्रीय आहे. मूळच्या निबंधाची तुला आठवण असेल तर त्याच्यापेक्षां हा फार चांगला वठला आहे असें तुला आढळून येईल. "

त्याचसंबंधानें ता० २० आक्टोबर रोजीं तो लिहितोः—" या निबंधाची वर्तमानपत्रांतून आणखी खाजगीरीतीनेंहि बरीच स्तुति होत आहे......... मी जेव्हां पुढें तो इतर ' निबंध व टीकात्मक लेख ' यांबरोबर पुनः छापीन तेव्हां बहुधा बराच विस्तृत करीन. मी जे जे निबंध लिहितों ते मी अशा भरीव रीतीचे लिहीत आहें कीं, ते पुनः छापण्याच्या योग्यतेचे व्हावे; आणि माझें नांव हळूहळू ज्या पदवीस चढावयाचें आहे त्या पदवीस चढलें म्हणजे अशा पुनः प्रकाशनाचा खर्च निघून येईल.

त्याची ह्या निबंधाबद्दल खाजगी रीतीनें स्तुति करणारांपैकीं एडिंबरोचा आलेक्झांडर स्मिथ हा एक होता; त्याचें नांव त्या निबंधांत आल्यामुळें त्यास सामाधान वाटलें होतें, आणि स्पेन्सरनें त्यास लिहिलें तोंपावेतों त्याचा लेखक कोण हें त्यास माहीत नव्हतें. त्यासंबंधानें स्पेन्सर एडवर्ड लॉट यास ता० १० सपटंबर १८५२ रोजीं लिहितो:—" मी डार्बी एथें जेव्हां नुक्ताच आलों होतों तेव्हां आलेक्झांडर स्मिथ याचें नांव तुला सांगितलें काय ? मला तो निःसंशय प्रस्तुत काळचा पहिला कवि वाटतो. तो जरी स्कॉचमन आहे (आणि त्या जातीच्या संबंधानें माझ्या मनांत विशेष आदरबुद्धि आहे असें नाहीं) तरी माझ्या मनाचा असा जोराचा कल झाला आहे कीं, शेक्सपियरच्या नंतरचा सर्वांत मोठा कवि तोच आहे. पुनःपुनः आनंदानें मी कविता वाचितों अशी त्याचीच होय. "

ता० ३ सपटंबर १८५१ रोजीं बापास लिहिलेल्या एका पत्रांत आपल्या एका नव्या व्यासंगाचा त्यानें उल्लेख केला. कारण त्यांत त्यानें असें म्हटलें कीं " आलीकडे मी अध्यात्मज्ञानाकडे बरेंच लक्ष्य देत आहें, आणि मला वाटतें, मी त्याच्या संबंधानें एक नवीन शोध लाविला आहे." या 'नवीन शोधा' संबंधाचा पुढील उद्योग बहुधा 'हेथार्न पेपर्स' हे निबंध, आणि लोकसंख्येवरील लेख, हे लिहिण्यांत तो गुंतल्यामुळें तितकाच राहिला होता. पण ता० १२ मार्च १८५२ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत त्यासंबंधानें तो म्हणतो:—" मी तो शोध प्रसिद्ध करून चळवळच उडवून देणार आहें. " हें करण्यास वेळ मिळाला म्हणून 'इकॉनॉमिस्ट'वरील आपली नोकरी सोडून द्यावी आणि पगाराचें होणारें नुकसान 'क्वार्टर्ली रिव्ह्यू' स लिहून भरून काढावें, असे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. पण त्याच्या आईनें, 'काय करशील तें सावधगिरीनें कर' म्हणून त्यास सुचविलें. तेव्हां त्यासंबंधानें तो तीस ता० २७ आ-

क्टोबर १८९२ रोजीं लिहितो:—" ज्या माझ्या विचारानें तूं घाबरल्यासारखी दिसतेस तो विचार अमलांत आणणें सुरक्षित आहेसें वाटल्याशिवाय तो मी अमलांत आणीन अशी शंका तूं मनांत आणूं नकोस..... असें करण्यांत धोका आहे असा जो तूं आक्षेप घेतेस तो प्रत्येक नव्या गोष्टीविरुद्ध घेतां येईल..... पण आपली स्थिति बदलणें योग्य आहे अशी खात्री करून घेतल्याशिवाय मी तसें करणार नाहीं अशी तुझी खातरजमा असूं दे."

'वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू' च्या १८९२ च्या एप्रिलच्या अंकांत चापमननें "वाङ्मयाचा" म्हणून एक निबंध लिहिल्यामुळें ग्रंथविक्रयाच्या संबंधानें जी चळवळ सुरू झाली तिच्यांत त्यानें मनःपूर्वक लक्ष घातलें. ता० ९ एप्रिलच्या 'टाइम्स' मध्यें 'एक ग्रंथकार' ह्या सहीनें पत्र लिहून त्यांत 'सोश्यल स्टॅटिक्स' ग्रंथाच्या प्रकाशनाच्या व विक्रीच्या संबंधानें आपला अनुभव त्यानें सांगितला. या चळवळींत पुस्तकविक्यांच्या सभेला यश आलें नाहीं. १८९३ सालीं ज्ञानावरील (छापण्याच्या कागदावरील वगैरे) कर काढून टाकण्याच्या खटपटीसाठीं स्थापिलेल्या सभेस तो जाऊन मिळाला.

१८९२ सालीं आणि १८९३ च्या पहिल्या सहामाहींत त्याचा बाप आजारी होता, आणि त्याचा चुलता टॉमस आजारी पडून मेला; तरी त्या मुदतींत त्यानें बरेंच काम केलें याचें आश्चर्य वाटतें. तो बापास व चुलत्यास बेताबाहेर त्रास न करण्याबद्दल वरचेवर लिहीत असे, पण फुकट. चुलत्याच्या आजारांत त्यास वरचेवर त्याच्याकडे जावें लागे; त्याबद्दल त्याच्या चुलतीस फार कृतज्ञता वाटली. चुलत्याच्या मृत्यूबद्दल त्यास फार वाईट वाटलें.

त्याच्या चुलत्यानें आपल्या मृत्युपत्रांत त्यास व बायकोस त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास नेमिलें होतें. हें काम त्याच्यावरच मुख्यतः पडलें, व तें त्यानें त्वरित व सुज्ञपणें केल्याबद्दल त्याच्या

त्याची ह्या निबंधाबद्दल खाजगी रीतीनें स्तुति करणारांपैकीं एडिंबरोचा आलेक्झांडर स्मिथ हा एक होता; त्याचें नांव त्या निबंधांत आल्यामुळें त्यास सामाधान वाटलें होतें, आणि स्पेन्सरनें त्यास लिहिलें तोंपावेतों त्याचा लेखक कोण हें त्यास माहीत नव्हतें. त्यासंबंधानें स्पेन्सर एडवर्ड लॉट यास ता० १० सपटंबर १८९२ रोजीं लिहितोः—" मी डार्बी एथें जेव्हां नुक्ताच आलों होतों तेव्हां आलेक्झांडर स्मिथ याचें नांव तुला सांगितलें काय ? मला तो निःसंशय प्रस्तुत काळचा पहिला कवि वाटतो. तो जरी स्कॉचमन आहे (आणि त्या जातीच्या संबंधानें माझ्या मनांत विशेष आदरबुद्धि आहे असें नाहीं) तरी माझ्या मनाचा असा जोराचा कल झाला आहे कीं, शेक्सपियरच्या नंतरचा सर्वांत मोठा कवि तोच आहे. पुनःपुनः आनंदानें मी कविता वाचितों अशी त्याचीच होय. "

ता० ३ सपटंबर १८९१ रोजीं बापास लिहिलेल्या एका पत्रांत आपल्या एका नव्या व्यासंगाचा त्यानें उल्लेख केला. कारण त्यांत त्यानें असें म्हटलें कीं " आलीकडे मी अध्यात्मज्ञानाकडे बरेंच लक्ष्य देत आहें, आणि मला वाटतें, मी त्याच्या संबंधानें एक नवीन शोध लाविला आहे. " या ' नवीन शोधा ' संबंधाचा पुढील उद्योग बहुधा ' हेथार्न पेपर्स ' हे निबंध, आणि लोकसंख्येवरील लेख, हे लिहिण्यांत तो गुंतल्यामुळें तितकाच राहिला होता. पण ता० १२ मार्च १८९२ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत त्यासंबंधानें तो म्हणतोः—" मी तो शोध प्रसिद्ध करून चळवळच उडवून देणार आहें. " हें करण्यास वेळ मिळाला म्हणून ' इकॉनॉमिस्ट'वरील आपली नोकरी सोडून द्यावी आणि पगाराचें होणारें नुकसान ' क्वार्टर्ली रिव्ह्यू' स लिहून भरून काढावें, असे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. पण त्याच्या आईनें, ' काय करशील तें सावधगिरीनें कर ' म्हणून त्यास सुचविलें. तेव्हां त्यासंबंधानें तो तीस ता० २७ आ-

क्टोबर १८९२ रोजीं लिहितोः—" ज्या माझ्या विचारानें तूं घाबरल्यासारखी दिसतेस तो विचार अमलांत आणणें सुरक्षित आहेसें वाटल्याशिवाय तो मी अमलांत आणीन अशी शंका तूं मनांत आणूं नकोस..... असें करण्यांत धोका आहे असा जो तूं आक्षेप घेतेस तो प्रत्येक नव्या गोष्टीविरुद्ध घेतां येईल..... पण आपली स्थिति बदलणें योग्य आहे अशी खात्री करून घेतल्याशिवाय मी तसें करणार नाहीं अशी तुझी खातरजमा असूं दे. "

'वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू' च्या १८९२ च्या एप्रिलच्या अंकांत चापमननें " वाङ्मयाचा " म्हणून एक निबंध लिहिल्यामुळें ग्रंथविक्रयाच्या संबंधानें जी चळवळ सुरू झाली तिच्यांत त्यानें मनःपूर्वक लक्ष घातलें. ता० ९ एप्रिलच्या 'टाइम्स' मध्यें 'एक ग्रंथकार' ह्या सहीनें पत्र लिहून त्यांत 'सोश्यल स्टॅटिक्स' ग्रंथाच्या प्रकाशनाच्या व विक्रीच्या संबंधानें आपला अनुभव त्यानें सांगितला. या चळवळींत पुस्तकविक्यांच्या सभेला यश आलें नाहीं. १८९३ सालीं ज्ञानावरील (छापण्याच्या कागदावरील वगैरे) कर काढून टाकण्याच्या खटपटीसाठीं स्थापिलेल्या सभेस तो जाऊन मिळाला.

१८९२ सालीं आणि १८९३ च्या पहिल्या सहामाहींत त्याचा बाप आजारी होता, आणि त्याचा चुलता टॉमस आजारी पडून मेला; तरी त्या मुदतींत त्यानें बरेंच काम केलें याचें आश्चर्य वाटतें. तो बापास व चुलत्यास बेताबाहेर त्रास न करण्याबद्दल वरचेवर लिहीत असे, पण फुकट. चुलत्याच्या आजारांत त्यास वरचेवर त्याच्याकडे जावें लागे; त्याबद्दल त्याच्या चुलतीस फार कृतज्ञता वाटली. चुलत्याच्या मृत्यूबद्दल त्यास फार वाईट वाटलें.

त्याच्या चुलत्यानें आपल्या मृत्युपत्रांत त्यास व बायकोस त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास नेमिलें होतें. हें काम त्याच्यावरच मुख्यतः पडलें, व तें त्यानें त्वरित व सुज्ञपणें केल्याबद्दल त्याच्या

चुलतीस समाधान वाटलें. चुलत्यानें त्यास त्याच्या बापास आणि आपला दुसरा भाऊ विलियम यास देणग्या द्यावयास सांगितलें होतें. या सर्व बाबतींत त्यानें कोणाचेंहि मन दुखविलें नाहीं. एका बाबतींत मात्र त्याचा व त्याच्या चुलतीचा मतभेद झाला. तो त्याच्या चुलत्याच्या निधनलेखासंबंधानें होय. त्याच्या मनांत त्यांत त्याचे गुण व दोष दोन्ही दाखवावे असें होतें. चुलतीस तें पसंत पडलें नाहीं. तिला स्तुति तेवढी पाहिजे होती.

आतां त्याच्या मनांत लवकरच ‘ इकॉनॉमिस्ट ’ पत्रावरील जागा सोडावयाची असल्यामुळें त्यानें ‘ सार्वत्रिक गृहीत गोष्ट ’ या विषयावरील आपला निबंध पुरा केला, आणि “ फाजील कायदेकानू ” या विषयावर एक निबंध रेखाटिला. त्यासंबंधानें ता० २८ एप्रिल १८९३ रोजीं तो बापास लिहितो—“ मी ‘ फाजील कायदेकानू ’ वरील आपला निबंध तयार करण्यांत गुंतलों आहें, व त्यांपैकीं दोनतृतीयांश पुरा झाला आहे. ‘ नार्थ ब्रिटिश रिव्ह्यू ’ च्या संपादकाकडे घेऊन जाण्याकरितां कोणाकडून तरी परिचय–पत्रिका मिळविण्याच्या बेतांत मी आहें, म्हणजे इकॉनॉमिस्टशीं माझा संबंध तुटेल त्या सुमारास त्या मासिकाकरितां एक निबंध तयार करण्यास ठीक पडेल. ”

ता० १७ मे रोजीं तो लिहितो:–“ मी लिहिण्यांत फारच गुंतलेला आहें.....ह्याचें कारण हें कीं, ‘ फाजील कायदेकानू ’वरील, आणि ‘ सार्वत्रिक गोष्टीं’ वरील दोन्ही लेख “ वेस्टमिन्स्टर रिव्ह्यूंत ” प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. पहिला लिहून झाला असून छापखान्याकडे जात आहे. तो बऱ्याच लोकांस पसंत होत आहे. दुसरा अत्यन्त समाधानकारक रीतीनें तयार होत आहे. ”

ता० २४ मे रोजीं तो लिहितो:–“मी आपली स्थिति बदलीत आहें ह्याबद्दल तुला मुळींच धास्ती वाटावयास नको. पुढच्या ‘ वेस्ट-

मिन्स्टर रिव्ह्यू ' त येणारे माझे दोन निबंध, आणि त्याशिवाय मीं लिहिलें आहे तें सर्व, यास पुरेशी मागणी येईल याबद्दल मला संशय वाटत नाहीं. मॅसन हा 'नार्थब्रिटिश' मध्यें मुख्य लेखकांपैकीं एक असून त्याच्यापासून जी चिठी मीं या पत्राबरोबर पाठविलेली घेतली आहे तिजवरून त्या मासिकांत माझे लेख येण्याची व्यवस्था मीं केली आहेसें तुला दिसून येईल..... 'वेस्टमिन्स्टर' चा पुढील अंक प्रसिद्ध झाल्याबरोबर, एडिंबरो रिव्ह्यूचा संपादक कॉर्नेवाल ल्युइस याच्याकडे नेण्यास एक परिचय-पत्र मी मिळविणार आहें."

ता० ७ जून रोजीं तो लिहितो:—" नॉर्थब्रिटिशच्या संपादकास आतांच मी लिहीत आहें, आणि त्यास पांच निबंधांचीं नांवें देऊन त्यांपैकीं पाहिजे ते पसंत करण्यास सांगितलें आहे. 'सार्वत्रिक गृहीत गोष्टीं' वरील माझा निबंध दोनतृतीयांश पुरा झाला आहे, व तो माझ्या मतें उत्तम वठला आहे."

ता० १९ जून रोजीं तो लिहितो:—" सार्वत्रिक गृहीत गोष्टी' वरील निबंध 'वेस्टमिन्स्टर' च्या पुढच्या अंकांत अखेरीस येत नाहींच. संपादकीय कारणांवरून तो त्याच्या पुढच्या अंकांत घेण्याचें तहकूब ठेवणें संपादकास जरूर पडलें आहे. तथापि तो टाइपांत एकदम घालण्याचा चापमन विचार करीत आहे, अशासाठीं कीं, मुख्य मुख्य तत्त्ववेत्त्यांकडे त्याचे प्रूफशीट मला एकदम पाठवितां यावे."

'फाजील कायदेकानू' वरील निबंध 'वेस्टमिन्स्टर' च्या जुलै १८९३ च्या अंकांत प्रसिद्ध झाला. त्याच महिन्यांत त्यानें आपला 'इकॉनॉमिस्ट' शीं असलेला संबंध तोडिला.

प्रकरण सातवें

—:०:—

एक नवीन मानसशास्त्र

त्याच्या मृत चुलत्याकडून त्यास ५०० पौंडांची देणगी मिळाल्यामुळें, इकॉनॉमिस्ट पत्राशीं त्याचा संबंध तुटलेला असल्यामुळें, आणि त्याच्या प्रकृतीस बरें वाटत नसल्यामुळें, ल्युइस व लॉट यांजबरोबर स्वित्सर्लंदांत हवा खाण्यास जाण्याचा त्यानें निश्चय केला. तो स्टँडिश एथें पॉटर याच्याकडे प्रथमच कांहीं दिवस रहावयास गेला असतां तेथून आईस लिहितो:—" माझी खात्री आहे कीं, मी एथून निघण्यापूर्वीं अगदीं बरा होऊन जाईन, आणि स्वित्सर्लंदांत जाऊन आल्यानें तर मला पूर्वीपेक्षांहि ज्यास्त शक्ति येईल. स्वित्सर्लंदांत मी आपला जीव धोक्यांत घालीन किंवा श्रमातिरेक करीन अशी भीति तूं मनांत बाळगूं नको; मी त्या बाबतींत फारच सावध आहें. "

' सार्वत्रिक गृहीत गोष्टीं ' वरील निबंधाबरोबर योजिलेल्या निबंधांची यादी, ' नॉर्थ ब्रिटिश रिव्ह्यू ' च्या संपादकास त्यानें पाठविली होती म्हणून मागील प्रकरणांत सांगितलें; त्यासंबंधानें ता० २९ जुलै १८५३ रोजीं तो त्यास लिहितो:—" तुझ्या लिहिण्याच्या झोंकावरून " शिक्षणविषयक पद्धति " यावरील निबंध तुला सर्वांत पसंत पडेल असें दिसतें, आणि माझीहि तोच लिहिण्याची सर्वांत ज्यास्त तयारी आहे..... म्हणून मी तुझ्या फेब्रुवारीच्या अंकासाठीं तो तयार करण्याच्या बेतांत आहे. "

त्याच संबंधानें ता० ३० जुलई रोजीं तो त्यास लिहितो:—

" आणखी एकदां निबंध लिहिण्याच्या विचारांत मी आहें कीं काय म्हणून तूं विचारितोस.... तसा निबंध मी ' विधायक तत्त्वज्ञान ' या विषयावर लिहिण्याचा विचार करीत आहें. काम्टेच्या त्या विषयावरील ग्रंथाचें मिस मार्टिनोचें भाषान्तर नाताळच्या सुमारास बहुधा बाहेर पडेल. आणि त्याच्या तात्त्विक मतसरणीच्या विरुद्ध मला बरेंच म्हणावयाचें असल्यामुळें या भाषान्तरावर अभिप्रायात्मक लेख लिहिण्याची माझी फार इच्छा आहे. "

त्याच दिवशीं तो आपल्या बापास लिहितो:—" वेस्टमिन्स्टर रिव्ह्यूला " रीतिरिवाज " या विषयावर निबंध लिहून पाठविण्याचें मीं कबूल केलें आहे. शिवाय, ' लीडर ' पत्राच्या मालकानें ' हेथॉर्न पेपर्स ' या मथाळ्याखालीं आणखी कांहीं लेख लिहिण्याचा गेल्या थोड्या दिवसांत दोनदां मला आग्रह केला आहे. एवंच मला करावयास पाहिजे तितकें काम सध्या आहे, आणि तें सर्व मींच निवडलेल्या विषयांवर आहे. म्हणून केवळ पैशासाठीं मजूर--लेखक मी बनेन अशी भीति नको. "

ल्युइस त्याच्या बरोबर येण्यास समर्थ नसल्यामुळें, आणि लॉटयास निवण्यास विलंब असल्यामुळें, तो स्वित्सर्लंदास जाण्यास ता० १ आगस्ट रोजीं एकटाच निघाला. तेथें गेल्यावर ता० १२ आगस्ट (१८५३) रोजीं झूरिच एथून तो लिहितो:—" आंटवर्प एथें मला थोडे तासांची फुरसत होती, ती मीं तेथील देवळें पाहण्यांत घालविली.... कलोन एथील देवळाचा बाह्य भाग मला फारच पसंत वाटतो, आणि तें देऊळ बांधून पुरें झालें म्हणजे गॉथिक शिल्पाचा सर्व जगांत तो एक अद्वितीय नमुना बनणार आहे. तथापि त्याचा आंतील भाग मला इतका पसंत वाटत नाहीं, मात्र तो आकारानें

मोठा असल्यामुळें भव्य दिसतो. आंतील शिल्प काम बाहेरच्या सारखें मुळींच नाहीं, आणि त्यांत निरनिराळ्या रंगांचीं भूषणें भरल्यानें तो अगदींच बिघडला आहे.... फ्रांकफर्ट शहर फार वाखाणण्यासारखें आहे. तेथील घरें सुंदर आहेत, रस्ते चांगले बांधलेले व स्वच्छ आहेत, आणि प्रत्येक वस्तु चित्ताकर्षक दिसते. एकंदरींत हीं इकडच्या देशांतील शहरें पाहून आमच्या शहरांची मला फार लाज वाटते....खरोखरच, आह्मी आपल्या श्रेष्ठत्वाबद्दल जी बढाई मारितों तिच्याबद्दल मला बऱ्याच बाबतींत संशय येऊं लागला आहे."

रंगांच्या संबंधानें त्यास स्वित्झर्लंद देश स्काटलंदपेक्षां कमी योग्यतेचा वाटला. यासंबंधानें तो पॉटर यास लिहितोः—" लॉकलॉमंडकडे चढून जात असतां त्या सरोवराच्या वरच्या भागाकडील पर्वतांवर दिसणाऱ्या चकचकीत पिंवळ्या, तांबड्या व निळ्या रंगाचा सुंदर समुदाय पाहून आश्चर्यानें थक्क झाल्याचें मला आठवतें. तशा प्रकारचें स्वित्झर्लंदांत मला कांहीं दिसलें नाहीं."

तेथें त्याच्या प्रकृतीस कसा काय फायदा वाटला या संबंधानें परत आल्यावर तो लिहितोः—" तेथें असतांना मला आशा होती तितका जरी मला फायदा झाला नाहीं, डोंगरावरील हवेनें मला जरी उत्साह वाटला नाहीं—व हें पाहून मला आश्चर्य वाटलें—तरी माझ्या प्रकृतींत झालेला बदल बहुधा फायदेशीर होईल असें मला वाटतें." हा त्याचा अंदाज अगदीं चुकीचा ठरला. त्याचें काळीज त्यास त्रास देऊं लागलें. ह्याचें कारण श्रमातिरेक होय असें जें त्याचें मत तें बरोबर दिसतें; कारण ज्यास संवय नाहीं त्यास डोंगर चढणें फार जड जातें असा तज्ज्ञ लोकांचा अनुभव आहे. त्यासंबंधानें लॉट ह्यालाहि तसाच अनुभव आला.

आक्टोबरमध्यें तो बापास लिहितोः—" मानसशास्त्रांत मी आणखी महत्त्वाचे शोध लावीत आहें, आणि टिपणें करीत आहें.

त्यावरील ग्रंथास केव्हां सुरवात करीन असें मला झालें आहे. " पण तो ग्रंथ हातांत घेण्यापूर्वीं अगोदर कबूल केलेले लेख लिहून देणें त्यास भाग होतें. म्हणून नव्हेंबरमध्यें घरीं गेला असतां शिक्षणावरील लेख तयार करण्यांत तो फार राबला. तेथून परत आल्यावर " रीतिरिवाज " हा लेख तयार करण्यास तो लागला. ' देवाला मनुष्याचे गुण लावण्याच्या प्रवृत्तीचा उपयोग ' हा लेख ता० ५ नवंबरच्या ' लीडर'मध्यें आला. दुसरा ' शरीरसौंदर्या'वरील पूर्वार्ध पुढच्या एप्रिलच्या ता० १९ च्या अंकांत आला, आणि त्याचाच उत्तरार्ध ता० १३ मेच्या अंकांत आला. ' मानसशास्त्रा' स सुरवात करण्यापूर्वीं आणखी दोन लेख त्यास लिहावयाचे होते. त्यांपैकीं एक कॉम्टेवरील होता. त्यासंबंधानें स्वित्सर्लंदास जाण्यापूर्वीं ' नॉर्थब्रिटिश' चा संपादक फ्रेझर यास वचन दिल्याप्रमाणें त्या लेखाचा रेखाटा अगोदर पाठविण्यास तो तयार झाला. त्यासंबंधानें ता० २६ जानेवारी १८५४ रोजीं तो त्यास लिहितो:—" कॉम्टेवरील लेखांत त्याच्या मताच्या धर्मविषयक स्वरूपाचा कांहींच संबंध यावयाचा नाहीं; तो केवळ शास्त्रीय असेल. मी त्यास ' शास्त्राची जनिति ' हें नांव योजिलें आहे. प्रथम त्यांत सामान्य ज्ञानाशीं शास्त्राच्या संबंधांचा विचार केला जाईल, आणि त्यांत काम्टेनें ध्यानांत न घेतलेल्या एका महत्त्वाच्या लक्षणाचा समावेश होईल; नंतर त्याच्या मांडणींतलि असंबद्ध प्रकार दाखविले जातील, आणि असें सिद्ध केलें जाईल कीं, गोळा केलेल्या सामुग्रीवरूनच त्यानें बसविलेल्या क्लृप्तीच्या अगदीं उलट क्लृप्ति बसवितां येण्यासारखी आहे; नंतर शास्त्राचें सांखळीच्या रूपानें वर्गीकरण करण्याचा यत्न करणें मुळांतच सदोष आहे, तसें वर्गीकरण अगदीं अशक्य आहे, असें दर्शविलें जाईल; आणि शेवटीं मला शास्त्रांच्या उत्क्रमणाची जी वास्तविक सरणी म्हणून वाटते तिचा, कांहीं अंशीं मानसशास्त्रीय आणि कांहीं अंशीं

ऐतिहासिक असा; रेखाटा दिला जाईल. ह्या मथळ्यांच्याखालीं मी त्या विषयाचीं कच्चीं टिपणें लवकरच करणार आहें. मला भीति वाटते कीं, स्वच्छताविषयक प्रश्नावर मी जें लिहिणार आहें त्यास 'नॉर्थब्रिटिश'मध्यें स्थान मिळणार नाहीं. गेल्या जुलैच्या वेस्टमिन्स्टरमध्यें आलेल्या फाजील कायदेकानूवरील माझ्या लेखाच्या धोरणावरच तो बनणार आहे. मी त्यांत असें दाखविण्याचा यत्न करणार आहें कीं, ज्या पुराव्याच्या आधारावर स्वच्छताविषयक चळवळ्ये ज्यास्त कायदे मागत आहेत, तो अगदीं बनावट व एकपक्षीय आहे, आणि मृत्युसंख्येच्या स्थानिक आंकड्यांवरून त्यांनीं काढिलेलीं पुष्कळ अनुमानें अगदीं चुकीचीं आहेत. ज्या दुर्व्यवस्थांविरुद्ध ते सर्वांत ज्यास्त ओरड करीत आहेत त्यांपैकीं पुष्कळ दुर्व्यवस्था पूर्वींच्या कायद्यांपासूनच उत्पन्न झालेल्या आहेत, आणि हल्लीं होऊं घातलेले कायदे निःसंशय तसल्याच आपत्ती उत्पन्न करितील. शिवाय मी असें दाखविणार आहे कीं, ज्या संस्थांनीं आमच्या शहरांची गटारपद्धति वगैरे हल्लींच्या स्थितीस आणिलेली आहे, त्याच संस्था कायद्यांचे अडथळे काढून टाकिल्यास, जरूर त्या सुधारणा घडवून आणितील; इत्यादि, इत्यादि."

ता० २८ जानेवारी रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—"काम्टेवरील लेखाच्या पहिल्या किंवा संहारक भागाचा रेखाटा ह्या पत्राबरोबर पाठवीत आहें. त्याच्या दुसऱ्या किंवा घटनात्मक भागाचा रेखाटा देऊन त्याचें निदर्शन व्हावयाचें नाहीं."

स्पेन्सरनें काम्टेवर लेख लिहितों म्हणण्यापूर्वींच दुसऱ्या एकानें त्याच्यावर लिहिलेला लेख 'नॉर्थब्रिटिश' च्या त्याच अंकांत आल्यामुळें ह्याचा लेख त्यांत घेतला नाहीं. पण तो 'ब्रिटिश कार्टर्ली' मध्यें आला.

आगस्टच्या प्रारंभीं त्यानें लंदन सोडिलें. तेव्हां त्याचा बेत

असा होता कीं, कांहीं महिने फ्रान्सच्या किनाऱ्यावर राहून पुढें हिंवाळ्यांत पारिसमध्यें रहावयास जावयाचें, आणि तेथें मानसशास्त्रावरील ग्रंथ लिहावयाचा. पण ट्रेपोर्ट एथें एक महिनाच राहून तो पारिसला गेला, आणि तेथें अद्यापि उन्हाळाच असल्यामुळें आणखी एक आठवडा ट्रेपोर्ट येथें न राहिल्याबद्दल त्यास पश्चात्ताप झाला. मानसशास्त्रासंबधानें तो म्हणतो:—"माझ्या 'मानसशास्त्रा'ची प्रगति फार छानदार रीतीनें चालली आहे, आणि जसजसा मी पुढें जात आहें तसतसें त्या विषयास ज्यास्त ज्यास्त पूर्ण स्वरूप येत आहे. वेळोवेळीं नवे शोध मी करीतच आहें, आणि ते इतर शोधांनीं सुसंगत असून त्यांस दुजोरा देत आहेत. त्यासंबधानें माझें खाजगी मत असें आहे कीं, अखेरीस तो ग्रंथ न्यूटनच्या 'प्रिन्सिपिया' ग्रंथाच्या तोडीचा होईल." हें मत जरा धाष्टर्याचेंच आहे असें त्यास वाटलें असलें पाहिजे, कारण पुढें बारा दिवसांनीं तो आपल्या बापास लिहितो कीं, "ही गोष्ट कोणास न सांगणें बरें, कारण लोक अहंमन्यतेचा आरोप मजवर आणितील." पारिसची हवा फार कडक असल्यामुळें आणि तेथें मजा कांहींच नसल्यामुळें सपटंबरच्या १९ तारखेच्या सुमारास तो तेथून निघून जेरेसी एथें गेला; तें बेट त्याला सुखकर वाटलें, पण तेथील जेवण त्यास आवडलें नाहीं. म्हणून तो आक्टोबरच्या प्रारंभींच ब्रायटन एथें आला. तेथें समुद्रापासून कांहीं अंतरावर उंचावरची जागा रहावयास घेऊन आपलें ग्रंथलेखन चालवण्याचा त्याचा बेत होता. पण त्या महिन्याच्या एकोणिसाव्या तारखेस हिंवाळा लंदनांत घालवण्याच्या बेतानें तो तेथें आला.

"आगगाडीवाल्यांची नीति आणि त्यांचें धोरण" ह्या विषयावरील त्याचा लेख १८५४ च्या आक्टोबरच्या 'एडिंबरो रिव्ह्यू' च्या अंकांत प्रसिद्ध झाला. त्यासंबधानें ता० २४ आक्टोबर १८५४ रोजीं तो बापास लिहितो:—"आगगाड्यांवरील माझा लेख अ-

गर्दी छान वठला आहे. ह्या आठवड्याच्या ' इकॉनॉमिस्ट ' व ' स्पेक्टेटर ' पत्रांत त्याच्यावर अग्रलेख आलेले असून, त्यांत मीं प्रतिपादिलेलें तत्त्व त्यांस पसंत पडलें आहे, आणि आगगाड्यांच्या संबंधाच्या कायद्यांत सुधारणा केली पाहिजे असें तीं पत्रें सुचवीत आहेत.....' रेलवे टाइम्स ' देखील असें जाहीर करितो कीं, आपण त्यांतील आणखी उतारे देणार आहों. ह्यावरून सार्वजनिक दृष्ट्या, ह्या निबंधाचा कांहीं परिणाम होईलसें दिसतें; आणि खाजगी दृष्टीनें, त्यावरून एडिंबरोरिव्ह्यूशीं माझें चांगलें बस्तान बसेलसें दिसतें."

ता० १९ नवंबर रोजीं तो लिहितोः—' सार्वत्रिक गृहीत गोष्टी ' ह्या निबंधास माझ्या मानसशास्त्राचा पहिला भाग ' सामान्य विवरण ' ह्याचें स्वरूप यावें एतदर्थ त्यांत योग्य ती भर घालून त्याचे योग्य ते भाग पाडण्यांत हल्लीं मी गुंतलों आहें. मी तो ज्यास्त स्पष्ट व जोरदार केला आहे, आणि त्याच्याविरुद्ध घेतलेल्या आक्षेपांचें त्यांत निरसन केलें आहे.

ता० ११ मार्च १८५५ रोजीं तो लिहितोः—'मानसशास्त्र ' प्रसिद्ध करण्याची व्यवस्था अखेरीस कांहींहि लागो; हें स्पष्ट आहे कीं, लेख लिहून तयार झाल्याबरोबर मला मिळावी अशी रोख रकम कोणी देण्यास तयार होईलसें दिसत नाहीं. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें, आणि अमेरिकेंतून रोख पैसे न आल्यामुळें, मी एथें राहिल्यास लवकरच माझी पैशाच्या संबंधानें अगदीं चणचण उडणार आहे; आणि म्हणून तुझा प्रत्यवाय नसल्यास पूर्वीच्या अटींवर मी कांहीं दिवस डार्बी एथें रहावयास येईन म्हणतों. "

ता० १९ मार्च रोजीं तो लिहितोः—" ' ग्रंथ छापण्यास लवकरच सुरवात होणार..... त्यामुळें, पुढील जूनमध्यें किंवा त्या सुमारास माझा ग्रंथ लिहून पुरा होईल त्या बेतास तो छापूनहि बहुतेक पुरा होईल. "

पुढचे तीन महिने त्यानें घरीं घालविले; त्या वेळीं तो पांच तास रोज लिहीत असे, आणि फिरावयास गेला म्हणजे विचार करीत असे. त्याच्या त्या वेळच्या तसबिरीवरून पाहतां तो आपल्यास फाजील कष्टवीत होता असें दिसतें. जूनच्या अखेरीच्या सुमारास शेवटचीं तीन प्रकरणें लिहिण्याकरितां तो वेल्स प्रांतांत गेला. तेथें त्याच्या मेंदूस कायमचा धक्का बसला. तेव्हांपासून तो ग्रंथ पुरा करण्याचें काम आस्ते आस्ते चाललें; पैकीं कांहीं वेल्स प्रांतांत झालें, आणि शेवटचें प्रकरण त्यानें घरीं लिहिलें. त्या ग्रंथांचें प्रकाशन झटकन व्हावें म्हणून तो लंदनास गेला, आणि आगस्टच्या पंधरावीस तें पुस्तक बाहेर पडलें.

त्यासंबंधानें, टेनिसनच्या काव्यांत आपल्या मतासारखें कांहीं त्यास दिसल्यावरून त्यानें त्याची एक प्रत त्यास पाठविली, आणि दुसरी हक्सुले यास पाठविली. ती पाठवितांना त्यानें त्यास (ता० १६ आगस्ट १८९९) असें लिहिलें:—" तूं करितोस ती टीका जरी पुष्कळ वेळां प्रतिकूळ असते तरी तिचें महत्त्व मी फार समजतों हें तुला माहीतच आहे; म्हणून हा ग्रंथ वाचीत असतांना (किंवा जितका त्याचा भाग तुला वाचवेल तितका वाचतांना) तुला ज्या कांहीं टीका त्याच्यावर कराव्याशा वाटतील त्या जर त्याच्या बाजूवर तूं टिपशील, आणि एक दिवस मला पहावयास देशील, तर मला किती आनंद होईल हें तुला सांगावयास नको. फार काम केल्यामुळें माझी प्रकृति बिघडली आहे, आणि म्हणून मी सहा महिने विसावा घेणार आहें. उद्यां सकाळीं फ्रान्सच्या किनाऱ्यावर ट्रेपोर्ट एथें जाण्याकरितां मी निघणार आहें. नुक्त्याच घडून आलेल्या गोष्टीच्या (हक्स्लेच्या विवाहाच्या संबंधानें) तुझें अभिनंदन करण्यासाठीं मी असें म्हणतों कीं, मला तुझा हेवा वाटतो, आणि मला वाटतें तुझा हेवा करणें हेंच तुझें अत्युत्तम अभिनंदन होय. "

गर्दी छान वठला आहे. ह्या आठवड्याच्या ' इकॉनॉमिस्ट ' व ' स्पेक्टेटर ' पत्रांत त्याच्यावर अग्रलेख आलेले असून, त्यांत मीं प्रतिपादिलेलें तत्त्व त्यांस पसंत पडलें आहे, आणि आगगाड्यांच्या संबंधाच्या कायद्यांत सुधारणा केली पाहिजे असें तीं पत्रें सुचवीत आहेत..... ' रेलवे टाइम्स ' देखील असें जाहीर करितो कीं, आपण त्यांतील आणखी उतारे देणार आहों. ह्यावरून सार्वजनिक दृष्ट्या, ह्या निबंधाचा कांहीं परिणाम होईलसें दिसतें; आणि खाजगी दृष्टीनें, त्यावरून एडिंबरोरिव्ह्यूशीं माझें चांगलें बस्तान बसेलसें दिसतें."

ता० १९ नवंबर रोजीं तो लिहितोः—' सार्वत्रिक गृहीत गोष्टी ' ह्या निबंधास माझ्या मानसशास्त्राचा पहिला भाग ' सामान्य विवरण ' ह्याचें स्वरूप यावें एतदर्थ त्यांत योग्य ती भर घालून त्याचे योग्य ते भाग पाडण्यांत हल्लीं मी गुंतलों आहें. मी तो ज्यास्त स्पष्ट व जोरदार केला आहे, आणि त्याच्याविरुद्ध घेतलेल्या आक्षेपांचें त्यांत निरसन केलें आहे.

ता० ११ मार्च १८५५ रोजीं तो लिहितोः—'मानसशास्त्र ' प्रसिद्ध करण्याची व्यवस्था अखेरीस कांहींहि लागो; हें स्पष्ट आहे कीं, लेख लिहून तयार झाल्याबरोबर मला मिळावी अशी रोख रकम कोणी देण्यास तयार होईलसें दिसत नाहीं. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें, आणि अमेरिकेंतून रोख पैसे न आल्यामुळें, मी एथें राहिल्यास लवकरच माझी पैशाच्या संबंधानें अगदीं चणचण उडणार आहे; आणि म्हणून तुझा प्रत्यवाय नसल्यास पूर्वींच्या अटींवर मी कांहीं दिवस डार्बी एथें रहावयास येईन म्हणतों. "

ता० १९ मार्च रोजीं तो लिहितोः—" ' ग्रंथ छापण्यास लवकरच सुरवात होणार..... त्यामुळें, पुढील जूनमध्यें किंवा त्या सुमारास माझा ग्रंथ लिहून पुरा होईल त्या बेतास तो छापूनहि बहुतेक पुरा होईल. "

पुढचे तीन महिने त्यानें घरीं घालविले; त्या वेळीं तो पांच तास रोज लिहीत असे, आणि फिरावयास गेला म्हणजे विचार करीत असे. त्याच्या त्या वेळच्या तसबिरीवरून पाहतां तो आपल्यास फाजील कष्टवीत होता असें दिसतें. जूनच्या अखेरीच्या सुमारास शेवटचीं तीन प्रकरणें लिहिण्याकरितां तो वेल्स प्रांतांत गेला. तेथें त्याच्या मेंदूस कायमचा धक्का बसला. तेव्हांपासून तो ग्रंथ पुरा करण्याचें काम आस्ते आस्ते चाललें; पैकीं कांहीं वेल्स प्रांतांत झालें, आणि शेवटचें प्रकरण त्यानें घरीं लिहिलें. त्या ग्रंथांचें प्रकाशन झटकन व्हावें म्हणून तो लंदनास गेला, आणि आगस्टच्या पंधरावीस तें पुस्तक बाहेर पडलें.

त्यासंबंधानें, टेनिसनच्या काव्यांत आपल्या मतासारखें कांहीं त्यास दिसल्यावरून त्यानें त्याची एक प्रत त्यास पाठविली, आणि दुसरी हक्स्ले यास पाठविली. ती पाठवितांना त्यानें त्यास (ता० १६ आगस्ट १८९९) असें लिहिलें:—“ तूं करितोस ती टीका जरी पुष्कळ वेळां प्रतिकूळ असते तरी तिचें महत्त्व मी फार समजतों हें तुला माहीतच आहे; म्हणून हा ग्रंथ वाचीत असतांना (किंवा जितका त्याचा भाग तुला वाचवेल तितका वाचतांना) तुला ज्या कांहीं टीका त्याच्यावर कराव्याशा वाटतील त्या जर त्याच्या बाजूवर तूं टिपशील, आणि एक दिवस मला पहावयास देशील, तर मला किती आनंद होईल हें तुला सांगावयास नको. फार काम केल्यामुळें माझी प्रकृति बिघडली आहे, आणि म्हणून मी सहा महिने विसावा घेणार आहें. उद्यां सकाळीं फ्रान्सच्या किनाऱ्यावर ट्रेपोर्ट एथें जाण्याकरितां मी निघणार आहें. नुक्त्याच घडून आलेल्या गोष्टीच्या (हक्स्लेच्या विवाहाच्या संबंधानें) तुझें अभिनंदन करण्यासाठीं मी असें म्हणतों कीं, मला तुझा हेवा वाटतो, आणि मला वाटतें तुझा हेवा करणें हेंच तुझें अत्युत्तम अभिनंदन होय. ”

वर लिहिल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं तो ट्रेपोर्ट येथें जाण्यास निघाला. तेथें लॉट त्याच्याबरोबर आला असल्यामुळें त्यास जलद बरें वाटूं लागलें, पण नेहमींप्रमाणें लवकरच त्यास त्या जाग्याचा कंटाळा आला. नंतर त्यानें डोव्हर एथें जाऊन पाहिलें, पण तें शहर त्यास आवडलें नाहीं. तें अगदीं खोलांत आहेसें त्यास वाटलें. नंतर तो फोक्स्टोन येथें गेला, आणि तेथें त्यानें खाण्यापिण्याची नव्या प्रकारची व्यवस्था केल्यामुळें त्यास पूर्वींपेक्षां ज्यास्त चांगली झोंप लागूं लागली. तेथून त्याच्या मनांत हेस्टिंग्स एथें जावयाचें होतें, पण हक्स्ले टेन्बी एथें गेला होता तेथें जावयास तो निघाला; कारण दररोज त्याच्याबरोबर समुद्रांतील प्राणि-नमुने काढण्यासाठीं गेल्यानें आपली प्रकृति सुधारेल असें त्यास वाटलें. इकडे आपल्या मेंदूच्या बिघडलेल्या स्थितीबद्दल त्याच्या निरनिराळ्या कल्पना चालल्याच होत्या, आणि तो सुधारण्याकरितां नवे नवे उपाय सुरूच होते, आणि अनुभव प्रतिकूल आला तरी लवकरच बरें होण्याची आशा त्यास सारखीच वाटत होती.

त्यासंबंधानें ता० २९ सपटंबर १८५५ रोजीं तो बापास लिहितो:—" वास्तविक स्थिति अशी आहे कीं, माझ्या मेंदूंतील अशक्त झालेल्या रक्तवाहिन्या सहन करूं शकतील त्यापेक्षां ज्यास्त जलद माझ्या अंगांत नवें रक्त उत्पन्न होत आहे; म्हणून मला वाटतें, कांहीं दिवस मला जरा बेतानें खाल्लें पाहिजे. "

ता० १० आक्टोबर रोजीं तो लिहितो:—" माझ्या मेंदूची सध्याची स्थिति फाजील रुधिराभिसरणाची असेल, तर डा० रानसमचें म्हणणें बरोबर ठरेल. पण माझ्या मेंदूची स्थिति त्याच्या उलट आहे. हक्स्लेशीं या विषयावर झालेलें माझें संभाषण, आणि मीं स्वतः केलेलें निरीक्षण व त्यावरून बनविलेलीं अनुमानें, ह्यांवरून माझी खात्री झाली आहे कीं माझ्या निद्राभावाचें कारण मेंदूंत

रक्ताचा कमीपणा हें आहे. म्हणून विचारव्यापार खेरीज करून मेंदूतील रुधिराभिसरण चेतवण्याचे सर्व व्यापार त्यास फायदेशीरच आहेत. उदाहरणार्थ, उत्तेजक पेयें, धूम्रपान, इत्यादि."

ता० २३ आक्टोबर रोजीं तो पुनः लिहितोः—"हल्लीं मला वाटतें कीं दोष आहे तो माझ्या मेंदूतील रक्तवाहिन्यांत नसून ज्ञानतंतूंच्या घटकद्रव्यांत आहे..... मीं उत्क्षोम करून घेतला नाहीं तर माझ्या डोक्यांत ज्ञानतंतुविषयक वेदना होत नाहीं."

ता० ३० आक्टोबर रोजीं तो लिहितोः—"निरनिराळ्या प्रकारच्या कांहीं प्रयोगांवरून मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं, सर्व प्रकारचीं पुष्टिकारक औषधें माझ्या हल्लींच्या स्थितींत मला अयोग्य आहेत, आणि समुद्रकांठच्या हवेपासून माझें फायद्यापेक्षां नुकसानच होत आहे....मला वाटतें, डार्बी एथील हवा कांहीं काळ मला पथ्यकारक होईल."

त्याप्रमाणें तो डार्बी एथें गेला; व तेथें सरासरी पांच आठवडे राहिल्यानंतर तो डेव्हन प्रांतांत आईडफर्ड एथें गेला; कारण तो हल्लीं घोड्यावर बसून मेहनत करीत असून तशा रपेटीस ती जागा सोईवार होती. डेव्हन प्रांतांतून तो ग्लॉस्टर प्रांतांत प्रथम सिरेनसेस्टर एथें गेला; तेथील हवा त्यास उत्साहजनक वाटली; कदाचित् फारच उत्साहजनक वाटली. ती इतकी कीं, तो म्हणतो, एथें आल्यापासून मला जितकी चांगली झोंप लागते तितकी पूर्वीं कधींच लागली नव्हती. घोड्यावरची मेहनत "एथें होत नाहीं ह्याबद्दल चुकल्यासारखें वाटतें, कारण तिच्यापासून श्रम फार न होतां उघडी हवा पुष्कळ सांपडते." म्हणून ता० २० जानेवारीस तो त्याच प्रांतांत ब्रिम्सफील्ड एथें गेला. तेथें असतां पुष्कळ वर्षांपूर्वीं प्रिचर्ड साहेबाच्या आगगाडीसंबंधाच्या योजनांसंबंधानें त्यानें केलेल्या कामाबद्दल आतां ६७ पौंड अकस्मात् आले, व ते त्याच्या फार उपयोगीं पडले. ते

येतील अशी त्यास मुळींच आशा नव्हती. ता० ७ फेब्रुवारी रोजीं तो आपल्या आईस लिहितोः—" माझी प्रकृति हल्लीं चांगल्या रीतीनें सुधारत आहे. मी हल्लीं पायीं चालून, घोड्यावर फेरफटका करावयास जाऊन; आणि धान्याच्या पेंढ्या झोडपून, दररोज पुष्कळ मेहनत करितों, आणि ह्यांपैकीं शेवटचा प्रकार मला फार फायदेशीर वाटतो." दुसरे दिवशीं पावसामुळें तेथील हवा अगदीं सर्द झाल्यामुळें त्यानें घरीं जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें तो घरीं गेला, पण तीन आठवड्यांच्या आंत पुनः ब्रिम्सफील्ड एथें आला. तेथून तो लिहितोः—" झाडांचे बुंधे जमिनींतून खणून काढणें, आणि जाळण्यासाठीं त्यांचे फोडून तुकडे करणें, ही मेहनत मला सर्वांत उत्तम वाटते. तिच्या योगानें केवळ थकवा येत नाहीं इतकेंच नाहीं, तर मजा वाटते, आणि लक्ष्य सारखें वेधलेलें राहतें." ल्युइस ह्या त्याच्या लिहिण्याबद्दल त्याची थट्टा करून म्हणतोः—" तर मग अशा रीतीनें तूं लांकूडतोड्या व पाणीकाढ्या बनला आहेस! ही तत्त्वज्ञानाची हकालपट्टी कीं काय?"

स्टँडिश एथील त्याच्या मित्रांनीं त्यास असें सुचविलें कीं, लग्न करणें, आणि मनोभावनांस, व विशेषतः धर्मविषयक मनोभावनांस चेतना देणें, हा एक तुझ्या रोगावर उपाय आहे. ह्यावर त्यानें दिलेल्या उत्तरांचे कांहीं भाग त्याच्या 'आत्मचरितांत' आले आहेत. पैकीं मिसेस पॉटरला पाठविलेल्या पत्राचा उत्तरभाग असा आहेः—

" तूं असें सुचवितेस कीं माझ्या मनोभावनांस चेतविण्याच्या ज्यास्त प्रत्यक्ष साधनांच्या अभावीं मीं बैबल वाचावें. पण त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, ज्याच्या ठिकाणीं स्वभावाचा मनोवृत्तिविषयक भाग बराच जोरदार असेल, त्याच्या ठिकाणीं हा उपाय लागू पडेल. पण माझ्या ठिकाणीं मनोवृत्ति पुष्कळ काळपर्यंत एकप्रकारच्या निद्रितावस्थेंत असल्यामुळें मला उपदेश किंवा प्रत्यक्ष

उदाहरण ह्यांचा फारसा उपयोग होईलसें वाटत नाहीं. त्या मनोवृत्तींचा ज्या वस्तूंशीं व परिस्थितीशीं संबंध असेल त्या वस्तू व ती परिस्थिति प्रत्यक्ष हजर असल्याविना त्या मनोवृत्ती योग्य प्रमाणानें जागृत होतील असें मला वाटत नाहीं. शिवाय माझ्या ठिकाणीं बैबल वाचून जो परिणाम होईल असें तुला वाटतें तो न होण्यास एक विशेष कारण आहे. मी लहान असतां धर्मविषयक उपदेश आणि विधी हे माझ्या मनांत मूर्खपणानें आग्रहपूर्वक कोंबून भरल्यामुळें ते ज्या रूपांनीं माझ्या मनांत कोंबिले त्यांचा मला अत्यंत तिटकारा उत्पन्न झालेला आहे. धर्मग्रंथांतलि वाक्यें ऐकिलीं कीं माझ्या मनांत एकप्रकारचा दुःखसंवेदक मनोविकार उत्पन्न होतो; आणि मी लहान असतां औषधांबरोबर जे गोड पदार्थ मला देत त्यांबद्दलचा तिटकारा जसा मला माझ्या मनांतून काढून टाकतां येत नाहीं, तसा हाहि काढून टाकतां येत नाहीं. यावरून तुझ्या सहज लक्ष्यांत येईल कीं, ज्या भाषेबद्दल मला अशी ही ओकारी आहे त्या भाषेंत गोंविलेल्या कथा वाचून इष्ट परिणाम होण्याचा संभव नाहीं. शिवाय पौरुष मनोविकार जागृत करण्यापूर्वीं अपौरुष मनोविकार योग्य रीतीनें जागृत करतां येतील किंवा नाहीं ह्याचीहि मला शंकाच आहे; कारण स्वाभाविक क्रम ह्याच्या उलट आहे. आणि शिवाय, तूं सांगतेस त्या युक्तीचा पूर्वीं कधीं म्यां उपयोग करून पाहिला नाहीं असेंहि नाहीं, कारण सतरा वर्षांचा होईपर्यंत धर्मग्रंथांचें श्रवण मी सारखा करीतच होतों. "

मिस्तर व मिसेस पॉटर यांनीं त्यास स्टँडिश येथें कांहीं दिवस रहावयास ये म्हणून जो दुसरा उपाय सुचविला तो मात्र त्यानें ऐकिला; तथापि सुशिक्षित लोकांच्या सहवासाचा परिणाम आपल्या मेंदूवर काय होईल याबद्दल त्यास संशयच होता. पण तेथें त्यास फार सुख झालें, कारण तो तेथें असतां मुलांच्या कर्मणुकींत आणि मजांत

मुद्दाम मिसळत असे. ह्यामुळें तेथें गेल्यापासून त्यास इतका फायदा झाला कीं, आतां लंदनास जाऊन काय होतें तें पहावें असा त्यानें विचार केला. त्यासंबंधानें तो म्हणतो:—" लंदनांत इकडे तिकडे भटकल्यानें, निरनिराळे देखावे पाहिल्यानें, आणि कधीं कधीं मित्रांस भेटावयास गेल्यानें, मला योग्य तो फायदा होईल असें मला निःसंशय वाटतें."

या प्रमाणें लंदनास गेल्यावर तेथें त्यानें काटकसरीनें रहाण्याचा विचार केला, आणि तें बरोबरच होतें. कारण त्यानें आज पुष्कळ दिवस कांहीं लिहिलेलें नसून, ' मानसशास्त्रा' च्या प्रकाशनापासून नुकसान होण्याची भीति होती. त्या ग्रंथावर जे अभिप्राय आले होते ते तो ग्रंथ खपावा अशा प्रकारचे बहुतेक मुळींच नव्हते. तो ग्रंथ जडवादी व निरीश्वरवादी आहे असा आरोप त्याजवर ' नॉनकनफॉर्मिस्ट ' पत्रानें आणिला होता; म्हणून तो खोडून टाकण्याकरितां त्यानें त्या पत्रास असें लिहिलें:—" देव नाहीं अशा प्रकारचा सिद्धान्त मीं कोठेंहि काढिला नाहीं, तर मी असें म्हणूं शकतों कीं, त्या ग्रंथाच्या सामान्य रोंखावरून असा सिद्धान्त निघण्यासारखाहि नाहीं. ज्या लोकांनीं ह्या विषयाचा मुळापर्यंत विचार केलेला आहे त्यांच्याप्रमाणेंच माझेंहि असें मत झालेलें आहे कीं, देवाचें अस्तित्व सिद्ध करतां येत नाहीं, किंवा नासिद्ध करतां येत नाहीं. " ' नॅशनल रिव्ह्यूंत ' आलेला अभिप्राय तर, त्यास स्पष्टपणें अप्रामाणिकच वाटला, आणि ' नॉन्कन्फार्मिस्ट' प्रमाणें त्या पत्रालाहि लिहिण्याचा त्यानें विचार केला. त्यासंबंधानें स्टँडिश एथून ता० ९ एप्रिल १८५६ रोजीं तो बापास लिहितो:—" मानसशास्त्रा" वर 'आथीनियम'पत्रांत किती घाणेरडा अभिप्राय आला आहे हें कदाचित् तुझ्या कानावर आलें असेल..... ' नॅशनल रिव्ह्यू'नें माझें पत्र छापण्याचें नाकारिलें आहे. तें जर मला परत मिळालें तर तें मी

दुसरीकडे प्रसिद्ध करीन. मी तुला ' मेडिको सर्जिकल रिव्ह्यू ' पाठवीत आहें, कारण त्यांत ' मानसशास्त्रा'वर फार चांगला अभिप्राय आला आहे. तो मोरेलनें लिहिला आहे. "

ता० १३ एप्रिल रोजीं तो लंदनाहून लिहितो:—" आपल्या व्याख्यानांच्या संबंधानें हक्स्ले ' मानस शास्त्रा'चा द्वितीयार्ध वाचीत आहे, व तो म्हणतो, त्यांत फार मोठ्या कल्पना आहेत. मला त्याच्या पसंतीची किंमत सर्वांहून ज्यास्त आहे; कारण तो नेहमीं डोळ्यांत तेल घालून दोष काढीत असतो, व संशय घेत असतो, आणि स्तुति करण्याच्या कामीं आपला हात अगदीं आखंडता धरीत असतो. "

ता० २ मे रोजीं तो पुनः लिहितो:—" परवां रात्रीं (मिसेस मेसनच्या घरीं मंडळी जमली असतां प्रोफेसर बेनची व त्याची प्रथम गांठ पडली तेव्हां) बेन फारच आदरपूर्वक मला सांगता झाला कीं, ' मानस शास्त्रा 'ची जॉन (स्टुअर्ट) मिल्ल फार स्तुति करीत होता, आणि मी त्याजवर केलेल्या हल्लचाला तो उत्तर तयार करीत असून तें त्याच्या ' तर्क शास्त्रा' च्या चवथ्या आवृत्तींत प्रसिद्ध व्हावयाचें आहे. "

१८५६ चा उन्हाळा त्यानें प्रथम त्याचा मित्र ऑक्टेव्हियस स्मिथ ह्याच्याकडे आर्कानिश (ह्यालाच पुढें आर्डटॉर्निश हें नांव प्राप्त झालें) एथें घालविला. तिकडे जात असतां ब्रीऑक एथें एक आठवडा मुक्काम करून लॉक डून नामक सरोवराच्या किनाऱ्यावर माशांच्या मानसिक स्थितीच्या संबंधानें त्यानें काढिलेल्या अनुमानांचा पडताळा पाहिला. आर्कानिश एथून ता० १६ आगस्ट १८५६ रोजीं तो बापास लिहितो:—" ह्या पत्रासोबत पाठविलेली (मिल्लची) चिठ्ठी थोड्या दिवसांपूर्वीं माझ्या हातीं आली, आणि त्याच्या ' तर्क शास्त्रा ' चे खंड आतां माझ्या हातीं आले आहेत. " सार्व-

त्रिक गृहीत गोष्टी" ला उत्तर देण्यांत त्यानें सरासरी एक प्रकरण खर्चिलें आहे. मीं त्याच्यावर नजर टाकून पाहिली; त्यांत घाबरण्यासारखें मुळींच मला दिसलें नाहीं. आणखी एका मुद्यावरील देखील त्याचें उत्तर घाबरविण्यासारखें नाहीं."

ता० ९ सपटंबर रोजीं तो लिहितो:—"मला वाटतें, लवकरच मी थोडेंसें काम दररोज करण्यास समर्थ होईन; आणि ब्रायटनची हवा मला वाटते तशी मानवल्यास विशेषतः करूं शकेन. अद्यापि एकहि सामन मासा मला सांपडला नाहीं; मात्र दोघांना मी गळ घालूं शकलों."

ब्रायटनची हवा अजमासाप्रमाणें न मानवल्यामुळें त्यानें पारीसला जाण्याचा निश्चय केला, आणि बापास आपले स्केट्स (बर्फावर चालण्याचे लोखंडी जोडे), पारीसचा नकाशा, व न्यूजंटचा शब्दकोश, इतक्या वस्तू पाठविण्यास लिहिलें.

ता० २० आक्टोबर १८५६ रोजीं पारीसहून तो आईस लिहितो:—एथें हवा स्वच्छ व चकचकीत आहे, आणि पारीस शहर फारच मनोहर दिसत आहे. काम्टेला देण्याकरितां चापमननें दिलेले पैसे त्यास देण्याकरितां मी काल त्याच्याकडे गेलों होतों. तो ठेंगू वृद्ध माणूस असून त्याच्यांत भव्यपणा कांहींच दिसत नाहीं. त्याच्याशीं अगदीं अर्धवट भाषेंत कोटिक्रम करण्यास माझें फ्रेंच भाषेचें ज्ञान मला पुरलें."

पारीस शहर इतकें मनोहर होतें तरी एका आठवड्याच्या आंत त्यास त्याचा कंटाळा आला. धूर खाऊन टाकणारी चूल बनवण्याच्या कल्पनेंत तो हल्लीं गर्क झाला होता. त्यासंबंधानें तो म्हणतो:—"ती अत्यन्त साधी असून तिच्यांत फारच फायदे आहेत, आणि मला वाटतें, तिचा खप चांगला होईल. शिवाय ती तयार

करण्याचा उद्योग नवा व आकर्षक असल्यामुळें माझ्या प्रकृतीला तो फार फायदेशीर होईल. "

त्यासंबंधानें ता० ४ नवंबर १८९६ रोजीं लंदनाहून तो बापास लिहितो:—" धूर भक्षण करणाऱ्या चुलींबद्दल माहिती मिळविण्यांत मी गर्क झालों आहें. आर्नाॅठची चूल जरी पुष्कळ चांगली आहे, तरी ती पूर्णपणें चांगली नाहीं. शिवाय ती बिघडण्याचा संभव असून तिची व्यवस्था ठेवणें कठीण आहे. ह्या कामीं मला यशः-प्राप्तीची खात्री वाटते, आणि धूम्रभक्षणाखेरीज दुसऱ्या पुष्कळ सोयी मीं योजलेल्या चुलींत साधतील अशी मला आशा आहे. "

यानंतर तो एकदोन दिवसांनीं घरीं गेला होता, आणि सरासरी नाताळपर्यंत तेथें राहिला. " धूर भक्षण करणारी चूल चुलींत गेली," म्हणून तो लिहितो, कारण धूर त्याच्या अजमासाप्रमाणें वागेना.

१८९७ ची वर्षप्रतिपदा ध्यानांत ठेवण्यासारखी होती. कारण त्या दिवशीं तो हक्स्लेकडे जेवावयास गेला, आणि पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत तो हक्स्लेकडे त्या दिवशीं जेवावयास जात असे. त्याच्या नजीक राहिलें असतां कांहीं काम होईल ह्या आशेनें त्यानें आपलें बिऱ्हाड त्याच्या शेजारीं नेलें. दोन वर्षांपूर्वीं त्यानें ' सर्व प्रगतीचें कारण ' ह्या विषयावर ' वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू ' स एक लेख लिहून देण्याचें कबूल केलें होतें. तो तयार करण्याच्या कामास तो आतां लागला. ता० ४ फेब्रुवारी १८९७ रोजीं ता बापास लिहितो:—" हक्स्लेनें मला तिकीट दिलें असल्यामुळें मी ' रॉयलइन्स्टिटयूशन'मधील त्याची व्याख्यानें ऐकावयास जात असतों. बर्फाच्या नद्यांवर टिंडालनें क्तेंच एक व्याख्यान दिलें त्यास मी हजर होतों. त्यांत त्यानें द्विषयक कांहीं रूढ कल्पना खोडून टाकिल्या. " पुढें ता० २३ मार्चे रोजीं तो लिहितो:—" 'प्रगती'वरील माझा लेख शनवारीं पुरा झाला.

आज दहा दिवस मी जरा बरेंच जारीनें काम करीत होतों. त्याच्या योगानें एकंदरींत माझा स्पष्ट फायदाच झाला आहे."

तो मे महिन्यांत लिहितोः—" ह्या लेखाबद्दल अभिप्राय फार चांगले आले आहेत. हक्स्लेच्या टीकेची किंमत मला अत्यन्त असून तो म्हणतो कीं, मला त्यांत छिद्र दिसत नाहीं, आणि तो मी दोनदां किंवा तीनदां वाचणार आहें. त्याच्या मतें त्याचे शास्त्रावर मोठे परिणाम होणार आहेत." ह्याच्या पुढचे कांहीं महिने ' अ-तींद्रिय इंद्रियविज्ञान ' ह्या विषयावर ' नॅशनल रिव्ह्यू ' करितां एक लेख लिहिण्यांत त्यानें घालविले. तो लेख अखेरीस ' इंद्रियविज्ञा-नाचे अंतिम नियम ' या नावानें प्रसिद्ध झाला. त्यासंबंधानें हक्स्लेनें त्यास सांगितलें कीं, ' तो माझा (हक्स्लेचा) म्हणून डा० हुकर-सारखा माणूस म्हणतो. '

१८९७ चा उन्हाळा त्यानें कर्केड व आयर ह्या दोन प्रांतांत घालविला. तेथें असतांना ' गानाचा उगम व व्यापार ' ह्या विषयावर पूर्वीं तयार केलेल्या कांहीं टिपणांस त्यानें विस्तृत स्वरूप दिलें. तेथून तो घरीं गेला, व थोडे आठवडे तेथें राहिला. त्या मुदतींत ' प्रतिनिधिसत्ताक सरकार ' ह्या विषयावर एक लेख लिहिण्यास त्यानें सुरुवात केली, आणि तो स्टँडिश येथें असतां पुरा केला. तो लेख आक्टोबरच्या ' वेस्टमिन्स्टर ' मध्यें प्रसिद्ध झाला, आणि त्याच सुमारास तोहि लंदनास परत आला. तेथून ता० २८ नवंबर १८९७ रोजीं तो बापास लिहितोः—" हल्लीं पेढ्यांच्या संबंधाचा जो महत्त्वाचा प्रश्न निघाला आहे त्यावर पुढील ' वेस्ट-मिन्स्टर ' करितां एक लेख मी लिहिणार आहें, त्यांत त्यांच्या स्वातंत्र्यात हात न घालणेंच एकंदरींत बरें होय असें मी दाखविणार आहें. शिवाय, " मुलांचें नैतिक शिक्षण " ह्या विषयावर ब्रिटिश कार्टर्लीच्या एप्रिलच्या अंकांत एक निबंध लिहिण्याचें मीं कबूल

केलें आहे. ‘ निबंधसंग्रहा ’ चा शेवटच्याच्या अलीकडचा प्रूफशीट मीं आतांच तपासून दिला. पुढच्या आठवड्याच्या शेवटीं तो बहुधा प्रसिद्ध होईल. ” ह्या निबंधसंग्रहांत त्यानें आजवर प्रसिद्ध केलेले महत्त्वाचे निबंध एकत्र गोविलेले होते.

प्रकरण आठवें

:o:

ज्ञानाचें एकीकरण

हक्स्लेच्या शेजारीं बिऱ्हाड घेतल्यापासून त्याचें त्याच्याशीं दळवळण ज्यास्त निकट झालें, आणि आठवड्यांतून इतर दिवशीं त्यांची गांठ पडो वा न पडो, रविवारीं ते दोघे मिळून तिसऱ्या प्रहरीं नियमानें फिरावयास जात असत; आणि त्या वेळीं त्यांचीं संभाषणें होत असल्यामुळें त्यांच्या शरीरास चांगली मेहनत घडून त्यांच्या मनासहि उत्साह येत असे.

१८५७ चे अखेरचे दिवस आणि १८५८ चे प्रारंभीचे दिवस ह्या दरम्यान त्याच्या विचारांची एकदम संघटना झालेली जी दिसली तिचें तात्कालिक कारण निबंधांची जी निबंधसंग्रहरूप पुनरावृत्ति त्यानें काढिली तें होय. तथापि ता० ६ जानेवारी १८५८ रोजीं जी रेखाटणी त्यानें तयार केली, आणि ता० ९ रोजीं बापाकडे पाठविली, तिची योजना त्यानें घाईनें मनांत केली होती असें समजणें चुकीचें होईल. अशा संघटनेकडे त्याच्या कल्पनांचा कल आज कित्येक वर्षें होत होता, आणि शास्त्रज्ञांच्या विचारांचा सामान्य कलहि ज्ञानाचें एकीकरण करणाऱ्या सामान्यतत्त्वाकडे होता. त्याचे आतांपर्यंतचे लेख विषय व विवेचन ह्या दोन्ही बाबतींत जरी नाना-

विध होते तरी प्रत्येक प्रश्नाकडे पहाण्याची त्याची पद्धति तत्त्वतः एकच होती, आणि त्याच्या रेखाटणींत गोंविलेल्या कल्पनांपैकीं बऱ्याच कल्पना त्या लेखांतून आलेल्या होत्या. सारांश, ज्ञानाचें एकीकरण करण्याचें त्याच्या मनांत येण्यास झालेल्या कारणपरंपरेच्या साखळींतील निबंधांची पुनरावृत्ति ही शेवटची कडी होती.

पण ह्या नवीन क्लृप्तीचा विचार चालला असतां अगोदर केलेले करार पुरे करणें जरूर होतें; उदाहरणार्थ, मुलांच्या नैतिक शिक्षणावर ब्रिटिश क्वॉर्टर्लीला लिहून देऊं केलेला निबंध लिहिणें जरूर होतें. तद्वतच कार्टर्लीरिव्ह्यूला शारीरिक शिक्षणावर निबंध लिहून देण्याचें त्यानें कबूल केलें होतें, आणि तेजोमेघविषयक क्लृप्तीवर एका निबंधास सुरुवात केली होती. या शेवटच्या निबंधाच्या संबंधानें ता० १ एप्रिल १८५८ रोजीं तो बापास लिहितो:—" माझी प्रकृति फार चांगली आहे, आणि क्वार्टर्लीकरितां मीं निबंध लिहिला आहे तो चांगला चालला आहे. मला वाटतें तो वाचण्यासारखा होईल. रविवारीं चापमनकडे क्यापटिन ल्युई नांवाच्या एका गृहस्थाची गांठ पडली; त्यानें मला एक विलक्षण अभिनंदनपर गोष्ट सांगितली. तो म्हणाला, 'तुमचें 'सोश्यल स्टॅटिक्स' हें पुस्तक वाचून मला फार फार फायदा झाला आहे, आणि हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवरील लष्करी हपीसरांचें तें फार आवडतें पुस्तक बनलेलें आहे, आणि सिंधचा चीफ कमिशनर कर्नल जेकब तर त्यांतील तत्त्वांप्रमाणें पूर्णपणें वागतो. त्यानें त्या पुस्तकांतील तत्त्वांचे निदर्शक असे आपले अनुभव ज्यांत गोंविले आहेत असा एक ग्रंथ तयार केला असून तो क्यापटिन पेलीनें आपल्याबरोबर आणिला आहे.' कांहीं लाख माणसांचें शासन 'सोश्यल स्टॅटिक्स' मधील तत्त्वांप्रमाणेंच चाललें आहे असें माझ्या स्वप्नींहि नव्हतें."

पुढच्या उन्हाळ्यांत बापाबरोबर फ्रान्सांत जाण्याचें त्यानें कबूल

केलें होतें. पण तेथें त्या वेळाच्या सुमारास लढाईची तयारी चालली असल्यामुळें तो तेथें जाण्यास कचरूं लागला. त्यासंबंधानें ता० १४ जून १८५८ रोजीं तो बापास लिहितो:–" ह्या ज्या जंगी प्रमाणावर तयाऱ्या चालल्या आहेत त्यांचा अर्थ काय ? इंग्लंदवर हल्ला करण्याचा त्यांचा (फ्रेंचांचा) विचार असेलसें संभवनीय दिसत नाहीं; पण दुसरीहि कोणती गोष्ट तितकीच असंभवनीय दिसते. आतां ह्या तयाऱ्यांचा उद्देश ज्या अर्थीं कांहीं तरी असलाच पाहिजे त्या अर्थीं सर्वांत कमी असंभवनीय गोष्ट कोणती हें पाहिलें पाहिजे. आह्मांवर हल्ला करण्यापासून फ्रेंच फौजेला जितका आनंद होईल तितका दुसऱ्या कशापासून होणार नाहीं हें उघड आहे. फ्रेंच शिपाई एक कविता म्हणत असतात तिची एक प्रत नुक्तीच माझ्या पाहण्यांत आली, तिच्यांत आमच्याविरुद्ध अत्यन्त भयंकर विचार गोंविलेले होते. लुई नेपोलियनला (तेव्हांच्या फ्रेंच बादशाहाला) जर आह्मांवर हल्ला करणें मुत्सद्दीपणाचें वाटलें तर तो क्षणभर काकूं करणार नाहीं. पण त्याला तें मुत्सद्दीपणाचें वाटेल कीं काय ह्याबद्दल मला कांहींच मत बनवतां येत नाहीं."

ता० १८ जून रोजीं तो पुनः लिहितो:—" तुझ्याबरोबर मला येतां येणार नाहींसें वाटतें. प्रिचर्ड साहेबाचा तिऱ्हाइताचा एक खटला लवकरच निघावयाचा आहे, आणि त्यांत माझी साक्ष व्हावयाची आहे; आणि तसलीच साक्ष पांच वर्षांपूर्वी दिल्याबद्दलचें वेतन द्यावयास जर तो कबूल होत असेल तर आतां साक्ष देण्यास मला एथें थांबणें जरूर आहे. आपण दोघे बरोबर बाहेर देशीं जाऊं असा आज पुष्कळ दिवसांचा आपला जो संकेत त्यास अशा रीतीनें विघ्न यावें हें खरोखर मनास फार चीड आणणारें आहे."

ह्यापुढचे तीन महिने त्यानें बहुतेक डार्बी प्रांतांतच घालविले. त्यावेळीं मासे धरण्यास सांपडतील म्हणून तो त्या प्रांतांत इकडे

तिकडे पुष्कळ फिरला. पैकीं, तो म्हणतो, मॅट लॉक एथें मासे धरण्याबद्दल फी नव्हती, कारण तेथें मासेच नव्हते. म्हणून त्यानें तो वेळ मणक्याच्या सांगाड्याबद्दलची जी ओवेनची क्लृप्ति तिजविरुद्ध लेख तयार करण्यांत घालविला. सांगाड्याचे ठराविक नमुने आहेत ही ओवेनची क्लृप्ति १८५१ सालीं त्यानें त्याचीं व्याख्यानें ऐकलीं तेव्हांपासून त्यास असमाधानकारक वाटत होती. पुढें नरोटीच्यासंबंधानें तरी ती अपुरी आहे असें हक्स्लेनें एका व्याख्यानांत दाखविलें. तें पाहून ती एकंदरींतच चुकीची आहे असें दाखविण्याचें स्पेन्सरनें मनांत आणिलें. त्यासंबंधानें ता० ९ जुलै रोजीं तो लिहितो:—"मी ओवेनवर हल्ला करण्यांत गुंतलों आहें. त्याचें ठराविक नमुन्यावरील पुस्तक वाचतां तें अगदींच पोकळ दिसतें; तें इतकें फोल असेल अशी माझी कल्पना नव्हती. त्याचा मी अगदीं चुराडा करून टाकणार आहें, आणि त्या चुराड्यावर तद्विषयक खऱ्या क्लृप्तीचा पाया रचणार आहें." हा निबंध प्रसिद्ध झाल्यानंतरच्या महिन्यांत बापास त्यासंबंधानें तो लिहितो:—हक्स्ले मला सांगतो कीं, "ओवेनवरील तुझ्या निबंधानें अगदीं चळवळ उडवून दिली आहे; त्याचा लेखक कोण याबद्दल मला पुष्कळांनीं प्रश्न केले, आणि कित्येकांना मींच (हक्स्ले) तो लिहिला असेलसा संशय आला." त्यासंबंधानें सामान्य मत असें झालेलें दिसतें कीं त्याच्या योगानें ओवेनची क्लृप्ति कायमचीच हाणून पडली आहे."

आक्टोबरांत लंदनास परत आल्यावर 'सेंद्रिय आकारांचे नियम' या विषयावर कबूल केलेला निबंध लिहिण्यास त्यानें सुरवात केली. शारीरिक शिक्षणावरील निबंध 'क्वार्टर्ली रिव्ह्यू' नें नाकारिल्यामुळें तो ब्रिटिश क्वार्टर्लींत प्रसिद्ध झाला. त्यानें 'निबंध संग्रहा' च्या कांहीं प्रती निवडक लोकांकडे पाठविल्या. त्यावर जीं उत्तरें त्यास आलीं त्यांपैकीं दोन एथें देण्यासारखीं आहेत. पैकीं

डार्विनच्या पत्राचें त्यास विशेष महत्त्व वाटत होतें. तें पत्र ता० २९ नवंबर १८५८ रोजीं लिहिलेलें असून असें आहे: " वार्धाची क्लृप्ति ' म्हणून जीस म्हणतात तिजविषयींचा तुझा कोटिक्रम वाखाणण्यासारखा आहे. उपजातिविषयक फेरबदलावर त्याहून एक मोठा ग्रंथ मी लिहिणार असून त्याची रेखाटणी हल्लीं तयार करीत आहें; पण : त्या विषयाचें विवेचन मी केवळ प्राणिशास्त्रदृष्ट्या करीत आहें, आणि सामान्य (सर्व शास्त्रांच्या) दृष्ट्या नव्हे; नाहीं तर, माझ्या मतें, तुझा कोटिक्रम अगदीं पूर्ण असल्यामुळें तो मला माझ्या ग्रंथांत उतरून घेणें फार फायदेशीर झालें असतें. "

दुसरें पत्र प्रसिद्ध लेखक टॉमस हेन्री बकल याचें ता० ३ दिजंबरचें असून, असें होतें:—"विचारांनीं इतका पूर्ण भरलेला ग्रंथ मीं क्वचित्, फारच क्वचित्, वाचिला असेल, खरोखरच, तुझीं कांहीं मतें इतकीं अर्थपूर्ण आहेत कीं ती मला बहुतेक त्रासच देतात; म्हणजे, त्या कल्पना स्पष्ट असून इतक्या सूचक आहेत कीं त्यांवर विचार करतां करतां थकवा उत्पन्न होतो. पण अशा रीतीनें (वाचणारास) त्रास देणें हा (लेखकाच्या) सामर्थ्याचा अत्युच्च पुरावा होय..... ' प्रगती ' वरील तुझा निबंध मला फार आकर्षक वाटला; पण त्यांतील एकंदर व्यापक तत्त्व बरोबर आहे असें दाखविण्याइतकें आपलें ज्ञान पक्क झालेलें नाहीं ही गोष्ट तूंच निःसंशय सर्वांच्या अगोदर कबूल करशील. "

घरीं असतां, आपलें लेखनविषयक काम चालवण्यास फुरसत मिळेल असा पोटाचा धंदा कोणता करावा ह्याबद्दल त्याचे विचार चाललेच होते. आपल्या ह्या देशाच्या कारभाराची पुनर्घटना ह्यावेळीं होत असल्यामुळें त्यांत आपल्यास कांहीं योग्य उद्योग मिळेल असें त्यास वाटून त्यानें जॉन मिल्ल यास त्यासंबंधानें लिहिलें; कारण तो इंडियाआफिसमध्यें होता. शिक्षणविषयक कमिशनाकडेहि

जागा मिळण्याबद्दल त्यानें अर्ज केला. शिवाय त्याचा मित्र ऑक्टेव्हियस स्मिथ हा चापमनच्या दुकानांत त्यास जागा मिळावी म्हणून खटपट करीतच होता. मिसेस मिल्ल यावेळींच मेली असल्यामुळें मिल्लला लिहिलेलें पत्र त्यास नवंबरपर्यंत मिळालें नाहीं; आणि त्यावर जें त्याचें उत्तर आलें तें जरी सहानुभूतिपूर्ण होतें, तरी उद्योग मिळविण्याच्या संबंधानें निराशाजनक होतें. त्यावर त्यानें त्यास रिचमंड एथून ता० २७ नवंबर १८९८ रोजीं पुढील उत्तर लिहिलें:—" तुझ्या फार उदार पत्राबद्दल तुझे योग्य उपकार कसे मानावे हेंच मला कळत नाहीं; आणि तूं ज्या शोककारक स्थितींत तें लिहिलेंस त्या स्थितीमुळें ही माझी अडचण ज्यास्तच वाढली आहे. तुझ्या ह्या दुःखांत तुझ्याशीं सहानुभूति प्रदर्शित करण्यास मला बहुतेक मुळींच हक्क नाहीं. पण खाजगी व सार्वजनिक दोन्ही दृष्ट्या माझ्यानें अशी आशा प्रदर्शित केल्याशिवाय रहावत नाहीं कीं, तुझ्या पत्राच्या पहिल्या वाक्यावरून जी उदासीनता दिसून येते ती फार दिवस कायम न राहो, आणि तुला तुझ्या उपयुक्ततेचा उद्योग पुनः सुरू करतां येवो. तुझ्या पत्राच्या शेवटीं जें मत–प्रदर्शन तूं केलें आहेस तें माझ्या आशेपेक्षां ज्यास्त जोरदार आहे, आणि त्याचा जर मीं उपयोग केला तर त्यापासून मला फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. "

मिल्लशिवाय त्यानें ह्या उद्योगासंबंधानें त्याचा मित्र डा० हूकर यास ता० १३ दिजंबर १८९८ रोजीं असें पत्र लिहिलें:–" परराष्ट्रीय व्यापारी वकिलाच्या जाग्यासारखी एकादी जागा मी पाहण्याच्या बेतांत आहें; आणि तशी जागा पाहण्यांत माझा असा उद्देश आहे कीं, जें मी कित्येक वाङ्मयात्मक (किंवा शास्त्रीय म्हणणें ज्यास्त बरोबर होईल) उद्योग योजिलेले असून हल्लीं मला करतां येत नाहींत ते मला करतां यावे. मीं जें आजपर्यंत लिहिलें आहें

तें, जें मी लिहिण्यास उत्सुक आहें त्याच्या मानानें अगदीं अल्प आहे. प्रारंभींच कांहींसे विस्तृत असलेले माझे उद्देश हळू हळू ज्यास्त विस्तृत होत चालले आहेत. विशेषतः अलीकडे, कांहीं कल्पना, ज्यांचीं थोडीशीं अपक्व व वेडींवांकडीं मुळें "निबंध संग्रहांत" दिसतात, त्या माझ्या स्वप्नींहि नव्हत्या अशा रीतीनें माझ्या मनांत वृद्धिंगत होत आहेत, आणि त्यामुळें जे निरनिराळे ग्रंथ करण्याचें मीं पूर्वीं योजिलें होतें तें सर्व त्यांत ओढिलें जाऊन त्यांस एकीकृत स्वरूप येण्याचा बराच रंग दिसत आहे, आणि ह्यामुळें हा उद्योग चालू ठेवण्यास मी ज्यास्तच उत्सुक झालों आहें. पण माझ्या दुर्दैवानें माझ्या ग्रंथांना पुरेसा खप नाहीं.....ह्यामुळें मला असा मार्ग सुचला आहे कीं, साधल्यास जिच्यांत प्रत्यक्ष कामापेक्षां जबाबदारी ज्यास्त आहे अशी एकादी जागा मिळवावी, म्हणजे तेणेंकरून योजिलेले ग्रंथ लिहून काढण्यास मला पुरेशी फुरसत मिळेल.....भौतिक शास्त्राच्या धोरणावर व पद्धतीवर मानसशास्त्र व समाजशास्त्र ह्यांचें विवेचन करणें इष्ट आहे असें जर तुला वाटत असेल, आणि माझे जे लेख तूं पाहिले आहेस त्यांवरून ह्या दिशेनें कांहीं तरी माझ्या हातून होण्यासारखें आहे असें जर तुझें मत झालें असेल, तर तूं ह्या कामीं इतरांबरोबर आपलेंहि वजन खर्च करावें. माझी अशी इच्छा आहे कीं, ह्या प्रश्नाचा विचार केवळ सार्वजनिक दृष्ट्या व्हावा. इष्ट जागा मला मिळाल्यानें मतप्रगति होऊन योग्य असा सार्वजनिक फायदा उत्पन्न होईल असें जर तुला वाटत असेल, आणि ज्या मानानें तुला हें वाटत असेल तेवढ्यापुरतेंच जर तूं आपल्या शिफारशीनें मला सहाय्य करशील, तर माझी इच्छा तृप्त होईल आणि मी तुझा फार आभारी होईन."

व्यापारी वकिलांच्या जागेच्या संबंधानें डा० हूकरचें उत्तर उमेदीचें नव्हतें; कारण तो म्हणतो:—ह्या कामामध्यें स्वकर्तव्यदक्ष

आणि कोंवळ्या मनाच्या माणसाला इतकी दगदग होत असते कीं, ती त्यास विचार करण्यास मुळींच अनुकूल नसते..... म्हणून मला असें वाटतें कीं, ज्या जाग्यावर कामाच्या कलाकांत केवळ अगदीं हमालगिरी पण दुसरें कांहीं नसेल, अशी जागा तुझ्या व्यासंगाला ज्यास्त योग्य होईल..... हें अगदीं शिक्षकास शिकविण्यासारखें आहे, कारण हें तुझ्याइतकें चांगलें दुसऱ्या कोणास समजत नसेल; पण म्हणताना, ज्याची त्यास शारीरिक वैद्यकी किंवा आध्यात्मिक वैद्यकीहि साधत नाहीं."

ह्या नेमणुकीच्या प्रश्नाचा विचार केवळ सार्वजनिक मुद्यावरच करावा, खाजगी मुद्यावर, म्हणजे त्यांचे हित साधण्याच्या दृष्टीनें, करूं नये, अशी आपली इच्छा आहे असें त्यानें आपल्या मित्रांस त्यांचें मत विचारतांना मुद्दाम लिहिलें होतें. म्हणून त्याला जीं त्यांच्याकडून शिफारसपत्रें आलीं त्यांत त्यांनीं तत्त्व व ग्रंथकार ह्या दृष्टीनें त्याच्या कामाची किती किंमत आहे, तें चालविण्यास त्यास साधन व फुरसत देणें किती महत्त्वाचें आहे, आणि पहिल्या प्रतीचा सरकारी नोकर बनण्यास जे बौद्धिक व नैतिक गुण लागतात ते त्याच्या अंगीं किती आहेत, हें दाखविण्यावर विशेष जोर दिलेला होता. त्या शिफारसपत्रांपैकीं कांहींतील थोडेसे उतारे खालीं देतों.

जॉन स्टुअर्ट मिल्ल असें म्हणतो:—" सरकारी कामाकरितां तुझ्यासारख्या हुशारीच्या व मतांच्या माणसाचें साहाय्य मिळविणें कोणत्याहि प्रधानाला भूषणास्पद होईल, आणि तूं नोकरी करण्यास कबूल असतां त्याचा फायदा न घेणें (सरकारास) अगदीं लज्जास्पद होईल असें मला वाटतें."

डा० हूकर म्हणतो:—" तुझी यथार्थ व विस्तृत माहिती, ज्ञान संपादन करण्याचें तुझें जंगी सामर्थ्य, आणि सृष्टिविषयक व भौति-

क शास्त्रांच्या मुळीं असलेल्या गोष्टी व कल्पना ह्यांचें पृथक्करण करून त्यांस व्यापक स्वरूप देण्यामध्यें व्यक्त होणारें तुझें कौशल्य, ह्यांचा माझ्या मनावर खोल ठसा उमटलेला आहे. शिवाय, हे व्यापक सिद्धांत बनविण्याची तुझी पद्धति जितकी उत्कृष्ट आहे तितकी त्यांचें निरूपण करण्याची सरणीहि विशद आहे....तुझ्या इतर मित्रांप्रमाणें माझीहि अशी फार इच्छा आहे कीं, तुला अशी जबाबदारीची जागा मिळावी कीं, त्या जाग्यावर असतांना, ज्या मोठ्या प्रश्नांमध्यें तुझें लक्ष्य गुंतलेलें आहे ते सोडविण्याच्या कामीं तुला आपल्या वेळाचा बराच भाग खर्च करतां यावा. कारण मला खात्री वाटते कीं, तूं कोणत्याहि ठिकाणीं असलास तरी ह्या शास्त्रांबद्दलचें तुझें प्रेम, तुझी निरीक्षण व विचार करण्याची शक्ति, आणि त्यांचें विवेचन करण्याचें तुझें सामर्थ्य व चापल्य, ह्यांच्या योगानें मानवी ज्ञान व सुख ह्यांस अत्यन्त महत्त्वाचे असे सिद्धान्त तूं बसवूं शकशील. "

प्रोफेसर हक्स्ले म्हणतो:—" शास्त्राचा पाया प्रत्यक्ष घडून येणाऱ्या गोष्टींच्या यथार्थ निरीक्षणावर रचलेला असल्यामुळें, पुरावा जसा गोळा होत जाईल तसें जर त्यास सुसंगत स्वरूप देत गेलें नाहीं तर शास्त्र लवकरच निर्जीव होऊन जाईल; आणि मला वाटतें बेकनच्या 'नवी (तत्त्वविवेचन) सरणी' ह्या ग्रंथाप्रमाणें हल्लींच्या ज्ञानाच्या प्रगतीस जुळणारी, आणि सर्व शास्त्राची सरणी एकच आहे, आणि ज्ञानाचीं सर्व स्वरूपें एकमेकांशीं संबद्ध व परस्परावलंबी आहेत असें दाखविणारी, जर नवी सरणी कोणी प्रसिद्ध करील, तर शास्त्राच्या प्रगतीस तो अत्यन्त जोराचें उत्तेजन देईल.

स्पेन्सरसाहेबाच्या सामर्थ्याबद्दल माझें जें मत आहे तें उत्तम रीतीनें व्यक्त करण्याकरितां मी असें सांगतों कीं, त्याची जर प्रकृति चांगली राहून त्यास बेताची फुरसत मिळाली, तर आपणाक-

रितां ही आवश्यक कामागिरी तो समाधानकारक रीतीनें बजावील."

प्रोफेसर टिंडाल म्हणतोः—" मला असें सांगण्यास आनंद वाटतो कीं तुझ्या लेखांत मला विलक्षण बुद्धियुक्त आणि विलक्षण ज्ञानपूर्ण अशा मनाचा व्यापार दिसून येतो. दुसऱ्या कोणाच्याहि लेखांत तुझ्याहून ज्यास्त खोल व ज्यास्त शुद्ध अशी शोधकबुद्धि मला दिसून आल्याचें माहीत नाहीं. तूं अपरिमित पुरावा देत असतोस, आणि त्याचा उपयोग करण्याची तुझी हतोटी माझ्या मतें बहुतेक अद्वितीय आहे..... म्हणून मी माझीअशी उत्कट आशा प्रदर्शित करितों कीं, ही तुझी विलक्षण शक्ति, आणि जें गोळा करण्यास तुला पुष्कळ वर्षें खपावें लागलें असेल तें तुझें ज्ञान, ह्याचा ज्ञानाची वृद्धि व प्रसार करण्याच्या कामीं तुला उपयोग करतां येईल अशी परिस्थिति तुला प्राप्त व्हावी."

ह्या शिफारसपत्रांबद्दल जीं आभारप्रदर्शक पत्रें त्यानें पाठविलीं त्यांतील दोन आढळतात तीं अशीं आहेत. डा० हूकर यास ता० १६ दिजंबर १८५८ रोजीं तो लिहितोः—" तुझ्या शिफारशीबद्दल आणि सहानुभूतियुक्त शब्दांबद्दल मी मनःपूर्वक तुझे आभार मानितों. तुझी शिफारस अगदीं मला हवी तशी आहे, पण तशी तूं करशील अशी आशा करण्यास माझें मन धजावलें नव्हतें..... मीं परराष्ट्रीय व्यापारी वकिलाची जागा मिळविण्याची खटपट करण्याचें मनांत आणिलें ह्याचें कारण एकवार हें कीं, मला वाटलें, असल्या जाग्यावर मला जरूर ती फुरसत सांपडेल, आणि दुसरें हें कीं सरकारच्या कर्तव्यमर्यादांविषयीं जीं माझीं मतें आहेत त्यांस अनुसरून तसली जागा मला पत्करतां येईल. पण तुझ्या लिहिण्यावरून मला आतां शंकाच येते..... काल सायंकाळीं भरलेल्या भूगर्भशास्त्रविषयक सभेच्या बैठकीस तूं हजर राहशील, व मला तेथें तुझे आभार तोंडानें मानतां येतील असा माझा अंदाज होता, पण तेथें

तूं दिसला नाहींस. त्या बैठकींत हक्स्लेनें चांगलीच मिळविली आणि प्रगतिविषयक जी प्रचलित कल्पना तीस चांगला धक्का बसला."

ता० ३१ दिजंबर १८९८ रोजीं तो हक्स्लेस लिहितो:—
"तुझ्या अत्यन्त मन:पूर्वक शिफारशीबद्दल तुझे योग्य आभार कसे मानावे हेंच मला समजत नाहीं. माझा उद्देश तुझ्या लक्षांत इतका खोल आला असेल अशी मला मुळींच कल्पना नव्हती; आणि तूं तो ज्या रीतीनें व्यक्त केला आहेस त्या रीतीनें व्यक्त करण्यास मला कधींच सुचलें नव्हतें. मीं कधीं कधीं ह्याबद्दलचे सूचक शब्द वापरलेले आहेत हें मला माहीत आहे, पण आलीकडे माझी महत्त्वाकांक्षा इतकी विस्तृत होत आहे कीं, ती पूर्णपणें कोणासहि बोलून दाखविण्यास मला धीर झालेला नाहीं. पण ती कांहीं अंशीं ध्यानांत घेऊन, माझी व्यंगें तुला माहित असूनहि, ती पुरी करण्याच्या दिशेनें मला कांहीं करतां येण्यासारखें आहे असें तुला वाटतें हें पाहून, मी तुला खात्रीनें सांगतों कीं, मला मनस्वी समाधान वाटतें, आणि त्यामुळें माझा उद्योग नेटानें चालविण्यास मला फार उत्तेजन येणार आहे. माझे संकल्प सिद्धीस नेण्याची मला संधि दिल्यानें मोलवान् फलप्राप्ति होईल ही गोष्ट जरी थोडक्यांत शक्य किंवा निदान संभवनीय वाटत असेल अशी मला भीति वाटते तरी, तुझ्यासारख्या योग्यतेच्या माणसानें तशी आपली खात्री व्यक्त करावी ही गोष्ट मला उपयोगी पडल्यावांचून रहाणार नाहीं."

आपल्या ह्या देशाच्या संबंधानें एकादी जागा मिळविण्याच्या उद्देशानें त्यानें तेव्हांचा सेक्रेटरी लार्ड स्टान्ले ह्यास लिहिलें होतें, आणि डिस्रायलीप्रमाणें त्यानेंहि त्यास मदत करण्याची आपली इच्छा दर्शविली होती. म्हणून इंडिया आफिसधून त्यानें पुढील पत्र यास ता. ४ जानेवारी १८५९ रोजीं लिहिलें:–तुझें 'मानसशास्त्र' व 'सोश्यल स्टॅटिक्स' हे ग्रंथ मला पुष्कळ दिवस परिचित आहेत,

आणि माझ्या पुस्तकालयासाठीं मीं त्या ग्रंथाच्या प्रती जरी अगोदरच घेतलेल्या आहेत, तरी तूं पाठविल्या आहेस त्यांचा मीं आनंदानें स्वीकार करितों. हे ग्रंथ फार लक्ष्यपूर्वक मीं वाचिले असल्यामुळें सार्वजनिक नोकरीला तूं बौद्धिक दृष्ट्या योग्य आहेस किंवा नाहींस ह्याबद्दल आणखी पुरावा मला नको आहे; आणि तुझी बुद्धि व उद्योगप्रियता ह्यांचा फायदा सरकारला मिळवून देण्यास मला आनंद होईल. पण तुला असें कळविणें योग्य दिसतें कीं, माझ्या ताब्यांत असल्या नोकऱ्या फारच थोड्या आहेत.... म्हणून तुझी इच्छा पुरी करण्याचें माझें सामर्थ्य फार मर्यादित आहे; पण सरकारी नोकरीच्या कोणत्या विशिष्ट खात्यांत तुझी जागा मिळविण्याची इच्छा आहे हें जर तूं कळविशील तर मला तुला जागा देतां येण्याचा संभव किती आहे हें मी ज्यास्त चांगल्या रीतीनें तुला सांगूं शकेन."

ह्यासंबंधानें ता० २८ मार्च १८९९ रोजीं तो आईस लिहितोः—" कांहीं दिवसांपूर्वीं विलसनशीं माझें संभाषण चाललें असतां मला योग्य फुरसत मिळेल अशा जागा आतां फारच थोड्या आहेत असें त्याच्या तोंडून ऐकून माझी फारच निराशा झाली.... तो म्हणाला, स्टांप वाटणारांच्या तेवढ्याच जागा कायत्या रिकाम्या आहेत."

पोटाचा उद्योग मिळविण्याच्या या खटपटीमुळें ' व्यापाऱ्यांची नीति ' ह्या त्याच्या लेखास अडथळा येऊन तो जानेवारीपर्यंत पुरा झाला नाहीं. कांहीं आठवडे तो घरीं गेला असतां निरनिराळ्या प्रकारच्या ज्ञानाच्या सापेक्ष किंमतींवर त्यानें एक लेख लिहिण्यास सुरवात केली. ब्रिजगेटमधील घरांच्या संबंधानें टौनकौन्सिलला त्याच्या बापास अर्ज करावयाचा होता तो तोंडी सांगून त्यानें लिहून काढविला. आणि अशा रीतीनें सांगून ग्रंथ तयार करण्याचा पहिला प्रयोग त्यानें ह्या वेळीं करून पाहिला.

घराहून ता० १७ फेब्रुवारी १८९९ रोजीं त्यानें मिल्ल यास असें लिहिलें:—"" स्वातंत्र्या 'वरील तुझ्या निबंधाची एक प्रत मला कृपाळू होऊन पाठविल्याबद्दल मी तुझे ह्याच्या अगोदरच फार उपकार मानावयास पाहिजे होते; ते आतां मानितों. आलीकडे शुष्क वक्तृत्व आणि वक्त्यांचें संशयी शील ह्यांनीं ह्या विषयास इतकें विद्रूप करून टाकिलें आहे कीं बऱ्याच लोकांना तो कमज्यास्त प्रमाणानें हास्यास्पद वाटावयास लागला आहे. म्हणून त्या विषयास त्याच्या हलकट पुरस्कर्त्यांच्या हातून सोडविणें फार जरूर होतें; करितां तें काम तुझ्यासारख्या वजनदार माणसानें हातीं घेतलेलें पाहून मला फार आनंद वाटतो. समाजाविरुद्ध व्यक्तींचे हक्क हें जें ह्या विषयाचें अंग त्याचें विवरण करणें फार जरूर होतें, आणि त्याचा तूं विचार केल्याबद्दल मला फारच आनंद वाटतो. दुर्दैवानें स्वातंत्र्याची कल्पना समाजसुधारणेच्या कल्पनेशीं लोकांनीं इतकी गोंधळून टाकिलेली आहे कीं, स्वातंत्र्य आणि लोकसत्ताक सरकार हीं एकच म्हणून लोक समजूं लागले आहेत; आणि जे स्वातंत्र्याचे कट्टे अभिमानी म्हणून आपणास म्हणवितात त्यांपैकीं पुष्कळांचा कल मुख्यत्वेंकरून समाजाचा व्यक्तीवरील जुलूम वाढविण्याकडे आहे. खरोखरच, लोकांची सत्ता वाढल्याचे परिणाम काय होतील ह्याबद्दलची जी मला शंका वाटते, ती कामकरी वर्गाचा फाजील कायदे करण्याकडे जो जोराचा कल तो पाहून वाटते.

सार्वजनिक हक्कांविरुद्ध व्यक्तीच्या हक्कांचें मी जितक्या प्रमाणानें पतिपादन करितों तितक्या प्रमाणानें तूं करीत नाहींस. पण केवळ कल्पनेच्या दृष्टचा जरी तूं ह्याच्या कांहीं पुढें गेला असतास तर बरें झालें असतें असें मला वाटतें, तरी व्यावहारिक दृष्टीनें तुझ्या निबंधांत व्यक्तिस्वातंत्र्याचें केलें आहे त्याहून ज्यास्त विधान केलेलें नाहीं ह्याचा मला आनंद वाटतो; कारण त्यायोगानें बहुतेक सर्व

वाचकांना त्याचें महत्त्व एरवीं वाटलें असतें त्याहून ज्यास्त वाटेल. आलीकडे कायद्यांच्या द्वारा लोकांच्या स्वातंत्र्यांत हात घालण्याचा जो सपाटा दिसतो तो कमी करण्याच्या कामीं त्याचा मोठा उपयोग होईल अशी मला आशा आहे. आणि ह्या बाबतींत सार्वजनिक मत सुधारण्यापेक्षां ज्यास्त महत्त्वाची कामगिरी कोणतीहि असेल असें मला वाटत नाहीं."

पुढील पत्रांत पार्लमेंतीय सुधारणेवरील त्याच्या चोपड्याची प्रत पोहोंचल्याचें स्पेन्सरनें कळविलें आहे. तें ता० २९ मार्च १८५९ रोजीं लिहिलेलें असून, असें आहे:—जे अमुक अमुकपर्यंत शिकलेले असतील त्यांस मतदानाचा हक्क असावा असें जें तूं म्हटलें आहेस त्याबद्दल काय म्हणावें तें मला समजत नाहीं; पण एकंदरींत माझा कल त्याच्याविरुद्ध आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष ठरवण्याच्या कामीं बऱ्याच अडचणी येतील असें मला वाटतें, पण ती गोष्ट एकीकडे ठेविली तरी केवळ प्राथमिक शिक्षण ही मत देण्यास जरूर त्या अकलेची विश्वसनीय कसोटी मानतां येईल किंवा नाहीं ह्याबद्दल मला शंका वाटते. मला वाटतें, ज्यांस लिहितां वाचतां येत नाहीं ते कायदे करण्याच्या बाबीबद्दलच्या एकंदर गोष्टींत जितके पूर्ण अजाण असतात, तितकेच ज्यांस केवळ प्राथमिक शिक्षण मिळालेलें आहे त्यांतील बहुतेकजण असतात. स्वस्तीं वर्तमानपत्रें जशीं पसरत जातील तशी ही स्थिति कदाचित् बदलेल; पण हल्लीं तरी मी म्हणतों अशी गोष्ट आहे असें मला वाटतें. शिवाय ज्या हलक्या कारागिरांनीं आपल्या शिक्षणाचा कांहीं उपयोग केलेला आहे आणि जे राजकीय कामांत लक्ष्य घालतात, ते मतदार वर्गांत थोडे फार आल्यानें त्या शिक्षणामुळें मतदाराचें काम ज्यास्त चांगलें न करतां बहुधा ज्यास्त वाईटच करितील. कारण बाकीच्यांना जर कांहीं ज्ञान नाहीं, तर ह्यांचें ज्ञान बहुधा चुकीचें

असतें. ज्या लेखांतून त्यांस अशक्य फायदे करून देण्याचें अभिवचन दिलेलें असतें तें त्यांस इतरांहून ज्यास्त आवडत असल्यामुळें आणि तेवढेंच ते वाचीत असल्यामुळें त्यांच्या मनांत अगदीं भलत्याच आशा उत्पन्न होतात, आणि त्यांविरुद्ध कोणीं टीका केल्यास ते तिकडे दुर्लक्ष्यच करितात; आणि बहुतकरून त्या उत्तमोत्तम राज्याच्या आशा सफल करण्याकरितां ते राजकीय सत्तेची इच्छा करीत असतात. चाह्मार हे हुशार कामगारांपैकीं असून त्यांनीं हल्लीं जोडे शिवण्याच्या यंत्राविरुद्ध कट केला आहे, ह्यावरून सामाजिक चमत्कारांच्या बाबतींत ते शेतमजुरांपेक्षां ज्यास्त शहाणे नाहींत असें स्पष्ट दिसतें. ह्या प्रश्नाचा विचार मीं काळजीपूर्वक केलेला नसून हे विचार केवळ सुचतील तसे मीं मांडिले आहेत. गुप्त मतदाराच्या संबंधानें माझें मत बरेंच डळमळीत झाल्याचें मी कबूल करितों, कदाचित् माझें मत त्यास अनुकूलच झालें आहे असें म्हणतां येईल. लोकप्रतिनिधी निवडण्याच्या बाबतींतील एक मुद्दा मला सर्वांत ज्यास्त महत्त्वाचा दिसतो, त्याकडे मी तुझें लक्ष्य पुरवूं काय? तो हा कीं, ज्यांस मतदानाचा हक्क असेल त्यांनीं कर दिलेच पाहिजेत. अलीकडे वस्तुस्थितीचा कल ह्याच्या अगदीं उलट दिशेनें आहे. लहान घरवाल्यांवरील प्रत्यक्ष कर ज्यास्त ज्यास्त कमी होत असून त्यांची राजकीय सत्ता कायमच आहे. कांहीं वर्षांपूर्वीं त्यांच्या जमीनदारांनीं स्थानिक करांबद्दल एकदम एकच रक्कम देण्याचें ठरविलें तेव्हां त्यांचा मतदान हक्क काढून घेतला होता; पण हल्लीं स्थिति उलट आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, शास्ते लोक जितकीं ज्यास्त कामें अंगावर घेतील तितकी कराची मागणी वाढत जाते हा जो त्या दोहोंमधील संबंध अत्यन्त अनुकूल परिस्थितींतहि अगदीं अंधकपणें लोकांच्या लक्ष्यांत येत असतो, तो कामकरी वर्गाच्या मनाला कमी कमी परिचित व्हावयास लागला आहे. ह्यामुळें सहजच

फाजील कायदे करण्याकडे शास्त्यांचा कल वाढत चालला आहे. म्युनिसिपालिट्यांच्या संबंधानें ही गोष्ट हल्लीं ढोबळ रीतीनें दिसूं लागली आहे. म्युनिसिपल कर लहान घरांचे मालक देत असल्यामुळें, आणि म्युनिसिपल खर्च वाढल्यास आपल्यास ज्यास्त कर द्यावे लागतात असा प्रत्यक्ष अनुभव त्या घरांतील भाडोत्र्यांस येत नसल्यामुळें, म्युनिसिपालिटीच्या खर्चानें सार्वजनिक बागा, सार्वजनिक स्नानाच्या जागा, वगैरे तयार करण्याकडे स्थानिक अधिकाऱ्यांचा कल वाढत आहे; कारण असल्या गोष्टी करूं म्हणून अभिवचन दिल्यानें उमेदवार लोकप्रिय बनून त्यांस ज्यास्त मतें मिळतात. ज्यांच्या हातीं राजकीय सत्ता आहे त्या सर्वांच्या मनावर ही गोष्ट जर अगदीं स्पष्ट व प्रत्यक्ष रीतीनें सारखी ठसत राहिली कीं, स्थानिक किंवा मुख्य सरकार जसजशी एकेक ज्यास्त गोष्ट करावयाचें अंगावर घेईल, तसतसा आपल्यास तितका ज्यास्त कर द्यावा लागतो, तर ज्या त्या कामांत हात घालण्याच्या ह्या सरकारच्या प्रवृत्तीस चांगला आळा बसेल. मला असें फार वाटतें कीं, ज्या मानानें कर प्रत्यक्ष होत जातील, आणि त्यांची वांटणी न्याय्य होत जाईल, त्या मानानेंच मतदानाचा हक्क ज्यास्त ज्यास्त लोकांस देणें सुरक्षितपणाचें होईल."

ह्या वर्षीं त्याचा मित्र स्मिथ याच्याकडे आक्रानिश एथें जाण्यापूर्वीं सहा आठवडे तो घरीं रहावयास गेला होता, त्या मुदतींत त्यानें भूगर्भशास्त्रावर एक लेख सांगून लिहून काढिला. पुढें तिकडे गेल्यावर त्यानें आईबापांस लिहिलेल्या पत्रांतून पुढील उतारे देतों.

ता० २१ जुलई—"एथील सर्व माणसें मला फार ममताळूपणानें वागवितात, आणि सर्व गोष्टी अगदीं माझ्या मनाप्रमाणें होत आहेत. एथील हवा फारच सुरेख आहे, आणि वनश्रीचा देखावा एथें फारच सुंदर आहे."

ता० ७ आगस्ट—" पूर्वीप्रमाणेंच ही हवा मला जरा हलक करणारी आढळून येते, पण मला झोंप चांगली येत आहे, आणि सुख फार होत आहे........ भूगर्भाचें आणि विशेषतः रूपान्तर पावणाऱ्या खडकांचें निरीक्षण करण्यास हें स्थान फार उत्तम आहे. थोड्याच आवारांत अनेक प्रकारच्या खडकांच्या घटना एथें दिसून येतात. "

ता० ४ सपटंबर—" जोंपावेतों तुला बरें वाटेल तोंपावेतों तूं एथें रहा असा मिसेस स्मिथनें मला आग्रह केला आहे....माझी प्रकृति सामान्यतः बरी आहे, पण या ओलसर हवेनें मी जरा जडबुद्धि बनलों आहें. "

ता० १३ सपटंबर—" व्हॅलेंटाईन स्मिथबरोबर माझा तिकडे येण्याचा विचार होता, पण तो मंगळवारपर्यंत निघत नाहीं, आणि तो निघेपर्यंत राहण्यास घरांतील माणसांनीं माझें मन वळविलें आहे........ कालची आमची सफर माझ्या सगळ्या कारकीर्दींत अत्यन्त रमणीय झाली. आह्मी, बारा जणें, होडींत बसून सनार्ट व टीक्किस या सरोवरांपर्यंत मल्लच्या खाडींतून गेलों, आणि चालत परत आलों. मार्गांत देखावा फारच सुंदर असून रंग तर विलक्षणच दिसत होते. एकंदरींत कालचा दिवस माझ्या निरंतर स्मरणांत राहील. "

' मानसशास्त्र ' लिहिल्यानंतर अठरा महिनेपर्यंत समाजांत मिसळण्याची जी त्यास भीति वाटत असे ती आतां निघून गेली होती. उदाहरणार्थ ता० १४ नवंबर रोजीं तो लंदनाहून लिहितोः—" गेल्या मंगळवारीं सायंकाळीं दुसऱ्या कांहीं जणांबरोबर ' आथिनियम'चा संपादक हेपवर्थ डिक्सन याच्याकडे मी जेवावयास गेलों होतों....शनिवारीं सर जे० ट्रेलॉनि याच्याकडे जेवलों; आणि काल मॅसनकडे जेवलों. तथापि माझी प्रकृति आज फार चांगली आहे. मला नेहमींप्रमाणें लंदनच्या हवेपासून फायदा वाटत आहे. मला

वाटतें, लंदनांत फरसबंदी केलेली व झांकलेली जागा इतके मैल असल्यामुळें तेथील हवा शुष्क होऊन इतकी निरोगी बनलेली आहे."

ही सर्व स्थिति अर्थात् कामास अनुकूल होती. म्हणून त्यानें 'मनोवृत्ती आणि इच्छा' ह्या बेनच्या ग्रंथावर अभिप्राय लिहून, शिवाय, "सामाजिक इंद्रियजाला" वर एक निबंध पुरा केला. आणि 'तुरुंगांतील नीति' ह्या विषयावर एक सुरू केला. 'म्याकमिलन्स मागाझीन' ह्या मासिकास निबंध लिहून देण्यास मॅसननें सांगितल्यावरून त्यानें 'इंद्रियविज्ञानाचें भौतिक' असा निबंध लिहिण्याचें मनांत आणिलें, पण त्याऐवजीं 'हास्याचा इंद्रियविज्ञानदृष्ट्या विचार' ह्या विषयावर त्यानें एक निबंध लिहिला. पुढें पुष्कळ वर्षांनीं, पहिल्या विषयाचा उल्लेख ज्याच्यांत केला आहे असें बापास या वेळीं लिहिलेलें पत्र जेव्हां त्याच्या पाहण्यांत आलें, तेव्हां त्यानें त्यास पुढील टीप जोडून ठेविली:—"अशा प्रकारचा लेख लिहिण्याची कल्पना इतके वर्षांपूर्वीं माझ्या डोक्यांत आली होती हें माझ्या लक्ष्यांत नव्हतें. पण ह्या विषयाचें विशेष विवेचन करणें जरूर आहे असें तेव्हांपासून माझ्या मनांत वरचेवर आलेलें आहे. जीवशास्त्राच्या ह्या भागावर एक मोठा ग्रंथ लिहिण्यास पुष्कळच जागा आहे. डाक्टरांपैकीं पुष्कळजणांना सृष्टपदार्थविज्ञानाचें ज्ञान नसतें, आणि योग्य ज्ञानाच्या अभावीं पुष्कळ इंद्रियविज्ञानविषयक चमत्कारांचा अर्थ त्यांस होत नाहीं किंवा भलताच करितात. अशा प्रकारचा हा ज्ञानाभाव फारच लोकांत दिसतो, आणि म्हणून सामान्य भौतिक नियमांखालीं येणाऱ्या सेंद्रिय व्यापारांचें शास्त्रीय दृष्ट्या विवेचन करणें आवश्यक आहे."

पोटाची काळजी राहणार नाहीं, आणि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथसरणी लिहिण्यास जरूर ती फुरसत सांपडेल, अशी जागा मिळल्यासंबंधाची त्याची सर्व आशा १८६० च्या आरंभाला अगदीं

नाहींशी झालेली होती. अशा परिस्थितींत दुसऱ्या कोणींहि तत्त्वज्ञानास बहुधा रामराम ठोकिला असता, आणि केवळ पोटाच्या उद्योगाची वाट धरिली असती. पण स्पेन्सरनें तसें केलें नाहीं. ता० २० जानेवारी १८६० रोजीं बापास लिहिलेल्या एका पत्रांत, 'वेस्टमिन्स्टर'ला पार्लमेंतीय सुधारणेवर एक लेख लिहिण्याचें आपण कबूल केलें आहे असें सांगून, तो पुढें लिहितो:—" थोड्याच दिवसांत, तूं आश्चर्यभरित होशील असें कांहीं मी तुला पाठविणार आहें. " हा उल्लेख अर्थात् त्याच्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांच्या रेखाटणीला होता. ती पाठवितांना त्यानें बापास लिहिलें कीं, " सध्या ती कोणास दाखवूं नको; ती प्रसिद्ध करण्यापूर्वी मी कांहीं जणांचीं मतें घेणार आहें. " त्या रेखाटणीच्या प्रारंभीं असे शब्द होते:—" जे तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ लिहिणारे मोठें नुकसान सोसण्यास असमर्थ असतात, किंवा अगोदरच ज्यांनीं होतें नव्हतें तें त्या कामांत घातलेलें असतें, त्यांनीं एक मौनव्रत धारण केलें पाहिजे, किंवा वर्गणीदार जमवून स्वग्रंथप्रकाशन केलें पाहिजे. म्हणून आज कित्येक वर्षें मनांत तयार होत असलेली ग्रंथमाला आलिखित ठेवण्यापेक्षां दुसऱ्या मार्गाचें अवलंबन करण्याचें मीं मनांत आणिलें आहे. "

ह्या सुमारास (नवंबर १८५९ मध्यें) डार्विनचें ' उपजातीचा उद्गम ' हें पुस्तक प्रसिद्ध झालें होतें, आणि त्याची एक प्रत त्यानें स्पेन्सर यास लागलीच पाठविली होती, पण ती फेब्रुवारी १८६० पर्यंत त्यास मिळाली नाहीं. त्याच्या अगोदरच ही रेखाटणी तयार झालेली होती. तो ग्रंथ वाचल्यावर त्यांतील कोटिक्रम लोकसंख्यावृद्धीवरील आपल्या निबंधांतील कोटिक्रमाशीं अगदीं जुळतो असें पाहून त्याची एक प्रत यानें त्यास पाठवून दिली, आणि त्याचा ग्रंथ पोहोंचल्याबद्दलहि एक पत्र लिहिलें. त्यावर ता० २३ फेब्रुवारी १८६० रोजीं डार्विन त्यास लिहितो:—" तुझ्या पत्रा-

बद्दल आभार मानण्यास एक ओळ लिहितों. माझ्या ग्रंथावर ज्या अनेक गृहस्थांनीं मला खासगी रीतीनें आपले अभिप्राय कळविले आहेत त्यांपैकीं तूंच माझ्या कोटिक्रमांतील रहस्य बरोबर रीतीनें प्रदर्शित केलें आहेस. म्हणजे ती एक अशी क्लृप्ति आहे कीं तेणें-करून बऱ्याच प्रकारच्या गोष्टींचें स्पष्टीकरण होतें हें तूं ध्यानांत घेतलें आहेस. तूं आपल्या निबंधांत निवडीचें तत्त्व फारच चटकदार व विशद रीतीनें मांडिलें आहेस. ”

कांहीं वर्षांपूर्वी आपले ग्रंथ अमेरिकन वाचकांपुढें ठेवण्याचा बेत त्यानें केला होता, तो अमलांत आणण्यास ही रेखाटणी पाठविण्या-चा प्रसंग त्यास अनुकूल वाटला. म्हणून त्या बाबतींत त्यानें आ-पला अमेरिकेंतील स्नेही मि० सिल्स्बी यास लिहिलें; त्याचें उत्तर जरी अस्पष्ट होतें तरी निरुत्साहकारक नव्हतें. पुढच्या एका पत्रांत त्यानें एडवर्ड सिव्हिंग्स्टन यूमन्स याचें नांव स्पेन्सर यास सुचविलें. कांहीं वर्षांपूर्वीं ‘ मानसशास्त्रा’वरील एक अभिप्राय वाचून यूमन्सचें याच्या ग्रंथांकडे लक्ष्य गेलेलें होतें. त्यानें स्पेन्सरची रेखाटणी वाच-ल्याबरोबर ता० २३ फेब्रवारी रोजीं त्यास पहिलें पत्र पाठविलें, व त्यांत त्यानें त्यास मनःपूर्वक साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें.

पार्लमेंतीय सुधारणेवरील निबंध एप्रिलांत प्रसिद्ध झाला, आणि तुरुंगांतील नीतीवरील जुलईंत प्रसिद्ध झाला. आपलें महत्त्वाचें ता-त्त्विक ग्रंथसरणीचें काम हातीं घेण्यापूर्वीं क्वार्टर्ली रिव्ह्यूंना यानें लि-हिलेल्या निबंधांपैकीं पार्लमेंतीय सुधारणेवरील निबंध अखेरचा होय. त्याच्या रचनेबद्दल एका टीपेंत तो म्हणतोः—“ हा निबंध मीं प्र-सिद्ध केलेल्या एकंदर निबंधांमध्यें अत्यन्त त्वरेनें लिहिलेला होता. त्यावेळीं मी एक लेखक लाविलेला असून तो लघुलिपींत लिहूं शकत असे, आणि मजकूर सांगतांना मी थांबलों म्हणजे तेवढ्या अवधींत लघुलिपींतील मजकूर दीर्घलिपींत लिहून काढीत असे. एणेंकरून अ-

र्थात् वेळ पुष्कळ वांचे; आणि मला असें वाटतें कीं त्यावेळीं तासास मी एका छापील पानाचा मजकूर तयार करीत असें. इतक्या जलद ग्रंथरचना ह्यापूर्वीं किंवा ह्यानंतर माझ्या हातून कधींहि झाली नाहीं. ”

प्रकरण नववें

—:o:—

आदितत्त्वें

—:०:—

त्यानें जो तात्त्विक–ग्रंथ–रचनारूपी दीर्घपथ आक्रमण्याचें ठरविलें होतें त्यांत पहिलें पाऊल टाकिल्याचा पुरावा ता० ८ मे १८६० रोजीं त्यानें बापास लिहिलेल्या पुढील पत्रांत आढळून येतो:–“ माझें हल्लींचें बिऱ्हाड बरेंच सुखाचें आहे. मी काल लिहिण्यास सुरवात केली, आणि अजमासापेक्षां ज्यास्त चांगलें लिहिलें. वर्गणीदारांची संख्या आतां २८० झाली आहे. होलीओकने (एक प्रसिद्ध सामाजिक सुधारक) वर्गणीदार येत आहेत; आणि अमेरिकेंतील वर्गणीदार सोडून ३९० वर्गणीदार जमतील ह्याबद्दल मला शंका वाटत नाहीं. ”

ह्या कामास सुरवात करून फार दिवस झाले नाहींत तोंच त्याच्या डोक्यांत पुन: बिघाड होऊन त्याला कांहीं दिवस ब्रायटन एथें जाणें भाग पडलें. उन्हाळ्याच्या दिवसांत ट्रेपोर्ट येथें बापाबरोबर जाण्याचें त्यानें कबूल केलें होतें, पण आपणास तसें करतां येत नाहीं म्हणून पुढच्या महिन्यांत त्यानें त्यास लिहिलें. त्या पत्रांत तो म्हणतो:—“ विशेषत: मीं हल्लीं अंगावर घेतलेल्या कामाच्या दृष्टीनें पाहतां प्रकृति संभाळणें ही सर्वांत मुख्य गोष्ट आहे; आणि

माझें असें निखालस मत झालेलें आहे कीं फ्रान्समध्यें (ट्रेपोर्ट एथें) जाण्यापेक्षां लॉटच्या मंडळीबरोबर लाण्डुडनो एथें जाणें माझ्या प्रकृतीस ज्यास्त फायदेशीर होईल.... शिवाय, त्यांत माझा खर्च कमी होईल, आणि तीहि एक महत्त्वाचीच गोष्ट आहे. ” सरते शेवटीं खर्चाचा विचार एकीकडे ठेवून तो दोन्ही ठिकाणीं गेला; प्रथम लॉटकडे, आणि नंतर आईबापांकडे; आणि जुलईत लंदनास परत आला. अमेरिकेंत वर्गणीदार चांगले जमत आहेत व ते मोठमोठाले लेखक आहेत असें या वेळेस यास पत्र आलें, आणि त्यामुळें पैशाच्या प्रश्नाची काळजी कमी झाली.

सपटंबरमध्यें आक्रानिश एथें जात असतां मध्यें तो कांहीं दिवस घरीं राहिला. या सुमारास त्याच्या “ आदितत्त्वें ” ह्या ग्रंथाचें प्रूफ हक्स्लेकडे त्यानें पाठविलेलें परत आलें; तेव्हां त्यास तो ता० ११ सपटंबर १८६० रोजीं डार्बीहून लिहितोः—“ तुला हा लेख इतका पसंत पडल्याचें तूं लिहितोस हें पाहून मला अत्यन्त आनंद होतो हें सांगावयास नकोच. तूं इतका दोषदृष्टी व संशयी असल्यामुळें तुझी पसंती पाहून मला अमळ आश्चर्यच वाटलें; आणि ज्यास्तच आश्चर्य वाटण्याचें कारण हें कीं, हा पहिला भाग (अज्ञेयमीमांसा) वर्गणीदारांच्या घशांतच अडकेल अशी मला शंका होती हें होय. तेव्हां तुझें पत्र वाचून मला किती समाधान वाटलें असेल याचा तूंच विचार कर. ”

या सुमारास हक्स्लेचा लहान मुलगा वारला; त्यास अनुलक्षून ता० २३ सपटंबर रोजीं आक्रानिशहून पुढील पत्र त्यानें लिहिलें:—“ तुला व तुझ्या बायकोला तुमचा लहान मुलगा किती प्रिय होता हें मला माहीत होतें, म्हणून तुमचें जें हें मोठें नुकसान झालें आहे त्याबद्दल मला मनःपूर्वक तुमच्याबद्दल सहानुभूति वाटते. तो झाल्यापासून पूर्वीं सुप्त असलेली तुझ्या स्वभावाची एक नवी जबा

तुला कशी दिसूं लागली ह्याबद्दल तूं मला सांगितलेलें मला चांगलें आठवतें; आणि म्हणून केवळ उपजतबुद्धिदृष्ट्याच नव्हे, तर विचारदृष्ट्याहि ज्यास अपत्यवात्सल्य इतकें खोल वाटत होतें त्यास अशा ह्या घातामुळें किती वाईट वाटलें असेल ह्याची मला चांगली कल्पना होते."

प्रो० हक्स्ले किंवा डॉ० हूकर हे वर्गणी देणारे आपल्या ग्रंथांचे ग्राहक व्हावे ह्या गोष्टीस तो खुशीं नव्हता, आणि त्याचीं कारणें त्यानें ता० ६ आक्टोबर १८६० रोजीं हक्स्लेला लिहिलेल्या पुढील पत्रांत दिलीं आहेत:—"तुझ्यापासून माहिती, सल्ला आणि टीका ह्या रूपांनीं मला पुष्कळ मदत मिळेल हें मी पहिल्यापासूनच ध्यानांत घेतलेलें आहे; आणि तुझी परवानगी असेल तर तुला प्रश्न विचारून आणि तुझ्याशीं चर्चा करून मी तुला वेळोवेळीं बराच त्रास देणार आहें. अशा स्थितींत ग्रंथाची एक प्रत तुला नजर केल्यानें तुझे उपकार जरी काडीभरहि कमी होणार नाहींत, तरी अशा रीतीनें ते रीतसर मानणें ह्यांत एकप्रकारचें समाधान आहे, आणि हें समाधान मला प्राप्त करून देण्याचें त्वां नाकारतां कामा नये."

ता० २९ आक्टोबर १८६० रोजीं मिसेस पॉटरला त्यानें पुढील पत्र लिहिलें:—"जॉवेट आणि कंपनी ह्यांनीं नुक्ताच प्रसिद्ध केलेला "निबंधसंग्रह" तूं पाहिलास काय? ते निबंध बरीच चळवळ करीत आहेतसें दिसतें. ते कांहीं अत्यन्त वजनदार धर्माधिकाऱ्यांनीं लिहिलेले असल्यामुळें मताची प्रगति ह्या दृष्टीनें ते अत्यन्त अर्थप्रचुर आहेत.....जातां जातां, एक नवीन शोध लागला आहे त्याचा रूढधर्मविषयक मतांशीं संबंध असल्यामुळें तो तुला कळवून मला तुला घाबरवून टाकूं दे. नुक्ताच जर्मनींतून सर चार्लस लायेलकडे एका नरोटीचा सांचा आलेला आहे, ती नरोटी अगदीं अर्वाचीन

अशा भूगर्भविषयक युगांतील मॅमथ वगैरे इतर प्राण्यांच्या सांगाड्याबरोबर सांपडली. आणि जीं गारेचीं हत्यारें नुक्तींच सांपडून आणि मानव प्राणी पृथ्वीवर अत्यन्त जुना आहे असें सिद्ध करून इतकी चळवळ उत्पन्न करतीं झालीं आहेत, त्याच काळची ही नरोटी तिच्या बरोबर सांपडलेल्या इतर अवशेषांवरून दिसत असून ती गॉरिला व माणूस ह्यांच्या नरोट्यांच्या मधली आहे का ! आहे कां नाहीं तुला चकीत करणारी गोष्ट ! ह्यानंतर आणखी कांहीं लिहिणें म्हणजे गोडावर आंबटच चाखण्यासारखें होईल, म्हणून इतकेंच पुरें करितों. मि० पाटर व मुली ह्यांस माझें सखोल प्रेम विदित कर. ”

त्याच्या ग्रंथमालेचा पहिला अंक निघण्यास विलंब लागल्यामुळें अमेरिकेंतील वर्गणीदारांच्या संख्येस कदाचित् धक्का बसेल अशी त्यास भीति पडली, पण तशी भीति मानण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्यास यूमन्सनें आश्वासन दिलें.

तो लंदनास परत येऊन कामास लागतो न लागतो तों त्याचा चुलता विलियम आजारी पडल्यामुळें त्यास डार्बीस पुनः परत जावें लागलें. त्या आजारांत नवंबर अखेर त्याचा अंत झाला. त्यानें याला पैसे ठेविले होते त्यांचा उपयोग त्याच्या ग्रंथप्रकाशनाच्या कामीं व्हावयाचा होता. हल्लीं त्यास इतके वर्गणीदार मिळाले होते कीं त्यांची संख्या कमी न होतां सर्वांनीं वर्गणी दिल्यास प्रकाशनाचा खर्च निभावून त्यास थोडी पैदास होण्याचा संभव होता. पण इतक्यांतच वर्गणीदार कदाचित् कमी होतील अशी भीति वाटूं लागली होती; म्हणून चुलत्याची ही देणगी वेळेवरच आली म्हणावयाची.

१८६१ च्या प्रारंभीं त्याच्या ग्रंथमालेचा दुसरा अंक निघाला व तो लोकांस फार पसंत पडला. या वेळीं तो अनेक व्याख्यानें

ऐकावयास जात असे, आणि त्यामुळें त्याची प्रकृति पुनः बिघडेल अशी त्याच्या बापास भीति पडली. १३ फेब्रुवारी व १४ जून ह्यांच्या दरम्यानचें मुळींच पत्र उपलब्ध नाहीं, पण तिसरा अंक निघाला त्या सुमारास तो पुनः आजारी पडून स्टँडिश व डार्बी येथें विश्रांति घेण्यास गेल्याचें दिसतें; आणि तेथें असतां, शिक्षणावरील निबंध सुधारून मे व जून मध्यें त्यानें ते छापून काढिले. नेहमींप्रमाणें आक्रानिश एथें जुलई व आगस्टमध्यें गेल्यानें त्याची प्रकृति सुधारली, आणि तेथून परत आल्यावर आपल्यास जोरानें काम करतां येईल अशी त्यास उमेद वाटली; पण ती टिकली नाहीं; कारण लंदनास परत आल्यावर चवथा अंक छापून काढण्याच्या ताणानें त्याची प्रकृति पुनः ढांसळली. आक्टोबरच्या पंधरावीस पारीस एथें जाण्याचा तो विचार करूं लागला, आणि नवी हवा, नवा देखावा, पूर्ण विश्रान्ति, आणि विपुल कर्मणूक यांनीं आपली प्रकृति तेथें सुधारेल अशी त्यास आशा वाटली. त्याप्रमाणें तेथें त्यास बरें वाटलें असें दिसतें, कारण तेथून परत आल्यावर ता० १२ दिजंबर रोजीं लंदनांतून लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो:—" माझी प्रकृति बरीच सुधारत आहे; आणि ह्या आठवड्यांत त्रास न होतां माझ्या हातून बरेंच काम झालें आहे. "

मे महिन्यांत तो आपल्या बापास लिहितो कीं, " समतोलना" वरील प्रकरण मी हल्लीं दुरुस्त करीत असून त्यास सुंदर स्वरूप येत आहे; पण त्याबद्दल मला बराच त्रास होत आहे. " हा विषय त्यास आज एकदोन वर्षें त्रास देत होता असें दिसतें, कारण १८९९ च्या प्रारंभाच्या सुमारास प्रो० टिंडाल यास लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतो:—" गेल्या शनिवारीं सायंकाळीं जी चर्चा आपण सुरू केली ती काफी पिण्याचें आमंत्रण येऊन मध्येंच बंद पडली नसती तर आणखी बराच वेळ माझ्या मनांत चालवावयाची होती

माझ्या म्हणण्यासंबंधानें तुझा गैरसमज होऊं नये म्हणून त्या वेळीं जें मला म्हणावयाचें होतें तें येथें थोडक्यांत सांगतों. पहिली गोष्ट ही कीं, अन्तिम समतोलाकडे (विश्वाचा) कल आहे ही गोष्ट मी पूर्णपणें लक्ष्यांत घेतों, व नेहमींच घेतलेली आहे; आणि म्हणून रूपान्तराच्या सामान्य नियमांवर कित्येक प्रकरणें लिहिल्यानंतर ' शक्तींचें समतोलन ' या नांवाचें अखेरचें प्रकरण लिहिलें आहे. खरोखर, अलीकडील कांहीं वर्षांत ज्या व्यापक कल्पना माझ्या मनांत बनत आहेत त्यांत ही कल्पना सर्वांच्या अगोदर मला सुचलेली आहे. १८९१ च्या अखेरीस किंवा ९२ च्या प्रारंभीं ' सोश्यल स्टॅटिक्स ' च्या दुसऱ्या आवृत्तीकरितां केलेल्या कांहीं टिपणांत ही व्यापक कल्पना समाजास लाविली असतां काय परिणाम होतात ह्या गोष्टीस कांहीं उल्लेख केलेला सांपडतो. ह्यावरून तुझ्या लक्ष्यांत येईल कीं, अन्तिम समतोलनाची कल्पना माझ्या एकंदर कल्पनांशीं पूर्णपणें अनुरूप अशीच आहे.

गेल्या जूनमध्यें आणि गेल्या शनिवारीं तुझ्या बोलण्यांत मला जें नवें भासलें तें हें कीं, समतोलन म्हणजे मरण होय. समतोलन ही समाजाची अन्तिम आणि उच्चतम स्थिति होय असें मी मानीत आलों असल्यामुळें ती विश्वाचीहि केवळ अन्तिमच नव्हे तर **उच्चतमहि** अवस्था होय असें मीं गृहीत केलें होतें. म्हणून समतोलन उत्पन्न झालें म्हणजे जीवित बंद झालें पाहिजे हें जें तुझें म्हणणें त्यानें मी घाबरून गेलों. खरोखरच, हा सिद्धान्त कसा टाळावा हें माझ्या लक्ष्यांत येत नसल्यामुळें, त्यानंतर कांहीं दिवस मी अगदीं उदास झाल्याचें मला स्मरतें. अद्यापि मला त्या बाबतींत अनिश्चितपणा वाटतो, आणि म्हणून एक दिवस त्याबद्दल तुझ्याशीं चर्चा करण्याचें माझ्या मनांत आहे. "

" आदितत्त्वां " चा पुरा केलेला खंड जूनच्या तिसऱ्या आठ-

वडयांत प्रसिद्ध झाला, आणि नंतर तो विश्रांति घ्यावयास लागून आपले आईबाप व इतर ह्यांस प्रदर्शन दाखविण्यांत वेळ घालवूं लागला. ह्या वर्षाच्या उन्हाळ्यांतील त्याची सफर बहुतेक पायीं झाली असल्यामुळें तिचें ' आत्मचरितां ' त त्यानें विशेष सविस्तर वर्णन दिलेलें आहे. ह्या वेळेस डा० यूमन्स व त्याची बायको हीं अमेरिकेहून आलेलीं असल्यामुळें त्यांस ग्लासगो येथें जाऊन मिळण्याचें त्यानें ठरविलें, आणि त्यामुळें ही आनंदाची सफर नेहमींपेक्षां त्यास आखडती घ्यावी लागली. त्यांच्या समवेत थोडे दिवस राहून तो लंदनाकडे यावयास निघाला, आणि वाटेंत डार्बी व कॉव्हेंट्री येथें कांहीं दिवस घालवून सपटंबरच्या पंधारावीच्या सुमारास तेथें येऊन पोहोंचला.

लंदनाबाहेर असतां आपल्या पुस्तकावर अभिप्राय काय येतात इकडे त्याचे डोळे लागले होते. तो जुलैंत लिहितो कीं, " ' आदितत्त्वें ' ह्यावरील एकहि अभिप्राय अद्यापि मजकडे आलेला नाहीं. तो ग्रंथ असा आहे कीं त्याच्यावर अभिप्राय देणें जितकें लांबणीवर टाकतां येईल तितकें चांगलें, असें अभिप्राय देणारांस वाटतें. " पुढें आक्टोबरांत कित्येक अभिप्राय आले. त्यांतील एक त्या महिन्याच्या " न्याशनल रिव्ह्यू " त ' शास्त्र, नशास्त्र आणि धर्मविश्वास ' ह्या नांवानें आला; त्याला ता० ३ आक्टोबर १८६२ रोजीं बापास लिहिलेल्या एका पत्रांत तो असा उल्लेख करितो:—" तो उघडच मार्टिनोनें लिहिलेला आहे. तो तूं अखेरपर्यंत वाचिलास म्हणजे तुझ्या लक्षांत येईल कीं, मी त्याच्यावर हल्ला केला होता त्याजबद्दल सूड घेण्याच्या बुद्धीनें त्यानें तो लिहिला आहे. तो अर्थात् चातुर्यानें लिहिला आहे; पण त्यांत त्याच्या लेखांत नेहमीं येणारीं कांहीं जेस्विट लोकांसारखीं अप्रामाणिक विधानें दिसतात—म्हणजे, मीं केलीं नाहींत अशीं विधानें त्यानें माझ्या अंगीं लाविलेलीं आहेत,

आणि मीं केलेल्या विधानांचा भलताच अर्थ केलेला आहे.....वे-स्टमिन्स्टर रिव्ह्यूंत माझ्या पुस्तकावर तीन पानी अभिप्राय आलेला आहे.....पण अजमासाप्रमाणें तो गुळमुळीतच आहे.

ब्रिटिश क्वार्टर्लीमध्यें चांगला अभिप्राय आलेला पाहून मला आश्चर्य वाटतें. "शास्त्र" ह्या सदराखालीं त्यांत अंतःकरणपूर्वक अभिनंदनपर थोडासा अभिप्राय आला असून, पुढच्या अंकांत त्यावर एक निबंधच लिहिण्याचें अभिप्राय देणारानें अभिवचन दिलेलें आहे. एवंच ज्यांच्यापासून मीं अत्यन्त विरोधाची अपेक्षा केली होती त्यांनीं अत्यन्त अभिनंदन करावें हें जरा चमत्कारिक होय.... मी बरा असून माझें काम चांगलें चाललेलें आहे. केंब्रिज एथें (ब्रिटिश आसोसिएशनच्या वार्षिक बैठकीस) जावयाचें माझ्या मनांत फार होतें, पण तेथें गेल्यानें मेंदूचा उत्क्षोभ बेताबाहेर होईल असें मला वाटलें."

ता० १३ आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितो:—"मि० सिल्सबीबरोबर पारिसला जाण्याचें मीं वचन दिल्याचें तुला कळविलें होतेंसें मला वाटतें........तेथें जातांना पुनः वाचून सुधारण्यासाठीं मी कांहीं काम घेऊन जाणार आहें, आणि तें मला तीन एक आठवडे तेथें असेन तोंपावेतों पुरेल; अशा रीतीनें माझा वेळ मुळींच फुकट जाणार नाहीं."

नेहमींप्रमाणें त्याला ह्या प्रसंगींहि पारीसचा लवकरच कंटाळा आला, आणि एका पंधरवड्यानेंच तो तेथून परत आला. परत आल्याबरोबर त्यानें "आदितत्त्वां" वरील मार्टिनोचा अभिप्राय हातीं घेतला. आणि त्यांतील चुका स्पष्ट करून दाखविल्या. ब्रिटिशक्वार्टर्लीमध्यें निबंध आला तो विरुद्धच आला, आणि अशा रीतीनें त्याचा पहिला अजमास खरा ठरला.

पुस्तकाची जाहिरात देण्याच्या कामीं वर्तमानपत्रांतील अभि-

प्रायांचा उपयोग करणें त्यास पसंत नसे, तथापि अमेरिकेंतील लोकांना त्यांची जरूरी आहे असें यूमन्सनें लिहिल्यावरून १८६३ च्या आरंभीं असे कांहीं अभिप्राय एकत्र करून त्यानें त्याजकडे पाठविले. अशा प्रकारच्या अभिप्रायांची त्या वेळेस तेथें फारच जरूरी होती. कारण ह्या वेळीं तेथें दक्षिण व उत्तर ह्या संस्थानांमध्यें गुलामगिरीच्या संबंधानें युद्ध सुरू झालेलें असल्यामुळें तेथील लोक त्या प्रश्नासंबंधाचे लेख खेरीज करून इतर लेखांस आश्रय देण्याच्या कामीं अगदीं उदासीन बनलेले होते.

प्रकरण दहावें

जीवशास्त्र

१८६२ च्या सपटंबरांत बाहेर गांवीं जाऊन आल्यानंतर त्यानें " जीवशास्त्राचीं तत्त्वें " या ग्रंथास एकदम सुरवात केली; त्याचा पहिला हप्ता त्यानें १८६३ च्या जानेवारींत प्रसिद्ध केला, आणि दुसरा एप्रिलांत प्रसिद्ध केला.

ह्यावेळीं मिल्लचा ' उपयुक्ततातत्त्वा ' वरील ग्रंथ प्रसिद्ध झाल्यामुळें उपयुक्ततेच्या क्लृप्तीविषयींचें त्याचें मत ' सोश्यल स्टॅटिक्स' मध्यें प्रदर्शित झालें होतें त्याहून ज्यास्त स्पष्ट रीतीनें प्रदर्शित करण्याची संधी त्यास आली, व ती त्यानें साधून घेतली. त्यासंबंधानें त्यानें ता० २४ फेब्रुवारी १८६३ रोजीं मिल्ल यास लिहिलेल्या पत्राचा पुष्कळ भाग ' आत्मचरितां ' त दिलेला आहे. त्या पत्राच्या अखेरीस त्यानें असें म्हटलेलें आहे:—"वरील स्पष्टीकरणावरून असें उघड दिसून येईल कीं, मी वास्तविकरीत्या उपयुक्ततातत्त्वाच्या विरुद्ध

नाहीं. उपयुक्तता शब्दाच्या प्रत्यक्ष अर्थीं जरी मी उपयुक्ततावादी नसलों तरी त्याच्या अप्रत्यक्ष अर्थी तसा आहें. "

ह्यावर ता० २९ फेब्रुवारी १८६३ रोजीं मिल्लनें त्यास असें लिहिलें:—" तुझ्या पत्राबद्दल मी तुझा आभारी आहें, आणि ज्या पानावर हा विषय आला आहे तें त्याच्या अगोदरच छापलें गेलें नसल्यास (मला वाटतें, छापिलें गेलें आहे) ज्या टीपेंत तुझें नांव आलें आहे तिच्यांत, तुझ्याबद्दल वाचकांचा जो गैरसमज न व्हावा म्हणून तुझी इच्छा आहे, तो न व्हावा एतदर्थ जरूर ते शब्द मी घालीन. "

तूं केलेल्या स्पष्टीकरणावरून आपल्या मतभेदाचें क्षेत्र आकुंचित झालें आहे, तथापि तो अगदींच नाहींसा झालेला नाहीं; कारण मानवी कृतीच्या धोरणांविषयीं केवळ अनुभवदृष्ट्या विचार करण्याची सरणी चांगली नाहीं असें जरी तुझ्याप्रमाणेंच माझें मत आहे, आणि इतर विषयांप्रमाणें ह्या विषयाच्या संबंधानेंहि साध्य असतील तितके अन्तिम सिद्धान्त बनविण्याची खटपट करण्याची माझी जरी इच्छा आहे, तथापि ह्या सिद्धान्तांपैकीं कोणतेहि सिद्धान्त अनिवार्य किंवा अवश्यमेव निष्पन्न होणारे आहेत, किंवा त्यांच्यावरून बनविलेले व्यावहारिक सिद्धान्त सर्वांशीं सर्वव्यापी आहेत ही गोष्ट मला कबूल करतां येत नाहीं.

हें पत्र पुरें करण्यापूर्वीं मला असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं कीं, तुझ्या ' आदितत्वें ' ह्या ग्रंथांत सुसंगत भव्य अशा विचारसरणीचें विलक्षण रीतीनें प्रतिपादन केलेलें आहेसें मला वाटतें; आणि त्या विचारसरणीपैकीं बराच भाग जरी मला संमत नाहीं, तरी त्याहून अधिक भाग संमत आहे. "

यावर ता० १ मार्च १८६३ रोजीं त्यानें पुढील उत्तर लिहिलें:—" टीपेंत इष्ट तो बदल करून मला त्याचा प्रूफ पहाण्याची संधि

दिल्याबद्दल मी तुझा फार आभारी आहें. तुझ्या परवानगीवरून, माझें म्हणणें ज्यास्त पूर्णपणें त्यांत प्रतिबिंबित होण्यास जरूर ते शब्दबदल पेन्सिलीनें करण्याचें धाष्टर्य मीं केलें आहे."

ता० २० मार्च रोजीं तो त्यास पुनः लिहितो:–"उपयुक्तता-तत्त्वावरील तुझ्या निबंधाच्या पुनरावृत्तीची एक प्रत मला पाठविल्याबद्दल मी तुझा फार आभारी आहें..... टीपेच्या संबंधानें माझी विनंति मान्य केल्याबद्दल आणि मीं सुचविलेले शब्दबदल तिच्यांत केल्याबद्दलहि मला तुझे आभार मानूं दे."

ता० ९ जून १८६३ रोजीं तो आपल्या बापास लिहितो:—"माझ्याबद्दल म्हणशील तर मी बरा असून कामांत गुंग आहें; मी बाहेर बराच फिरावयास जात असतों, कदाचित् जरासा बेताबाहेरच जात असतों. शनवार व रविवार हे दिवस मी हक्स्ले, त्याची बायको व टिंडाल यांच्या समवेत लबकच्या घरीं घालविले. मला पुनः बुधवारीं, नंतर शुक्रवारीं, आणि पुनः रविवारीं बाहेर जेवावयास जावयाचें आहे. शुक्रवारीं मी मुद्दाम लेडी लबकला भेटावयास जाणार आहें, कारण ती म्हणते, "तुला पाहण्यास मी अगदीं सुकल्यें आहें."

जुलैच्या पंधरावीच्या सुमारास, 'जीवशास्त्रा' चा तिसरा हप्ता प्रसिद्ध केल्यानंतर सुधारावयाचा 'निबंधसंग्रह' बरोबर घेऊन तो आपल्या आईस भेटण्यास स्कारबरो एथें गेला. तेथें असतांना तो आपल्या बापास लिहितो:—"माझी आई मला बरीच बरी दिसते आणि तिच्यांत उत्साहहि बराच दिसतो..... तुझें अक्षर नेहमींपेक्षां फारच मोठें आलें आहे; त्यावरून मी असें अनुमान करितों कीं, तुझ्या प्रकृतींत बरीच सुधारणा आहे. माझी स्वताची प्रकृति फार चांगली असून एथील रहाणी सुखाची आहे, आणि ह्या गांवांत वैविध्य व सौंदर्य पुष्कळ असल्यामुळें मला तो आवडतो." स्कार-

बरो एथून तो लॅाट व दुसरा एक मित्र यांजबरोबर पश्चिम स्काट-लंदांत गेला, आणि शेवटीं आर्डटार्निश (पूर्वींचें आर्क्कानिश) एथें गेला.

अमेरिकेंत त्याच्या ग्रंथांचा प्रसार व्हावा, आणि तेणेंकरून जो द्रव्यरूपी फायदा होईल तो त्यास मिळावा एतदर्थ डॉ० यूमन्स चांगली खटपट करीत होता, आणि त्यांत त्यास सिद्धिहि बरीच आली. ह्याच्या निबंधसंग्रहापैकीं कांहीं निवडक निबंध खर्चाची पूर्ण जबाबदारी घेऊन अमेरिकन प्रकाशक आपल्टन हा छापण्यास तयार नव्हता, म्हणून यूमन्सनें त्या कामासाठीं वर्गणी गोळा केली, व ती बरीच जमली. ह्या वर्गणीसंबंधानें स्पेन्सरनें अशी अट घातली कीं अशा रीतीनें छापिलेले ग्रंथ विकून जो फायदा होईल त्यांतून वर्गणीदारांच्या रकमा प्रथम परत कराव्या, आणि नंतर कांहीं फायदा राहिल्यास तो अपल्यास द्यावा. हें त्याचें म्हणणें यूमन्सनें वर्गणीदारांस कळविलें. पण ते त्यास कबूल होईनात. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, "आह्मी जी ही मदत करीत आहों ती सार्वजनिक फायद्याकरितां करीत आहों; आमचा हेतु स्पेन्सरच्या मतांचा प्रसार होऊन तेणेंकरून लोकमत सुधारावें असा असल्यामुळें आह्मीं ही वर्गणी दिलेली आहे, आणि म्हणून ती परत न घेतां उलट तींत भर घालण्याचीच आमची तयारी आहे; आतां आमच्या ह्या कृतीमुळें त्याचे ग्रंथ चांगले खपून त्याचा फायदा झाल्यास त्यांत आह्मांस ज्यास्तच आनंद होईल."

हें त्यांचें म्हणणें यूमन्सनें स्पेन्सर यास कळविलें तेव्हां त्यानें त्यास ता० २३ जानेवारी १८६९ रोजीं असें लिहिलें:—"माझ्या पुस्तकविक्रीपासून होणाऱ्या फायद्यासंबंधानें तूं जें लिहिलेंस त्यावरून व्यक्त होणारी सहानुभूति व औदार्य ह्यांचा माझ्या मनावर फार खोल ठसा उमटला आहे. मीं प्रथम सुचविलेल्या रीतीनें ह्या व्यवहाराचा निकाल लागणें मला ज्यास्त पसंत पडलें असतें, आणि

हल्लीं ठरविलेल्या मार्गानें मजवर त्यापेक्षां उपकारांचें ओझें पुष्कळ ज्यास्त पडणार ह्याबद्दल मला जरा अस्वस्थपणा वाटतो; पण त्याबरोबरच, माझ्या अमेरिकन मित्रांनीं हा अत्यन्त मोठा आत्मत्याग दाखविलेला पाहून मला फार आनंद वाटतो, आणि तो खाजगी मुद्यावरच नव्हे, तर जीं मतें माझींच म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांचा प्रसार करण्याची त्यांची त्यावरून आस्था दिसून येते, ह्या मुद्यावरहि होय."

'निबंधसंग्रह' अमेरिकेंत चांगला खपल्यामुळें 'सोश्यल स्टॅक्स' ग्रंथाचीहि अमेरिकन आवृत्ति काढणें त्यास सोईवार वाटलें, आणि मुलांचे व स्त्रियांचे हक्क ह्यासंबंधानें प्रथमावृत्तीनंतर त्याच्या मनांत जो कांहीं बदल झाला होता तो एका लहानशा प्रस्तावनेंत दर्शवून आणि पहिल्या पाहिल्या कांहीं प्रकरणांतील धर्मविषयक शब्दांचीं स्वरूपें कांहींशीं बदलून त्यानें ती आवृत्ति काढिली.

निबंधसंग्रहाचा दुसरा भाग काढण्यासाठीं त्यांत येणाऱ्या निबंधांची सुधारणा करण्याच्या कामीं त्यानें तीन एक महिने खर्चिल्यामुळें जीवशास्त्राचा चवथा हप्ता निघण्यास उशीर लागला. काम्टे व त्याची विधायक तत्त्वमीमांसा ह्यांच्या संबंधानें त्याच्या मताबद्दलचा गैरसमज काढून टाकण्याकडे तो नंतर लागल्यामुळें वरील कामीं ज्यास्तच मोठा अडथळा आला. त्या बाबतींत १८६३ च्या नवंबरच्या अखेरीस 'न्यू इंग्लंदर' पत्रास एक पत्र लिहून आपण काम्टेचा अनुयायी नाहीं असें त्यानें स्पष्ट करून दाखविलें. त्यांत तो म्हणतो:—" त्याच्या तत्त्वमीमांसेचे जे जे विशेष म्हणून आहेत त्यांच्यासंबंधानें त्याचा माझा मतभेद आहे. त्यानें शास्त्रांची जी मालिका लाविली आहे ती मला कबूल नाहीं. धर्मविषयक, आध्यात्मिक आणि विधायक अशीं बौद्धिक प्रगतीचीं तीन स्वरूपें आहेत हें त्यानें केलेलें वर्गीकरण मी उथळ समजतों. त्याचा मानवजा-

तिविषयक धर्म मी अगदींच नाकबूल करितों; आणि त्याची समाजविषयक सुधारणेची अत्युत्तम कल्पना तर मला अगदीं तिरस्करणीय वाटते. त्याचीं कांहीं किरकोळ मतें मला ग्राह्य आहेत; त्यानें जातां जातां केलेलीं कांहीं विधानें मला फार खोल दिसतात, पण ज्याच्या ज्याच्या योगानें काम्टेच्या म्हणण्यास तत्त्वसरणीचें स्वरूप येतें ती प्रत्येक गोष्ट मला नाकबूल आहे. ”

हें पत्र वरील अमेरिकन वर्तमानपत्रास त्यानें लिहिलें तेव्हां ह्या बाबतींत त्याच्या मनांत ह्यापलीकडे जावयाचें नव्हतें. पण आतां त्यास असें वाटलें कीं एतद्विषयक आपलीं मतें पूर्णपणें प्रतिपादिलीं असतां बरें होईल; आणि म्हणून १८६४ च्या जानेवारींत डार्बीहून परत आल्यावर तो लागलाच त्या उद्योगास लागला, आणि ‘ शास्त्रांचें वर्गीकरण ’ हा निबंध त्यानें तयार केला. तो तयार करीत असतां एका फ्रेंच मासिकांत लॉजेलचा एक निबंध आला, त्यांतहि हा कॉम्टेचा अनुयायी असल्याचें ध्वनित केलें होतें. म्हणून त्यानें “ काम्टेच्या तत्त्वसरणींशीं माझा मतभेद असण्याचीं कारणें ” म्हणून दुसरा एक निबंध तयार करून त्याचीं प्रुफें ल्युइसकडे पाठविलीं. शिवाय त्यानें कित्येक शास्त्रज्ञांस, तुमच्या किंवा तुम्हांस माहीत असलेल्या दुसऱ्या कोणाच्या मतांवर काम्टेच्या मतांचा पगडा बसलेला आहे कीं काय म्हणून पृच्छा केली त्यावर हक्स्ले, टिंडाल, हर्शेल, लायेल इत्यादिकांच्या नकारार्थी आलेल्या उत्तरांचा सारांश वरील निबंधास जोडावयाचें त्याच्या मनांत होतें, पण अखेरीस त्यानें तो विचार रहित केला.

ह्याच प्रश्नाच्या संबंधानें त्यानें ता० २९ जुलई १८५८ रोजीं मिल्ल यास एक पत्र लिहिलें होतें; तें तुझ्यापाशीं अद्यापि आहे काय म्हणून त्यानें आतां मिल्ल यास विचारिलें; त्यावर ता० ३ एप्रिल १८६४ रोजीं मिल्लनें पुढील उत्तर लिहिलें:—“ सुदैवानें तुला पा-

हिजे तें पत्र मजपाशीं आहे. ज्या इंग्रजानें तुझे व कॉम्टेचे दोघांचे- हि ग्रंथ वाचिलेले आहेत तो तुला त्याजपासून फार प्राप्त झालेलें आहे असें समजणार नाहीं. तुझ्या स्वताच्या मूळच्या कल्पनांची हळू हळू वाढ होऊन बनल्याच्या खुणा तुझ्या सिद्धान्तांमध्यें जित- क्या दिसतात तितक्या दुसऱ्या कोणत्याच तत्त्वज्ञाच्या सिद्धान्तांत दिसत नसतील........पण जीं मतें तुझीं व कॉम्टेचीं जुळतात व जीं तूं म्हणतोस त्याप्रमाणें त्याचींच म्हणून नाहींत, तीं अशा प्रकारचीं आहेत कीं त्यांवरून फ्रेंच लेखकांस तुला त्याच्या वर्गांत घालावेंसें वाटेल. कारण त्यांच्या मतें त्यांच्या अंध अध्यात्मशास्त्राला विरोध करणारे काय ते काम्टे व त्याचे अनुयायी एवढेच आहेत.

कॉम्टेपासून तुझ्यापेक्षां मीं स्वतः ज्यास्त घेतलेलें आहे, तथापि माझ्या बाबतींतहि माझे सर्व मुख्य सिद्धान्त त्याचा ग्रंथ मीं पाह- ण्यापूर्वीं मला प्राप्त झाले होते. पण विचारविषयक पुष्कळ बाबतीं- त तुझें त्याचें जेथें मतैक्य नाहीं तेथें माझें त्याचें आहे, आणि वि- शेषतः ह्या शास्त्रांच्या वर्गीकरणाच्या बाबतींत आहे. त्याच्या विधायक तत्त्वमीमांसा ग्रंथाचा तूं केवळ कांहीं भागच वाचिला आहेस ह्या गोष्टीवरून पूर्वीं मला समजत नव्हत्या अशा कांहीं गो- ष्टींचा उलगडा होतो; कारण जर तूं तो सर्व ग्रंथ वाचिला असतास तर तुझ्या हें लक्ष्यांत आलें असतें कीं ज्या गोष्टी तूं त्याच्या क्लप्तीस आक्षेपकारक म्हणून समजतोस त्या त्याच्या क्लप्तीचे भाग आहेत.

तुझा " मानसशास्त्राचीं तत्त्वें " हा ग्रंथ मला पुनः वाचण्याचें नुक्तेंच कारण पडलें, व तो मी अद्यापि वाचीतच आहें. त्याच्या प्रस्तावनेंतील मत मला पूर्वीं जसें संमत नव्हतें तसें हल्लींहि नाहीं; परंतु खुद्द त्या ग्रंथाच्या संबंधानें म्हणशील तर त्याविषयीं जें माझें मत अगोदरच उच्च होतें तें (मी आशा करितों माझ्या मनाच्या प्रगती- मुळें) ह्या पुनर्वाचनानें ज्यास्त उच्च झालें आहे. त्याचा पुष्कळ भाग

हल्लीं जसला ठसा माझ्या मनावर उमटवितो तसला पूर्वीं उमटवीत नव्हता; विशेषतः ज्या प्रकरणांत आमच्या मानसिक व्यापारांचा केवढा मोठा भाग संबंधांमधील संबंध ध्यानांत आणण्याच्या व्यापारांचा बनलेला असतो हें दाखविलेलें आहे तीं प्रकरणें मला ज्यास्तच आकर्षक वाटलीं. तूं व बेन ह्या दोघांनाहि, आपापल्या मार्गानें, मनाचे समजून होणारे व्यापार ज्ञानतंतूंच्या न समजतां होणाऱ्या मूल इंद्रियविषयक व्यापारांशीं जोडून देण्यांत, आणि अशा रीतीनें अत्यन्त मोठी खिंड भरून काढण्यांत व साहचर्यमूलक मानसशास्त्रांतील मुख्य अडचण काढून टाकण्यांत, सिद्धि आलेली पाहून मला फार समाधान वाटतें."

त्यावर ह्यानें ता० ८ एप्रिल १८६४ रोजीं असें उत्तर त्यास लिहिलें:—"तुझ्या तिसऱ्या तारखेच्या पत्राबद्दल व त्याबरोबर परत पाठविलेल्या माझ्या पत्राबद्दल मी तुझा फार आभारी आहें. तद्वतच चर्चाविषयक प्रश्नावर तूं जें मत प्रदर्शित केलें आहेस तेंहि मला अत्यन्त समाधानकारक वाटतें; कारण तुला तद्विषयक गोष्टींची माहिती इतकी पूर्ण असून शिवाय पक्षपातीपणापासून तूं इतका अलिप्त आहेस. तुझ्या पत्रावरून मी जें म्हणतों तें बरोबर आहे ही माझी समजूत दृढ झाली आहे. "मानसशास्त्राचीं तत्त्वें" ह्या ग्रंथाबद्दल तूं जें समाधानकारक मत व्यक्त केलें आहेस त्याबद्दल देखील मला तुझे आभार मानूं दे. तुझ्यासारख्याकडून असें मत त्याच्यावर यावें ह्यावरून तें पुस्तक मीं कांहीं व्यर्थ लिहिलें नाहीं अशाबद्दल माझी पूर्वींपेक्षांहि ज्यास्त खात्री पटतें हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

प्रस्तावनेंतील मतांविषयीं म्हणशील तर त्या प्रश्नाकडे पुनः वळण्याचें दुसरी आवृत्ति काढीपर्यंत मीं तकूब ठेविलें आहे. परंतु ज्याअर्थीं तूं त्या प्रश्नाचा उल्लेख केला आहेस त्या अर्थीं एथें इतकें म्हणणें योग्य दिसतें कीं, तुझ्या माझ्यामधील मतभेद मुख्यत्वेंकरून

शब्दांचे अर्थ भिन्न करण्यापासून उत्पन्न झालेला आहे. मीं जेव्हां अकल्पनीय (inconceivable) या शब्दाची योजना केली तेव्हां त्याचा अर्थ 'अविश्वसनीय' (incredible) असा घेतला जाण्याचा संभव आहे हें माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. मीं जेव्हां जेव्हां 'अकल्पनीय विधान' असें म्हटलें आहे तेव्हां तेव्हां मीं त्याचा उपयोग 'अनाकलनीय विधान' अशा अर्थानें, म्हणजे ज्या विधानाचीं घटकांगें ज्ञानवर्त्तेत जुळवतां येत नाहींत—ज्यांचा विचार 'प्रत्यक्ष संबंधानें' करतां येत नाहीं—असें विधान, अशा अर्थानें केलेला आहे."

वरील तिसऱ्या तारखेच्या पत्रांत बेन व स्पेन्सर आपापल्या घरीं चांगलें काम करीत आहेत असें मिल्ल म्हणतो. त्यासंबंधानें असें एथें सांगणें इष्ट दिसतें कीं, तात्त्विक विषयांवर त्यांचा जो मतभेद होता तेणेंकरून त्यांचा एकमेकांबद्दलचा आदर ज्यास्तच स्पष्टपणें व्यक्त होतोसा दिसत असे. हा आदर ह्या वेळींहि बळकट असून पुढें पुढें ज्यास्तच बळकट होत गेला. बेननें 'ज्ञानेंद्रियें आणि बुद्धि' ह्या आपल्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचें स्पेन्सरचे 'जीवशास्त्रा' मधील विचार आपल्यास अगोदर कळावे म्हणून होईल तितकें लांबणीवर टाकिलें होतें. नंतर ती काढिल्यावर त्याची एक प्रत त्यानें स्पेन्सरला पाठविली, तेव्हां त्यानें त्यास उत्तरीं (मार्च १८६४) असें लिहिलें:—"तूं आपल्या ग्रंथांत माझ्या क्लृप्त्यांस व टीकांस कांहीं उल्लेख केल्याचें आढळून येतें, आणि तो उल्लेख त्वां फार स्नेहपूर्वक केलेला आढळतो. ह्याबद्दल मला एरवीं वाटलें असतें त्याहून ज्यास्तच समाधान वाटतें, कारण तुझ्या दुसऱ्या पुस्तकावरील माझा अभिप्राय वाचून तुला कदाचित् कांहींसें वाईट वाटेल अशी मला भीति होती. मीं त्या ठिकाणीं जे मतभेद मोकळ्या मनानें प्रदर्शित केले त्या योगानें तुझ्या मनांत मुळींच वांकडेपणा आला नाहीं ह्याचा

मला फार आनंद वाटतो. खरोखरच तूं त्यांचें ग्रहण करण्यांत मनाचें जें मोठें औदार्य व्यक्त केलें आहेस त्याचा माझ्या मनावर चांगलाच ठसा उमटला आहे."

ह्या सुमारास त्याची प्रकृति आणि काम करण्याचें सामर्थ्य हीं नेहमींपेक्षां अधिक समाधानकारक होतीं. त्याच्या मतें, कॉम्टेवर टीका करीत असतां त्याच्या मनाला झालेली चेतना त्याला फायदेशीर झाली होती. लंडनांत उन्हाळ्यांत मंडळी जमते तेव्हां भोजनास वगैरे जाऊन जो क्षोभ होतो त्यापासूनहि त्याला कांहीं काळ इजा झाली नाहीं. परंतु अर्धा उन्हाळा झाल्यावर आपण हल्लीं जेवावयास वगैरे बाहेर फार जातों असें त्यास वाटूं लागलें. मॅटलॉक येथून आईस घरीं घेऊन जाऊन नंतर तो कांहीं काळ लॉट कुटुंबाबरोबर वेल्स प्रांतीं गेला, आणि तेथून स्काटलंदांत आर्डटॉर्निश येथें गेला. तेथून ता० २८ आगस्ट १८६४ रोजीं तो बापास लिहितो:—"मला येथें येऊन आज नऊ दिवस झाले, आणि ते फार मजेनें गेले. माझें स्वागत येथें फार मनःपूर्वक चाललें आहे; मला वाटतें, नेहमींपेक्षांहि ज्यास्त मनःपूर्वक चाललें आहे.....बेनचें आमंत्रण मीं नाकारिलें आहे; कारण त्याच्याशीं चर्चा करून प्रकृति बिघडवून धोका अंगावर घेण्याचा मला धीर झाला नाहीं."

ता० ७ आक्टोबर रोजीं येथून तो पुनः त्यास लिहितो:—"जुलैच्या नार्थ अमेरिकेन रिव्ह्यू" त तेजोमेघविषयक क्लसीवर एक निबंध आला आहे, व तो माझ्या द्वितीय 'निबंधसंग्रहा' वर टीका म्हणून लिहिलेला आहे. त्यांत कांहीं बाबतींत लेखकानें माझ्याशीं मतभेद दाखविला आहे, पण तो लेख फार सभ्य व अभिनन्दनपर आहे."

आक्टोबरच्या पंधरावीच्या सुमारास जीवशास्त्राच्या पहिल्या खंडाचा शेवटचा हप्ता प्रसिद्ध झाला. पुढच्या महिन्यांत तो बापास

लिहितो:—“ नवीन प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांच्या यादींत माझ्या पुस्तकाचें नांव ‘ विद्युज्जीवशास्त्र ’ असें लंडन-रिव्ह्यूनें दिलेलें पाहून मला किती राग आला असेल ह्याची तूंच कल्पना कर. माझें लिहिणें समाधानकारक रीतीनें चाललेलें आहे, आणि ‘ वनस्पतींचें आकारशास्त्र ’ हा भाग ध्यानींमनीं नव्हता अशा रीतीनें चांगला बनत आहे. त्यासंबंधानें वनस्पतींच्या चित्रांचे लांकडी छाप मला बरेच तयार करून घ्यावे लागत असल्यामुळें दुसऱ्या खंडाचा पहिला हप्ता काढण्यास विलंब होत आहे. ह्या छापांची निवड, योग्य मांडणी आणि घडण ह्यांबद्दल मला बरीच मेहनत पडत आहे, आणि त्यामुळें मला एथें बांधून घ्यावें लागलें आहे. म्हणून नाताळ होऊन जाई तोंपावेतों मला डार्बीस येतां येणार नाहीं. हें काम चाललें असतांच ‘ रीडर ’ नांवाच्या पत्राची पुनर्घटना करण्याच्या खटपटीचें कामहि त्यानें कांहीं मित्रांबरोबर आपल्या शिरावर घेतलें. त्यांत त्यानें स्वत: “ वीज म्हणजे काय ? ”, “ सूर्याची घटना ”, “ समुदित शहाणपण ”, आणि “ राजकीय मूर्तिपूजा ”, असे चार लेख लिहिले. नामांकित लोकांचें सहाय्य मिळविण्याकरितांहि शिवाय त्यानें यत्न केले. त्यासंबंधानें डार्विन यास ता० २२ एप्रिल १८६९ रोजीं पुढील पत्र त्यानें लिहिलें.

‘ रीडर ’चें कामगारमंडळ आह्मी ज्यास्त व्यवस्थित करीत आहों, आणि लोकमतावर ज्यास्त ठळक ठसा उमटविण्यास आणि आपलें नांव स्थापण्याकरितां उपलब्ध सर्व साधनांचा एकदम उपयोग करावयास लागण्याचें मनांत आणीत आहों. त्या पत्राला योजिलेलें वळण व दिशा लावण्याकरितां मी, प्रो० हक्स्ले, टिंडाल व मिल्ल इतक्याजणांनीं प्रत्येकीं थोडे अग्रलेख लिहिण्याचें ठरविलें आहे. ‘ रीडर ’चें स्वरूप लोकांच्या लक्ष्यांत आणून देण्याकरितां आह्मी ज्या साधनांचा उपयोग करणार आहों त्यांपैकीं एक हें आहे

कीं, जे नवे चटकदार शास्त्रीय शोध सामान्य जनास समजण्यासारखे आहेत, आणि आमच्या पत्रांतून ज्यावरील लेख लोक उतरून घेण्याचा संभव आहे, अशा शोधांवर अग्रगण्य शास्त्रज्ञांकडून लहान लहान पत्रें होतील तितकीं कधीं कधीं मिळवावयाचीं. अशा रीतीची मदत करण्यास कबूल असल्याचें सर जॉन हर्शेलनें मला लिहिलें आहे. सर चार्लस लायेलनेंहि असलीच मदत कबूल केली आहे. तर त्यांच्याप्रमाणें तुझ्या नांवाची मोलवान् मदत तूं आह्मांस देऊं शकशील काय ?.... दहा बारा ओळींचें पत्र तूं लिहिलेंस तरी तुझ्या नांवाचें वजनआमच्या पत्रास मिळण्यास तें पुरेंसें होणार आहे, आणि त्यावरून एक शास्त्रीय पत्र आणि प्रागतिक मताचें द्वार स्थापण्याच्या ह्या आमच्या यत्नांत तुझें अंग आहे हें दिसून येणार आहे."

याच संबंधानें ता० २६ मे १८६९ रोजीं तो मिल्ल यास लिहितो:—"मी आशा करितों कीं तुला 'रीडर' पत्र आतां पहिल्यापेक्षां ज्यास्त बरें वाटत असेल. त्याचे वर्गणीदार झपाट्यानें वाढत आहेत. पण मला अशी भीति वाटते कीं कांहीं वेळ जाहिराती न मिळाल्यामुळें आह्मांला बरेंच कठीण जाणार आहे.

असें दिसून येतें कीं लेखाखालीं लेखकाच्या नांवाचीं केवळ आद्याक्षरें घालून फारसें काम होत नाहीं. पुष्कळांना त्यावरून लेखकाचें पूर्ण नांव काय ह्याचा बोध होत नाहीं. म्हणन माझी अशी सूचना आहे कीं लेखाखालीं त्वां आपलें पूर्ण नांव घालावें. याबद्दल तुझें मत काय आहे ?" यावर मिल्लनें लेखाखालीं पूर्ण नांव घालण्याची सूचना आपणास पसंत असल्याचें लिहिलें.

आज कित्येक वर्षें मोठाल्या रिव्ह्यूंत विशेष महत्त्वाचा किंवा आकाराचा लेख स्पेन्सरनें लिहिला नव्हता. पण तसला लेख त्यानें १८६९ त लिहिला. त्याचें कारण पुढील पत्रव्यवहारावरून दिसून येतें. ता० ११ मार्च १८६९ रोजीं मिल्ल त्यास लिहितो:—" काम्टेवरील

माझा लेख येत्या ' वेस्टमिन्स्टर ' मध्यें प्रसिद्ध होणार आहे त्याची एक प्रत चापमन तुला एक दोन दिवसांत पाठवील. काम्टेबद्दल आपला अभिप्राय देतांना तुझ्या कांहीं मतांशीं मला सहजच विरोध प्रदर्शित करावा लागला आहे. ह्याबद्दल तुझी किंवा दुसऱ्या कोणत्याहि पुढें गेलेल्या तत्त्वज्ञाची माफी मागण्याचें माझ्या कधींच मनांत येणार नाहीं. पण गोष्ट अशी बनून आलेली आहे कीं, तुझ्या माझ्यामध्यें मतभेदापेक्षां मैतक्याचे विषय जरी फारच ज्यास्त आणि फारच ज्यास्त महत्त्वाचे आहेत, तरी आपल्यामधील मतभेदाच्या विषयासंबंधानें माझ्या बाजूनें तरी लोकांपुढें फारच चर्चा आलेली आहे. पण आपण दोघे एकमेकांचे सोबती व एकाच पक्षाला लढणारे असल्यामुळें, तुझ्यामाझ्यांत लहान मतभेदांपेक्षां ज्यास्त कांहीं आहे असें दाखविणारें कांहीं मीं त्या लेखांत लिहिलें आहें असें जर त्यावरून तुला वाटलें, तर तुझ्याविषयींच्या माझ्या मनोवृत्तींची तुला फार चुकीची कल्पना झाली असें मला वाटेल. लवकरच मी या लेखापेक्षां ज्यास्त मोठा लेख तुला भेट पाठविणार आहें, त्यांत तुझ्या तत्त्वज्ञानविषयक प्रयत्नांबद्दल मला जी अत्यन्त मोठी किंमत वाटते तीस कमीपणा आणणारें तुला बहुतक कांहींच सांपडणार नाहीं."

यावर स्पेन्सर ता० १३ मार्च रोजीं त्यास उत्तरीं लिहितो:—

" ता० ११ च्या तुझ्या पत्राबद्दल मी तुझा फार आभारी आहें, आणि ज्या ममताळूपणाच्या मनोवृत्तीनें प्रेरित होऊन तूं तें लिहिलेंस तिची योग्य किंमत मी ओळखतों.

मतभेद स्पष्टपणें प्रदर्शित करण्याच्या बाबतींतलि तुझ्या मताशीं माझी पूर्ण सहानुभूति आहे. माझा स्वताचा परिपाठ मला जें चुकीचें दिसतें तें तसें दाखविण्याचाच आहे, आणि तसें करतांना मी कोणास बरें किंवा वाईट वाटेल हा विचार मनांत आणीत नसतों. म्हणून मी जे अभिप्राय प्रदर्शित करितों त्याबद्दल इतर तत्त्ववेत्त्यांनीं

केवळ सत्यावरच दृष्टि देऊन आपलें मत प्रदर्शित करावें यास मी अगदीं तयार आहें. शिवाय, माझी अशी पूर्ण खात्री झालेली आहे कीं, मीं जें कांहीं म्हटलें असेल त्याविरुद्ध जें कांहीं म्हणणें तुला आवश्यक वाटेल, तें योग्य असेंच नेहमीं असलें पाहिजे; कारण त्यावरून एक माझी चुकी व्यक्त झाली पाहिजे, किंवा माझ्या कोटिक्रमांत, किंवा तो व्यक्त करण्याच्या पद्धतींत कांहीं तरी अपूर्णपणा असून तो काढून टाकणें जरूर असलें पाहिजे."

मिल्लनें वरच्या पत्रांत उल्लेखिलेला लेख "सर विलियम हामिल्टनच्या तत्त्वमीमांसेचें परीक्षण" हा होता. त्या ग्रंथाची त्यानें पाठवितों म्हटलेली प्रत स्पेन्सर यास मिळाल्यावर 'सत्याची अन्तिम कसोटी' हा जो त्यांच्यामधील मतभेदाचा प्रश्न त्याचें विवेचन करणें त्यास जरूर वाटलें, व तें त्यानें जुलैच्या 'फार्टनाइटली'च्या अंकांत केलें. त्याची प्रत मिल्ल यास मिळाल्यावर ता० १२ आगस्ट १८६५ रोजीं तो त्यास लिहितोः—"फॉर्टनाइटली'मधील तुझा लेख जेव्हां मला मिळाला तेव्हां हामिल्टनवरील माझ्या पुस्तकाची द्वितीयावृत्ति इतकी छापून झालेली होती कीं तूं त्यांत दाखविलेली चूक योग्य पृष्ठावर दुरुस्त करणें शक्य नव्हतें. म्हणून त्या पुस्तकाच्या शेवटीं एक टीप मीं जोडिली आहे, आणि तूं ती कदाचित् पाहिली नसल्यास तिची एक नक्कल याबरोबर मी पाठवीत आहें.

अकल्पनीय (inconceivable) शब्दाच्या दोन अर्थांमधील भेदावरून तुझ्यामधील मतभेद नाहींसा झालेला किंवा कमी झालेला मला दिसून येत नाहीं. (उलट गोष्टीची) जी अकल्पनीयता तूं सत्याची अन्तिम कसोटी म्हणून समजतोस ती एकाच मानसिक प्रदर्शनांत दोन कल्पना जोडण्याची अशक्यता होय ही गोष्ट मला आधींच माहीत होती. पण ह्यापलीकडे तुझ्या म्हणण्याबद्दल माझा गैरसमज झाला नसेल तर, कल्पना करण्याच्या शक्तीची ही असमर्थता विशिष्ट

गोष्ट खरी मानण्याच्या आवश्यकतेबद्दल देतां येण्यासारखा केवळ बलवत्तम पुरावा म्हणून तूं मानितोस असा मी तुझ्या म्हणण्याचा भावार्थ समजतों. मी अद्यापि असें समजतों कीं, एकाद्या अन्तिम सत्याची तुझी कसोटी, त्याच्या उलट गोष्ट खरी मानण्याचा प्रयत्न करण्याच्या कसोटीस तें लावतां, तें सत्यच नेहमीं बरोबर म्हणून वाटणें ही आहे. मलाहि माझ्या म्हणण्याबद्दल तुझा कांहींसा झालेला गैरसमज दूर करावयाचा आहे. कांहीं लोक एकादी गोष्ट खरी मानणें आवश्यक समजत नाहींत यावरून ती गोष्ट खरी मानणें आवश्यक नाहीं असें ठरतें, असें विधान मी केलें नव्हतें, तर कांहीं लोक एकादी गोष्टच खरी मानीत नाहींत ह्यावरून तें ठरतें असें मीं म्हटलें होतें; हें मत, उलट मत जितकें युक्तीस सोडून दिसेल तितकेंच, उघड(बरोबर) दिसतें. तुझ्यामाझ्यामधील मुख्य प्रश्नासंबंधानें तुझा मुख्य मुद्दा हा दिसतो कीं, कल्पनावाद्यांचे (सृष्टि केवळ कल्पनामय आहे, तिच्यांत वास्तविक अस्तित्व कशाचें नाहीं असें मानणारे) सिद्धान्त कबूल केल्यास त्यांचा कोटिक्रम अयुक्तिक ठरतो; कारण तो कोटिक्रम (कल्पनारूप) ठसा उत्पन्न करणारी व तो ठसा ग्रहण करणारी वस्तुविषयक सत्ता (अस्तित्व) गृहीत केल्याशिवाय प्रदर्शितच करतां येत नाहीं. आपल्या मनाच्या अवस्थांचा ज्या अनुभवाशीं आपण संबंध लावितों तो अनुभव (तुला वाटतो कीं) मनाच्या अवस्थांखेरीज दुसऱ्या कशाचा तरी असला पाहिजे हें, ही गोष्ट व्यक्त करतांना ज्या शब्दांचा आपण उपयोग करितों त्यावरूनच प्राप्त होते. (मी म्हणतों) मनाच्या सर्व अवस्थांचा जर तत्पूर्वींच्या कांहींशीं संबंध आपण जोडीत असूं तर हें तुझें म्हणणें बरोबर ठरेल. पण माझें मत असें आहे कीं मनाच्या अवस्थांचें पृथक्करण करतां मुळांत मनाच्याच अवस्था आढळून येतात; त्या संवेदना, संवेदनास्मृति, आणि संवेदनापेक्षा ह्या होत. ह्यांचा हिशेब

मला लावतां येतो (ह्यांचें कारण मला दाखवतां येतें) असें मी म्हणत नाहीं, किंवा त्यांच्यांत त्यांच्याखेरीज आणि त्यांच्या वरून येण्याच्या क्रमाखेरीज दुसरें कांहीं मला दिसतें असेंहि मी म्हणत नाहीं; पण आमच्या अन्य ज्ञानावस्थांचें त्यांच्यांत पृथक्करण होतें असें मी म्हणतों. आतां मी असें प्रतिपादितों कीं ह्या अवस्था मूळ पाया म्हणून गृहीत करणें एवढेंच आपल्यास आवश्यक आहे; आणि जेव्हां दुसरें कांहीं गृहीत केलेलें दिसून येतें, तेव्हां तें आपली सर्व भाषा ज्या चुकीच्या क्लृप्तीवर रचलेली आहे तिजवरून उत्पन्न झालेलें असतें; आणि म्हणून योजिलेल्या मूर्त (वस्तुवाचक, भाववाचक नव्हे) शब्दांचा 'संवेदनांच्या आपल्या अपेक्षा' असा जर अर्थ घेतला तर ज्या भलतेपणांत व अर्थाभावास तूं उल्लेख करितोस ते उत्पन्न होत नाहींत.

तथापि आमच्यामधील भेद मुळांतून नसून केवळ वरवरचा आहे हें तुझें म्हणणें मला अगदीं कबूल आहे; निदान मानसिक चमत्कारांच्या स्पष्टीकरणाच्या आपल्या सामान्य सरणीस तेणेंकरून बोध येण्यासारखा नाहीं व येतहि नाहीं. ज्यांचा मूलपायावरील विश्वास केवळ अज्ञेयावरील विश्वासाच्या रूपाचा आहे त्यांच्याशीं तंटा न करण्याबद्दल माझी पहिल्यापासूनच इच्छा आहे. आपल्यामधील वादाच्या मुद्यांसंबंधानें आपली बाजू बरोबर रीतीनें दाखविण्यास जें तुला जरूर वाटलें तें तूं म्हटलें आहेस. तूं तसें केलेंस ह्याबद्दल मला आनंद वाटतो; व आतां ही गोष्ट इतकीच ठेवावी असें मला वाटतें. म्यान्सेल किंवा इतर कोणी आणखी व ज्यास्त विरुद्ध अशा टीका बहुधा करितील; आणि त्यांस उत्तर देणें जर मला इष्ट वाटलें तर त्या वेळीं तुझ्या टीकांवरहि मी चार शब्द लिहीन, पण तुझ्याशीं माझा विरोध आहे असें दाखविणार नाहीं, कारण ती गोष्ट टाळावी अशी माझी फार इच्छा आहे."

ह्यानंतर ता० ११ आगस्ट १८६५ रोजीं तो आर्डटॉर्निश एथून

मिल्ल यास लिहितो:—" हामिल्टनवरील तुझ्या ग्रंथाच्या नव्या आवृत्तीची एक प्रत पाठविण्याच्या तुझ्या सौजन्याबद्दल मी तुझा फार आभारी आहें.....तुझ्या चिठींतील फार खुल्या मनाच्या स्पष्टीकरणाबद्दल मी तुझे फार फार आभार मानितों. त्यांत वादविषयक प्रश्न अगदीं सरळ रीतीनें मांडिलेला आहे. तुझ्या माताचें जें अर्धवट चुकीचें म्यां केलेलें विधान तूं दाखवितोस तें विधान दुरुस्त करण्याची संधि आल्यास (किंवा संधि आल्याबरोबर) मी दुरुस्त करीन. आतांपर्यंत बौद्धिक भेदापलीकडे कांहीं उत्पन्न न करतां आपल्या दोघांमध्यें वांकडे वगैरे न आणतां अशा रीतीनें आपला वादविवाद झाला, आणि सध्यापुरता तरी संपला, ह्याबद्दल मला फार संतोष वाटतो. "

पुन: ता० ११ आक्टोबर १८६९ रोजीं तो त्यास लंदनाहून लिहितो:—" तुझ्या ' तर्कशास्त्रा 'च्या सहाव्या आवृत्तीच्या प्रतीबद्दल फार फार आभार. माझ्या ' मानसशास्त्रा 'ची दुसरी आवृत्ति तयार करण्याचा प्रसंग आल्यास, तसें करण्यापूर्वीं मला ती पुन: वाचावी लागेल; आणि तुझ्या ग्रंथांत विवेचिलेल्या पुष्कळ महत्त्वाच्या प्रश्नांवरील तुझ्या मतांचीं अगदीं अलीकडील पक्क स्वरूपें अगदीं आज तारखेपर्यंत शुद्ध केलेलीं मला मिळालीं ह्याबद्दल मला फार आनंद वाटतो. तुझ्यामाझ्यामधील मुख्य वादाच्या प्रश्नांची चर्चा ज्यांत तूं केलीआहेस तें प्रकरण मीं अलबत आधींच वाचून टाकिलें आहे; आणि नुक्तेंच त्यासंबंधानें मीं आपलें म्हणणें तुला कळविलें तें तूं काळजीपूर्वक इतक्या तत्परतेनें घातल्याबद्दल मी तुझा आभारी आहें. हल्लींचें जें त्या कोटिक्रमाचें स्वरूप आहे त्यांतील कोणत्याहि मुख्य मुद्यांत न शिरतां मी येथें एवढ्याच गोष्टीस उल्लेख करितों कीं एका मुद्यासंबंधाचा प्रश्न आतां पुष्कळ मर्यादित झाला आहे. कारण तुझी ज्ञानवत्ता आणि माझी ज्ञानवत्ता ह्यांच्या सांगण्यामधील प्रत्यक्ष

विरोधाचेंच त्यास आतां स्वरूप आलेलें आहे. तूं म्हणतोस–" एकादा माणूस जेव्हां उन्हाकडे पहात असतो तेव्हां आपण अंधारांत आहों अशी कल्पना त्यास करतां येणार नाहीं असें स्पेन्सर म्हणतो त्याचा अर्थ असा कीं, आपण तसें करीत आहों असें त्या माणसास मानतां येत नाहीं. कारण हें त्यास माहीत आहे कीं, चकचकीत सूर्यप्रकाशांतहि, आपण अंधार पहात आहों अशी नुसती कल्पना करणें शक्य आहे." माझ्या भावार्थाची ही उपपत्ति मला मान्य नाहीं. ह्या व इतर ठिकाणीं 'मला कल्पना करतां येत नाहीं (मनानें आकलतां येत नाहीं)' असे शब्द मीं जेथें जेथें वापरले आहेत तेथें तेथें त्याचा अर्थ अगदीं वाच्यार्थ घ्यावयाचा असा माझा उद्देश आहे. माझ्या ज्ञानवत्तेची साक्ष मला अशी दिसते (आणि माझ्या तीन हुशार मित्रांस मीं याबद्दल विचारिलें तेहि असेंच म्हणतात) कीं उन्हाकडे पहात असतां **तेव्हां आणि त्याच स्थानीं** मी अंधार पहात आहें अशी मला कल्पना करतां येत नाहीं इतकेंच नव्हे (आणि हाच वादाचा मुख्य प्रश्न आहे) तर मला अंधाराची कल्पनाहि करतां येत नाहीं. मी अंधार पहात आहें अशी कल्पना करण्याचा यत्न केल्यास मला असें आढळून येतें कीं, पूर्वीं ज्या देखाव्यांत मीं अंधार अनुभविला होता अशा एकाद्या देखाव्याची कल्पना करण्यापर्यंत तो (यत्न) मला पोहोंचवितां येतो; पण त्या अंधाराबरोबर येणाऱ्या देखाव्याचे जे निरनिराळे घटक त्यांची कल्पना जरी मला करतां येते, तरी प्रत्यक्ष अंधाराची करतां येत नाहीं. **माझी ज्ञानवत्ता प्रकाशाच्या ढळढळीत ठशानें व्यापून गेली असतां** एकाद्या भुयारांतील अंधार ज्या ठशांबरोबर मीं अनुभविला असेल ते सर्व ठसे ज्ञानवत्तेंत मला आणतां येतात, पण त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष अंधाराचा ठसा तिच्यांत आणतां येत नाहीं. अशा परिस्थितींत अंधाराची तात्त्विकदृष्ट्या मला कल्पना करतां येते असें

मला आढळलें तरी त्याच क्षणीं मी प्रत्यक्षरीत्या अंधार पहात आहें असें मला मानतां, आकलतां किंवा कल्पितां येईल अशा आढळण्यासारखें तें होणार नाहीं; आणि मी समजतों, मुद्याची गोष्ट हीच आहे."

यावर ता० २९ आक्टोबर १८६९ रोजीं मिल्ल त्यास लिहितो:—"आपल्यामधील जो जरासा सूक्ष्म भेद तूं माझ्या नजरेस आणिला आहेस त्यावर प्रकाश पाडणारें, विलंब केल्यानें, मला कांहीं कदाचित् सुचेल या आशेनें, आणि कांहीं अंशीं वेळाच्या अभावामुळें, इतके दिवस तुझ्या पत्राचें उत्तर न देतां मीं तसेंच ठेवून घेतलें. तुझ्या मताचें ज्या रीतीनें मीं विधान केलें ती ज्या अर्थीं तूं आपली म्हणून कबूल करीत नाहींस, त्या अर्थीं तुझें मत मी बरोबर समजलों नाहीं असें पुनः कबूल करणें व दुरुस्ती करणें मला अर्थातच भाग आहे. आपला दोन प्रश्नांसंबंधानें भेद दिसतो; एक प्रश्न हा कीं, उन्हाकडे पाहतां काळोखाची कल्पना करणें शक्य आहे किंवा नाहीं. तूं व तुझे तीन मित्र यांस वाटतें कीं आपणांस तसें करतां येत नाहीं, पण माझी ज्ञानवत्ता मला असें सांगतेशी दिसते कीं, दुसऱ्या एकाद्या वस्तूची तिच्या गैरहजिरींत कल्पना करणें जसें अगदीं शक्य आहे, तशीच अंधाराची कल्पना करणेंहि शक्य आहे. अर्थात्, एकाद्या प्रत्यक्ष संवेदनेच्या बलवत्तर वर्तमान ठशाच्या मानानें त्याबरोबरचीच एकाद्या केवळ आठवणेची ज्ञानवत्ता दुर्बल दिसते; पण ती मला पूर्णपणें वास्तविकशी दिसते, आणि बहुतेक आठवणी मूळ अनुभवांशीं जितक्या सदृश दिसतात तितकीच ती त्याच्या मूळ संवेदनेशीं सदृश दिसते. पण तूं म्हणतोस कीं; अशा परिस्थितींत मला अंधाराची कल्पना करतां आली तरी त्याच क्षणीं मी प्रत्यक्ष अंधार पहात आहें अशी कल्पना मला करतां येईल असें त्यावरून सिद्ध होत नाहीं. मला असें वाटतें

कीं, प्रकाशाच्या वस्तूची कल्पना करणें म्हणजे त्या क्षणीं मी तो प्रत्यक्ष पहात आहें अशी कल्पना करणें होय. मला वाटतें, कोणालाहि कोणत्याहि गोष्टीची कल्पना आपला स्वताचा तात्कालिक वर्तमान ठसा ह्या स्वरूपाव्यतिरिक्त कधीं करतांच येत नाहीं. आतां हें खरें आहे कीं, जेथें कल्पना करावयाची वस्तु अंधार ही आहे तेथें, आपण पहाण्याचा यत्न करितों पण कांहीं दिसत नाहीं, ह्याखेरीज दुसरें कांहीं कल्पिण्यासारखेंच नाहीं; कारण अंधार ही होकारार्थी वस्तु नाहीं. म्हणून मला असें वाटतें कीं चकचकीत उन्हांतहि तेव्हां व त्याच स्थानीं मी अंधार पहाणारा अशी स्वताबद्दल मला कल्पना करतां येईल. " तेव्हां आणि त्याच स्थानीं मी अंधार पहात आहें अशी कल्पना करतां येत नाहीं, " असे जे शब्द तूं योजिले आहेस त्यांचा अर्थ व मी म्हणतों याचा अर्थ एकच आहे किंवा नाहीं? मला असें वाटतें कीं " मी अंधार पहाणारा " याबद्दल " मी अंधार पाहत आहें " ही जी अन्यशब्दयोजना ती कल्पनेपासून मानण्याकडे किंवा समजुतीकडे होणाऱ्या संक्रमणाची बरोबर दर्शक आहे; म्हणजे, ज्ञानेंद्रियांचे ठिकाणीं गैरहजर म्हणून मानलेल्या कांहींची कल्पना यापासून ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणीं हजर म्हणून मानलेल्या कांहींचें अवधारण, ह्या संक्रमणाची ती यथार्थदर्शक आहे; आणि गृहीत केलेल्या परिस्थितींत मनाच्या या दोन अवस्थांपैकीं पहिली मी शक्य म्हणून समजतों, व दुसरी अशक्य म्हणून समजतों. ' कल्पना ' किंवा ' आकलन ' हा शब्द ' मानणें ' किंवा ' समजणें ' या अर्थीं तूं या ठिकाणीं योजीत आहेस असें जें मला वाटलें तें अशा रीतीनें वाटलें. ' कल्पना करणें किंवा आकलणें ' या शब्दाचा अगदीं वाच्यार्थीं उपयोग केला असतां, ' मी पहात आहें अशी कल्पना करणें ' ही शब्दयोजना

(प्रस्तुत प्रसंगीं) कशी योग्य ठरते हें अजून देखील माझ्या लक्षांत येत नाहीं. ”

वनस्पत्याकारशास्त्र व इंद्रियविज्ञानशास्त्र यांचा विचार करीत असतां सूक्ष्मदर्शकयंत्रानें जे सूक्ष्म शोध तो करीत होता, त्यासंबंधानें वनस्पतींचें रसाभिसरण आणि त्यांच्यांत लांकूड बनणें याबद्दलचा प्रश्न निघाला होता. त्याबद्दल त्यानें तत्पूर्वीं केलेले प्रयोग व बसविलेल्या कल्पना डा० हूकर, प्रोफेसर हक्स्ले, व डा०बस्क यांस १.८६९ च्या जानेवारींत त्यानें दाखविल्या. त्यासंबंधानें डा० यूमन्स यास तो लिहितो कीं, “ एतद्विषयक माझी क्लृप्ति बहुतेक सृष्टिशास्त्रज्ञांस धिट्टाईची वाटेल, पण ज्या अर्थीं हूकर व हक्स्ले यांचा कल माझा कोटिक्रम बरोबर आहे असें म्हणण्याकडे आहे, त्या अर्थीं त्या बाबतींत मला काळजी वाटत नाहीं. ”

१८६९ च्या जून महिन्यांत प्रस्तुत ग्रंथाचा हप्ता प्रसिद्ध केल्यानंतर त्यानें नेहमींप्रमाणें सुटी घेतली. या सुटींत तो आर्डटॉर्निश येथें गेला असतां साडेनऊ पौंड वजनाचा ‘ सामन ’ मासा पकडल्याचें तो लिहितो; एवढा मोठा मासा त्यास पूर्वीं कधीं सांपडला नव्हता. आर्डटॉर्निश एथून परत निघण्याच्या सुमारास आपली प्रकृति पहिल्या प्रतींची बनेल अशी आशा धरून तो तेथें गेला होता. तेथून लंदनास परत आल्यावर ता० ३ आक्टोबर १८६९ रोजीं तो बापास लिहितोः—“ माझें काम समाधानकारक रीतीनें होत आहे, आणि पंध्रवड्याच्या आंत कांहीं प्रुफें तुजकडे पाठवतां येतील असा मला अंदाज वाटतो. मणक्याच्या प्राण्याच्या सांगाड्याची क्लृप्ति माझ्या अजमासाबाहेर समाधानकारक बनत चालली आहे. ”

पुनः ता० १८ दिजंबर रोजीं तो लिहितोः—“ इकडे मी १६ वा हप्ता तयार करण्यांत गुंतलों आहें..... मी डार्बीं एथें असेन तोंपावेतों सुधारण्यास पुरेल इतका मजकूर वीस तारखेपावेतों लिहून

तयार होईल अशी मला आशा आहे. कांहीं अडचण न आल्यास २१ वीस तुझ्याकडे येईन, आणि तो महिना संपेपर्यंत तेथें राहीन, असें म्हणतों; त्यानंतर तुला अजमासांतील वाटल्यास तूं मजबरोबर येऊन लंदनास एक आठवडा राहशील तर बरें. तुझ्या परवांच्या आजारांत माझ्या आईनें घाबरेपणा दाखविला नाहीं हें पाहून मला फार आनंद वाटतो. असेंच धैर्य ती पुढेंहि दाखवील अशी मी आशा करितों. तिला माझें प्रेम विदित कर, आणि मी लवकरच तिला भेटावयास येईन म्हणून सांग."

तो याप्रमाणें थोडे दिवस घरीं रहावयास गेला असतां वनस्पतींच्या रसाच्या अभिसरणासंबंधानें त्यानें आपले सूक्ष्मदर्शकयंत्रानें चालविलेले शोध सुरू ठेविले होते. तेथून तो हक्स्लेकडील पाडव्याचें भोजन साधण्याच्या बेतानें लंदनास आला. त्या गोष्टीस ता० ३ जानेवारी १८६६ रोजीं बापास लिहिलेल्या पत्रांत याप्रमाणें तो उल्लेख करितो:—" आमची ती संध्याकाळ फार मजेची गेली. तेथें हजर असलेल्या इतर मंडळीमध्यें एलिस हा असून शिक्षणाच्या प्रसारार्थ उत्साहपूर्वक खटपट करणारा तो आहे. आणि शाळांतून अर्थशास्त्राचें अध्यापन सुरू करण्याच्या बाबतींत त्यानें कामगिरी बजाविलेली आहे."

मी एकीकडे मजकूर सांगत असतां दुसरीकडे रसाभिसरणविषयक केलेल्या तयाऱ्या पुनः तपासून पहात आहें. त्या मीं राखून ठेवण्यास योग्य आहेत इतकें पहाण्यापुरत्याच डार्बीं एथें असतां तपासिल्या होत्या. मला पुनःपरीक्षणाअंतीं असें आढळून येतें कीं, पूर्वीं माझ्या लक्ष्यांत आली होती त्यांहून ज्यास्त सुंदर उदाहरणें त्यांपासून मला प्राप्त होत आहेत. मी इकडे येत असतां वनस्पतींतील रसाभिसरणाची पूर्ण उपपत्ति लावण्यास जरूर ती कल्पना

मला सुचली. आतां ती सर्व कल्पना उत्तम रीतीनें सिद्ध करून दाखवतां येण्यासारखी बनलेली आहे. ”

पुढें ता० १९ जानेवारी रोजीं तो लिहितो:—“ माझें पूर्वींचें पत्र लिहिल्यानंतर मीं तयार केलेले प्रयोग हूकर, बस्क व हक्स्ले यांस दाखविले. त्यांपासून दिसून येणाऱ्या गोष्टी नव्या आहेत म्हणून दिसतें. कांहीं प्रकारच्या पानांतील ह्या रचना त्यांच्यापैकीं कोणींहि पूर्वीं पाहिलेल्या नव्हत्या; आणि त्यांचीं वर्णनेंहि त्यांना कोठें आढळलेलीं नव्हतीं; पण त्यांचें महत्त्व त्यांच्या लक्ष्यांत आतां आलें आहे. शिवाय असेंहि दिसून येतें कीं (वनस्पतींनीं) रंग ओढून घेण्याच्या संबंधानें जरी अगोदरच लोकांनीं प्रयोग केलेले आहेत, तरी ते देठांच्याच संबंधानें केलेले आहेत, आणि त्यापासून (रसाभिसरणासंबंधानें) स्पष्ट असें कांहीं दिसून आलेलें नाहीं; उलट घोंटाळा व गैरसमजुती मात्र वाढलेल्या आहेत. म्हणून मीं ज्या गोष्टी त्यासंबंधानें त्यांस दाखविल्या त्यांनीं ते सर्व अगदीं चकित होऊन गेले; कारण त्या आज कित्येक वर्षें रूढ असलेल्या एतद्विषयक मतांच्या अगदीं उलट आहेत; आणि ह्या गोष्टींच्या आधारावर मीं रचलेल्या कृप्तीच्या विरुद्ध ते कांहीं आक्षेप आणूं शकत नाहींत. ते असें म्हणतात कीं, ह्या गोष्टी व त्यासंबंधानें माझा कोटिक्रम ह्यांवर मीं एक निबंध तयार करून “ लिनियन सोसायटी ” या शास्त्रज्ञ सभेपुढें वाचावा; आणि मी बहुधा तसें करीन, आणि अखेरीस तो लेख ‘ जीवनशास्त्रा’च्या पुरणिकेंत गोंवून देईन. ”

पुढें ता० २४ जानेवारीस तो लिहितो:—“ ‘लिनियन’पुढें वाचण्याचा माझा निबंध अर्धा किंवा अर्ध्याहून अधिक तयार झाला आहे. त्यांतील कोटिक्रम फार छानदार जमत आहे. ”

पुढें ता० १३ जानेवारीस तो लिहितो:—“ मी रंगाकरितां पतंगाच्या लांकडांच्या अर्काच्या उपयोग करीत आहें, आणि कांहीं

आवृत्तींत म्याजेंटा (तांबडा व गुलाबी यांमधील रंग) पेक्षां तो ज्यास्त बरा दिसतो. मला वाटतें, माझा सिद्धान्त मी पूर्णपणें सिद्ध करून दाखवूं शकेन. पानें वगैरे छेदून करावयाच्या प्रयोगांत मी पूर्वींहून ज्यास्त तरबेज होत चाललों आहें, आणि तें झपझप व सफाईनें करण्याचा एक मार्ग शोधून काढिला आहे. रविवारीं विलक्षण आकाराच्या कांहीं नागमोडी व कड्याच्या आकाराच्या रचना मीं शोधून काढिल्या; त्यापूर्वीं मला दिसलेल्या किंवा मीं चित्रांतून पाहिलेल्या रचनांहून चार पट किंवा पांचपट मोठ्या व्यासाच्या होत्या. त्या एका अपवादरूपी वनस्पतीच्या अपवादरूपी पानांत दिसतात, आणि मी खात्रीनें सांगतों कीं त्यांपूर्वीं कधीं कोणीं पाहिलेल्या नाहींत. ”

पुढें ता० २६ फेब्रुवारी रोजीं तो लिहितो:—“ मीं ह्याच्या अगोदरच तुला पत्र लिहिलें असतें; पण मी नमुने तयार करणें, त्यांचे नकाशे काढणें, आणि ‘ लिनियन सोसायटी’ पुढें वाचावयाचा निबंध तपासणें ह्या कामांत अगदीं गाढ होऊन गेलों आहें. तो पुढच्या गुरुवारला नेमिलेला आहे. ”

हा निबंध त्यानें ता० १ मार्च रोजीं त्या सभेपुढें वाचिला. त्या सभेच्या दप्तरांत तो घालण्याकरितां पुनः तपाशीत असतां जे प्रयोग व परीक्षणें त्यास करावीं लागलीं त्यांत त्याचा तो सर्व महिना गेला. पुढें ईस्टरमध्यें आईबापांस भेटावयास जाऊन परत आल्यावर जीवशास्त्राच्या दुसऱ्या खंडाचा चवथा हप्ता तयार करण्याच्या उद्योगास तो लागला, आणि तो अंक जूनमध्यें प्रसिद्ध झाला. ह्या अंकासंबंधानें डार्विननें हुकरला असें लिहिलें:—“ तो विलक्षण रीतीच्या हुशारीचा दर्शक आहे, आणि त्यांत स्पेन्सर लिहितो तें बहुतेक खरें आहे.....समतोलाच्या नियमानुरोधानें कांहीं विचारशक्ति कमी करून घेऊन तो जर ज्यास्त निरीक्षण करण्यास

शिकला असता तर तो विलक्षण माणूस बनला असता.'' उन्हाळ्यांत बाहेर जाऊन सपटंबरमध्यें परत आल्यावर त्यानें नव्या ठिकाणीं जागा घेतली, व तेथें पुष्कळ वर्षें घालविलीं. तेथें तो पुष्कळ विघ्नें मध्यें येत असतां जीवशास्त्राचा बाकीचा भाग पुरा करण्याच्या कामास लागला; तो पुरा होण्यास आणखी तीन अंक निघावयाचे होते. त्यासंबंधानें १८९७ च्या फेब्रुवारींत तो डा० यूमन्स यांस लिहितो:—" 'जीवशास्त्रा'च्या शेवटच्या आधींचें प्रकरण माझें अर्धें पुरें झालें आहे, आणि आकस्मिक अडचण न आल्यास मार्च संपण्याच्या अगोदर हा खंड प्रसिद्ध होईल अशी मला खात्री वाटते. (तो पुरा होईल तेव्हां) मीं शिरावर घेतलेल्या कामाचा इतका कसोटीस लावणारा भाग मला एकदां पुरा करतां आला म्हणजे फार आनंद मानण्यासारखी ती गोष्ट होईल."

प्रकरण अकरावें

मातृपितृवियोग

१८६५ च्या दिजंबरांत 'जीवशास्त्रा'च्या काढिलेल्या हप्त्यांत स्पेन्सरनें अशी नोटीस दिली होती कीं हा खंड पुरा झाल्यावर ही माला बंद होईल. असा विचार करण्यास झालेलीं कारणें व तो फिरविण्यास केलेले प्रयत्न यांचें कथन त्यानें "आत्मचरितां" त केलेलें आहे. ह्याबद्दल सर्वांत अगोदर खटपट करणारांपकीं मिल्ल हा एक होता. त्यासंबंधानें ता० १९ फेब्रुवारी १८६६ रोजीं तो बापास लिहितो:—" सरासरी १० दिवसांपूर्वीं जॉन मिल्लकडून मला फार संतोषकारक पत्र आलें, त्याची एक नक्कल या पत्रासोबत पा-

ठविली आहे. त्यावरून त्याचें फार औदार्य व्यक्त होतें. तथापि त्यांतील दोन्ही देणग्या मीं नाकारिल्या आहेत. माला बंद करण्याची नोटीस काढण्यास कोणत्या प्रकारचें नुकसान कारण झालें हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं हें त्याच्या पत्रावरून स्पष्ट दिसतें. त्यास वाटतें कीं, छपाईचा खर्च आणि वर्गणीदारांकडील उत्पन्न ह्यांच्यामधील तफावतीपेक्षां तें (नुकसान) अन्य नाहीं; आणि म्हणून प्रकाशनाचा खर्च भागण्यास मला माला सुरू ठेवण्यास अडचण पडणार नाहीं. पण वास्तविक स्थिति काय आहे हें मीं त्यास स्पष्ट करून लिहिलें आहे. विलियम्स् व नॉर्गेट (स्पेन्सरच्या ग्रंथांचे प्रकाशक) यांनीं परवां मला असें कळविलें कीं, मला कबूल होईल अशा रीतीनें माझी अडचण दूर करण्याची (मिल्लची) कांहीं खटपट सुरू आहे. मला असेंहि समजतें कीं त्याच्या पत्राचा जबाब मिळाल्यावर तो त्यांस भेटावयास गेला होता."

याच गोष्टीच्या संबंधानें ता० २ मार्च रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—"काम्टेच्या मृत्युपत्राच्या व्यवस्थापकांपैकीं एक जण कौंट लिंबर्ग स्टीरम यानें प्रकाशनफंडाकरितां दहा पौंड पाठवून ल्युइस यास असें लिहिलें आहे कीं, या कामीं एक कमिटी नेमावी, आणि असा फंड फॉर्टनाइटली रिव्ह्यूच्या द्वारा जमवावा. अर्थात्, यासंबंधी माझ्या निश्चयास अनुसरून ती रक्कम मीं त्यास परत केली आहे, व खरी वस्तुस्थिति कळविली आहे."

यावर त्याच्या कांहीं मित्रांनीं अशी सूचना पुढें आणिली कीं, याच्या ग्रंथप्रकाशनाबद्दल ज्यांस कळकळ वाटत असेल त्यांनीं त्याचा खर्च भरून येईल इतक्या प्रतींना वर्गणीदार व्हावें, आणि ही सूचना नाकारणें वरच्या इतकें सोपें नव्हतें. त्यासंबंधानें ता० ११ एप्रिल रोजीं त्यानें हक्स्ले यास असें कळविलें कीं, मी या गोष्टीस जरी कबूल आहें, तरी ज्यांच्या खिशांत पैसे खेळत आहेत अशा माझ्या

मित्रांच्या संबंधानेंच मी हें कबूल करीन. हें काम खाजगी नसून सार्वजनिक आहे असें तूं कितीहि जोरानें सांगितलेंस, तरी मी या गोष्टीस कबूल होणार नाहीं, कारण तें माझ्या मनास बरें वाटणार नाहीं. "

पुढें हींहि मान्यता त्यानें काढून घेतली, आणि त्याचें कारण त्याच्या बापाच्या मृत्यूनंतर सरासरी तीन आठवड्यांनीं (मे महिन्यांत) डार्बी एथून हक्स्ले यास लिहिलेल्या पत्रांत दिलेलें असून तें पत्र ' आत्मचरितां 'त छापिलेलें आहे.

अमेरिकेंतील त्याचे मित्र देखील माला बंद होण्याचें संकट टळावें म्हणून फार खटपट करीत होते. १८६५ च्या अखेरीस माला बंद होणार ही गोष्ट यूमन्सच्या कानावर आल्यावर त्यानें त्यास असें लिहिलें कीं, " यासंबंधानें इष्ट ती गोष्ट करण्यास तूं प्रत्यवाय घेणार नाहींस अशी मी आशा करितों. " आपण काय करणार हें स्पेन्सर यास समजलें तर तो त्यास कधीं कबूल होणार नाहीं हें यूमन्स यास पूर्णपणें माहीत होतें. म्हणून त्यानें जून १५ पर्यंत मुकाट्यानें सात हजार डालर गोळा केले. पण स्पेन्सर ती रकम घेईल किंवा नाहीं याबद्दल त्यास जबर संशय होता. यास आणखी कारण अमेरिकेंतील कांहीं वर्तमानपत्रांत त्याच्या तत्त्वमीमांसेविरुद्ध चुरचुरीत टीका आलेली होती हें झालें होतें.

अखेरीस मिन्टर्नसाहेबाचें पत्र व ही रकम घेऊन यूमन्स स्पेन्सरकडे आला. तें पत्र वाचून स्पेन्सर यास आश्चर्य व आनंद हीं दोन्ही वाटलीं! यापत्राबरोबर आणखीहि गुणग्राहक पत्रें होतीं. पैकीं एक आल्जर नामक अमेरिकन गृहस्थाचें असून त्यांत पुढील मजकूर होता:—आह्मी ही रकम सत्य व मानवजाति ह्यांना निष्ठावंत होऊन तुला देत आहों; त्यांत तुजविषयीं किंवा आह्मांविषयीं स्वार्थपर विचाराचें अंग मुळींच नाहीं. आह्मी हें शुद्ध न्यायाचें

कृत्य म्हणून करीत आहों. तूं आपले स्वताचे नको म्हणणारे मनोविकार दाबून ठेवून, आह्मी शास्त्र व समाज यांची सेवा करण्यासाठीं ही देणगी ज्या मनोवृत्तीनें देत आहों, त्याच मनोवृत्तीनें जर घेणार नाहींस, तर आमची फारच निराशा होईल. ''

प्रसिद्ध अमेरिकन हेन्री वार्ड बीचर याचें पत्र असें होतें:—
" अमेरिकेंतील समाजाच्या विलक्षण स्थितीमुळें तुझे लेख यूरोपापेक्षां येथें जास्त फलकारक व जागृतिकारक झालेले आहेत. तुझे आमच्यावर पुष्कळ उपकार आहेत ह्याची आह्मांस जाणीव असून तुझे आह्मी देशबांधव असतों तर जशा रीतीनें त्यांची फेड आह्मीं केली असती तशा रीतीनें करतां येत नाहीं याबद्दल आह्मी बुचकळ्यांत पडलों आहों. पण तूं आमची, व आह्मां सर्वांना इतक्या प्रिय असलेल्या मानवी मनाच्या मुक्ततेची व सुसंस्कृतीची जी एवढी मोठी कामगिरी बजाविली आहेस, त्याबद्दलच्या आमच्या मनोवृत्तींची कांहीं तरी साक्ष दिल्याविना तुझ्या इतक्या ऋणांत राहण्यास आह्मांस कबूल होतां येत नाहीं. आणि आह्मांला भरंवसा वाटतो कीं, स्वताविषयीं नाजूक मनोवृत्तीचा किंतु मनांत आणून, आह्मांला एवढ्या अंतरावरून, व आमच्या परिस्थितींत, जी एकच गोष्ट करणें शक्य आहे ती करण्यास मनाई करणार नाहींस."

ता० २७ मार्च (१८६६) रोजीं त्यानें आपल्या बापास जें अखेरचें किंवा बहुतेक अखेरचें पत्र लिहिलें त्यांत सेंट पीटर्सबर्ग एथून आलेलें एक आश्चर्यकारक पण आनंदकारक पत्र घातलें होतें. तें पत्र त्याच्या ग्रंथांचें रशियन भाषेंत भाषान्तर करण्याची परवानगी मागण्याबद्दलचें होतें. तशी परवानगी त्यानें दिल्यावर त्याप्रमाणें ' शास्त्रांचें वर्गीकरण ' याचें रशियन भाषान्तर प्रथम प्रकाशित झालें. ह्याच ग्रंथाचें भाषान्तर रशियन ग्रंथकारानें प्रथम करण्याचें कारण असें होतें कीं, धार्मिक किंवा राजकीय विषयांची

चर्चा करणाऱ्या ग्रंथाच्या प्रकाशनास तेथील सरकारानें हरकत घेतली असती. "वर्गीकरणा"चें भाषान्तर निभावलें, पण निबंधांच्या भाषान्तराच्या प्रती तेथील सरकारानें जप्त केल्या; कारण "रीतिरिवाजा"वरील निबंधांत राजांना राज्य करण्याचा दैविक व अक्षय्य हक्क आहे ही गोष्ट नाकबूल केलेली आहे असा तेथील अधिकाऱ्यांस संशय आला. त्याबद्दल भाषान्तरकारावर आरोप येऊन त्यास आठ महिन्यांपासून सहा वर्षेंपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा होण्याचा संभव होता. म्हणून तसें झाल्यास त्यावर 'टाइम्स'मध्यें चार शब्द लिहिण्यास भाषान्तरकारानें स्पेन्सर यास विनंति केली. पण पुढच्या वर्षाच्या मार्च महिन्यांत आपल्यावरचा आरोप काढून घेतल्याचें त्यानें स्पेन्सर यास कळविलें.

'आदितत्त्वां'चें फ्रेंच भाषान्तर मिल्ल साहेबानें शिफारस केलेला डा० कॅझेलिस नांवाचा फ्रेंच गृहस्थ करीत होता. त्याच्या अगोदर १८६९ च्या आक्टोबरांत हें भाषांतर होण्याचा संभव असल्याचें प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार रेनान यानें स्पेन्सर यास कळविलें होतें. म्हणून १८६६ च्या अखेरीस डा० कॅझेलिसनें अर्धें अधिक भाषान्तर पुरें झाल्याचें जेव्हां स्पेन्सर यास कळविलें, तेव्हां सदर ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघेपर्यंत तें तहकूब ठेवण्यास त्यानें त्यास लिहिलें.

१८६६ च्या दुसऱ्या सहामाहींत त्यानें आणखी काय गोष्टी केल्या त्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं. यावेळची हकीकत लिहीत असतां आपल्यास ती स्पष्टपणें स्मरत नाहीं असें त्यानें 'आत्मचरितां'त म्हटलें आहे. आजपर्यंत त्याचीं व बापाचीं पत्रें त्याला गतगोष्टींची आठवण करण्यास कारणभूत होतीं. शिवाय या वेळची त्यास चांगली स्मृति राहूं नये हेंहि स्वाभाविकच होतें. त्याच्या बापाच्या मरणानें त्यास बसलेला धक्का, त्याच्या आईच्या प्रकृतीबद्दलची काळजी, आपली तात्त्विक ग्रंथमाला बंद करावी लागणार

हें मनांत येऊन त्याची झालेली नाउमेद, आणि ती अडचण अनपेक्षित रीतीनें दूर झाली ही गोष्ट, हीं सर्व कारणें या वेळीं झालेल्या गोष्टींचा कायमचा ठसा त्याच्या मनावर उठण्याच्या आड आलीं असावीं.

१८६७ च्या मार्च महिन्यांत ' आदितत्त्वें ' सुधारण्याचें योजिलेलें काम त्यानें हातीं घेतलें. त्याचा पूर्वभाग लंदनाबाहेर राहून सुधारतां येण्यासारखा असल्यामुळें थोडे दिवस पारीस येथें जाण्याचें त्यानें मनांत आणिलें. त्यासंबंधानें ता० ३ मे १८६७ रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—" मी रविवारीं पारीसला जाण्यास निघतों (त्या दिवसाचा असा उपयोग करण्यास मला फार आनंद वाटतो); एथें दहा एक दिवस राहीन म्हणतों; तेथें सुधारण्याकरितां थोडेंसें काम बरोबर घेणार आहें; पण मुख्यत्त्वेंकरून देखावे पहाण्यांत मी आपला वेळ तेथें घालवणार आहें." ता० ७ जून रोजीं पुनः तो त्यास लिहितो:—" मी पंधरवड्याकरितां म्हणून पारीस एथें गेलों, आणि आठवडा पुरा होण्यापूर्वीं परत आलों. सारखे देखावे पहाण्याचा लवकरच मला थकवा आला; आणि एकदांचा मी परतलों याचा मला मनापासून आनंद वाटला. ता० १९ जून रोजीं तो त्यास पुनः लिहितो:—" 'आदितत्त्वां'ची दुसरी आवृत्ति फार समाधानकारक रीतीनें बनत आहे—माझ्या अजमासापेक्षांहि अधिक समाधानकारक रीतीनें बनत आहे. तिच्या पुनर्घटित स्वरूपीं ती एथून तेथून अत्यन्त सुसंबद्ध बनणार आहे—म्हणजे, तिच्यांतलि कोटिक्रमाचें सूत कोठेंहि तुटलेलें दिसावयाचें नाहीं; आणि, मला वाटतें, तिच्यांत पूर्णपणाचा गुण उघड उघड दिसून येईल."

आपल्या ग्रंथमालेला विशिष्ट असें नांव देणें जरूर आहे असें त्यास आतां वाटूं लागलें. कारण ल्युइसनें ' तत्त्वज्ञानाचा इतिहास ' या आपल्या ग्रंथाची नवी आवृत्ति नुक्तीच काढिली तेव्हां त्यांत

याच्या व काम्टेच्या दोघांच्याहि तत्त्वमीमांसेस " विधायक मीमांसा, (Positive Philosophy)" हें नांव दिलेलें होतें, आणि त्यामुळें लोकांचा गैरसमज होण्याचा संभव होता. म्हणून " संघटनात्मक मीमांसा" हें नांव आपल्या मालेस देण्याचें त्यानें मनांत आणिलें. पण हक्स्ले व टिंडाल यांनीं नवें नांव ह्या द्वितीयावृत्तींत घालूं नको असें म्हटल्यामुळें, त्यांच्या म्हणण्याची सयुक्तिकता त्यास पटली नाहीं तरी त्यांच्या म्हणण्यास मान देऊन त्यानें तें घातलें नाहीं.

आपलें काम आपणास सोडून द्यावें लागणार अशी काळजी त्यास पडली असतांच १८६६ च्या एप्रिलांत त्याच्या बापाचा आकस्मिक आजार व मृत्यु यांनीं त्याच्या मनास मोठा धक्का बसला. ज्या तत्त्वमीमांसेच्या बीजारोपणापासून त्यानें तिजवर नजर ठेविली होती, आणि जिच्याविषयीं त्यानें प्रत्येक गोष्टींत यास सल्ला दिला होता, ती सोडून देण्याचा व त्याच्या मृत्यूचा समय सरासरी एकच यावा हें स्पेन्सर यास दैवाचें मोठें क्रूर विलसित म्हणून वाटलें असलें पाहिजे. उत्क्रांतितत्त्वाचीं प्रधान मतें जरी त्यास बापापासून प्राप्त झालेलीं नव्हतीं, तथापि ज्या बौद्धिक शिक्षणामुळें तिची घटना त्यास बनवतां येऊन एथपावेतों आणितां आली, तें शिक्षण त्यास त्याच्याकडूनच मिळालेलें होतें; आणि त्याच्या प्रत्येक प्रकरणांतील भाषा व विवेचन ह्यांतील गुणदोष त्यानें दाखविलेले होते. बापाच्या ह्या टीकेवर स्पेन्सरचा अखेरपावेतों पूर्ण विश्वास असे.

बापाच्या मृत्यूच्या धक्क्यांतून तो मान वर काढितो न काढितो तों त्याच्या सहनशील व सौम्य स्वभावाच्या आईच्या मृत्यूचा धक्का त्यास बसला. कारण ती १८६७ च्या मे महिन्यांत निवर्तली. ही गोष्ट जरी बापाच्या मृत्यूप्रमाणें त्याच्यावर आकस्मिक रीतीनें आली नाहीं, आणि तिजमुळें बौद्धिक साहचर्याला जरी तो

मुकला नाहीं, तरी त्याच्या स्वभावाच्या मनोवृत्तिविषयक अंगास तेणेंकरून जबर धक्का बसला. आपल्या बौद्धिक व्यासंगाशीं तिची बहुतेक मुळींच सहानुभूति नाहीं हें त्यास माहीत होतें; पण त्यास हेंहि माहीत होतें कीं, आपलें सुख व कल्याण ह्यांबद्दल ती फार काळजी वहाते; आणि त्याच्या हितासाठीं पाहिजे तो आत्मत्याग करण्यास ती तयार झाली असती.

आज कित्येक वर्षें त्याच्या आई-बापांच्या प्रकृतीबद्दल त्यास ज्यास्त ज्यास्त काळजी वाटावयास लागलेली होती. आईची प्रकृति सुधारण्याची आशा त्यानें आज कित्येक वर्षें सोडून दिलेली होती; कारण ती आपल्या प्रकृतीबद्दल सामान्य खबरदारी देखील घेत नसे. बापाची स्थिति ह्याच्या उलट असे; त्यास तो असेल त्याहून ज्यास्त आजारी असल्याची नेहमीं काळजी वाटे; आणि त्यामुळें तो खाणें, पिणें, लेणें ह्याविषयीं नेहमीं नवे नवे प्रयोग करून पहात असे. बरा असेल तेव्हां ह्याच्या उलट तो वागे; म्हणजे, बेताबाहेर श्रम करी. आई जुन्या विचारांची असल्यामुळें तिला किती सांगितलें तरी आपल्या ठराविक आयुष्यक्रमांत ती कमी करीत नसे; आणि तिची प्रकृति जात्याच अशक्त असल्यामुळें नवऱ्याप्रमाणें तीस मध्यें मध्यें-हि बरें वाटत नसे, आणि त्यामुळें तिच्या प्रकृतीची काळजी ह्यास नेहमींच वाटे.

स्पेन्सरचा स्वभाव म्हणजे ‘ सर्वच बुद्धि व मनोविकार मुळींच नाहीं ’ अशा प्रकारचा होता असें पुष्कळ लोक समजत असत, पण हें मत चुकीचें असल्याबद्दल त्याच्या मित्रांस चांगलें माहीत होतें. तो आपले मनोविकार अगदीं मनःपूर्वक प्रदर्शित करी ह्याबद्दल तो ज्यास ज्यास माहीत होता अशा कोणासहि कधींच शंका आली नाहीं. त्याचें त्याच्या आईबापांवर शुद्ध व खोल प्रेम होतें, हें त्याच्या तेहतीस वर्षांच्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसून येतें.

त्यांत प्रेमाचे कल्लोळ दर्शविणारे शब्द नाहींत असें कोणास वाटेल! माणसाच्या शब्दांवरून त्याच्या मनोवृत्तींचा विचार करतांना त्याचा स्वभाव विशेष ध्यानांत घेतला पाहिजे. स्पेन्सरला अतिशयोक्तीचा स्वभवतःच तिटकारा होता हें ध्यानांत आणिलें म्हणजे त्याच्या पत्रांत ' तम ' प्रत्ययांत विशेषणांची रेलचेल कां दिसत नाहीं ह्या गोष्टीचा उलगडा होतो. शिवाय एकाद्याच्या मनोवृत्तींचा विचार करतांना जसें त्याच्या भाषेकडे पाहिलें पाहिजे तसें मजकुराकडेहि पाहिलें पाहिजे. त्या दृष्टीनें त्याच्या पत्रांकडे पाहतां त्यांत त्यानें आईबापांचे आजार, त्यांचीं भांडणें, किंवा नफानुकसानें, किंवा मानसिक व्यथा ह्यांजबद्दल, बारीकसारीक गोष्टींबद्दल देखील विचारपूस केलेली दिसून येते, आणि असें करण्यापेक्षां नुसतें अतिशयोक्तिरूप सहानुभूतिपर शब्द योजणें किती सुकर आहे हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. त्याच्या पत्रांत सहानुभूतिरूप मनोविकारप्रदर्शनें जरी फार जोराचीं दिसत नाहींत, तरी विचाराच्या गोष्टी बारीकसारीक देखील आईबापांच्या नजरेस आणिलेल्या दिसतात. त्यांस पत्र लिहिण्याचा तो कधीं कंटाळा करीत नसे, किंवा तीं कशींबशींहि लिहीत नसे. त्याच्या पत्रांवरून तो व त्याचा बाप ह्यांच्यांत विचार व मनोविकार ह्यांचें परस्परांशीं किती निकट दळणवळण होतें हें दिसून येतें. आईची आपल्या विचारांशीं फारशी सहानुभूति नाहीं हें जरी त्यास माहीत होतें तरी तो तिजपासून कोणताहि विचार लपवून ठेवीत नसे. त्याचा प्रघात लोकांकडून आपल्यास आलेलीं सर्व पत्रें घरीं पाठविण्याचा असे, मग तीं त्याच्या ग्रंथांसंबंधानें असोत, योजना व आशा यांच्या संबंधाचीं असोत, किंवा स्नेह्यांकडे जाण्यायेण्यासंबंधाचीं असोत. अशा रीतीनें त्याच्या आईबापांना त्याच्या आयुःक्रमाची प्रत्येक बारीकसारीक गोष्ट माहीत होत असे. तींहि त्याच्याशीं तितक्याच मोकळ्या म-

नानें वागत. अशा प्रकारचीं बापमुलांनीं आपलीं मनें एकमेकांना उघडीं करून दाखविल्याचीं उदाहरणें विरळ सांपडतात; आणि विचार व मनोविकार ह्यांच्या एवढ्या उच्च पायरीवर तिसांहून अधिक वर्षें बापमुलांनीं पत्रव्यवहार चालू ठेविल्याचीं उदाहरणें तर त्याहूनहि विरळ होत.

प्रकरण बारावें

मानसशास्त्र आणि वर्णनात्मक समाजशास्त्र

१८६७ च्या उन्हाळ्यांत तो जो फिरावयास गेला तो यारो, आर्डटॉर्निश, स्कारबरो वगैरे बऱ्याच ठिकाणीं गेला, आणि नंतर ल्युइसबरोबर सरे प्रांतांत पायीं फिरला. त्या सहलींत त्यानें केंब्रिजमधून जात असतां मि० क्रॉसच्या कुटुंबाशीं ल्युइसची ओळख करून दिली. ह्या क्रॉससाहेबाशीं जार्ज इलियटनें पुढें लग्न केलें, व तिचें त्यानें पुढें चरित्र लिहिलें. स्पेन्सरची क्रॉससाहेबाशीं १८५८ पासून ओळख झालेली होती.

'सोश्यल स्टॅटिक्स' मध्यें त्यानें प्रदर्शित केलेल्या मतावरून, तो स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा असें म्हणणारांपैकीं असावा, असें लोकांस वाटत असे. म्हणून त्या उद्देशानें एक सभा स्थापन व्हावयाची होती तिचा सभासद होण्याची मिल्लनें आगस्टमध्यें त्यास विनंती केली. ह्याच्यापूर्वीं दोन महिने त्या ग्रंथांतील 'स्त्रियांचे हक्क' हें प्रकरण मिस हेलेन टेलर (मिल्लच्या बायकोची पूर्वीच्या संबंधाची मुलगी) कांहीं निबंध छापीत होती त्यांत गोंवण्याची तिनें विनंति केली होती. त्यासंबंधानें ता० २८ मे १८६७ रोजीं तो मिल्ल यास लिहितो:—

' सोश्यल स्टॅटिक्स ' लिहून आज सतरा वर्षें झालीं; तेवढ्या मुदतींत त्यांत प्रतिपादिलेल्या विषयांपैकीं बऱ्याच विषयांच्या संबंधानें माझीं मतें ज्यास्त पूर्ण आकारास आलेलीं आहेत हें तुझ्या लक्ष्यांत येईलच; आणि म्हणून तीं पूर्वींच्या स्वरूपीं पुनः प्रसिद्ध करण्यास मी नाखुषी आहें हेंहि तुझ्या ध्यानांत येईलच. बरें, ते भाग मीं पुनः लिहून काढावे म्हणशील तर तसें करावयास लागल्यानें माझ्या हल्लींच्या बेतांत फारच घोंटाळा उडण्याचा संभव आहे. "

ह्या पत्रांत जर तो ह्याहून ज्यास्त स्पष्ट खुलासा करता, तर वरील ग्रंथ लिहिल्यापासून त्याचीं मतें किती बदललीं आहेत हें मिल्लच्या लक्ष्यांत आलें असतें, व तो त्यास वरील सभेचा सभासद होण्याचा आग्रह करता नसता. म्हणून त्यास आतां पुढील पत्र लिहावें लागलें. तें यारोहून ता० ९ आगस्ट १८६७ रोजीं लिहिलेलें आहे. तें असें:—" मी उत्तरेकडे (स्काटलंदांत) चाललों असतां एथें प्रो० मेसनकडे थोडे दिवस उतरलों आहें तेथें मला तुझें पत्र पावलें. " सोश्यल स्टॅटिक्स " हा ग्रंथ मीं लिहिला तेव्हांपासून माझीं मतें कांहींशीं बदललीं आहेत हें मीं तुला कांहीं दिवसांपूर्वीं तुझ्या एका पत्राच्या उत्तरीं कळविलें होतें तें बहुधा तुला स्मरत असेल. तो बदल इतका झाला कीं, स्त्रियांना मतदानाचा हक्क अखेरीस द्यावा असें म्हणण्यास जरी मी तयार आहें तरी तो आतांच द्यावा किंवा थोड्याशा काळानें द्यावा असें म्हणण्यास मी तयार नाहीं. माझें असें मत आहे, आणि निःसंशय तुझेंहि असेंच असेल, कीं, मतदानासारखे जे राजकीय अधिकार आहेत ते केवळ कांहीं साध्य साधण्याचीं साधनें आहेत. तें साध्य, तूं बहुधा म्हणशील, असले अधिकार चालविणाऱ्या व्यक्तींचें हित साधणें हें होय; किंवा दुसऱ्या पक्षीं, मी म्हणेन कीं, तें साध्य त्यांना अत्यन्त मोठें क्रियास्वातंत्र्य प्राप्त करून देणें हें होय. प्रत्येकानें

आपल्या शक्तींचा बिन अडथळा उपयोग करणें, आणि इतरांच्या त्याच हक्काची तेवढी मर्यादा मानणें ही गोष्ट मतदानाच्या हक्कापासून प्राप्त होण्याचा व कायम राहण्याचा संभव असतो. खरें स्वातंत्र्य हेंच आहे, व त्याच्याशीं तुलना करून पाहतां मतदानाचा हक्क हें केवळ नांवाचें स्वातंत्र्य आहे. म्हणून ह्यासंबंधानें पुढील प्रश्न मी मुद्याचा समजतों; कमींत कमी अडथळ्यानें जीविताचे उद्देश प्राप्त करण्याच्या मार्गास लागण्याचें हें भरीव स्वातंत्र्य ज्यास्तींत ज्यास्ती लोकांस कसें देतां येईल ? आणि याशीं संबद्ध असा प्रश्न हा आहे कीं, मतदानाचा हा जो हक्क नांवाचेंच स्वातंत्र्य वाढवणारा आहे, तो स्त्रियांना देण्यानें स्वातंत्र्याचें वास्तविक वर्धन होईल काय ? माझें निश्चित मत आहे कीं, तें होणार नाहीं. मला वाटतें, बायकांस राजकीय अधिकार दिल्यानें, स्वातंत्र्याला दोन प्रकारें आकुंचितपणा, आणि खरोखर, कमीपणा येईल. माझें मत असें आहे कीं तेणेंकरून राजकीय व धार्मिक अधिकाऱ्यांचे हात बळकट होतील; कारण बहुतेक स्त्रिया अधिकाराच्या पक्षाच्या असतात. शिवाय, तेणेंकरून सर्व प्रकारच्या सरकारी कारभाराच्या शाखांना मदत व उत्तेजन मिळेल; आणि त्यांतील बहुतेक साहजिकपणेंच व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध आहेत. पुरुषदेखील आपल्या राजकीय कृतींत नजीकच्या नफ्यातोट्याकडे फारच लक्ष्य देत असतात; आणि स्त्रियांमध्यें तर हा कल ह्याहूनहि ज्यास्त दिसेल. कांहीं सामाजिक दुःख निवारावयाचें किंवा सुख मिळवावयाचें असूं द्या; त्यासंबंधानें कायदा केल्यास ज्या अहितकारक प्रतिक्रिया उत्पन्न होतील, त्या अगदीं अपवादरूप स्त्रियाच तेवढ्या लक्ष्यांत घेतील. अशा प्रकारची राजकीय दूरदृष्टि पुरुषांमध्येंहि विरळ असून स्त्रियांमध्यें तर अत्यन्तच विरळ आहे. अर्थात् ज्यांना पुरुष व स्त्रिया यांचीं मनें सदृश वाटत असतील, त्यांस असली अडचण

मुळींच भासणार नाहीं. पण माझ्या मतें स्त्रीपुरुषांचीं मनें गुणधर्म व संचय या दोन्ही बाबतींत विसदृश आहेत. मला वाटतें, हा भेद इंद्रियघटनाविषयक आवश्यकतेवरून उत्पन्न झालेला आहे, आणि कितीहि शिक्षणानें तो नाहींसा होण्यासारखा नाहीं. आणि शिवाय मला असें वाटतें कीं, स्त्रियांचा जो कमीपणा आहे तो ज्या बौद्धिक व नैतिक अशा अत्यंत संमिश्रगुणांचें क्षेत्र राजकीय क्रिया हें आहे त्या गुणांच्याच संबंधानें आहे. सरकारचें जें मला वास्तविक क्रियाक्षेत्र म्हणून वाटतें तेंच जेव्हां त्याच्या हातीं शिल्लक राहील, म्हणजे त्या क्षेत्राबाहेर जाणें जेव्हां त्यास वस्तुतः अशक्य होऊन जाईल, तेव्हां स्त्रियांना राजकीय सत्ता मिळावी ही गोष्ट सध्यांच्या व दूरवरच्या दोन्ही दृष्टींनीं न्याय्य होईल. या माझ्या विचारांचा तुला बरोबर अर्थ करतां येण्यास तुला असें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, माझ्या मतें सरकारच्या क्रिया मर्यादित करणें हा अत्यन्त महत्त्वाचा प्रश्न आहे; आणि त्याच्या मानानें इतर सर्व राजकीय प्रश्न क्षुल्लक आहेत; आणि ज्या मानानें मतदानविषयक व इतर फेरबदल कांहीं अंशीं प्रत्यक्ष अन्याय काढून टाकून, आणि कांहीं अंशीं फाजील कायद्यांपासून अवश्यमेव होणारे अप्रत्यक्ष अन्याय दूर करून, माणसांस ज्यास्त स्वतंत्र करण्यासारखे असतील, त्याच मानानें मुख्यत्वेंकरून मी त्यांची महती समजतों. ह्या बाबतींत माझें मत तुझ्या मताशीं जुळत नाहीं ह्याबद्दल मला फार वाईट वाटतें; आणि तुझा हेतु फार उदात्त आहे हें माझ्या लक्षांत असल्यामुळें मला ज्यास्तच वाईट वाटतें; म्हणून माझ्या सदसद्विवेकबुद्धीची समजूत मला करतां आली असती, तर मीं तुझें अनुकरण खुशीनें केलें असतें."

आणखी दोन वर्षांनीं ह्याविषयींचीं त्याचीं मतें स्पष्ट करून सांगण्यास आणखी एकदां त्यास संधि आली. कारण त्या वेळीं "स्त्रि-

यांची परवशता " हा मिल्लचा सुप्रसिद्ध ग्रंथ प्रसिद्ध होऊन त्याची एक प्रत त्यानें त्यास पाठविली. तेव्हां (ता० ९ जून १८६९ रोजीं) त्यानें मिल्ल यास पुढील पत्र लिहिलें:—" 'स्त्रियांची परवशता' यावरील निबंधाच्या प्रतीबद्दल मी तुझा आभारी आहें..... एथें मी इतकेंच म्हणतों कीं, स्त्रीपुरुषांचे संबंध केवळ किंवा मुख्यत्वेंकरून कायद्यावरूनच निश्चित होत असतात असें गृहीत करून एकंदर प्रश्नाची त्याच्या सामाजिक व राजकीय स्वरूपीं चर्चा चाललेली दिसते. मला वाटतें, 'स्त्रियांचें वर्चस्व' या विषयावर सणसणीत असा निबंध लिहितां येईल, आणि त्यांत असें दाखवितां येईल कीं, सुधारणेच्या प्रस्तुतच्या स्थितींत पुरुषांनीं स्त्रियांस सामाजिक व्यवस्थांत स्वेच्छेनें दिलेल्या सवलतींना व्यवस्थित कायद्यांचें स्वरूप आलेलें असून, कायदेमंडळाकडून होणाऱ्या कायद्यांनीं होणारें जें स्त्रियांचें नुकसान होतें तें तेणेंकरून पुष्कळ अंशीं भरून येतें, आणि समाजाच्या एका मोठ्या भागामध्यें एथून तेथवर अबलांचा जुलमी अंमल सबलांच्या जुलमी अमलाइतकाच भयंकर आहे. "

पुष्कळ बाबतींत स्त्रिया पुरुषांवर जुलमी सत्ता चालवितात, आणि बहुधा हा जुलूम पुरुषांपैकीं उत्तमांवर सर्वांत ज्यास्त होतो, असें स्पेन्सरप्रमाणें मिल्ललाहि पूर्णपणें वाटत होतें; पण तो असेंहि म्हणे कीं, "दोन परस्परविरुद्ध जुलमी अंमल-स्वातंत्र्य " असें समीकरण कांहीं करतां येत नाहीं.

आक्टोबरच्या प्रारंभीं ' मानसशास्त्रा'च्या पुनःशोधनास सुरुवात करण्यास उत्सुक होत्साता लंदनास तो परत आला; त्याजविषयीं एका टिपणांत तो असें म्हणतो:—" नांवानें ही दुसरी आवृत्ति होती, पण तो वास्तविकपणें नवाच ग्रंथ होता; कारण त्याच्यांत जुन्या ग्रंथाचे कित्येक भाग पुष्कळ वाढविलेले असून, त्यांत पूर्वीं नव्हते असे चार भाग नवे घातलेले होते.....हे भाग आतां मला तयार करावयाचे

होते, आणि त्या कामास बऱ्याच उत्साहपूर्वक मीं सुरवात केली; कारण पूर्वीं मीं प्रतिपादिलेलीं मतें आणि हीं नवीं मतें ह्यांमधील मेळ मला त्यांत दाखवितां येईल हें माझ्या लक्षांत आलें होतें, आणि तसें करण्याची मला मोठी हौस वाटत होती. शिवाय पूर्वीं मीं प्रतिपादिलेलीं सामान्य मतें ज्यास्त पूर्णपणें जिच्यांत प्रतिपादिलेलीं आहेत अशी नवी आवृत्ति तयार करण्यांत आणखी एक प्रकारचें समाधान मला होतें; कारण पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाली त्या वेळीं ह्या मतांच्या संबंधानें सार्वजनिक मनाचा जो कल होता त्याहून आतां फार भिन्न झाला होता. १८९८ त ह्या मताकडे फारच थोड्या लोकांचें लक्ष गेलें होतें; आणि ज्यांचें गेलें त्यांपैकीं बहुतेकांकडून मला शिव्याच मिळाल्या होत्या. सर्व इंद्रियजालें उत्क्रान्तीपासून उत्पन्न झालेलीं आहेत, असें त्या ग्रंथांत मुकाट्यानें गृहीत केलेलें असल्यामुळें, आणि त्याच्या अखेरीस अखेरीस स्पष्टपणें कथिलेलें असल्यामुळें, आणि ह्या कल्पतीस अनुरूप अशा रीतीनें मनाच्या चमत्कारांची उपपत्ति अवश्यमेव लाविली पाहिजे अशी कल्पना त्या ग्रंथांत एथून तेथून भरलेली असल्यामुळें, त्या सालीं त्याबद्दल सहानुभूति उत्पन्न न होतां विरुद्ध मनोवृत्ति उत्पन्न झाली होती. पुढें सरासरी चारवर्षांनीं " उपजातींचा उद्गम " हा डार्विनचा ग्रंथ जेव्हां प्रसिद्ध झाला, आणि त्याजकडे लोकांचें इतकें लक्ष्य जाऊन इतका वादविवाद उत्पन्न झाला, आणि अशा रीतीनें शास्त्रज्ञमंडळाचीं मतें नंतर लवकरच फारच बदलून गेलीं, तेव्हांच 'मानशास्त्रां'त प्रतिपादिलेल्या मतांकडे लोक ज्यास्त सहानुभूतिपूर्वक पाहूं लागले........तथापि पूर्वीं त्या ग्रंथाला जो मान मिळत नव्हता तो आतां एकदम मिळूं लागला असें झालें नाहीं; तर, मतप्रवाहांत असा हा बदल झाल्यामुळें, हें प्रागतिक मत प्रतिपादणारे दुसरे ग्रंथ उत्पन्न झाले, आणि आतां काल बदलल्यामुळें लोक त्याजकडे सहानुभूतिपूर्वक

पाहूं लागले. " मनाचें इंद्रियविज्ञान व रोगविज्ञान " या डा० मॉडस्लेच्या ग्रंथासंबंधानें ही गोष्ट विशेषतः दिसून आली. तो ग्रंथ एथून तेथवर मनाकडे उत्क्रान्तिदृष्टया पाहून रचलेला होता, आणि ' मानसशास्त्रां ' तील पायाभूत मत त्यांत स्वीकारलेलें असून तें कोठून घेतलें हें मुळींच दाखविलेलें नव्हतें; म्हणून त्याच्यावर पसंतीचे अभिप्राय येऊन त्याचा चांगला खप झाला. म्हणून आतां ' मानसशास्त्र ' आणखी पक्क करण्याकरितां मी जेव्हां त्याजकडे वळलों, तेव्हां मला अशी आशा वाटली कीं, ज्या स्थितींत मला सर्व लाथा आणि इतरांना सर्व लाडू मिळाले होते, ती सुधारण्यास आतां कांहीं तरी करतां येईल. "

पुढें आपल्यास आपल्या संघटनेच्या समाजशास्त्राविषयक भागाकडे वळावें लागेल, आणि त्याकरितां पुष्कळ तयारी अगोदर करावी लागेल, इकडेहि त्याची हल्लीं नजर होती. ही तयारी दुसऱ्या कोणाकडून करणें इष्ट आहे असें त्यास आलीकडे कांहीं काळ वाटूं लागलें होतें, आणि आतां आईबापांना पोसण्याचा भार त्याजवर नसल्यामुळें त्याला तें करतां आलें. ह्या बाबतींत त्यानें प्रो० मॅसनचा सल्ला घेतला, आणि त्याच्या शिफारशीनें प्रो० डंकन यास आपला सेक्रेटरी नेमिलें. आणि इकडे ' मानसशास्त्रा'ला प्रारंभ केल्याबरोबरच सर्व प्रकारच्या सामाजिक चमत्कारांचें समकालीन व क्रमिक अस्तित्व दाखविणारीं ऐतिहासिक पुराव्याचीं कोष्टकें तयार करण्याची जी त्याची कल्पना तीसहि प्रत्यक्ष स्वरूप तो देऊं लागला. दोनप्रहरच्या जेवणापूर्वीं सरासरी तासभर त्याचा सेक्रेटरी हातांत पेन्सिल घेऊन प्रवासवर्णनात्मक ग्रंथांचे भाग वाचीत असे, आणि तो ते लक्ष्यपूर्वक ऐकत असे. त्याला पाहिजे अशी एकादी गोष्ट त्यांत त्यास दिसली कीं ' त्या खालीं रेघ ओढ ' म्हणून तो आपल्या सेक्रेटरीस सांगत असे. अशा रीतीनें त्या कामाची माहिती

त्यास करून दिल्यावर मग त्यानें तें काम बहुतेक त्याजवरच संपविलें. त्यानें त्यास केलेली एक सूचना त्याच्या स्वभावाला अनुरूप होती. हें काम फार मोठें असून त्यास फार काळ लागेल हें लक्ष्यांत घेऊन त्यानें सेक्रेटरीस फार पुस्तकें वाचूं नको म्हणून सांगितलें. तो त्यास म्हणाला, तूं कोणत्याहि टोळीवर तीन विश्वसनीय पुस्तकें वाचिलींस म्हणजे पुरे. पण ही सूचना त्यास मुकाट्यानें बाजूस ठेवावी लागली. ह्यास एक कारण सर्व प्रकारचे सामाजिक चमत्कार लक्ष्यांत घेण्याचें सामर्थ्य थोड्याच प्रवाशांच्या अंगीं असतें; दुसरें कारण रानटी किंवा अर्धवट सुधारलेल्या समाजांच्या कांहीं रूपांकडे लक्ष्य द्यावेंसें पुष्कळांस वाटत नाहीं; आणि तिसरें कारण इतरांस असल्या समाजांचीं वरवरचीं तेवढीं स्वरूपें खेरीज करून इतर रूपांचें निरीक्षण करण्यास संधि मिळत नाहीं. शिवाय, एकादा ग्रंथकार विश्वसनीय आहे किंवा नाहीं हें त्यांत लिहिलेलें वाचिल्याशिवाय कळण्याचा मार्गच नसतो.

ह्या पूर्वतयारीच्या संबंधानें स्पेन्सरनें अशी हकीकत दिली आहे:—"वर्गीकरणाची पद्धति सविस्तर ठरविण्यांत मला कांहीं वेळ घालवावा लागला; कारण स्वाभाविक व पद्धतवार अशा रूपानें समाजविषयक सर्व चमत्कार दाखविण्याची एकादी पद्धति शोधून काढण्याचें काम सोपें नव्हतें. पण सरतेशेवटीं ही मांडणी करण्याची समाधानकारक पद्धति (माझ्या मनांत) ठसली, आणि मजला मोठ्यानें वाचून दाखवून आणि जरूर त्या सूचना मजपासून मिळवून, कामाचें स्वरूप आणि भरावयाचीं सदरें ह्यांची माहिती डंकननें करून घेतली तोंपावेतों मीं असुधारलेल्या जातींच्या कोष्टकांचें स्वरूप कायम ठरविलें, आणि सदरांचे मथळे घालून त्यांचे फर्मे शिळेवर छापून काढविले. ही सर्व खटपट माझ्या स्वताच्या उपयोगासाठीं आवश्यक सामग्री तयार करण्याच्या उद्देशानें मीं केली

होती. पण ह्यांपैकीं कांहीं कोष्टकें जेव्हां भरून तयार झालीं, तेव्हां प्रत्येक समाजामध्यें दिसणारे सर्व चमत्कार एकसमयावच्छेदेंकरून अशा रीतीनें पाहण्यापासून होणारा फायदा माझ्या लक्ष्यांत येणें शक्य झालें; आणि तेव्हां मला असें सुचलें कीं, आपण उपयोग केल्यावर इतकी ही सामग्री फुकट जाऊं देणें बरोबर नाहीं. म्हणून मीं तीं कोष्टकें छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. त्यानंतर आपलें काम केवळ खाजगी उपयोग झाला म्हणजे फुकट न जातां तें प्रसिद्ध झाल्यामुळें मिळणारी प्रतिष्ठा आपणास मिळेल ह्या जाणिवेनें डंकन आपलें काम करूं लागला. आणि अशा रीतीनें वर्णनात्मक ‘ समाजशास्त्रा ’ ची उत्पत्ति झाली. ”

१८६८ सालाबरोबर नेहमींपेक्षां अधिक डोकेदुखीचा हल्ला त्याच्यावर झाला म्हणून प्रो० टिंडालला त्यानें असें विचारिलें कीं, प्रवासांत चांगली सोबत करील असा एकादा आनंदी व विनोदी माणूस तुझ्या माहितींत आहे काय? तो मिळेतोंपावेतों डंकन साहेबाशींच तो ‘ राकेट ’ नांवाचा चेंडूफळीचा खेळ पेंटनाव्हिल येथील दारूच्या दुकानानजीकच्या चौकांत पुनः खेळूं लागला. तो डंकन यास चांगला येत नसे, म्हणून एकादे वेळीं शेजारच्या घरांच्या खिडक्यांवर चेंडू फेंकला जाऊन तावदानें फुटून तीं भरून देण्याचा प्रसंग येई. पण स्पेन्सर ह्याबद्दल त्याजवर कधीं रागावला नाहीं. अशा रीतीनें सरासरी वीस मिनिटें खेळ झाल्यावर शेजारच्या एका छपराखालीं बसून तितकाच वेळ तो त्यास मजकूर सांगे; नंतर आणखी एक डाव खेळे, आणि आणखी मजकूर सांगे. अशा रीतीनें सकाळचें काम चाले. एका प्रसंगीं प्रो० टिंडाल तेथें आला आणि आपण आपलें ‘ मानसशास्त्र ’ असें थोडें थोडें अशा विलक्षण परिस्थितींत लिहीत आहों असें जेव्हां स्पेन्सरनें त्यास सांगितलें, तेव्हां त्यास सहजच आश्चर्य वाटलें, व तें खरेंहि वाटेना. पाऊस वगैरे

असल्यामुळें हा खेळ खेळण्याची सोय नसल्यास तो बिलियर्डचा खेळ खेळत असे. हवा अमळ ज्यास्त उबदार झाली म्हणजे तो ' सर्पेंटाइन ' नामक कृत्रिम ओढ्यावर जात असे, आणि आळीपाळीनें वल्हवणें आणि मजकूर सांगणें हीं कामें सकाळचीं करीत असे, किंवा ' केंसिंग्टन गार्डनस् ' या सार्वजनिक बागेंत जाऊन तेथें थोडा थोडा वेळ झाडाखालीं बसून मजकूर सांगे, आणि थोडा थोडा वेळ फेरफटका करी. पुढें १८६८ च्या पहिल्या महिन्यांत त्यास जेव्हां ' आथिनीयम ' या क्लबाचा सभासद निवडिलें, तेव्हां कर्मणुकीचा आणखी एक मार्ग त्यास खुला झाला.

' आनंदी व विनोदी मित्र ' न मिळाल्यामुळें फेब्रुवारींत त्यानें इटालीस एकटेंच निघण्याचा निश्चय केला. ह्या प्रवासाची पुरी हकीकत त्यानें ' आत्मचरितां 'त दिलेली आहे. तो एप्रिलच्या पंधरावीच्या सुमारास परत आला, तेव्हां प्रकृतीस फारसा फायदा झालेला नसून पत्रें लिहिण्याचा देखील उत्साह त्यास राहिलेला नव्हता, पण त्यास निदान एवढी आशा होती कीं, लिहिणें फारसें न झालें तरी सेक्रेटरीच्या द्वारा वाचणें तरी कांहींसें होईल.

समाजशास्त्रासंबंधाच्या पूर्व तयारीची देखरेख आणि त्याच्या प्रकृतीची ही स्थिति यावरूनच मानसशास्त्राची प्रगति मंदरीत्या कां चालली होती ह्याचें पूर्ण स्पष्टीकरण होत नाहीं; कारण त्या गोष्टीस आणखीहि कारणें मधून मधून होत असत. उदाहरणार्थ, किंग्डन क्लिफर्ड नामक गृहस्थानें " मानसिक वाढीचीं कांहीं कारणें " ह्या विषयावर ' रॉयल इन्स्टिटयूशन ' नामक सभेपुढें एक निबंध वाचिला त्यामुळें असें एक कारण उत्पन्न झालें. कारण त्यांत प्रतिपादिलेलीं मतें याचीं असून आपल्यासंबंधानें चुकीचा समज उत्पन्न होईल अशा रीतीनें तीं मांडिलेलीं आहेत असें यास वाटलें. म्हणून त्या बाबतींत प्रो० टिंडालचा सल्ला घेण्याकरितां त्यास ता० ११ मे १८६८ रोजीं

त्यानें पुढील पत्र लिहिलें:—" मीं अगोदरच प्रसिद्ध केलेल्या कांहीं मतांच्या संक्षिप्त रीत्या व सोप्या भाषेंत कथन करण्यापलीकडे त्या व्याख्यानांत दुसरें कांहीं नाहीं.........मला वाटतें, अगदीं परिचित विधानांखेरीज, माझ्या पुस्तकांत कोठेंतरी त्याच किंवा अन्य स्वरूपानें केलेलें नाहीं असें मुळींच विधान त्याच्यांत नाहीं.........ही गोष्ट जगापुढें आणणें ज्यास्तच जरूर ह्यामुळें झालें आहे कीं, तेणेंकरून आणि दुसऱ्या असल्याच एका गोष्टीमुळें माझी स्थिति फार चमत्कारिक झाली आहे.....ती अशी कीं, माझ्या स्वताच्या कल्पना पुनः मीं आपल्या ग्रंथांत गोंविल्यास मीं लोकांपासून ह्या घेतल्या असा आरोप मजवर येण्याचा संभव आहे. मीं म्हणतों ती परिस्थिति अशी आहे. " मनाचें इंद्रियविज्ञान व रोगविज्ञान " ह्या नांवाचें एक पुस्तक गतवर्षीं डा० मॉडस्लेनें प्रसिद्ध केलें आहे..... त्यानें त्यांतील मतें मजपासून घेतलेलीं असून तीं त्याचीं म्हणून इतर लोक उतरून घेऊं लागले आहेत.....पहा तेव्हां आतां माझी स्थिति कशी झाली आहे ती. मी 'मानसशास्त्राच्या तत्त्वाची नवी आवृत्ति' तयार करण्यास प्रारंभ करीत आहें; तिच्यांत दुसऱ्यांच्या नांवानें पसरलीं जाणारीं हीं मतें पुनः येतील..... तेव्हां माझे स्वताचेच विचार मीं पुनः प्रदर्शित केल्यानें मजवर लोकांपासून ते चोरून घेतल्याचा आरोप येण्याचा संभव उत्पन्न होणार ! "

ही गोष्ट जेव्हां क्लिफर्ड साहेबाच्या नजरेस आणिली, तेव्हां त्यानें ता० २४ जूनच्या पेलमेल ग्याझेटांत एक पत्र लिहून स्पेन्सरचें समाधान होईल अशा रीतीनें तिचें स्पष्टीकरण करून टाकिलें.

१८६८ सालच्या पावसाळ्याच्या सुटीचा कांहीं भाग त्यानें इन्व्हेरोराम् एथें घालविला, व तेथें ऑर्ची नदीवर त्याला चांगले मासे सांपडले. तेथील खाणावळींत उतरलेल्या दुसऱ्या दोघांच्या मानानें आपल्यास ज्यास्त मासे सांपडल्याचें लिहितांना तो बहुतेक एकाद्या

पोराप्रमाणें आपलें समाधान व्यक्त करितो. पण त्या खाणावळीं-तील अन्नांत वैविध्य नाहीं ह्या त्याच्या नेहमींच्या सबबीवर त्यानें तेथून लवकरच प्रयाण केलें.

ह्या सालच्या अखेरीस त्याच्या कामास पुनः अडथळा आला. आक्टोबरच्या ' नॉर्थअमेरिकन रिव्ह्यू 'त आबट नामक एका साहेबानें ' तात्त्विक जीवशास्त्र ' ह्या नांवाचा एक निबंध लिहून कांहीं पायाभूत प्रश्नास स्पेन्सरनें दिलेल्या उत्तराचें परीक्षण केलें. त्यांत त्यानें असें म्हटलें होतें:—" जीविताचा उगम काय ? " ह्या प्रश्नास स्पेन्सरच्या ग्रंथांत निश्चित असें कांहींच उत्तर आपल्यास सांपडत नाहीं. " उपजातींचा उद्गम काय ? " ह्या प्रश्नास स्पेन्सरचें उत्तर वस्तुत: डार्विनच्याच उत्तरासारखेंच आहे. " सेंद्रिय उत्क्रमणाचीं कारणें काय ? " ह्या तिसऱ्या प्रश्नास उत्तर देतांना तें उत्क्रमण सर्वांशीं यांत्रिक व भौतिक रासायनिक शक्तींपासून उत्पन्न होतें असें स्पेन्सर म्हणतो. आणि कोणत्याहि विशिष्ट अर्थीं ज्यांस **जीवविषयक** (vital) शक्ति किंवा शक्ती असें म्हणतां येईल, अशी शक्ति किंवा अशा शक्ती तो मुळींच ओळखीत नाहीं. आणि असें असून जी गृहीत गोष्ट तो निषिद्ध करितो, तीच तो गृहीत करितो. ती " अंतर्गत कल, किंवा शक्ति, किंवा योग्यता" ही होय. म्हणजे तो यांत्रिक कल्पना झुगारून देतो, आणि वस्तुतः जीववाद्याची कल्पना स्वीकारितो. "

ह्या त्याच्या टीकेवरून एक लहानसा वादविवाद उत्पन्न झाला असें स्पेन्सर एका टिपणांत म्हणतो. तें टिपण असें:—" स्वैच्छिक उत्पत्तिविषयक जी प्रचलित क्लृप्ति ती मीं स्वीकारिली नाहीं म्हणून मजवर विसंगतपणाचा आरोप (त्यांत) आणिला होता, तो आणणाराची अशी कल्पना होती कीं, ही क्लृप्ति माझ्या उत्क्रान्तिविषयक मतांशीं सुसंगत आहे इतकेंच नाहीं, तर त्याचा तो एक

भाग आहे, आणि म्हणूनच सुसंगतता कायम राखण्यास ती स्वीकारणें मला भाग आहे. ह्या त्याच्या म्हणण्यास कांहीं आधार आहे असें मला वाटल्यामुळें माझें द्वितीय मत स्पष्ट करण्याकरितां मला प्रत्युत्तर लिहिणें भाग पडलें, आणि विश्रांन्ति घेण्यापूर्वीं तें आपणास तयार करतां येईल असें नेहमींप्रमाणें समजून नेमलेल्या दिवशीं तें पुरें करण्याची खटपट मीं केली. माझी प्रकृति जी बिघडते ती नेहमीं विश्रान्ति घेण्यापूर्वीं कांहीं तरी नजीकचा उद्देश साध्य करण्याच्या श्रमापासूनच बिघडते; कारण बहुतकरून तो उद्देश साध्य होण्यापूर्वींच, ज्या बिघाडाची मला भीति वाटूं लागली असेल तो उत्पन्न होतो. ह्या प्रसंगीहि असेंच झालें. म्हणून मला काम अर्धवट सोडून देऊन लंदनांतून निघावें लागलें; तेथून प्रथम मी माल्व्हर्न येथें गेलों आणि नंतर बेनहिडिंग एथें गेलों."

आपलें उत्तर नॉर्थअमेरिकन रिव्ह्यूमध्येंच प्रसिद्ध करण्याचा त्याचा बेत होता, पण त्यांत तें प्रसिद्ध झालें नाहीं. डा० यूमन्सनें त्या संबंधानें त्यास लिहिलें कीं, "येथील सामान्य वाचकांस तें समजण्यासारखें नाहीं; म्हणून मला तें नीट समजल्यास मीच तो विषय हातांत घेऊन त्यांस समजेल अशा रीतीनें त्याचें विवेचन करीन; पण तसें करण्यापूर्वीं ह्या प्रश्नाचें स्वरूप बदललें आहे कीं काय हें मला समजण्याची इच्छा आहे." त्यासंबंधानें त्यानें ता० १६ मार्च १८६९ रोजीं डा० यूमन्स यास असें पत्र लिहिलें:—

"स्वैच्छिक उत्पत्तीच्या स्वरूपासंबंधानें आणि त्याविषयीं मीं प्रदर्शित केलेल्या मताच्या संबंधानें तुला घाबरण्याचें कारण नाहीं. त्या बाबतींत हक्स्ले आलीकडे प्रयोग करीत असून त्यामुळें विलक्षण गोष्टी नजरेस येत आहेत; आणि तो म्हणतो कीं, त्यांवरून पौशाटचीं कांहीं निरीक्षणें जरी खरीं ठरतात, तरी स्वैच्छिक निर्मितीची क्लृप्ति तेणेंकरून पूर्वींपेक्षांहि ज्यास्त डळमळीत होत आहे. तूं म्ह-

णतोस त्याप्रमाणें माझ्या उत्तरांतील कल्पना सामान्य बुद्धीच्या माणसास समजण्यासारख्या नसल्यास तशा त्या करणें इष्ट आहे. पण ज्यांस माझें उत्तर समजूं शकेल अशांसाठीं तरी तें छापून प्रसिद्ध करणें मला इष्ट वाटतें."

१८६९ च्या सपटंबरच्या अखेरीस स्काटलंदांतून जेव्हां तो परत आला, तेव्हां "मानसशास्त्रा"च्या पहिल्या खंडाचा अर्धा भाग पुरा झाला होता नव्हता. प्रो० टिंडालला कांहीं अपघात होऊन तो स्वित्सर्लंदांत पडून राहिला होता, तेथें तो खुशीनें गेला असता; पण पुष्कळ दिवस आळसांत घालविले असल्यामुळें आतां काम करण्यास तो उत्सुक झाला होता. तो टिंडालकडे जाता तर त्याची काम करण्याची शक्ति वाढती किंवा नाहीं ह्याबद्दल शंकाच आहे, कारण तो असें म्हणत असे कीं, "त्याचा स्वभाव आनंदी असून तो चांगल्या प्रकृतीच्या माणसाचेंहि डोकें पुष्कळ बोलून वगैरे, भणभणावून टाकितो." म्हणून तो आपल्या कामांस चिकटून राहिला, आणि त्यामुळें दिजंबर १८६८ ते मार्च १८७० या दरम्यान 'मानसशास्त्रा'चे तीन हाप्ते प्रसिद्ध झाले; आणि अशा रीतीनें पावसाळ्यांतील सुट्टीचे दिवस येण्यापूर्वीं 'भौतिक संघटना' हा जो बाकीचा भाग तो जरी नवा होता तरी पुरा होण्याचा संभव उत्पन्न झाला. ही सुट्टी त्यानें नेहमींपेक्षां ज्यास्त दिवस घेतली, आणि त्या मुदतींत तो ज्यास्त ठिकाणीं गेला. पैकीं दहा दिवस त्यानें पॉटरसाहेबाकडे घालविले; लॉटसाहेबाकडे एक पंध्रवडा घालविला; आणि शिवाय स्काटलंद व आयर्लंद देशांतहि तो गेला. आयर्लंदासंबंधानें तो लिहितोः—"मी डब्लिनमध्यें तीन दिवस राहिलों, त्यांत पाहण्यासारख्या कांहीं गोष्टी आहेत. पण तेथील रहाणी मला घाणेरडी वाटली. इन्व्हेरोराम् एथें जागा आहे असें ऐकून मीं बेलफस्टवरून तेथें जाण्याचा निश्चय केला. पण बेलफस्ट

शहर डब्लिनहून मला ज्यास्त वाईट असें आढळून आलें; तेथें घरांत घाण व घराबाहेरहि घाण; म्हणून तेथून होईल तितका लवकरच मी निसटलों. " त्या वर्षी लिव्हरपूल एथें ' ब्रिटिश असोसिएशन ' या शास्त्रीय सभेची बैठक झाली होती. ती आटोपल्यावर प्रो० टिंडालबरोबर तो सरोवर प्रांतांत (कंबर्लंद वगैरे वायव्येकडील प्रांत) फिरावयास गेला; आणि अशा रीतीनें त्याच्या ह्या सुटींतील प्रवास शेवटीं सुखाचा झाला.

सुटींत बाहेर जाण्यापूर्वी " भौतिक संघटना " पुरी करण्याचा त्याचा बेत सिद्धीस गेला नव्हता. त्याचें समाधानकारक रीतीनें विवेचन करणें त्यास कठीण गेलें; आणि तो खंड दिजंबरमध्यें, म्हणजे सुरू केल्यावर पूर्ण तीन वर्षांनीं, प्रसिद्ध झाला. आपली तत्त्वमीमांसाविषयक ग्रंथमाला आपल्या अमेरिकन मित्रांना अर्पण करण्याचा त्याचा उद्देश साधल्यास सिद्धीस नेण्यास ही संधि बरी आहे असें त्यास वाटलें; आणि म्हणून त्या कामीं अर्थात् त्यानें डा० यूमन्सचा सल्ला घेतला, व अर्पणपत्रिकेचा मसुदा त्याच्याकडे पसंती करितां पाठविला. डा० यूमन्सचें असें मत पडलें कीं, तो मसुदा अमेरिकन लोकांना जरी अत्यन्त खुष करण्यासारखा आहे, तरी तेणेंकरून इतर देशांतील त्यांच्या मित्रांचा कदाचित् अन्याय केल्यासारखा होईल. हें त्याचें म्हणणें यास पटून यानें तो बेत रहित केला.

' मानसशास्त्रा ' च्या दुसऱ्या खंडाचें काम पहिल्या खंडाच्या कामापेक्षां ज्यास्त झपाट्यानें चाललें आणि त्याचे पांच हापे १८७१ सालीं प्रसिद्ध होऊन बाकीचे तीन १८७२ सालीं निघाले. त्या वर्षी ता० १२ अक्टोबर रोजीं त्यानें यूमन्सला लिहिलेल्या पत्रांत आपली ग्रंथमाला आणखी बारा वर्षांत पुरी होईल असा अंदाज केला होता; पण ती पुरी होण्यास चोवीस वर्षें लागलीं. तें पत्र असें:—

"'मानसशास्त्राचा दुसरा भाग मीं आतांच पुरा केला आहे. मागें पाहतां

मीं ही ग्रंथमाला सुरू केल्यास बरोबर बारा वर्षें झालीं असें आढळून येतें. तेवढ्या मुदतींत अर्धें काम पुरें झालें असल्यामुळें बाकीचें पुरें करण्यास आणखी बारा वर्षें लागतील असा अंदाज करण्यास हरकत नाहीं. तथापि अशी आशा करण्यास मला कारण दिसतें कीं, त्यास दहा वर्षेंच पुरतील. कारण मला वाटतें आजपर्यंत दोन वर्षांपेक्षांहि बराच अधिक काळ खंड पडलेला आहे. ह्याचें कांहीं अंशीं प्रकृतीचा पुनःपुनः बिघाड हें कारण झालेलें आहे, कांहीं अंशीं ‘ आदितत्त्वांची दुसरी आवृत्ति’ हें झालें आहे, कांहीं अंशीं प्रसंगोपात्त लिहिलेले निबंध व इतर लेख हे झालेले आहेत, आणि कांहीं अंशीं वर्णनात्मक समाजशास्त्राची मांडणी व देखरेख हें झालेलें आहे, कारण त्याच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर माझा बराच वेळ त्यांत जात असे. खरोखरच, अशा रीतीनें हें खंड एथें मांडतां त्यांस दोन वर्षांपेक्षांहि ज्यास्त काळ फुकट गेला आहे असें मला वाटतें. मी ह्या ग्रंथमालेस सुरवात केली तेव्हांपेक्षां आतां पुष्कळ बरा असल्यामुळें, आणि ह्यापुढें मध्यें मध्यें प्रासंगिक लेख फारसे लिहावे लागतील असा संभव दिसत नसल्यामुळें, मला अशी आशा वाटते कीं, ‘ समाजशास्त्राचें अध्ययन ’ हा ग्रंथ लिहून झाल्यावर आपलें बाकीचें काम पुरें करण्यास मला दहा वर्षें पुरतील. ”

१८७० सालीं त्याचा सेक्रेटरी डंकन मद्रासेस आल्यामुळें वर्णनात्मक समाजशास्त्राची देखरेख हें जें ह्या दोनतीन सालांत चाललेलें त्याचें काम त्यांत खंड पडला. तें काम हातीं घेण्यास योग्य असे पाहिजे तितके तरुण माणूस सांपडतील अशी डा० यूमन्सनें त्यास आशा लाविली असून एकहि योग्य माणूस जेव्हां त्यास सांपडला नाहीं, तेव्हां त्याची ज्यास्तच निराशा झाली. पुढें सरासरी एक वर्ष खटपट केल्यावर त्यास जेम्स कोलियर हा सांपडला. हे उतारे व कोष्टकें बरींच छापून झालीं नाहींत तों त्यांस खर्च

फार लागतोसें दिसूं लागलें. ह्याचें एक कारण मूळचाच कच्चा मसुदा छापखान्याकडे जात असे हें होय. इकडे येण्यापूर्वीं डंकननें त्यास ही गोष्ट सुचविली होती, आणि मी तो मसुदा सुधारण्याकरितां मद्रासेस नेतों असें त्यास म्हटलें होतें; पण तो तसा पाठविणें फार धोक्याचें होईल असें स्पेन्सर यास वाटलें. ह्या कामीं अजमासापेक्षां इतका ज्यास्त खर्च लागतो असें आढळून आल्यावरहि त्यानें तें बंद केलें नाहीं ह्याचेंच एकाद्यास आश्चर्य वाटेल. पण तो उलट 'नष्ट सुधारलेल्या जाती' हा विषय घेण्याकरितां आणखी एक लेखक पाहूं लागला. मि० ल्युइसच्या द्वारा ह्या वर्षाच्या अखेरीस त्याला ह्या कामाकरितां डा० शेपिग हा जर्मन गृहस्थ मिळाला.

ह्या वर्णनात्मक समाजशास्त्राच्या देखरेखीमुळें त्यास मध्यें मध्यें चित्ताकर्षक अशा विचारदिशा सुचत असत, आणि त्यामुळें ' मानसशास्त्र ' एकीकडे ठेवण्याचा मोह त्यास पडत असे. ह्यांपैकीं एक विचार प्राणिपूजेबद्दलचा होता; आणि त्याबद्दल त्यास जे विचार सुचले ते त्यानें १८७०च्या मे महिन्याच्या " फार्टनाटइलीं "त एका लेखांत गोंविले; त्यांत त्यानें, आपण इतर प्राणी, वनस्पती किंवा जडवस्तु ह्यांची संतति आहों असें प्राथमिक माणसांना सर्वत्र किंवा बहुतेक सर्वत्र कसें वाटूं लागलें ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याची खटपट केली. आणखी एका दिशेनें विचार करतां, नैतिक मतें व मनोभाव ह्यांची उत्पत्ति व वाढ ह्यांसंबंधानें त्यानें पूर्वींच बनविलेल्या दृढ मताचें पुष्टीकरण झालें. त्यासंबंधानें ता० ३ मार्च १८७१ रोजीं डा० यूमन्स यास यानें असें पत्र पाठविलें कीं, हा प्रसिद्ध होणारा भाग निघाला म्हणजे मी आपल्या कामांत आणखी एक स्वल्प विराम करणार आहें. मनोभावाच्या उत्पत्तीच्या संबंधानें माझ्या मताविषयीं सरासरी एक वर्षापूर्वीं " म्याकमिलन्स् म्यागाझीन"मध्यें हटननें जीं विधानें केलीं तीं दुसऱ्या द्वारांनीं पसरत आहेत, आणि त्यास बंदी करणें मला

आवश्यक दिसतें. माझ्या कामाच्या क्रमांत मी त्या विषयाप्रत येईतों-पावेतों तें काम लांबणीवर टाकण्याचा माझा बेत होता. पण आतां हटनला त्याच्या अगोदरच प्रायश्चित देण्याचा मीं विचार केला आहे. त्याबद्दलचा लेख पुढच्या 'फार्टनाइटली' साठीं मी तयार करीत आहें."

'मानसशास्त्राचीं तत्त्वें' हा ग्रंथ डार्विनच्या 'उपजातींचा उद्गम' ह्या ग्रंथापूर्वीं पांच वर्षें जरी प्रसिद्ध झाला होता तरी त्यांतील मानसिक उत्क्रमणाची क्लृप्ति डार्विननेंच काढिली असें लोक घेऊन चालले होते, म्हणून या सालच्या जूनच्या 'कॉन्टेम्पोररीं' त त्यानें 'मानसिक उत्क्रमण' म्हणून एक छोटा लेख लिहिला. त्यास ता० ९ जून रोजीं यूमन्सला लिहिलेल्या पुढील पत्रांत उल्लेख सांपडतो:—नुक्ताच प्रसिद्ध झालेला एक निबंध मी यासोबत पाठवीत आहें. तो लिहिण्याचा एक उद्देश या प्रश्नावरील लोकमत मुकाट्यानें जरा ताळ्यावर आणावें हा आहे. डार्विनचा 'माणसाची उत्पत्ति' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून मानसिक वाढीच्या क्लृप्तीसंबंधानें बरीच चळवळ उडून गेलेली आहे, आणि त्यामुळें 'डार्विनचें मत व धर्म', 'डार्विनचें मत आणि नीति', 'तत्त्वज्ञान आणि डार्विनचें मत' अशा नांवांचे निबंध मासिकांतून येत आहेत; त्या सर्वांचा विषय मानसिक उत्क्रमण हा असून ती क्लृप्ति डार्विनची आहे असें कल्पून ते सर्व लेख लिहिले जात आहेत. ही चुकीची कल्पना दुरुस्त करण्यास ज्या अर्थीं कोणी एकहि शब्द बोलत नाहीं, आणि ज्या अर्थीं 'उपजातींचा उद्गम' या आपल्या ग्रंथाच्या अगोदर पांच वर्षें 'मानसशास्त्राचीं तत्त्वें' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला होता ही गोष्ट डार्विननें स्वतः दाखविलेली नाहीं, त्या अर्थीं हळूच ही गोष्ट लोकांच्या नजरेपुढें आणणें मला भाग पडलें आहे.

ह्या वर्षाच्या अखेरीस अखेरीस प्रो० हक्स्लेशीं त्यास वादाचें कारण पडलें. कारण त्यानें 'राज्यकारभारविषयक अराजकता' ह्या

नांवाचा एक निबंध लिहून त्यांत शिक्षणाच्या कामांत सरकारच्या ढवळाढवळीविरुद्ध यानें काढिलेल्या आक्षेपांचा विचार करीत असतां सरकारानें पोलीसचें तेवढेंच काम करावें हें जें स्पेन्सरचें मत त्याजवर टीका केली, आणि " सामाजिक इंद्रियजाल " ह्या निबंधांत स्पेन्सरनें भौतिक शरीर व राजकीय शरीर यांमध्यें केलेली तुलना चुकीची आहे असें म्हटलें. स्पेन्सरनें दिंजबरच्या "फार्टनाइटली रिव्ह्यू"त 'विशिष्टीकृत राज्यकारभार' असा निबंध लिहून त्यास उत्तर दिलें, पण त्याबरोबर असेंहि व्यक्त केलें कीं, ज्याची आपल्यास इतकी वाखाणणी करावीशी वाटते अशा माणासाशीं असलेल्या आपल्या मतभेदांवर फारसा जोर देणें आपल्यास बरें वाटत नाहीं.

विश्वविद्यालयीन पदव्यांची त्याला मुळींच किंमत वाटत नसे. मात्र त्या कोणीं द्यावयास लागलें म्हणजे त्यांवरून लोक त्याच्या कामाची चहा करितात एवढें दिसे ह्याबद्दल त्यास समाधान वाटे. ह्या सुमारास त्यास 'सेंट आण्ड्र्यूस' या विश्वविद्यालयाचा लॉर्ड रेक्ट निवडला जाण्यास उमेदवार होण्याबद्दल विनंति करण्यांत आली, पण ती त्यानें नाकारिली, तशीच ' एल् एल् डी ' ही पदवीहि त्यानें नाकारिली. तेथील डाक्टर—पदवीधरांच्या सभेची सन्मान्य सभासदीहि त्यानें नको म्हटली, आणि त्याचीं कारणें त्या सभेच्या सेक्रेटरीस ता० १६ दिंजबर रोजीं त्यानें ह्याप्रमाणें कळविलीं:—" कांहीं वर्षांपूर्वी मी जीवशास्त्रविषयक शोध करीत होतों तेव्हां असल्या निवडणुकीपासून होणाऱ्या फायद्यांचा उपयोग मीं निःसंशय आनंदानें केला असता; पण हल्लीं माझें अध्ययन ज्याअर्थी बहुतेकांशीं इतर दिशांनींच चाललेलें आहे, त्याअर्थीं ह्या मोलवान् सवलतीचा मला आतां बहुतेक कांहींच उपयोग होणार नाहीं. निःसंशय हें खरें आहे कीं सन्मान्य सभासदांना सभेसंबंधानें नेहमींच काम करावें लागत नाहीं.....

जो जें काम करितो तें दाखविणाऱ्या नांवांखेरीज व पदव्यांखे-

रीज इतर पदव्यांच्या विरुद्ध मी असून शिवाय ह्या गोष्टीच्या विरुद्ध असण्यास आणखी एक कारण मला दिसतें. बहुधा तेंहि तुम्हांला तितकेंच विलक्षण वाटेल. तुमच्या सभेचा एक उद्देश तुमच्या विश्वविद्यालयाच्या वैद्यकी पदवीधरांचें हिताहित पाहणें हा आहे असें मला आढळतें.....म्हणून ह्यासंबंधानें तुमच्या सभेनें कांहीं खटपट केल्यास ती बहुधा मला नापसंत पडेल असें वाटतें. सरकारचीं कर्तव्यें आणि लोकांचे हक्क ह्यासंबंधानें माझीं आज पुष्कळ दिवसांचीं जीं मतें आहेत तीं डाक्टर मंडळीचें जें एकंदर धोरण (ज्यांस पदव्या नाहींत त्यांस कायद्यानें वैद्यकीची बंदी करावी हें धोरण) त्याच्या अगदीं विरुद्ध आहेत.....तुमच्या सभेनें ही विनंति करून मला जो मान दिला आहे त्याला हें माझें उत्तर अगदीं न शोभणारें आहे असें तुम्हांस वाटेल अशी मला भीति वाटते. पण मी आशा करितों कीं, हें मीं उत्तर दिलें आहे तें तुमच्याच सभेच्या संबंधानें नव्हे हें तुमच्या कौन्सिलाच्या लक्षांत येईल. येथें दर्शविलेलीं तत्त्वें पुष्कळ दिवस मीं स्वीकारिलेलीं आहेत, आणि त्यांपासून आजपर्यंत मी कधीं ढळलों नाहीं."

'आदितत्त्वां'चें फ्रेंच भाषान्तर १८६८ च्या आरंभींच प्रसिद्ध व्हावयाचें होतें; पण तें कांहीं कारणांनीं लांबतां लांबतां शेवटीं १८७१ च्या उन्हाळ्याच्या आरंभीं प्रसिद्ध झालें. त्याला कॅझेलिसनें (भाषान्तरकारानें) जोडिलेली प्रस्तावना स्पेन्सर यास फार आवडली; कारण तींत त्यानें स्पेन्सरचा एकंदर कोटिक्रम फार विशद रीतीनें मांडिला होता.

स्पेन्सरला न कळतां रिबो नांवाच्या दुसऱ्या एका फ्रेंच गृहस्थानें "मानसशास्त्रा" च्या मूळ आवृत्तीचें भाषान्तर अगोदरच केलें होतें. म्हणून आतां नव्या आवृत्तीचें भाषान्तर त्याऐवजीं करण्याची व्यवस्था त्यानें केली.

प्रकरण तेरावें

समाजशास्त्राचें अध्ययन

हार्वार्ड एथील विश्वविद्यालयांत फिस्कसाहेबानें स्पेन्सरच्या तत्त्वमीमांसेवर दिलेली व्याख्यानमाला न्यूयार्क एथील ' वर्ल्ड ' नामक पत्रांत प्रसिद्ध झाली; तेव्हां त्या मीमांसेला एक सामान्य नांव देण्याचा जो प्रश्न १८६७ सालीं त्यानें नाखुशीनें एकीकडे ठेविला होता तो पुनः पुढें आला. कारण या व्याख्यानमालेला फिस्कनें दिलेलें नांव त्यास आवडलें नाहीं. त्यासंबंधानें ता० ४ दिजंबर १८६९ रोजीं त्यानें यूमन्स यास लिहिलें:—" त्यानें "विधायक तत्त्वमीमांसा" हें नांव दिलेलें पाहून मला फार अस्वस्थपणा वाटत आहे; कारण काम्टेच्या मीमांसेस तेंच नांव असून त्या दोघींमध्यें फारच अल्प साम्य आहे......... ह्याचा एक वाईट परिणाम असा होईल कीं, काम्टेच्या मीमांसेविरुद्ध घेतलेले आक्षेप व बनलेले दुराग्रह ज्यांना उत्क्रान्तितत्त्वाविरुद्ध लावावयाचे असतील, त्यांना तसें करण्यास हा एक आधार दाखवितां येणार आहे. "

हा म्हणतो तें बरोबर आहे अशी फिस्कचीहि पुढें खात्री झाली, आणि त्यानें विश्वविषयक (Cosmic) तत्त्वमीमांसा हें नांव त्यास सुचविलें; पण तेंहि त्यास पसंत पडलें नाहीं. म्हणून त्यानें संघटनात्मक (Synthetie) तत्त्वमीमांसा हें नांव देण्याचा आपला पूर्वीचा उद्देश आतां अमलांत आणिला, आणि " आदितत्त्वें ", " जीवशास्त्र ", आणि " मानसशास्त्र " या ग्रंथांच्या शिल्लक राहिलेल्या प्रतींत हें नांव घातलेला मुखपृष्ठाचा कागद घालून दिला. हें नांव देण्याचें कारण त्यानें फिस्क यास १८७२-७३सालीं

लिहिलेल्या पत्रांत दिलें आहे:—"माझ्या म्हणण्याला अत्यन्त सामान्य स्वरूप जर द्यावयाचें असेल तर असें म्हटलें पाहिजे कीं, एकाद्या तत्त्वमीमांसेला जें भेदक नांव द्यावयाचें तें तिच्या विषयावरून न देतां तिच्या सरणीवरून दिलें पाहिजे. तत्त्वज्ञानाचा विषय कोणी स्पष्टपणें ध्यानांत घेवो वा न घेवो, तो सर्वत्र एकच असतो. प्रत्येक तत्त्वमीमांसा कमज्यास्त प्रमाणानें जरी संघटनात्मक असली तरी मला असें वाटतें कीं, जिच्यांत उत्क्रान्तिविषयक मताला सूत्रस्वरूप देऊन त्याचें सविस्तर विवेचन केलेलें आहे ती विशिष्टप्रकारें संघटनात्मक होय. मी आपल्या तत्त्वमीमांसेला संघटनात्मक म्हणण्याचें एक कारण हें कीं, तत्त्वज्ञान हें सर्व ज्ञानाचें संघटन आहे, कारण निरनिराळ्या शास्त्रांनीं केलेलीं जीं अंशतः एकीकरणें तीं तत्त्वज्ञान एकीकृत करीत असतें. तिला संघटनात्मक म्हणण्याचें दुसरें कारण हें कीं, विश्वाच्या व्यापक कल्पनेचे परस्परसंबंधी भाग म्हणून ती शास्त्र व नशास्त्र यांचें एकीकरण करिते. त्याचें तिसरें कारण हें कीं, शक्तींचें नित्यस्थायित्व हा जो अन्तिम नियम त्यापासून प्रत्येक उत्पाद्य शक्तिनियम निष्पन्न होतो असें दाखवितां येतें, ही गोष्ट त्या मीमांसेंत लक्ष्यांत घेतलेली आहे. चवथें कारण हें कीं, ह्या उत्पाद्य नियमांस अनुरूप अशी शक्तींची सहक्रिया होऊन विश्वांतील चमत्कार उत्पन्न होत असतात, अशा रीतीनें जाणूनबुजून त्यांची उपपत्ति ती लावीत असते. पांचवें कारण हें कीं, ज्यास्त ज्यास्त संमिश्र अशा मूर्त चमत्कारांचे जे निरनिराळे प्रकार ते द्रव्य व गति ह्यांच्या पुनर्विभजनापासून सामान्य नियमाच्या अनुरोधानें ती निष्पन्न करीत असते. आणखी कारण हें कीं, अध्यात्मवादी व अनुभववादी, अशांचीं जीं परस्परविरोधी मतें त्यांचें ती संयोजन व समेट करीत असते. आणि शिवाय तसें म्हणण्याचें कारण हें कीं, विश्वविषयक जी तिच्यांतील कल्पना तीहि संघटना-

त्मक आहे; कारण ती ज्या वस्तुप्रगतीमुळें उत्क्रमण होतें तीसहि संघटनात्मक मानिते; म्हणजे, ज्यास्त ज्यास्त वाढणारा अदलाबदल होऊन ज्यास्त संमिश्र वस्तु उत्पन्न होत असतात. ”

यावर फिस्कचें म्हणणें असें पडलें कीं, ‘ विश्वविषयक ’ नांवाप्रमाणें ‘ संघटनात्मक ’ हें नांव स्पेन्सरच्या तत्त्वमीमांसेला भेदक म्हणून देतां येणार नाहीं; त्याच्या तत्त्वमीमांसेचें भेदक चिन्ह ती विश्वविषयक किंवा संघटनात्मक आहे हें नसून हें आहे कीं, तिचा पाया निर्मिति हा नसून उत्क्रान्ति हा आहे. तथापि डा० यूमन्सचें मत असें पडलें कीं, अमेरिकेंतील लोकांस ‘ विश्वविषयक ’ हेंच नांव त्याच्या तत्त्वमीमांसेस योग्य म्हणून वाटण्याचा संभव आहे; कारण त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या मोठ्या भरारीस ह्या नांवापेक्षां कमी आवाक्याचें नांव समाधानकारक वाटावयाचें नाहीं.

या सुमारास डा० यूमन्सनें “ सर्वराष्ट्रीय शास्त्रीय ग्रंथमाला ” या नांवाची एक ग्रंथमालिका तयार करण्याचा जो बूट काढिला तो स्पेन्सर यास फार पसंत पडला; आणि तो, हक्स्ले व टिंडाल ह्या तिघांची मिळून त्या मालेसंबंधानें लंदनमधील सल्लागार कमिटी बनली; आणि प्रारंभापासून त्या कमिटीच्या कामाचें ओझें स्पेन्सरनें आपल्या अंगावरच घेतलें.

तो आपल्या स्वतःच्या ग्रंथमालेच्या रचनेंत गुंतलेला असल्यामुळें ह्या मालेंतील एकादा मणि आपणांस स्वतः ओंवावा लागेल अशी त्यास प्रथम कल्पना नव्हती. पण आज कित्येक वर्षें, समाजविषयक चमत्कारांचें निरीक्षण व अध्ययन कोणत्या दृष्टीनें व कोणत्या पद्धतीनें केलें पाहिजे हें स्पष्ट करून समाजशास्त्रावरील ग्रंथाचा मार्ग खुला करणें जरूर आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत आलेली होती. म्हणून हें काम हातीं घेण्यास किंवा त्यांत त्यास मदत करण्यास कोणी योग्य माणूस न मिळाल्यामुळें, तूंच त्यावर ग्रंथ लिहून या

मालेमध्यें गुंफून दे म्हणून यूमन्सनें जेव्हां त्यास वरचेवर विनंति केली तेव्हां तसें करण्यास तो कबूल झाला. त्या ग्रंथास ' समाजशास्त्राचें अध्ययन ' असें नांव देऊन प्रथम तो ' निबंधमाला ' रूपानें इंग्लंदांत ' कॉन्टेंपोररी रिव्ह्यू'त व अमेरिकेंतील तसल्याच एका नांवाजलेल्या मासिकांत प्रसिद्ध करण्याचें त्यानें ठरविलें. त्यांतील पहिला निबंध पाहिल्याबरोबर यूमन्सनें " पॉप्युलर सायन्स मंथ्ली " (सुबोध शास्त्रीय मासिक) नांवाचें नवेंच मासिक स्वतः सुरू करण्याचा व त्यांत तो घालण्याचा निश्चय केला. ह्या लेखमालेकडे अमेरिकन लोकांचें लक्ष्य फारसें गेलें नाहीं, व हें पाहून स्पेन्सरला अंमळ आश्चर्य वाटलें.

एप्रिलच्या ' कान्टेम्पोररी रिव्ह्यू ' त " सृष्टींत मनाचें स्थान आणि मनुष्याची अंतर्ज्ञानदृष्टि " या नांवाचा मार्टिनोचा एक लेख प्रसिद्ध झाल्यामुळें त्यास उत्तर देण्यासाठीं वरील ग्रंथाचें काम स्पेन्सर यास मध्येंच थांबवावें लागलें. तें उत्तर डार्विन यास फार पसंत पडून त्यानें त्यास तसें लिहिलें. तें वाचून स्पेन्सर यास समाधान वाटलें; कारण त्यांत मण्डन केलेल्या मताच्या संबंधानें त्यानें आपल्यास उल्लेख करावयास पाहिजे होता असें कदाचित् डार्विन यास वाटेल अशी यास शंका वाटत होती. त्यासंबंधानें ता० १२ जून १८७२ रोजीं त्यानें त्यास असें लिहिलें:—" तुला माझा निबंध पसंत पडला हें पाहून मला किती समाधान वाटतें हें म्हटल्याशिवाय मला तुझें पत्र बाजूस ठेवतां येत नाहीं. वेळ असता तर मार्टिनोच्या कोटिक्रमाच्या आध्यात्मिक भागाचा कांहींसा ज्यास्त पूर्ण विचार त्यांत करणें मला आवडलें असतें. तो यावर कांहीं तरी उत्तर देईल असा माझा अंदाज आहे. त्याप्रमाणें त्यानें दिल्यास कांहीं वेळानें तसा विचार करण्यास मला बहुधा पुनः संधी येईल. तो केल्यानें मार्टिनो आपल्या स्वताला व आपल्या वाचकांना ज्या

विधानांनीं भ्रमांत पाडितो तीं किती शुष्क आहेत हें सामान्य बुद्धीच्या माणसास देखील स्पष्टपणें कळून येईल."

प्रो० केर्न्सनें सरकारानें लोकांच्या वर्तनस्वातंत्र्यांत हात न घालण्याच्या तत्त्वावर एक निबंध लिहिला होता, त्यासंबंधानें त्यानें त्यास ता० २१ मार्च १८७३ रोजीं असें लिहिलें:—" अद्यापि तुझ्या निबंधांत थोडीशी बुडी मारण्यापलीकडे मीं कांहीं केलेलें नाहीं. हात न घालण्याच्या तत्त्वाची जी प्रचलित कल्पना तूं स्वीकारून तिजवर कोटिक्रम करतोससा दिसतोस, तिजवर मला आक्षेप घ्यावासा वाटतो; पण तुझ्या म्हणण्याचा अर्थ मीं बरोबर केला आहे किंवा नाहीं ह्याबद्दल मात्र मला पूर्ण खात्री वाटत नाहीं. तूं म्हणतोस, " धान्यासंबंधी कायदे रद्द करण्याच्या संबंधाच्या चळवळींत जे हुशार लोक प्रमुख होते त्यांनीं ह्याहून फार ज्यास्त गोष्टींविषयीं अभिवचन दिलेलें होतें. धान्याच्या कायद्यांमागून भिकाऱ्यांसंबंधाचे कायदे जातील असें त्यांनीं आह्मांस सांगितलें होतें; व्यापारावरील बंधनें नष्ट झालीं म्हणजे भिकार नष्ट होईल, आणि भिकारखाने लवकरच गतसंस्था होऊन बसतील असें ते आह्मांस सांगत होते." आतां ज्या अर्थीं भिकाऱ्यांचा कायदा हा, हात न घालण्याच्या तत्त्वाचा जो खरा अर्थ म्हणून मी समजतों त्या अर्थीं, त्या तत्त्वाच्या अगदीं विरुद्ध आहे, त्या अर्थीं एका दिशेनें ह्या तत्त्वाप्रमाणें वागल्यानें, दुसऱ्या दिशेनें त्याची सारखी अवज्ञा केल्यापासून होणारीं नुकसानें भरून निघालीं नाहींत, ह्याबद्दल तुझ्या लिहिण्याच्या झोंकावरून तूं निराशा प्रकट करितोस असें मी समजतों. हात न घालण्याचें तत्त्व हें केवळ राजकीय-सांपत्तिक तत्त्व म्हणून समजावें असें मला वाटत नाहीं; तर तें त्याहून फार व्यापक तत्त्व समजलें पाहिजे; म्हणजे, सर्व नागरिकांना त्यांच्या स्वताच्या कृतीचे फायदे-तोटे घ्यावयास देण्याचें तें तत्त्व आहे: ती

कृति केवळ उद्यमविषयकच नव्हे तर एकंदर होय. आणि ह्या तत्त्वाचा जो अर्थ मी समजतों त्यास अनुसरून पाहतां तें तत्त्व ही व्यक्तींची कृति व तिचे परिणाम ह्या दोहोंच्या मध्यें सरकारानें येण्याचा निषेध करितें इतकेंच नाहीं, तर सरकारानें हल्लींपेक्षां फार उत्तम रीतीनें व फार ज्यास्त बारकाईनें इतरांच्या कृतींपासून होणाऱ्या नुकसानापासून व्यक्तीचें संरक्षण केलें पाहिजे, व इतरांच्या कृतीपासून उत्पन्न होणारे फायदे मागण्यापासून तीस (व्यक्तीस) निवृत्त केलें पाहिजे, ह्या मतांशींहि तें तत्त्व अगदीं सुसंगत आहे."

अमेरिकेंतील जपानी वकील आरिनोरी मोरी याच्याशीं या सुमारास स्पेन्सरची ओळख झाली. त्याच्यासंबंधानें तो म्हणतो:— "तो मला जपानी संस्थांच्या पुनर्घटनेसंबंधानें माझें मत विचारावयास आला; मी त्याला सावधगिरीचा सल्ला दिला, आणि असें सांगितलें कीं, शेवटीं त्यांस हल्लीं आहे त्याहून फार उच्च नाहीं अशा स्वरूपाप्रत परत यावें लागेल, आणि म्हणून त्यापासून त्यांनीं फार भिन्न स्वरूपाप्रत जाण्याचा यत्न करतां कामा नये."

'समाजशास्त्राचें अध्ययन' या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणासंबंधानें त्यानें त्यास दिलेल्या उत्तरावरून त्यास स्वताची टिमकी वाजविण्याचा किती तिटकारा होता हें स्पष्ट दिसून येतें. तें उत्तर ता० ३ जून १८७३ रोजीं लिहिलेलें असून असें आहे:—"समाजशास्त्राच्या तत्त्वाचें जें मीं विवेचन यापुढें करणार आहें त्याची रेखाटणी या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत मीं करावी ह्या तुझ्या सूचनेस, मला वाटतें, मला मान्यता देतां येणार नाहीं. त्या प्रकरणाची मीं जी रेखाटणी आपल्या मनांत केली आहे तिजप्रमाणें पाहतां त्या "तत्त्वां"ना त्यांत मुळींच उल्लेख येणार नाहीं, आणि तसा उल्लेख या ग्रंथाच्या योग्य मर्यादांचें अतिक्रमण केल्याशिवाय मला करतां येणार नाहीं. त्या "तत्त्वां"च्या क्षेत्राचें यांत दिग्दर्शन

करण्यानें होणाऱ्या फायद्याबद्दल मी तटस्थ आहें; म्हणजे, तेणेंकरून त्याचा कदाचित् खप वाढेल ह्याबद्दल मी मुळींच पर्वा करीत नाहीं. स्वताची जाहिरात देण्यासारखी ही संधि मुद्दाम साधण्याचा मला मोह पडणार नाहीं इतकेंच नाहीं, तर तशी संधि सहजगत्या आल्यास ती टाळण्याचा मला मोह पडेल. " जीवशास्त्रांतील तयारी ", आणि " मानसशास्त्रांतील तयारी " हीं दोन प्रकरणें त्यांत घालण्याच्या देखील मी कांहीं अंशीं विरुद्ध आहें; कारण तींहि माझ्या स्वताच्या पुस्तकाच्या अप्रत्यक्ष जाहिराती म्हणून कोणास वाटण्याचा संभव आहे. हाच संभव माझ्यानें टाळवता तर मीं खुशीनें टाळिला असता; म्हणून असले आणखी संभव मी मुद्दाम काळजीपूर्वक टाळणार. "

' फार वाईट हवा, फार थोडी कर्मणूक, आणि असमाधानकारक प्रकृति ' ह्यामुळें ह्याचें ह्या वर्षीचें स्काटलंदांतील वास्तव्य नेहमींहून कमी झालें. धर्मसंस्थान व राजसंस्थान हीं वेगळीं करावीं ह्या प्रश्नाबद्दलची जी त्याची पूर्वीची कळकळ ती ' समाजशास्त्राचें अध्ययन ' ह्या ग्रंथाच्या लेखानें पुनः जागृत झाली; आणि म्हणून ह्या चळवळीला जे अनुकूल होते त्यांच्याशीं त्यानें ह्या वेळीं मुलाखती व वादविवाद सुरू केले. त्यांची सविस्तर हकीकत ' आत्मचरितां ' त दिलेली आहे.

वरील ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत स्पेन्सरनें ग्लाडस्टनवर कांहीं आरोप केले होते, त्यासंबंधानें त्यांच्यांत पत्रव्यवहार होऊन तो वाद मिटला, आणि नंतर त्यांची स्परस्परांशीं असलेली ओळख ग्लाडस्टनच्या इच्छेनुरूप ज्यास्त वृद्धिंगत होत गेली.

इकडे ज्या ' वर्णनात्मक समाजशास्त्रा'च्या वरील ग्रंथ लिहिण्यांत त्यानें इतका उपयोग केला होता त्यावर त्याचें द्रव्य व वेळ ह्या दोहोंचाहि ज्यास्त ज्यास्त खर्च होतोसें दिसूं लागलें. त्या शा-

स्त्राचे जे खंड डा० शेपिंग तयार करीत होता त्यांचा खर्च अंगावर घेण्यास त्याचे अमेरिकन मित्र तयार झाले. पण पूर्वीं त्यांनीं केलेल्या मदतीबद्दल भलत्याच कंड्या तेथें पिकल्या होत्या, त्यामुळें त्यास त्रास वाटून त्यानें त्यांस नको म्हटलें.

'समाजशास्त्राचें अध्यन' हा ग्रंथ पुरा झाल्यावर, 'आदितत्त्वां' त प्रतिपादिलेल्या उत्क्रान्तीच्या सामान्य मतावर वेळोवेळीं आलेल्या मुख्य टीकांना उत्तरें देण्याचा उद्योग त्यानें हातीं घेतला. त्यांत तो गुंतला असतां १८७३ च्या आक्टोबरच्या 'क्कार्टर्लीरिव्ह्यू' त विरुद्ध पण सभ्य असा एक लेख त्याजवर आला, आणि त्याबरोबरच 'ब्रिटिशक्कार्टर्लीं' त विरुद्ध व असभ्य असा आला. म्हणून त्यांना उत्तर देण्यासाठीं त्यानें वरील लेखास एक पूरणिका जोडिली. त्यावर ब्रिटिशक्कार्टर्लींत लेखकानें प्रत्युत्तर केल्यावरून हीं उत्तरें चोपड्यांच्या रूपानें काढतांना स्पेन्सरनें त्यास पुनः उत्तर दिलें. त्यावर त्या लेखकानें १८७४ च्या मे महिन्यांत 'नेचर' नामक शास्त्रीय साप्ताहिकांत "भौतिक स्वतःसिद्ध सत्यें यांचा उद्गम व स्वरूप" यांवर एक वादविवाद सुरू केला; तो पुढें मूळचे वावदूक समरांगणांतून मागें सरल्यानंतर देखील कांहीं महिने चालला. या वादांत स्पेन्सरचेंच म्हणणें बरोबर आहे ही गोष्ट टिंडाल व हर्स्ट ह्या दोघांनींहि पडताळा पाहून खरी ठरविली.

१८७२ सालीं हक्स्लेसाहेबाची प्रकृति फार बिघडली, म्हणून त्यानें विसावा घ्यावा या गोष्टीकडे त्याचें मन वळविण्यास ह्यानें फार खटपट केली. त्या सालाच्या अखेरीस हक्स्लेनें स्वताचें घर बांधिलें, व त्यांत तो रहावयास गेला. त्यावेळीं स्पेन्सरनें त्याच्या पुष्कळ दिवसांच्या स्नेहास अनुलक्षून एक पत्र लिहिलें. त्याच्या उत्तरीं प्रो० हक्स्ले लिहितोः—"तुला आमच्या दीर्घ स्नेहाची जितकी किंमत वाटते त्याहून मला ज्यास्त वाटते. तुझ्याविषयीं वीस

वर्षांपूर्वीं जें माझें मत बनलें होतें तें आतां सर्वांचेंच हळू हळू बनत आहे हें पाहून मला अत्यन्त आनंद वाटतो. "

१८७३ च्या मे महिन्यांत जॉन स्टुअर्ट मिल्ल मरण पावल्यामुळें स्पेन्सर यास फार वाईट वाटलें. एवढ्या जोरदार व विशद बुद्धीच्या व एवढ्या उच्च नैतिक शीलाच्या माणसाच्या मरणानें खाजगी व सार्वजनिक केवढें नुकसान झालेलें आपल्यास वाटतें हें त्यानें ता० १७ मेच्या 'एक्झामिनर' च्या अंकांत त्याच्यावर एक मृत्युलेख लिहून व्यक्त केलें.

प्रकरण चवदावें

:o:

मान व विधि यांचा तिटकारा

१८७४ सालीं रोजनिशी ठेवण्याचा त्यानें कांहीं दिवस यत्न केला, पण तो फार दिवस टिकला नाहीं. त्या रोजनिशीवरून पाहतां ता० ४ मार्च रोजीं तो ग्लाडस्टनकडे सकाळच्या न्याहारीस गेला होता असें दिसतें. हें त्यांच्यामध्यें झालेल्या वादविवादानंतर ग्लाडस्टनच्या इच्छेनुरूप वृद्धिंगत होणाऱ्या स्नेहाचें लक्षण होतें.

या वेळीं त्यानें रॉयल सोसायटीचा सभासद व्हावें म्हणून त्याच्या मित्रांनीं खटपट केली; त्यासंबंधानें ता० २८ मार्च १८७४ रोजीं तो हूकर यास लिहितोः—" सरासरी दोन महिन्यांपूर्वीं आमचें थोडेंसें संभाषण झालें तेव्हांपासून, मीं रॉयल सोसायटीचा 'सभासद' व्हावें म्हणून तूं जी आपली इच्छा प्रदर्शित केली तिचा मीं वरचेवर विचार केला आहे; आणि तुझ्या सूचनेचा योग्य रीतीनें विचार करण्यांत चूक होऊं नये म्हणून त्या संबंधाचे माझे

विचार कागदावर मांडण्याचा मीं बेत केला आहे. गेल्या थोड्या वर्षांत वरचेवर मला असल्या सूचना झाल्या असतां मीं दिलेलें उत्तर लोकांस विक्षिप्तपणाचें वाटलेलें आहे हें मी जाणून आहें. सरदारवर्गाच्या पदराला चिटकून राहण्याचा, एकंदर लोक-समाजाप्रमाणें, रॉयल सोसायटीचा जो कल दिसतो त्याबद्दल कदाचित् फाजील तिटकारा मला वाटतो. सरदारांना सभासद होण्याकरितां ठेविलेल्या विशेष सवलती, आणि जे लोक त्यांना सरदारी नसती तर अध्यक्षस्थानाला योग्य समजले गेले नसते अशा लोकांची अध्यक्षाच्या जागीं निवड, यांवरून रॉयल सोसायटीचा शास्त्राबद्दल अशा प्रकारचा अनादर दिसतो कीं तसा अनादर दाखविण्याचें या सोसायटीनें मुख्यत्वेंकरून टाळावयास पाहिजे होतें.

तेव्हांपासून या बाबतींत फार सुधारणा झाली आहे हें खरें आहे. डेव्हनशायरच्या ड्यूकाला वगळून तुला त्यांनीं अध्यक्ष निवाडिलें यावरून ही गोष्ट चांगली व्यक्त झाली आहे; आणि सरदारांनीं सभासद होण्याच्या संबंधाच्या नियमांत जी सुधारणा होणार आहे त्यावरूनहि तेंच दिसन येतें. म्हणून दुसरीं कारणें नसतीं तर हें कारण पुरे झालें नसतें. पण दुसरीं कारणें अद्यापि कायम आहेत. इतर विद्वान् मंडळांप्रमाणें रॉयलसोसायटीसंबंधानेंहि मूळ उद्देशाखेरीज आणखी एक उद्देश उत्पन्न झाला आहे, आणि होतां होतां तो बलवत्तर होऊन बसला आहे. ज्ञानाच्या प्रगतीसाठीं सहक्रिया करणें हा सभेचा मूळ उद्देश आहे; मानाचें चिन्ह धारण करणें हा त्यापासून उत्पन्न झालेला अतएव दुय्यम उद्देश आहे; पण आतां मूळ उद्देशापेक्षां दुय्यम उद्देश ज्यास्त महत्त्वाचा बनलेला आहे. आतां अशा प्रकारचीं मान–चिन्हें परिस्थितीस अनुसरून फायदेकारक होतात किंवा नुकसानकारक होतात. तीं माणसांस त्यांच्या कारकीर्दीच्या पहिल्या अमदानींत दिल्यास त्यांना

तज्ज्ञ लोकांनीं दिलेलें शिक्कामोर्तब म्हणून तीं उपयोगी पडतात; आणि म्हणून त्यांच्या मार्गांतील अडचणी कमी करितात. उलट-पक्षीं, तीं न दिल्यास ह्या अडचणी वृद्धिंगत होतात. म्हणजे ह्या शिक्कामोर्तबाचा अभाव ही एक त्यांच्यामार्गांत ज्यास्त अडचण उत्पन्न होते. सामान्यजनास ह्या बाबतींत स्वत: विचार करण्याची शक्ति नसल्यामुळें ज्यांना हीं चिन्हें नाहींत त्यांची त्यांस कमी किंमत वाटते, आणि त्यामुळें ते जें कांहीं करितील तिकडे सामान्य-जन कमी लक्ष्य देतात. सारांश, जे (लेखक वगैरे) लहान वय किंवा इतर कांहीं कारण यांमुळें आधींच इतरांच्या मानानें कमी अनुकूल स्थितींत असतील त्यांची यामुळें ज्यास्तच कमी अनु-कूल स्थिति बनते; उलट जे ह्या अडचणींतून आधींच पार पड-लेले असतील त्यांस तीं कृत्रिम सवलती देतात. ह्यापासून जे अनर्थ उत्पन्न होतात ते माझ्या स्वताच्या अनुभवावरून मला क-ळून आलेले आहेत. १८९९ त " मानसशास्त्राचीं तत्त्वें " हा ग्रंथ प्रसिद्ध केल्यावर रॉयल सोसायटीचा मीं सभासद व्हावें म्हणून कोणीं सूचना केली असती तर माझा मार्ग कांहींसा सुलभ होईल ह्या आशेनें वर सांगितलेल्या माझ्या मनोवृत्तीस मीं कदाचित् बा-जूस सारिलें असतें. पण ज्या पुस्तकांच्या प्रकाशनानें त्यांची छ-पाई देखील भरून येईना अशीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत ज्या कालीं मी माझी अल्प मत्ता खर्च करीत होतों त्या दीर्घ कालांत अशी मदत कोणीं मला केली नाहीं. उलट, मीं वर म्हटल्याप्रमाणें, इत-रांना मिळालेला मान मला न मिळाल्यामुळें जी अडचण उत्पन्न व्हावयाची ती माझ्या बाबतींत उत्पन्न झाली; ती अडचण इंग्लं-दांत वर्तमानपत्रवाले माझ्या पुस्तकांवर अभिप्राय देण्याचें पुष्कळ काळपर्यंत टाळीत ह्या रूपानें व्यक्त झाली. आणि इतर देशीं पर-वांपर्यंत माझ्या ग्रंथाचीं भाषान्तरें झालीं नाहींत ह्या रूपानें व्यक्त झाली.

एवंच ज्या स्वाभाविक अडचणी स्वताच मोठ्या असून पुष्कळ वेळां अगदीं घातुक ठरत असतात, आणि माझ्या स्वताच्या बाबतींत बऱ्याच वेळां बहुतेक घातुक ठरण्याच्या बेतांत आल्या होत्या, त्या अशा रीतीनें ज्यास्त मोठ्या केल्या जातात. मान्यता मिळविण्याच्या कलहांत पुष्कळ लोकांचा चुराडा व्हावा हें एकंदरींत कदाचित् हितपरिणामी असेल; जरी त्यामध्यें ह्या प्रतिकूल स्थितीमुळें उत्तमांपैकींहि कांहींचा कदाचित् चुराडा होत असेल. पण ज्यांची परिस्थिति अगोदरच प्रतिकूल असेल त्यांना हा नैसार्गिक कलह कृत्रिमरीत्या ज्यास्त कडक केला जावा हें मला अनिष्ट वाटतें. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा मुळींच नाहीं कीं, रॉयल सोसायटीचें शिक्कामोर्तब ज्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर (होतकरू ग्रंथकारास) फायदेशीर असतें, त्या पायऱ्यांवर पुष्कळ लोकांस तिनें तें दिलेलें नाहीं. तिनें तें ज्या मानानें दिलें आहे त्या मानानें ती गोष्ट आपण लक्ष्यांत घेऊं या. आणि ज्या मानानें तिनें तें दिलेलें नाहीं त्या मानानें तीहि गोष्ट लक्ष्यांत घेऊं या. म्हणजे, तिच्या शिक्कामोर्तबाचा भाव किंवा अभाव कितपत प्रमाणावर आपल्यास कसोटी म्हणून समजतां येईल ह्याबद्दल योग्य विचार करण्यास ठीक पडेल. आणखी एक हेतु, जो वरच्यापेक्षांहि ज्यास्त व्यक्तिविषयक आहे, तो मला फार महत्त्वाचा वाटतो; ज्या हेतूनें प्रेरित होत्साता मी तुला परवां म्हणालों कीं, " मला वाटतें आतां सभासद होऊं पाहण्याचा वेळ निघून गेला आहे. " पुढच्या वर्षीं मी ग्रंथकार बनल्यास पाव शतक होऊन जाईल. मी आतां रॉयल सोसायटीचा सभासद होण्यास उमेदवार म्हणून पुढें आलों तर सामान्यपणें लोक असें म्हणतील कीं, एवढ्या मोठ्या काळानंतर आतांच अशा निवडणुकीचा योग्यपणा उघड दिसूं लागला आहे. इतके दिवस अशा मानास मी योग्य नव्हतों अशा प्रकारची मुकाट्याची कबूली देण्यास माझ्या मनाची तयारी नाहीं.

शिवाय, असें करणें अगदींच शहाणपणाचें होणार नाहीं असेंहि मला वाटतें; कारण, मला वाटतें, इतक्या दिरंगाईची ही निवड मला फार फायदेशीर होण्यापेक्षां नुकसानकारक बनण्याचाच ज्यास्त संभव दिसतो. एवंच अजूनहि ' नाहीं ' म्हणण्यास मला अनेक कारणें आहेत. जरी तुझ्याबद्दल माझ्या मनांतील मोठ्या सन्मानबुद्धीमुळें आणि तुझ्या मित्रत्वाच्या सूचनेस मान देण्याच्या इच्छेमुळें मी कांहीं वेळ अनिश्चित राहिलों, तरी या प्रश्नाचा पुन:पुन: विचार करतां माझीं मूळचीं कारणें व मनोविकार पुन: प्रबल झाले आहेत. अशी स्थिति झाल्याबद्दल मला विषाद वाटतो, आणि तुझ्या विनंतीस तुला कदाचित् न शोभणारें वाटेल असें उत्तर म्यां द्यावें ह्याबद्दलहि मला वाईट वाटतें. "

" आदितत्त्वें " ह्या ग्रंथाच्या फ्रेंच भाषान्तरास डा० क्याझेलिसनें जी प्रस्तावना जोडिली होती तिचें इंग्रजी भाषान्तर आतां (मे १८७४) छापावयास देण्यास तयार झालें होतें. एकदां तें फिस्क साहेबानें तयार करावें असा विचार चाललेला होता, पण १८७१ च्या मे महिन्यांत तें त्याला तयार करावयास न सांगणेंच यास बरें वाटलें. ह्याचें कारण त्या नांवाचे दोन अमेरिकन गृहस्थ या वेळीं कोर्टापुढें आलेले होते. हें पुस्तक " उत्क्रान्तिमीमांसा " ह्या नांवानें प्रसिद्ध झालें.

' हर्बर्ट स्पेन्सर व उत्क्रान्तिमत ' या नांवाचें एक व्याख्यान डा० यूमन्सनें न्यूयॉर्क एथील लिबरल क्लबापुढें दिलें होतें; त्यांत त्याची फार स्तुति केली असल्यामुळें तें व्याख्यान स्वतंत्ररीत्या किंवा डा० क्याझेलिसच्या प्रस्तावनेच्या भाषान्तराबरोबर प्रसिद्ध करण्यास स्पेन्सर कांकूं करूं लागला. त्यास अशी शंका वाटली कीं तें न्यूयार्कच्या लोकांच्या जरी पचनीं पडलें तरी लंदनच्या लोकांच्या पचनीं पडणार नाहीं. तद्वतच १८७४ च्या अखेरीस जेव्हां

त्यास असें समजलें कीं, ग्रांट आलेन यानें आपणावर केलेल्या कांहीं स्तुतिपर कवितांची एक नक्कल मोर्लेसाहेबाकडे (हल्लींचे लार्ड मोर्ले) 'फॉर्ट नाइटली रिव्ह्यू' त छापण्याकरितां पाठविली आहे, तेव्हां तो त्या कामीं आपली मान्यता देण्यास कबूल झाला नाहीं.

ह्या वर्षीं ब्रिटिश असोशिएशनची बैठक बेलफस्ट एथें व्हावयाची असून प्रो० टिंडाल अध्यक्ष व्हावयाचा होता. म्हणून तेथें हजर राहण्यास डा० यूमन्सला स्पेन्सरनें लिहिलें, पण त्यास येतां आलें नाहीं. तेव्हां स्पेन्सर एकटाच गेला. तेथें त्याचे दिवस मोडल्यामुळें स्काटलंदांत ह्या वर्षीं त्यास एक महिनाच रहावयास सांपडलें. त्यापैकीं पहिले कांहीं दिवस तो आबरनेथी एथें होल्टसाहेबाकडे रहावयास गेला, आणि पुढें आर्डटॉर्निश एथें गेला. आबरनेथी एथें राहण्यापासून त्याचा फार फायदा झाला असें त्याच्या एका पत्रावरून दिसतें.

बेलफस्ट एथील बैठकीच्या संबंधानें ता० २८ आगस्ट १८७४ रोजीं तो डा० यूमन्स यास लिहितो:—"बेलफस्ट एथील बैठकीस तूं हजर असतास तर तुला मजा वाटली असती. ती फारच चांगली वठली, आणि टिंडालचें प्रास्ताविक भाषण श्रोत्यांस फार आवडलें. हक्स्लेचें व्याख्यानहि फार चांगलें वठलें. हीं दोन व्याख्यानें एकसमयावच्छेदें झालीं हें विरुद्धपक्षाला एक आव्हानच होय असें लोक समजतात."

ता० ६ नवंबर रोजीं याच विषयाच्या संबंधानें तो पुनः त्यास लिहितो:—"मी समजतों कीं एथल्याप्रमाणें तेथेंहि उत्क्रान्तिमतासंबंधानें सार्वजनिक मत झपाट्यानें वाढत चाललें आहे. टिंडालच्या भाषणानें त्यास ज्यास्त जोर आला आहे. वर्तमानपत्रें त्याच्यावर लेख लिहीत आहेत, पत्रें छापीत आहेत, व चोपडीं निघत आहेत; आणि सामान्य प्रश्नाच्या ह्या किंवा त्या स्वरूपाचा ज्यांच्यांत विचार

केला आहे असे मासिक निबंध आणि पुस्तकें सारखीं वाढत आहेत. एकंदर परिणाम अगदीं अपरिमित होत आहे. आणखी थोड्याशा वर्षांत सार्वजनिक मतांत केवढी क्रान्ति होईल हें सांगतां येत नाहीं. ह्याचें एक अत्यन्त विलक्षण चिन्ह हें आहे कीं, " मानसशास्त्राच्या तत्त्वां " चें प्रो० मिव्हार्ट " डब्लीन रिव्ह्यू " त फार सविस्तर परीक्षण सुरू करीत आहे. तो त्याच्या प्रत्येक प्रकरणाचा विचार करीत आहे, आणि अनेक लेखांत अशा रीतीनें सगळ्या पुस्तकाचें परीक्षण करावयाचें म्हणतो. त्याच्या टीका मीं पाहिल्या आहेत तेवढ्यांवरून पाहतां त्या केवळ शब्दच्छलरूप आहेत आणि त्या निराधार असून व्यापकप्रश्नांना मुळींच शिवत देखील नाहींत. पण माझें एवढ्यानेंच पूर्ण समाधान होत आहे. कारण तो अशा रीतीनें त्या ग्रंथाचा ज्यास्त प्रसार करण्यास कारणीभूत होणार आहे. फ्रेंच इन्स्टिटयूटचा सभासद जानेट यानें तेथील एका प्रसिद्ध मासिकांत ' समाजशास्त्राचें अध्ययन ' या ग्रंथावर एक लेख लिहिला आहे. तो वाचावयास अद्यापि मला वेळ झाला नाहीं; पण तो टीकात्मक असूनहि गुणग्राही आहे असें दिसतें. मोर्ले देखील मला सांगतो कीं, " फॉर्ट नाइटली रिव्ह्यू " त प्रोफेसर केर्न्सकडून मी त्याच्यावर एक लेख लिहून घेणार आहें. "

ह्या विषयासंबंधानें लोकांचें जें हें लक्ष्य जागृत झालें त्याचा एक परिणाम असा झाला कीं, प्रोफेसर बेननें मानसिक शास्त्रावर एक स्वतंत्र मासिक सुरू केलें. ह्या कामीं स्पेन्सरनें त्यास फार मदत केली.

आतां ह्याची ' मानसशास्त्रा'ची लांबलेली द्वितीयावृत्ति पुरी झाली होती. ' समाजशास्त्राचें अध्ययन ' ह्या ग्रंथाकडे लोकांचें जितकें लक्ष्य गेलें तितकें पूर्वींच्या ह्याच्या दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाकडे गेलें नव्हतें; आणि समाजशास्त्रविषयक जी सामग्री तो आज सहा वर्षें इतरांकडून तयार करवीत होता, ती त्या ग्रंथास सुरवात

करण्यास पुरेशी तयार झालेली होती. आतां हें खरें आहे कीं, ‘ वर्णनात्मक समाजशास्त्र ’ जसें ज्यास्त ज्यास्त तयार होत गेलें, तशी त्याची त्याबद्दलची काळजी कमी न होतां वाढतच गेली होती. तें काम महत्त्वाचें असल्यामुळें त्यास तसें चालू ठेवावेसें वाटे; पण त्याला खर्च फार येत असल्यामुळें त्यास तें थांबवावेंसेंहि वाटे. ह्या दोन मनोवृत्तींपैकीं जी ज्या वेळीं प्रबल असेल तिची त्या वेळीं त्याच्या पत्रांवर छटा उमटे. उदाहरणार्थ, एका पत्रांत तो म्हणतो:— “ मला अशी आशा वाटूं लागली आहे कीं, हळू हळू, पण अखेरीस, छपाईचा खर्च भरून येईल, किंवा निदान जवळ जवळ तरी भरून येईल, आणि मला माझें काम बंद करावें लागणार नाहीं. ” त्याला काळजी वाटे ती ह्या बंद होण्याचीच वाटे. दुसऱ्या एका पत्रांत तो म्हणतो:—“ मला आपलें काम बंद करावें लागेल किंवा नुकसान सोसावें लागेल ही कल्पना माझीच आहे. पण मला सोसवेल त्यापेक्षां ज्यास्त नुकसान झाल्यास मला त्याची परवानगी नाहीं. नुसते पैसे गोळा करण्याची भिकार महत्त्वाकांक्षा जी आहे तिच्याशीं माझी इतकी अल्प सहानुभूति आहे कीं ती माझ्या लक्ष्यांतच येत नाहीं. ” १८७९ च्या जानेवारींत तो आशावंत दिसतो, कारण तो लिहितो:—“ माझीं दुसरीं पुस्तकें इतकीं चांगलीं खपत आहेत कीं मला या ग्रंथांच्या प्रकाशनाचें काम चालू ठेवतां येईल; म्हणून माझ्या उत्पन्नांतून फार खर्च होत आहे तरी मी काळजींत नाहीं. ” त्याच्या पुढच्या महिन्यांत उलट मनोविकार प्रबल झालेला दिसतो; कारण त्या वेळीं तो लिहितो:—“हल्लींच्या स्थितीकडे पाहतां मला हा उद्योग बंद केला पाहिजे हें उघड आहे. आधींच सुरू केलेले खंड पुरे केलेच पाहिजेत; पण ते पुरे केल्यावर इतक्या मूर्ख जनतेकरितां आणखी पैसे खाड्यांत घालण्यास आणि आपल्यास सारखा त्रास देत रहाण्यास माझ्या मनाची तयारी रहाणार नाहीं. ”

" उन्हाळ्याची सुट्टी येण्यापूर्वी 'समाजशास्त्राच्या तत्त्वां'चा पहिला हप्ता निघण्याचा संभव दिसत नाहीं, " असें जेव्हां तो १८७३ च्या वसंतांत म्हणाला होता, तेव्हां १८७४ च्या मार्चांत आपली त्या ग्रंथाचीं साठच पानें काय तीं लिहून होतील असें त्याच्या स्वप्नींहि नसेल. दुसऱ्या हप्त्याबद्दल त्या वर्षाच्या नवंबरांत तो म्हणतो:- " हल्लीं माझ्या कामाचा जो भाग मी करीत आहें तो मला फार आनंददायक होत आहे. देवभोळ्या समजुतींची व कृतींची जनिति आज कित्येक वर्षें माझ्या मनांत सुधारतां सुधारतां तीस सुसंगत कल्पनेचें स्वरूप येत आहे, आणि आतां ती अगदीं स्पष्ट व पूर्ण झाली आहे. " या ग्रंथाचा तिसरा हप्ता १८७५ च्या फेब्रुवारींत निघाला. डा० यूमन्स यास ते हप्ते आपल्या मासिकांत इतके भराभर छापणें गैरसोईचें भासूं लागलें; कारण या ग्रंथांत इतर धर्मांबरोबर ख्रिस्तीधर्माचाहि सगळा सांगाडा डळमळीत करण्याचा स्पेन्सरचा यत्न होता. तेव्हां असले हप्ते महिन्याच्या महिन्यास प्रसिद्ध करणें त्याच्या मासिकास किफायतीच्या दृष्टीनें सोयीचें नव्हतें. म्हणून त्यानें हा शेवटचा हप्ता एकदम छापिला नाहीं. त्यासंबंधानें स्पेन्सर त्यास ता० १४ एप्रिल १८७५ रोजीं तो लिहितो:—" मीं पाठविलेलीं प्रकरणें तूं छापिलीं नाहींस तें बरोबर केलेंस. तूं पाठीव म्हणालास म्हणूनच तीं मीं पाठविलीं होतीं. तुझ्या मासिकांत आपलें मतप्रकाशन इतक्या प्रमाणावर करणें कितपत शहाणपणाचें होईल याबद्दल मला वरचेवर शंका आलेली आहे; आणि म्हणून तूं त्यास मर्यादा घालीत आहेस ह्याबद्दल मला वाईट न वाटतां आनंद वाटत आहे. ह्या हल्लींच्या प्रकरणासंबंधानें तसें करणें तूं म्हणतोस त्याप्रमाणें विशेष शहाणपणाचें आहे; आणि याच्या पुढचीं प्रकरणें ह्याहूनहि कडक आहेत. त्यांचा परिणाम काय होईल याबद्दल खरोखरच मला स्वतालाहि कांहीं भीति वाटूं लागली आहे;

कारण तुझ्या हळूहळू लक्ष्यांत येईल कीं, हीं घटनात्मक प्रकरणें हल्लीं दिसतात त्याहूनहि प्रस्तुत समजुतींचीं इतकीं विघटक (विनाशक) आहेत कीं, तीं कांहींच कायम टिकूं देत नाहींत. ज्यांस प्रस्तुत धर्माभिमानी म्हणून म्हणतात त्यांना तीं वाचून त्वेष न येणें अशक्यच आहे; पण त्यास उपाय नाहीं. "

ह्या वर्षीं त्यानें याशिवाय जीं लहानसहान कामें केलीं त्यांपैकीं प्रो० टिंडालचे आक्षेप दूर करण्याकरितां " आदितत्त्वां"चीं कित्येक प्रकरणें दुरुस्त केलीं हें एक होतें. ते दुरुस्त केलेले भाग त्याजकडे पाठवून त्यांसंबंधानें ता० २४ मार्च १८७९ रोजीं तो त्यास लिहितो:—" हे भाग पाठविण्यांत माझा हेतु असा आहे कीं, ते ईस्टरच्या सणाकरितां लंदनाबाहेर जाण्यापूर्वीं तुला पोहोंचल्यास त्यांत मीं जे फेरबदल केले आहेत त्यांपैकीं, जास्त महत्त्वाच्या फेरफारांकडे पाहण्यास तुला फुरसत मिळावी, आणि तूं घेतलेल्या आक्षेपांचा योग्य परिणाम झाला किंवा नाहीं हें सांगून तुझ्याकडून आधींच झालेल्या पुष्कळ उपकारांत त्वां आणखी भर घालावीस. ' द्रव्याचें अविनाशित्व ' हें प्रकरण पुनः वाचण्याचे श्रम तूं घेण्याचें कारण नाहीं असें मला वाटतें. त्यांत तूं माझ्या नजरेस आणिलेल्या सर्व गोष्टींकडे मीं योग्य लक्ष्य पुरविलें आहे..... ' गतींचें सातत्य ' हें बहुतेक प्रकरण मीं अगदीं नवें बनविलें आहे; आणि आतां तें असावें त्याहून फारसें निराळें नाहीं असें मला वाटतें. त्याचा पुनः विचार करण्थास व तें दुरुस्त करण्यास तूं मला लाविलेंस ह्याबद्दल मला फार आनंद वाटतो. कांहीं झालें तरी तें पूर्वीं होतें त्याहूनहि हल्लीं फारच अधिक चांगलें बनलें आहे. ' शक्तीचें नित्यस्थायित्व ' ह्या प्रकरणासंबंधानें तूं जे शब्द शक्तीचे वाचक म्हणून योजावे म्हणून म्हणतोस, ते मला माझा अर्थ पूर्णपणें व्यक्त करण्यास पुरेसे वाटत नाहींत. "

‘ नीतिसरणी ’ नामक आपल्या पुस्तकांत सिजविक साहेबानें ‘ सोश्यल स्टॅटिक्स ’ मधील ह्याच्या कांहीं मतांचा भलताच अर्थ केला होता, त्यासंबंधानें तो त्यास ता० १२ जानेवारी १८७९ रोजीं लिहितोः— “ ‘ एका आदितत्त्वाचें उत्पादन ’ या ज्या प्रकरणांतून तूं उतारे घेतले आहेस त्यांत, मला वाटतें, ही गोष्ट स्पष्टपणें दिसते कीं, सर्वांच्या सदृश स्वातंत्र्यानें मर्यादित अशा व्यक्तिस्वातंत्र्याचा नियम व्यक्तिवर्तनाला पुरेसा मार्गदर्शक आहे असें म्हणण्याचा माझा उद्देश नाहीं. मागाहून दुय्यम तत्त्वांनीं मर्यादित करावयाचें असें हें प्राथमिक तत्त्व म्हणून तें तेथें मीं दाखविलेलें आहे; म्हणजे, माणसामाणसांमध्यें योग्य संबंध काय असावे ह्याबद्दलचा तो नियम असून माणसाच्या विचारशक्तीवरून उत्पन्न होणाऱ्या आणखी नियमांनीं तो मर्यादित व्हावयाचा आहे. समाजाची न्यायघटना कशी असावी ह्यासंबंधाचे नियम बसवितां, हें इतरांच्या स्वातंत्र्यानें मर्यादित असें व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणें प्रतिपादण्यास हरकत नाहीं असा सिद्धान्त मीं तेथें केला आहे; पण व्यक्तीला हा नियम पुरेसा मार्गदर्शक आहे असा सिद्धान्त मीं तेथें बसविलेला नाहीं, तर ह्याच्या उलट गोष्ट दर्शविलेली आहे. त्या प्रकरणाचा उद्देश न्यायाचा पाया प्रतिपादणें हा आहे. पण न्यायांत सर्व नैतिक बंधनांचा समावेश होतो असें तेथें म्हटलेलें नाहीं; ह्याच्या उलट विधानें तेथें स्पष्टपणें केलेलीं आहेत. त्याचा उद्देश व्यक्तीच्या हक्काचें नियमन करण्याकरितां त्याचे कोणते हक्क इतरांच्या (समाजाच्या) हक्कांविरुद्ध न्याय्य समजावयाचे हें स्थापण्याचा आहे. आणि व्यक्तीनें आपल्या कृती आपल्या स्वताच्या विचारशक्तीनें आणखी मर्यादित करण्याची मुभा त्यांत दिलेली आहे; कारण, त्यांत असें मुळींच प्रतिपादिलेलें नाहीं कीं, विचारशक्तीच्या सांगण्याकडे अगदीं दुर्लक्ष करून माणसानें आ-

पल्या उपजत बुद्धींना पूर्ण राज्य करावयास द्यावें. वर घालून दिलेल्या मर्यादांच्या आंत, सुखदु:खांच्या अनुभवांनीं माणसाचें शील योग्य बनविण्याचें काम त्याच्या एकंदर स्वभावाच्या अनियंत्रित व्यापाराकडे सोंपवावें, असें जें मीं म्हटलें आहे, त्याचा अर्थ विचारशक्तीनें आपला अधिकार उपजतबुद्धीच्या हवालीं करून मोकळें व्हावें असा, तूं म्हणतोस त्याप्रमाणें, मुळींच नाहीं. मीं असें म्हटलें आहे कीं, कायद्याचें स्वरूप दिलेली जी समाजाची विचारशक्ति तिनें घातलेलीं आणखी निबंधनें अमलांत आणिल्यानें माणसाचें शील जितकें योग्य बनण्याचा संभव आहे त्याहून, माणसास वर घालून दिलेल्या मर्यादांच्या आंत आपल्या स्वताच्या वर्तनापासून होणारा फायदातोटा भोगूं देऊन, आणि आपल्या शहाण्या व वेड्या विचारशक्तीच्या सांगण्यांनीं स्वतास कह्यांत ठेवावयास लावून, जो अनुभवसंचय त्याच्या ठिकाणीं होईल तेणेंकरून त्याचें शील योग्य बनण्याचा संभव ज्यास्त आहे; कारण समाजाची विचारशक्ति त्या त्या वेळच्या अज्ञानानें आणि वैगुण्ययुक्त मनोभावानें निःसंशय दूषित झालेली असते. साहजिक मनःप्रवृत्तीवरील विचारशक्तीचें स्वाभाविक वर्चस्व मी नाकबूल करितों असा आरोप मजवर केल्यानें तुझा कोटिक्रम विशद होतो हें मी जाणून आहें, पण तेणेंकरून माझ्या पदरीं जरासा फाजील मूर्खपणा बांधिला जातो."

१८७९ च्या मे महिन्यांत तो ‘ आत्मचरित ’ लिहावयास लागला तेव्हां त्याचे विचार सहजच त्याच्या मूलवयाकडे वळले. त्यासंबंधानें ता० १४ मे १८७९ रोजीं तो जॉर्ज हेल्म यास लिहितो:—"तुला डार्बीचा मेयर निवडलें आहे हें कांहीं दिवसांपूर्वीं ऐकून मला फारच आनंद झाला. तुझ्यासंबंधानें ही जी गुणग्राहकता तेथील लोकांनीं दाखविली तिला तूं योग्यच होतास; आणि ती दाखविण्यास ह्याहून ज्यास्त विलंब त्यांनीं लाविला नाहीं ह्याचा

मला संतोष वाटतो. प्रथम जेव्हां आपली ओळख झाली तेव्हांपासून हळूहळू सुरू होऊन पुढें जी ज्यास्त ज्यास्त झपाट्यानें वाढत गेली आहे त्या तुझ्या भरभराटीच्या कारकीर्दीवर हा फार योग्य कळस चढला आहे. ज्या दिवशीं तूं मला बुडतां बुडतां वांचविलेंस त्या दिवशीं, पुढें आपलें काय होईल याबद्दल आपणास फारच अल्प कल्पना होती. अर्धवट बुडालेल्या एका मुलाला दुसरा थिबथिबत जाणारा तरुण हातांत धरून घरीं नेतांना ज्या लोकांनीं पाहिला त्यांच्या स्वप्नीं हें क्वचित्च आलें असेल कीं, त्यांतील एकजण त्या शहरच्या मुख्य माजिस्ट्रेटाच्या पदवीस चढेल, आणि दुसरा काय म्हणूं? बरें, असें म्हणतों—" कांहीं अंशीं बराचसा प्रसिद्ध होईल. त्या प्रसंगाचें स्मरण मला जसें नेहमीं कृतज्ञतापूर्वक होत राहील, तसें तुला समाधानपूर्वक होत राहिलें पाहिजे. "

मनोविकारांचा शारीरिक हालचालींशीं कारणरूप संबंध आहे ह्या स्पेन्सरनें गृहीत केलेल्या गोष्टीपासून विसंगतता उत्पन्न होते असें स्पाल्डिंगसाहेबानें ' नेचर ' पत्रांत या सुमारास एक लेख लिहून दाखवून देण्याचा यत्न केला होता. त्यासंबंधानें तो त्यास ता० ९ जुलई १८७९ रोजीं लिहितोः—" तुझ्या कोटिक्रमापासून असा अर्थ निघतोसा दिसतो कीं, वास्तविक रीत्या असणारी गति आणि आपल्या ज्ञानशक्तीस प्रादुर्भूत होणारी गति ह्या दोन्ही मी एकच समजतों. मी जर असें समजलों असतों, तर मनोविकाराचें गतींत आणि गतीचें मनोविकारांत रूपान्तर होऊं शकतें ह्या कल्पनेंत तूं म्हणतोस तशी विसंगता उत्पन्न झाली असती. ...पण (कसें होतें हें मुळींच न जाणतां) जें रूपान्तर मी गृहीत करितों तें ज्या आत्मविषयक चळवळीस आपण मनोविकार म्हणतों त्याचें आणि ज्या वस्तुविषयक (अनात्मविषयक) चळवळीस आपण गति म्हणतों त्याचें रूपान्तर होय. जरी ह्या दोन्ही त्यांच्या अन्तिमस्वरूपीं अ-

ज्ञेय आहेत.....थोडक्यांत सांगतां, सर्वत्र गर्भित होणारें माझें मत असें आहे कीं, वस्तुविषयक हालचाल अविवरणीय आहे, आत्म-विषयक हालचाल अविवरणीय आहे, आणि त्या दोहोंमधील संबंध अविवरणीयच आहे. ज्ञानतंतुविषयक घटना आणि व्यापार ह्यां-च्यासंबंधाच्या गोष्टींकडे पाहतां मला असें समजणें भाग पडतें कीं, हीं दोन्ही कोणत्यातरी रीतीनें संबद्ध आहेत, जरी कशीं आहेत ह्याची कल्पना मला करतां येत नाहीं. मला हीहि गोष्ट ध्यानांत घेणें भाग पडतें कीं त्यांचा एकमेकांशीं संचयदृष्ट्या संबंध आहे; आणि संचयरूप संबंध रूपान्तर गर्भित करितो. "

पुढच्या वर्षाच्या दिजंबरांत मन आणि शरीर ह्यांमधील संबं-धाचा हा प्रश्न पुनः उत्पन्न झाला. तो कोपेनहेगेन एथील प्रो० हाफडिंग, ज्यानें " निबंध संग्रहा " पैकीं कांहीं निवडक निबं-धाचें डेनिश भाषेंत भाषान्तर केलें होतें, त्यानें उपस्थित केला होता. त्याचें त्यासंबंधाचें ता० १४ दिजंबर १८७६ चें पत्र असें होतें:—" तुझ्या ग्रंथांत कांहीं ठिकाणीं, पुनःपुनः मनन केल्यावरहि मला एक विसंगतता दिसतेशी वाटते. त्यासंबंधानें कांहीं माहिती तुला विचारण्याची मी तुझी परवानगी मागतों..... (१) तुझ्या " आदितत्त्वां " च्या ७१ व्या कलमांत तूं म्हणतोसः— " रूपान्तराचा जो नियम भौतिक शक्तींमध्यें लागू पडतो तो त्यांच्या-मध्यें व मानसशक्तींमध्येंहि लागू पडतो. त्याच ग्रंथाच्या १९४ व्या कलमांत तूं असें म्हटलें आहेसः—" परस्परसंबंधाच्या नियमापासून असा एक सिद्धान्त अवश्यमेव निष्पन्न होतो कीं, ज्ञानवर्त्तंत जें मनोविकाराच्या रूपानें असतें त्याचें द्रव्याच्या ठिकाणीं दिसणाऱ्या इतर सर्व शक्तींच्या सममूल्यांत रूपान्तर होऊं शकतें. " " मान-सशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या ४७ व्या कलमांत एकदां भौतिक फेरबदल आणि त्याचा सहचारी मानसिक फेरबदल ह्यांच्यामधील

संबंधाची, उष्णता व गति ह्यांच्यामधील संबंधाशीं त्वां तुलना केलेली आहे. (२) पण 'मानसशास्त्रा' च्या पहिल्या खंडाच्या परिशिष्टांत तूं असें म्हटलें आहेसः—"अर्थात् माझें असें म्हणण्याचा भाव नाहीं कीं भौतिक कार्यें अशा रीतीनें मानसिक कार्यें बनतात.....मी केवळ कांहीं भौतिक फेरबदल आणि तत्संबंधीं मानसिक फेरबदल ह्यांच्यामधील समान्तरपणा दाखवीत आहें." हें म्हणणें "आदितत्त्वां" चें १४३ कलम आणि "मानसशास्त्राच्या तत्त्वां" चीं २२१ व ४६९ कलमें ह्यांच्याशीं जुळतें. ह्या ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं ज्ञानवत्तेचें उत्क्रमण उत्क्रान्तीच्या सामान्य नियमास अनुसरून होतें, पण शक्तीच्या नित्यस्थायित्वापासून तें निष्पन्न करून दाखवतां येत नाहीं, पण भौतिक इंद्रियांमधील भौतिक फेरबदलांची वाढ हें जें त्याचें दुसरें तोंड त्याच्यासंबंधानें तें त्या नियमापासून निष्पन्न करून दाखवतां येतें.

माझ्याविषयीं म्हणशील तर माझ्यामतें ह्या शेवटीं सांगितलेल्या स्थळीं ह्या प्रश्नाची खरी स्थिति त्वां स्पष्ट केलेली आहे. मला असेंहि वाटतें कीं त्या ठिकाणीं तुझें खरें मत व्यक्त झालेलें आहे."

त्यावर ता० १८ दिजंबर १८७६ रोजीं स्पेन्सर त्यास लिहितोः—"तुझ्या ता० १४ च्या पत्रापासून मला त्रास होईल असें मुळींच समजूं नको. उलट, तूं सांगतोस ती विसंगतता मला दाखविल्याबद्दल मी तुझा आभारी आहें. "मानसशास्त्रा" च्या पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें 'आदितत्त्वां' त प्रारंभीं दर्शविलेल्या मतांत खरोखरच कांहीं फरक झालेला आहे हें त्या विसंगततेचें कांहीं अंशीं कारण आहे; आणि कांहीं अंशीं माझ्या लक्ष्यांत न आलेला असा कांहीं योजिलेल्या शब्दांचा दोष हें कारण आहे. मानसशास्त्राच्या 'आधारस्तंभ' ह्या भागांत केलेल्या प्रतिपादनाशीं जुळेल अशा रीतीनें 'आदितत्त्वां' च्या तूं उल्लेखिले-

ल्या भागांत कांहीं फेरबदल करणें जरूर आहे हें, तूं ती गोष्ट माझ्या लक्ष्यांत आणी तोंपर्यंत, मी विसरलों होतों. आणि पूर्वी मीं केलेल्या विधानांशीं विसंगत दिसेल अशा शब्दांनीं परिशिष्टांतून तें उतारा घेतलेलें विधान मीं व्यक्त केलेलें आहे ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत आलेली नव्हती. माझी कल्पना ‘ समान्तरपणा ’ ह्या शब्दानें अपुऱ्या रीतीनें व्यक्त होत असून ज्या वस्तुविषयक अवस्थांस भौतिक फेरबदल असें म्हटलेलें आहे त्यांचें आत्मविषयक अवस्था हें दुसरें तोंड आहे असें म्हणण्यानें, ती ज्यास्त चांगल्या रीतीनें स्पष्ट होते, हें दुसऱ्या अनेक वाक्यांवरून तुला अनुमानितां येईल. आणि ‘ समान्तरपणा ’ ह्या शब्दानें माझा असें दर्शविण्याचा हेतु होता कीं, एका तोंडाकडून भौतिक आणि दुसऱ्या तोंडाकडून मानसिक अशा ह्या सर्व फेरबदलांतून एकप्रकारचा निश्चित संबंध सारखा दृष्टीस पडतो; तो असा कीं, एकाच्या वाढी व क्षय ह्यांच्याबरोबर दुसऱ्याच्या वाढी व क्षय होत असतात. तथापि समान्तरपणा हा शब्द कांहीं अंशीं भ्रामक आहे, कारण त्यांत अशी कल्पना अंतर्भूत होते कीं, मानसिक फेरबदलांची सांखळी भौतिक फेरबदलांच्या सांखळीच्या बाहेर व तिजपासून पृथक् अशी आहे. पण माझें मत असें नाहीं. ज्ञानवत्तेंत प्रादुर्भूत होणारी मानसिक शक्ति ज्या भौतिक शक्तींवरून ती जागृत होते त्यांची आणि त्यानंतर ज्या भौतिक शक्तींना ती सुरू करिते त्यांची प्रत्यक्ष परस्परसंबंधी म्हणून मी समजतों; पण ‘ मानसिक शास्त्राच्या आधारस्तंभां ’ मध्यें स्पष्ट करून दाखविल्याप्रमाणें, मी ती शक्ति जेथें उत्तेजक लावावा त्या स्थळीं सुरू होणाऱ्या फेरबदलाची, किंवा स्नायूंत उत्क्रान्त होणाऱ्या गतिसंचयाची संचयदृष्ट्या परस्परसंबंधी समजत नाहीं; तर संवेदनास्थळामध्यें उत्पन्न होणाऱ्या ज्ञानतंतुविषयक उत्सर्जनाची ती संचयदृष्ट्या परस्परसंबंधी असते. जी मानसिक शक्ति ज्ञानवत्ता म्हणून

आपणास उद्भूत होते ती, आणि ज्या भौतिक शक्ती एकीकडे तीस सुरू करितात त्या शक्ती, व दुसरीकडे ती ज्या भौतिक शक्तींस सुरू करिते त्या शक्ती, ह्यांच्यामधील संबंधाचें माझें मत, ह्या विषयाची मित्राशीं चर्चा करतांना ज्या उपमितीचा मीं कधीं कधीं उपयोग केलेला आहे तिजवरून कदाचित् उत्तम रीतीनें लक्ष्यांत येईल. विजेच्या यंत्राचीं (गाल्हानिक ब्याटरीचीं) धन व ऋण टोकें जुळविणाऱ्या तांब्याच्या तारा जर आपण तोडिल्या, आणि त्यांच्या दोन टोंकांमध्यें प्लाटिनम धातूची तार घातली, तर, विद्युच्चक्र पुरें केलें म्हणजे, विद्युत्प्रवाह जोराचा असल्यास, तो तांब्याच्या तारांतून जातांना त्यांच्यांत जरी लक्ष्यांत येण्यासारखा फेरबदल करीत नाहीं, तरी त्यांच्यामधील प्लाटिनमच्या तारेच्या तुकड्यामध्यें अत्यन्त कडक उष्णता उत्पन्न करितो. आतां आपण जर अशी कल्पना केली कीं, तांब्याच्या तारेचा एक तुकडा अंतर्मुख ज्ञानतंतु दर्शवितो व दुसरा तुकडा बहिर्मुख ज्ञानतंतु दर्शवितो आणि मधील प्लाटिनमच्या तारेचा तुकडा ज्या संवेदनास्थळीं बाहेरून माहिती आणिली जाते आणि तिला अनुसरून स्नायूंमध्यें योग्य गति उत्पन्न केली जाते तें स्थळ दर्शवितो; तर सगळ्या चक्रांतून विद्युत्प्रवाह गेल्यानें प्लाटिनमच्या तुकड्यालाहि तीच उष्णता प्राप्त होण्याची जी क्रिया ती संवेदनास्थळीं एकंदर ज्ञानतंतुविषयक उत्सर्जनाबरोबर उत्पन्न होणारी जी ज्ञानवत्ता तिची दर्शक म्हणून समजतां येईल. अर्थात् ही केवळ उपमा आहे, कारण तुला माहीतच आहे, कीं, हें ज्ञानतंतुविषयक उत्सर्जन कोणत्याहि अर्थीं विद्युद्रूप आहे असें मी समजत नाहीं; पण ही गोष्ट मला आकलनीय दिसते कीं, प्लाटिनमच्या तुकड्याच्या ह्या तीव्र उष्णतेचा विद्युज्जन्य उत्सर्जनाशीं जो परस्परसंबंध आहे तशाच प्रकारचा आपल्यामधील ज्ञानवत्ताघटक शक्तीचा, जी शक्ति तीस सुरू करिते तिच्याशीं, व

ती ज्या शक्तीस सुरू करिते तिच्याशीं, संबंध आहे. अशा रीतीनें ह्या गोष्टीकडे पाहिल्यास जी भौतिक शक्ति ज्ञानवत्तेस सुरू करते, व ज्ञानवत्ता ज्या भौतिक शक्तीस सुरू करते, त्या दोहोंशीं ज्ञानवत्ता-कशी संबद्ध आहे, आणि हें रूपान्तर कसें होतें, आणि ज्ञानवत्ता-घटक शक्ति काय आहे, हें जरी आपल्यास समजत नाहीं, तरी त्या दोन शक्तींपैकीं प्रत्येकीप्रमाणें तिची तीव्रताहि कशी बदलत जाते, हें अंधक रीतीनें ध्यानांत येणें शक्य होतें. आणि जी भौतिक मानसिक क्रियेस सुरू करिते तिचें, आणि ज्या भौतिकक्रियेस ती (मानसिक क्रिया) सुरू करिते तिचें, ती मानसिक क्रिया दुसरें तोंड कसें आहे, हेंहि आकलणें शक्य होतें. ह्या दृष्टीनें ज्ञान–गति विषयक फेरबदलाच्या एकंदर चक्राचा ज्ञानवत्ता हा एकप्रकारचा आडवा छेद म्हणून ढोबळ रीतीनें मानतां येईल. भौतिक उत्सर्ज-नाच्या प्रवाहास चक्राच्या ज्या भागीं कांहीं अडथळा होत असेल तेथें तो छेद उत्पन्न होतो.... आपल्यामध्यें घडून येणाऱ्या गोष्टीं-कडे अशा दृष्टीनें पाहिल्यास आपल्यास असें म्हणतां येईल कीं, अन्तिमशक्तीच्या ज्या स्वरूपास गति हें नांव देऊन आपण आ-पल्या मनापुढें मांडितों त्यास कांहीं विशिष्ट परिस्थितींत आविज्ञात अंतिम स्वरूपाच्या ज्या शक्तीची ज्ञानवत्ता बनते तिचें स्वरूप येतें, आणि ही अवस्था क्षणभर तशीच राहून नंतर लागलेंच गति हें नांव दिलेली अज्ञातशक्तीची जी पूर्वींची अवस्था तिचें स्वरूप तीस येतें. ह्या माझ्या मताबरोबर इतरत्र मीं वरचेवर प्रदर्शित केलेलें दु-सरें माझें एक मत त्वां ध्यानांत घेतलें पाहिजेस; तें हें कीं, शक्तीचीं हीं दोन्ही स्वरूपें ज्या अज्ञेय सामर्थ्याचे ते प्रादुर्भाव आहेत त्याचीं केवळ सांकेतिक चिन्हें किंवा चिन्हरूपी दर्शक आहेत आणि त्यां-च्यांतील भेद तत्त्वतः हा आहे कीं, ज्यास आपण आपली ज्ञानवत्ता म्हणतों तो भाग मर्यादित आहे, आणि ज्यास आपण संज्ञाविरहित

किंवा भौतिक म्हणून म्हणतों तो ह्या ज्ञानवत्ता नामक मर्यादित भागाच्या बाहेरचा होय. अशा दृष्टीनें ह्या विषयाकडे पाहिल्यास भौतिकाचें मानसिकामध्यें रूपान्तर होण्याची जी कल्पित असंभवनियता तिच्या भोंवऱ्यांत आपण सांपडणार नाहीं. मीं वर म्हटल्याप्रमाणें हीं माझीं परस्परविसंगत विधानें माझ्या नजरेस आणिल्याबद्दल मी तुझा आभारी आहें, आणि तीं टाळण्यास योग्य तो फेरबदल पुढच्या आवृत्तींत मी मुद्दाम करीन. "

तशा प्रकारचा फेरफार त्यानें वरील ग्रंथाच्या पुढच्या आवृत्तींत केला. वरच्या पत्राच्या संबंधानें प्रो० हॉफडिंग म्हणतो कीं, " मला तें त्या वेळीं अगदीं स्पष्टरीत्या कळलें नव्हतें व अजूनहि (१९०४) कळत नाहीं. "

१८७९ चा आगस्ट आर्डटॉर्निश एथें घालविल्यानंतर तो लाण्डुडनो एथें गेला. तेथें गेल्यानंतर दुसरे दिवशीं (ता० २९ आगस्ट) त्यानें मिसेस स्मिथ हीस आर्डटॉनिश एथें लिहिलें:—" मी कोठें आहें हें शब्दांनीं सांगण्याचें कारण नाहीं; मी तें चित्रानें दर्शवीत आहें. त्या चित्रावरून दुसरी एक गोष्ट स्पष्ट होते. ती ही कीं, स्काटलंदांतील सुंदर देखाव्यांतून लंदनच्या कुरूप रस्त्यांत हलके हलके जाण्याचा शहाणपणा मी कसा करितों हेंहि त्यावरून व्यक्त होतें..... मी एथें कालपर्यंत येऊन पोहोंचलों नाहीं; म्हणजे, माझ्या अजमासाबाहेर एक दिवस मला ज्यास्त लागला. ' अयोना ' आगबोटींत गर्दी असल्यामुळें हें सर्व झालें. तूं विचारशील, ' तें कसें ? ' त्याचा क्रम फारसा उघड नाहीं; पण तें अशा रीतीनें घडून आलें. उतारू फार असल्यामुळें जेवणाच्या तेथें फार गर्दी झाली; ह्या गर्दीमुळें मागितलेला पदार्थ मिळण्याची पंचाईत पडूं लागली; व्हिस्की मिळेना म्हणून मी बीर प्यालों; बीर प्याल्यानें माझें डोकें दुखूं लागलें; डोकें दुखूं लागल्यामुळें मीं असें ठरविलें

कीं रात्रीचा प्रवास करण्यास मी योग्य नाहीं; ह्या निश्चयामुळें ग्लासगो येथें मीं रात्रीची वस्ती केली, आणि म्हणून मला लिव्हरपूलच्या रस्त्यानें येतां आलें नाहीं आणि चेस्टरकडून यावें लागलें. अशा रीतीनें तुझ्या ध्यानांत येईल कीं ही कार्यकारणमालीका अगदीं स्पष्ट आहे; आचार्न एथें मधला (न्याहारीच्या नंतरचा व जेवणाच्या अगोदरचा) अल्प फराळ केल्यानंतर नदीच्या तीरीं परवां मी पडलों असतां तेथें जी एक कारणमालिका माझ्या लक्षांत आली तितकीच बहुतेकांशीं ही स्पष्ट आहे; ती कार्यकारणमालिका ही:— “ आक्रानिश (आर्डटार्निशचें पहिलें नांव) एथील इस्टेटीची जाहिरात मि० स्मिथनें जर पाहिली नसती तर अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटाली, रशिया व इतर देश एथील बऱ्याच लोकांचे विचार हल्लीं आहेत तसेच झाले नसते. ” (स्पेन्सरसाहेबांच्या ह्या विनोदी म्हणण्याचा भाव असा दिसतो कीं तुमच्या स्काटलंदांतील ह्या ठिकाणाकडे दर वर्षीं हवा पालटण्यास येऊन जर माझी प्रकृति आहे तशी राहिली नसती तर माझ्या हातून झालें तें ग्रंथलेखन झालें नसतें).

ता० २९ नवंबर १८७६ रोजीं तो यूमन्स यास लिहितो:— “ बेनच्या ‘मनोवृत्ती व इच्छा’ या ग्रंथाची नवी आवृत्ति मला पोहोंचली आहे. मला ती फार सुधारलेली वाटते, आणि तो उत्क्रान्तीच्या मताचा स्वीकार जरी जरासा सावधगिरीनेंच करितो, तरी तो शुद्ध अनुभववाद्यांच्या पंथांतील आहे ही गोष्ट लक्ष्यांत घेतां त्यानें त्या बाबतींत बरीच प्रगति केली आहे असें म्हटलें पाहिजे..... नुक्ताच रोमानिस नांवाचा एक फार होतकरू तरुण जीवशास्त्रज्ञ माझ्या नजरेस आला; तो मेडच्यूसी नामक सूक्ष्मजलजंतूंच्या ज्ञानतंतु व स्नायुविषयक हालचालींच्यासंबंधानें कांहीं फार महत्त्वाचीं व अत्यन्त बोधप्रद अशीं निरीक्षणें करीत आहे. तो म्हणतो, त्या निरीक्षणांत ज्या गोष्टी माझ्या नजरेस आल्या आहेत त्यांवरून

' मानसशास्त्रा ' च्या पांचव्या भागांत ज्ञानतंतुविषयक जनितीच्या संबंधानें प्रतिपादिलेले विचार विलक्षण रीतीनें बरोबर ठरतात. "

" वेस्टमिन्स्टर आबे " या देवळांत टिंडालचें लग्न लवकरच व्हावयाचें होतें त्या गोष्टीची खबर स्पेन्सर यास देतांना तो त्यास लिहितो:—" तूं तेथें यावें हें मला फार आवडेल, पण मला माहीत नाहीं अशी कांहीं शका तुझ्या मनांत कदाचित् येईल. म्हणून तूं मला (त्या प्रसंगीं) सोडिलेंस तरी मी रागावणार नाहीं. " स्पेन्सरला त्या प्रसंगीं तेथें हजर नसणें जरी कसेंसेंच वाटलें तरी तो गेला नाहींच. मात्र त्यासंबंधानें त्यानें त्यास ता० २४ फेब्रुवारी रोजीं असें लिहिलें:—" रजिस्ट्रारकडून तुझें लग्न लागलें असतें तर बरें झालें असतें. तसें होतें तर मला सर्वांशीं अत्यन्त आनंद झाला असता, आणि त्यासाठीं मी लांबूनहि तुझ्या बरोबर असण्यासाठीं आलों असतों. पण हल्लींच्या स्थितींत (देवळांत तुझें लग्न व्हावयाचें असतां) काय बरें म्हणूं ?—हजर असण्याकडे माझें मन वळविण्याचा मीं वरचेवर यत्न करून पाहिला, पण फुकट. मी प्रार्थना करितों कीं याबद्दल मला क्षमा कर. मी जरी लग्नाला हजर नसलों तरी, विवाहाचे सर्व परिणाम तुला सुखकर होवोत असें मीं हजर असतों तर जितक्या मनःपूर्वक इच्छिलें असतें, तितक्याच मनःपूर्वक इच्छितों. "

१८७६ च्या फेब्रुवारींत त्याला जेव्हां रोमन आकाडेमीचा ' फारेन कॉरेस्पाँडेंट ' म्हणून निवडलें तेव्हां त्या मंडळाच्या कौन्सिलला त्यानें ता० ११ मार्च १८७६ रोजीं असें लिहिलें:— रोमन आकाडेमीचा ' फारेन मेंबर ' निवडल्याबद्दलचें पत्र आणि सनद कांहीं दिवसांपूर्वी मला पोहोंचली. ग्यालिलिओच्या देशबाधवांनीं आणि त्याच्या वेळेपासून अस्तित्वांत असलेल्या विद्वत्सभेच्या सभासदांनीं अशा रीतीनें आपली मान्यता दाखवावी, ह्या-

पासून मला फार संतोष वाटतो, आणि ह्या संतोषाचें मोठें कारण हें आहे कीं, माझीं म्हणून जीं मतें लोक समजतात त्यांजकडे लोकांचें लक्ष्य जात आहे हें त्यावरून दिसतें, हें सांगावयास नकोच.

ह्या अव्यक्तिविषयक समाधानाबरोबर मला एक प्रकारचें व्यक्तिविषयक समाधानहि वाटतें; इतक्या निवडक मंडळानें दिलेल्या आपल्या पसंतीच्या चिन्हापासून मला आनंद न होणें अशक्य आहे. असा आनंद मला झाल्याचें एथें मुद्दाम नमूद करणें जास्तच इष्ट ह्यामुळें झालें आहे कीं, आतांपर्यंत अशा प्रकारची कोणतीच शास्त्रिय पदवी किंवा मानाचें चिन्ह मीं स्वीकारिलेलें नाहीं हेंहि मला सांगावयाचें आहे. माझी अशी समजूत आहे कीं, कार्यदर्शक नसणाऱ्या सर्व पदव्या अन्तीं नुकसानकारक होतात; म्हणजे, त्यांचे जे परिणाम प्रत्यक्षरीत्या फायदेशीर म्हणून दिसतात ते, नुकसानकारक अशा अप्रत्यक्ष परिणामांनीं नुसते बुजून जातात इतकेंच नाहीं, तर त्यांत ते अगदीं बुडूनहि जातात. ज्या कारणांमुळें माझें असें मत बनलें आहे, आणि इंग्लंदांत शास्त्रीय पदव्या नको म्हणण्यास मला भाग पडलें आहे, तीं एथें पूर्णपणें सांगूं म्हटल्यास फारच जागा अडेल, तथापि रॉयल सोसायटीचा सभासद होण्याकरितां उमेदवार म्हणून पुढें येण्याबद्दल मला आमंत्रण आलें तेव्हां त्या सभेच्या अध्यक्षास लिहिलेल्या पत्राचा उतारा एथें देतों. (ते पत्र आधींच आलेलें आहे.) रॉयल सोसायटीचा फेलो ह्या पदवीसंबंधानेंच नव्हे, तर इतर पदव्यांच्या संबंधानेंहि असा मार्ग स्वीकारण्याला ज्या दृढ समजुतीनें मला लाविलें ती अद्यापि कायम आहे, आणि म्हणून तिला अनुसरून वागणें मला भाग आहे. म्हणून रॉयल आकाडेमीनें ही पदवी देऊन मला सन्मानिलें आहे ती माझ्या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर न दिसल्यास तुम्हीं हें लक्ष्यांत ठेवावें कीं त्याबरोबर इतर पदव्याहि त्यावर दिसत नाहींत. "

रॉयल आकाडेमीनें त्यांना देतां येण्यासारखी सर्वांत मोठी पदवी आपल्यास दिली नाहीं अशा समजुतीनें पुढल्या वर्षीं (ता० २४ सपटंबर १८७७ रोजीं) त्यानें सेक्रेटरीस आपलें नांव काढून टाकण्यासाठीं लिहिलें. तेव्हां त्या सभेच्या अध्यक्षानें त्याचा गैरसमज दूर केला, आणि योग्य संधि आल्याबरोबर त्याला वरच्या वर्गांत घातलें.

१८७४ सालीं एडिंबरो युनिव्हार्सिटीचा लॉर्ड रेक्टर होण्याविषयीं त्यास आमंत्रण आलें होतें, आणि १८७५ सालीं आबर्डीन युनिव्हर्सिटीचा होण्याविषयीं आलें होतें. ह्या दोन्ही पदव्या जरी त्यानें नाकारिल्या, तरी सेंट आण्ड्र्यूसच्या युनिव्हर्सिटीच्या संबंधानें त्याचें उत्तर जितकें निक्षून होतें, तितकें ह्यासंबंधानें नव्हतें. उदाहरणार्थ, एडिंबरो एथील विनंतीस त्यानें असें उत्तर दिलें होतें:—"ह्यापुढें, संभव दिसतो त्याप्रमाणें, हल्लींपेक्षां ज्यास्त काम शिरावर घेण्याची जर मला ताकद आली, तर पुष्कळ विद्यार्थ्यांनीं तशी इच्छा दर्शविल्यास, रेक्टरच्या जाग्याला उमेदवार म्हणून पुढें येण्यास कदाचित् मी कबूल होईन, आणि निवडिला गेल्यास, शिक्षणविषयक सुधारणा करण्याच्या कामीं होईल तें करण्याची संधि आनंदानें स्वीकारीन."

आबर्डीन एथील कमिटीला त्यानें दिलेलें उत्तर एका दृष्टीनें, ह्याहून उत्तेजनकारक होतें. तें असें:—"तुमच्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देणें, आणि तुमच्या विद्यार्थीबंधूंचें गर्भित निमंत्रण स्वीकारणें मला फार आवडलें असतें. रेक्टरच्या प्रारंभींच्या भाषणाला योग्य अशीं माझीं कांहीं मतें आहेत, व तीं प्रतिपादण्याची संधि मला मिळाल्यास आनंदच होईल. तथापि तो मोह मला टाळणें भाग आहे."

रॉयल इन्स्टिटयूशन ह्या सभेपुढें व्याख्यान देण्यास १८७६ च्या आक्टोबरांत त्यास पुनः विनंति केली, तेव्हां त्यानें असें उत्तर

दिलें:—" वर्षें जसजशीं ज्यास्त होतात तसतसें, जीवित आंखूड आहे आणि तत्त्वज्ञान दीर्घ आहे, असें मला ज्यास्त ज्यास्त वाटत आहे....हें कारण नसतें तर तुमची सूचना मीं फार खुशीनें मान्य केली असती, आणि मी जें नाहीं म्हणत आहे तें, माझा वेळ व ताकद ह्यांचा अत्यन्त बेतानें खर्च करणें मला फार आवश्यक आहे म्हणूनच म्हणत आहें, असें समजा."

विधियुक्त समारंभांची त्याला मुळींच आवड नसे. त्यांपैकीं कांहींचा त्याला अपरिहार्य तिटकाराच असे; तो तिटकारा लहानपणीं बापाच्या उदाहरणानें व उपदेशानें पोशिला गेला होता, आणि मोठ्या वयांत मुद्दामच तो त्यानें कायम ठेविला होता. १८७४ च्या मे महिन्यांत परराष्ट्रीय प्रधानाकडे एका फराळपार्टीस त्यास आमंत्रण आलें, तेथें रशियाचा बादशहा यावयाचा होता; पण तो गेला नाहीं याचें कारण तेथें दरबारी पोषाक करून जाणें भाग होतें, आणि त्यास तो मुळींच कबूल नव्हता. तेव्हां तो पोषाक न चढवतां तूं आलास तरी चालेल म्हणून त्या प्रधानाच्या बायकोनें (कौंटेस डार्बी हिनें) त्यास लिहिलें. तेव्हां तो फारच बुचकळ्यांत पडला; कारण अशा प्रकारची परवानगी आपल्यास मिळेल हें त्याच्या स्वप्नींहि नव्हतें. तेव्हां त्यानें तीस असें लिहिलें:— " लोकांच्या लक्ष्यांत फार ढोबळ रीतीनें येईल अशा प्रकारें जनरूढी मोडण्याची मला संवय नसल्यामुळें अशा प्रसंगीं अशा ठळक रीतीनें आपण निराळाच पोषाक करून येणें हें लोकांसारखा पोषाक करून येण्यापेक्षांहि मला ज्यास्त कठीण वाटेल. शिवाय, मी असें कां केलें ह्याबद्दल भलतेच हेतू माझ्या माथीं मारून लोक मजवर मला न आवडणाऱ्या टीका करूं लागतील. अशा अडचणींत मी असल्यामुळें तुम्ही कृपा करून अशी परवानगी दिली असतांहि तिचा उपयोग मला करतां न आल्यास मला विक्षिप्त समजूं नका."

ह्या वर्षींच्या उन्हाळ्यांत तो बाहेर (स्काटलंदांत) गेला असतां ता० २६ जुलई रोजीं रात्रीं दहा वाजतां सूर्यप्रकाशांत वाचल्याचें लिहितो. त्याचे ते दिवस आगस्ट अखेरपावेतों पायीं व गाडींतून फिरण्यांत, बोलण्यांत, लॉनटेनिस खेळण्यांत आणि " गृहसंस्था " ह्या समाजशास्त्राच्या भागाचीं टिपणें करण्यांत आनंदानें गेले. सामन मासे मात्र त्याला मिळावे तसे मिळाले नाहींत.

कॉन्टेम्पोररी रिव्ह्यूच्या आगस्ट—सप्टंबर महिन्यांच्या अंकांत डा० ईलाम नामक धर्माधिकाऱ्यानें हक्स्ले, टिंडाल व स्पेन्सर यांजवर भयंकर व अगदीं निराधार असे हल्ले केले. म्हणून त्याची फजिती करण्यासाठीं त्यानें एक पत्र तयार केलें, व तें तो त्याच रिव्ह्यूंत छापविणार होता; पण टिंडाल व ल्युइस त्यास नको म्हणाले, तेव्हां त्यानें तें छापिलें नाहीं. पण त्याचें प्रूफ डा० ईलामला दाखविण्यांत आलें, तेव्हां त्यानें त्यांची क्षमा मागितली.

बिशप एलिकॉट हा धर्माधिकारी याहून अगदीं भिन्न होता. त्याची व याची नव्हंबरमध्यें पॉटरसाहेबाकडे गांठ पडली, व त्याच्याबद्दल याचें फार चांगलें मत झालें. त्यासंबंधानें ता० २५ नव्हंबर १८७६ रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—

" त्याचें माझें बोलणें तूं ऐकतास तर तुला मजा वाटली असती. मी नंतर म्हणत होतों तसा हल्लींच्या प्रगतीवर धर्ममतांचा तो एक उत्तम मासला आहे; एखाद्या लांकडी वस्तूला आंतून वाळवी लागून तिनें ती पोखरून अगदीं पोकळ करून टाकावी, आणि बाहेरचा पातळ झालेला सांगाडा मात्र कायम रहावा, तशी त्याची (प्रचलित धर्मविषयक) स्थिति आहे असें त्याच्याकडे पाहून मला वाटतें. "

समाजशास्त्राचा पहिला खंड याच्या अगोदरच पुरा झाला असता, पण तो चालू असतां त्याच्या लक्ष्यांत असें आलें कीं, आपण त्यांत ' गृहसंबंध ' हा भाग न घालण्यांत मोठी चूक केली.

१८७६ च्या उन्हाळ्यांत तो बाहेर गेला त्याच्या अगोदरपासून तो हा भाग तयार करीत होता, पण तो जसा तयार करीत चालला तसा तो वाढतच चालला, आणि नवंबर महिना आला तरी पुरा होईना. म्हणून काय करावें हें त्यास सुचेना. त्या विषयावर त्यानें मनांत आणिलेलें सर्व प्रतिपादण्यास आणखी चार प्रकरणें घालणें जरूर होतें. तरी त्यानें दिजंबरमध्यें ह्या चार प्रकरणांविनाच तो भाग प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. ह्या वेळीं त्याच्या प्रकृतीविषयीं इंग्लंद व अमेरिका ह्या दोन्ही ठिकाणीं अतिशयोक्तिमय बातम्या पसरल्या होत्या, आणि त्यामुळें त्याला सहानुभूतिपर पत्रेंहि पुष्कळ यावयास लागलीं होतीं. त्यांपैकीं एक प्रो० बेन यांजकडून होतें, आणि तोच पुढें लवकरच वारल्याची बातमी पसरली; पण ती त्याच नांवाच्या एका गृहस्थाबद्दल होती. त्या गोष्टीस उद्धेखून यूमन्स त्यास ता० ९ फेब्रुवारी १८७७ रोजीं लिहितो:—" बेनच्या मरणाची वार्ता ऐकून आमच्यांत मोठीच चळवळ उडाली होती. ती बातमी तारेनें आमच्याकडे आली होती, आणि आबर्डीनच्या आलेक्झांडर बेनखेरीज सायक्लोपीडियांत (सर्वसंग्रहांत) दुसऱ्या कोणाचें नांव नसल्यामुळें, त्याचे निधनलेख आमच्याकडील सर्व वर्तमानपत्रांत दुसऱ्या दिवशीं आले. सहजच आह्मां सर्वांस त्याच्याबद्दल फार वाईट वाटलें, आणि माझ्या मासिकासाठीं (त्याच्या निधनावर) एक लांबलचक अग्रलेख मीं तयार केला, आणि तो कायम ठशांनीं छापण्याच्या बेतांत होतों; इतक्यांत तो तो नव्हे असें आह्मांस समजलें. इतकें उत्कृष्ट काम मला फुकट टाकावें लागलें आणि आयत्या वेळेस दुसरें कांहीं तयार करण्याकरितां मेंदू सडकावा लागला, याचा मला अत्यन्त खेद वाटतो, असें मीं बेन यास लिहिलें ! "

' माइंड ' (मन) नामक पत्रांत कोणीं असें गर्भितरीत्या प्र-

तिपादिलें होतें कीं, स्पेन्सरनें आपल्या पिशाचक्लप्तींत टायलर-साहेबाचीं मतें उचललीं आहेत आणि तसें केल्याचा उल्लेखहि केलेला नाहीं. म्हणून आपण त्याचीं मतें घेतलेलीं नाहींत हें दाखविण्याकरितां कांहीं पृष्ठें मजकूर स्पेन्सरनें त्या पत्राच्या संपादकाकडे पाठविला व तो पुढच्या अंकांत घालण्यास त्यास लिहिलें. हा पत्रव्यवहार जूनच्या पंधरावीपर्यंत चालला, आणि त्यावरून स्पेन्सरचीं मतें स्वतंत्र आहेत अशी संपादकाची (प्रो० क्रूम रॉबर्टसन याची) खात्री झाली; पण टायलरची मात्र झाली नाहीं.

मे महिन्याच्या अखेरीस वर सांगितलेलीं समाजशास्त्राच्या पहिल्या खंडाचीं जादा प्रकरणें प्रसिद्ध झालीं. तेव्हां वार्षिक सुटीचे दिवस येण्याच्या अगोदरचे कांहीं आठवडे कसे घालवावे ह्या विचारांत तो पडला. तितक्यांत आर्डटॉर्निश :एथें येण्याविषयीं मिसेस स्मिथचें त्यास पत्र आलें, तेव्हां त्यास समाधान वाटलें. तेथें तो आगस्टच्या पंधरावीपासून सपटंबरच्या पंधरावीपर्यंत राहिला, आणि त्यापासून त्यास सुख झालें, व त्याची प्रकृतिहि सुधारली. त्यासंबंधानें ता० १७ सपटंबर १८७७ रोजीं तो मिसेस स्मिथ हीस लिहितोः—" गतवर्षाच्या ह्या वेळापासून मला शक्ति वाटत होती त्याहून हल्लीं ज्यास्त वाटते. ह्याचें कारण मुख्यत्वेंकरून आर्डटॉर्निश एथें राहणें आणि तेथील घरांतील व घराबाहेरील करमणुकी हें होय असें मला वाटतें. ह्या सगळ्याबद्दल मला तुझे आभार मानिले पाहिजेत. माझ्यामागें माझ्या कारकीर्दीच्या हकीकतींचे जे लेख मी ठेवीन त्यांचा जर कोणीं उपयोग केला, तर त्यास बहुधा स्पष्ट पुरावा सांपडेल कीं माझ्या जीवितांतील अत्यन्त सुखाचे बहुतेक दिवस आर्डटॉर्निश एथें गेले आहेत. आणि मी तुझा जो ऋणी आहें तो केवळ सुख व आरोग्य ह्यासंबंधानेंच नाहीं, तर त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या काम करण्याच्या शक्तीबद्दलहि

आहे, असें मला वाटतें. आपलीं मुलें वाढवावीं आणि त्यांची संसारांत सुखकर यात्रा होईल अशी त्यांची तयारी करून द्यावी, हाच अखेरीस आईबापांचा मुख्य उद्देश होऊन बसतो. तद्वतच, ग्रंथकार जसजसा वयस्क होत जाईल, तसा आपले लेखनविषयक उद्देश पुरे करणें—म्हणजे आपल्या मेंदूच्या संततीला वाढविणें—हाच त्याच्या चिंतेचा बहुतेक मुख्य विषय होऊन बसतो. ”

‘ राजकीय संस्था ’ ह्या भागाला लागणारी सामग्री अद्यापि तयार नसल्यामुळें त्यानें ‘ विधिविषयक संस्था ’ हाच भाग अगोदर तयार करण्याचें ठरविलें, आणि त्याची प्रकरणें ‘ फार्टनाइटली रिव्ह्यू ’त तो प्रसिद्ध करूं लागला. तीं प्रकरणें युनैटेडस्टेट्स् , फ्रान्स, जर्मनी, इटाली, रशिया व हंगारी इतक्या ठिकाणीं एकदम प्रसिद्ध करण्याची व्यवस्था ह्या वर्षाच्या (१८७७ च्या) अखेरीस चालली होती. तें वर्ष संपलें तेव्हां त्याचें पुढचें काम अव्याहत चालेल असा पूर्ण रंग दिसत होता. पण लवकरच पुनः सर्व तंत्र बिघडलें. कसें तें पुढच्या प्रकरणांत दिसून येईल.

प्रकरण पंधरावें

नीतीची लौकिक पायावर उभारणी

१८७८ सालापासून दिनचर्या लिहून ठेवण्याचा त्यानें पुन्हां प्रयत्न केला. तिच्यांत ता० १ जानेवारी १८७८ चें टिपण असें आहे:—“ ‘ नजराणे ’. काम. क्लब. हक्स्लेकडे जेवलों. (इतर-पाव्हणे) मोर्ले, वालर, मि० स्माले. ” ‘ नजराणे ’ हें “ विधि-विषयक संस्था ” पैकीं प्रकरण असून त्याची नोंद ता० ५ व ६

खेरीजकरून पहिले आठ दिवस सारखी आढळते; ते दोन दिवस तो लिहिलेलें तपाशीत होता. ता० ९ ला अशी नोंद आहे:— " प्रकृति नादुरुस्त–सर्व सकाळ बिछान्यावर. " क्लोरोफार्म घेतला असतांची जाणीव " याची प्रस्तावना आणि " नीतीचीं तत्त्वें " याचीं टिपणें सांगितलीं. " क्रमानें " नीतीचीं तत्त्वें " हा विषय येईल तेव्हां हातीं घेऊं म्हटल्यास कदाचित् तो ग्रंथ मुळींच लिहिला जाणार नाहीं ह्या भीतीनें तो आतां त्यानें हातीं घेतला हें आत्मचरितांत सांगितलेंच आहे.

आपल्या सगळ्या जन्मांत बहुतेक अत्यन्त त्रासदायक असा काळ ता० १३ जानेवारी १८७८ रोजीं सुरू झाला असें तो म्हणतो. " ता० १३—त्रासदायक रात्र—वेदना आणि निद्राभाव. १ वाजतां उठून सगळा दिवस घरांत. संध्याकाळीं अंमळ बरा. मि० ब्रूस सकाळीं आला व औषधयोजना करता झाला. " " ता० १४ त्रासदायक रात्र—झोंप मुळींच नाहीं, पण वेदना जरा कमी. सगळा दिवस घरांत. क्षुधाभाव. मांडींतील वेदना वगैरे बऱ्याच कमी. " " ता० १५—आणखी एक भयंकर रात्र. मध्यरात्रीं शेकोटीजवळ खुर्चीवर बसलों असतां मात्र झोंप. " " ता० १६ घाणेरडी रात्र. क्लोरल (झोंपेचें औषध) घेतलें. फार अशक्त. सगळा दिवस बिछान्यावर. पूर्ण निद्राभाव. भूक बहुतेक तशीच. " " ता० १७ आणखी एक भयाण रात्र. तथापि अमळ बरा. न्याहारीनंतर खालच्या खोलींत कांहीं प्रुफें वाचलेलीं ऐकून तपासिलीं. वाल्श पाहण्यास आला. भूक अमळ बरी. लार्ड ए. रसेल भेटावयास आला. " " ता० १८—क्विनिन घेतल्यानंतर पुनः वाईट रात्र. प्रुफें वाचलेलीं ऐकून तपासणें. थोडीशी क्षुधा. अद्यापि ताप फार. " " ता० १९ आणखी एक भिकार रात्र. प्रुफें पुरीं केलीं. वाल्श पुनः आला. क्विनिन सोडिलें, आणि पोटेशम ब्रोमाइड घेतलें. ल्युइस भेटावयास

आला. " " ता० २०—अमळ बरी रात्र. थोडेसें तपासण्याचें काम. ल्युइस भेटावयास आला. उष्णतामान अद्यापि फाजील. " " ता० २१—पूर्वींपेक्षांहि अधिक बरी रात्र. तपासणी. तिसऱ्या प्रकरणाचीं प्रुफें भाषान्तरकारांकडे पाठविलीं. ल्युइस व त्याची बायको भेटावयास आलीं, व एक तास राहिलीं. ताप उतरता." " ता० २२ फार चांगली रात्र. चोहोंकडून सुधारणा. पत्रें आणि 'आत्मचरित' सांगणें. ताप उतरता. " " ता० २३—रात्र इतकी चांगली नाहीं. उष्णतामान बहुतेक असावें तितकें. भूक बरी. साडेचारला व्हिक्टोरिया (स्टेशन) सोडिलें—ब्रायटनला साडेपांचला पोंहोचलों. प्रकृति न बिघडवतां ब्रिस्टल हाटेलांत पोंहोचलों. क्लारिक इथर (झोंपेचें औषध) घेतल्यानें झोंप बरीशी आली. "

तो ब्रायटन एथें एका आठवड्याहून ज्यास्त दिवस राहिला, व त्यास प्रत्येक दिवशीं सुधारणा वाटत गेली. परत आल्यावर तो एकदम नाचनाटकांस, जेवणाखाणास, वगैरे बाहेर जाऊं लागला. हा त्याचा पुष्कळ दिवसांचा प्रकृति सुधारण्याचा आवडता उपाय होता, आणि त्याचा आतां चांगला अनुभव घेऊन पाहण्याचा त्यानें निश्चय केला. मार्चांतील दिनचर्येंत पुढील नोंदीं आढळतात:— " मि० ग्लाडस्टन, सर एच्. टॉम्प्सन व मिसेस स्मिथ ह्यांजकडे भेटावयास गेलों. "—" हुथकडे फ्यान्सी नाच (जुन्या प्रसिद्ध स्त्रीपुरुषांचे वगैरे पोषाक करून ज्यांत स्त्रीपुरुषें नाचतात.) साधा पोषाक करून पहावयास गेलों. " " गेइटी थिएटर. " " ग्लोबथिएटर. " " एक्स् क्लबाचें भोजन. " इ० इ०. एप्रिलमध्यें त्याचा असाच क्रम सुरू होता. मे महिन्यांत तो पारीस एथें लॉटबरोबर गेला. तेथील प्रकाशक बेलेरी यास भेटला. त्यानें त्यास मेजवानी दिली. त्या वेळीं १६ प्रोफेसर, संपादक, व सभासद (फ्रेंच पार्लमेंताचे) त्यानें त्याजबरोबर जेवावयास बोलाविले होते.

' विधिविषयक सरकार ' ह्यावरील लेखांकडे जावें तसें लोकांचें लक्ष जात नाहींसें पाहून त्यानें ते फॉर्टनाइटलींत छापण्याचें बंद केलें. त्याचें शेवटचें प्रकरण त्यानें सुरू केलें होतें पण " नीतिशास्त्राचे आधारस्तंभ " हा भाग हातीं घेण्याकरितां त्यानें तें एकीकडे सारिलें, आणि त्या शास्त्राचीं कित्येक प्रकरणें केन्सिग्टनबागांत बसून रेखाटलीं त्यासंबंधानें ता० ९ जुलई रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—" हीं प्रकरणें फार समाधानकारक रीतीनें बनून येत आहेत; आणि तीं प्रसिद्ध केलीं म्हणजे तें एक मोठें काम होणार आहे, आणि, मला वाटतें, आपल्या सामान्य उद्देशसिद्धीला उपयोगी पडणार आहे, कारण तेणेंकरून त्याचे (आपल्या तत्त्वमीमांसेचे) नैतिक संबंध दिसून येतील, आणि धर्माभिमानी त्याच्याविरुद्ध जीं निषेधकारक मतें नेहमीं प्रदर्शित करीत असतात त्यांचा चांगलाच समाचार घेतल्यासारखा होईल. पावसाळ्यांत लंदनास परत आल्यानंतर लवकरच मी तो ग्रंथ लिहिण्यास सुरुवात करीन म्हणतों. "

त्याचा मित्र मि० स्मिथ १८७१ सालीं मेला होता, आणि आतां ह्या महिन्यांत मिसेस स्मिथ मरण पावली. तेव्हां त्यास फार दुःख झालें. त्यासंबंधानें तो तिचा मुलगा व्हालेन्टाइन स्मिथ यास ता० १८ जुलई (१८७८) रोजीं लिहितोः—" तुझ्या व एकंदर कुटुंबाच्या दुःखाचा मी पूर्ण वांटेकरी आहें, कारण तिच्या मरणाबद्दल तुम्हांला जसें वाईट वाटत असेल तसेंच मलाहि वाटत आहे. तिच्या अपरिमित मायेच्या कृतींमुळें मला माझ्या अत्यन्त सुखाच्या दिवसांच्या स्मरणाबरोबर तिचेंहि स्मरण होत असतें; आणि ती आतां ह्या जगांतून गेल्यापासून तें (हें जग) मला पूर्वींहून दीन दिसूं लागलें आहे. तुला माहीतच आहे कीं मी अतिशयोक्ति करीत नसतों. म्हणून माझ्या एकंदर अनुभवांत तुझ्या

आईच्या इतक्या गोड स्वभावाचें आणि सर्वच प्रकारें इतकें वाखाणण्यासारखें (माणूस) दुसरें कोणीहि मला भेटलें नाहीं असें जें मी म्हणतों, तें शब्दशः खरें आहे म्हणून समज. तिच्यासारखीं पुष्कळ माणसें असतीं तर ' मानवपूजा ' हा जो कॉम्टेचा धर्म तो कांहीं अंशीं योग्य ठरला असता. "

जुलईच्या शेवटच्या आठवड्यांत लंदनांतून बाहेर पडून त्यानें कांहीं दिवस लिव्हरपूल एथें होल्टसाहेबाकडे घालविले, आणि नंतर तो इन्व्हेरोराम एथें गेला. मासे मिळण्यास अयोग्य अशी शुष्क हवा असल्यामुळें त्यानें आगस्टचे पहिले अकरा दिवस भटकण्यांत, तपासण्यांत, आणि बेनचा " मानसिक व नैतिक शास्त्र " हा ग्रंथ वाचण्यांत घालविले. पुढें तीन दिवस त्याला चांगले मासे सांपडले, आणि त्यासंबंधानें तो आपल्या दिनचर्येंत पोरासारखें (म्हणजे आपल्यास मिळाले, इतरांस नाहीं अशासारखें) स्वसमाधान व्यक्त करितो. "

तो ता० २३ आगस्टलाच लंदनास परत आला; म्हणजे, बेत केल्याच्या अगोदर दोन आठवडे तरी आला. परत येत असतां वाटेंत कार्लाइल एथून तो डा० यूमन्स यास लिहितो कीं, " माझी ही सुटी बरोबर गेली नाहीं. " त्या पत्राबरोबरच त्यानें " क्लोरोफार्म घेतला असतानाची जाणीव " ह्या निबंधाला जोडलेली प्रस्तावनाहि त्याजकडे पाठविली. त्या निबंधांत एका विश्वविद्यालयीन पदवीधरानें क्लोरोफार्म घेतलें असतांनाचे आपले अनुभव नमूद केले होते, आणि त्यांवरून " मानसशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या कांहीं मतांचा चांगला पडताळा जमत होता.

नीतिशास्त्रावरील ग्रंथाच्या रेखाटणीला आकार देत असतां त्यानें फ्रान्सच्या दक्षिणभागीं कांहीं दिवस राहण्याचा बेत केला, आणि तिकडे येण्याकरितां डा० यूमन्स यास ता० २७ सपटंबर

१८७८ रोजीं पुढील पत्र लिहिलें:—“ मी आपल्याबरोबर तपासण्याकरितां बराच लिहिलेला मजकूर घेणार आहें. तूं जर मजबरोबर येण्याचा आणि आनंदाच्या स्थळीं थोडासा वेळ रिकामटेकडेपणांत घालविण्याचा निश्चय केलास, तर एकंदरींत तूं वेळाच्या संबंधानें आपला फायदाच केल्यासारखें होईल. तूं म्हणतोस कीं, कामामुळें असें मला करतां येत नाहीं; पण हा तुझा मी शुद्ध वेडेपणा समजतों; कारण तुझ्यासारख्यांना काम सोडणें मात्र अशक्य वाटतें, पण कामाकरितां आयुरारोग्य ह्यांचा बळी देणें अशक्य वाटत नाहीं. ”

ता० ३० आक्टोबर रोजीं त्यास तो पुनः लिहितो:—“ मी बाहेर जाणार किंवा नाहीं हें पुष्कळ अंशीं तुझ्या उत्तरावर अवलंबून आहे.....सगळ्या जन्मांत एकदां तरी थोडीशी विश्रान्ति व विसावा घेण्याचा निश्चय कर. ही गोष्ट लांबणीवर टाकणें शहाणपणाचें होईल इतके तुझे आयुष्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. त्वां हें ध्यानांत आणावें कीं, तुला केवळ कामच करावयाचें नाहीं, तर जगावयाचेंहि आहे; आणि, तुझी माझी ओळख झाली तेव्हांपासून तूं कामाचा तेवढाच विचार करीत आला आहेस, आणि जगण्याचा कधींच केला नाहींस.....तूं आपल्या बहिणीला आपल्या बरोबर आणण्याची व्यवस्था करशील अशी मी आशा करितों. ”

तो फ्रान्सच्या दक्षिणभागीं यावयास निघण्याच्यापूर्वीं, त्याचा अत्यन्त जुना विद्वन्मित्र ल्युइस हा मरण पावला. त्याचा स्मशानविधि ता० ४ दिजंबर रोजीं झाला, त्यास तो हजर होता. त्याचा मित्र आक्टेव्हियस स्मिथ १८७१ सालीं मेला तेव्हां यापूर्वीं तो अशाच विधीस गेला होता. एरवीं तो अशा विधीस कधीं जात नसे.

स्पेन्सर व यूमन्स नाताळच्या अगोदर थोडे दिवस फ्रान्सला जावयास निघाले. तेथें ते पुष्कळ फिरले, आणि ता० १७ फेब्रु-

वारीस लंदनला परत आले. पुढें जून महिन्यांत ‘ नीतिशास्त्राचे आधारस्तभ ’ हा नीतिशास्त्राचा खंड प्रसिद्ध झाला.

ता० २० जून १८७९ रोजीं तो डा० यूमन्स यास लिहितोः— “ ‘ काय होईल तें होवो ’ अशा प्रकारचा मनाचा निष्काळजीपणा धरण्याची जर तूं खटपट करशील, तर तुझें त्यापासून फार हित होईल, आणि त्यापासून सरतेशेवटीं तुझ्या हातून ज्यास्त काम होईल. मी आतां नेहमा आवरण्यास तुझ्या समीप नसल्यामुळें तूं पुनः आपले खोटे उद्योग सुरू केले आहेस..... पण तुला बोलून कांहीं उपयोग दिसत नाहीं. ”

डा० यूमन्सच्या मनांत वरील ग्रंथाच्या अमेरिकन आवृत्तीला एक प्रस्तावना लिहावयाची होती, अशासाठीं कीं, तशा रीतीनें त्याचा तेथील कापीराइट कायम रहावा. सरतेशेवटीं ती प्रस्तावना बरीच सुधारून व विस्तृत करून आगस्ट महिन्याच्या ‘ नॉर्थ अमेरिकन रिव्ह्यू’च्या अंकांत स्वतंत्र निबंधरूपानें त्यानें प्रसिद्ध केली. इंग्लंदांत ह्या ग्रंथाबद्दल खाजगी रीतीनें पुष्कळ अनुकूल अभिप्राय आले. उदाहरणार्थ, प्रसिद्ध इतिहासकार लेकी साहेब यानें ता० २० जून १८९७ रोजीं त्यास असें लिहिलें:—“ या ग्रंथाच्या पुढील भागांत निरनिराळ्या सद्गुणवर्गांचें किंवा समूहांचें स्वतंत्र विवेचन करण्याचा तुझा विचार आहे, आणि त्यांमध्यें त्यांची जनिति, त्यांचे परस्परांशीं संबंध, त्यांच्या मर्यादा, आणि त्यांच्या परस्परसापेक्ष किंमती ह्यांचें वर्णन करणार आहेस, असें प्रसिद्धिपत्रकावरून समजतें, व त्याबद्दल मला आनंद वाटतो. नीतिशास्त्रावरील बहुतेक पुस्तकें मला बहुतेकांशीं कुचकामाचीं वाटतात, कारण तीं त्या विषयाचा मूर्तस्वरूपानें करावा तितका विचार करीत नाहींत, आणि किती वरचेवर त्यांचा परस्परांशीं विरोध असतो, आणि जी परिस्थिति एक जातीच्या सद्गुणांना अनुकूल असते ती

किती वेळां दुसऱ्या जातीच्यांना प्रतिकूल असते, हें त्यांत दाखविलेलें नसतें. मला वाटतें, नैतिक गुणांचें उत्पादन, आणि नैतिक नमुन्यांचा इतिहास, म्हणजे, निरनिराळ्या काळच्या नैतिकध्येयांमध्यें निरनिराळ्या गुणांची एकमेकांच्या मानानें किती किंमत मानितात ह्याचा इतिहास, ह्यासंबंधानें अद्यापि पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. ''

त्याच संबंधानें मिसेस ल्युइस (जॉर्ज ईलियट) ता० २७ जून रोजीं त्यास लिहितेः—" तुझ्या नीतिशास्त्राचा हा भाग लिहिला जावा म्हणून तूं आपला ठरविलेला क्रम मोडिलास ह्याबद्दल मला आनंद वाटतो, पण त्याच्या कारणाबद्दल (तुझ्या प्रकृतीच्या बिघाडाबद्दल) मात्र वाटत नाहीं; आणि ह्यासंबंधानें आपली इच्छा काय आहे हें एकाद्यानें ग्रंथकारास सांगणें फाजीलपणाचें आहे असें जर मला वाटत नसतें, तर सामाजिकशास्त्र विषय पुरा करण्यापेक्षां ह्याच विषयाच्या पुढील भागांचें विवेचन ज्यास्त जरूरीचें समजून पुष्कळ लोक त्यास ज्यास्त किंमत कशी देतील ह्याबद्दल थोडेसें ज्यास्त म्हटलें असतें. तूं भविष्य केल्याप्रमाणें, अर्थात्, लोक तुझ्या म्हणण्याचा कांहीं अंशीं भलताच अर्थ समजतील, आणि करून दाखवितील. ही भवितव्यता अनिवार्य आहे. आपण किंमत मानावयाची ती एवढ्याचीच कीं, प्रचलित मतशोधन करणाऱ्या या ज्ञानाचे किंवा त्या कामीं उपयुक्त प्रोत्साहनाचे कांहीं कण कांहीं लोक गिळतील आणि पचवतील..... ''

ता० ३० जून १८७९ रोजीं लॉर्ड डार्बीनें त्यास असें लिहिलें:—" ज्याचे विचार आज पुष्कळ वर्षं समजण्यास व अनुसरण्यास मीं प्रयत्न केलेला आहे अशा ग्रंथकाराचा बुद्धिदृष्ट्या मी किती आभारी आहें हें स्वतः तुला कळविण्याची मला संधि आली ह्याबद्दल मला आनंद वाटतो. तुला शाबासकी देण्याची माझी

इच्छा नाहीं व योग्यताहि नाहीं; पण मला तुझें ऋण कबूल करण्याची परवानगी असूं दे. "

आल्फ्रेड रसेल वालेस ह्यानें ह्याचसंबंधानें ता० २ जुलई रोजीं त्यास असें लिहिलें:—" नीतीचें खरें स्वरूप अगदीं पूर्ण रीतीनें तूं सिद्ध करून दाखविल्याबद्दल मला तुझी वाखाणणी करणें जरूर आहे. ह्या प्रश्नाच्या त्या बाजूच्या संबंधानें माझें तुझ्याशीं निःसंशय मतैक्य आहे. पण उत्साहयुक्त अशी जी परोपकारबुद्धि माणसांमध्यें हल्लींच अस्तित्वांत आहे असें नाहीं, तर आजपर्यंतहि नेहमींच अस्तित्वांत असावीसें दिसतें, तिची वाढ उत्क्रान्तीच्या तूं दाखविलेल्या सरणीनें देखील झाली असेल किंवा नाहीं ह्याबद्दल मला शंका वाटते.....पण ह्या मुद्यासंबंधानें जर मला शंका वाटते, तर दुसऱ्या एका मुद्याच्या संबंधानें वाटत नाहीं; तो हा कीं, नीतिशास्त्राची तुझी सुंदर सरणीहि माणसांचें आवरण करूं शकणार नाहीं, किंवा दैनिक नीतिनियम-बाड नष्ट झाल्यानें उत्पन्न झालेलें खिंडार भरून काढूं शकणार नाहीं. "

आगस्टचा सर्व महिना व सपटंबरचा बराच भाग त्यानें नेहमींप्रमाणें स्काटलंदांत फिरण्यांत घालविला; त्या वेळीं तो इन्व्हेरोराम, आर्डटॉर्निश इत्यादि ठिकाणीं जाऊन आला. या वेळीं त्याची लॉर्ड व लेडी रे (मुंबईचे माजी गव्हर्नर) यांशीं गांठ पडली, आणि त्यांच्याशीं ह्याचा मेंदू थकेपर्यंत ह्याचे वादविवाद झाले.

तिकडून लंदनास परत आल्यावर त्यानें सपटंबरचे बाकीचे दिवस आणि सर्व आक्टोबर महिना ' विधिसंस्था ' या ग्रंथावर अखेरचा हात मारण्यांत, समाजशास्त्राच्या पुढच्या भागाची सामग्री व्यवस्थेनें लावण्यांत, आणि त्याचें पहिलें प्रकरण लिहिण्यांत घालविला.

ता० १ आक्टोबर १८७९ रोजीं तो डा० यूमन्स यास लिहितो:—" ' नीतीचे आधारस्तंभ ' यावरील ' नेशन ' पत्राचा

अभिप्राय मीं अगोदरच पाहिला आहे. त्याची सरणी जराशी भपकेदार आहे एवढाच काय तो त्यांत दोष आहे, बाकी एकंदरींत तो ठीक आहे.....बाकीचे अभिप्राय अगदीं समाधानकारक आलेले आहेत, आणि ' आर्थीनियम ' मधील अभिप्रायाप्रमाणेंच ' पेलमेल ग्याझेट ' व ' आकाडेमि ' यांतील अभिप्रायांत ग्रंथाची काळजीपूर्वक छाननी केली आहे. अभिप्रायकारांनीं स्वताचीं मतें न देतां ग्रंथकाराचीं मतें देण्याचा हा जो नवीन उपक्रम केला आहे, तो पाहून मला आश्चर्य वाटतें व समाधानहि वाटतें. ' माईंड ' नामक पत्रांत बेननें दिलेला अभिप्राय नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे, आणि तो अत्यन्त समाधानकारक आहे. तोहि तत्त्वतः छाननीच्या रूपाचाच आहे. आणि त्यांत थोडीशी टीका असून तिच्यांत महत्त्वाचा मतभेद प्रदर्शित केलेला नाहीं; आणि तो जुन्या उपयुक्ततावादाच्या अभिमान्याकडून, आणि नीतीचें सर्व क्षेत्र ज्यास परिचित झालेलें आहे अशा माणसाकडून आलेला आहे ही गोष्ट ध्यानांत घेतां, तो अगदीं माझ्या इच्छेनुरूप आहे. त्याच्यावर टीका करण्यांत पुष्कळ वेळां मीं जरासा कडकपणाच दाखविला आहे ह्या दृष्टीनें पाहतां, मला वाटतें, त्यांनीं ह्या बाबतींत माझ्याशीं फारच चांगलें वर्तन केलें आहे. "

ता० ६ आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—" स्पेन्सरच्या उत्क्रांन्तिसूत्रावर " ह्या नांवाचा मजवर हल्ला करणारा एक ग्रंथ आतांच माझ्या हातीं आला आहे. त्याची पोंच ग्रंथकारास जी मी पाठविली आहे तिजवरून त्याचें स्वरूप तुझ्या ध्यानांत येईल. ती अशी होती:—" मि० गुथ्रीनें आपल्या ग्रंथाची एक प्रत पाठविल्याबद्दल मि० स्पेन्सर त्याचा आभारी आहे. त्याच्या मताच्या विस्तृत अशा विपरीत प्रदर्शनाबद्दल तो त्याचा आभारी नाहीं. "

ता० ८ आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः —" तुझें

२६ तारखेचें पत्र मला नुक्तेंच पोहोंचलें, आणि त्यानंतर दोनतीन तासांनीं ' नार्थअमेरिकन रिव्ह्यू ' चा अंक पोहोंचला. दोन्हीबद्दल फार आभारी आहें. ' नीतिशास्त्राचे आधारस्तंभ ' ह्याच्या अमेरिकन आवृत्तीला जी प्रस्तावना तूं जोडणार होतास तिचा असा उपयोग केलेला पाहून मला आनंद वाटतो. एकंदरींत ह्या ठिकाणीं ती ज्यास्त योग्य दिसते, व ज्यास्त उपयुक्त होईल. मला वाटतें ती उत्तम साधली आहे..... भाग आणि सगळें ह्यांमधील संबंधाच्या माझ्या ग्रंथांतील पहिलें वाक्य प्रस्तावना लिहिण्यास आधार म्हणून तूं घेतलें आहेस तें फार उत्तम झालें, आणि संघटनात्मक तत्त्वमीमांसेच्या संबंधानें तें विशेषतः बरोबर आहे. “ आदितत्त्वां ” चा उत्क्रान्ति-क्लृप्ति-घटक जो विधिरूपी मुख्य भाग त्याकडे दुर्लक्ष्य करून, त्याचा निषेधरूपी (अज्ञेयमीमांसारूपी) भाग हाच त्याचा वैशेषिक भाग समजण्याचा जो विलक्षण व बहुतेक सार्वत्रिक कल दृष्टीस पडतो, त्यामुळें उत्पन्न झालेल्या भलत्याच लोकसमजाला तूं त्यांत उल्लेख केला आहेस त्याबद्दलहि मला आनंद वाटतो. माणसाच्या वैपरीत्याभिरुचीचें तो समज हें एक आश्चर्यकारक उदाहरण आहे. लोकांपुढें गोष्टी जर स्पष्टपणें मांडिल्या तर त्या त्यांच्या कशा तरी लक्ष्यांत येतील अशी कल्पना करण्याचा जो (माझ्या मनाचा) कल तो मनांतून कधींच जात नाहीं; पण (एकाद्या गोष्टीचें) सिद्धीकरण कितीहि निर्णायक असो, उदाहरणें कितीहि विपुल असोत, (त्यासंबंधानें) कांहीं तरी गैरसमज करून घ्यावयाचेच, ह्याचे दाखले वरचेवर येतात. ”

ता० १० आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—“ मी तुला चकित करील असें कांहीं पाठवीत आहें. धर्माधिकाऱ्यांच्या परिषदेंत माझें नांव ऐकून टाळ्या वाजल्या ह्याची कल्पना तुला होते काय ? प्रस्तुत काळाचीं असलीं चिन्हें पाहिल्यानंतर, आणखी

कशाची अपेक्षा आपल्यास करतां येणार नाहीं? अमेरिकेंतील धर्माधिकाऱ्यांच्या अंगावर प्रसंगीं फेंकण्यास ही गोष्ट तुझ्या उपयोगी पडेल. "

वर जी धर्माधिकाऱ्यांची परिषद म्हटली आहे ती स्वान्सी एथें भरली होती, आणि तिच्यांत ' अलीकडील शास्त्रीय शोधांपासून झालेले फायदे ' ह्या विषयावर एक निबंध कोणीं वाचिला होता. त्याच्यावर जो वादविवाद झाला त्यांत क्यांटर्बरी एथील कॉलेजाचा प्रोफेसर रेव्हरंड वॉटकिन्स हा उत्क्रांतिविषयक कल्पनेवर बोलत असतां असें म्हणाला कीं, " मला खात्री वाटते कीं, ह्या शतकाचा इतिहास भविष्यत् काळाच्या दृष्टीनें जेव्हां लिहिला जाईल तेव्हां त्याच्यांत हर्बर्ट स्पेन्सरचें नांव इंग्लिश वक्ते व तत्त्ववेत्ते ह्यांच्या अग्रीं पहिल्या रांगेंत घातलेलें आढळून येईल (टाळ्या). अन्तिम तत्त्वांच्या संबंधानें स्पेन्सरचा व माझा आकाशपाताळाइतका मतभेद आहे, पण त्यामुळेंच त्याच्या कामाचें महत्त्व, आणि तें करतांना त्यानें ठेविलेली तात्त्विक दृष्टि हीं कबूल करण्यास मी ज्यास्तच उत्सुक आहें. " बर्कनहेड एथील कालेजाचा रेव्हरंड प्रिन्सिपॉल यानें आपल्या प्रास्ताविक संभाषणाची एक प्रत त्याजकडे पाठविली, आणि लिहिलें कीं, " ह्या माझ्या संभाषणावरून, तुझ्या ग्रंथांची मी केवढी मोठी किंमत मानितों, आणि समाजशास्त्रविषयक माझ्या अध्ययनांत मी तुझा किती पुष्कळ ऋणी आहें हें त्यावरून तुला दिसून येईल.... माझ्या धर्माधिकारी बांधवांमध्यें उत्क्रान्तितत्त्वावर विश्वास बसलेला मी एकटाच नाहीं. " नानकन्फॉर्मिस्ट लोकांमध्येंहि मतौदार्याचे असेच दाखले स्पेन्सर यास दिसून आले, तरी त्यांच्यांत तशा औदार्याचा अभाव आहे असें त्यास फार वाटत असे.

ता० २९ आक्टोबर १८७९ रोजीं यूमन्स त्यास लिहितोः—

(धर्माधिकारी मंडळाच्या परिषदेबद्दल) " 'टाइम्स' मधील उतारा तूं पाठविलास त्याबद्दल मी तुझा आभारी आहें. आल्बनीमध्यें अमेरिकन धर्माधिकाऱ्यांची सभा भरली होती, आणि आपल्टनचा (स्पेन्सरच्या ग्रंथांच्या अमेरिकेंतील प्रकाशकाचा) खेडयांतील उपाध्या मि० वाइल्ड हा त्या परिषदेचा सेक्रेटरी होता. आपल्टननें हा उतारा आल्याबरोबर त्याजकडे टपालानें पाठवून दिला, आणि तो परिषदेच्या सर्व सभासदांनीं वाचून पाहिला तेव्हां त्यांस फार समाधान वाटलें. रेव्हरंड वाइल्ड तेथून परत आल्यावर म्हणाला, " आह्मी तुमच्याकडे (तुमच्या मतांकडे) जितक्या लवकर आमच्यानें येववेल तितक्या लवकर येत आहों. " सैन्यें कमी करण्याच्या चळवळीच्या संबंधानें तूं जें लिहिलेंस तिकडे माझें फार लक्ष वेधलें. मीं त्याजबद्दल बराच विचार केला आहे. पण त्या कामांत तूं पुढाकार घेणें खरोखरच फायदेशीर होईल काय? त्याचा भार तुजवरच बहुतेक पडणार नाहीं काय, आणि तुझ्या योग्य कामांतून उरवून ह्या कामीं लावण्यास एक औंस तरी शक्ति तुजपाशीं आहे काय? आणि तुझें योग्य काम तर असें आहे कीं, कोणत्याहि व्यवस्थित चळवळीपेक्षां सार्वजानिक मतांवर एकंदरींत त्याचा परिणाम ज्यास्त व विस्तृत प्रबल झालाच पाहिजे. "

प्रकरण सोळावें

ईजिप्त व अमेरिका

आजपर्यंत स्पेन्सरनें बाहेर देशीं जे अत्यन्त दूरचे प्रवास केले होते ते १८६८ त इटालीस व १८७८ त फ्रान्सच्या दक्षिणभागीं

केलेले होते. त्याचे युनैटेड स्टेट्स्‌मधील मित्र आज कित्येक वर्षें अमेरिकेस येण्याचा त्यास आग्रह करीत होते, परंतु कदाचित् कधीं तरी येईन असें म्हणून त्यानें तें ह्या किंवा त्या सबबीवर आजपर्यंत लांबणीवर टाकिलें होतें. आतां १८७९ च्या अखेरीस त्यानें एकदम अमेरिकेस नव्हे तर ईजिप्तला जाण्याचें ठरविलें. हें ऐकून आपले अमेरिकन मित्र खरोखर चकित होतील असें त्यास वाटलें आणि त्यासंबंधानें ता० ९ नवंबर रोजीं यूमन्स यास त्यानें असें लिहिलें:—" नाईल नदींतून सफर करीत जाणाऱ्या एका मंडळीबरोबर जाण्याचें मीं ठरविलें असून थोड्याच दिवसांत तिकडे जाण्यास निघणार आहें हें ऐकून तूं चकित होशील. माझा बेत ह्या सफरींत चार महिने घालविण्याचा आहे; तेव्हां मी बहुधा मार्चाच्या प्रारंभीं तिकडून परत येईन. मला कोणी लेखक बरोबर नेतां येत नसल्यामुळें माझें काम राहणार म्हणून मी कांहीं दिवस कांकू करीत होतों; कारण गेल्या हिवाळ्याप्रमाणें तपासण्यास मजपाशीं कांहीं लिहिलेलें शिलक नाहीं. तथापि मीं असें ठरविलें आहे कीं नाईल नदीवर सफर करीत असतां मी पुराणपद्धतींचा स्वीकार करावयाचा, आपणच लेखक बनावयाचें; कारण तेथें मला पुष्कळ फुरसत मिळेल असें मी ऐकतों. पुढच्या मंगळवारीं, निघण्याच्या पूर्वीं, " विधिविषयक संस्था " हा ग्रंथ पुरा होईल. "

ह्यासबंधानें त्याच्या दिनचर्येंतून पुढील उतारे देण्यासारखे आहेत. ता० ३०आक्टोबर—" केट पॉटर हिजकडे ईजिप्तला जाण्याच्या संबंधानें गेलों. " ता० ३१—" ईजिप्तला जाण्याचें ठरविलें." ता० ६ नवंबर—" मार्गारेटला मी आपल्याबरोबर ईजिप्तला न्यावें म्हणून मिसेस पॉटरचें पत्र. .. तिला नेली असतां जनरूढीविरुद्ध होईल कीं काय म्हणून विचारण्यासाठीं क्रिप्स (तिचा मेव्हणा) ह्याजकडे गेलों. त्यानें माझ्या शंकेची अगदीं भंबेरी केली. " ता०९—" 'विधि-

विषयक संस्थां'चीं प्रुफें तपासण्याचें काम पुरें केलें.....हक्स्ले, मिसेस ल्युइस, व बस्क यांना भेटावयास गेलों." ता० १०—"शेवटची तयारी. शेवटची प्रुफतपासणी." ता० १४—" बलोग्नाशहरीं पोहोंचलों." ता० १९—" नऊ वाजतां दर्शनीय स्थळें पहावयास निघालों..... विश्वाविद्यालय व चित्रप्रदर्शनमहाल पाहिले." ता० १६—" रविवार बलोग्ना येथील मोठ्या बुरुजावर चढलों. आणखी देवळें पाहिलीं." ता० २०—" अलेक्झांड्रिया एथें पोहोंचलें. वाटाड्या घेतला आणि मार्गारेटबरोबर बाजार पाहिला..... " ता० २१—" कायरो एथें येऊन पोहोंचलों. मधल्या फराळानंतर सुलतान हसन व महमद-अल्ली ह्यांच्या कबरा पाहिल्या. राजांचें थडगें आणि स्मशान." ता० २६—"पिरामिड नामक बुरूज पाहण्यास निघालों. त्याच्यावर चढलों नाहीं, पण त्यांच्या सभोंवतीं फिरलों. निरनिराळीं थडगीं निरीक्षिलीं. बराच चकित झालों. ध्यानांत ठेवण्यासारखा दिवस." ता० २७— " 'राजकीय घटना' ह्या प्रकरणाचीं टिपणें व्यवस्थेनें लाविलीं. तिसऱ्या प्रहरीं बार्नेटबरोबर जुन्या कायरोस गेलों. खेचरावर बसून परत." ता० २९—" बोट ठरविण्याकरितां मंडळीबरोबर गेलों. ' हेडविग ' नांवाची बोट ठरविली." ता० ३०—" परवानगी घेऊन दोन मशिदी पाहिल्या. आरब युनिव्हर्सिटी आणि बाजारहि पाहिला." ता० १ डिजंबर—" चांदण्यांत खलीपांचीं थडगीं पाहण्याकरितां खेचरावर बसून मंडळीबरोबर गेलों." ता० ६ —" शेजारच्या वाळवंटांत फिरलों. त्याच्यांतून पुष्कळ जळ वगैरे वाहून गेल्याचीं चिन्हें दिसत होतीं. नुक्तीं वादळें होऊन मोठाले ओढे वाहले होते."—ता० १२—"अकराच्या सुमारास निघालों." ता ० १३—" पायरी—बुरुज पाहिला." ता० २२—"बेनिहसनला पोंहोचलों. रात्रीं बोटींत बर्फ." ता० २३—" बोट चांगली चालली. पहाटेस चाराच्या सुमारास आसियट एथें पोंहोचलों. आगगाडी सांपडावी व परततां यावें म्ह-

णून सगळी रात्र बोट चालविली. " ता० २४—" बार्नेट व पॉटर यांना रामराम करून कायरो शहर आठ वाजतां सोडिलें. सवा-दहा वाजतां तीन गाड्या एका रेड्यानें रुळाबाहेर लोटिल्या. पुनः सवाबाराला निघालों. " हा जो त्यानें परतण्याचा एकाएकीं नि-श्चय केला त्याचें कारण त्याला आपली प्रकृति बिघडली असा भ्रम झाला हें होय. डा० ग्रांटला प्रकृति दाखविल्यावर व कायरो एथें दोन दिवस विश्रान्ति घेतल्यावर हा भ्रम नाहींसा झाला. (दिन-चर्या पुढें चालू) :मंडळीकडे परत जाण्याचें ठरविलें. " ता० २८—" सहा वाजतां निघालों. सात वाजतां आसियट एथें पोहों-चलों.....मी येत आहें अशी बार्नेटला तार केली. वारा सोसाट्याचा वहात होता, म्हणून बोट काढतां येईना. " ता० ६ जानेवारी —" दोन वाजतां लक्सॉर एथें पोंहोचलों. ' हेडविग ' बोटीवर चढलों. मित्र गैरहजर. कर्नाकच्या देवळास गेलों, आणि तेथें ति-सरा प्रहर घालविला. " ता० ८—" एस्नेचें देऊळ पाहिलें. " ता० ९—" एडफूचें देऊळ पाहिलें. " ता० ११—" असावन एथें पोंहोचलों. अर्धवट सुटलेला मनोरा पहावयास गेलों. " ता० १३ —"फिली एथें जाऊन पोहोंचलों. सभोवतीं फार रम्य देखावा. मजेचा दिवस. " ता० १४—" दिवस फिली व शेजारचा किनारा एथें घालविला. " ता० १६—"असावन व एलिफंटाइन बेट एथें फि-रावयास गेलों. लहान खेचरांशिवाय वाहन नव्हतें, व त्यांना फार श्रम देणें मला आवडत नव्हतें; म्हणून पायींच गेलों व आलों. " ता० १७—" मित्रमंडळी दुसऱ्या धबधब्याकडे निघाली, आणि मी कूकच्या आगबोटीवर चढलों. तेथें प्रोफेसर साइसची गांठ प-डली. " ता० २०—" वाळवंटांतून कांहीं चालून, कांहीं वहानावर ब-सून, असावनला गेलों. " ता० २१—" लक्सॉरला गेलों. चांदण्यां-तून कार्नाक पाहण्यास गेलों. " ता० २३—" आबायडॉस एथें

गेलों; प्रोफेसर साइस वाटाड्या असल्यामुळें ही सफर फार बोधप्रद झाली." (ता० २६ रोजीं तो कायरोस गेला, तेथें ता० २८ वीपर्यंत राहून आलेक्झांड्रिया एथें गेला, आणि ता० २९ ला बोटींत बसून निघून ता० ४ फेब्रुवारीस व्हेनिस एथें पोहोंचला. तेथून मिलान शहराला जाऊन ता० १० रोजीं पारीसला पोहोंचला.) ता० १२ "बेलीरीस भेटलों..... " ता० १२–" लंदनला पोहोंचलों, त्याचा मनापासून आनंद वाटला. माझ्या सगळ्या प्रवासांत इतका आनंद दुसऱ्या कशानें झाला नव्हता."

या प्रवासांतील एकंदर अनुभवांचें सार तो असें काढितो:— "या माझ्या वयांत मला ज्यास्त ज्यास्त असें वाटतें कीं, ह्या खटाटोपांत पडण्यांत एकंदरींत कांहीं अर्थ नाहीं. तथापि मला कांहीं फार उपयुक्त माहिती प्राप्त झाली, आणि माझ्या मनावर कांहीं फायदेशीर ठसे उमटले." नाईल नदींतून जात असतां 'राजकीय संस्था' ह्या खंडाचीं कांहीं प्रकरणें लिहिण्याच्या उद्देशानें जी सामग्री त्यानें बरोबर नेली होती ती तशीच परत आणिली. म्हणून तें काम एकदम सुरू करण्यास तो उत्सुक झाला होता. पण 'सुसंगतता' नांवाचा एक नवा भाग "मानसशास्त्रा"ला जोडण्याची जरूरी असल्यामुळें तो वरील काम हातीं घेण्यास कांकूं करूं लागला.

ता० २३ फेब्रुवारी १८८० रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—"मी 'इजिप्त' मध्यें गेलों असतां माझीं कामें फार उत्तम रीतीनें चाललीं होतीं..... 'राजकीय संस्था' ह्या ग्रंथाचें काम एकदम चालू करावें किंवा "मानसशास्त्राचीं तत्त्वें" ह्यास आणखी एक भाग जोडावा ह्याबद्दल सध्या मी अनिश्चितस्थितींत आहें..... कदाचित् मी "राजकीय संस्थां"चीं दोनतीन प्रकरणें प्रथम लिहीन, कारण त्यांच्याबद्दल मनांत मी बरीच रेखाटणी करून ठेविली अ-

सल्यामुळें तें काम लांबणीवर टाकिल्यास पुढें तशीं वठणार नाहींत. म्हणून तीं प्रथम लिहून, मग ' मानसशास्त्रा 'लाहि भर घालीन. ”

डा० यूमन्सचें असें ठाम मत पडलें कीं, यानें ' मानसशास्त्रा ' कडे प्रथम लक्ष्य द्यावें. कारण त्याच्या मतें त्याच्यावर पुनःपुनः पुष्कळ टीकाकार हल्ले करीत असून त्यांना उत्तर न मिळाल्यामुळें आपण विजयी झालों असें ते समजूं लागले आहेत. म्हणून त्यांस एकदम उत्तर देणें त्यास फार महत्त्वाचें वाटत होतें. पण त्याचा सल्ला स्पेन्सरनें ऐकिला नाहीं, ह्याचें कारण बहुधा वर सांगितलेलेंच असावें. म्हणून “ राजकीय संस्थांचीं ” पहिलीं पहिलीं प्रकरणें १८८० च्या पार्लमेंटीय सामान्य निवडीच्या धामधुमींत त्यानें लिहिलीं. त्या निवडणुकींत त्याचा मित्र एडवर्ड लॉट हा निवडून आला. त्यास अनुलक्षून ता० ८ एप्रिल १८८० रोजीं तो त्यास लिहितो:–“ ही जी मोठी राजकीय क्रान्ति झाली त्याबद्दल आपण एकमेकांचें अभिनंदन करूं या. तूं माझ्या एथें होतास तेव्हां तुला निराशा वाटत होती, तिजवरून पहातां माझ्यापेक्षांहि तुला ज्यास्त आश्चर्य वाटलें असलें पाहिजे. प्रांतिक शहरांतून दैनिक वर्तमानपत्रांची अलीकडे वाढ झाल्यामुळें लंदनशहरच्या मतापासून प्रांतिक मत भिन्न होण्याच्या कामीं त्याचा केवढा परिणाम झालेला आहे, हें, मला वाटतें, आपणा कोणाच्याहि लक्ष्यांत बरोबर आलेलें नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, पूर्वीं जीं प्रांतिक शहरें आपलें धोरण लंदनमधील वर्तमानपत्रांकडे पाहून ठरवीत असत, ती स्थिति जाऊन, आतां लंदनमधील वर्तमानपत्रें आपलें मतधोरण आपल्या प्रांतिक वर्तमानपत्रांवरूनच बऱ्याच अंशीं ठरवूं लागलीं आहेत. ”

इंग्लंदांतील ग्रंथकारांचीं पुस्तकें अमेरिकेंतील प्रकाशक त्यांस न विचारतां बेलाशक छापीत असून त्यामुळें इंग्लिश ग्रंथकारांचें नुकसान होत असे म्हणून दोन्ही देशांत इंग्लिश व अमेरिकन ग्रंथका-

रांस कापी-राइट घेतां यावा याबद्दल आज बरींच वर्षें खटपट चाललेली असून तो प्रश्न आतां निकरावर आलेला होता. त्यासंबंधानें ता० २७ एप्रिल १८८० रोजीं तो यूमन्स ह्यास लिहितोः—" कापी-राइट प्रश्नाची फारशी आशाजनक स्थिति नाहीं ह्याबद्दल मला वाईट वाटतें; कारण तुझ्याप्रमाणेंच माझेंहि असें मत आहे कीं, हल्लींची स्थिति बदलावी अशा प्रकारचें लोकमत झालें नाहीं तोंपावतों ती बदलण्याचा फारसा संभव नाहीं. माथ्यू आर्नोल्डच्यां मूर्खपणाच्या आर्टिकलामुळें तुमच्यांत भलताच ग्रह उत्पन्न होत आहे हें ऐकून मला वाईट वाटतें. मी त्याच्याकडे नजर फेकीन आणि थोडक्यांत त्याचा खरपूस समाचार घेतां येण्गासारखा आहे किंवा नाहीं तें पाहीन, आणि तसा घेण्यासारखा असल्यास त्या बाबतींत तसें कदाचित् कांहीं तरी करीन."

याच संबंधानें ता० ६ आक्टोबर रोजीं तो पुनः त्यास लिहितोः—" नोल्स ('नाइनटीन्थ सेंचरी ' मासिकाचा संपादक) मला सांगतो कीं, तुमचा एथील प्रतिनिधि लोवेल यानें एक तहाचा मसुदा तयार केला आहे, त्याचा पाया अमेरिकेंत जर (इंग्लिश) ग्रंथकारांनीं आपलीं पुस्तकें छापविलीं तर त्यांस कापीराइट द्यावा असा आहे. बारीकसारीक बाबतींत अडथळा न आल्यास, हीच गोष्ट पाहिजे आहे."

१८८१ च्या जुलईंत यूमन्सला असें कांहीं तरी होईल म्हणून आशा वाटत होती. पण आपल्टन व हार्पर ह्या प्रकाशकांबरोबर दिजंबरांत वाशिंग्टनला जाऊन आल्यावर तो निराश झाला, आणि त्याप्रमाणें स्पेन्सरला कळविता झाला. त्यावर स्पेन्सर त्यास ता० १० जानेवारी १८८२ रोजीं लिहितोः—" कापीराइटबद्दलच्या बोलण्याची, आणि प्रकाशनविषयक धंद्याची, तूं जी हकीकत लिहितोस ती खरोखरच फार असमाधानकारक दिसते..... ग्रंथकारांच्या हक्कांकडे

न पाहतां तुमच्या लोकांना ज्ञानसाधनें (पुस्तकें) मिळणें हें तुमच्या संस्थांना आवश्यक आहे हें जें कारण तुमच्या चांचेपणाच्या पद्धतीच्या समर्थनार्थ तुम्ही नेहमी दाखवीत असतां तें किती चुकीचें आहे, हें तुम्हां अमेरिकन लोकांच्या मनांत बरोबर भरून देतां येईल तर बरें असें मला वाटतें. सर्वत्र न्यायरूपी समता असेल तर स्वतंत्र संस्था अस्तित्वांत राहून योग्य रीतीनें काम करितील, हें सत्य वरील चांचेपणाच्या ऐवजीं त्यांच्या मनावर बिंबविलें पाहिजे; पण, मला वाटतें, तें त्यांच्या लक्ष्यांत कशानेंहि यावयाचें नाहीं. ज्या लोकांना एकमेकांच्या हक्कांबद्दल फारशी पर्वा नसते त्यांच्यामध्यें जिच्यांत दुसऱ्यांच्या हक्कांची पायमल्ली गर्भित होते अशी जबरीची शासनपद्धति असून ती बऱ्याच अंशीं स्थाइक अशी सामाजिक स्थिति त्यांच्यांत कायम राखूं शकते; कारण त्यांच्यांत सदसद्विवेकबुद्धि जें करूं शकत नाहीं तें जबरी करूं शकते. पण ज्या मानानें सरकार बिनजबरीचें होत जाईल, आणि करार व स्वैच्छिक सहक्रिया यांचें राज्य समाजांत सुरू होईल, त्या मानानें एकमेकांचे हक्कांना मान देण्याची प्रवृत्ति लोकांच्या स्वभावांत उत्पन्न झाली पाहिजे. तशी न झाल्यास सगळ्या गोष्टी नीटपणें चालावयाच्या नाहींत. हल्लींच अप्रामाणिकपणामुळें तुमच्या संस्था नीट रीतीनें चालण्यास चोहोंकडून अडचणी येत आहेत. हा अप्रामाणिकपणा आणखी वाढल्यास त्या कशा तरी जमीनदोस्त झाल्याशिवाय राहणार नाहींत. त्या बचावयाच्या असल्या तर प्रामाणिकपणानेंच बचावतील. म्हणून तुमचे लोक म्हणतात त्याप्रमाणें, प्रामाणिकपणाला बुडवून ज्ञानाचा प्रसार करणें आवश्यक नाहीं इतकेंच नाहीं, तर प्रामाणिकपणामुळें ज्ञानप्रसाराला अडथळा येत असला तरी तो पत्करून, प्रामाणिकपणाचा प्रसार करणें आवश्यक आहे. मला वाटतें, हें त्यांच्या लक्ष्यांत आणून देण्याची आशा मुळींच नाहीं. ”

आतां आपण १८८० चा वसंत व उन्हाळ्याचा प्रारंभ इकडे वळूं. त्या सुमारास तो मिसेस लेकी (प्रसिद्ध इतिहासकाराची बायको) हिच्याकडे जेवावयास गेला असतां तेथें फ्रेंच ग्रंथकार रेनान व इंग्लिश कवि ब्राउनिंग ह्यांची गांठ पडल्याचें दिनचर्येंत लिहितो. तसेंच, " 'उपजातींचा उद्गम' या ग्रंथाचें वयांत येणें" (तो प्रसिद्ध होऊन २१ वर्षें होणें) ह्यावर हक्स्लेनें दिलेल्या व्याख्यानास हजर असल्याचें, प्रसिद्ध प्रवासी व्हाम्बरी याची मिसेस हक्स्लेकडे गांठ पडल्याचें आणि लेडी रेच्याकडे ग्लाडस्टन व इतर नामांकित गृहस्थ ह्यांची भेट झाल्याचें लिहितो. त्या दरम्यान, त्याच्या कामाच्या संबंधानें पाहतां, गुथीला उत्तर दिल्याचें, ' समाजशास्त्राचें अध्ययन ' या ग्रंथास एक पूरणिका जोडल्याचें आणि 'आदितत्त्वां' च्या चवथ्या आवृत्तीला प्रस्तावना आणि परिशिष्ट जोडल्याचें, तो लिहितो.

ता० ८ जुलई १८८० रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—" ' सनातनधर्मीय टीकाकारांचे मार्ग ' ह्यावरील आपला लेख लिहिण्यांत ग्रांट आलेन चूर झाला आहे. त्याला लागणारी सामग्री मीं त्याला पुरविली असून ती असावी तितकी मजबूत आहे, आणि ती योग्य रीतीनें मांडिल्यास त्यांच्या हल्ल्यांना तें सणसणीत उत्तर होणार आहे.....मी बहुधा थोड्या दिवसांत ' आदितत्त्वां ' ना जोडावयाच्या परिशिष्टाचा एक भाग तुजकडे पाठवीन; त्यांत कर्कमेन व टेट यांनीं उत्क्रान्तिसूत्रावर केलेल्या टीकेला मी उत्तर देत आहें. मला वाटतें, तें कांहीं अंशीं करमणूक करणारें होईल.

माझ्या मनांत लिव्हर्पूल येथें समाजशास्त्रविषयक प्रोफेसराची एक जागा स्थापण्याची खटपट करावी असें आहे; त्या गोष्टीस लॉर्ड डार्बीची सहानुभूति मिळविण्यासाठीं काल, आधीं ठरवून, मीं त्यास भेटावयास गेलों होतों. ते लिव्हर्पूल येथें एक कॉलेज स्थाप-

णार असून त्यांनीं सरासरी ७० हजार पौंड जमविले आहेत. लॉर्ड डार्बीनें एका प्रोफेसराची जागा स्थापण्याकरितां १० हजार पौंड दिले आहेत, आणि मी त्याला भेटलों तोंपावेतों ती कसली आहे तें मला समजलें नव्हतें. तथापि सृष्टिविषयक इतिहासाची असणार असें त्यानें ठरविलें आहेसें दिसतें, म्हणून माझ्या चेतवणीनें तो समाजशास्त्रीय प्रोफेसरी स्थापील ही आशा निष्फळ झाली आहे.... " सुसंगतता " या नांवाचा ' मानसशास्त्रा ' चा आणखी एक भाग लिहीन असें मीं कांहीं वर्षांपूर्वीं ठरविलें होतें; तो लिहिण्यास मी हल्लीं गुंतलों आहें, आणि लंदन सोडण्यापूर्वीं तो पुरा होईल असा माझा अंदाज आहे. तो विषय माझ्या हाताबाहेर होऊन आज इतका काळ गेलेला आहे कीं, त्याच्याकडे पुनः जातांना माझे विचार जरासे मंद चालतातसे मला दिसतें, आणि स्पष्टपणें पण थोडक्यांत त्यांतील मुख्य गोष्टी कशा मांडाव्या ह्याबद्दल मी गोंधळांत पडलों आहें. "

ता० १६ जुलईस तो पुनः त्यास लिहितोः—" एकदोन दिवसांपूर्वीं बार्सिलोना एथील एका स्पानिश माणसाकडून ' संरक्षण आणि स्वतंत्र व्यापार ' ह्यावर लिहिलेला एक ग्रंथ मजकडे आला; त्यांत त्यानें माझ्या निरनिराळ्या ग्रंथांचा आणि विशेषेंकरून समाजदेहाबद्दलच्या सामान्य कल्पनांचा उपयोग संरक्षकांच्या मताच्या स्थापनार्थ केला आहे..... "

नेहमीपेक्षांहि अधिक विलक्षण अशा त्याजबद्दलच्या बातम्या या वेळीं इंग्लंद व अमेरिका येथील वर्तमानपत्रांतून पसरत होत्या. त्यांपैकीं एक कंडी अशी होती कीं, एका श्रीमान् अमेरिकन वारसदारणीची व त्याची कायरो एथें गांठ पडली होती, तिच्याशीं तो लग्न करणार आहे. दुसरी एक अशी होती कीं, अमेरिका व जपान या मार्गानें तो पृथ्वीपर्यटण करणार आहे; त्या कामीं तो

दोन वर्षें घालविणार आहे, विशेष महत्त्वाच्या स्थळीं समाजशास्त्र-विषयक निरीक्षणें करणार आहे, आणि आपल्याबरोबर एकदोन शास्त्रज्ञ मित्र, आणि एक सेक्रेटरी घेणार आहे. त्यासंबंधानें ता० ८ सपटंबर १८८० रोजीं तो यूमन्स यास लिहितोः–" ही खोटी बातमी प्रथम कशी निघाली याची मला दूरवरचीहि कल्पना नाहीं. हे गप्पारूपी प्यारे बहुतेक जरी अगदीं मूर्खपणाचे असतात, तरी त्यांचा कांहीं तरी उगम माझ्या लक्ष्यांत येत असतो; पण या कंडीच्या संबंधानें कांहींच येत नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें ह्या विधानास आधारभूत असें मीं कांहींच म्हटलेलें किंवा केलेलें नाहीं.... "

ता० ६ आक्टोबर रोजीं तो त्यास लिहितोः–" 'नीतिशास्त्राचे आधारस्तंभ ' यावरील सिजविक व अन्य यांच्या टीकांना मी उत्तर तयार करावयास लागण्याच्या बेतांत आहें, व तें ' माइंड'च्या जानेवारीच्या अंकांत प्रसिद्ध होणार आहे. हें काम माझ्या हाता-पलीकडे झालें म्हणजे सध्यापुरतें माझें सर्व लढणें पुरें होईल, आणि नंतर ' राजकीय संस्थां ' वरील माझें काम स्वस्थपणें मी पुनः हातीं घेईन. " ता० ८ नवंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—" टेटनें एडिंबरो एथील विद्यार्थ्यांना ह्या वर्षीं प्रास्ताविक व्याख्यान देतांना त्याच्यावर मीं केलेल्या टीकेवर भाषण केलें..... मी ऐकतों, तो तें व्याख्यान ' नेचर'मध्यें छापणार आहे, आणि तसें झाल्यास आमची लढाई जुंपेल. ह्या रिपोर्टावरून दिसतें त्यापेक्षां त्याच्या व्याख्यानांत जर कांहीं ज्यास्त (सार) नसेल, तर, मला वाटतें, त्यानें मौन सोडिल्याबद्दल त्यास पाश्चात्ताप होईल..... "

ता० ३० नवंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—" माझ्या मार्गांतील अनेक लहान लहान अडचणींतून मी नुक्ताच पार पडलों आहें; त्यांपैकीं एक 'मानसशास्त्रा'चा नवा भाग ही होय. ' नेचर' मध्यें टेटच्या हल्लयाची वाट आज कित्येक आठवडे मी पहात

आहे तो त्यानें न केल्यास कांहीं काळपावेतों तरी माझ्या टिकाकारांची मला रजा घ्यावयास सांपडेल आणि माझें काम मला ज्यास्त समाधानकारक रीतीनें करावयास फुरसत मिळेल. "

ता० २ दिजंबर—" टेट लढण्याचा आव शेवटीं दाखवूंच लागला आहे, आणि 'नेचर'च्या गेल्या अंकांत त्यानें आपली बंदूक झाडली आहे.... माझें प्रत्युत्तर ह्या पत्राबरोबर बहुधा तुझ्या हातीं येईल. "

ता० १७ दिजंबर—" तुझ्या ' नेचर ' च्या प्रतींत, (जी मला वाटतें तुला ह्या पत्राबरोबर बहुधा पोहोंचेल) तुला टेट-मोहिमेचा शेवट दृष्टीस पडेल. हा वादविवाद सुरू होण्यापूर्वीं मीं तुला सांगितल्याप्रमाणें, मला वाटतें, ह्या कामांत पुनः पडल्याबद्दल त्यास पश्चात्ताप होईल. "

ता० १० जानेवारी १८८१—" माझें लढणें सध्यापुरतें संपलें आहे, आणि माझ्या सर्व टीकाकारांचा बराच खरपूस समाचार मीं घेतला आहे, असें मी समजत होतों. पण त्यांतील थोडासा भाग शिल्लकच राहिला आहे. प्रोफेसर ग्रीननें गेल्या ' कॉंटेम्पोररी ' च्या अंकांत हाडसनला उत्तर दिलें आहे, (दोन वर्षांपूर्वीं स्पेन्सरच्या आध्यात्मिक मतावर ग्रीननें टीका केली असून त्याला हाडसन नामक एका अमेरिकन पदवीधरानें, स्पेन्सरला विचारून, उत्तर दिलें होतें, व तें वरील रिव्ह्यूंत प्रसिद्ध झालें होतें.) आणि मला वाटतें, त्यावर मला स्वताच चार शब्द लिहिणें जरूर पडेल....."

ता० १४ फेब्रुवारी—" संयुक्त राजकीय मुख्य ' ह्यावर एक प्रकरण मी हल्लीं तयार करीत आहें. इतकें घोंटाळ्याचें प्रकरण मला कोणत्याहि विषयावर आजपर्यंत लिहिण्याचा प्रसंग आला नव्हता. मला वाटतें, तें जेव्हां समाधानकारक रीतीनें तयार होईल, तेव्हां ह्या भागांतील अत्यन्त बिकट काम पार पडल्यासारखें होईल. ' कान्टेम्पोररी ' मधील ग्रीनला मीं दिलेलें उत्तर तुझ्या दृष्टीस पड-

लेंच असेल. आपल्याला हा वाद पुढें चालवावयाचा नाहीं असें त्यानें स्ट्रेहानला लिहिलें आणि तें पत्र मजकडे पाठविण्यास सांगितलें. त्या पत्रांत आपण आपल्या प्रतिपादनांत चुकलों होतों हें जरी तो कबूल करीत नाहीं, तरी आपण वापरलेल्या शब्दांबद्दल त्यानें त्यांत माफी मागितली आहे, व ते शब्द अगदीं गैर होते हें त्यानें कबूल केलें आहे. हा वादविवाद आतां संपल्यामुळें मला मोकळें वाटतें, आणि ह्यापुढें वेळाचे हे अशा प्रकारचे निरर्थक खर्च टाळण्याचें मी म्हणतों, आणि ज्या अर्थीं माझे सर्व टीकाकार (मांजरासमोर) उंदराप्रमाणें स्वस्थ बसले आहेत, त्या अर्थीं विशेषतःच म्हणतों. ”

१८८० च्या दिजंबरच्या अखेरीस मिसेस क्रॉस (जॉर्ज इलियट) मरण पावली. तो तीस ता० १९ दिजंबर रोजीं भेटावयास गेला होता, आणि त्याच्या आदल्या दिवशीं तिनें त्यास असें लिहिलें होतें:—“ तुझ्या अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची भेट तूं मला ममतेनें पाठविलीस त्याबद्दल तुझे आभार मानण्याची मीं दिरंगाई केली आहे; पण त्या पुस्तकांचा मीं पुष्कळ उपयोग केला आहे, कारण मि० क्रॉसबरोबर ‘ नीतिशास्त्राचे आधारस्तंभ ’ व ‘ समाजशास्त्राचें अध्ययन ’ हे ग्रंथ मीं पुनः वाचिले..... ”

या तिच्या पत्राखालीं स्पेन्सरनें अशी टीप दिली आहे:—“ मला वाटतें, तिनें लिहिलेलें हें अखेरचें पत्र होतें. मी दुसरे दिवशीं (रविवारीं) तिसरे प्रहरीं तिजकडे गेलों, आणि तिच्याशीं मजेनें पुष्कळवेळ बोललों. ती थकलेलीशी मला दिसली, पण एरवीं आजारीशी दिसली नाहीं. ती मला पुनः दिसणार नाहीं असें त्या वेळीं मला मुळींच वाटलें नव्हतें. त्याच रात्रीं ती आजारी पडली, आणि ती बुधवारीं रात्रीं मेली, असें हेस्टिंग्स एथें वर्तमानपत्रांत लिहिलेलें वाचण्यापूर्वीं मला तिजबद्दल कांहींच खबर लागली नाहीं. अरेरे !”

आपणास वेस्टमिन्स्टर आबेमध्यें पुरावें अशी तिची इच्छा होती; आणि स्पेन्सर हा तिचा एक अत्यन्त जुना व अत्यन्त कळवळ्याचा मित्र असल्यामुळें, तीं पुरी करण्याच्या कामीं त्यानें आपल्यास सहाय्य करावें अशी मि० क्रासनें त्यास विनंति केली. प्रो० टिंडालनें त्या बाबतींत जोराची खटपट केली. पण तो विचार सोडून दिला पाहिजे असें डीन स्टान्लेकडून ऐकून त्यानें स्पेन्सरला लिहिलें:—" तुझ्या-माझ्यामध्यें मी म्हणतों कीं हा विचार शहाणपणाचा झाला. आबेमध्यें पुरून घेण्याचा तिला काय हक्क आहे? ह्याबद्दल अनेकांचीं अनेक मतें ऐकण्यापेक्षां तिला मुकाट्यानें हायगेट येथें पुरणें बरें." पण जो वादविवाद तिच्या पुरण्याच्या संबंधानें झाला नाहीं, तो स्पेन्सरचें तिच्या शिक्षणाच्या कामीं किती अंग होतें ह्याबद्दल इंग्लंद व अमेरिका ह्या दोन्ही देशांत झाला. तेव्हा त्यासंबंधानें पत्र लिहून स्पेन्सरला खरी गोष्ट नमूद करणें भाग पडलें. हा खुलासा त्याच्या ' आत्मचरितां ' त आलेला आहे.

मार्चमध्यें एक आठवडा तो ब्रायटन येथें असतां, त्याची प्रो० लेकी व त्याची बायको ह्यांशीं बहुतेक रोजची गांठ पडत असे; संध्याकाळीं दररोज तो विलियम बॅकशीं बिलियर्ड खेळत असे; आणि त्याच अवधींत मायालनें त्याचे दोन फोटोहि घेतले. प्रोफेसर हक्स्लेनें पुढील पत्र जें त्यास लिहिलें तें बहुधा ह्या दोन फोटोंपैकीं एकाच्या संबंधानें असावें:—"(फोटोंतील) डोळ्यांत कडकपणाची जरा झांक मारते. आह्मी तो जेवणाच्या खोलींत टांगणार आहों, आणि कोणी जर अतिशयोक्तीचें भाषण किंवा चुकीचें तर्कशास्त्र या बाबतींत अपराध केला (त्या मेजासभोंवतीं पांच बायका नेहमीं बसतात !) तर मला वाटतें, तो डोळा आपल्यावर आहे हें त्यांच्या किंवा तिच्या लक्ष्यांत येईल."

ह्या वेळच्या दिनचर्येंतून पुढील उतारे देण्यासारखे आहेत:—

ता० २७ एप्रिल "' ीलाचें इंद्रियविज्ञान ' यावरचें टिपण सांगण्याचें काम पुरें केलें." ता० १२ मे—" ग्लाडस्टनकडे न्याहारीस." ता० १९ मे—" क्लबांत जपानी प्रधान, बेन, मासन, मोर्ले, फ्रँकलण्ड, सर एच्. टॉम्सन, आणि लॉर्ड आर्थर रसेल यांस मेजवानी दिली."

" राजकीय संस्थां "वरील लेख इंग्लंदांत त्याच्या अजमासाप्रमाणें लोकप्रिय न झाल्यामुळें त्यानें यूमन्स यास असें लिहिलें कीं, "अमेरिकेंताहि त्याची लोकप्रियता कमी होत असल्यास तूं ते ह्यापुढें प्रसिद्ध करूं नको." त्यावर डा० यूमन्सनें त्यास असें लिहिलें कीं, " आमच्या मासिकांतून असल्या प्रकारच्या होतील तेवढ्या चर्चा आह्मांस पाहिजेच आहेत; सरकार म्हणजे काय ह्याची कांहीं योग्य शास्त्रीय कल्पना झाल्याशिवाय आमच्या देशाचा तरणोपाय नाहीं."

ता० २१ सपटंबर १८८१ रोजीं तो डा० यूमन्स यास लिहितो:—" तुला शक्ति येत आहे हें ऐकून मला आनंद वाटला, पण तुला काम करण्याची ज्यास्त हुशारी वाटत आहे हें ऐकून तितका आनंद वाटत नाहीं. ह्या ऐवजीं ' मला खेळण्याची ज्यास्त हुरूप वाटत आहे ' असें जर तूं लिहितास, तर तें मला ज्यास्त आवडलें असतें..... ' लष्करी नमुना ' आणि ' औद्योगिक नमुना ' हीं प्रकरणें तुला आवडलीं हें ऐकून मला आनंद वाटतो. महत्त्वाच्या दृष्टीनें पाहतां ह्या भागांतील, आणि खरोखर त्या एकंदर ग्रंथांतील, तीं कमालीचीं प्रकरणें आहेत."

अमेरिकेस जाण्याच्या बोलण्यास आतां निश्चित स्वरूप येत चाललें होतें. त्याला जी अत्यन्त भीति वाटत होती ती इतक्या पुष्कळ लोकांना भेटण्याच्या संबंधाची होय; तथापि केव्हांतरी एकदां तें पत्करिलें पाहिजे असें त्यास आतां वाटूं लागलें. पण एकीकडे त्याचे न्यूयार्कमधील मित्र त्याची सफर सुखकारक व फायदे-

शीर कशी होईल हें पहात असतां, तो, दुसरीकडे डा० यूमन्सला येत्या हिंवाळ्यांतून पार पाडण्यास काय करावें, ह्याचा विचार करीत होता.

मि० आल्फ्रेड रसेल वॉलेस ह्यानें ' सोश्यल स्टॅटिक्स ' हा ग्रंथ वाचल्यापासून त्याच्या मनांत देशांतील सर्व जमीन राष्ट्रीय (सार्वजनिक) करण्याकरितां स्थापिलेल्या सभेंत स्पेन्सरचें अंग असावें असें आलें, व म्हणून तो १८८१ च्या मे-जून महिन्यांत त्या बाबतींत खपपट करूं लागला. तद्वतच, प्रसिद्ध सोश्यालिस्ट हेन्री जॉर्ज ह्यास वरील पुस्तकांत आपल्या " प्रगति व दारिद्र्य " ह्या पुस्तकांत त्या सारखींच कांहीं मतें प्रतिपादिलेलीं आहेत असें वाटून आपला ग्रंथ स्पेन्सर यास पसंत पडेल असा त्याचा अंदाज झाला. पण १८८२ सालीं जेव्हां त्यांची गांठ पडली तेव्हां त्याची ह्या बाबतींत अगदीं निराशा झाली. पुढें कांहीं वर्षांनीं तो जो स्पेन्सरवर कडक हल्ले करूं लागला, त्याचें बीज बहुधा ह्याच वेळीं पेरलें गेलें असावें.

' वर्णनात्मक समाजशास्त्रा'चे पुढील भाग निघावयाचे नाहींत अशी स्पेन्सरनें दिलेली जाहिरात पाहून हेजेलर नांवाचा एक अमेरिकन त्यांच्या छपाईचा खर्च देण्यास तयार झाला; त्यासंबंधानें स्पेन्सर त्यास ता० १४ फेब्रुवारी १८८२ रोजीं लिहितोः—" तुझें सहानुभूतिपर पत्र व २०४ पौंडांची हुंडी आज सकाळीं मला पोंहोंचली..... मी तुझे फार अंतःकरणपूर्वक आभार मानितों; आणि ज्या औदार्यबुद्धीनें तुला ही देणगी देण्यास प्रेरिलें तिची वाखाणणी करितों; पण मी ती स्वीकारीत नाहीं ह्याबद्दल तूं मला माफी केली पाहिजे..... प्रगतिपर कल्पनांचा प्रसार व्हावा, आणि मानवजातीचें कल्याण व्हावें एतदर्थ अशा देणग्या देऊन, शिवाय त्या बाबतींत स्वतः अंगमेहनत करणारीं माणसें कोठें कोठें दृष्टीस पडतात ही लक्ष्य वेधण्यासारखी व उत्तेजनदायक गोष्ट आहे. अशा माण-

सांची सर्वांहून अधिक जरूरी आहे. माणसांमध्यें मोठी उणीव दिसते ती ही कीं, त्यांची कांहीं सत्याबद्दल पूर्ण खात्री झाली तरी, तेणेंकरून त्यांच्या प्रसारार्थ वेळ व सामर्थ्य ह्यांचा खर्च करण्यास ते तयार होत नाहींत. "

लॉटला बरोबर घेऊन अमेरिकेस येण्याचा स्पेन्सरचा बेत आहे असें ऐकून हेजेलर त्या दोघांचा जाण्यायेण्याचा खर्च देण्यास तयार झाला; पण हीहि गोष्ट स्पेन्सरनें आभारपूर्वक नाकारिली. शिवाय, अमेरिकेंत ' वर्णनात्मक समाजशास्त्रा 'चा खप जोरानें व्हावा ह्याकरितां भांडवल पुढें करण्याच्या कामींहि हेजेलर सर्वांत पुढें झाला. ही गोष्ट साध्य करण्याकरितां यूमन्सनें कित्येक योजना मनांत आणिलेल्या होत्या, पण त्यास शक्ति नसल्यामुळें त्यांतील किती अमलांत आणतां येतील याबद्दल त्यास शंका होती. म्हणून त्यानें त्या बाबतींत योग्य दिसेल तें करण्याची स्पेन्सरची परवानगी मागून ठेविली. त्याच्या मतें त्या ग्रंथाची किंमत कमी केल्यास त्याचा खप वाढविण्यास भांडवल जमवतां येण्यासारखें होतें.

दक्षिण आफ्रिकेंतील बासूटो लोकांस केप वसाहतींतील सरकारानें निःशस्त्र केल्याबद्दल तेव्हांचा वसाहतींचा सेक्रेटरी लॉर्ड किंबर्ली याच्याकडे एक तक्रार व विनंतिपत्र न्यावयाचा बूट १८८० त निघाला होता, त्या कामीं मदत करण्यास स्पेन्सरला निमंत्रण झालें होतें. या कामीं पुढाकार घेणाऱ्यांच्या मनांत बासूटो लोकांच्या मुलखाचा कारभार केप सरकाराकडून काढून ब्रिटिश सरकारानें आपल्याकडे घ्यावा, म्हणजे, त्या मुलखास गादीची किंवा राजवसाहत बनवावी, असें होतें. त्यासंबंधानें त्यांचा प्रमुख चेसन यास ता० १८ नवंबर १८८० रोजीं स्पेन्सर लिहितोः—" तुम्ही जी विशेषच सूचना करणार आहां ती मला मान्य असती, तर तुमच्याबरोबर वसाहतींच्या प्रधानाकडे मी स्वमतप्रदर्शनार्थ आनंदानें

आलों असतों. पण पुष्कळ अनुभव उलट आलेले असल्यामुळें बासूटो व इतर लोकांचे मुलूख राजवसाहती बनविल्यानें कायमची इष्टहेतुसिद्धि होईलसें मला वाटत नाहीं. तद्देशीय लोकांच्या हक्कांचें अतिक्रमण करून त्यांच्याशीं तंटे केल्यास विलायत सरकार आपल्या मदतीस येईल असें जोंपावेतों वसाहतकारांना वाटत आहे, आणि जोंपावेतों असें अतिक्रमणाचें धोरण ठेवून अधिकाराविना, व सरकारी हुकूम मोडूनहि, तद्देशीयांचे मुलूख आपल्या मुलखास जोडणारांस पदव्या व मानमरातब मिळत आहेत, तोंपावेतों हें अतिक्रमणाचें धोरण, आणि त्याबरोबरच येणारे सर्व अत्याचार चालावयाचेच."

ह्या बाबतींत राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीस हालवण्याला कोण बरें योग्य आहे असा विचार तो करीत असतां त्यास कवि स्विनबर्न याची आठवण झाली, आणि त्यासंबंधानें त्यानें त्यास ता० ८ मार्च १८८१ रोजीं पुढील पत्र लिहिलें:—"परवां मला आठवण झाली कीं, योग्य कारणानें उत्पन्न झालेला क्रोध प्रदर्शित करण्याचें जें तुझ्या अंगीं विलक्षण सामर्थ्य आहे त्याचा हल्लीं जें आमचें चांचेपणाचें धोरण चोहोंकडे दिसून येतें त्याचा निषेध करण्याच्या कामीं उपयोग करावा. झुलुलॅण्ड, ट्रान्स्वाल, आणि कमी प्रमाणावर इतर ठिकाणें, ह्या ठिकाणीं आमच्या ज्या कृति चाललेल्या आहेत त्या पाहून तुझ्या मनाची, क्रोधाविष्ट स्थिति झालेली असेल, व ती दररोज वाढत चाललेली असेल, ह्याबद्दल मला संशय वाटत नाहीं. आमचा ख्रिस्ती धर्म आणि अख्रिस्ती कृति, आमची ढोंगी मानवप्रीती आणि वास्तविक रानटीपणा, ह्यांच्यामधील विरोध चुरचुरीत रीतीनें लोकांपुढें मांडण्याची अधिक योग्य संधि यापूर्वीं कधीं आली नसेल; आणि कार्लाइलची मतें व त्याची अगदीं उलट कृति ह्यांचें जसें जोरदार व चुरचुरीत खंडन तूं केलेंस, तसेंच ह्या गोष्टीचेंहि केव्हां करशील असें मला झालें आहे, वरच्याच सारखें बन-

चलेलें, आणि इंग्लिश लोकांस ज्यांत आपलें स्वरूप व आपल्या कृति स्पष्टपणें दिसतील असें दर्पण त्यांच्यापुढें उभें करणारें चोपडें जर तूं तयार करशील, तर तें जितकें योग्य परिणामकारक होईल तितकें दुसरें कांहींच होणार नाहीं असें मला वाटतें. मेहरबानी करून या गोष्टींचा विचार कर, आणि तुझ्यानें करवली तर माझी सूचना मान्य कर. "

हें पत्र वाचून स्विनबर्नला अत्यन्त समाधान वाटलें, पण त्याला ही सूचना मान्य करतां आली नाहीं. हें पाहून स्पेन्सरची मोठी निराशा झाली, कारण ह्या कामीं त्यास मिळेल तितकी मदत पाहिजे होती.

पुढें वसाहतींतील लष्करी व दिवाणी हपीसरांच्या वर्तनासंबंधानें हेन्री रिचर्ड यानें पार्लमेंतापुढें सूचना आणिली तेव्हां स्पेन्सरला वाटलें कीं, या कामीं जोराची चळवळ करण्यास ही योग्य वेळ आहे. म्हणून तिच्याशीं ज्यांची सहानुभूति आहे असें त्यास वाटत होतें त्यांचें सहाय्य मिळविण्याची त्यानें खटपट आरंभिली. त्यासाठीं त्यानें एक सर्क्युलर तयार केलें, त्याचा कच्चा मसुदा ता० १६ जून १८८१ चा असून, घाई असल्यामुळें तो त्यानें ४० मिनिटांत तयार केला. त्यासंबंधानें ता० २ जुलई १८८१ रोजीं तो जॉन ब्राइट यास लिहितोः—" सरासरी सहा आठवड्यांपूर्वीं औद्योगिक प्रगति आणि लढाई यांमधील विरोधावर तुझें माझें लॉर्ड एर्लींच्या घरीं भाषण चाललें असतां, आमच्या दण्डुकेपणाच्या धोरणाविरुद्ध जें लोकांत इकडे तिकडे विखरलेलें मत आहे, आणि ज्यास व्यवस्थित स्वरूप दिलेलें नसल्यामुळें त्याचा फारसा उपयोग होत नाहीं, तें एकत्र करण्याचा यत्न मी आज कांहीं दिवस मनांत आणीत आहें, हें तुला सांगण्यास विसरलों. माझी कल्पना अशी आहे कीं, ' पीस सोसायटी ' नामक जी लढाईविरुद्ध सभा आहे

ती (इतरांनीं केलेल्या) अतिक्रमालाहि विरोध करूं नये असें म्हणणाराशीं एकस्वरूप असल्यामुळें तिच्या यत्नांस वस्तुतः यश येत नाहीं.....माझी समजूत अशी आहे कीं; ती सभा अवरोधाच्या ऐवजीं अनतिक्रमाच्या तत्त्वाचा स्वीकार जर करील, तर त्यापासून प्रत्यक्ष फलनिष्पत्ति तितकीच होऊन तिच्या मार्गांतील अडचणी दूर होतील. "

ता० ११ जुलई रोजीं सभा भरून तिच्यांत ता० १६ जूनच्या स्पेन्सरच्या सर्क्युलरावर चर्चा झाली, आणि नवीन सहाय्यकारी मिळविण्यासाठीं तें बाहेर पाठविण्यापूर्वीं त्याच्यांत थोडासा फरक केला. त्यास या वर्षीं ह्या बाबतींत दुसऱ्या पुष्कळ सभांस हजर रहावें लागलें; आणि बराच पत्रव्यवहार करावा लागला. ह्या सर्क्युलरास बरेंच उत्तेजन मिळाल्यामुळें १८८२ च्या प्रारंभीं तो व त्याचे सहाय्यकारी ह्यांनीं एक सार्वजनिक सभा भरविली, आणि तिच्यापुढें त्यांच्या मंडळाचे उद्देश दर्शविणारें जें पत्रक वाचावयाचें होतें तेंहि स्पेन्सरनेंच तयार केलें. पण सभेची तारीख जसजशी जवळ येत चालली, तसतशी त्यास आपली प्रकृति ज्यास्त ज्यास्त बिघडते आहेसें वाटूं लागलें. त्यासंबंधानें त्याच्या दिनचर्येंत पुढील उल्लेख सांपडतातः—
ता० १९ फेब्रुवारीच्या "अनतिक्रमणसभे"च्या कामानें कंटाळलों."
ता० २०—" 'अन्तिक्रमण' सभेबद्दलची व्यवस्था. " ता० २२—
"फार काम. माझी मुरकुंडी वळणार म्हणून भीति पडली, पण तसें झालें नाहीं. 'अनतिक्रमण' सभेची बैठक चांगल्या रीतीनें पार पडली. मी चांगलें बोललों आणि माझें पुष्कळ अभिनंदन झालें. "
या चळवळीस इंग्लिश वर्तमानपत्राकडून उत्तेजन मिळालें नाहीं.

'राजकीय संस्था' हा समाजशास्त्राचा भाग ता० २४ मार्च १८८२ रोजीं लिहून पुरा झाला, आणि त्याला आपल्या डोक्यावरचें एक मोठें ओझें उतरल्यासारखें वाटलें. त्यासंबंधानें ता० २९

मार्च १८८२ रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—" माझ्या ग्रंथाचा हा भाग आतां पुरा झाला आहे हें ऐकून तुला आनंद वाटेल. आजपर्यंत जें काम मीं केलें त्या सर्वांत हें अत्यन्त कठीण म्हणून मी समजतों, आणि तें पुरें झाल्यामुळें पुढील काम त्या मानानें मला अगदीं सोपें वाटतें."

ता० २६ एप्रिलच्या दिनचर्येंत ही नोंद आढळतेः—" वेस्टमिन्स्टर आबेमध्यें डार्विनच्या दफनविधीस गेलों." त्यास असल्या ह्या धर्मविषयक विधीचे प्रसंगीं हजर असणें आवडत नसे हें टिंडालच्या लग्नाला तो गेला नाहीं ह्यावरून व्यक्त झालेलेंच आहे. असें असून तो ह्या समारंभास गेला ह्याचें कारण डार्विनबद्दल त्याच्या मनांत मोठी सन्मानबुद्धि होती हें होय.

' अनतिक्रमण ' मंडळाच्या संबंधानें पुष्कळ पत्रव्यवहार आणि भेटी चालूच होत्या. त्यासंबंधानें ता० २४ जून १८८२ रोजीं तो जॉन ब्राइट यास लिहितोः--"गेल्या गुरुवारीं मी ग्लाडस्टनकडे न्याहारीस गेलों होतों, आणि न्याहारीनंतर अतिक्रमणाविरुद्ध मंडळाच्या संबंधानें त्याच्याशीं माझें पाव तास संभाषण झालें. त्या मंडळाचे हेतु आपणास सर्वांशीं मान्य आहेत असें तो म्हणाला. तो म्हणाला, ' माझ्या मतें असल्या मंडळाची जरूरी होती; कारण " पीस सोसायटी " नें (शांतता परिषदेनें) अव्यवहार्य तत्त्व (कोणीं इंग्लंदच्या हक्कांचें अतिक्रमण केलें तरी त्याच्याशीं लढाई करूं नये, हें तत्त्व) पुढें ठेवून त्या कामीं गोंधळ केला आहे. तो असेंहि म्हणाला कीं, तुमचे उद्देश एकंदर लिबरल मतांच्या प्रगतीला अनुकूल असेच आहेत. ' या संभाषणामुळें मीं दुसरे दिवशीं आमच्या प्रास्ताविक बैठकीच्या हकीकतीची एक नक्कल त्याच्याकडे पाठविली, आणि मंडळाचे उद्देश वर्णिलेलें पत्रक वाचण्यास त्यास विनंती केली. त्यावर त्यानें स्वदस्तुरचें उत्तर पा-

ठविलें असून त्यांत तो म्हणतो कीं, " माझी त्या उद्देशांना केवळ शाब्दिक किंवा रीतसर मान्यता नव्हे तर त्यांच्याशीं मनःपूर्वक सहानुभूति आहे. " त्यानें मला विचारलें कीं, तूं ब्राइटला या बाबतींत विचारलें आहेस काय ? आणि मीं उत्तर केलें कीं, " त्यानें आपली सहानुभूति व्यक्त केली आहे. " आतां मला वाटतें कीं, अशा परिस्थितींत निश्चित उद्योगास लागण्यास ही योग्य वेळ आहे. तूं पेनिन्गटनला विचारलेंस तर तो तुला सांगेल कीं, तो व साम्युएल मोर्ले ह्यांखेरीज जे कित्येकजण आह्मांस मदत करण्यास इच्छितात ते, तसें केल्यानें प्रधानमंडळास अडथळा येईल ह्या भीतीनें, मागें घेत आहेत..... म्हणून अशा लोकांस जर असें कळवितां आलें कीं, तुलाच केवळ नव्हे तर ग्लाडस्टनला देखील आमचे सामान्य उद्देश मान्य आहेत, तर वरील आडचण दूर होईल, आणि आह्मांस एकदम पुष्कळ व बहुधा उत्साहयुक्त अशी मदत मिळेल. "

ह्या वेळीं पार्लमेंताचा सभासद होतांना घ्यावयास लागणाऱ्या शपथेसंबंधाचें ब्राडलाचें प्रकरण सुरू होतें, आणि ईजिप्तमध्यें लढाईहि सुरू होती. तेव्हां सरकारानें दुर्बल राष्ट्रांवर केलेल्या हल्ल्यांबद्दल लोकांस ज्यास्त राग आला आहे, किंवा प्रजेच्या हक्कांवर हल्ला केल्याबद्दल ज्यास्त राग आला आहे हें सांगणें कठीण होतें. म्हणून नागरिकांचे व्यक्तिविषयक हक्क राखण्यासाठीं जीं निरनिराळीं मंडळें स्थापिलेलीं होतीं त्यांनीं एकमतानें चळवळ करावी असा त्यानें सल्ला दिला. ह्यासंबंधानें १८८१ च्या दिजंबरांत क्रॉफ्टसाहेबाला त्यानें असें लिहिलें:—" हल्लींच्या आमच्या काळांत टोरी मतें व लिबरल मतें ह्यांचें संमिश्रण झालेलें आहे, आणि तीं पुनः वेगळीं करणें जरूर आहे. टोरी मत म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध सरकारच्या जुलमी सत्तेला अनुकूल मत, आणि लिबरल मत म्हणजे सरकाच्या सत्तेविरुद्ध व्यक्तिस्वातंत्र्याला अनुकूल मत. हल्लीं

लिबरल पक्ष हें आपलें मुख्य तत्त्व विसरला आहे, आणि म्हणून त्याचें पुनः प्रतिपादन करण्यासाठीं नवीन लिबरल पक्ष बनविणें जरूर आहे. ”

त्याच्या अमेरिकेंतील सफरीची हकीकत त्याच्या ‘आत्मचरितां’त सविस्तर आलेलीच आहे. ती सफर त्यास होईल तितकी सुखकर, बोधप्रद, आणि चैनीची करण्याकरितां त्याच्या मित्रांनीं व ओळख्यांनीं त्यास फार साहाय्य केलें. निरनिराळ्या आगगाड्यांच्या व्यवस्थापकांनीं त्यास चैनीनें प्रावस करतां यावा म्हणून एकमेकांशीं जणूं काय चढाओढच चालविली होती. हॉटेलाच्या मालकांनीं त्याचें सन्मान्य पाहुणा म्हणून स्वागत करण्यासाठीं आपली इच्छा प्रत्येक शक्य रीतीनें व्यक्त केली. मित्रांनीं त्याच्यावर व लॉटवर अमर्याद खाजगी पाहुणचारांचा व अविश्रांत मदतीचा वर्षाव केला. आणि डेलमानिकोच्या हाटेलांत अमेरिकन विद्वान् व साहसी लोकांच्या मुख्य मुख्य प्रतिनिधींनीं त्याला अखेरीस जी मेजवानी दिली तिनें तर ह्या स्वागताचा कळसच झाला. त्या स्वागताच्या संबंधानें, त्याच्या मेजवानीच्या प्रसंगीं केलेल्या संभाषणांत त्यानें असें म्हटलें कीं, ह्या गोष्टीच्या स्मरणानें मला जितका आनंद होत राहील, तितका दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीच्या स्मरणानें होणार नाहीं. ”

तो युनटेडस्टेट्स् व कानडा या देशांत जेथें जेथें गेला, तेथें तेथें अत्यन्त मनःपूर्वक जो त्याचा आदरसत्कार झाला, त्यानें त्याचें अंतःकरण खालपासून हालून गेलें ह्यांत शंका नाहीं. त्याला निरनिराळ्या ठिकाणांहून जीं निमंत्रणें आलीं तीं सर्व आपल्यास मान्य करतां आलीं नाहींत ह्याबद्दल त्यास अत्यन्त दिलगिरी वाटली. दुर्दैवाची गोष्ट अशी होती कीं, समाजांत मिसळल्यानें मेंदूचा उत्क्षोभ होईल असें त्यास अत्यन्त भय वाटे; आणि प्रत्यक्ष उत्क्षोभापेक्षां ह्या भीतीपासूनच त्यास ज्यास्त त्रास होई. त्याच्या भेटी घेऊन

त्याचीं मतें काढून घेण्यास जे वर्तमानपत्रवाल्यांचे प्रतिनिधि सारखे येत, त्यांच्या त्रासापासून त्याचें रक्षण करतां करतां लॉट यास पुरे झालें, आणि त्या धांदलींत त्यास शिकागो एथील आपल्या आप्तांस भेटून येण्यास देखील फुरसत झाली नाहीं. आपला बडेजाव करून घेण्याचा स्पेन्सर यास जो तिटकारा होता, तो तिकडून परत येत असतां जेव्हां लिव्हरपूल येथें येऊन तो पोंहोचला, तेव्हां पुनः दिसून आला. तेथें राबर्ट होल्ट व त्याचे इतर मित्र यांनीं त्यास मेजवानी देण्याचा विचार केला होता, पण तो तेथें आल्यावर एकदम लंदनच्या गाडींत बसला.

लंदनास परत आल्यावर तो ता० २९ नवंबर १८८२ रोजीं यूमन्स यास लिहितोः—" वर्तमानपत्रवाल्यांनीं अखेरीस ' जर्मानिक ' बोटीवर माझी गांठ घेतलीच हें ऐकून तुला खरोखरच हंसूं आलें असेल. ' हेरल्ड'च्या बातमीदारानें मला पकडिलें, आणि तो कोण आहे हें माझ्या लक्षांत येण्यापूर्वीं त्यानें माझ्या तोंडून कांहीं उद्गार शिताफीनें काढून घेतले, जे उद्गार मी जर सावध असतों तर बहुधा काढिले नसते, किंवा निराळ्या रीतीनें तरी काढिले असते. काय झालें तें नंतर एकदम माझ्या लक्ष्यांत आलें.....माझें वजन सरासरी सात पौंड कमी झालेलें मला आढळून येतें. आज कित्येक वर्षांत मी वाळलों नाहीं इतका अमेरिकेंत असतांना वाळलों; आणि माझ्या डोक्याच्या क्षीणतेपासून जे दुष्परिणाम झाले त्यांबरोबर हा एक झाला कीं, अनेक लहानसहान गोष्टींत माझ्याकडून असे कांहीं शब्दभ्रंश व कृतिभ्रंश झाले कीं त्यांची आठवण होऊन मला मागून फार वाईट वाटलें. "

डा० यूमन्सनें त्याची मुद्दाम मुलाखत घेतल्यासारखें करून तिची हकीकत वगैरे छापून काढिली होती, त्यासंबंधानें ता० १२ दिजंबर रोजीं तो त्यास लिहितोः—" तुझ्या चोपड्याची प्रत आज

सकाळीं मला मिळाली.....त्यांतील जे भाग मला नवे होते ते मीं चाळून पाहिले, तेव्हां त्यांत माझी भरपूर स्तुति पाहून माझ्या ज्ञानतंतूंची जरा धांदलच उडाली. तिच्या योगानें कांहींकांच्या मनांत मजबद्दल प्रतिकूल ग्रह होईल अशी मला भीति वाटते. तथापि तुम्हां अमेरिकन लोकांना अतिशयोक्तीची संवय असल्यामुळें, एथें तिच्यापासून जितका वाईट परिणाम झाला असता, तितका तेथें बहुधा होणार नाहीं. नेहमींप्रमाणें या लेखांतहि तूं माझ्या बोलण्यांतील मुख्य मुद्दे तेवढेच घेऊन ते अत्यन्त स्पष्टपणें मांडिले आहेस. जें म्हणणें अत्यन्त जरूरीचें असेल तें इतक्या थोडक्या शब्दांनीं व्यक्त करण्याची कला तुझ्यासारखी दुसऱ्या कोणास साधलेली मला माहीत नाहीं. तुला माहीत आहे कीं, मी कधीं उगाच स्तुति करीत नाहीं, तर योग्य असेल तीच करितों.....ड्रेपर (अमेरिकेंतील एक मोठा शास्त्रज्ञ) मेल्याचें ऐकून मला तुझ्यासारखेंच फार वाईट वाटतें; आपलें काम उत्तम करण्याची त्याची नुक्तीच तयारी झाली होती. या वर्षांत शास्त्रीय जगाचें फार मोठें दुर्दैव ओढवलेलें दिसतें. (अर्थशास्त्रज्ञ) जीव्हन्स, (भौतिकशास्त्रज्ञ) बाल्फर, ड्रेपर—ह्या सर्वांकडून पुष्कळ कामगिरी होण्याची आशा होती. ”

प्रकरण सतरावें

खऱ्या लिबरल पक्षासाठीं राजकीय मतांचें बाड

१८८३ साल सुरू झालें तेव्हां प्रकृतीबद्दल त्यास काळजी वाटत होतीच; म्हणून स्वच्छ हवा व करमणूक यांचा उपभोग घेण्यासाठीं तो हनब्रिज एथें एका जलचिकित्सालयांत कांहीं दिवस रहा-

वयास गेला. तेथें त्यास फारसें सुख झालेलें दिसत नाहीं. कारण तो तेथें तीनच रात्री राहिला; व त्या तीन रात्रींच्या संबंधानें त्याच्या ह्या ' दिनचर्यें ' त अशा नोंदी आढळतात—" फार चांगली रात्र, " " भिकार रात्र; " " फार वाईट रात्र. "

तिकडून परत आल्यावर ता॰ १६ जानेवारी १८८३ रोजीं तो रिचर्ड हॉडसन यास लिहितोः—" कॅन्टच्या नव्या अनुयायांच्या कांहीं लेखांकडे तूं नजर फेंकशील तर बरें; ते प्रबल होत आहेत, आणि त्यांस—उदाहरणार्थ, वाटसन यास—असें वाटतें कीं, उत्क्रान्तिविषयक अनुभवशास्त्रावर आपण प्रतिपक्षास निरुत्तर करणारे हल्ले केले आहेत. त्यांचें एकंदर धोरण कॅन्टविरुद्ध केलेल्या सर्व टीकांकडे अगदीं दुर्लक्ष्य करण्याचें, आणि दुसरेच प्रश्न उपन्न करण्याचें, दिसतें. " मानसशास्त्रां"त क्यांटच्या आकाशविषयक मताविरुद्ध जे आक्षेप मीं घेतले आहेत त्यांस उत्तर देण्याचा त्यांनीं यत्न केलेला माझ्या पाहण्यांत आलेला नाहीं. शिवाय, त्यांच्यावर दुसरा एक फार जोरदार असा हल्ला करतां येण्यासारखा आहे. ज्ञानाच्या प्रत्यक्ष क्रियेंतच ज्ञानवत्ताविषयक ज्या गोष्टी अंतर्भूत होतात, त्या गृहीत करून प्रत्येक तत्त्वमीमांसा-सरणींनें पुढें पाऊल टाकिलें पाहिजे, कारण अवयवांचा उपयोग केल्याशिवाय जसें शरीर हालावयाचें नाहीं, तशा ह्या गोष्टी गृहीत केल्याविना विचारशक्तीस कोणत्याहि निर्णयाकडे एक पाऊलहि टाकतां यावयाचें नाहीं, ही जी गोष्ट मीं सर्वत्र आग्रहपूर्वक प्रतिपादिलेली आहे, तिजकडे ते मुद्दाम दुर्लक्ष्य करितात. तत्त्वज्ञानविषयक कोणताहि मूलसिद्धान्त गृहीत करतांना जो विचारविषयक पहिलाच व्यापार करावा लागतो त्यांत कोणत्या गोष्टी अंतर्भूत होतात हा प्रश्न न करतां; आणि ह्या व्यापाराचा बरोबरपणा त्याच्या पूर्वींच्या कोणत्याहि गोष्टीनें सिद्ध करतां येत नसून, ह्या पहिल्या

व्यापारास अनुसरून पुढें जे सिद्धान्त निष्पन्न होतात ते सर्व सुसंगत आहेत असें दाखवून तो बरोबर म्हणून ठरवावा लागतो, हें सत्य ध्यानांत न आणतां; क्यांटियन टीकाकार आपल्या विवेचनास सुरुवात करितात. तुला स्मरतच असेल कीं मीं ' मानसशास्त्रा'त असें दाखविलें आहे कीं, ज्ञानवत्तेचें एकच सांगणें तिच्या कांहीं उलट सांगण्याविरुद्ध खरें म्हणून कां स्वीकारिलें जातें हा (एतद्विषयक) मुख्य प्रश्न आहे; आणि ज्ञानवत्तेच्या अवस्थांमध्यें कमी-ज्यास्त सुसंबद्धता कोणत्या अवस्थांमध्यें आहे हें पाहण्यापासून ह्या प्रश्नाचें उत्तर निघतें. ह्यावरून हें उघडच होतें कीं, क्यांट जसल्या सिद्धांन्तानीं (आपल्या तत्त्वमीमांसेस) सुरुवात करितो तसल्या सर्वांपेक्षां निरनिराळ्या सिद्धांन्तांमध्यें निवड करण्यास समर्थ करणारा जो हा आवश्यक निर्णायक (सिद्धान्त) तो ज्यास्त अधिकाराचा समजला पाहिजे. पण क्यांटचे अनुयायी हें सत्य ध्यानांत घेत नाहींत. आणि ज्या मूलसिद्धान्तापासून ते सुरुवात करितात, त्यांना अबाधित आधार आहे असें ते समजतात, म्हणजे ते सिद्धान्त ज्ञानवत्तेच्या ज्या सांगण्यापासून उत्पन्न होतात तेंच सांगणें बरोबर कां, आणि ज्ञानवत्तेचें उलट सांगणें बरोबर कां नाहीं, तें दाखवा असें आव्हान त्यांस कोणी करील, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहींसें दिसतें. क्यांटच्या अनुयायांना असें वाटतें कीं, " आपण इतर तत्त्वमीमांसांच्या पलीकडे गेलों आहों म्हणून आह्मांस त्यांच्याहिपलीकडे गेलें पाहिजे, आणि असें दाखविलें पाहिजे कीं, विचाराचा खरा सांचा ज्ञानवत्तेच्या अवस्थांमधील संबंध हा आहे, आणि विचाराची खरी सरणी (असल्या संबंधांच्या) जीवनार्थ चाललेल्या कलहांत ज्यास्त सुसंबद्ध संबंधांचा तगाव ही होय."

याच विषयाच्या संबंधानें ता० २२ जानेवारी १८८३ रोजीं क्रूम राबर्टसन यास तो लिहितोः—" 'क्यांटच्या मतांची पुनर्जागृति'

या नांवाचा ' एडिंबरो रिव्ह्यू ' च्या चालू अंकांत आलेला लेख तूं बहुधा वाचिला असशील. प्रो० वॉटसनच्या ग्रंथांतहि कांहीं टीका आलेल्या आहेत. म्हणून वरील लेखाचा व टीकांचा माझ्याशीं जेवढा संबंध येतो तेवढ्यापुरतें या बाबतींत दोन शब्द आपण लिहावेसें मला वाटतें. मी असा विचार केला आहे कीं, या वादांत हल्लीं पडावयाचें नाहीं, तर क्यांटच्या तत्त्वमीमांसेवर मीं घेतलेले आक्षेप त्यांच्या नजरेस आणावयाचे, आणि त्यांचें निरसन करा, म्हणजे मी तुम्हांस उत्तर देईन, असें त्यांस म्हणावयाचें; वॉटसन व इतर यांनीं काढिलेल्या मुद्याला उत्तर देण्याची माझी पूर्ण तयारी आहे; पण तें देण्याच्या कामीं आपला वेळ खर्चण्याच्या अगोदर, मीं काढिलेल्या मुद्यांना त्यांनीं उत्तर दिलें पाहिजे."

या संबंधानें तो डा० यूमन्स यास लिहितो:—" ' सेंटजेम्स ग्याझेट ' मध्यें एक पत्र मीं नुक्तेंच (ता० १४ फेब्रुवारी रोजीं) छापिलें, तें ज्यांत आहे तें त्या वर्तमानपत्राचें पान मी तुला ह्या पत्राबरोबर पाठवितों. ' एडिंबरो रिव्ह्यू ' ला हरताळ फांसण्याची संधी मला मिळाली ह्याचा आनंद वाटतो, आणि हेन्री जॉर्जचें मत मला कबूल नाहीं हें प्रसिद्धपणें सांगण्याची मला संधि सांपडली, याबद्दलहि मला वाईट वाटत नाहीं. " " सेंटजेम्स ग्याझेटांत " छापिलेल्या ह्या पत्रांत तो म्हणतो:—" मी आज एकतृतीयांश शतकपर्यंत ग्रंथ प्रसिद्ध करीत आहें; तेव्हां आतां त्या ' मुख्य टीकाकार पत्रा'स (' एडिंबरोरिव्ह्यू ' स) मी दिसलों ह्याबद्दल मीं त्या त्रैमासिकाचे आभार मानिले पाहिजेत असें मला वाटतें.....पण हें पाहून एरवीं जें मला आनंदाचें भरतें यावयाचें, त्यास दोन गोष्टींनीं खो येत आहे. एक गोष्ट ही कीं, ' एडिंबरो रिव्ह्यू ' नें मला स्वतः शोधून काढिलें नाहीं, तर हेन्री जॉर्जच्या ग्रंथांत माझ्या (सोश्यल स्टॅटिक्स या) ग्रंथांतील उतारे आले तेव्हां माझ्याकडे

त्याची (त्या रिव्ह्यूची) नजर गेली. आणि दुसरी गोष्ट ही कीं, मीं (सोश्यल स्टॅटिक्स शिवाय) अन्य ग्रंथ लिहिले आहेत आणि त्यांतील शेवटचा ' राजकीय संस्था ' हा असून त्यांत तो चर्चा करितो त्या प्रश्नासंबंधानें लिहिलेलें आहे, ह्याची जाणीव त्यांतील टीकालेख लिहिणारास असलेली दिसत नाहीं. अब्रूदार टीका करणाऱ्या वर्तमानपत्रांत लिहिणारे लेखक ग्रंथकाराच्या मतांचें अगदीं आलीकडील स्वरूप काय आहे तें नेहमीं पहात असतात. "

डेल्मानिकोच्या हाटेलांतील मेजवानीच्या वेळच्या त्याच्या भाषणावर अमेरिकेंतील वर्तमानपत्रांतून अद्यापि चर्चा चाललीच होती. " जीवित हें शिकण्यासाठीं नाहीं, किंवा काम करण्यासाठींहि नाहीं, पण शिकणें व काम करणें हीं जीवितासाठीं आहेत, " हें त्याचें म्हणणें बरोबर आहे कीं नाहीं ह्याबद्दलच तिकडे वाद माजला असें नाहीं, तर हें म्हणणें नवें आहे किंवा नाहीं ह्याबद्दलहि माजला. त्या भाषणांत स्पेन्सर असें म्हणाला होता कीं, " उद्योगाचा उपदेश आपल्याला जरासा फाजीलच झालेला आहे, आतां विश्रांतीचा उपदेश करण्याची वेळ आली आहे. " यावर, स्पेन्सरच्या पूर्वीं, एका ग्रंथांत मीं हेंच म्हटलें आहे, असें एक अमेरिकन डाक्टर म्हणूं लागला. तेव्हां स्पेन्सरचें हें म्हणणें आलीकडील नसून आपण तें त्याच्या तोंडून पुष्कळ वर्षांपूर्वीं ऐकिलेलें आहे, आणि तें त्याच्या उत्क्रान्तिविषयक विचारांपासूनच उत्पन्न झालेलें आहे, असें त्या गृहस्थाच्या नजरेस आणणें डा० यूमन्स यास भाग पडलें.

त्याच्या ह्या भाषणाचा एक परिणाम हा झाला कीं, न्यूयॉर्क एथें एक विश्रान्ति-क्लब स्थापन झाला, व त्याचा तो सन्मानीय सभासद बनला. पण त्या क्लबांत संभाषणें गंभीर विषयांवर चालतात असें त्याच्या कानीं आलें. तेव्हां विश्रान्तीच्या दृष्टीनें तीं योग्य नाहींत असें त्यांस कळविणें याला भाग पडलें.

या सुमारास बर्मिंघाम एथील ‘ नॅचरल हिस्टरी सोसैटी ’ नामक सभेनें समाजशास्त्रविषयक एक शाखा स्थापण्याचें ठरविलें. या सभेचा स्पेन्सर सन्मान्य उपाध्यक्ष असून ह्या चळवळीमुळें कॉलिन्सशीं त्याची प्रथम ओळख झाली (त्यानें स्पेन्सरच्या सर्व ग्रंथांचा एक सारभूत ग्रंथ तयार केलेला आहे). असलीच शाखा अमेरिकेंत स्थापणें इष्ट आहे असें जेव्हां स्पेन्सरनें यूमन्स यास लिहिलें, तेव्हां तो त्यास उलट लिहितो कीं, “ न्यूयॉर्क एथें असली सभा स्थापण्याचें आज माझ्या मनांत पुष्कळ दिवस आहे, पण ती गोष्ट घडवून आणण्याचा मार्ग अद्यापि मला दिसत नाहीं; कोणत्याहि गोष्टीस सुरवात करण्यांत सर्वांत हें शहर ज्यास्त सोईचें आहे, पण ती चालू ठेवण्यास सर्वांत ज्यास्त अडचणीचें आहे. ”

ता० १२ एप्रिल १८८३ रोजीं स्पेन्सर यूमन्स यास लिहितोः— “ एथील जपानी वकिलानें मला परवां एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट सांगितली; ती ही कीं, त्यांनीं “ नीतिशास्त्राचे आधारस्तंभ ” या ग्रंथाचें भाषान्तर जपानी भाषेंत प्रसिद्ध केलें आहे. या गोष्टीची आठवण तूं त्या ग्रंथाच्या स्वस्त आवृत्तीस उल्लेख केलास यावरून झाली. त्या ग्रंथांतील कांहीं शब्दांचें जपानींत भाषान्तर करावयास त्यांस किती त्रास पडला असेल हें मनांत येऊन मला जरा मजाच वाटली. माझ्या असेंहि मनांत आलें कीं, त्यांची कल्पनासामग्रीहि बेताचीच असल्यामुळें त्यांना माझा कोटिक्रम समजण्यास कठीण जाईल. पण ते चाणाक्ष लोक आहेत.....माझ्या निबंधसंग्रहाची अखेरची आवृत्ति तयार करावयास जरूर ती योजना मी मुकाट्यानें करावयास लागलों आहें.....ती योजना एवढीच कीं अथीनियम क्लबास जातांना तपासण्याकरितां एक पान बरोबर घ्यावयाचें, आणि तेथें असतां तिसऱ्या प्रहराचा अर्धा तास तें सुधारण्यांत घालवावयाचा.....अशा रीतीनें दुसरें काम पुरें होण्याच्या सुमारास हें सुधारण्याचें काम

संपून जाईल. दुसरें काम संपवावयाचें मी म्हणतों तें मुख्यत्वेंकरून ' समाजशास्त्रा'च्या पहिल्या खंडाची नवी आवृत्ति काढण्यासंबंधानें होय. त्या आवृत्तीस, तो ग्रंथ लिहितांना ज्या ग्रंथाचे आधार घेतले आहेत त्यांची पूर्णजंत्री जोडावयाची आहे.....या कामासाठीं मी अथीनियम क्लबाचा तज्ञ लायब्रेरियन याच्याशीं ते सर्व तपासून जरूर तेथें शुद्ध करून घेण्याचा ठराव करीत आहें. तो फार हुशार व विद्वान् आहे. "

लॉर्ड पेम्ब्रोकनें एका मासिकांत एक लेख लिहून त्यांत स्पेन्सरच्या कांहीं मतांवर टीका केली होती. त्यासंबंधानें त्यानें त्यास ता० २ मे १८८३ रोजीं असें लिहिलें:–(आपल्या म्हणण्याच्या) "तूं स्पष्टीकरणार्थ जें पत्र पाठविलेंस, व त्यावरून मजविषयीं तुझी जी कृपाबुद्धि दिसून येते तिजबद्दल मी तुझा फार आभारी आहें; आणि अशी कृपाबुद्धि तुझ्या ठायीं नसती तर असें हें स्पष्टीकरण करणें जरूर म्हणून तुला वाटलेंच नसतें हें ध्यानांत येऊन मला तुजबद्दल ज्यास्तच कृतज्ञता वाटते. खाजगी स्नेहसंबंधामुळें इतरांवर प्रसिद्धपणें मनःपूर्वक टीका करण्यास मीं स्वतः कधीं कमी केलेलें नसल्यामुळें, लोकांनीं मजवरहि तशीच टीका करावी, अशी मी अपेक्षा करितों, आणि टीका न्याय्य रीतीनें केलेली असली म्हणजे मग ती कितीहि कडक असली तरी त्याजबद्दल मला राग आल्याचें मला आठवत नाहीं. उलट, महत्त्वाच्या बाबतींत दुसऱ्याशीं आपला मतविरोध असल्यास तो दर्शविणें हें मी आपलें कर्तव्य समजत असल्यामुळें, इतरांनींहि तसल्याच बाबतींत माझ्याशीं त्यांचा मतविरोध असल्यास तो दर्शविणें, अर्थात्, मी त्यांचें कर्तव्यच समजतों. आणि हीहि गोष्ट माझ्या पूर्णपणें ध्यानांत आहे कीं, तुझ्या प्रमाणें जे, जेथें कृति करावी लागते आणि म्हणून निश्चित विचार करावे लागतात अशा जागीं असतात, त्यांना ज्या समजुती चुकी-

या सुमारास बर्मिंघाम एथील ' नॅचरल हिस्टरी सोसैटी ' नामक सभेनें समाजशास्त्रविषयक एक शाखा स्थापण्याचें ठरविलें. या सभेचा स्पेन्सर सन्मान्य उपाध्यक्ष असून ह्या चळवळीमुळें कॉलिन्सशीं त्याची प्रथम ओळख झाली (त्यानें स्पेन्सरच्या सर्व ग्रंथांचा एक सारभूत ग्रंथ तयार केलेला आहे). असलीच शाखा अमेरिकेंत स्थापणें इष्ट आहे असें जेव्हां स्पेन्सरनें यूमन्स यास लिहिलें, तेव्हां तो त्यास उलट लिहितो कीं, " न्यूयॉर्क एथें असली सभा स्थापण्याचें आज माझ्या मनांत पुष्कळ दिवस आहे, पण ती गोष्ट घडवून आणण्याचा मार्ग अद्यापि मला दिसत नाहीं; कोणत्याहि गोष्टीस सुरवात करण्यांत सर्वांत हें शहर ज्यास्त सोईचें आहे, पण ती चालू ठेवण्यास सर्वांत ज्यास्त अडचणीचें आहे. "

ता० १२ एप्रिल १८८३ रोजीं स्पेन्सर यूमन्स यास लिहितोः— " एथील जपानी वकिलानें मला परवां एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट सांगितली; ती ही कीं, त्यांनीं " नीतिशास्त्राचे आधारस्तंभ " या ग्रंथाचें भाषान्तर जपानी भाषेंत प्रसिद्ध केलें आहे. या गोष्टीची आठवण तूं त्या ग्रंथाच्या स्वस्त आवृत्तीस उल्लेख केलास यावरून झाली. त्या ग्रंथांतील कांहीं शब्दांचें जपानींत भाषान्तर करावयास त्यांस किती त्रास पडला असेल हें मनांत येऊन मला जरा मजाच वाटली. माझ्या असेंहि मनांत आलें कीं, त्यांची कल्पनासामग्रीहि बेताचीच असल्यामुळें त्यांना माझा कोटिक्रम समजण्यास कठिण जाईल. पण ते चाणाक्ष लोक आहेत.....माझ्या निबंधसंग्रहाची अखेरची आवृत्ति तयार करावयास जरूर ती योजना मी मुकाट्यानें करावयास लागलों आहें.....ती योजना एवढीच कीं अथीनियम क्लबास जातांना तपासण्याकरितां एक पान बरोबर न्यावयाचें, आणि तेथें असतां तिसऱ्या प्रहराचा अर्धा तास तें सुधारण्यांत घालवावयाचा.....अशा रीतीनें दुसरें काम पुरें होण्याच्या सुमारास हें सुधारण्याचें काम

संपून जाईल. दुसरें काम संपवावयाचें मी म्हणतों तें मुख्यत्वेंकरून 'समाजशास्त्रा'च्या पहिल्या खंडाची नवी आवृत्ति काढण्यासंबंधानें होय. त्या आवृत्तीस, तो ग्रंथ लिहितांना ज्या ग्रंथाचे आधार घेतले आहेत त्यांची पूर्णजंत्री जोडावयाची आहे.....या कामासाठीं मी अथीनियम क्लबाचा तज्ज्ञ लायब्रेरियन याच्याशीं ते सर्व तपासून जरूर तेथें शुद्ध करून घेण्याचा ठराव करीत आहें. तो फार हुशार व विद्वान् आहे."

लॉर्ड पेम्ब्रोकनें एका मासिकांत एक लेख लिहून त्यांत स्पेन्सरच्या कांहीं मतांवर टीका केली होती. त्यासंबंधानें त्यानें त्यास ता० २ मे १८८३ रोजीं असें लिहिलें:-(आपल्या म्हणण्याच्या) "तूं स्पष्टीकरणार्थ जें पत्र पाठविलेंस, व त्यावरून मजविषयीं तुझी जी कृपाबुद्धि दिसून येते तिजबद्दल मी तुझा फार आभारी आहें; आणि अशी कृपाबुद्धि तुझ्या ठायीं नसती तर असें हें स्पष्टीकरण करणें जरूर म्हणून तुला वाटलेंच नसतें हें ध्यानांत येऊन मला तुजबद्दल ज्यास्तच कृतज्ञता वाटते. खाजगी स्नेहसंबंधामुळें इतरांवर प्रसिद्धपणें मनःपूर्वक टीका करण्यास मीं स्वतः कधीं कमी केलेलें नसल्यामुळें, लोकांनीं मजवरहि तशीच टीका करावी, अशी मी अपेक्षा करितों, आणि टीका न्याय्य रीतीनें केलेली असली म्हणजे मग ती कितीहि कडक असली तरी त्याजबद्दल मला राग आल्याचें मला आठवत नाहीं. उलट, महत्त्वाच्या बाबतींत दुसऱ्याशीं आपला मतविरोध असल्यास तो दर्शविणें हें मी आपलें कर्तव्य समजत असल्यामुळें, इतरांनींहि तसल्याच बाबतींत माझ्याशीं त्यांचा मतविरोध असल्यास तो दर्शविणें, अर्थात्, मी त्यांचें कर्तव्यच समजतों. आणि हीहि गोष्ट माझ्या पूर्णपणें ध्यानांत आहे कीं, तुझ्याप्रमाणें जे, जेथें कृति करावी लागते आणि म्हणून निश्चित विचार करावे लागतात अशा जागीं असतात, त्यांना ज्या समजुती चुकी-

च्या वाटतील त्यांच्याशीं विरोध दर्शविणें, आणि महत्त्वाच्या बाबतींत, इतरांच्या हितासाठीं, त्या विरोधाचीं कारणें प्रसिद्धपणें सांगणें, हें त्यांचें सार्वजनिक कर्तव्य होय. प्रत्येकास जें सत्य म्हणून वाटतें तें जेव्हां तो बोलून दाखवील, व इतरांकडून तें मान्य करून घेण्याची खटपट करील, आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या सामान्य मतास योग्य ते परिणाम घडवूं देईल, तेव्हांच सुस्थिति उत्पन्न होईल, असें मीं आग्रहानें प्रतिपादिलेलें आहे. ”

ता० १७ मे रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—“ ‘आध्यात्मिक जगांत नैसर्गिक कायदा ’ या नांवाचें हेन्री ड्रमंडनें केलेलें एक पुस्तक मीं नुक्तेंच ‘ आर्थीनियम ’ क्लबांत चाळिलें. त्यांत माझीं कांहीं मतें आणि कांहीं आध्यात्मिक म्हणून समजलेले नियम ह्यांच्यांत सुसंगतता दाखवून मला एकप्रकारच्या धर्ममताच्या मण्डनार्थ ओढण्याचा बराच प्रयत्न केलेला आढळून आला. जीं संक्रमणात्मक पुस्तकें हल्लीं उपयोगाचीं आहेत तशा पुस्तकांचा त्याचें पुस्तक हा एक ध्यानांत ठेवण्यासारखा मासला आहे. मला असें सुचतें कीं, तो ग्रंथकार मला आपल्या उद्देशसिध्द्यर्थ आपल्याकडे ओढीत असतां, आपणहि आमच्या उद्देशसिध्द्यर्थ त्याला आपल्याकडे ओढणें फायद्याचें होईल. (म्हणून) त्या पुस्तकाकडे नजर फेंक, आणि तसें करतां येईल किंवा नाहीं तें पहा. आजच्या टपालांतून कालच्या ‘ स्टँडर्ड ’ ची (एक वर्तमानपत्र) एक प्रत मी तुला पाठवीत आहें, त्यांत फ्रेंच आकाडेमींत (फ्रान्सांतील एक विद्वत्सभा) मला निवडिलें याबद्दल एक लेख तुला आढळून येईल. ‘ पेलमेल ग्यॅझेट’चा एक तुकडा त्यालाच चिकटवून मी पाठवीत आहें, त्यांत या निवडणुकीबद्दल निराळीच हकीकत दिलेली आहे, व ती, मला वाटतें, बरोबर आहे. ती जर बरोबर असेल,—आणि ती तशी आहे किंवा नाहीं ही बातमी काढण्याची खटपट मी करीत आहें,—तर

तिजवरून असें दिसतें कीं इमरसन मेल्यानें सभासदांच्या वरच्या रांगेंत रिकामी झालेली जागा सर हेन्री मेन यास खालच्या रांगेंतून वर चढवून भरली आहे, आणि खालच्या रांगेंत रिकामी झालेली जागा स्वीकारावयास मला निमंत्रण केलें आहे. मीं जर ती स्वीकारिली, तर आमच्या दोघांच्या हक्काची ही केलेली किंमत मी बरोबर समजतों असा त्याचा अर्थ होईल. सर हेन्री मेन माझ्यापेक्षां (वयानें) दोन वर्षांनीं लहान आहे, आणि ग्रंथकार या नात्यानें माझ्यापेक्षां दहा वर्षांनीं लहान आहे, म्हणून तो माझ्यापेक्षां मोठा आहे असें कोणत्याच दृष्टीनें म्हणतां येणार नाहीं; तर, मग, अर्थात्, ही निवड हा आमच्या दोघांच्या कमज्यास्त योग्यतेचा प्रश्न ठरतो.....(म्हणून या बाबतींत) मी एक दोन दिवस जरा कांकूं करीत आहें.....मला २७ विरुद्ध २ अशा फार मोठ्या बहुमतानें निवडलें आहे, आणि अशी निवड नाकारणें बरें दिसणार नाहीं, ह्या गोष्टी ध्यानांत आणून पूर्वीं जें मीं नाकारिलें होतें तें स्वीकारण्याचें विसंगत वर्तन करण्याकडे माझ्या मनाचा थोडासा कल होत आहे. परंतु मला सर हेन्रीच्या खालच्या रांगेंत घालण्याचा जो त्या मंडळाचा विचार, तो जर मीं कबूल करावा म्हणून मला सांगण्यांत आलें, तर पूर्वीं मनांत आणिलेला क्रम स्वीकारावा (ती पदवी नको म्हणावी) असेंहि मला फार फार वाटतें. ''

ता० २४ मे रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—'' मीं आज फ्रेंच आकाडेमीला लिहिलेलें पत्र (त्याची नक्कल) तुजकडे पाठवीत आहें; त्या पत्रांत मला कॉरेस्पांडेंट (सभासद) निवडून त्यांनीं मला दिलेला नांवाचा मान,मीं नाकारिला आहे....त्या सभेच्या सेक्रेटरीकडून मला पुढील पत्र आलें आहेः—'' महाराज, मला तुम्हांस असें कळवावयाचा मान मिळाला आहे कीं,:आज ता० १२ मे रोजीं, भरलेल्या सभेंत नैतिक व राजकीय शास्त्रांच्या मंडळानें, मृत मि० टापमन याच्या

जागीं, तत्त्वज्ञानशाखेंत, तुम्हांस कॉरेस्पॉंडेंट निवडिलें. "....कांहीं असलें तरी खरी गोष्ट अशी आहे कीं, इमर्सनच्या मरणानें 'आ-सोशिएट' या वर्गामध्यें जागा रिकामी झाल्यामुळें, सर हेन्री मेनला 'कॉरेस्पॉंडेंट' या यादींतून ती जागा भरण्यासाठीं बढती दिली आहे; आणि त्या यादींत टॉपमनची रिकामी जागा भरण्याकरितां मला घेतलें आहे. "हा मि० टॉपमन कोण ?" असें जो तो विचारूं लागेल..... मला वाटतें, हें सर्व कृत्य इतकें अयुक्तिक आहे कीं, त्याच्या योगानें केवळ फ्रेंच आकाडेमीवर नव्हे, तर एकंदर आ-काडेम्यांच्या निवडींवर, चुरचुरीत टीका करण्याकरितां मला चांगली संधि सांपडली आहे."

ही संधि साधून त्या आकाडेमीचा सेक्रेटरी जूल्स सायमन यास त्याच महिन्यांत त्यानें असें पत्र लिहिलें:—"मृत मि० टापमन याच्या जागीं तत्त्वज्ञान-शाखेंत मला नैतिक व राजकीय शास्त्रांच्या सभेनें कॉ-रेस्पांडेंट निवडिल्याचें कळविण्याकरितां तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. या योजिलेल्या सन्मानाबद्दल आभारवचनांबरोबर, तो नाकारण्यास मला भाग पडणारीं पुढील कारणें आकाडेमीच्या सभासदांना कळ-विण्याची मेहरबानी करावी. एथें मला सरासरी बारा वर्षांपूर्वी एक सन्मान-पदवी देत होते; त्या वेळीं मीं योजिलेल्या शब्दांनीं त्यां-पैकीं पहिलें कारण देणें सोईचें पडेल. ते शब्द असे:—"तथापि, मला वाटतें, जी पदवी मला द्यावी म्हणून प्रोफेसरलोक सुचवि-तात ती स्वीकारण्याच्या मार्गांत, सन्मान्य पदव्यांच्या परिणामांच्या संबंधानें कांहीं दृढ समज मजमध्यें आज पुष्कळ दिवस वाढत आहेत ते आड येतील. माझ्या मनाचा असा सिद्धान्त झाला आहे कीं, अशा प्र-कारच्या सन्मान्य पदव्या बौद्धिक पराक्रम करण्यास उत्तेजक म्हणून जरी दिसतात, तरी, खरोखर, आपल्या अप्रत्यक्ष परिणामांनीं त्या गैर उत्तेजक बनतात. योग्य निवड करणें शक्य आहे असें कल्पून,

चांगल्या होतकरू लोकांस त्यांच्याकडे सामान्य जनाचें लक्ष्य जाईल अशा पदव्या असल्या विद्वत्सभेकडून मिळाल्यास त्यांस फार मदत होईल, आणि प्रसिद्ध माणसांविषयीं अनुकूल पूर्वग्रह बनलेल्या समाजामध्यें प्रतिकूल परिस्थितींत झगडतांना बुडण्यापासून त्यांचा बचाव होईल, ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत येते. पण असल्या अडचणी घातक ठरल्या नाहींत तर त्यांतून पार पडेपर्यंत असली (पदव्यांच्या रूपाची) मदत नूतन ग्रंथकारांस सामान्यतः मिळत नाहीं.

ह्यावर कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, सन्माननीय पदव्या लवकर दिल्या असतां जितक्या फायदेशीर होतील तितक्या फायदेशीर (उशीरां दिल्यानें) बहुधा होत नाहींत म्हणून, त्या (उशीरां) दिल्या असतां गैरफायदेशीर होतात असें त्यावरून ठरत नाहीं. पण, मला वाटतें कीं, ज्या ज्यास्त वयाच्या माणसांस त्या देतात त्यांच्यावर (ह्या दानापासून) होणाऱ्या प्रत्यक्ष परिणामांच्या ऐवजीं, ज्या तरुण माणसांना त्या मिळाल्या नाहींत त्यांवर होणाऱ्या अप्रत्यक्ष परिणामाकडे पाहिलें तर आपल्यास असें दिसून येईल कीं, वस्तुतः, त्या त्यांच्या यशप्राप्तीच्या मार्गांत एक नवीन अडचण उत्पन्न करितात. ज्यांची अधिकारयुक्तता स्थापन झालेली आहे, त्यांबरोबर, असली योग्यता ज्याची स्थापन झालेली नाहीं असा मनुष्य, प्रतिस्पर्धा करण्यास जेव्हां बौद्धिक समरांगणांत (प्रथम) शिरतो, तेव्हां त्याच्या मार्गांत येणारे अडथळे नेहमींच फार मोठे असतात. (इतरांनीं) ऐकण्यास योग्य असें सांगण्यासारखें त्याच्यापाशीं कांहींच नसेल हा संभव इतका मोठा असतो कीं, पुष्कळ कालपर्यंत जितकें लक्ष्य ओढून घेण्याची त्याची खरोखर योग्यता असेल तितकें लक्ष्य देखील त्याच्याकडे बहुधा कोणी देत नाहीं. पण स्वताला किंमतीचा छाप मिळालेला नसतां, त्यास जेव्हां जे लोक पराक्रम केलेले म्हणून गाजलेले असून शिवाय

असला हा छाप मिळविलेले असतात, अशांशीं स्पर्धा करण्याचा प्रसंग येतो, तेव्हां वरील अनिवार्य अडचण मुद्दाम ज्यास्त मोठी केल्यासारखी होते. वाचणारें मोठें जग, आणि त्याचें मार्गदर्शक टीका करणारें लहान जग, ह्या दोघांचाहि सन्मान्य पदव्या ज्यांना असतील त्यांना अनुकूल असा फारच मोठा पूर्वग्रह बनत असतो. म्हणून असली सन्मान्य पदवी धारण करणाराला तिजपासून जसा हा प्रत्यक्ष फायदा होतो, तसा तिच्या अभावापासून ती धारण न करणाऱ्याचा त्यामुळें प्रत्यक्ष तोटा होतो. ह्या पद्धतीपासून उत्पन्न होणारीं हीं नुकसानें मला स्वताच्या अनुभवानें माझ्या कारकीर्दीच्या पहिल्या अमदानींत माहीत झालीं. शिवाय तिजपासून एवढींच नुकसानें उत्पन्न होतात असेंहि नाहीं. ज्यांस असल्या सन्मानीय पदव्या युनिव्हर्सिटच्या व आकाडेम्या यांजकडून मिळत नाहींत त्यांची गोष्ट एकीकडे ठेवून ज्यांस त्या मिळतात त्यांचीच गोष्ट जरी ध्यानांत घेतली, तरी, मला वाटतें, असें दाखवितां येईल कीं, त्या पदव्यांच्या वांटणीपासून व्यक्तींना अन्याय होतात, व सार्वजनिक नुकसानें होतात. ज्यांना ह्या पदव्या द्यावयाच्या त्यांची निवड अगदीं योग्य रीतीनें केली, किंवा हल्लीं प्रत्यक्ष झालेली दिसते तशी केली, तरी हें झालेंच पाहिजे. अशी कल्पना करूं कीं, पदव्या घेणारांची निवड अगदीं प्रामाणिकपणें व उत्तम विचारानें केली आहे; तरी कोणत्याहि असल्या पदव्या धारण करणारांची संख्या इतकी मोठी असणार कीं, त्यांच्या समूहापैकीं वर असलेले थोडे आणि खालीं असलेले पुष्कळ ह्यांमध्यें, ह्या पदविला त्यांच्या हक्काच्या दृष्टीनें पाहतां, फार मोठा फरक असणार; आणि असें असूनहि, (त्या पदव्यामुळें) सुशिक्षित लोकांच्या [बिनपदवीवाल्या] मोठ्या समूहापासून भिन्न म्हणून समजले जाण्यास, ते पुष्कळ त्या थोडक्यांइतकेच योग्य आहेतसे दिस-

णार. ह्या पदव्यांचा समाजाच्या मनावर जर कांहीं परिणाम होत असेल (आणि होत नसेल तर त्या निरर्थकच होत), तर हा होतो कीं, त्या ज्यांस मिळतात ते सर्व सारखे समजले जाण्याकडे अवश्यच समाजाची मनःप्रवृत्ति होते; व त्यामुळें अर्थात् कनिष्ठ (लेखक) वास्तविक असतील त्यांहून मोठे समजले जातात. आणि श्रेष्ठ ग्रंथकार वास्तविक असतील त्याहून लहान समजले जातात. (योग्य निवड झाली तरी असे दुष्परिणाम उत्पन्न होतात.) पण, मला वाटतें, ही निवड योग्य गुणाभिरुचि किंवा पूर्वग्रहविहीन मनोभाव ह्यांस अनुसरून केली जात नाहीं, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. कधीं कधीं ही निवड व्यक्तिविषयक आवडनावड ह्यांस अनुसरून होत असून धर्मविषयक पूर्वग्रहाप्रमाणें पुष्कळ अंशीं, व राजकीय पूर्वग्रहाप्रमाणें बऱ्याच अंशीं, खात्रीनें बरी होत असते. शिवाय, विशिष्ट आकाडेमींतील किंवा युनिव्हर्सिटींतील प्रमुख माणसांना शास्त्रीय किंवा वाङ्मयात्मक जी विचारसरणी आवडत असेल तिचाहि पगडा या निवडीवर बसतोच. आणि ज्या अर्थीं प्रत्येक स्थापित मंडळ पुराणप्रिय बनत जातें त्या अर्थीं ज्या पदव्या ते देणार त्या अशा रीतीनें देणार कीं, पुराणमतांच्या पोशिंद्यांना (त्यांपासून) उत्तेजन मिळावें, आणि त्या मतांऐवजीं उत्पन्न होत जाणारीं जीं नवीं मतें त्यांच्या पुरस्कर्त्यांस धक्का बसावा. ह्या सर्व कारणांच्या सहकार्यानें ज्या भलत्याच निवडी होतात त्या सुप्रसिद्ध आहेत. आमच्या इंग्लिश व स्कॉच युनिव्हर्सिट्यांच्या क्यालेंडरांतील ' एल्. एल्. डी ' किंवा ' डी. सी. एल्. ' हीं अक्षरें लाविलेलीं पांचशेंहून अधिक नांवें जो वाचील, त्यास इतक्या अप्रसिद्ध माणसांबरोबर इतक्या नामांकित माणसांची एकाच (पदवीरूप) पट्ट्यानें सांगड घालण्याच्या ह्या दैवदुर्विलसिताकडे पाहून हंसू आल्याशिवाय रहाणार नाहीं. आणि यूरोपीय इतर देशांतील आ-

काडेम्यांनीं दिलेल्या पदव्या धारण करणारांमध्यें योग्यता किंवा पराक्रम यांच्यासंबंधानें जरी इतके आत्यंतिक भेद नसले तरी सहज लक्ष्यांत येण्यासारखे ते असतात. पण व्यक्तीच्या योग्यतेवर ह्याचा जो परिणाम होतो तोच केवळ किंवा मुख्यत्वेंकरून आक्षेपार्ह आहे असें नाहीं; तर, सार्वजनिक मतावर तेणेंकरून न होणारा जो परिणाम तो त्याच्याहूनहि ज्यास्त आक्षेपार्ह आहे. जनसमूह आपलीं मतें बाबावाक्याप्रमाणें बनवीत असतात; आणि म्हणून ज्या मतांवर एकाद्या आकाडेमीचा किंवा युनिव्हर्सिटीचा छाप बसला असेल तीं मतें, जीं मतें तिनें स्पष्टरीत्या किंवा गर्भितरीत्या त्याज्य ठरविलीं असतील त्यांहून, जनसमूहास ज्यास्त ग्राह्य वाटतात. म्हणून नव्या कल्पनांनीं जुन्यांना जिंकण्याचा जो प्रत्येक संक्रमण काल, त्या कालीं, असल्या मंडळानें जुन्यांच्या संरक्षकांस दिलेल्या सन्मान्य-पदव्या, सहजच, ह्या रूपान्तराला (विजयाला) अडथळा करितात.

मला असें म्हणणेंहि जरूर दिसतें कीं, जेव्हां आकाडेम्या परकी सभासदांचे दोन वर्ग बनवितात, तेव्हां तर हे तोटे ज्यास्तच वाढतात; कारण, कोणाला ह्या वर्गांत आणि कोणाला त्या वर्गांत निवडून तशा रीतीनें त्या त्यांच्या योग्यतांबद्दल निर्णय करून टाकितात, किंवा टाकितातशा दिसतात; व अशा रीतीनें लोकांचें त्यांच्या लेखाबद्दल किंवा मतांबद्दल होणारें जें मत त्यास विशिष्ट वळण लावितात. वर सांगितलेल्या कारणांसारख्या कारणांवरून, ह्या आकाडेम्या असल्या माणसांच्या योग्यतांचे जे अंदाज करितात, ते पुष्कळ वेळां चुकीचे असतात, आणि त्यामुळें ते लोकांस भुलवून टाकितात. हीं सामान्य कारणें माझ्या मनांत येत असून त्यांखेरीज एक विशिष्ट कारणहि माझ्या मनांत येतें. परकी आकाडेम्यांनीं मला देऊं केलेली ‘ कॉरेस्पांडेंट ’ ही पदवी मीं तीनदां नाकारिलेली आहे. उघडच, ह्या तीन आकाडेम्यांचा अपमान

केल्याखेरीज फ्रेंच आकाडेमीची ही पदवी मला स्वीकारतां येत नाहीं. हें करणें ज्या अर्थी अयोग्य होईल, त्या अर्थी पूर्वीचा क्रम चालू ठेवणें आणि तुमची पदवी नको म्हणणें ह्याखेरीज दुसरा मार्ग मला दिसत नाहीं; तुमच्या आकाडेमीच्या सभासदांनीं मला एवढ्या मोठ्या बहुमतानें निवडून ठळक रीतीनें आपली सहानुभूति आणि कमी प्रमाणानें आपली पसंतीहि व्यक्त केली आहे, ही गोष्ट माझ्या ध्यानांत असल्यामुळें, अशा दांडगेपणाच्या दिसणाऱ्या रीतीनें त्यांस नाहीं म्हणणें मला भाग पडावें ह्याचें वाईट वाटतें. पण तुमच्या लक्ष्यांत येईल कीं मला नको म्हणावयास लावणारीं कारणें बळकट आहेत, आणि त्यांपैकीं शेवटचें कारण तर अनिवार्यच आहे. ”

जुलईचा पहिला पंध्रवडा त्यानें इन्व्हेरोराम् एथें घालविला, पण, हक्स्ले रॉयल सोसायटीचा सभासद निवडिला गेला होता त्या-बद्दल त्यास अभिनंदनपत्रासहित पाठविण्यास, तेथें त्यास एक देखील ' सामन ' मासा सांपडला नाहीं. आर्डटार्निश एथें कांहीं आठवडे घालवून तो घराकडे परतला. मार्गात एडिंबरोहून ता० ११ आगस्ट रोजीं मिस् फ्लोरा स्मिथ हीस लिहितो:–“मी जेव्हां आर्ड-टार्निशहून परतलों तेव्हां, तेथें मी इतके सुखाचे दिवस इतक्या ममताळू मित्रांच्या सहवासांत घालविले असल्यामुळें, त्या जाग्याकडे पाहून माझ्या डोळ्यांस पाणी आलें, कारण मला असें वाटलें कीं तेथें माझे पाय पुन: लागावयाचे नाहींत. कारण मला अशी भीति पडली आहे कीं, माझी प्रकृति लवकरच अगदीं बिघडणार, आणि मंडळींत रा-हण्यास किंवा दुसऱ्या कोणत्याहि कामास मी नालायक होणार. म्हणून, तुम्हीं माझ्याबद्दल जी अंत:करणपूर्वक सहानुभूति दाखविली व माझ्या कल्याणाची चिंता वाहिली, त्याचा विचार मनांत येऊन दु:खांत सुख वाटलें; आणि त्याबद्दल मला नेहमीं कृतज्ञतापूर्वक स्मरण राहील. ”

ता० २१ आगस्ट रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—" एकाच पोस्टांतून खालच्या जगांतून [दक्षिण गोलार्धांतून] तीन पत्रें मला आलीं, एक आस्ट्रेलियांतील एका पक्क्या शिष्याकडून, आणि दुसरीं दोन न्यूझीलंदमधून कोलियर व सर जॉर्ज ग्रे यांजकडून; दोहोंतहि तेथें माझ्या मताचा प्रसार होत असल्याचें वर्णन आहे. लंदन सोडल्यापासून माझ्या हातून फारच थोडें काम होत असून तें सर्व माझ्या निबंधसंग्रहाच्या सुधारण्याच्या संबंधानें मीं केलेलें आहे. ' गानाची उत्पत्ति व कार्य ' ह्याला मी एक महत्त्वाची पूरणिका जोडणार आहें. त्या पूरणिकेंत डार्विनच्या म्हणण्याविरुद्ध मी आपल्या मताचें मंडन करणार असून डार्विनच्या कृतीवर सामान्य टीका अशी कांहीं करणार आहें कीं, तेणेंकरून त्याचे निःसीम अनुयायांत बरीच गडबड उडून जाईल. ही गोष्ट आज कित्येक दिवस करण्याचें मीं योजिलें होतें, पण तो तितक्यांत मेल्यामुळें कांहीं दिवस ती लांबणीवर टाकणें मला इष्ट वाटलें. म्हणून सरासरी एक वर्षानें मी हें काम करीन म्हणतों. "

स्टँडिश एथें दोन आठवडे घालवून तेथें तो लॉनटेनिस, बिलियर्डस् वगैरे पुष्कळ खेळ खेळला, आणि नंतर मिस् बीआट्रिस पॉटर हीस लिहितोः—" खेळाचें औषध आणि दुसरीं कारणें ह्यांनीं माझा चांगला फायदा झाला आहे, आणि काल हक्स्लेकडे मी म्हणत होतों त्याप्रमाणें, मी जर तरुण असतों, आणि धाडशी असतों, तर ह्या उपायानें रोग्यांस बरें करण्याचा दवाखाना मीं स्थापिला असता. "

१८८३ च्या सपटंबरांत तो यूमन्स यास लिहितोः—" ' विधिविषयक संस्था ' ह्याची दुसरी आवृत्ति तयार करण्यासाठीं मला हा ग्रंथ (आत्मचरित) तितकाच ठेवावा लागत आहे. कायम ठशाच्या पानांत कांहीं फेरबदल करणें जरूर आहे, कारण टायल-

रनें रॉयल इन्स्टिटयूशनमध्यें एका व्याख्यानांत जी मजवर टीका केली आहे किंवा मजवर लांबलचक हल्ला केला आहे, व जो म्याकमिलनच्या मासिकांत (मे १८८२) छापिला आहे, तो मला खोडून काढावयाचा आहे. मला वाटतें, त्याची एकच टीका कायती बरोबर आहे. "

ता० ३ आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितो:—" आह्मी (इंग्लिश लोक) सोश्यालिस्ट मताच्या धोपट मार्गास लागलों आहों, आणि त्या दिशेनें चाललेल्या आमच्या गतीस अडथळा होईलसें मला दिसत नाहीं. उलट, मला असें वाटतें कीं जें प्रत्येक पाऊल आह्मी टाकीत आहों, त्यानें ती लाट उलटणें ज्यास्त कठीण होत आहे; कारण तिला विरोध करणारा लोकसमूह अधिक अधिक दुर्बल होत चालला आहेसें वाटतें. "

ता० १३ नवंबर: —" मी बहुतकरून राजकीय विषयावर चार निबंध लिहिण्याचें कबूल करीन. हल्लीं कम्युनिस्ट (सोश्यालिस्ट) मताकडे इतक्या झपाट्यानें लोकप्रवृत्ति होत आहे कीं आज कित्येक दिवस तिजमुळें मला ज्यास्त ज्यास्त क्रोध येत चालला आहे, आणि आपल्या ओरडण्याचा फारसा उपयोग होईल असें जरी मला वाटत नाहीं, तरी ह्या प्रवृत्तीचा जोरानें निषेध करावासें मला फार वाटूं लागलें आहे, आणि कांहीं कडक टीका करण्याचा बेत मी करीत आहें. चमत्कार असा कीं, अलीकडे कांहीं दिवस ह्या प्रश्नाचा विचार करून मी आपल्यास जसें क्षुब्ध करून घेत असतों, तसें काल करून घेत असतां ' कॉंटेम्पोररी रिव्ह्यू ' चा संपादक मला भेटावयास आला, आणि कामकरी वर्गाच्या वसतिस्थानांवर लार्ड सालसबरीनें एक लेख लिहून हा प्रश्न ठळक रीतीनें लोकांपुढें नुक्ताच आणिला असल्यामुळें, " तूं तो हातीं घे " असें मला म्हणाला. मीं अजून त्यास ' होय ' म्हटलें नाहीं, पण बहुधा म्हणेन. आतां इतर काम

तकूब ठेवावें हें मला आवडत नाहीं, पण हा विषय निकडीचा व महत्त्वाचा आहे, आणि एका अर्थीं कायमचा आहे; कारण ह्या योजिलेल्या चार लेखांत मी त्या प्रश्नाचा-हंगामी नव्हे तर कायमच्या दृष्टीनें, विचार करणार असल्यामुळें भविष्यत्काळींहि त्याचें महत्त्व कायम राहील. ”

ता० १२ जानेवारी—“ ‘ एडिंबरोरिव्ह्यू ’ च्या आगामी अंकाच्या जाहिरातीवरून त्यांत ‘ स्पेन्सरची तत्त्वमीमांसा ’ या नांवाचा एक लेख येणार आहे असें दिसतें. त्यांत सभ्यरीतीनें मतविरोध दर्शविलेला असेल असा माझा अंदाज आहे. ”

ता० २८ जानेवारी—“ मला उपयोगी पडेल असें वाक्य शोधून काढण्यासाठीं तो लेख पाहण्यास मी काल गेलों आणि त्यांतील अखेरच्या पानावर मला अगदीं पाहिजे तसें वाक्य सांपडलें, तें ह्या पत्राबरोबर पाठवितों. ह्या आठवड्यांत सर्व प्रमुख पत्रांत मी ‘ आदितत्त्वां ’ ची जाहिरात देणार आहें, आणि ‘ एडिंबरो ’ च्या ह्या प्रतिकूल मताबद्दल मला मुळींच पर्वा नाहीं हें दाखविण्याकरितां हें वाक्य मी त्या जाहिरातीस जोडणार आहें. ” त्या बेताप्रमाणें तें वाक्य त्यानें त्या जाहिरातीस जोडिलें. ते असें:—ही केवळ नांवें आणि वचनें ह्यांची तत्त्वमीमांसा आहे; तीं अनुपमेय गंभीरपणा आणि ठाकठिकीच्या लेखनशैलीचा आव ह्यांसहित तींत प्रथम घालून, मागून तशींच चालू ठेविलेलीं आहेत, आणि त्यांखालीं अत्यन्त पोकळ कोटिक्रम आणि अत्यन्त अंधक अशी अनिश्चितता छपविलेली आहे. ” ह्या जाहिरातीची एक नक्कल त्या रिव्ह्यूच्या संपादकाकडे आणि एक लेखकाकडे त्यानें पाठविली. त्या लेखकाचें नांव सर एडवर्ड बेकेट असें होतें.

१८८४ च्या वर्षप्रतिपदेच्या दिवशीं पुढील अशुभकारक नोंद दृष्टीस पडते—“ हक्स्लेकडील वर्षप्रतिपदेच्या जेवणाचें निमंत्रण

नाकारावें लागलें—परिणामास भ्यालों. " प्रकृति बिघडल्यामुळें तो रोज सकाळीं ' केन्सलग्रीन ' नांवाच्या मैदानांत ' कॉइट्स् ' नांवाचा एक लोखंडाच्या कड्यांनीं खेळावयाचा खेळ खेळावयास, व मधून मधून काम करावयास जाऊं लागला. तें काम वर सांगितलेले राजकीय विषयावरील निबंध लिहिण्याचें होतें. ह्यापासून त्याच्या प्रकृतीस अपाय झाला. कारण जानेवारीच्या थंडींत सकाळच्या प्रहरीं उघड्यावर खेळल्यामुळें त्याची कमर धरली. ती बरी झाल्यावर तो पुनः खेळूं लागला, व पुनः आजारी पडला. तेव्हां त्यानें उघड्या हवेंत खेळण्याची व झांकल्या जागेंत मजकूर सांगण्याची दुसरीकडे व्यवस्था केली. पण ती लवकरच सोडून देऊन तो दररोज आथीनियम क्लबास गाडींत बसून जाऊं व येऊं लागला, आणि अशा रीतीनें उघडी हवा व मेहनत ह्या दोहोंसहि त्यानें टाळा दिला; व त्यापासून आपल्यास फायदा झाला असें तो लिहितो.

ता० १९ फेब्रुवारी १८८४ रोजीं तो वरील राजकीय निबंधांपैकीं पहिल्याच्या संबंधानें यूमन्स यास लिहितोः—" 'नवीन टोरीमत ' ह्या लेखानें एथें बरीच चळवळ उडाली आहे, आणि लिबरल पत्रांनीं मजवर टीकांचा भडिमार केला आहे; त्यांतील बहुतेकांत माझी थट्टा उडविली आहे. चमत्कार असा कीं, कान्सर्व्हेटिव्ह पत्रें आणि रोमनक्याथलिक पत्र ' टाब्लेट ' हीं माझी पाठ थोपटीत आहेत; ह्यांपैकीं पहिला अनुभव मला नवीन आहे. कांहीं आठवड्यांपूर्वीं 'टाब्लेट' पत्रानें धर्मावरील लेख भयंकर म्हणून म्हटला असून, हल्लींच्या लेखाबद्दल पसंती दर्शवून त्यांतील उतारे त्यानें घेतले आहेत हें पाहून हंसू येतें. तिसरा लेख माझा बराच लिहून झालेला आहे, व तो पाहून लोक पूर्वींपेक्षांहि ज्यास्त चकित होतील."

लीस्टर एथील पार्लमेंतीय सभासद टेलर ह्यानें राजीनामा दिल्यावरून, तेथील कांहीं लोकांनीं स्पेन्सर यास उमेदवार म्हणून

पुढें येण्याची विनंति केली. त्यासंबंधानें स्पेन्सरचें मत आज कित्येक वर्षें कायमचें बनलेलें असल्यामुळें त्यानें त्या बाबतींत पुढील पत्र त्यांतील प्रमुख रेव्हरंड पेज हॉप्स ह्यास लगेच दुसरे दिवशीं (ता० २१ फेब्रुवारी १८८४ रोजीं) लिहिलें:—" तुमच्या सूचनेवरून मजबद्दल जी मान्यताबुद्धि व सहानुभूति व्यक्त होते तिजबद्दल जरी मला संतोष वाटतो, तरी ती मला मान्य करतां येणार नाहींसें मला वाटतें. ह्यास अनेक कारणें असून त्यांतील प्रत्येक पुरेसें जोरदार आहे. पहिली गोष्ट अशी कीं, माझी प्रकृति अशी आहे कीं पार्लमेंतीय कर्तव्यें माझ्या हातून होणें अशक्यच आहे..... ते श्रम कदाचित् मला सोसले तरी दुसरें कांहीं काम मग माझ्या हातून होऊं शकणार नाहीं. ज्या अर्थीं हें दुसरें काम मला फारच ज्यास्त महत्त्वाचें वाटतें—ज्या अर्थीं वादविवाद ऐकणें आणि मतें देणें ह्यांत आपला वेळ घालविण्यापेक्षां मीं जें काम शिरावर घेतलें आहे तें पुरें करण्याचा प्रयत्न केल्यानें माझ्या हातून अधिक लोकहित होईल असें मला वाटतें—त्या अर्थीं ह्या कामाबद्दल तें स्वीकारिल्यास मी बरोबर करित आहें असें मला वाटणार नाहीं. मला वाटतें, पार्लमेंताच्या सभासदाच्या वजनाबद्दल लोक फारच फाजील अंदाज हल्लीं करीत असतात. हल्लीं ज्या अर्थीं पार्लमेंतीय सभासद आपल्या मतदारांच्या आधीन पूर्वींपेक्षां ज्यास्त झालेला आहे, आणि ज्या अर्थीं एकंदर कामन्स सभेला सार्वजनिक मतापुढें ज्यास्त ज्यास्त मान वांकवावी लागत आहे, त्या अर्थीं, असें निष्पन्न होतें कीं, जे सार्वजनिक मत बनावेतात तेच वास्तविक अधिकार चालवितात. ज्या स्थितींत वस्तुतः कायदे पार्लमेंताबाहेर बनतात, आणि पार्लमेंत केवळ त्यांची नोंद करितें, अशा स्थितीप्रत आह्मी चाललेलों आहों असें जो तो म्हणूं लागला आहे. आणि हें जर खरें असेल, तर जे निवडणाऱ्यांचीं मतें बनवितात ते जे तीं मतें अमलांत आणितात त्यांच्याहून

कायदे करण्याचें प्रत्यक्ष काम ज्यास्त करितात. अशा दृष्टीनें ह्या गोष्टीकडे पाहतां, मला वाटतें कीं, सभासद होण्यासाठीं मीं ग्रंथकर्तृत्व सोडिल्यास माझें वजन न वाढतां उलट कमी होईल. पण ह्या सामान्य कारणांखेरीज आणखी एक विशेष कारण आहे; तें हें कीं, लीस्टरच्या मतदारांनीं मला निवडिल्यास मी फार अव्यावहारिक सभासद ठरेन. राजकीय विषयांवरील माझीं मतें हल्लीं अस्तित्वांत असलेल्या सर्व राजकीय पक्षांच्या मतांहून फार भिन्न आहेत. न्यायदान अशा प्रकारचें असावें कीं, प्रत्येकास खात्रीनें आणि खर्च न पडतां आपले न्याय्य हक्क संभाळून धरतां यावे, हें मी कायदेकरणारांचें मुख्य कर्तव्य समजत असून तिकडे ते फारच अल्प लक्ष देतात; आणि ज्या गोष्टी त्यांनीं मुळींच करूं नये असें माझें मत आहे त्या करण्यांत ते चूर होऊन राहतात. ज्या अर्थीं मी केवळ मुनीम बनून मतदारांच्या इच्छेप्रमाणें मत देणारा बनण्यास कबूल होणार नाहीं, पण सर्व बाबतींत आपल्या विचाराप्रमाणें वागेन, त्या अर्थीं माझा माझ्या मतदारांशीं सारखा विरोध माजून राहील. कारण त्यांच्यांतील बहुतेकांचीं मतें—मग ते कान्सर्व्हेटिव्ह असोत, वा लिबरल असोत—मला कबूल नाहींत अशीं असणार, आणि मला नापसंत अशा बिलांना ते मला संमति द्यावयास सांगणार. म्हणून मी निवडला गेलों तरी, लवकरच राजीनामा देण्याची मला पाळी येईल. एवढ्यानें देखील माझीं सर्व कारणें संपत नाहींत. आणखी एक कारण आहे, आणि तें पूर्वींच्या कारणांहून पुष्कळांस खचीत ज्यास्त विलक्षण वाटेल. मी निवडून आल्यास, पार्लमेंतांत शिरतांना घ्यावी लागते ती शपथ घेण्यासच माझी हरकत आहे असें नाहीं, शपथेऐवजीं केवळ प्रतिज्ञा करण्याची मला परवानगी मिळाल्यास ती करण्यासहि माझी हरकत आहे. दूरच्या पूर्वजांच्या विचारांनीं बांधलें जाण्यास कांहीं गैर आहे असें मतदारांस वाटत नाहीं किंवा त्यांच्या

प्रतिनिधींसाहि वाटत नाहीं. त्यांच्या खापर-खापर-खापरपणजांनीं ज्या संस्था त्यांना कल्याणकारक म्हणून ठरविल्या, त्या न बदलण्यास आपल्यास बांधून घेण्यास ते अगदीं तयार असतात. मला असें वचन देण्यास सांगितलें तर मी तसें करण्याचें नाकारीन; आणि ज्या संस्था मला हितकारक वाटत नसतील, त्या बदलण्यास किंवा नाहींशा करण्यास मी स्वतंत्र आहें असें म्हणेन. शिवाय ज्या विशिष्ट गोष्टींना अशा वचनानें मी बांधला जाणार, त्यांजबद्दल माझें मत कांहींहि असलें तरी मुळीं अशा रीतीनें बांधला जाण्यासच माझी तत्त्वदृष्ट्या हरकत आहे. यावरून तुझ्या लक्ष्यांत येईल कीं, उमेदवार होण्याचें नाकारण्यास खाजगी प्रकारचीं कांहीं कारणें मला नसलीं तरी मला उमेदवार निवडणें अत्यन्त गैरमुत्सद्दीपणाचें होईल."

हें पत्र, शपथेबद्दलचा मजकूर वगळून, प्रसिद्ध केलें. तेव्हां तत्त्वविवेचकांचें पार्लमेंतसभेंत नीट जमत नाहीं असें पुष्कळांचें मत पडलें, आणि पार्लमेंतांत शिरण्यापेक्षां स्पेन्सरनें आपलें काम सुरू ठेवणेंच ज्यास्त चांगलें असें सामान्य मत झालें. "अव्यावहारिक सभासद" म्हणून जें त्यानें आपणास म्हणून घेतलें होतें, त्याबद्दल फारशी शंका कोणीं घेतली नाहीं. चमत्कार असा कीं, ज्या वेळीं स्पेन्सरनें ही उमेदवारी नाकारिली, त्याच सुमारास लॉर्ड टेनिसन लार्डांच्या सभेंत स्वस्थानापन्न झाला. त्यावरून एका वर्तमानपत्रकारानें असें म्हटलें कीं, "आह्मास आमचा कवि लाभला, पण (तत्त्व) कोविद लाभला नाहीं." त्यासंबंधानें स्पेन्सर यूमन्स यास ता० १४ मार्च १८८४ रोजीं लिहितो:—"माझ्या पत्रावर टीकेचा सारखा गजर चालला आहे, आणि तिच्यांतील टीका बहुतेक अनुकूल अशी आहे ....आज 'टाइम्स', 'स्पेक्टेटर', व 'साटर्डे रिव्ह्यु' ह्यांत अग्रलेख आले असून ते विशेषतः प्रतिकूल आहेत. मी 'टाइम्स'चा लेख व माझें त्यास उत्तर हीं तुला एक दोन दिवसांत पाठवीन."

पुनः ता० २० मार्च रोजीं तो त्यास लिहितो.—" न्यायदान बिन खर्चाचें केल्यास कज्जे फार वाढतील असें ' टाइम्स 'नें केलेलें अनुमान चुकीचें आहे, आणि तसें केल्यास त्याचा परिणाम कज्जे न वाढतां कमी होतील, कारण दिवाणी अतिक्रमणापैकीं बरेंच अतिक्रमण त्यापासून आपणास शिक्षा होणार नाहीं याच समजुतीवर होत असतें, असें दाखविण्यासाठीं त्या पत्राला जें उत्तर मी देणार होतों तें दिलें नाहीं. माझा बेत मी अशासाठीं फिरविला कीं, एकाद्या संपादकाशीं वादविवाद करणें निष्फल काम असतें, आणि त्याचा शेवट नेहमीं त्रासदायक होत असतो; कारण त्यास वाटेल तेव्हां तो वादविवाद बंद करतां येतो, आणि त्यामुळें त्याच्याशीं वाद करणाराचीच चूक आहे असा लोकांना भास होतो. "

' स्वातंत्र्य व मालमत्ता ह्यांची संरक्षक मंडळी ' ह्या सभेचा सभासद होण्यास ह्या सुमारास वेमिसच्या सरदारानें त्यास विनंति केली; ती त्यानें पुढील पत्रांत दिलेल्या कारणांकरितां नाकारिली. तें पत्र ता० १ मार्च १८८४ रोजीं लिहिलेलें असून असें आहे:— " नजीकच्या प्रश्नांचा तेवढाच विचार करावयाचा असता, तर तुझ्या विनंतीस मीं आनंदानें मान दिला असता, पण दूरवरच्या प्रश्नांचा करतां, माझें मन कचरतें. मला वाटतें, मी या मंडळाचा सभासद होणें मंडळालाहि फायद्याचें होणार नाहीं, व मलाहि होणार नाहीं. योग्य वा अयोग्य कारणास्तव ती टोरी संस्था असल्याचा तिचा लौकिक झालेला आहे; आणि ज्याअर्थीं मी आलीकडे आपल्या टीकांनीं लिबरल पक्षाला क्रुद्ध केलें आहे, त्या अर्थीं ते असें अनुमान बांधितील, आणि सकारण बांधितील, कीं मीं पक्षान्तर केलें आहे. आतां असें अनुमान जर कोणी केलें, आणि जो तो असें म्हणूं लागला— आणि म्हणणारच—तर मी जे लेख हल्लीं लिहित आहें त्यांचा जो परिणाम व्हावयाचा तो बऱ्याच अंशीं कमी होईल. माझ्या म्हण-

ण्याची थट्टा उडविल्यास लिबरल पक्षाच्या वर्तमानपत्रांना योग्यसें भासणारें कारण उत्पन्न होईल. हा परिणाम सार्वजनिक व खाजगी दोन्ही कारणांस्तव शोचनीय होईल इतकेंच नाहीं; तर, व्यक्तिपक्षीय कल्पना व मनोभाव ह्यांच्या वृद्धीवर माझ्या लेखांचा होणारा परिणाम ज्या मानानें कमी होईल, त्या मानानें तुमच्या मंडळाच्या प्रगतीस तेणेंकरून अडथळाच होईल. कारण, ज्यांत त्यांत हात घालण्याचें हल्लींचें जें धोरण त्याच्याविरुद्ध मीं केलेल्या कोटिक्रमाकडे लक्ष्य देण्याच्या ऐवजीं ते दुर्लक्ष्य करूं लागतील."

या सुमारास यूमन्सला लिहिलेलीं बहुतेक पत्रें, राजकीय विषयावरील वरील चार निबंध, आणि 'धर्मविषयक भूत व भावी स्थिति' हें "धर्मसंस्थां" तील शेवटचें प्रकरण, ह्यासंबंधानें आहेत. उदाहरणार्थ, पहिल्याविषयासंबंधानें ता० १९ एप्रिल १८८४ रोजीं तो त्यास लिहितो:—"राहिलेला ("मोठी राजकीय भोळी समजूत") लेख सर्वांशीं क्रान्तिकारक मत प्रतिपादणारा आहे आणि तो वाचून लोक फार चकित होतील; इंग्लंदापेक्षां कदाचित् अमेरिकेंतीलच ज्यास्त चकित होतील, कारण कांहीं निश्चित मर्यादांपलीकडे बहुमताचा हक्क नाहीं असें त्या लेखांतील मुख्य तत्त्व आहे. हा कोटिक्रम माझ्या अंदाजापलीकडे समाधानकारक रीतीनें बनत आहे; आणि एकंदर राजकीय–नैतिक क्लृप्तीस माझ्या पूर्वीं लक्ष्यांत आलें नव्हतें इतकें पूर्ण व सुसंगत स्वरूप येत आहे.....टोरी वर्तमानपत्रें माझी पाठ थोपटतात हें पाहून मोठी मजा वाटते. अशी गोष्ट होणें शक्य आहे काय? असें पूर्वीं कोणीं मला विचारिलें असतें, तर "तें अगदीं अशक्य होय" असें मीं म्हटलें असतें."

त्याच लेखासंबंधानें ता० १३ मे रोजीं तो पुनः त्यास लिहितो:—"राजकीय बाबींच्या संबंधानें मला जें कांहीं म्हणावयाचें आहे, तें बहुतकरून ह्या लेखांत संपेल. ह्या विषयाच्या विवे-

चनास १८४२ त सुरवात करून तेव्हांपासून आतांपर्यंत त्या विषयाकडे मी वेळोवेळीं वळलों आहें, व माझे तद्विषयक विचार ज्यास्त ज्यास्त पक्क होत गेले आहेत; आणि आतां १८८४ त, मला वाटतें, पुरेसें पूर्ण असें तद्विषयक माझें मत बनलें आहे, आणि तें मीं ह्या लेखांत पूर्ण स्वरूपानें प्रतिपादिलें आहे. मला वाटतें, अखेरीस राजकीय विषयांस तेणेंकरून नवीन स्वरूप येईल. सरकारें आणि बहुमतें ह्यांच्या योग्य अधिकारांच्या संबंधानें त्यांत ठरविलेले सिद्धान्त, आणि कांहीं मर्यादांपलीकडे त्यांना आपले अधिकार योग्य रीतीनें कां चालवितां येणार नाहींत ह्याबद्दल दिलेलीं कारणें, आणि त्याबरोबर भविष्यत् कालीं खरें लिबरल मत कशा प्रकारचें असलें पाहिजे ह्याबद्दल दर्शविलेली निश्चित कल्पना, ह्यांचा, मला वाटतें, प्रगतिपर राजकीय पक्षास आपला कार्यक्रम बनविण्यास चांगला उपयोग होण्यासारखा आहे. निदान, हा विषय स्पष्ट करण्यास माझ्यानें करवेल तें सर्व मीं आतां केलें आहे; आणि जी थोडीशी शक्ति आतां मजमध्यें राहिलेली आहे, तिचा उपयोग सर्वांशीं इतर दिशांनीं करण्याचा माझा विचार आहे....."

हे चार लेख त्यानें ' नागरिक विरुद्ध सरकार ' ह्या नांवानें १८८४ च्या जुलईंत एकत्र छापून प्रसिद्ध केले. १८८३त त्याचा चेहरा बोहेमनें काढिला होता, त्याच्या त्यानेंच तयार केलेल्या प्रति ह्या वेळीं तो आपल्या विशेष निकट स्नेह्यांस पाठवीत होता. त्यासंबंधानें ता० ६ आक्टोबर १८८४ रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—" तुला माझा चेहरा आवडला हें ऐकून मला आनंद वाटतो. सर्वांचें नाहीं तरी बहुतेकांचें, तो फार चांगला साधला आहे, असें मत पडतें. हक्स्ले-कुटुंबाचें, तो बरोबर साधला नाहीं असें बहुतेक एकमत आहे.—मिसेस हक्स्ले तर असें म्हणते कीं, ' मला तर एक घण घेऊन त्याचे तुकडे करावेसे वाटतात. ' त्यांचें एक म्हणणें

असें पडतें कीं, त्यांत व्यक्तिविशेष दिसत नाहीं; आणि हक्स्लेचा जांवई जॉन कोलियर म्हणतो कीं, तो तत्त्वज्ञान्याच्या चेहऱ्यापेक्षां वक्त्याच्या चेहऱ्यासारखा ज्यास्त दिसतो. आथीनियम क्लबाचा सभासद व चेहरे खोदणाराचा मुलगा वेस्टमेकॉट म्हणतो कीं, 'तो मला फाजील कोरींव दिसतो,' आणि त्याच्या म्हणण्यांत मला कांहीं अर्थ दिसतो. तथापि बोहेमला मीं एक माझा संगमरवरी मुखवटा तयार करण्यास सांगितला असून तो तो हल्लीं तयार करीत आहे, तेव्हां त्यास हा अवयवांचा विशेष कोरींवपणा कमी करण्यास मी सांगणार आहें."

ता० १४ नवंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—"वादविवादरूप सर्व त्रासांतून मी आतां मोकळा झालों असल्यामुळें मी आतां आपलें कायमचें काम पुनः स्वस्थपणें सुरू करण्याची तयारी करीत आहें. 'समाजशास्त्रा' च्या पहिल्या खंडाची सुधारणा करण्याच्या कामाचा मला त्रास नसता, तर 'धर्मविषयक संस्था' ह्याचा कांहीं भाग ह्याच्या अगोदरच माझा लिहून झाला असता. तो खंड सुधारतांना मी कांहीं फाजील दृष्टान्त काढीत असून कांहीं ठिकाणीं ज्यास्त घालीत आहें, आणि "प्राणिपूजा" व "सृष्टिपूजा" ह्या वादविवादविषयक प्रकरणांसंबंधानें ही गोष्ट विशेषच करीत आहें; व तीं दोन्ही प्रकरणें आतां फार मजबूत बनलीं आहेत."

१८८९ च्या प्रारंभीं त्यास वाटलें आपलें तारूं आतां संथ पाण्यांत शिरलें असून तें लवकरच बंदरास जाऊन पोहोंचेल; पण ती त्याची आशा पूर्ण झाली नाहीं. डॉ० माझ्लेच्या 'आठवणी' आणि मार्टिनोच्या 'नैतिक कल्पनांचे नमुने' हीं पुस्तकें ह्या सुमारास प्रसिद्ध झाल्यामुळें तें पुनः किरकोळ वादविवादांच्या वावटळींत सांपडलें.

ता० २३ मार्च १८८९ रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—

" मी आशा करितों कीं, तूं दक्षिणेकडे गेल्यामुळें तुझी छाती सुधारली असेल. तेथें गेल्यापासून तुला काय फरक वाटतो हें तूं अद्यापि मला कां कळविलें नाहींस ? तुझ्या कामापासून तूं दूर असल्यामुळें तुला आपला वेळ मारण्यास कठीण जात असेल, पण तूं काम करीत असतां तुला वेळानें मारण्यापेक्षां हें अधिक बरें. आणि तूं नेहमींच फार खबरदारी घेतल्याशिवाय राहिलास, तर वेळ तुला लवकरच मारील ह्यांत बिलकूल शंका नाहीं.....बेलजममधील अर्थशास्त्रज्ञ एमिलीडे लाव्हेल यानें " सरकारविरुद्ध नागरिक, हर्बर्ट स्पेन्सर यास उत्तर " या नांवाचा एक लेख "कान्टेम्पोररी रिव्ह्यू"त लिहिला आहे. त्याचें एक प्रुफ संपादकानें मजकडे आणिलें होतें; अशासाठीं कीं, मीं त्यास कांहीं उत्तर द्यावें. "

स्पेन्सरनें त्याप्रमाणें त्यास उत्तर दिलें, व तें पाहून लाव्हेलनें त्यास ता० २ एप्रिल १८८९ रोजीं पुढील पत्र लिहिलें:—" हलींच्या परिस्थितींत करारस्वातंत्र्य जर स्थापन झालें तर कामकऱ्यांना न्यायवेतन मिळेल, हें जें स्थापित अर्थशास्त्रापासून तूं उसनें घेतलेलें मत, तोच, मला वाटतें, आमच्या मतभेदांतील खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. पण प्राथमिक हक्कांचा जेव्हां भंग होतो, म्हणजे मजूर किंवा कूळ ह्यांचा स्वामित्वाचा हक्क काढून घेतला जाऊन, कारखानदार किंवा जमीनदार देईल ती मजुरी घेणें किंवा उपाशीं मरणें ह्या दोहोंमध्यें निवड करण्याची त्यास पाळी येते, तेव्हां, " जवळ असलेलें द्रव्य दे किंवा मरावयास तयार हो, " असें ज्या प्रवाशास लुटारू सांगतो, त्याच्यापेक्षां त्यास ज्यास्त स्वातंत्र्य नसतें, असें जें ' सोश्यल स्टॅटिक्स'च्या नवव्या प्रकरणांत तूं सिद्ध केलें आहेस, तेंच बरोबर आहे असें माझें मत आहे. "

ता० २१ जुलई रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—"मीं " धर्मविषयक संस्था" हा ग्रंथ पुरा केला आहे, आणि शुक्रवारीं स-

काळीं बाहेरगांवीं जाणार असून, तत्पूर्वीं गुरुवारीं शिलक राहिलेला सर्व मजकूर छापखान्यांत नेऊन देणार आहें. विंडरमीर सरोवराच्या किनाऱ्यावर माझा मित्र पॉटर याजकडे दहा पंधरा दिवस राहून मी बहुधा उत्तरेकडे जाईन, आणि सदर्लेंद प्रांतांत कांहीं मासे सांपडल्यास पकडण्याचा व स्वच्छ हवा खाण्याचा यत्न करीन. बहुधा सपटंबरच्या प्रारंभीं, किंवा नंतर लवकरच परत येईन."

तिकडून परत आल्यावर ता० २१ आगस्ट रोजीं तो पुनः त्यास लिहितोः—" मी स्काटलंदास गेलों त्यापासून फायदा न होतां उलट नुकसानच झालें. प्रवासाचा थकवा आणि दुसरे दिवस अमळ फाजील श्रम यांनीं मी इतका थकून गेलों कीं, मला परतणें भाग पडलें; आणि एकटा परत येण्याचें धैर्य न होऊन मला येऊन घेऊन जाण्यास हडसन यास (नव्या सेक्रेटरीस) लंदन एथें तार केली. तथापि, परत थोडथोडा प्रवास केल्यामुळें, आणि ठिकठिकाणीं थोडे थोडे दिवस विश्रान्ति घेतल्यामुळें, माझी प्रकृति बरीच सुधारली, आणि त्यामुळें मला भीति होती तितकी हलकी मला आतां वाटत नाहीं."

ता० ३० सपटंबर रोजीं तो पुनः त्यास लिहितोः—" डार्विनच्या मतावर टीका करण्यासाठीं जो निबंध किंवा जे निबंध मी लिहिणार म्हणून तुला सांगितलें होतें ते लिहिण्याचेंच अल्पस्वल्प काम मी हल्लीं करीत आहें. मी जशीं टिपणें व सामग्री तयार करीत आहें तसें त्या विषयाचें महत्त्व फार वाढत चाललें आहे, आणि त्या सर्व प्रश्नाला तेणेंकरून नवीन स्वरूप येईल असें मला वाटतें, कारण त्याचा विचार हल्लीं फार अर्धवट रीतीनें झालेला आहे. मला वाटतें, या निबंधानें कांहीं चळवळ उत्पन्न होईल."

स्काटलंदांतून परत आल्यावर 'समाजशास्त्रा'च्या पहिल्या खंडाची नवी आवृत्ति लवकरच प्रसिद्ध झाली, आणि आक्टोबरच्य

प्रारंभीं 'धर्मसंस्था' हाहि ग्रंथ तयार झाला म्हणून त्यानें "सेंद्रिय उत्क्रान्तीचीं उपादान कारणें" हा लेख सुरू केला. याच वेळीं "चार्लस डार्विन" हें ग्रांट आलेनचें छोटेसें पुस्तक प्रसिद्ध झालें, आणि त्यांत स्पेन्सरचा त्याच्याशीं संबंध काय आहे हें दाखविलेलें असल्यामुळें तें यास योग्य वेळीं प्रसिद्ध झालेंसें वाटलें.

या वेळीं त्यास हल्ल व कॉर्क येथें व्याख्यान देण्याविषयीं, आणि वेस्टमिन्स्टरच्या डयूकाच्या ऐवजीं 'संडे सोसायटी' नामक सभेचा अध्यक्ष होण्याविषयीं विनंति केली, पण ती त्यानें आपली बेताची शक्ति भलत्याच कामीं न लावण्याच्या हेतूनें नाकारिली. आयर्लंदांतील 'होमरूल' किंवा 'स्वराज्य' ह्या प्रश्नावर लॉर्ड डायसार्टशीं त्याचा कांहीं पत्रव्यवहार झाल्यानंतर, त्याच बाबतींत 'न्यून पक्षाचें शासन' ह्या मथळ्याखालीं त्यानें 'टाइम्स'ला एक पत्र लिहिलें; त्यांत, आयर्लंदास स्वराज्य येईपर्यंत आयरिश पक्षास व्यवस्थित रीतीनें अडथळे उत्पन्न करून कायदे करण्याच्या एकंदर कामास खो घालूं देणें अगदीं गैर आहे, असें त्यानें विवेचन केलें होतें. यासंबंधानें डा० यूमन्स यास त्यानें असें लिहिलें:—"आजपर्यंत चालू राजकीय प्रश्नांच्या संबंधानें मीं कधीं कांहीं म्हटलें नव्हतें. पण या प्रसंगीं मला तसें करणें जरूर वाटलें. 'टाइम्स'च्या अग्रलेखांत ह्या पत्रास उल्लेख केलेला तुला आढळेल; आणि 'कार्टर्ली'च्या संपादकानें मला काल असें सांगितलें कीं, 'मी तें पत्र कापून माझा एक मदतनीस राजकीय विषयावर एक लेख लिहीत आहे त्याजकडे पाठविलें आहे' यावरून त्याच्यावर खर्च केलेला तास फुकट गेला नाहीं." 'जमिनीच्या प्रश्नांसंबंधानें तुझें मत काय आहे तें थोडक्यांत सांग?' अशी ऑबेरॉन हर्बर्ट यानें त्यास विनंति केल्यावरून त्यानें त्यास ता० १३ आक्टोबर रोजीं पुढील पत्र लिहिलें:—"जमीन धारण करण्यासंबंधानें ३९ वर्षांपूर्वीं 'सोशयल

स्टॅटिक्स ' ग्रंथांत प्रतिपादिलेलीं मतें केवळ नैतिक सिद्धान्तावरून निष्पन्न केलेलीं होतीं, आणि ज्या नीतिसरणीस मीं ' केवल नीति ' म्हणून म्हटलें आहे त्या नीतींपैकीं होतीं; ही नीति, जी सापेक्ष नीति हल्लीं अस्तित्वांत असलेल्या व्यवस्था व हल्लीं अस्तित्वांत असलेलीं माणसें यांस लागू आहे, त्या सापेक्ष नीतीपासून भिन्न आहे. जमिनीच्या मालकीचा प्रश्न आमच्या कालीं, आणि जवळच्या कोणत्याहि भविष्यत्कालीं, उत्पन्न होईल अशी, तीं मतें प्रतिपादितांना, मला कल्पना नव्हती; तर मानवी स्वभाव सामान्य जीविताला ज्या कालीं ज्यास्त अनुरूप होऊन जाईल, आणि अगदीं न्याय्य सामाजिक रचना शक्य होतील, अशा दूरच्या भविष्यत्कालाला अनुलक्षून मीं तीं नमूद केलीं होतीं. खाजगी मालकीला लॉक व इतर लेखक यांनीं दिलेला आधार आयोग्य असल्यामुळें मी जेव्हां योग्य आधार पाहूं लागलों, तेव्हां जमिनीचा मालक या नात्यानें समाज आणि जमिनीचा धारणकर्ता या नात्यानें व्यक्ति, यांच्यामध्यें करार होऊन ती (खाजगी मालकी) उत्पन्न झाली ह्याखेरीज समाधानकारक आधार सांपडेना, म्हणून कांहीं अंशीं तो सिद्धान्त मला पतकरणें भाग पडलें; आणि कांहीं अंशीं ' सिली आयलंड्स ' या बेटांतल्याप्रमाणें जे चमत्कारिक प्रकार दृष्टीस पडतात त्यांवरून भाग पडलें; त्या बेटाच्या मालकाला वाटल्यास अशी अट घालण्याचा अधिकार आहे कीं, तेथें राहणारानें त्याच्या त्या बेटांच्या मालकाचा धर्म स्वीकारिला पाहिजे, आणि तो सांगेल त्याप्रमाणें राहिलें पाहिजे; ही स्थिति नीतिदृष्ट्या, अर्थात् अन्याय्य आहे. (जमिनीच्या मालकीच्या संबंधानें) हल्लीं योजिलेल्या फेरबदलानें सर्व जमीन राष्ट्रीय करावयाची या योजनेनें अर्थशास्त्रदृष्ट्या कांहीं फायदा होईलसें दिसत नाहीं. प्रारंभींच साफ न केलेली व लागवडीस न आणिलेली जी जमीन तिजवरच काय तो सर्व

समाजाचा हक्क आहे म्हणून म्हणतां येईल. आज इतकीं शतकें लागवड करून तीस आलेली जी किंमत तीच (शहरांतील जमीन खेरीज करून बाकीच्या) सर्व जमिनीची बहुतेक सर्व किंमत असून तिजवर हल्लींच्या मालकांचा हक्क आहे; आणि त्यांपैकीं बहुतेकांनीं ही कृत्रिम किंमत त्या जमिनीस येण्यासाठीं लागलेला खर्च स्वतः केलेला आहे, किंवा ज्यांनीं केला त्यांचे ते वारस आहेत. म्हणून समाजानें ती जमीन जर पुनः आपल्याकडे घेतली, तर ह्या किंमतीचा मोबदला त्यांस, त्यांचे नुकसान भरपाईकरितां, समाजानें द्यावा लागेल; आणि आपल्या कुळांकडून समाजास साऱ्याच्या रूपानें जें कांहीं मिळेल तितकें किंवा त्याहून अधिक हल्लींच्या व्याजाच्या दरानें, त्या किंमतीच्या पैशाचें व्याज होईल. शिवाय, दुसरी एक अडचण अशी आहे कीं, द्रव्यदृष्ट्या पाहतां सरकाराच्या जमिनरूपी मालमत्तेची व्यवस्था बरोबर व्हावयाची नाहीं; कारण इतर खात्यांपेक्षां ह्या खात्यांत सार्वजनिक (सरकारी) व्यवस्था ज्यास्त चांगली चालेल असें मानण्यास आधार नाहीं. आतां " जमिनीची ह्यापुढें जी किंमत वाढेल तिच्या योगानें वाईट व्यवस्थेमुळें उत्पन्न होणारें नुकसान कदाचित् भरून येईल, " असें कोणीं म्हटल्यास त्याबद्दलहि शंकाच आहे. ' राजकीय संस्था ' ह्या ग्रंथांतील मालमत्तेवरील प्रकरण जो वाचील त्याच्या नजरेस येईल कीं, जमिनीच्यासंबंधानें माझीं मतें मुळींच कायम झालेलीं नाहींत, कारण नीतिदृष्टि आणि द्रव्यदृष्टि ह्यांचा मेळ घालतांना जी अडचण उत्पन्न होते तिच्यांतून पार पडण्याचा मार्ग मला दिसत नाहीं.

परंतु मीं त्या प्रकरणाच्या शेवटच्या कांहीं ओळींत दर्शविल्याप्रमाणें माझें मत असें आहे कीं, जमिनीची सामाजिक मालकी जर स्थापावयाची असेल तर जेव्हां (समाजाचा) औद्योगिक नमुना पूर्ण वाढीस येईल, तेव्हां ती स्थापिली पाहिजे; आणि हल्लीं हा

प्रश्न पुढें आणण्याच्या मी स्पष्ट विरुद्ध आहें; कारण हल्लीं असला जर कांहीं फेरबदल केला, तर तो सोश्यालिस्ट लोकांच्या फायद्याचा होईल. "

ह्या वर्षाच्या अखेरीस यूमन्स व लॉट ह्यांस लिहिलेल्या पत्रांतून उद्विग्नपणाची छटा दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, यूमन्स यास तो लिहितो:—" खरी गोष्ट अशी आहे कीं, आपण सर्व ह्या किंवा त्या तऱ्हेनें पिचावयास लागलों आहों. ' एक्स ' क्लब, हक्स्ले म्हणतो त्याप्रमाणें, काल ' वयांत ' आला असून त्याच्या सभासदांपैकीं एक अगोदरच मेला आहे, आणि बाकीच्या आठांपैकीं दोघांचीच काय ती प्रकृति चांगली आहे. माझा गरीब मित्र लॉट ह्याची प्रकृति ठीक नाहीं. "

एडवर्ड लॉट यास ता० १० नवंबर १८८९ रोजीं तो लिहितो:— " तुझें पत्र वाचून मला अनेक कारणांनीं वाईट वाटलें. आणि तुझ्याबद्दल विशेषच वाईट वाटलें. माझ्यासंबंधानें देखील तें (पत्र) निराशाजनक आहे, कारण दक्षिण किनाऱ्यावर एकाद्या चांगल्या हवेच्या ठिकाणीं घर घेण्याच्या विचारांत मी होतों, आणि तेथें मध्यें मध्यें जाऊन तुझ्याबरोबर वर्षांतून चार महिने घालविण्याचा बेत करीत होतों.....पण हल्लींच्या स्थितींत तुला डार्बींतून बाहेर पडणें शक्य दिसत नाहीं; आणि म्हणून ज्या माझ्या बेतापासून आपणां सर्वांचाच फायदा होईल अशी मी आशा करीत होतों, तो अगदीं फिसकटला.....सुदैवानें मी हल्लींच आपलें मृत्युपत्र सुधारीत आहें, आणि त्यांत तुला, आणि तूं माझ्या अगोदर मेलास तर फीला (' फी ' हें लॉटच्या मुलीचें नांव), मीं तीनशें पौंड ठेविले आहेत हें सांगणें कदाचित् चुकीचें होणार नाहीं. हें ऐकून तिच्याबद्दलची तुझी काळजी कदाचित् कमी होईल. "

तो ब्राइटन एथें असल्यामुळें त्यास ता० ३ दिजंबरच्या ' ए-

क्स् ' क्लबाच्या मेजवानीस हजर राहतां आलें नाहीं. म्हणून प्रो० हक्स्लेनें दुसरे दिवशीं त्यास पुढील पत्र लिहिलें:—" काल तूं नव्हतास हें पाहून आह्मांस फार वाईट वाटलें, कारण आह्मी पांचजणच काय ते हजर होतों; पण आह्मीं आनंदानें वेळ घालविण्याची कशी तरी युक्ति केली, आणि लवकला ' लिनियन सोसायटी 'च्या सभेला जावयाचें होतें म्हणून त्याच्या खेरीज बाकीचे आह्मी दहा वाजून जाईपर्यंत बसलों. आमच्या भाषणांत कांहीं गंभीर भाग आलासें मला वाटत नाहीं; खरोखर, तूं हजर नसल्यामुळें, मला वाटतें, आमचा कल विनोदाकडेच ज्यास्त होता. "

ह्यावर ता० ७ दिजंबर १८८९ रोजीं तो हक्स्लेस लिहितोः—" तर मग, तुम्ही दहापर्यंत बसलेत ! खरोखरच ही तुम्हीं चांगली गोष्ट केली नाहीं. नेहमीं तुम्ही लवकर उठतां, आणि त्याच्याविरुद्ध मी नेहमीं असतों, ही गोष्ट ध्यानांत घेतां, मी गैरहजर आहें हें पाहून तुम्ही इतका वेळ गंमत करीत बसलां हें खरोखर दुःखावर डाग देण्यासारखें होय. तूं माझ्यापुढें ज्या गोष्टी मुद्दाम आणिल्या आहेस त्यांवरून खरोखरच असें दिसतें कीं, आजपर्यंत मंडळी लवकर उठे त्याचें कारण मीच ! मला हा प्रश्न पुढच्या ' एक्स'पुढें आणावा लागेल, आणि मीं हजर असलों म्हणजे होईल तितके लवकरच उठण्याची जी तुम्ही उघड उत्कंठा दाखवितां ती उत्पन्न करणारें माझ्या वर्तनांत काय आहे, असें विचारावें लागेल ! लार्ड इडेस्लेचें पत्र आणि त्यांतील बातमी (हक्स्लेला पेन्शन दिल्याची) ऐकून मला फार आनंद वाटतो. निर्वाहसाधनाबद्दलची काळजी निवारिली जाणें ही फार मोठी गोष्ट आहे; आणि आतां तूं ह्या आणि सरकारी कामाच्या सर्व काळजींतून मोकळा झालेला असल्यामुळें, तूं आतां पुष्कळ अस्सल काम करशील, आणि मध्यें मध्यें लढशील (त्याबद्दल काळजीच नको), अशी आशा करण्यास हर-

कत नाहीं. (दिजंबरचा) ' नाइन्टीन्थ सेंचरी 'चा अंक बाहेर पडल्याबरोबर मीं तो मिळविला, आणि (तुझा) (बैबलांतील जगाच्या उत्पत्तीचा अर्थ लावणारे आणि सृष्टीची उपपत्ति लावणारे ह्या नांवाचा) त्यांतील लेख वाचून मीं आनंदानें टिऱ्या बडविल्या; त्या लेखांत, नेहमींप्रमाणें, लोखंडाचा हात मखमालीच्या मोज्यांत झांकलेला आहे. "

हावर्ड कॉलिन्सच्या सूचनेस अनुसरून बर्मिंग्राम एथील " नॅचरल हिस्टरि सोसायटी " च्या समाजशास्त्र विषयक शाखेनें स्पेन्सरच्या पुस्तकांचीं सूचिपत्रें तयार करण्याचा विचार केला, व तें काम अंगावर घेण्याचें कॉलिन्सनें आनंदानें कबूल केलें. अनेक माणसांनीं एकादें काम अंगावर घेतलें म्हणजे जसें नेहमीं होतें, तसेंच ह्याहिसंबंधानें झालें; म्हणजे, तें काम लवकरच सगळें एकट्या कालिन्सच्या शिरावर पडलें. स्पेन्सरकडून टीका व सूचना अशा रूपाची मदत मिळेल असा जो कालिन्सचा अंदाज होता तोहि खरा ठरला नाहीं. डंकन व इतर यांनीं यापूर्वीं त्याच्या पुस्तकांची सूचिपत्रें तयार करितों म्हणून जेव्हां म्हटलें होतें, तेव्हां तें ह्या मुद्यावर त्यानें नाकारिलें होतें कीं, " असल्या सर्व गोष्टींच्या संबंधानें मला कसलें ना कसलें काम करावें लागतेंच; आणि माझी शक्ति इतकी बेताची आहे, आणि पत्रें लिहिणें, छापखानेवाल्यांशीं व्यवहार करणें, वगैरे कामांत ती इतकी सारखी खर्च होत असते, कीं, माझ्या हातून माझें इतर काम होण्याची मारामारी पडते. "

प्रकरण अठरावें

धर्मविषयक वादविवाद

बेचाळीस वर्षें विचार करून, राजकीय बाबतींत प्रगामी पक्षाला योग्य अशीं, स्पेन्सरचीं कामें बनलीं होतीं हें गेल्या प्रकरणांत आपल्या नजरेस आलें. या प्रकरणांत धर्मविषयक त्याच्या मतांस अखेरचें स्वरूप काय आलें, याचा विचार करणें आहे. या प्रकरणांत ज्या गोष्टी आह्मी सांगणार आहों त्या जरी गत प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टींबरोबरच झाल्या, तरी त्यांचा स्वतंत्र विचार करण्याइतक्या महत्त्वाच्या त्या असल्यामुळें त्यांचा विचार या प्रकरणांत करूं.

ता० १२ एप्रिल १८८३ रोजीं तो यूमन्स यास लिहितो:--‘ धर्मविषयक संस्था ’ या ग्रंथापैकीं पहिलें प्रकरण मीं इतक्यांतच पुरें केलें आहे. त्यांत धर्मविषयक कल्पनेचा विचार केलेला असून प्रारंभीं असें दाखविलें आहे कीं, ती स्वभावतः माणसांत असत नाहीं, आणि धर्मशास्त्री म्हणतात तशी धर्मविषयक अंतर्दृष्टिहि त्यांच्यांत असत नाहीं; नंतर, “ आदितत्त्वें ” ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागांत केलेला कोटिक्रम दुसऱ्या स्वरूपानें, आणि संक्षेपतः नवे दाखले देऊन, उजळलेला आहे; आणि शेवटीं, प्रस्तुत धर्ममत आणि इतर मतें ह्यांची उत्पत्ति व उत्क्रान्ति ह्यांमध्यें सविस्तर समान्तरपणा दाखवून, त्यांचें सादृश्य किती निकट आहे तें दाखविलें आहे. तें विवेचन (जुन्या समजुतींना) भयंकर रीतीनें विघातक आहे. ”

ता० ८ आक्टोबर १८८३ रोजीं मिस बिआट्रीस पॉटरला तो लिहितो:—“ रेव्हरंड ग्राउंड नामक पाद्र्यानें “ हर्बट स्पेन्स-

रच्या तत्त्वमीमांसेच्या घटनात्मक तत्त्वांचें परीक्षण" नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें असून तें जर तुझ्या हातीं कधीं आलें, तर त्यांत तुला असें ध्वनित केलेलें आढळून येईल कीं, ख्रिस्ताचा धर्म पुनः रचण्याकरितां बहुधा मला (स्पेन्सरला) नेमिलेलें आहे!!!"

त्या पाद्र्यास ता० १२ आक्टोबर १८८३ रोजीं तो लिहितो:—
"एकंदर संघटनात्मक मीमांसेचा विचार ज्याच्यांत केला आहे, आणि तो विचार न्यायानें करावयाचा अशा दृष्टीनें केला आहे, असा तुझ्या ग्रंथासारखा ग्रंथ पाहून मला आनंद होतो. उत्क्रांतीच्या सामान्य मताचा, त्याबरोबरच जें सत्ताविषयक मत मीं प्रतिपादिलें आहे त्याशीं, कांहीं संबंध नाहीं असें जें तूं म्हटलें आहेस ते मला अगदीं मान्य आहे; आणि ह्या गोष्टीवर तूं जोर दिला आहेस ह्याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. तथापि अन्तिम शक्तीच्या संबंधानें जें माझें मत आहे त्या संबंधाच्या कांहीं विधानांचा तुला बरोबर अर्थ समजला नाहीं असें मला वाटतें."

दुसऱ्या एका पाद्र्यानें असल्याच प्रकारचें पुस्तक लिहिलें असल्यानें त्यानें यूमन्सला १८८९च्या मार्चांत पुढील पत्रांत लिहिलें:—
"रेव्हरंड जॉर्ज माथेसन यानें 'नव्या धर्माबरोबर जुना धर्म राहूं शकेल काय?' ह्या नांवाचें एक पुस्तक नुक्तेंच प्रसिद्ध केलें आहे; तो बहुधा स्कॉच प्रेसबिटेरियन असावा, कारण त्यानें आपला पत्ता त्या देशांतला दिला आहे. तें फार विलक्षण पुस्तक आहे; त्याचें तात्पर्य कांहीं अंशीं ग्राउंडच्या पुस्तकासारखेंच आहे, पण त्याकडे लोकांचें ज्यास्त लक्ष्य वेधेल व त्यांना तें ज्यास्त पसंत पडेल, अशा धर्तीवर तें लिहिलें आहे. चालू धर्ममताशीं उत्क्रान्तिमताचा विरोध नाहीं असें दाखविण्याचा त्यांत फार चतुराईनें यत्न केलेला आहे. मला वाटतें, तें पाहून बीचरला फार आनंद होईल, आणि त्यांतील मतांचा त्यांवर निबंध लिहिण्याच्या कामीं तो उपयोग करील."

१८८३ सालांत " धर्मविषयक संस्थां " चा फारसा भाग लिहून झाला नाहीं. त्या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणाचा विचार तो कित्येक महिने करीत होता; पुढें पावसाळ्यांत त्यानें तें लिहून छापिलें, आणि नवंबरांत त्याचीं प्रुफें त्यानें हक्स्ले व टिंडाल यांजकडे पाठविलीं. त्यांनीं तीं वाचून त्यांजवरील आपलें मत सहा महिन्यांत द्यावें असें त्यानें त्यांस कळविलें; पण एक दोन दिवसांत पहिला बेत फिरवून तें एकदम प्रसिद्ध करण्याचें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें त्यानें त्यांस चिठ्ठ्या लिहिल्या, व त्यांत असें म्हटलें कीं, " सहा महिन्यांची मुदत दिल्यानंतर तुमचीं मतें सहा दिवसांत मागणें अगदीं मूर्खपणाचें काम आहे. "

त्यासंबंधानें ता० १३ नवंबर १८८३ रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—" 'धर्मविषयक भूत व भावी स्थिति ' नांवाच्या एका प्रकरणाचीं प्रुफें मी तुजकडे सोबत पाठवीत आहें; तें ह्यापुढील खंड " धर्मविषयक संस्था " ह्यांतील शेवटलें प्रकरण आहे. गेल्या उन्हाळ्यांत इतर प्रकरणांच्या अगोदर मीं तें लिहावयास घेतलें, आणि नुक्तेंच पुरें केलें. अशा रीतीनें प्रथम तें ह्या कारणासाठीं सुरू केलें कीं, तें घराबाहेर बसून सांगण्यासारखें होतें, कारण तें लिहितांना अगोदर गोळा केलेल्या सामग्रीकडे पाहण्याची जरूरी नव्हती. अशा रीतीनें तें इतर प्रकरणांच्या अगोदर लिहिलें असल्यामुळें मला त्याचा नीट विचार करतां येण्यासाठीं आणि प्रसिद्ध करण्यापूर्वीं स्नेह्यांना त्याजविषयीं मत देण्यास सांगण्यासाठीं, तें छापून काढणें बरें असें कांहीं दिवसांपूर्वीं माझ्या मनांत आलें. कारण त्यांत धर्मविषयक माझें एकप्रकारचें अखेरचें मतप्रदर्शन आहे; म्हणून मीं त्याच्या प्रती नुक्त्याच हक्स्ले व टिंडाल यांजकडे पाठविल्या. वर दर्शविल्याप्रमाणें, परवांपर्यंत, त्या भागांतील सर्व प्रकरणें लिहून होईपर्यंत तें तसेंच ठेवून, सगळाच खंड एकदम

प्रसिद्ध करण्याचा माझा बेत होता.....पण, या एकदोन दिवसांत त्या गोष्टीचा पुनः विचार करतां, तें प्रकरण एकदम प्रसिद्ध करणेंच ज्यास्त फायद्याचें होय असा माझा निर्णय ठरला आहे. पहिलें कारण हें कीं, आज बरेच दिवसांत मी लोकांपुढें (ग्रंथरूपानें) आलेलों नाहीं, आणि म्हणून कांहीं तरी प्रसिद्ध करणें महत्त्वाचें दिसतें. दुसरी गोष्ट अशी कीं, तें प्रकरण एथें व तुझ्या तेथें (अमेरिकेंत) निराळें प्रसिद्ध केल्यास, एकंदर खंडाबरोबर प्रसिद्ध करतां तें जितक्या लोकांच्या हातीं जाईल, त्याहून ज्यास्त लोकांच्या हातीं जाईल. तिसरी गोष्ट अशी आहे कीं, हा प्रश्न फारच महत्त्वाचा आहे, आणि म्हणून त्यासंबंधानें आपलें मत लोकांपुढें स्पष्टरीत्या मांडणें इष्ट आहे. ”

ता० १७ नवंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—“ ‘धर्मविषयक भूत व भावी स्थिति ’ हें प्रकरण नोल्स “ नाइन्टीन्थ सेंचरी”मध्यें प्रसिद्ध करीत आहें. आजपर्यंत, अमेरिकेंतहि एकादा लेख इंग्लंदच्या बरोबरच प्रसिद्ध करावयाचा म्हटल्यास, तो आपल्या मासिकांत प्रसिद्ध करण्याचें त्यानें नाकारिलेलें आहे. पण ज्या अर्थीं हा निबंध एथें जाईल तितक्यांच्या हातीं जाऊं द्यावा अशी माझी इच्छा होती त्याअर्थीं “ तो अमेरिकेंतहि प्रसिद्ध करण्याच्या विरुद्ध तूं आहेस कीं काय ? ” म्हणून मीं त्याला विचारिलें, आणि तूं विरुद्ध असलास तर मी दुसरीकडे जाणार, म्हणून त्यास कळविलें. तो म्हणाला, प्रस्तुत लेख अत्यन्त महत्त्वाचा असल्यामुळें मी तो अमेरिकेंतहि प्रसिद्ध न करण्याचा आग्रह सोडून देतों. ”

ता० २२ नवंबरः—“ हें पत्र तुला वेळेवर पोहोंचल्यास त्याबरोबर पाठविलेली टीप (वरील लेखास) जोडून दे. त्याच्यावर एक आक्षेप कदाचित् येण्यासारखा आहे म्हणून हक्स्लेनें मला सांगितलें, त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं ती टीप लिहिली आहे.

तो लेख हक्स्लेनें दोनदा, व टिंडालनें तीनदा वाचिला आहे, आणि दोघांचेंहि त्यासंबंधानें एकमत आहे. म्हणून त्यांतील कोटिक्रम प्रगामी शास्त्रवेत्त्यांचें मतप्रदर्शन करणारा आहे असें मानण्यास हरकत नाहीं. "

ता० १९ जानेवारी १८८४:—" अमेरिकेंतील बहुतेक वर्तमानपत्रें प्रस्तुत लेखाला इतकीं लाजलीं हें ऐकून आश्चर्य वाटतें..... येथील वर्तमानपत्रांनीं त्याच्याकडे बरेंच लक्ष पुरविलें आहे.....आणि त्याच्यावर लेख आलेलीं पुष्कळ वर्तमानपत्रें मजकडे आलीं असून, त्यांपैकीं बहुतेकांना तो चित्तवेधक वाटला असून कांहींना त्यापासून दुःख व तिटकारा उत्पन्न झाला आहे. पण पूर्वीं असल्या हल्ल्यांमध्यें जो कटुपणा दिसत असे, तो हल्लींच्या लेखांतून अगदीं दिसत नाहीं. नोल्स मला सांगतो कीं, त्याविषयीं त्याजवर पत्रांचा जणूं काय गारांसारखा वर्षाव झाला असून, त्यांपैकीं कांहीं पत्रें धर्माधिकाऱ्यांचीं आहेत, व त्यांनीं " आपल्यास " नाइन्टीन्थ सेंचरी " ह्यापुढें नको " म्हणून म्हटलें आहे; आणि तो मला सांगतो कीं, ग्लाडस्टननें मला पत्र लिहून असें विचारिलें आहे कीं, " असले लेख घेणाऱ्या मासिकाला आपण लेख कसे पाठवावे ? " " मजकडेहि पुष्कळ पत्रें व पुस्तकें आलीं आहेत; त्या सर्वांचा उद्देश मला माझी चूक दाखविण्याचा आहे, पण त्यांतील एकांत देखील शिव्या दिलेल्या नाहींत. "

ह्या लेखाचीं प्रुफें फ्रान्स, जर्मनी, इटाली, हंगारी, रशिया, हिंदुस्तान, जपान व न्यूझीलंद इतक्या ठिकाणीं पाठविलीं होतीं. न्यूझीलंदमध्यें सर जॉर्ज ग्रेनें तो लेख एकदम प्रसिद्ध करण्याची तजवीज केली, ती अशासाठीं कीं, युरोपांतील त्यावरील टीका येऊन तेथील लोकांच्या विचारांत भानगड उत्पन्न होण्यापूर्वीं त्यांना आपलें त्याविषयीं स्वतंत्र मत बनवतां यावें. आस्ट्रेलियांत क्याडी

नांवाचा स्पेन्सरचा एक शिष्य होता, त्यास तो लेख हातीं धरणारा कोणी संपादक सांपडण्यास मोठी मारामार पडली. आणि त्यांपैकीं एक जण असें म्हणाला कीं, 'माझ्या पत्रांत प्रत्येक आठवड्यास स्पर्जनचीं धर्मपर व्याख्यानें येत असल्यामुळें मला स्पेन्सरच्या अद्वातद्वा कल्पना त्यांत छापतां येत नाहींत.' अमेरिकेच्या संबंधानें डॉ० यूमन्स यास असें कबूल करणें भाग पडलें कीं, "इंग्लंदाइतकें एथें विचारस्वातंत्र्य नाहीं असें उघड दिसतें. कारण तुजवर तेथें टीका करणारे लोक त्या विषयाकडे लक्ष्य तरी देतात; पण एथें तर ते इतके भ्यालेले दिसतात कीं, ते कोणत्याच बाजूनें त्याची चर्चा करण्यास धजावत नाहींत."

इंग्लंदांत ह्या लेखासंबंधानें अखेर वादळ उत्पन्न झालेंच. त्यावर "धर्माचें भूत" नांवाचा फ्रेडरिक हारिसनचा लेख मार्च महिन्याच्या "नाइन्टीन्थ सेंचरी"च्या अंकांत आला. त्यासंबंधानें तां० ६ मार्च १८८४ रोजीं स्पेन्सर यूमन्स यास लिहितोः—

"तुझ्या नजरेस येईल कीं, धर्मावरील माझ्या लेखाचा उपयोग हारिसन आपल्या मनुष्यतापूजेचा फैलाव करण्याच्या कामीं करीत आहे. 'आपला विचार स्पेन्सरच्या कोटिक्रमावर टीका करण्याचा नाहीं,' अशा विधानानें आपल्या लेखास सुरवात करून शेवटीं त्यानें वस्तुतः कसा भयंकर हल्ला केला आहे हें पाहून हंसू येतें. मला वाटतें, मी त्याला उत्तर देणें जरूर आहे; पण तें द्यावयाचें म्हटलें तरी, हल्लींचे हे राजकीय लेख पुरे होईतोंपर्यंत मला तें काम लांबणीवर टाकिलें पाहिजे. मला त्याला उत्तर द्यावेंसें वाटतें, तें त्याला माझें म्हणणें मुळींच समजलें नसून शिवाय तो निराधार कांहीं विधानें करितो म्हणूनच केवळ नव्हे, तर मनुष्यताधर्मावर कडक हल्ला करावयाचें माझ्या मनांत आलें आहे, म्हणूनहि होय. मला वाटतें, मीं तुला सांगितलें होतें कीं, कित्येक वर्षांमागें असें करण्याचा

माझा बेत होता; आणि धर्मविषयक लेखांतच तो हल्ला मी गोंवून देणार होतों. पण मला वाटलें, एकंदरींत पॉझिटिव्हिस्ट लोकांचा (काम्टेच्या अनुयायांचा—मनुष्यताधर्मवाद्यांचा) राग आपल्याविरुद्ध चेतवणें बरें नव्हे. पण आतां हारिसननें प्रस्तुत लेख लिहून मला वस्तुतः आव्हानच केलें असल्यामुळें, आपणहि आपणास काय म्हणावयाचें असेल तें म्हणावें, असा माझ्या मनाचा फार कल होतो. तुला काय वाटतें ? ”

ता० १४ जून:—“ ‘पिच्छेहाटी धर्म’ ह्या लेखाचीं प्रुफें ह्याबरोबर मी तुजकडे पाठवीत आहें. त्यांत हारिसनला उत्तर दिलेलें असून सर जेम्स स्टीफननें त्यानंतर केलेल्या हल्ल्याचालाहि उत्तर दिलेलें आहे, हें त्यांतल्या शेवटच्या कलमावरून तुझ्या लक्षांत कांहीं अंशीं येईल..... हें उत्तर इतक्यांतच देण्याचा माझा उद्देश नव्हता. पण जेव्हां या महिन्याच्या प्रारंभीं सर जेम्स स्टीफनची मजवर व हारिसनवर टीका आली, आणि त्याबरोबरच विल्फ्रीड वार्डचा “ न्याशनल रिव्ह्यू ” त तसलाच हल्ला आला (मीं तो अजून पाहिला नाहीं.....), तेव्हां आपलें उत्तर प्रसिद्ध करण्याचें आणखी लांबणीवर टाकणें योग्य नाहीं असें मला वाटलें. ”

ता० २२ जुलई:—“ तुला ‘पिच्छेहाटी धर्म’ हा लेख आवडला हें ऐकून मला आनंद होतो. अज्ञेयवाद्यांचें म्हणणें काय हें पूर्वींहून ज्यास्त समजून देण्याच्या कामीं विशेषतः त्याचा बराच उपयोग झाला आहे. स्थापित धर्मवाले, त्यांचे विरोधी, आणि रोमन क्याथलिक, अशा तिन्ही प्रकारच्या कित्येक धार्मिक पत्रांतून माझी पाठ थोपटलेली पाहून मजा वाटते. तुझ्या तिकडेहि त्या लेखाचा वरच्यासारखाच निःसंशय उपयोग होईल. हारिसननें प्रत्युत्तर तयार केलें आहे, पण तें आगस्टच्या पहिलीला प्रसिद्ध होण्याचा संभव नाहीं असें समजतें. ”

तो ता० १ आगस्ट रोजीं लंदनहून दरवर्षाप्रमाणें स्काटलंदास जाण्यास निघाला, त्या वेळीं मिस लॉट व तिची आप्त मिस् ग्लव्हर हीं त्याचीं पाव्हणीं होतीं. सपटंबरच्या प्रारंभींच तो तिकडून लंदनास आला, व नंतर ता० ९ सपटंबर रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—" या पत्राबरोबर तुजकडे असें पाठवीत आहे कीं, तें वाचून तुला हात चोळून हंसावयासच येईल. मनुष्यता धर्मावर मीं केलेली टीका वाचून हारिसनच्या मनांत उघड उघड सूड घेण्याचें आलें, आणि काम्टेच्या मृत्युतिथीचा प्रसंग साधून एक संभाषण त्यानें केलें; तें दैनिक वर्तमानपत्रांतून त्यानें प्रसिद्ध केलें आहे.....ह्या भाषणाची हकीकत व त्यावर माझें उत्तर हीं दोन्ही मीं तुजकडे या पत्रासोबत पाठवीत आहें. ज्याची थुंकी त्याच्या अंगावर यापूर्वीं अशासारखी कधींच उडाली नसेल. त्याच्या मनांत माझें अत्यन्त नुकसान करावयाचें होतें; पण उलट त्यानें आपलेंच अत्यन्त नुकसान करून घेतलें असून माझा अत्यन्त फायदा केला आहे.

तुझ्या हें लक्ष्यांत येईल कीं, डार्विनशीं माझे संबंध काय आहेत ह्याविषयीं लोकांची जी सामान्य समजूत आहे तिच्यांतील चूक दाखवून ती बरोबर करण्यास त्यानें सहजगत्या पण अगदीं स्वाभाविक अशी संधि मला आणून दिली आहे, आणि संघटनात्मक मीमांसेच्या जनितीचीहि हकीकत देण्याचा योग आणून दिला आहे; शिवाय त्यानें, मिल्लची साक्ष एरवीं प्रसिद्ध करण्याची संधि मला सांपडली नसती ती, आणून दिली आहे.....(लोकांच्या) चुका दुरुस्त करण्यास ह्याच्यापेक्षां अधिक सुदैवाची संधि खरोखर कधींच आली नसती. "

ता० १९ सपटंबर:—" हारिसनच्या चतुराईनें लिहिलेल्या पत्राला उत्तर लिहून मीं तें आजच्या ' टाइम्स ' व ' स्टॅंडर्ड ' पत्रांत छापिलें आहे, तें मी तुला या पत्रासोबत पाठवीत आहें. तें

तुजकडे पाठविण्याचें एक कारण तुला तें मनोवेधक वाटेल हें होय, आणि दुसरें कारण, त्याच्या दुसऱ्या भागांत संघटनात्मक तत्त्व-मीमांसेच्या उत्पत्तीची व स्वरूपाची दिलेली त्रोटक माहिती कदाचित् तुझ्या उपयोगी पडेल, हें होय. कारण ती मीमांसा कशी उत्पन्न झाली व तिचें एकंदर स्वरूप काय आहे ह्याची त्यावरून थोडक्यांत साधारण कल्पना येईल. ही त्यांत सुदैवाची आणखी एक गोष्ट होय; कारण तेणेंकरून सामान्य जनांत तद्विषयक व्यापक कल्पना मला पसरतां येत आहे, जी कल्पना एरवीं त्यांच्या दृष्टीसमोर कधींच आली नसती. "

हारिसनला दिलेल्या या उत्तरासंबंधानें रिचर्ड पॉटर त्याच तारखेस त्यास (ता० १९ सपटंबर रोजीं) लिहितो:—" आजच्या ' स्टाण्डर्ड ' व ' टाइम्स ' मधलें तुझें पत्र मीं आतांच पाहिलें. तुला त्यांत पूर्ण सिद्धि आल्याबद्दल मी तुझें अभिनंदन करितों. त्यांत तूं आपलें म्हणणें सिद्ध केलें असून त्यापेक्षांहि ज्यास्त चांगली गोष्ट ही साधिली आहे कीं, ज्यास्त स्वभावसमता आणि पूर्ण सभ्यपणा यांनीं तूं आपल्या प्रतिवाद्यास जिंकिलें आहेस..... त्याच्या टीकेकडे यापुढें लक्ष्य देऊं नको.... तूं सभ्यपणाला जर मनाच्या औदार्याची जोड देशील तर तुझा विजय आणखीहि ज्यास्त ठळक होईल. आतां तुला पूर्ण माहीत आहे कीं, मी तिऱ्हाइत प्रेक्षक असून तुझ्या किंवा काम्टेच्या कोणत्याच तत्त्वमीमांसेचा अनुयायी नाहीं. तुझ्याबद्दल माझ्या मनांत बळकट प्रेम आहे, आणि हारिसनबद्दल मुळींच नाहीं; आणि तुझें नांव व सुख ह्याबद्दल मला फार आस्था वाटते, पण मी तुझ्या किंवा काम्टेच्या तत्त्वमीमांसेवर भरंवसा ठेवणारा किंवा तुमच्यापैकीं कोणाचाहि मी शिष्य नाहीं. मी ज्या ख्रिस्ती धर्मांत वाढलों आहें त्याच्याबद्दल ही किंवा ती मीमांसा स्वीकारण्यास मी समर्थ नाहीं. "

इतर कांहीं माणसांप्रमाणें डा० यूमन्स यानेंहि अशी भीति प्रदर्शित केली कीं, धर्माविषयींची चर्चा बंद होण्याच्यापूर्वींच काम्टेशीं आपला संबंध काय आहे त्यासंबंधाची जी ही चर्चा ह्यानें सुरू केली, ती कांहीं बाबतींत कितीहि फायदेशीर असली तरी तिजपासून फाजील नुकसान होण्याचा संभव आहे. तेव्हां त्यास ता० ६ आक्टोबर १८८४ रोजीं स्पेन्सरनें असें लिहिलें:—" तूं म्हणतोस त्याप्रमाणें, ह्या हारिसन व्यवहारांत वेळाचें फार नुकसान झालें आहे, आणि त्यांत मी प्रथम पडलों ह्याचेंच मला वाईट वाटूं लागलें आहे. तथापि, त्यांतून आतां मी मोकळा झालों आहें.

पहिल्या वादविवादाच्या पाठोपाठ हा दुसरा वादविवाद उत्पन्न झाल्याचा परिणाम असा झाला आहे कीं, " नाइन्टीन्थ सेंचरी " करितां मी तयार करीत असलेल्या निबंधास विलंब होऊन तो ह्या महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झाला नाहीं.... माझ्या संबंधानें (आणि मला वाटतें हारिसनच्या संबंधानेंहि) ह्या पुढच्या निबंधानें हा सर्व वाद पुरा होईल. "

ह्या दुसऱ्या वादविवादांत संघटनात्मक मीमांसेचें स्वरूप व जनिति ह्यांची हकीकत देण्याची संधि आल्यामुळें त्याच्या मनांत असा विचार आला कीं, आपलें शिक्षण आणि आपल्यास उत्क्रान्तीची कल्पना ज्या पायऱ्या पायऱ्यांनीं प्राप्त झाली त्या पायऱ्या ह्यांजबद्दल ज्यांत विवेचन केलें आहे तो ' आत्मचरिता ' चा भाग ह्या वेळीं प्रसिद्ध केल्यास कसें काय होईल. तेव्हां तो प्रसिद्ध करावयास व न करावयास काय कारणें आहेत ह्याचें विवेचन वरील पत्रांत पुढें त्यानें ह्याप्रमाणें केलें आहे:—" आपण जिवंत असतां तें प्रसिद्ध करण्याची अडचण मला ज्यास्त ज्यास्त भासते..... आणि दुसऱ्या पक्षीं, मी मरून जाईपर्यंत त्यांतील मुख्य मुद्याचे भाग छापविण्याचें न लांबविण्यासहि सबळ कारणें आहेत. पहिलें कारण,

त्यापासून होणारा शिक्षणरूपी परिणाम. हल्लीं आपल्या सार्वत्रिक सरकारी शिक्षणपद्धतीमुळें हानिकारक घोकंपट्टीची पद्धति आणि हानिकारक निर्जीव शिक्षणसरण्या यांस ज्यास्त ज्यास्त कायमचें स्वरूप येत आहे, आणि त्यांच्या चरकांत सर्व वर्ग येण्याचा, आणि प्रत्येकजण परीक्षेच्या सत्रांत सांपडण्याचा संभव दिसत आहे; म्हणून लोकांपुढें याच्या उलट पद्धति व तिचे परिणाम मांडण्याचें महत्त्व मला ज्यास्त ज्यास्त दिसत आहे. आणि मी मरून जाईपर्यंत, म्हणजे कदाचित् आणखी दहा किंवा पंधरा वर्षें, त्यांचीं मतें कदाचित बदलूं शकतील असा पुरावा प्रसिद्ध करण्याचें लांबणीवर टाकणें दुर्दैवाची गोष्ट दिसते. आणि लोकांपुढें चरित्ररूपानें उत्क्रान्तिमताच्या वाढीच्या निरनिराळ्या पायऱ्या मांडिल्यानें तें त्यांस अधिक चांगलें समजणार आहे.....एवंच काम्टे व डार्विन यांशीं माझे संबंध काय आहेत याविषयींच्या चुकीच्या समजुती दुरुस्त करण्याखेरीज, (' आत्मचरिता ' चा तो भाग छापण्याच्या कामीं) विलंब न करण्यास बळकट कारणें आहेत. आणि मी म्हणतों त्याप्रमाणें, दुसऱ्या पक्षीं, इतर काम तकूब ठेवणें हेंहि मला बरें वाटत नाहीं, आणि ' आत्मचरित ' प्रसिद्ध करणें हेंहि मला बरें वाटत नाहीं. "

ता० ३० आक्टोबर रोजीं तो त्यास पुनः लिहितो:--" काम्टेच्या तत्त्वमीमांसेशीं मतभेद असण्यास कारणें " हें चोपडें मी पुनः काढीत असून त्याची एक प्रत मी तुला एक दोन दिवसांत पाठवितों. हल्लींच्या परिस्थितींत " वर्गीकरणा " वरील निबंधापासून तो पृथक् करणें मला बरें वाटत आहे. आतां मी माझ्या सर्व लढायांतून आणि त्रासांतून मोकळा झालों असल्यामुळें (कारण हॅरिसनशीं माझे अखेरचे शब्द " नाइन्टीन्थ सेंचरी "च्या आगामी अंकांत प्रसिद्ध व्हावयाचे आहेत.) माझ्या कायमच्या कामाला मला बऱ्याच

उत्साहानें लागतां येईल अशी मला आशा आहे. तें काम पुनः सुरू करण्यापासून मला फार आनंद होईल, कारण तें तसेंच पडलें आहे, आणि इतर उद्योगांचा मला त्रास आला आहे. ”

ता० ११ नवंबर रोजीं यूमन्स त्यास लिहितो:—“ हारिसनविषयक चर्चा आणि त्याचें आगामी पुस्तक यासंबंधानें, मला वाटतें, तूं ह्यापुढें अगदीं दुर्लक्ष्य करणें हा योग्य मार्ग आहे.....उत्क्रान्तिमीमांसेच्या जनितीची पूर्ण हकीकत प्रसिद्ध करणें आणि हल्लींच्या (लोकमताच्या व कृतीच्या) कलाकडे पाहतां शिक्षणविषयक जे विचार निःसंशय महत्त्वाचे दिसतात त्यांस दुजोरा देणें, इष्ट आहे, यासंबंधानें तूं जें म्हटलें आहेस त्याचें पूर्ण महत्त्व माझ्या लक्ष्यांत येतें. तथापि तुझें मुख्य काम होईल तितकें पुरें करण्याचें जें फार मोठें महत्त्व आहे, त्या मानानें वरील काम कांहीं वर्षें अगोदर करण्याचें महत्त्व फारच कमी आहे. संघटनात्मक मीमांसेच्या स्पष्टीकरणांत प्रत्येक ज्यास्त ज्यास्त आक्रमिलेली मजल जगाच्या कायमच्या फायद्याची होईल, आणि म्हणून हंगामी कामांना त्या कामाच्या आड येऊं देतां कामा नये. ”

तो यूमन्स यास ता० ३ जानेवारी १८८९ रोजीं लिहितो:—“ तुझ्या शास्त्रीय मासिकाचा शेवटचा अंक मला मिळाला. त्यांत मी व हारिसन ह्यांच्यामधील प्रश्नाची मांडणी तूं फार उत्तम केली आहेस; आणि नेहमींप्रमाणें मुद्याचे प्रश्न फार स्पष्टपणें लक्ष्यांत घेतले आहेस. ‘ जर्नल आव्ह् एज्युकेशन ’ (शिक्षणविषयक पत्र) याचें पान मी याबरोबर पाठवीत आहें, त्यांत एक प्यारा असा आहे कीं तो वाचून तुझी कर्मणूक होईल.” वरील मासिकानें विद्यमान इंग्लिश शिक्षणशास्त्रवेत्त्यांपैकीं सर्वांत अत्यन्त मोठ्या सातजणांची जो उत्तम याद देईल त्यास बक्षीस लाविलें होतें. त्यासंबंधाचा तो प्यारा होता. ज्या यादींबद्दल बक्षीस मिळालें त्या यादींत स्पेन्सरचें नांव

पाहिलें होतें. एकंदर याद्यांमध्येंहि त्याचेंच नांव सर्वांत ज्यास्त याद्यांत होतें, आणि त्याच्या खालोखाल याद्यांत प्रो० बेनचें होतें.

ता० १३ जानेवारी १८८९ रोजीं तो यूमन्स यास पुनः लिहितो:-" तुझ्याकडून आज पुष्कळ दिवसांत पत्र आलें नाहीं यावरून तूं आजारी आहेस, किंवा निदान हल्लींची ही थंडी तुला जड गेली आहे, अशी मला शंका वाटते. दक्षिण प्रांतीं (कमी थंडीच्या मुलखांत) मेहरबानी करून जा."

याच दिवशीं डा० यूमन्सचें ता० २ जानेवारीचें पत्र त्यास मिळालें तें असें:—" आणि आतां एकप्रकारची नवीन अडचण उत्पन्न झाली आहे, आणि तिच्या संबंधानें मला तुझा सल्ला घेतला पाहिजे. हारिसनशीं झालेला तुझा वादविवाद स्वतंत्र चोपड्याच्या रूपानें छापून निघाला पाहिजे असें म्हणणारे पुष्कळ लोक आहेत, आणि प्रकाशकहि त्याला अनुकूल आहेत. असें करणें इष्ट आहे किंवा नाहीं हाच केवळ प्रश्न नाहीं, कारण ती गोष्ट आमच्या हातांत नाहीं. आह्मीं तसें चोपडें न काढिल्यास दुसरें कोणी काढितील, आणि तसें झाल्यास तो हारिसन पक्षाचा विजय म्हणून समजला जाईल. कारण लोक म्हणतील, एरवीं स्पेन्सरपक्ष तसें करण्यास मागें घेता नसता..... एकंदरींत तें छापून काढणें बरें दिसतें. ह्यासंबंधानें तुझें मत काय आहे? "

त्यावर स्पेन्सर त्यास ता० १४ जानेवारी रोजीं लिहितो:—" तुझी प्रकृति कशी काय आहे याबद्दल विवंचना करीत काल मीं तुला पत्र पाठविल्यावर आज सकाळीं तुझें पत्र आलें; तें पाहून मला अमळ बरें वाटलें, तरी पूर्ण बरें वाटलें नाहीं, कारण असें दिसतें कीं थंडीपासून तुला खोकल्याच्या रूपानें नाहीं, तर इतर रूपांनीं तरी त्रास होत आहे. ज्यास्त काम करण्याच्या यत्नांत आपलें नुकसान करून घेण्याचें जें अमेरिकन लोकांचें वेड त्या वेडांत

तुला ज्यास्त ज्ञान असतांहि, तूं कां पडतोस ? तूं विश्रान्तीचें मत तत्त्वत: कबूल करितोस; तर मग त्याप्रमाणें प्रत्यक्ष कां वागत नाहींस ? थोडेसें ज्यास्त काम करण्याच्या आशेनें आयुष्य आंखूड व दु:खमय करण्यांत आणि शेवटीं या काम करण्याच्या उत्कंठेनेंच आपली आशा निष्फळ करून घेण्यांत काय मतलब ? सार्वजनिक हिताकरितां मेहनत करण्याच्या बाबतींत आधींच तूं अगदीं पुष्कळ केलें आहेस. आपल्या स्वत:कडे जरासें लक्ष्य दे, आणि बाकीचें चालेल तसें चालूं दे. माझ्या स्पष्टोक्तीबद्दल मला क्षमा कर; पण तूं आपल्यास मुद्दाम मारून घेत आहेस हें पाहून मला फार वाईट वाटतें. हारिसनशीं झालेला वाद पुन: छापून काढण्याच्या संबंधानें तुझ्यासारखें माझें मत आहे. तो पुन: छापला जाणार म्हणून एकदम जाहिरात देण्याबद्दल, आणि मी तुला कांहीं टिपणें पाठवितों हें तुला कळविण्यासाठीं, आजच तुला तार केली आहे. आतां संधि असल्यामुळें त्याच्या लेखांतील पुष्कळ मुद्दे दुरुस्त करणें योग्य होईल."

ता० १९ जानेवारी रोजीं तो त्यास पुन: लिहितो:–" मी याबरोबर पुन: छापून काढावयाचे लेख, व त्यांतील एकावर कांहीं टीपा, पाठवितों; त्या टीपांतील सर्वांत नाहीं तरी बहुतेकांत हारिसनच्या चुकीच्या विधानांची दुरुस्ती केलेली आहे. मी समजतों कीं, तुला जरी त्यांना एक प्रस्तावना जोडण्यापुरती शक्ति वाटत नसली, तरी हे लेख पुन: छापण्याचा उद्देश दर्शविण्यासाठीं तूं चार प्रास्तविक ओळी लिहिशील. हें तूं करावें असें मला यासाठीं वाटतें कीं हें लेख माझ्या सांगीवरून पुन: प्रसिद्ध केले जात आहेत अशी कोणाची चुकीची समजूत होऊं नये. तूं मला लिहिलेंस त्याप्रमाणें त्या प्रास्तविक चार ओळींत तूं जर असें म्हटलेंस कीं, ते लेख कायमच्या(पुस्तकाच्या) स्वरूपानें आपणांस मिळावे अशी लोकांची मागणी आली आहे, आणि आपल्टन कंपनीनें ते प्रसिद्ध केले नसते

तर दुसरा कोणी प्रकाशक ते लवकरच प्रसिद्ध करता; आणि शिवाय तूं जर असें म्हटलेंस कीं, अशी स्थिति आढळून आल्यामुळें ते पुनः छापविण्याबद्दल तूं माझी परवानगी मागितलीस; तर तें पुरे होईल. शिवाय त्यांत तूं असेंहि म्हटल्यास चालेल कीं, पुनः छापण्यास मी ते कबूल झाल्यानंतर, हारिसनच्या कित्येक विधानांची दुरुस्ती करण्याकरितां मीं तुला एका लेखास कांहीं टीपा जोडण्याची सामग्री पाठवून दिली. ह्या टीपा मला सुचेल त्या स्वरूपानें तुला देत आहें, आणि त्या स्वरूपांत तुला वाटेल तो फेरबदल करण्याची मोकळीक ठेविली आहे. अशा रीतीनें ज्या अर्थीं मीं तुझ्या लक्षांत चुका व दुरुस्त्या आणून देत आहें, त्या अर्थीं तूं त्यांत फेरबदल केल्यास तूं त्यांच्याखालीं आपल्या नांवाचीं आद्याक्षरें घालणें योग्य होईल. ह्या टीपा ज्या लेखाला मीं जोडिल्या आहेत तोच केवळ नव्हे, तर सर्व लेख मीं तुजकडे पाठविले आहेत; अशासाठीं कीं, एथें छापिलेल्या मूळ लेखांवरून ते पुनः छापिले जावे. ”

ता० २१ जानेवारी:—“ मला असें वाटतें कीं, काळजीपूर्वक समजूत करून न दिल्यास लेखांच्या क्रमाच्या संबंधानें छापणारे कदाचित् कांहीं चुका करितील; आणि म्हणून मला योग्य दिसतो त्या क्रमानें ते लेख लावून देणें आणि त्यांचे पूर्वोत्तर भाग लावून देणें योग्य दिसतें. ”

ता० २७ जानेवारी १८८९ रोजीं यूमन्स त्यास लिहितो:— “ माझ्या बिघडलेल्या प्रकृतीच्या संबंधानें तूं इतकी काळजी वाहतोस, आणि चांगल्या हवेच्या ठिकाणीं जाण्यासाठीं पैसे देण्यासाठीं औदार्यानें तयार झालास, ह्याबद्दल मला मनापासून कृतज्ञता वाटते. पण माझी अडचण पैशाची नाहीं. जोंपर्यंत मी माझ्या शास्त्रीय मासिकास चिकटून आहें तोंपावेतों मला निर्वाहाची काळजी नाहीं..... तूं (हारिसन प्रकरणांतील लेख पुनः छापण्याचें ठरवि-

ल्याचें ऐकून मला फार आनंद झाला. तुझी तार आल्यानंतर दोन तासांत ते लेख छापखानेवाल्याकडे चालते झाले..... त्यांच्याबद्दल मागणीचीं पत्रें आमचेकडे आलीं आहेत. मला वाटतें, सामान्य कारणासाठीं तीं पत्रें (ग्रंथाच्या) अखेरीस छापणें योग्य होईल."

" धर्माचें स्वरूप आणि वास्तविकपणा " (The Nature and Reality of Religion) या नांवानें हा लेखसंग्रह आपल्टन कंपनीनें प्रसिद्ध केला, आणि त्याची एक प्रत हारिसनकडे पाठविली. तेव्हां त्यानें लगेच (ता० १६ मे रोजीं) स्पेन्सरला या प्रमाणें लिहिलें:—" या ग्रंथाबद्दल ज्या अर्थीं मला कांहीं म्हणावें लागेल त्या अर्थीं तुला असें विचारणें मला योग्य दिसतें कीं, तो तुला कळवून प्रसिद्ध केला आहे काय? किंवा तुझी त्याबद्दल पसंती आहे कीं काय, आणि विशेषेंकरून असें विचारणें योग्य दिसतें कीं, माझ्या लेखांना जोडलेल्या टीपांबद्दल व इतर गोष्टींबद्दल तुला कांहीं माहिती आहे काय? किंवा तूं त्या आपल्या म्हणून म्हणण्यास तयार आहेस काय?" दुसऱ्या दिवशीं स्पेन्सरनें त्यास कोणत्या कारणासाठीं ते लेख प्रसिद्ध केले त्याबद्दल, आणि त्यांच्याशीं असलेल्या आपल्यासंबंधाबद्दल व जबाबदारीबद्दल लिहिलें. तेव्हां " मला न कळवतां किंवा विचारतां माझे लेख छापण्यास तुला योग्य कारण होतें अशी या पत्रावरून माझी मुळींच खात्री होत नाहीं " असें हारिसननें उत्तरीं त्यास कळविलें, आणि असें विचारलें कीं, " ज्या ग्रंथाचा मी (कांहीं अंशीं) कर्ता आहे त्यावर होणारा नफा तुला मिळावयाचा आहे, किंवा तो तुझे अमेरिकन प्रकाशक व मित्र आपल्यासाठींच ठेवणार आहेत?" हें पत्र त्यानें ता० २९ मेच्या ' टाइम्स ' मध्यें छापिल्यामुळें स्पेन्सरनें दोन दिवसांपूर्वीं हारिसनला लिहिलेलें पत्र 'टाइम्स' मध्यें प्रसिद्ध करणें त्यास (स्पेन्सर यास) भाग पडलें. तें प्रसिद्ध करतांना, हारिसननें द्रव्यविषयक जे

उल्लेख केले होते, त्यासंबंधानें त्यानें ह्याप्रमाणें लिहिलें:--" नफ्याचा कांहीं भाग मला मिळावयाचा आहे कीं काय " असें विचारूनच केवळ नव्हे, तर " वाङ्मयात्मक चांचेपणाचा नवीन प्रकार " असा मथाळा (आपल्या पत्रास) देऊन मुकाट्यानें तो असें ध्वनित करितो कीं, मला नफ्याचा भाग मिळावयाचा आहे.....नेहमींच्या रीतीनें नेमिलेले तीन गृहस्थ जर असें ठरवतील कीं, यूमन्सनें मला कळविलेल्या परिस्थितींत मीं स्वीकारलेला मार्ग योग्य नव्हता, तर, हारिसनची इच्छा असल्यास, आपल्टन कंपनीला पुस्तक नाहींसें करण्यास व कायमचे ठसे मोडण्यास मी सांगेन, आणि त्यांचें नुकसान भरून देईन. " ह्यावर ता० २ जून रोजीं हारिसननें 'टाइम्स'मध्यें असें लिहिलें कीं, मला ह्या भानगडींत ह्यापुढें पडावयाचें नाहीं, किंवा तिऱ्हाईत नेमून त्याचा निकाल लावून घेण्याचा स्पेन्सरला आग्रह करावयाचा नाहीं. तें पाहून स्पेन्सरनें ' टाइम्स'ला तारेनें असें कविलें कीं, " हारिसनशीं ह्यापुढें भांडण्याच्या ऐवजीं, आणि त्याचा कापीराइटचा हक्क मीं मुद्दाम लक्ष्यांत घेतला नाहीं असें कोणास वाटूं देण्याच्या ऐवजीं, मी आपल्टन कंपनीला त्या पुस्तकाची विक्री बंद करण्याचा, राहिलेलीं पुस्तकें व कायम ठसे नाहींसे करण्याचा, त्यांचें होईल तें नुकसान माझ्या नांवें लिहिण्याचा, विद्युत्संदेश दिला आहे. " नंतर दुसरे दिवशीं त्यानें ' टाइम्स'ला पत्र लिहून त्यांत असें कबूल केलें कीं, " तो ग्रंथ छापण्यास अनुमति देण्यांत मीं चूक केली. " त्यासंबंधानें त्यानें म्हटलें:—" हा वाद लोकांपुढें योग्य रीतीनें मांडण्यांत माझें मन इतकें गढून गेलें होतें कीं, कापीराइटचा प्रश्न मला सुचला नाहीं. म्हणून माझी चूक झाली. पण मला वाटतें, माझ्या चुकीमुळें हारिसननें केलेला माझा अपमान योग्य ठरत नाहीं. बाकीच्या प्रती व ठसे रद्द करून माझ्या चुकीचे परिणाम दुरुस्त करण्याच्या बाबतींत शक्य होतें तें सर्व मीं केलें आहे."

हें पत्र वाचून हारिसन असें म्हणाला कीं, " ह्या ग्रंथापासून द्रव्यलाभ करण्याचा स्पेन्सरचा उद्देश होता असा आरोप त्याच्यावर आणण्याचा माझा मुळींच हेतु नव्हता; आणि असा ठसा मनावर उमटेल असे शब्द मीं योजिले असल्यास मला त्याजबद्दल वाईट वाटतें. " इकडे स्पेन्सरनें ह्या पत्रव्यवहाराची नक्कल यूमन्सकडे पाठवून ता० २ जून १८८९ रोजीं त्यास लिहिलें:—" 'हारिसनविषयक ग्रंथ विकण्याचा बंद करा ' म्हणून आपल्टन कंपनीला मीं पाठविलेली तार वाचून तुला निःसंशय आश्चर्य वाटलें असेल; पण याबरोबर पाठविलेला पत्रव्यवहार वाचून तें कमी होईल. त्यावरून तुझ्या लक्ष्यांत येईल कीं, त्या पुस्तकामुळें येथें अकल्पित झेंगट उत्पन्न झालें आहे, पण ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत अगोदरच यावयास पाहिजे होती. "

ता० ८ जून:—" ह्या हारिसन प्रकरणासंबंधी मला आणखी तुला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, त्याच्या योगानें कित्येक लोक माझ्याशीं पूर्वीं वागत होते त्याहून ज्यास्त प्रेमपूर्वक वागूं लागले आहेत. "

ता० ९ जून:—" मी काल रात्रीं लंदनास परत आलों, आणि आज सकाळीं मला असें समजलें कीं, गेल्या शनिवारच्या ' स्टॅण्डर्ड ' पत्रांत न्यूयार्क एथील तारेंत अशी बातमी आहे कीं, दुसरा कोणी प्रकाशक तें पुस्तक पुनः छापील या मुद्यावर आपल्टन कंपनी बाकीच्या प्रती व कायम ठसे नाहींसे करण्याचें नाकारितात. त्यांचा वरील अंदाज बहुधा बरोबर असेल. आपल्टन कंपनी ग्रंथकाराचा फायदा मला व हारिसनला वांटून देण्याचें म्हणतात त्याबद्दल एक शब्द लिहितों. जर कांहीं नफा हल्लीं झालेला असेल, किंवा माझ्या विनंतीप्रमाणें करण्याचें नाकारिल्यामुळें जर कांहीं यापुढें होईल, तर माझें असें म्हणण्याची इच्छा आहे कीं, या व्य-

वहारांत नफा मिळविण्याची यापूर्वी किंवा आतांहि माझी मुळींच इच्छा नसल्यामुळें मी नफ्याचा वांटा मुळींच घेणार नाहीं. "

हें पत्र हारिसननें वाचून पोष्टांत टाकावें ह्या उद्देशानें त्यानें तें त्याजकडे पाठविलें. शेवटीं पुस्तक नाहींसें केल्याची न्यूयार्क एथून तार आली, व ह्या कटु नाटकांतलि हा शेवटचा अंक झाला असें त्यास वाटलें. हारिसननेंहि अशी आशा प्रदर्शित केली कीं, ' कालान्तरानें मित्रत्वाचें नातें आमच्यांत पुनः स्थापन होवो. ' त्यावर स्पेन्सर त्यास ता० १३ जून १८८९ रोजीं लिहितोः—" गुरुवारीं रात्रीं अमेरिकेहून मला तार आली तिच्यांत असे शब्द होते कीं, पहिली तार आल्याबरोबर पुस्तक बंद केलें. यावरून असें दिसतें कीं, ' स्टांडर्ड ' च्या बातमीदाराला कशी तरी चुकीची बातमी समजली होती. गुरुवारीं आलेल्या तुझ्या चिठीसंबंधानें मी असें सांगतों कीं होऊन गेलेली गोष्ट विसरण्यास मी होईल तेवढा यत्न करीन, जरी असें करण्यास मला बरीच अडचण पडेल. गेल्या वर्षीं जी मनोवृत्ति मजमध्यें जागृत झाली, व अद्यापिहि जिवंत राहिली आहे, तिचें मुख्य कारण तुला बहुधा माहीत नसावें. तुला बहुधा असें वाटलें असावें कीं वादविवादरूपी जी विरोधवृत्ति मी सारखी दाखवित आलों आहें, त्याचा तो परिणाम आहे. पण वास्तविक गोष्ट तशी नाहीं. आमच्या वांकड्याचें कारण तुझ्या लक्ष्यांत येण्यास मला कित्येक गोष्टी तुला सांगाव्या लागतील. " यानंतर " वर्णनात्मक समाजशास्त्रा"च्या जनितीची, त्याजवर खर्च केलेल्या वेळाची व श्रमांची, त्यांत आलेल्या मोठ्या नुकसानीची, चवदा वर्षांत केलेल्या ग्रंथलेखनापासून उत्पन्न झालेला सर्व फायदा त्यांत घातलयाची, आणि त्यामुळें एरवीं जीं सुखसाधनें त्याला उपभोगतां आलीं असतीं त्यांच्या उपभोगास अंतरण्यास भाग पडल्याची, हकीकत देऊन पुढें त्या पत्रांत त्यानें असें लिहिलें:--" ह्या सर्व त्यागांबद्दल माझे कोणीच आभार

मानिले नाहींत.....तें असो, पण त्याऐवजीं आभारांच्या बहुतेक अगदीं उलट अशा गोष्टींची मला प्राप्ति होईल असें मात्र माझ्या मुळींच ध्यानांत आलें नव्हतें. इतरांच्या फायद्यासाठीं मीं वेळ, श्रम, आरोग्य व द्रव्य जीं खर्ची घातलीं त्याबद्दल मला निर्भर्त्सनेची प्राप्ति होईल असें माझ्या स्वप्नींहि आलें नव्हतें. " हें पुस्तक कोडबोळें असून तें हुकमाप्रमाणें कापून काढलेल्या उताऱ्यांचें बनविलेलें आहे " असें जेव्हां त्या ग्रंथाचें (वर्णनात्मक समाजशास्त्राचें) तूं वर्णन केलेंस, आणि असें म्हणून व वकिलाशीं माझी तुलना करून तूं जेव्हां असा समज ध्वनित केलास (जो समज अमेरिकेंतहि पसरला गेला) कीं, बनावट पुरावा जगापुढें मांडण्याइतका मी अप्रामाणिक आहें, आणि अशा रीतीनें खोटे सिद्धान्त मला उभारतां येतील असें मानण्याइतका मी मूर्ख आहें, तेव्हां तूं मला खोल जखम केलीस. ज्यानें चांगले हेतु साधण्यासाठीं आपलें अनेक तऱ्हांनीं नुकसान करून घेतलेलें नसेल त्याला देखील असला मर्मच्छेद फार लागेल. पण ज्यानें अंगावर घेतलेलें सन्मान्य (फुकाचें) काम पुरें करण्याकरतां आणि सार्वजनिक फायदा करण्याकरितां अनेक नुकसानें सोशिलीं त्याला केलेली असली जखम लवकर भरून येण्यासारखी नाहीं. ह्या नवीन प्रकरणानें तर ती जखम उघडच बरी होण्यासारखी नव्हती, आणि ज्या माणसानें, दुसऱ्या कोणींहि मला जितकें दुःख दिलेलें असेल त्याहून फारच ज्यास्त दुःख दिलेलें आहे, त्याच्याशीं एकदम मला प्रेमसंबंध स्थापतां येतील असें तुला क्वचितच वाटत असेल. पण माझ्याकडून होईल तेवढा यत्न मी करीन; आणि झालेल्या गोष्टींनीं उमटलेला ठसा कालान्तरानें कदाचित् निघून जाईल."

" वर्णनात्मक समाजशास्त्रा " च्या संबंधानें मीं केलेल्या टीकेनें तुला मीं त्रास दिला याबद्दल मला वाईट वाटतें, असें हारिसननें ताबडतोब त्यास लिहिलें, आणि असें म्हटलें कीं, " तूं पुरावा

बनावट केला आहेस, किंवा सत्याचें सन्मान्य रीतीनें अन्वेषण करण्याखेरीज तुझा दुसरा कांहीं उद्देश होता, असें माझ्या मनांत मुळींच आलें नाहीं. मीं जें कांहीं म्हटलें तें सिद्धान्त ठरविण्याच्या तुझ्या विशिष्ट सरणीची तात्त्विक दृष्ट्या काय किंमत आहे तें दाखविण्याच्या संबंधानें म्हटलें.....पण जेथें सत्याच्या पक्षाला तूं इतकें महत्त्व दिलेलें आहेस, तेथें (वर्णनात्मक समाजशास्त्रांतील) हीं कोष्टकें तुझ्या देणग्यांपैकीं अत्यन्त लहान देणगी आहे म्हणून मी समजतों."

ह्या प्रकरणासंबंधानें स्पेन्सरनें स्वीकारिलेला मार्ग पाहून न्यूयार्कमधील त्याचे मित्र फार गोंधळांत पडले; आणि डा० यूमन्स त्यास असें लिहिता झाला:---" या प्रकरणाबद्दल मला फारच वाईट वाटतें, आणि माझ्या कोणत्याहि कृतीमुळें तुला इतका त्रास व्हावा ह्याबद्दलहि मला वाईट वाटतें. मी जी काळजी करितों ती माझ्या स्वताच्या संबंधानें नव्हे, तर या प्रकरणांतील न्याय व हक्क ह्यांजबद्दल होय, आणि हल्लींचा माझा विचार, हें प्रकरण तें पुस्तक तुझ्या हुकमाप्रमाणें नाहींसें करण्यापलीकडे न्यावें, असा आहे. त्यावर त्यासंबंधानें तो यूमन्स यास ता० २३ जून १८८९ रोजीं लिहितो:—" ही गोष्ट म्हणजे प्रारंभापासून चुकांची एक माळच झालेली आहे. जानेवारींत तुझ्या पत्राला एकदम तारेनें उत्तर पाठविण्याच्या ऐवजीं मीं त्या सर्व प्रकरणाचा नीट विचार केला असता, तर आतां जशा प्रकारची गोष्ट बनून आलेली आहे तशी कांहीं तरी बनून येईल असें माझ्या ध्यानांत आलें असतें.....मीं जो मार्ग स्वीकारला तो स्वीकारण्यास मुख्य कारण हें झालें कीं, आपल्या बोलण्यांत व वर्तनांत सुसंगता ठेवण्यास दुसऱ्याचा कापीराइटचा योग्य हक्क मानणें माझें कर्तव्य होय असें मला वाटलें. मीं अगोदरच सांगितल्याप्रमाणें तो वादविवाद नीट रीतीनें मांडण्यांत त्या वेळीं मी इतका गर्क झालों होतों कीं, कापीराइटचा प्रश्न

माझ्या मनांतच आला नाहीं; तो इतका कीं हारिसननें जेव्हां आपलें पत्र प्रसिद्ध केलें तेव्हां ती गोष्ट प्रथम माझ्या डोक्यांत आली, आणि ती मीं कबूल केली. कारण मी जर राष्ट्राराष्ट्रांत कापीराइट असावा असें म्हणतों, तर तो कायद्यानें जरी पाळिला नाहीं, तरी मला पाळिला पाहिजे; आणि म्हणून ज्या कृत्यांत तो पाळिलेला नाहीं अशांत आपलें अंग मला घालतां कामा नये. म्हणून मला वाटलें कीं (न जाणतां) त्याच्या हक्काकडे दुर्लक्ष्य करण्यांत माझी चूक झाली, आणि ती गोष्ट तें पुस्तक नाहींसें करून आपण जाहीर करणें योग्य होय. "

ह्या एकंदर प्रकरणांत स्पेन्सरचें, आपल्टन कंपनीचें व आपलें वर्तन न्याय्य होतें असें दाखविणारा लेख यूमन्स तयार करीत आहे असें ऐकून त्यानें त्यास असें लिहिलें कीं, तो लेख इंग्लंडांत प्रसिद्ध करणें फार अनिष्ट होईल, कारण आतां तेथें तें प्रकरण अगदीं विझून गेलें होतें. पण पुढें त्या लेखाचीं प्रुफें त्याच्याकडे आल्यावर तो त्यास ता० २८ जुलई १८८९ रोजीं लिहितो:—" मी लंदनांतून निघणार इतक्यांत तुझ्या लेखाचीं प्रुफें मला मिळालीं..... तुला तो इतका असमाधानकारक कां वाटतो हें मला कळत नाहीं. मला तो फार स्पष्ट आणि जोरदार दिसतो, आणि माझ्या मित्रांनाहि तसा दिसतो. तुझ्या पूर्वींच्या दोन पत्रांचीं जेव्हां मीं उत्तरें लिहिलीं, आणि तो कितीहि चांगला असला तरी एथें तो प्रसिद्ध करणें वेडेपणाचें होईल असें म्हटलें, तेव्हां ह्या प्रकरणांतील माझ्या अंगाच्या विचारांतच मी अगदीं गर्क झालों होतों. आपण केलें ते योग्य केलें असें तुला व आपल्टन कंपनीला इंग्लिश लोकांपुढें मांडण्याचें तुझा लेख चांगलें साधन असल्यामुळें तो एथें प्रसिद्ध करण्याची इच्छा करण्यास तुम्हांस सबळ कारण आहे ही गोष्ट मीं लक्ष्यांत घेतली नाहीं. म्हणून माझा संबंध येणार नाहीं अशा रीतीनें

ती गोष्ट जर तुम्हांला करतां आली (तो लेख इंग्लंदांत प्रसिद्ध करतां आला) तर मला आनंद होईल; पण माझ्या फायद्यासाठीं ती गोष्ट केली जात आहे असें दिसण्याच्या मात्र मी अगदीं विरुद्ध आहें."

वरील पुस्तकाची विक्री बंद करण्यापूर्वींच्या विक्रीवर झालेल्या फायद्याचा भाग जेव्हां हारिसनकडे आपल्टन कंपनीनें हुंडी करून पाठविला, तेव्हां त्या वादाचे विझत चाललेले निखारे पुन: प्रज्वलित होण्यास तें एक कारण झालें. 'टाइम्स' ला ता० ७ आक्टोबर रोजीं एक पत्र लिहून त्याच्या द्वारा ती हुंडी स्वीकारिण्याचें त्यानें नाकारिलें, जरी त्याबरोबरच त्या कंपनीचा हेतु स्तुत्य होता ही गोष्ट त्यानें कबूल केली. या वेळीं या बाबतींत यूमन्सनें एक पत्र लिहिणें योग्य होईल असें स्पेन्सरला वाटलें. त्याप्रमाणें त्याचें पत्र ता० १६ नवंबरच्या 'टाइम्स' मध्यें आलें. त्यांत त्यानें कांहीं चुकीचे समज दूर केले होते, आणि प्रामाणिक अमेरिकन प्रकाशकांना काय अडचणी येतात त्यांचें स्पष्टीकरण केलें होतें. त्यांत तो म्हणाला कीं, "राष्ट्राराष्ट्रांमधील कापीराइटचा हक्क स्थापन होईपर्यंत ह्या अडचणी दूर व्हावयाच्या नाहींत." त्यावर 'टाइम्सनें विरुद्ध अग्रलेख लिहून असें म्हटलें कीं, "डा० यूमन्सनें प्रकाशकाची जबाबदारी फुगवून दाखविली आहे, आणि स्पेन्सरची झांकून ठेविली आहे."

पूर्वीं अंदाज केल्याप्रमाणें ह्यांनीं विक्री बंद केलेलें पुस्तक दुसऱ्या कोणीं सटीक पुन: छापिलें, आणि त्याची एक प्रत नाताळाच्या अगोदर स्पेन्सरकडे आली. ही गोष्ट स्पेन्सर यास यूमन्सनें आक्टोबरअखेरच कळविली होती, पण त्याबद्दल अर्थात् त्याची जबाबदारी कांहींच नव्हती.

हा सर्व गोंधळ चालला असतां स्पेन्सरला "धर्मसंस्था" हा समाजशास्त्राचा भाग पुरा करतां आला याचें अमळ आश्चर्य वा-

टतें. तो ग्रंथ १८८९ च्या पावसाळ्यांत प्रसिद्ध झाला. स्पेन्सरचें एक वेळ जार्ज ईलियटवर प्रेम जडलें होतें, अशी जी वदंता इंग्लंदांत कधीं कधीं, व अमेरिकेंत वारंवार, ऐकिली जात असे, तिला तीं १८८७ च्या दिजंबरांत वारली तेव्हां, पुनः जीव आला होता. ह्या कंड्यांपासून स्पेन्सरला फार त्रास होत असे. पण त्या अगदीं खोट्या आहेत हें प्रसिद्धपणें स्वतः दाखविणें योग्य नाहीं असें त्यास वाटून त्यानें ती गोष्ट हक्स्ले, टिंडाल, पॉटर आणि यूमन्स यांस खासगी रीतीनें कळविली होती, आणि त्यांच्या देखत कोणीं तसें म्हटलें असतां, ती गोष्ट खोटी आहे असें सांगण्यास त्यानें त्यांस विनंति केली होती. आतां जॉर्ज इलियटचें चरित्र प्रसिद्ध व्हावयाचें होतें. म्हणून त्यांत ही बातमी खोटी असल्याचें नमूद केलें जावें अशी त्यास इच्छा झाली. चरित्रकार मि० क्रॉस ह्यानें ती गोष्ट प्रथम कबूल केली, पण सरतेशेवटीं कांहीं पत्रव्यवहार होऊन ती गोष्ट नमूद व्हावयाची राहिली. त्याचीं कारणें ता० ४ फेब्रुवारी १८८९ रोजीं यूमन्सला लिहिलेल्या पत्रांत स्पेन्सरनें दिलीं आहेत. तें पत्र असें:—'जार्ज इलियटचें चरित्र' नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे; आणि प्रत्येकजण तें वाचीत आहे. तें माझ्यासंबंधानें पुष्कळ बाबतींत समाधानकारक आहे, पण ज्या बाबतीसंबंधानें मीं तुला कांहीं वर्षांपूर्वीं लिहिलें होतें त्या बाबतींत, म्हणजे मी तिच्यावर प्रीति करीत होतों ह्या कंडीच्या बातमींत असमाधानकारक आहे. मीं तुला लिहिलें तेव्हां हक्स्ले, टिंडाल व पॉटर यांस वस्तुस्थिति अगदीं खाजगीरीतीनें कळविली, आणि त्यांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें क्रॉसला अशी विनंति केली कीं, निदान ही गोष्ट खोटी आहे अशा प्रकारची एक टीप तिच्या चरित्रास जोडावी. ह्या गोष्टीस तो कबूल झाला, कारण ह्याबद्दल मींच त्याला वास्तविक स्थिति कळविली होती असें नाहीं, तर तिनेंहि कळविली होती. ती नमूद कर-

ण्याची वेळ आली तेव्हां टीपेच्या संबंधानें त्याचा-माझा मतभेद पडला. कारण माझी इच्छा अशी होती कीं, ही गोष्ट खोटी आहे इतकेंच नमूद करावें; त्याच्या मनांत ती टीप निराळ्या रीतीनें घालावयाची होती, व तशा रीतीनें ती घातल्यास खरी नाहीं अशी गोष्ट तिच्यांत गर्भित होत होती, म्हणून तिजवर मला आक्षेप घ्यावा लागला. सरतेशेवटीं, (ह्यासंबंधानें) ज्या कांहीं बातम्या पसरल्या असतील त्या खोट्या आहेत अशी मोघम टीप घालण्याचें ठरलें; पण तें पुस्तक छापिलें जात असतां, लार्ड आक्टन व सर चार्लस बोवेन यांनीं तीं प्रुफें पाहिलीं तेव्हां, अशा प्रकारची टीप घातल्यास तिच्या योगानें नव्या गप्पा पसरतील ह्या मुद्यावर तिला आक्षेप घेतला. पण ती सर्व गोष्ट क्रॉसच्या हातांत होती; आणि मला ती ज्या स्वरूपानें घालावयाची होती त्या स्वरूपानें ती घालण्यास ज्या अर्थी तो कबूल होईना, आणि तो ज्या स्वरूपानें ती घालण्यास नाखुषीनेंच तयार होता, त्या स्वरूपानें ती घातल्यास ज्या अर्थी तिचा भलताच अर्थ होण्याचा संभव होता, त्या अर्थी मीं ती मुळींच नको म्हणून म्हटलें. क्रॉसचें असें म्हणणें पडलें कीं, ही बातमी खोटी ठरविण्यास अप्रत्यक्ष पुरावा पुरे आहे. मला वाटतें कीं, तूं जर त्या गोष्टीची स्थिति पाहिलीस आणि तिच्या चरित्रांतील १८९२ पासूनचे पुढचे उतारे पाहिलेस, तर क्रॉस म्हणतो तसें मुळींच नाहीं ही गोष्ट तुझ्या लक्षांत येईल; आणि ज्यांस पूर्वीं ही बातमी खरी म्हणून वाटलेली असेल त्यांस आपला समज खोटा म्हणून वाटूं लागण्यास त्यांत कांहीं दिसणार नाहीं. ज्या वेळीं ही टीप अखेरची रद्द केली त्या वेळीं क्रॉसशीं केलेल्या पत्रव्यवहारांत मीं म्हटलें त्याप्रमाणें लोकांत रूढ असलेली बातमी खोटी आहे असें दोघांच्या म्हणण्याच्या आधारावर थोडक्या शब्दांनीं व्यक्त करण्याची त्यास संधि होती; आणि असें असूनहि

त्यानें प्रस्तुतचा मार्ग मुद्दाम स्वीकारिलेला आहे, आणि ती बातमी तशीच राहूं दिली आहे; कदाचित् खरीच आहे असें लोकांस वाटण्यास संधि उत्पन्न करून दिली आहे. त्याला ही दुरुस्ती जरी सहज्जगत्या करतां आली असती, तरी मला करतां येत नाहीं, आणि त्यामुळें जीं वेडीं वेडीं विधानें अमेरिकेंत लोक ह्यासंबंधानें करितात म्हणून तूं मला लिहिलेंस त्या दुरुस्त करण्यास मला कधींच संधि येणार नाहींसें मला वाटतें."

स्पेन्सरचे जॉर्ज इलियटशीं काय संबंध होते, आणि तिचें शील व उच्च मानसिकशक्ति ह्यांजबद्दल त्यास काय वाटत होतें, तें त्यानें 'आत्मचरितां'त सविस्तर सांगितलें आहे.

प्रकरण एकोणिसावें

सेंद्रिय उत्क्रान्तीचीं उपपादक कारणें

उत्क्रान्तीच्या सामान्य मताला जी आपली शेवटची जोड म्हणून त्यास वाटत होती, ती तयार करण्याचें काम १८८६ च्या जानेवारीस बरेंच झालेलें होतें. त्यासंबंधानें ता० १९ जानेवारी १८८६ रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—" डार्विनवरील जे लेख ' सेंद्रिय उत्क्रान्तीचीं उपपादक कारणें ' या नांवानें मी प्रसिद्ध करणार आहें, त्यांतील पहिला भाग मी आज छापखानेवाल्यांकडे नेईन म्हणतों, आणि दुसऱ्यास सुरवात केली आहे. त्यांत जीवशास्त्रविषयक बऱ्याच विस्तृत गोष्टी यावयाच्या असल्यामुळें मी तो कांहीं तज्ज्ञांकडे पाहावयास पाठवीन, व विशेषतः फ्लावर व

मायकेल फॉस्टर यांजकडे पाठवीन. तो पाहण्यास हक्स्ले व हूकर यांस सांगावें किंवा नाहीं हें मीं अद्यापि ठरविलेलें नाहीं, कारण ते ह्या बाबतींत कांहीं अंशीं माझे प्रतिस्पर्धी आहेत. कारण इंद्रिय-व्यापारानें उत्पन्न होणारे फेरबदल वंशपरंपरेनें संक्रान्त होतात ह्या समजुतीच्या ते विरुद्ध आहेत; किंवा कदाचित् असें म्हणणें बरोबर होईल कीं, ह्या समजुतीस पुरेसा पुरावा नाहीं ह्या मुद्यावर तिचा त्यांनीं नेहमीं अव्हेर केला आहे."

त्याच्या ह्या लेखांचें जर्मन भाषान्तर व्हेटर नांवाचा गृहस्थ करणार होता; त्यास, ता० १९ जानेवारी १८८६ रोजीं, त्या लेखांचा सारांश तो पुढील पत्रांत कळवितो:—"त्या लेखांत मुख्यत्वेंकरून डार्विनच्या मतांसंबंधानें रूढ असलेल्या समजुतीवर टीका येणार आहे. कारण त्यांत असें दाखविलें जाणार आहे कीं, डा० इरास्मस डार्विन (चार्लस डार्विनचा आजा) व लामार्क ह्यांनीं प्रतिपादिलेल्या एका मताकडे त्या समजुतींत दुर्लक्ष्य केलेलें आहे; तें मत हें कीं, इंद्रियांचा उपयोग करणें वा न करणें ह्याच्या योगानें होणारे फेरबदल वंशपरंपरेनें संक्रान्त होणें हें उत्क्रमणास एक कारण झालेलें आहे. म्हणून पहिल्या लेखांत असें प्रतिपादिलें जाईल कीं, ह्या कारणाचें साहाय्य उत्क्रमणास नेहमीं झालेलें आहे, आणि तें कारण नसतें तर सेंद्रिय उत्क्रान्तीच्या सर्व वरच्या वरच्या पायऱ्या उत्पन्न होऊं शकल्या नसत्या. दुसऱ्या लेखांत असें दाखविलें जाईल कीं, हल्लीं एकटेंच ओळखलें जाणारें 'सृष्टिविषयक निवड' हें जें उपपादक कारण, आणि वर दाखविलेलें कारण ह्यांखेरीज (उत्क्रान्तीस) तिसरें एक कारण आहे; तें कालाच्या क्रमानें पाहतां वरच्या दोन कारणांच्या अगोदरचें आहे, आणि प्रारंभापासून त्या दोन कारणांबरोबर त्याचा व्यापार झालेला आहे; म्हणून घटनाविषयक सर्व चमत्कार समजण्यास तें ध्यानांत घेतलें

पाहिजे, आणि तसें न केल्यास सेंद्रिय उत्क्रमण एकंदर उत्क्रमणाचा एक भाग आहे ही गोष्ट ध्यानांत यावयाची नाहीं. ”

याच लेखांसंबंधानें ता० २६ जानेवारी १८८६ रोजीं तो हक्स्ले यास लिहितो:—“ तुला राग आणण्यासारखें मी याबरोबर कांहीं पाठवीत आहें. सोबतच्या लेखांत मण्डन केलेल्या मतासंबंधानें तुझ्या माझ्यांत सहानुभूति कधींच नव्हती. आणि याच सालीं मीं तुझ्या तोंडून ऐकिलेल्या एका गोष्टीवरून तशी सहानुभूति उत्पन्न होण्याचाहि फारसा संभव दिसत नाहीं. ह्या बाबतींत तुला माझा प्रतिस्पर्धी समजून माझे एकान्तांत बसून केलेले विचार तुझ्याकडे अभिप्रायार्थ पाठविणें योग्य होईल किंवा नाहीं ह्याबद्दल कांहीं काळ मला बराच संशय वाटला. पण शेवटीं मीं असें ठरविलें कीं, माझे सर्व जीवशास्त्रविषयक लेख तुझ्याकडे टीकेसाठीं पाठविण्याचा जो माझा पुष्कळ दिवसांचा प्रघात, ज्यापासून मला इतका वारंवार फायदा झालेला आहे, तो मोडल्यास तुझ्या प्रामाणिकपणावरील माझा विश्वास उडाला असें दिसेल, आणि तशी गोष्ट तर मुळींच झालेली नाहीं. म्हणून पूर्वींप्रमाणेंच तुला अशी विनंति करितों कीं, सोबतच्या प्रुफाकडे नजर फेंकण्यास जरूर तें लक्ष्य त्याजकडे दे, आणि त्यावर तुला जे आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांचा फायदा मला मिळूं दे. ”

यावर ता० ३१ जानेवारी १८८६ रोजीं हक्स्ले त्यास लिहितो:—“ हें ध्यानांत ठेव कीं, इंद्रियव्यापारजन्य फेरबदलांच्या संक्रान्तीस माझा कांहीं मूळचाच आक्षेप नाहीं. वास्तविकरीत्या, मीं तुला सांगिल्याप्रमाणें, ती खरी असणेंच मला ज्यास्त आवडेल. पण जें कारण पूर्वींप्रमाणेंच हल्लींहि विश्वसनीय पुराव्याविना दिसतें, त्याचा व्यापार गृहीत करणें बरोबर नाहीं असें जसें मीं डार्विनला म्हटलें होतें, तसेंच तुला म्हटलें. ”

यावर ता० ३ फेब्रुवारी १८८६ रोजीं तो हक्स्ले यास लिहितोः—" तूं माझ्या लेखावर टीका केल्यास त्याबद्दल माझ्या आभारांचा स्वीकार करण्याची मेहरबानी कर; माझ्या लेखांवर आक्षेप येऊं नयेत म्हणून त्यांपैकीं कांहीं टीकांचा मी उपयोग करीत आहें. तथापि ही गोष्ट मी कबूल केली यावरून तूं असें ध्यानांत घ्यावें कीं, माझा अद्यापि वरील कारणावर विश्वास आहेच. आणि आतां चांगल्या कृतींपासूनहि तोटे कसे होतात ते पहा. तुझ्या टीकाइतक्याच लांब किंवा त्याच्याहूनहि अधिक लांब प्रतिटीका यासोबत मी पाठवीत आहें, तथापि, तुला वाटलें तर त्वां त्या वाचाव्या, नाहीं तर वाचूं नये. कांहीं मुद्यांच्या संबंधानें माझेंच म्हणणें बरोबर आहे असें मला अद्यापि कां वाटतें हें दाखविण्यासाठीं मीं त्या नमूद केल्या आहेत. "

या लेखांपैकीं दुसऱ्या लेखाच्या दुसऱ्या प्रुफाबरोबर त्यानें डा० यूमन्सला लिहिलें:–" मला वाटतें, उत्क्रान्तीच्या कळसीला ही माझी शेवटचीच जोड होईल. वयाच्या पासष्टाव्या वर्षानंतर पूर्वीं बनवलेल्या कल्पना लिहून काढण्यापलीकडे कोणालाहि कांहीं करतां येईल अशी आशा करतां येत नाहीं. " प्रोफेसर हक्स्लेला त्यानें अशी विनंति केली कीं, या लेखावर टीका करतांना पानाच्या बाजूलाच कायत्या टीपा कर, आणि त्याबरोबर त्यास असेंहि सुचविलें कीं, " कदाचित् एकाच असल्या टीपेची जरूर आहे ! "

हक्स्लेनें केलेल्या टीका त्यास मिळाल्यावर त्यानें त्यास ता० २३ मार्च १८८६ रोजीं पत्र लिहिलें तें असें:—" तुझ्या टीकांबद्दल ज्या दोष काढण्याच्या बुद्धीनें केलेल्या व विक्षिप्त आहेत म्हणून तूंच कबूल करितोस त्यांबद्दल मी तुझे मनःपूर्वक आभार मानितों. पण तुला लढण्याची काय ही आवड ! कारण तूंच कबूल करितोस कीं, ' प्रस्तुत मताभिमान्यांना हालवण्यास तुझीं प्रचलित-

समजुतीविरुद्ध मतें ज्यास्त योग्य व्हावीं एतदर्थ मीं त्यांजवर टीकांचा भडिमार केला आहे. तुझ्या कित्येक टीकांवरून, मी माझ्या लेखांत, गैरसमजुतीचा मार्ग बंद होईल अशा प्रकारचे कित्येक बदल करीत आहें; आणि कित्येक त्याच्याहून ज्यास्त महत्त्वाचे बदल करीत आहें. आणि ते करीत असतां मी आपल्या समाधानार्थ कांहीं प्रतिटीका नमूद करीत आहें; त्या तुझ्या मर्जीप्रमाणें त्वां वाचाव्या वा न वाचाव्या. "

हा लेख अखेरचा दुरुस्त करून यूमन्सकडे पाठवितांना त्यानें त्यास ता० २४ मार्च रोजीं असें लिहिलें:—" यावर फ्लावरनें मुळींच आक्षेप घेतलेला नाहीं; आणि मायकेल फॉस्टरनें महत्त्वाचा आक्षेप घेतलेला नाहीं. हक्स्लेनें बारीकसारीक ठोकाठोकी बरीच केली आहे, आणि त्यावरून ह्या प्रुफांतील बहुतेक फेरबदल मीं केलेले आहेत. पण तो जरी माझें मत कबूल करीत नाहीं, तरी तें डळमळीत करण्यासारखें त्यानें कांहींच म्हटलेलें नाहीं. "

हे लेख डा० आर्थर डौन्सनें वाचिले तेव्हां, तो व ब्लंट ह्या दोघांनीं मिळून १८७७ सालीं व त्यानंतर, रॉयल सोसैटीच्या मासिकांत कांहीं नवे केलेले शोध छापिले होते त्यांच्याशीं स्पेन्सरचें मत इतकें जुळतें हें पाहून त्यास मोठा चमत्कार वाटला. म्हणून त्यानें आपले त्यासंबंधाचे दोन तीन लेख त्याजकडे पाठविले. ते वाचिल्यावर स्पेन्सर त्यास ता० १० मे १८८६ रोजीं लिहितो:— " तुझ्या लेखांतील ज्या भागांवर तूं खुणा केल्या होत्यास ते मला विशेषच महत्त्वाचे वाटले, कारण जो परिणाम मीं विचारदृष्टीनें अनुमानिला होता तो त्यावरून प्रत्यक्ष घडून आलेला दिसत आहे. (माझ्या लेखांपैकीं) " नाइन्टीन्थ सेंचरी " मध्यें प्रसिद्ध केलेले दोन लेख, संपादक कबूल करील तेवढ्या अवधीनें, कायमच्या स्वरूपानें पुनः प्रसिद्ध करण्याच्या उद्देशानें लिहिलेले होते. म्हणून

माझ्या कोटिक्रमापैकीं कांहीं भागांचा ताळा दाखविणारे म्हणून तुझ्या ह्या दोन लेखांतील कांहीं उतारे पुरवणीवजा त्यांना जोडणें मला फारच आवडेल. जागेच्या अडचणीमुळें 'नाइन्टीन्थ सेंचरी' च्या संपादकानें ते लेख आखुडते करण्यास मला सांगितलें होतें; त्याप्रमाणें काढून टाकिलेल्या कांहीं वाक्यसमूहांमध्यें दोन असे होते कीं, त्यांत तूं ज्या गोष्टीला उल्लेख केलेला आहेस तिला मींहि केलेला होता. ती गोष्ट ही कीं, प्रोटोप्लाझम (आल्युमेनसारखा जीवघटक समस्वरूप पदार्थ) हा नेहमीं संरक्षक आच्छादनाच्या आंत सांपडतो..... हे काढून टाकिलेले वाक्यसमूह अर्थात् त्या लेखाच्या कायम स्वरूपांत पुनः घातले जातील. ही गोष्ट मी एथें यासाठीं सांगतों कीं, नाहीं तर, कदाचित् तुझ्या लेखांतील कांहीं गोष्टी तुला उल्लेख न करतां मीं त्यांत घातल्या, असें तुला वाटेल. त्या लेखाचा मूळचा आखूडता न केलेला प्रुफ तुजकडे पाठविणें मला आवडलें असतें, पण तसें मला करतां येत नाहीं, कारण "नाइन्टीन्थ सेंचरी "कडून तो जेव्हां आला, तेव्हां त्याचें काम नाहीं म्हणून मीं तो कचऱ्याच्या टोपलींत टाकिला. पण छापखानेवाल्यानें जुळलेले टाईप तसेच ठेविलेले आहेत, आणि ते लेख आखुडते करण्यापूर्वीं काढलेले छापे त्याजपाशीं असलेच पाहिजेत. तुला पाहिजे असेल तर, तुला सोईवार अशा एकाद्या दिवशीं अथीनियम क्लबांत तूं मला भेटलास तर फार चांगलें; म्हणजे मी तुझी खात्री करण्याकरितां तुला छापखानेवाल्याकडे घेऊन जाईन."

या पत्राची नक्कल स्पेन्सरच्या चरित्रकाराकडे पाठवितांना डा० डौन्स साहेबानें त्यास असें लिहिलें:—" तो बारीकसारीक गोष्टींकडे देखील किती लक्ष देत असे, आणि त्याचें वर्तन किती प्रामाणिकपणाचें आणि चोख असे, हें या पत्रावरून दिसून येतें. मला त्याजकडे जावयास झालें नाहीं, आणि मी त्याला कधीं भेटलोंहि

नाहीं, पण मी त्याला आभारप्रदर्शक पत्र पाठविलें, आणि लिहिलें कीं, छापखानेवाल्याकडे जाण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. ”

ता० १९ मार्च १८८६ रोजीं स्पेन्सर यूमन्स यास लिहितोः- “ कापीराइटचा प्रश्न इकडे पुनः उपस्थित होत आहे. ही गोष्ट घडवून आणण्याकरितां प्रकाशक व ग्रंथकार ह्यांचें एथें एक मंडळ स्थापन झालेलें असून कांहीं दिवसांपूर्वीं मंडेला प्रधानाकडे त्या मंडळानें आपले कांहीं प्रतिनिधी पाठविले होते. त्यांचा उद्देश राष्ट्राराष्ट्रामध्यें असा कापीराइटचा कायदा पास करून घेण्याचा आहे कीं, त्या मंडळानें एकाद्या ग्रंथाचा ग्रंथकाराकडून एथें कापीराइट घेतल्यास परदेशींहि तो त्यास मिळावा. ही गोष्ट बनून आली तर राष्ट्राराष्ट्रामधील कापीराइट नसतां ग्रंथकाराला जो (अल्प किंवा शून्य) फायदा होतो त्याहून फारसा ज्यास्त व्हावयाचा नाहीं. (म्हणून) अमेरिकन बिलानें असा कायदा करावा कीं, परराष्ट्रीय ग्रंथकाराखेरीज दुसऱ्या कोणाचा (उदाहरणार्थ, वरील मंडळाचा) कापीराइट अमेरिकेंत ओळखावयाचा नाहीं, आणि अप्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या असें ठरवावें कीं परराष्ट्रीयग्रंथकार आणि अमेरिकन प्रकाशक यांच्यामधील कापीराइटचा व्यवहार त्यांनीं अप्रत्यक्ष केलेला पाहिजे. ”

या सुमारास स्पेन्सरच्या प्रकृतीची अत्यन्त हलाकी झालेली होती; आणि त्याच्याप्रमाणेंच त्याच्या अत्यन्त निकट स्नेह्यांपैकीं बहुतेक ह्या वेळीं आजारी होते. म्हणून, “ आपण सर्व एकदम पिचत चाललों आहोंसें दिसतें ” असें जें प्रो० टिंडाल ह्या सुमारास म्हणाला तें फारसें चुकीचें नव्हतें. मार्च महिन्यांत हक्स्लेला लिहिलेल्या पत्रांत प्रो० टिंडालला आपण भेटावयास गेलों होतों असें सांगून पुढें स्पेन्सर लिहितोः-“ (त्याच्याशीं माझें) संभाषण चाललें असतां मीं त्यास असें सुचविलें कीं चैनीनें फिरावयास जा-

ण्याच्या जहाजांत बसून जाणें त्यास फार फायद्याचें होईल. मात्र किनाऱ्या किनाऱ्यानें जावें, असें कीं तेणेंकरून स्वस्थ झोंप मिळण्याकरितां दररोज रात्रीं बंदरांत जातां येईल. पुढें या गोष्टीचा विचार करीत असतां मला असें सुचलें कीं, ही गोष्ट (टिंडालप्रमाणें) तुला व मलाहि फार फायद्याची होईल. उघड्या हवेंत भटकणें, आपण जीव धरून राहूं इतकाच हवेचा वगैरे बदल करणें, आणि थोड्याशा मित्रांच्या सहवासापासून उत्पन्न होणारे फायदे प्राप्त करून घेणें, हें आह्मां तिघांनाहि पाहिजे आहे. बरें, माझा मित्र पॉटर यालाहि यापासून फायदा कां होऊं नये हें मला समजत नाहीं. दोन महिनेपर्यंत एकादें आराम-जहाज भाड्यानें घ्यावयाचें; आणि जेरेसी, गर्नसी, सिली, इत्यादि बेटांतून इंग्लिशखाडीच्या किनाऱ्यानें इकडे तिकडे भटकावयाचें, ही योजना तुला कशी काय वाटते ? ”

नाईल नदीवरील सफरीला तो गेला असतां त्यानें काय केलें ही गोष्ट ध्यानांत घेतां असें दिसतें कीं, ह्या सफरीला जर ही मंडळी गेली असती तर स्पेन्सर सर्वांच्या अगोदर पळून आला असता. असो. पण ही सूचना अमलांत न आल्यामुळें त्यानें बिऱ्हाड बदलून पाहिलें; पण त्यानें त्यास फायदा झाला नाहीं. या सुमारास मिस फ्लोरा स्मिथला लिहिलेल्या एका पत्रावरून दुसरा एक बूट त्यानें काढिला होता असें दिसतें. तें पत्र असें:—“ कांहीं दिवसांपूर्वीं मीं असा बेत केला होता कीं, फोकस्टोन एथें प्याव्हिलियन होटेलांत उतरावयाचें, आणि समुद्राची हवा, हालचाल, आणि आनंदितपणा यांचा फायदा घेण्याकरितां दररोज फ्रान्सला जाऊन यावयाचें; पण फोकस्टोन एथें प्रदर्शन सुरू झाल्यामुळें माझा तो बेत फिसकटला.” त्यानंतर त्यानें असा बेत केला कीं, आपला मित्र लॉट व त्याची मुलगी यांच्या समवेत समुद्रकिनाऱ्यावरील कोणत्या तरी हवेच्या ठिकाणीं जावें. पण लॉटची प्रकृति अकस्मात् बिघडल्यामुळें हाहि

बेत साधला नाहीं. तेव्हां त्यानें लॉट यास ता० १ जुलई १८८६ रोजीं असें लिहिलें:—“ गेल्या नाताळच्या अगोदरच्या नाताळांत जेव्हां मी तुला भेटलों, तेव्हां तुझी माझी गांठ पुनः पडावयाची नाहीं असें माझ्या स्वप्नींहि नव्हतें. माझा सर्वांत जुना व उत्तम मित्र गमावणार हा विचार मनांत येऊन मला फार वाईट वाटतें; आणि आतां मींहि स्वतः फार अशक्त झालों असल्यामुळें हल्लीं मला माझें जीवित एरवीं देखील फारसें आकर्षक वाटत नाहींसें झालें आहे; म्हणून (तूं मेल्यावर) तूं गेलास हें मनांत येऊन मला तें पूर्वींपेक्षांहि कमी आकर्षक वाटूं लागेल. ही गोष्ट मला स्पष्ट दिसत आहे कीं, आज कित्येक महिने तुला जें शारीरिक व मानसिक दुःख भोगावें लागलें आहे, तें त्या मुदतींत तुला जें अल्पस्वल्प झालें असेल त्याहून फार ज्यास्त असलें पाहिजे; आणि हल्लीं तुजबद्दल ज्या उद्वेगकारक बातम्या येत आहेत त्यांवरून मला असें दिसतें कीं, तुला सारख्या वेदना होत असल्यामुळें जीविताचें मोठें ओझें वाटत असलें पाहिजे. तुझ्याकडून पुनः ऐकण्याची किंवा तुला पुनः जबाब देण्याची आतां आशा राहिलेली नाहीं अशी मला भीति वाटते; तशी जर खरोखरच स्थिति असेल तर तुझ्या दुःख करणाऱ्या जुन्या मित्राचा हा शेवटचा निरोप म्हणून समज. ”

हें पत्र पोहोंचण्यापूर्वींच लाट निवर्तला होता. स्पेन्सर ग्रंथकार होणार ही गोष्ट लॉटला किंवा स्वतः स्पेन्सरला शक्य वाटण्यापूर्वीं त्यांचा स्नेह जमलेला असून तो आज पंचेचाळीस वर्षें कायम राहिलेला होता.

या मित्राच्या मरणाचें एकीकडे दुःख करीत असतां दुसऱ्या एका मित्राबद्दल त्यास भीति वाटूं लागली होती; तो त्याच्याशीं अद्वितीय प्रेमपूर्वक भक्तीनें आज पावशतकाहून ज्यास्त वर्षें वागत आलेला होता. तो अर्थात् डा० यूमन्स होय. त्याचें ता० ९ जुलई

१८८६ चें असें पत्र होतें:—" माझे फारच थोडे दिवस जाणार, आणि माझा व्यवहार बहुतेक आहे तसाच मला सोडून गेलें पाहिजे, अशीं सर्व चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. तुला-मला ज्या पुष्कळ गोष्टी आजपर्यंत हिताहिताच्या वाटलेल्या आहेत त्यांवर मला लिहितां येतें, तर बरें झालें असतें असें मला वाटतें, पण तसें होणें शक्य नाहीं; आणि तें शक्य नाहीं हें कदाचित् ठीकच आहे. बरें किंवा वाईट, जें काय झालें तें झालें. मीं जें काम केलें आहे त्याची इतकी ज्यांत स्तुति केली आहे असा तुझ्या आत्मचरितांतील उतारा ता० ८ मेच्या तुझ्या पत्राबरोबर तूं पाठविलास, तो वाचून मी फार सद्गदित झालों. तूं माझ्या कामाच्या केलेल्या कौतुकाबद्दल मला फार संतोष वाटतो, आणि या तुझ्या ममताळूपणाबद्दल व औदार्याबद्दल मी तुझे आभार मानितों. माझ्या मागें राहण्याला योग्य असें मीं स्वतः कांहींच केलेलें नाहीं; पण (तुझ्यासारख्या) न्यायी माणसानें हें जें माझें उदात्त कौतुक केलेलें आहे तेवढ्यानेंच माझें मागें स्मरण रहावें ह्यांत माझा पूर्ण संतोष आहे; कारण मीं आपलें आजपर्यंतचें काम कोणत्या उद्देशानें प्रेरित होऊन केलेलें आहे हें तुला माहीत आहे."

यावर ता० २० जुलई १८८६ रोजीं तो यूमन्स यास लिहितो:—" तूं आजारी असल्यामुळें तुझ्याकडून (इतके दिवस) पत्र आलें नसलें पाहिजे, अशी जी मला भीति वाटत होती, ती काल तुझें पत्र येऊन खरी ठरली याबद्दल मला फार वाईट वाटतें.

पण ह्या गोष्टीकडे तूं इतक्या शांत दृष्टीनें पाहूं शकतोस ही गोष्ट ठीक आहे; ती तुझ्या (तुझ्या प्रकृतीच्या) वर्णनावरून व विचारांवरून स्पष्ट दिसत आहे; आणि तूं वर्णितोस त्या स्थितींत राहण्याचा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां आणखी जगण्याची इच्छा कदाचित् आपोआपच कमी होत असेल.....माझा जुना व मोलवान्

मित्र लॉट नुक्ताच मरण पावला, त्याच्या माणसांचें मत (या गोष्टीसंबंधानें) असेंच पडतें..... त्याचा स्वभाव किती छानदार होता हें जाणण्याइतकी त्याची तुला माहिती होती..... मी देखील तुझ्यासारखाच ह्या गोष्टीकडे शांत दृष्टीनें पाहतों. माझ्या कामाकरितांच माझ्या जीविताची कायती मला किंमत वाटते; आणि तें जर पुरें झालें असतें, तर मींहि त्याची पर्वा केली नसती. कांहीं झालें तरी, उच्च हेतूंनीं प्रेरित होऊन आपण आपलें काम सदसद्विवेकपूर्वक केलें, ह्या जाणिवेमध्यें आपणां दोघांसहि कांहीं समाधानास जागा आहे. आणि तें केव्हांहि संपेल तेव्हां, आपल्यापैकीं जो मागें राहील त्यास, आपल्या दोघांमधील स्नेह ही आपल्या आयुष्यांतील एक मोलवान गोष्ट होती असें वाटणार आहे. पण, माझ्या प्रियकर जुन्या मित्रा, अद्यापिहि आमचा आणखी पत्रव्यवहार कदाचित् होईल; आणि त्या आशेनें मी "तुझा फार प्रेमयुक्त कळकळीचा" म्हणून सही करितों."

या वेळीं 'आत्मचरित्र' लिहिण्याचा उद्योग तो करीत होता तें उत्तमच होतें; त्यामुळें त्यास फाजील श्रम न पडतां, वेळहि चांगल्या रीतीनें जात असे. त्या चरित्राचा पंचविसावा भाग वाचून परत करतेवेळीं हक्स्लेनें त्यास असें लिहिलें:—"तूं आपल्या पुस्तकाचें (सोश्यल स्टॅटिक्सचें) परीक्षण त्यांत स्वतःच केलेलें पाहून मला अत्यन्त गुदगुल्या झाल्या. ही गोष्ट अस्सलांत अस्सल स्पेन्सरीय होय..... अनेकाद्ब्रूपी वृक्षपंक्तींतून मागें दृष्टि फेंकणें किती विलक्षण आहे ! माझ्याबद्दल तूं दिलेली हकीकत वाचतांना कस्तुरींतील माशीकडे पाहतांना जसें वाटतें, तसें मला वाटलें. कोणत्या विशिष्ट परिस्थितींत तुझीमाझी ओळख प्रथम झाली हें मी अगदीं विसरलों होतों. आपण दोघेजण (विशेषतः तूं) किती मुद्दाम वांकड्यांत शिरणारे आहों हें ध्यानांत घेतां, त्या वेळेस आपण

होतों त्याहून हल्लीं आपण ज्यास्त निकट मित्र आहों ही गोष्ट आपणां दोघांसहि फार भूषणाची आहे."

हिंवाळ्यांत लंदनांत रहावयाचें नाहीं असा त्यानें सपटंबरांत निश्चय केला होता; आणि ब्रायटन किंवा बोर्नमौथ या दोन ठिकाणांपैकीं कोठें तरी जावें असा विचार तो करीत होता. पैकीं बोर्नमौथ एथें त्याचा मित्र पॉटर व त्या कुटुंबांतील दुसरीं कित्येक माणसें गेलेलीं असल्यामुळें तिकडे जाण्याकडे त्याच्या मनाचा विशेष कल होता; कारण त्याला आवडत्या माणसांची जरूर हल्लीं फार वाटत होती. तथापि सरतेशेवटीं ब्रायटनला जाण्याचें त्यानें ठरविलें. यावेळीं मिस बिएट्रिस पॉटर एक निबंध लिहीत होती, तिकडे या सुमारास त्याचें चित्त वेधलेलें होतें. त्या निबंधांतील एक मुद्दा असा होता कीं, अर्थशास्त्राच्या ज्या क्लप्तींत समाजाच्या रुग्णावस्थेचा विचार केलेला नसेल ती तद्विषयक क्लप्ति निरर्थक होय. त्यासंबंधानें तो तिला ता० २ आक्टोबर १८८६ रोजीं लिहितो:—"अगोदरच्या अर्थशास्त्रज्ञांच्या मतांवर जे आक्षेप तूं घेतले आहेस ते मला समजतात त्या मानानें पाहतां, ते अलीकडे ज्या प्रकारचे आक्षेप त्या मतांविरुद्ध इतरांनीं घेतलेले आहेत त्यांच्याच तोडीचे बऱ्याच अंशीं असून, मला ते बरोबर दिसत नाहींत.....इंद्रियविज्ञान शास्त्र अयोग्यस्थितींतील शरीरव्यापारांचे नियम बांधतें, आणि रुग्णावस्थेचा मुळींच विचार करीत नाहीं; म्हणजे जे व्यापार शरीराच्या नेहमींच्या स्थितींतील नाहींत ते त्यास मुळींच जमेस धरतां येत नाहींत. पण अशा रीतीनें रुग्णावस्थेकडे दुर्लक्ष्य करून इंद्रियविज्ञानाची जेव्हां स्थापना होईल, तेव्हांच योग्य अशा रुग्णेंद्रियशास्त्राची स्थापना होईल. कारण आरोग्यावस्थेंतील इंद्रियव्यापाराचें ज्ञान झाल्याविना रुग्णावस्थेंतील त्या व्यापारांचें ज्ञान होत नाहीं. शिवाय, अशा रीतीनें सयुक्तिक रुग्णेंद्रियशास्त्राची स्थापना झाली, म्हणजे

चिकित्सेचा जो मार्ग त्यावरून दिसून येतो तो, रोग्याचे ठिकाणीं नेहमींचे इंद्रियव्यापार शक्य तितके पुनः स्थापावयाचे, अशा दिशेनें असतो——म्हणजे, रुग्णावस्थांना योग्य असें आरोग्यावस्थेंतील इंद्रियविज्ञानास स्वरूप द्यावयाचें, अशा (उलट) दिशेनें तो नसतो. खरें अर्थशास्त्र म्हणून जें आहे त्याचे घटक जे उद्यमविषयक व्यापार त्यांच्या योग्य संबंधांच्या हकीकतीचें असेंच आहे. ह्या व्यापारांतील अव्यवस्था किंवा त्यांना येणारे अडथळे यांचा विचार त्या शास्त्रास मुळींच करतां येत नाहीं. त्यास समाजविषयक रुग्णावस्था ध्यानांत घेतां येत नाहींत; आणि शिवाय, सामाजिकइंद्रियविज्ञानाच्या ज्या भागास अर्थशास्त्र म्हणून म्हणतात त्याची अगोदर स्थापना होईल, तेव्हां ह्या तद्विषयक रुग्णावस्था ध्यानांत येतील. आणखी, शिवाय, अर्थशास्त्रानें गृहीत केलेली अनिरुद्ध चढाओढ आणि अनिरुद्ध करार ह्यांचें अतिक्रमण केल्यामुळें जर ह्या रुग्णावस्था उत्पन्न झालेल्या असतील, तर ती अवस्था सुधारण्याचा मार्ग, अर्थशास्त्राच्या तत्त्वांत फेरबदल करणें हा नसून होईल तितकी अप्रतिबंध करार व चढाओढ ह्यांची स्थापना करणें, हा होय. रुग्णावस्था ध्यानांत घेण्याच्या धर्तीवर अर्थशास्त्राच्या तत्त्वांत फेरबद्दल करण्याचा तुझा उद्देश आहे असें मला वाटतें; तसें जर केलें, तर केवळ रुग्णावस्थानाच व्यवस्थित स्वरूप दिल्यासारखें होईल, आणि त्याच्या योगानें प्रस्तुत स्थिति न सुधारतां ज्यास्त ज्यास्त बिघडत जाईल. ”

जेव्हां स्पेन्सरला एकाद्या वादांत स्वत: पडतां येत नसे, तेव्हां तो आपल्या मित्रांपैकीं एकाद्याला त्यांत पडावयास लावण्याची युक्ति करीत असे. उदाहरणार्थ, “ जडवाद आणि नीति ” ह्या नांवाच्या लिलीच्या लेखास त्यानें प्रो० हक्स्लेला उत्तर द्यावयास लाविलें. तें त्यानें दिल्यावर त्यासंबंधानें ता० ११ दिंजबर १८८६ रोजीं तो

हक्स्लेस लिहितो:—" तूं जीस माझी दानवी युक्ति म्हणून म्हणतोस तिच्याबद्दल मला अभिमान वाटतो. तूं तिला असलें नांव दिलें आहेस तरी, तिच्या परिणामाकडे पाहतां, तिजपासून उलट दैवी फलप्राप्ति झाली आहे असें मला म्हणतां येईल. तुझा लेख वाचून मला फार कौतुक वाटलें, कारण तो उद्दिष्ट हेतूस फारच योग्य होता."

१८८७ च्या प्रारंभीं त्याच्यावर एक मोठें दुःख येऊन पडलें तें डा० यूमन्सचें मरण हें होय. त्यास ता० १ जानेवारी १८८७ रोजीं त्यानें असें पत्र लिहिलें होतें:—" तुझ्याकडून आज बरेच दिवसांत कांहींच बातमी समजली नाहीं, आणि त्यामुळें तुजबद्दल मला फार काळजी वाटूं लागली आहे. तर हा हिंवाळा तुला कसा गेला तें मला कळीव.....ही जरी वर्षप्रतिपदा आहे, तरी ' नवें वर्ष सुखाचें जावो ' अशी तूं मजबद्दल किंवा मीं तुजबद्दल आशा प्रदर्शित करणें मूर्खपणाचें होईल. कारण आपल्याला आतां फारसें सुख शिल्लक राहिलेलें नाहीं. हें पत्र तुला पोहोंचेल तेव्हां चार ओळी मेहरबानी करून सांगून लिहून पाठीव."

हें पत्र डा० यूमन्सला ता० १७ रोजीं पोंहोचलें. दुसऱ्या दिवशीं त्याच्या बहिणीनें लिहिलें:—" तुझें पहिल्या जानेवारीचें पत्र काल रात्रीं आह्मांस मिळालें, आणि मीं जेव्हां तें त्यास वाचून दाखविलें तेव्हां तो तुझ्या स्थितीबद्दल फार ममताळूपणानें बोलला, आणि म्हणाला, ' उद्यां मी स्पेन्सरला पाठविण्यास चार ओळी मजकूर सांगेन.' पण चांगलें उजाडण्याच्यापूर्वींच तो निवर्तला." अशा रीतीनें वाग्देवींच्या राज्यांतील अत्यन्त शुद्ध व अव्याहत अशी एक मैत्री संपली. स्पेन्सरचा व यूमन्सचा प्रथम स्नेह झाला तेव्हांपासून यूमन्सनें उत्क्रान्तिविषयक मतें मानवजातीस हितकारक समजून त्यांच्या प्रसारार्थ आपलें तन-मन-धन वाहिलें होतें.

या वर्षीं त्याची प्रकृति सुधारलेली असल्यामुळें बाहेर जावेंसें

त्यास वाटलें. म्हणून इंग्लिश खाडींतून आराम–जहाजांतून प्रवास करण्याचें त्यानें पुनः मनांत आणिलें. मुलांच्या सहवासालाहि तो उत्सुक झाला. तेव्हां त्याच्या विनंतीवरून पॉटरची मुलगी मिसेस क्रिप्स् हिनें त्याजकडे आपलीं दोन मुलें पाठविलीं, आणि आपल्या विवाहित बहिणींस त्याजकडे आपलीं एक दोन मुलें पाठविण्यास सांगण्याचें खुशीनें कबूल केलें. ही जी त्यांचीं मुलें आपल्याकडे आणण्याची पद्धत त्यानें आतां सुरू केली, ती पुढें कित्येक वर्षें सुरू होती. आणि अशा रीतीनें तो व पॉटरकुटुंब ह्यांच्यामधील संबंध ज्यास्तच निकट झाला. नवंबर महिन्यांत तो बोर्न मौथ एथें गेला, आणि पॉटरच्या घराशेजारींच त्यानें बिऱ्हाड केलें. ‘ तेथें ’ तो म्हणतो, ‘ मला तीन पिढ्यांच्या संगतीचा फायदा मिळूं लागला. ’

या सफरींतून तो ता० ३१ जानेवारी १८८८ रोजीं लंदनास परत आला. लंदन सोडल्याला त्यास आज १८ महिने झाले होते. एवढ्या मुदतींत त्याच्या प्रकृतींत बरीच सुधारणा झाली होती; जरी हक्स्ले त्यास पाहून म्हणाला त्याप्रमाणें “ पतंगाइतका चपळ ” तो कदाचित् दिसत नसेल. याच सुमारास मानवी समाजांत ‘ जीवनार्थ कलह ’ या नांवाचा हक्स्लेचा एक लेख “ नाइन्टीन्थ सेंचरींत ” प्रसिद्ध झाला, व त्याचा स्पेन्सरला फार राग आला असेल असें त्यास वाटलें तेव्हां त्यासंबधानें ता० ६ फेब्रुवारी १८८८ रोजीं तो हक्स्ले यास लिहितोः—“मला त्यांत आक्षेप घेण्यासारखें कांहीं नाहीं, आणि प्रत्येक गोष्ट संमति देण्यासारखी आहे. वास्तविक रीत्या त्यांतील मुख्य मुख्य सिद्धान्त असे आहेत कीं, ते मींच स्वतः प्रसिद्ध किंवा खाजगी रीतीनें प्रतिपादिलेले आहेत. बोर्नमौथ एथून निघण्याच्या अगोदरच्या दिवशींच, सृष्टिस्वरूप अनैतिक (मला वाटतें मीं त्यास ‘ दुर्नैतिक ’ म्हटलें होतें) आहे ही गोष्ट मीं प्रतिपादिलेली होती, आणि असें दाखविलें होतें कीं, पृथ्वीवर जीवितो-

त्पत्ति झाल्यापासून जो काळ निघून गेला आहे त्यापैकीं ९९/१०० वेळांत, किंवा कदाचित् ९९९/१००० वेळांत, जे जीव मानवी दृष्टीच्या अपराधी म्हणून दिसतात तेच यशस्वी झालेले आहेत. सृष्टीची प्रगतीप्रमाणें पीछेहाट करून घेण्याची जी सारखी तयारी दिसते, तीहि गोष्ट मीं अशीच प्रतिपादिलेली आहे; उदाहरणार्थ, मार्टिनोला दिलेल्या उत्तरांत व समाजशास्त्राच्या पहिल्या भागांत. गेल्या वसंतांत कांहीं महत्त्वाचे विचार मीं लिहून काढूं लागलों, आणि "नीतिशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त" हा भाग लिहावयास जर मी कदाचित् जगलों तर त्यांत ते विचार गोंवावयाचे आहेत; त्यांत पशुनीतीकडून मानवनीतीकडे होणारी जी प्रगति तूं चांगल्या रीतीनें प्रतिपादिली आहेस, तीच मी दाखवीत होतों. तुझ्या लेखांतील ह्या पहिल्या भागापैकीं शिल्लक महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, त्यासंबंधानें, मला वाटतें मीं एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें आहे असा तुझा समज झालेला आहे. कांहीं दिवसांपूर्वीं एका भाषणांत, किंवा मला वाटतें व्याख्यानांत, जे लोक लढाईपासून होणारीं नुकसानें आणि उच्चतर सुधारणेकरितां शांततेची जरूरी ह्यांचें प्रतिपादन करितात त्यांस तूं उल्लेख केला होतास, आणि असें दाखविलें होतेंस कीं, तरवारीच्या लढाईमागून मागांची लढाई व्हावयाची आहे; त्यावेळीं मला वाटलें, हें तूं मला अनुलक्षून म्हटलें असावेंस. पण हें सत्य मीं पुष्कळ वर्षांपूर्वीं प्रतिपादिलेलें आहे, उदाहरणार्थ, तुला तें "समाजशास्त्राचें अध्ययन" या ग्रंथांत (पान १९९) वर आढळून येईल. कारण तेथें, प्रारंभींच्या पायऱ्यांवर लढाईमुळें कमी दर्जाच्या जाती विनष्ट होऊन एकंदरींत फायदाच होत असतो असें दाखवून, पुढें मीं असें प्रतिपादिलें आहे कीं, त्यानंतर ही शुद्धीकरणसरणी जरी महत्त्वाचीच म्हणून कायम असते, तरी ती औद्योगिक लढाईच्या स्वरूपानें सुरू

ठेवावी लागते. पण ह्या प्राथमिक कोटिक्रमांत जरी तुझ्याशीं माझें एकमत आहे, तरी त्यावरून तूं काढिलेले जे सिद्धान्त व उपसिद्धान्त त्यांच्यासंबंधानें तुझ्याशीं माझा मतविरोध आहे. पूर्वींपेक्षां हल्लीं विपत्ति ज्यास्त आहे असें मला वाटत नाहीं इतकेंच नाहीं, तर, उलट, पूर्वींपेक्षां ती कमी आहे असें मला वाटतें, आणि तूं दाखवितोस त्या उपायांची आवश्यकता नाहीं असेंहि मला वाटतें. मृत्युसंख्येचें प्रमाण कमी होत आहे एवढ्यावरून देखील ही गोष्ट पुरेशी सिद्ध होते असें मला वाटतें. खालच्या वर्गांच्या विपत्तींविषयींचा जो (प्रचलित) समज त्यावरून दुसऱ्या अनेक चुकीच्या समजांची मला आठवण होते. ज्या काळीं बहुतेक लोक अज्ञान होते तेव्हां त्यांच्या अज्ञानाची जाणीव नव्हती; पण ते जेव्हां कांहीं अंशीं सुशिक्षित झाले तेव्हां असा ओरडा सुरू झाला कीं, ज्ञानाच्या वाणीमुळें राष्ट्र मरत आहे, आणि ज्ञानाचा प्रसार करण्याकरितां सरकारी खात्याची जरूरी आहे. मद्यपानाची गोष्ट अशीच आहे. जोंपावेतों अति मद्यपान पुष्कळच लोक करीत होते, तोंपावेतों त्याच्या विरुद्ध कोणीं ब्र काढिला नव्हता. परंतु जेव्हां तें बरेंच कमी झालें, तेव्हां असा ओरडा सुरू झाला कीं, अति मद्यपान हें सर्व अनर्थांच्या मुळीं असून सरकारानें तें बंद करण्याकरितां पुढें सरलें पाहिजे. स्त्रियांच्या स्थितीच्या संबंधानें असेंच आहे. त्या गुलाम होत्या तेव्हां, आणि पुढें त्यांस वाईट रीतीनें वागवीत होते त्या दीर्घ काळांत, त्यांच्या हक्कांबद्दल कोणी एक शब्दहि बोलत नव्हता; पण हल्लीं त्यांस चांगल्या रीतीनें वागवीत असतां त्या आपल्यावर होणाऱ्या अन्यायांच्या ओरडीनें सर्व जग दणाणून टाकीत आहेत, आणि ज्या अमेरिकेंत त्यांना फारच मान देतात तेथें त्या फारच मोठ्यानें ओरडत आहेत. तशीच, मी म्हणतों, ह्या विपत्तीची गोष्ट आहे. पूर्वीं असे त्याहून हल्लीं विपत्ति फार कमी अ-

सतां, ती फार आहे म्हणून ओरडा ऐकूं येतो, आणि ती बंद न केल्यास एकदम सर्व समाजाची इमारत ढांसळेल, अशीं भविष्यें केलेलीं ऐकूं येतात. तूं सुचविलेले उपाय, अर्थात्, मला मुळींच मान्य नाहींत. " जीवनार्थ कलह—अन्य योजना " अशा मथळ्याखालीं एक निबंध लिहावा असें मला फार फार वाटतें. पण हा मोह मला बाजूला ठेविला पाहिजे,: आणि अंगीं राहिलेल्या अल्प शक्तीचा काटकसरीनें उपयोग केला पाहिजे. असा निबंध न लिहिण्याचें दुसरें कारण हें कीं, माझ्या टीकांनीं तुझ्या माझ्या स्नेहांत कदाचित् कमीपणा येईल, आणि तसें झाल्यास मला फारच वाईट वाटेल. "

ता. १० फेब्रुवारी रोजीं तो त्यास पुन: लिहितो:—"अशा वादापासून वाईट परिणाम कदाचित् होईल असें मीं जें म्हटलें तें वादाच्या पहिल्या पायऱ्यांच्या संबंधानें नव्हे, तर पुढच्या पायऱ्यांच्या संबंधानें होय; कारण एकदां एकादा विचार सुरू झाला, म्हणजे तो कोणत्या थरास जाईल हें कोणास सांगतां येणार नाहीं. आह्मी दोघेहि भांडखोर आहों, आणि मला बहुतेक खात्री वाटली कीं, माझ्या टीकांवर तूं उत्तर द्यावयाचाच; आणि त्याच्यावर मी प्रत्युत्तर द्यावयाचा. असें झाल्यास तुझ्या माझ्या स्नेहांत कांहीं व्यत्यय येण्याचा संभव बराच उत्पन्न व्हावयाचा. तोंडी वादविवादांत, जे शब्द माझ्या तोंडून येतील असें प्रथम मला वाटलें नसेल ते मागून आल्याबद्दल मला आपल्यास दोष देण्याचा इतके वरचेवर प्रसंग आलेला आहे कीं, मी आतां त्या बाबतींत जरा सावध होत आहें."

बोर्नमौथ एथें त्याच्या प्रकृतींत जी सुधारणा व्हावयास सुरवात झाली, ती लंदनांत आल्यावर कायम राहिली. तथापि मार्चांत जेव्हां ' एक्स ' क्लबाची मेजवानी झाली, त्या वेळीं त्यास तेथें हजर राहतां आलें नाहीं. यावर हक्स्लेनें त्यास थट्टेनें असें लिहिलें

कीं, " खेडेगांवांतील तरुण लोक शहरांतील चैनीमध्यें जर गर्क होऊं लागले, तर त्याबद्दल प्रायश्चित्त भोगावयास लागावयाचेंच." त्यावर ता० १० मार्च रोजीं तो हक्स्लेस लिहितोः—" लंडनची रहाणी खेडेगांवांतील तरुणावर चालून आली असें नाहीं, तर त्या तरुणावर दुसरा एक खेड्यांतील तरुण चालून आला. मी गाल्टनबरोबर आथीनियममध्यें जेवीत होतों आणि त्याच्याशीं माझें पुरेसें भाषण झालें होतें, इतक्यांत एकाएकीं तेथें मासन आला. त्याला पाहून मला फार आनंद झाला. तो आमच्याबरोबर जेवावयास बसला, आणि नंतर अर्धा तास आमचें जोराचें बोलणें, हंसणें आणि गोष्टी सांगणें झालें..... जोंपावेतों आपल्या प्रकृतीस अपाय करून घेण्यापासून तुझा बचाव होत आहे, तोंपावेतों तुझी शक्ति मेंदूकडे न जातां केंसाकडे गेली म्हणून हरकत नाहीं. (मिल्टनच्या काव्यांतील भीमसेन ' साम्सन ' याची शक्ति केंसांत होती त्यास अनुलक्षून हें म्हटलें आहे.) जर साम्सनची उपमा तशीच चालवून (ज्या साम्सनबद्दल मला कांहीं माहीत नाहीं असें तूं म्हणतोस) तुला जर कादंबऱ्या खेरीजकरून इतर ग्रंथांबद्दल आह्मांस अंध करतां आलें, तर त्यापासून वाईट परिणाम होणार नाहीं; उलट, तेणेंकरून तुझें कल्याण होऊन त्याबरोबर तुझ्या विरोध्यांना शांततेचा उपभोग घेतां येईल ! "

' आत्मचरितां ' तील कलाविषयक टीकात्मक कांहीं कलमें दोघा कलाभिज्ञांकडे त्यानें पाठविलीं असतां, त्याच वेळेस कलाविषयक एका मासिकांत त्याच्या तद्विषयक मतांस उल्लेख आला. तेव्हां त्यानें त्या मासिकाच्या संपादकास (ता० २४ फेब्रुवारी रोजीं) असें लिहिलें:—" माझ्या प्रसिद्ध झालेल्या लेखांत माझ्या माथीं मारिलेलीं किंवा दुसरीं कोणतींहि मतें मीं कोठेंहि व्यक्त केलेलीं नाहींत. म्हणून अर्थात् तें विधान माझ्या मित्रांना किंवा माझ्या

लेखकाला कांहीं तरी मीं म्हटलेल्यावरून उत्पन्न झालें असलें पाहिजे. तें विधान त्याच्या सामान्य अर्थीं बरोबर आहे, पण विशेष बाबतींत सहजच चुकीचें आहे. " त्यावरून त्या संपादकानें त्याच्या नजरेस असें आणून दिलें कीं, १८४२ च्या जानेवारींत ' शिल्पशास्त्रांतील बाबावाक्य ' नांवाच्या त्यानें प्रसिद्ध केलेल्या निबंधांतून तें विधान उतरून घेतलेलें आहे, तेव्हां तें ऐकून तो म्हणाला कीं, " सरासरी पन्नास वर्षांपूर्वींच्या माझ्या एका पत्रास तो उल्लेख असेल हें माझ्या स्वप्नीं कधींहि आलें नव्हतें. "

एका अमेरिकन गृहस्थाच्या वतीनें मिस् बिआट्रिस पॉटर हिनें त्यास मिलेस नामक चितार्‍यापुढें आपली तजबीर काढण्यासाठीं बसण्याची विनंति केली. ह्या गोष्टीस तो प्रथम मान्य झाला, पण दुसरे दिवशीं त्यानें मागें घेतलें. यासंबंधानें त्यानें त्यास ता० ९ मे रोजीं असें लिहिलें:— " माझी तजबीर काढण्याच्या योजनेला मीं जेव्हां काल ' होय ' म्हटलें, तेव्हां मी स्वताला अगदींच विसरलों; किंवा माझ्या बळकट मतांपैकीं एक विसरलों असें म्हणणें ज्यास्त बरोबर होईल. ह्या किंवा त्या कामासाठीं वर्गण्या गोळा करण्याचा प्रघात समाजांत फाजील झालेला असून त्याचा मीं आलीकडे ज्यास्त ज्यास्त निषेध केलेला आहे. (हल्लीं) पाहिजे त्या कामासाठीं लोकांपासून पैसे उपटीत असतात. इतर वर्गण्यांबरोबर स्मारकें आणि स्मारक तजबिरी ह्यांकरितां वर्गण्या गोळा करीत असतात, आणि ह्या वर्गण्यांचाहि मी निषेध करितों. (असल्या) एका प्रसंगीं मागितल्याशिवाय मीं वर्गणी दिली, कारण तसें करणें मला माझें खाजगी कर्तव्य वाटलें (सर आण्ड्रू क्लार्कच्या स्मारकासाठीं); पण कांहीं इतर प्रसंगीं तजबिरी काढण्याच्या कामाकरितां जेव्हां मजकडे लोक वर्गण्या मागण्याकरितां आलेले आहेत, तेव्हां हा मजवर एक प्रकारचा नैतिक जुलूम आहे असें मला वाटलेलें आहे, आणि अ-

सला जुलूम मला आवडत नाहीं. तथापि (अशा प्रसंगीं) मला विनंति केल्यावरून वर्गणी देणें मला भाग पडलेलें आहे; कारण मी नाहीं म्हटलें असतें तर विनंती करणारास वाईट वाटलें असतें.

आतां अशा प्रकारची मजवर जबरी झालेली जर मला आवडत नाहीं, तर माझ्याकरितां इतरांवर तसली जबरी व्हावी हेंहि मला आवडत नाहीं. माझी तजबीर काढण्याकरितां रक्कम गोळा करण्याच्या हेतूनें एकाद्यास खिशांतून पैसे काढण्यास विनंति केली जावी हा विचार मला आवडत नाहीं. मला वाटतें, कदाचित् कांहीं जण खुशीनें पैसे देतील, पण पुष्कळजण नाखुशीनें देतील, आणि बहुतेकांना तो त्रास वाटेल. म्हणून मला जी योजना तूं सांगितलीस तिला नाकबूल होणें मला भाग आहे. ”

जानेवारीच्या अखेरीस तो लंदनास गेला तेव्हां, आपली प्रकृति सुधारलेली राहून आपल्याला काम करण्याची शक्ति राहील असें त्यास वाटलें होतें; पण त्याबद्दल थोडक्याच महिन्यांनीं वानवा उत्पन्न झाला. उन्हाळा अर्धा झाला तेव्हां त्यास असें खात्रीपूर्वक वाटलें कीं, आपल्या रहाणींत फरक करणें जरूर आहे. म्हणून त्यानें ग्रांट आलेनला व त्याच्या बायकोला अशी आग्रहाची विनंति केली कीं, ‘ मला तुम्ही (तुमच्या घरीं) जेवणारा म्हणून घ्या. ’ व त्यास तीं नवराबायको आपलीं गैरसोय करून वेऊन कबूल झालीं. तीं डॉर्किंग एथें रहात होतीं;: तेथें त्याप्रमाणें तो जून महिन्यांत गेला. पण हवा वाईट झालेली असल्यामुळें त्यास दरवाज्याबाहेर पडतां येईनासें झालें, व त्यामुळें त्यास हलाकी वाटूं लागली. सारांश, पुढें पुढें जी त्याची स्थिति ज्यास्त ज्यास्त ठळक ठळक दिसूं लागली, तिचीं प्रथम चिन्हें ह्या वेळेस दिसूं लागलीं. ती स्थिति ही कीं, इतरांची संगत त्यास नसली म्हणजे ती केव्हां प्राप्त

होईल असें त्यास व्हावयाचें, आणि ती प्राप्त झाली म्हणजे त्यास ती नकोशी व्हावयाची.

परातिक्रमणाविरुद्ध त्याचे मनोविकार पूर्वींसारखेच हल्लींहि जबर होते; मात्र १८८२ सालीं तो जसा सार्वजनिक रीत्या त्यांविरुद्ध चळवळ करीत होता तशी चळवळ करण्याची हल्लीं त्यास शक्ति नव्हती. त्या सालानंतर त्यानें ' धर्मविषयक संस्था ' हा ग्रंथ प्रसिद्ध केला होता; व त्यांत त्यानें इंग्लिश धर्माधिकारी राष्ट्राच्या अतिक्रमणरूप नीतीसंबंधानें तटस्थ रहातात, किंवा उलट तीस उत्तेजन देतात, याबद्दल त्यास दोष दिलेला होता. ह्या नीतीसंबंधानें ता० ३० सपटंबर १८८८ रोजीं ऑबेरॉन हर्बर्ट यास तो डार्किंग एथून लिहितोः—" ज्या घाणेरड्या लुटारूपणाचें आह्मांस लांछन लागत आहे त्याविरुद्ध धर्मयुद्ध सुरू करण्याला तूं ब्रॅडलॉला भर देशील तर बरें होईल असें मला वाटतें. आपण..... झुलुलॅण्ड, न्यू गिनी, नॉर्थ बोर्निओ, व ईस्ट आफ्रिका काबीज केली आहे,....आतां बेचुआनालॅण्डवर हल्ला करण्याबद्दल बोलत आहेत. मला ही सर्व गोष्ट भयंकर वाटते, आणि ती बंद होण्याचा संभव मुळींच नसून ती दिवसेंदिवस ज्यास्त जलदीनें होत चालली आहे, आणि त्याचा परिणाम आपलें राष्ट्र पुनः रानटी बनावें हा होणार आहे. ह्या सर्व धोरणाविरुद्ध जोरदार चळवळ सुरू करण्यास, मला वाटतें, ब्राडला फार योग्य माणूस होईल. (ह्यासंबंधानें) निःसंशयरीतीनें सिद्ध करण्यासारख्या कांहीं ठळक गोष्टी व उदाहरणें आहेत तीं त्यास पुढें आणतां येतील. पहिली गोष्ट ही कीं, ह्या सर्व धोरणानें अखेरीस राष्ट्राचें नुकसान होतें, कारण नेहमीं लढाया करण्याला व कारभार चालविण्याला जो खर्च येतो, तो जे व्यापारविषयक फायदे होतील म्हणून म्हणतात त्यांनीं कधीं भरून येत नाहीं, आणि ह्या

नुकसानामुळें इतर वर्गांबरोबर कामकरी वर्गाचेंहि अखेरीस नुकसान होतें. दुसरी गोष्ट ही कीं, ही सर्व सरणी अगदीं नैतिक नीचता उत्पन्न करणारी आहे, कारण तिच्या योगानें लष्करी घटनेच्या वाढीस जोर येऊन शिवाय अशा मनोविकारांचें सारखें पोषण होत राहतें कीं, तेणेंकरून अखेरीस स्वतंत्र संस्था नष्ट होऊन जुलमी कारभार उत्पन्न होतो. तिसरी गोष्ट ही कीं, वाढलेल्या मुलखांच्या संरक्षणार्थ, आणि युरोपांतील इतर राष्ट्रांच्या वाढत्या मत्सरानें ज्या लढाईच्या भीत्या उत्पन्न होतील त्यांविरुद्ध इंग्लंदास सुरक्षित करण्यास, ह्या गोष्टींमुळें, 'सैन्यें वाढवा' अशी वाढती मागणी निःसंशय उत्पन्न होणार आहे. चवथी गोष्ट ही कीं, सैन्याबद्दलची ही मागणी राज्यकर्ते वर्ग नेहमीं वाढवीत जातील, कारण लष्कर वाढावें आणि आपल्या धाकट्या मुलांना (मोठे मुलगे इस्टेटीचे धनी व्हावयाचे असतात) मुलूख वाढून तेथें जागा मिळाव्या, ह्यांत त्यांचा फायदा असतो. पण ह्यामुळें जबरीची लष्करी पद्धति सुरू होईल, व तिजपासून कामकरी वर्गाचें सर्वांत ज्यास्त नुकसान होईल.... ह्या सर्व गोष्टींचा आपल्या घनगर्जनेनें निषेध करणाराची जरूरी आहे. आणि मी इच्छितों कीं ह्या युद्धांत तूंहि पुढें यावेंस. हल्लीं ही गोष्ट मला दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीपेक्षां ज्यास्त महत्त्वाची दिसते."

१८८८ च्या हिंवाळ्यांत ग्रांट आलेन व त्याची बायको बाहेर देशीं गेलीं असतां तो डार्किंग एथील त्यांच्या घरीं एकटाच राहिला, आणि एकटेपणा टाळण्यासाठीं कधीं ही व कधीं ती युक्ति योजूं लागला. पण सामाजिक दळणवळण त्यास जर एकदां फायदेशीर वाटे, तर एकदां नुकसानकारक वाटे. उदाहरणार्थ, टिंडाल व त्याची बायको त्यास भेटावयास येणार होतीं त्यांना टाळण्याचें तो असें कारण लिहितोः—"(ह्या बाबतींत) माझे मित्र ते माझे

सर्वांत वाईट शत्रु आहेत, आणि म्हणून त्यांच्यासंबंधानें मला नेहमीं सावध रहावें लागतें; आणि जे मित्र माझ्या अत्यन्त कळवळ्याचे असतील त्यांच्यासंबंधानें विशेषच सावध रहावें लागतें; कारण त्यांच्याशीं माझें भाषण जोराचें होण्याचा अत्यन्त संभव असतो. सामान्य ओळख्यांची मला फारशी भीति वाटत नाहीं." मुलांच्या सहवासापासून मात्र असें नुकसान होईल अशी भीति त्यास वाटत नसे. म्हणून त्यानें मिसेस क्रिप्चीं दोन मुलें पुनः एक पंधरवडाभर 'उसनीं' आणिलीं. तीं परत गेलीं तेव्हां त्यानें त्यांच्या आईस जें पत्र पाठविलें त्यावरून ज्यांच्याशीं त्याचा संबंध येईल त्यांच्याबद्दल तो किती काळजी घेत असे हें स्पष्ट दिसतें. तें पत्र ता० १७ दिजंबरचें असून असें आहे:—" मुलें घरीं सुखरूप येऊन पोहोंचलीं अशाबद्दलचें तुझें पत्र वाचून मला आनंद झाला. तीं तुला इतकीं सुधारलेलीं आढळलीं ह्याबद्दल मला आनंद वाटतो. ही सुधारणा डार्किंगच्या हवेमुळें झाली असें समजूं नको. त्याच्या सभोंवतीं टेकड्या असल्यामुळें इतरत्र हवा स्वच्छ असेल तेव्हां देखील तेथें दाट धुकें असतें, आणि तेथील हवा हलक करणारी आहे..... त्यांच्यांत झालेला फरक केवळ त्यांच्या रहाणींत बदल केल्यामुळें झालेला आहे. मीं त्यांचें सकाळचें सोमाळ्या पाण्याचें स्नान बंद केलें, आणि गरम पाण्याचें घालूं लागलों. त्यांच्या फुप्पुसांच्या स्थितीकडे पाहतां त्यांची त्वचा गारठणें फार घातुक आहे. तीं घरांत असोत किंवा बाहेर जावोत त्यांच्या अंगावर पूर्वींहून ज्यास्त जाड कपडे मी घालीत असे हें तुझ्या नजरेस आलेंच आहे, आणि त्यांच्या सर्व शरीरावर अंगाबरोबर फ्लानेल पाहिजे. हल्लींची मुलांच्या पोषाखाची तऱ्हा त्यांच्या तंगड्या उघड्या ठेवण्याची किंवा पातळ कपड्यानें आच्छादण्याची असून, तिच्यामुळें किती तरी आजार उत्पन्न होतात, आणि किती तरी प्रकृत्या खच-

तात. शिवाय, त्यांच्या मानाहि आच्छादिल्या पाहिजेत. त्यांच्या तोंडांतील पातळ पडदे नाजुक असल्यामुळें व त्यांना पडसें होत असल्यामुळें त्यांच्या गळ्यासभोंवतालच्या कातडीवर आवरण पाहिजे. माझ्याकडे असतांना मी त्यांना दिवसांतून तीनदां मासान्न देत असें. आठ वाजतां सपाटून न्याहारी देऊन तिच्यांत त्यांच्या दूधभाकरीबरोबर त्यांना मासा, आंडें किंवा डुकराचें मांस देत असें; ह्यामुळें एक वाजतां दुपारच्या जेवणापर्यंत मध्यें त्यांना कांहींहि लागत नसे. दोनप्रहरच्या वेळीं त्यांना मांस व इतर अन्न पाहिजे तितकें देत असें. नंतर ४॥ वाजतां थोडेंसें खाणें त्यांस देत असें, आणि सात वाजतां आणखी एक भक्कम जेवण. शिवाय, जेवतांना त्यांना पहिल्याइतकें पाणीं प्यावयाचें बंद केलें होतें. त्यांना पाण्याची रोगट हांव उत्पन्न झालेली असून ती अपायकारक होती. ती फार आयासाविना मोडली, आणि त्यांची पचनक्रिया सुधारली. तीं नेहमीं निजावयास जातात तितक्या लवकर मी त्यांस जाऊं देत नसें. मुलांना झोंप येऊं लागण्याच्या पूर्वीं निजावयास जाण्यास सांगणें चुकीचें आहे, आणि बिछान्यांत फाजील वेळ पडून राहिल्यानें हृदयाची क्रिया मंदावते. त्यांची सकाळची सगळी मेहनत त्यांनीं एकदम करणें अनिष्ट होय असें मला आढळून आलें. कारण धडे झाल्यानंतर तीं, त्यांच्या हल्लींच्या प्रकृतीकडे पाहतां, फाजील लांब फिरावयास जात. म्हणून हवा चांगली असेल तेव्हां मी त्यांच्या धड्यांच्यापूर्वीं पाव तास त्यास बाहेर पाठवीत असें, आणि धडे झाल्यानंतर थोडा वेळ पुनः पाठवीत असें. जूडीला संध्याकाळीं वाचावयास किंवा गोष्टी सांगावयास देऊं नये, तर तिला कांहीं सामान्य खेळांत किंवा कर्मणुकींत तो वेळ घालवूं द्यावा. तिचा मेंदू सहज उत्क्षोभ पावतो, म्हणून निजण्याच्या पूर्वींचे तिचे उद्योग शांतपणाचे असावेत. हा माझा उपदेश केवळ कल्पनासाम्राज्य

करणाराचा आहे असें समजूं नको. (कारण) मीं अशा रीतीनें त्यांना वागविल्याचे परिणाम प्रत्यक्षरीत्या फार फायदेशीर झाल्याचें तुला आढळून येईल असें मला वाटतें. "

१८८९ च्या मार्चच्या पंधरावीच्या सुमारास तो लंदनास परत आला. डार्किंग एथें नऊ महिन्यांच्या मुदतींत त्यानें ' आत्मचरिता ' चा कांहीं ज्यास्त भाग लिहिण्यापलीकडे महत्त्वाचें काम केलें नाहीं. आपल्या एकोणसत्तराव्या वाढदिवशीं, " आत्मचरिता " चा त्यास जो बहुधा शेवटचा भाग म्हणून वाटत होता, तो त्यानें लिहिला. मे महिन्यांत कॉलिन्सनें तयार केलेल्या त्याच्या ग्रंथसारास त्यानें प्रस्तावना लिहून दिली, पण त्यापलीकडे त्या ग्रंथाशीं त्याचा कांहीं संबंध नव्हता, व हें जगाच्या निदर्शनास यावें याबद्दल तो फार उत्सुक होता.

या सुमारास मान्टन मार्बल नामक गृहस्थानें नाईल नदीवर आपल्याबरोबर प्रवासास येण्याविषयीं त्यास फार आग्रह केला; तेथें तो गृहस्थ आपल्या बायकोसमवेत खास बोटींतून जाणार होता. त्यासंबंधानें त्यानें स्पेन्सर यास असें लिहिलें:—" तुला आह्मी जहाजावर विस्तृत व सुखाची जागा देऊं, म्हणजे तुला एकटें रहावेंसें वाटल्यास मुळींच अडचण पडणार नाहीं; खाण्यापिण्याची उत्कृष्ट व्यवस्था करूं, त्याबद्दल एक छदामहि घेणार नाहीं; आणि तुला तुझे दिवस रिकामपणें आणि रात्रीं स्वस्थपणें घालवतां येतील. तुझें जर कांहीं आवडतें किंवा विशेष खाणें असेल, तर त्याची आह्मी सोय करूं; तुझा जर कांहीं आवडता खेळ असेल, तर तो आह्मीं शिकूं; तुला जेव्हां एकटें रहावेंसें वाटेल तेव्हां तूं बोटीवर नाहींस असें आह्मीं समजूं; तुझा कंटाळा आमच्यावर काढण्यास तूं आह्मांकडे येशील तेव्हां तुझें स्वागत करूं.... कोणत्याहि रीतीनें तूं निराश झाल्यास, किंवा कंटाळून परतावेंसें तुला वाटल्यास, कू-

कच्या आगबोटींतून तुला सहज पळ काढतां येईल." या उदार निमंत्रणाचा त्याच्या प्रकृतीमुळें त्यास स्वीकार करतां आला नाहीं याबद्दल त्यास फार वाईट वाटलें. त्याचा मित्र रिचर्ड यानें त्यास मॉन्मथ प्रांतांतील आपल्या गांवीं बोलाविलें होतें त्यासहि त्यानें ता० २८ मे १८८९ रोजीं असें लिहिलें:-"तुझ्या प्रेमयुक्त आग्रहाच्या विनंतीस मान देऊन तुझ्याकडे येणें शक्य असतें तर बरें झालें असतें असें मला फार वाटतें, पण दुर्दैवानें ती गोष्ट अगदीं अशक्य दिसते.... येत्या उन्हाळ्याच्या दिवसांत बाहेरगांवीं रहाण्यासाठीं योग्य जागेबद्दल मीं जाहिरात दिली आहे यावरून मला तुजकडे येववतें तर मी येण्याचा संभव किती होता हें तुझ्या लक्ष्यांत येईल.... इतरत्र मला इतर बाबतींत योग्य अशी जागा मिळाली तरी माझ्या स्नेह्यांची संगति ही जी गोष्ट मला सर्वांत ज्यास्त हवी आहे ती तेथें मिळावयाची नाहीं. यावरून तुझ्या घरीं माझ्यानें येववतें तर मी किती आनंदानें येतों, याचा तूंच विचार कर."

उन्हाळ्यांत रहाण्यास योग्य जाग्याबद्दल त्यानें जी जाहिरात दिली होती तिला हवीं तितकीं उत्तरें आलीं; पण त्याच्या अनेक विशेष गरजा सहजगत्या भागण्यासारख्या नव्हत्या. त्या कोणत्या त्याची लांबलचक यादी देऊन त्यानें आपल्या सेक्रेटरीस आलेलीं घरें कशीं काय आहेत तें पहाण्यास पाठविलें; आणि, घर आणि त्यांत रहाणारी मंडळी कशी आहे, कोंबडीं, बदकें, कुत्रे, देवळांच्या घंटा, आगगाड्यांचे रस्ते, हीं जवळपास आहेत किंवा कसें, हवा चांगली आहे किंवा नाहीं, सभोंवतालीं गाडींत बसून हवा खावयास जाण्याची सोय आहे किंवा नाहीं, इत्यादि गोष्टी पहावयास सांगितल्या. त्यासंबंधानें त्याचा सेक्रेटरी ट्रौटन म्हणतो, चमत्कार असा कीं, पुष्कळ ठिकाणीं माझी निराशा झाल्यावर जाहिरातीला जें शेवटचें उत्तर आलें ती जागा पुष्कळ बाबतींत त्यास

पाहिजे होती तशी मिळाली. ती विल्टशायर प्रांतांत प्यूसीनजीक होती. इकडे खाणावळींत राहण्याचा त्यास कंटाळा येऊन तो लंदनांत घर घ्यावयास पहात होता. पण घरांत जेवणाखाणाची व्यवस्था करावयास कोणी पाहिजे होतें. तें करणाऱ्या तीन अविवाहित बाया जेव्हां भेटल्या, तेव्हां त्यांच्याबरोबर व्यवस्था करून आव्हेन्यूरोड नामक रस्त्यावर त्यानें एक घर पसंत केलें. यासंबंधानें ता० १२ जून १८८९ रोजीं तो टिंडाल यास लिहितोः— " विल्टशायरमध्यें उन्हाळ्याचे महिने घालविण्यास योग्य अशी एक जागा मला सांपडली आहे.....तेथील लोक ओळख मागूं लागले, तेव्हां मीं तुझें एक नाव सांगितलें. आतां तुला चकित करणारी एक गोष्ट मला तुला सांगणें आहे, ती ही कीं मी सेंट जॉन्स वूडमध्यें एक घर घेतलें आहे, आणि तेथें माझी बरदास्त तीन अविवाहित स्त्रिया ठेवणार आहेत. आज मी सरासरी वर्षभर विचार करीत होतों तदनुरूप ही व्यवस्था केलेली आहे. "

तो प्यूसी एथें असतां ता० १७ आगस्टच्या ' पंच ' पत्रांत " बाहेर थंडींत कुडकुडत " ह्या नांवाचें टेनियलनें काढिलेलें विनोदी चित्र आलें. त्याचा इत्यर्थ असा होता कीं, सरकार तनखे जे देतें ते परदेशीय राजपुत्र, सरकारी पदवीवाले कवी, किंवा परराष्ट्रीय वकील वगैरेंचे नातलग, अशांनाच देतें; वाङ्मय, शास्त्र, किंवा कला ह्यांमध्यें पारंगत असणारांस देत नाहीं. ह्या चित्राला स्पेन्सरनें अशी पुरवणी जोडून ठेविली आहेः—" हें चित्र पाहून मला फार आनंद होतो. तें पाहून टेनिसनला कसेंसेंच वाटलें पाहिजे. माझ्या मतें त्याला सरकारी तनखा आज पुष्कळ वर्षें घेण्याची जरूरी नसतां तो तो तसा घेत आला आहे ही गोष्ट त्यास लज्जास्पद आहे. विशेष लाजेची गोष्ट ही कीं, ज्या फंडांतून तो हा तनखा घेतो, तो लहान असून वाङ्मय व शास्त्र ह्यांचा व्यासंग करणाऱ्या पण गरजू

माणसांकरितां तो काढलेला आहे, आणि त्यांसच तो पुरेसा नाहीं (जर अशा लोकांना सार्वजनिक पैशांतून असली मदत करणें योग्य असेल तर). टेनिसन जें पेन्शन अजून घेत आहे तें तो लहान असतां, आणि लोकांकडून त्यास फारसे मान मिळावयास लागण्याच्या अगोदर, आणि मी ऐकतों त्याप्रमाणें त्यानें आपली बहुतेक सर्व मत्ता एका सट्टयांत घालविली असतां त्यास दिलेलें होतें; सारांश, अशीं पेन्शनें जर द्यावयाचींच असतील, तर तसलें पेन्शन त्यास देण्यास योग्य कारण होतें अशा वेळीं दिलें होतें. पण आज पुष्कळ वर्षें तो साधारणपणें श्रीमान झालेला असतां (इतका कीं, त्याचीं लंदनाबाहेर दोन घरें आहेत), त्यानें आपल्या वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत तें घेण्याचें चालू ठेविलें आहे. मला वाटतें, त्याच्या ग्रंथांपासून वर्षाची त्यास कित्येक हजार पौंड किफायत आहे, आणि वस्तुतः ही गोष्ट त्याच्या रहाणीवरूनच दिसत आहे. एवंच ज्या वेळीं ह्या पेन्शनाची त्यास मुळींच जरूरी नाहीं अशा काळीं तो तें घेत राहिला आहे, आणि अशा रीतीनें खरी जरूरी असलेल्या दुसऱ्या कोणत्या तरी कमज्यास्त योग्य माणसाला तें मिळण्याच्या तो आड आलेला आहे. हारिएट मार्टिनो हिचें वर्तन ह्याहून किती तरी भिन्न होतें ! कारण तिला तिच्या लेखणीनें दीर्घ श्रम करून जें काय मिळेल त्यापलीकडे उदरनिर्वाहाचें साधन नसतां, आणि त्या दीर्घ श्रमांनींहि तिला बेताचीच कमाई होत असतां, तिला जेव्हां पेन्शन देऊं लागले, तेव्हां तिनें तें नको म्हटलें; सार्वजनिक पैसा घेण्यापेक्षां आपले दीर्घ श्रम व बेताची कमाई हींच तिला ज्यास्त पसंत वाटलीं; कारण बहुधा अशा कामीं सार्वजनिक पैसा खर्च होणें तिला नापसंत असावें. अर्थशास्त्रज्ञ स्वभावतः कठीण अंतःकरणाचा व काव्यविहीन समजला जात असतो, आणि कवि स्वभावतः उदात्त मनोविकारांनीं उचंबळलेला म्हणून समजला

जातो; पण अर्थशास्त्रज्ञ हारिएट मार्टिनो, आणि कवि टेनिसन, ह्यांच्या ह्या वर्तनांत काय हा विलक्षण फरक! टेनिसनचें हें वर्तन ध्यानांत घेऊन त्याच्याबद्दल मला वाटणारी वाखाणणी आज पुष्कळ वर्षें बरीच कमी झालेली आहे."

ता० २८ सपटंबर १८८९ रोजीं तो हक्स्लेस लिहितो:—"मी ऐकतों, तूं ईस्टबोर्न एथें घर बांधीत आहेस. आजपर्यंत सर्व जन्म भाड्याच्या खोल्यांत किंवा खाणावळींत मीं घालविला असल्यामुळें माझ्या ह्या वयांत घर "घेणें" देखील मला जरा विक्षिप्तपणाचें कृत्य वाटतें; पण तुझ्या वयांत तूं घर "बांधीत" आहेस हें पाहून, मला वाटतें, मी एकंदरींत कांहीं इतका विक्षिप्त नाहीं.... स्वित्सॅलंदांत तूं रहावयास गेला होतास त्यानें तुला कसें काय वाटलें? तूं मला भेटावयास आला होतास म्हणून जरी मीं ऐकिलें, तरी तुझ्या प्रकृतीबद्दल मला कांहीं समजलें नाहीं. पूर्वींप्रमाणें तुला फायदा झाला असेल, आणि धर्माधिकाऱ्यांशीं आणखी एक कुस्ती करण्यास तयार होऊन तूं आला असशील, अशी मी आशा करितों."

१८८८ सालीं त्याच्या कानावर असें आलें कीं, बलोन्नाच्या युनिव्हर्सिटीनें आपणास न्यायशाखेचा डाक्टर केलें आहे. यासंबंधानें टयुनिआर मार्टेलो यास उत्तर देतांना त्यानें असें म्हटलें कीं, "इटालीमध्यें माझीं पुस्तकें बऱ्याच लोकांना मान्य असल्याबद्दलचा जो (माझा) समज त्याचा हा स्पष्ट पडताळा पाहून मला आनंद वाटतो." पण ह्या निवडणुकीमुळें तो पुनः घोटाळ्यांत पडला, कारण आजपर्यंत असल्या सर्व सन्मान्य पदव्या त्यानें नाकारिल्या होत्या. तेव्हां ही कशी स्वीकारावी ह्याबद्दल त्यास मोठा विचार पडला.

१८८९ च्या प्रारंभीं असेंच दुसरें एक घोंटाळ्याचें कारण उत्पन्न झालें. डेन्मार्कमधील रॉयल आकाडेमीनें त्याला सभासद निव-

डिलें. ही सभासदी नाकारण्याबद्दल प्रो० हार्पडिंग ह्यास लिहितांना फ्रेंच आकाडेमीला पाठविलेल्या पत्राची एक नक्कल त्यानें सोबत जोडिली, आणि असें म्हटलें कीं, " ह्या सभासदीची किंमत मला कमी वाटते म्हणून मी ती नको म्हणतों असें नव्हे, हें त्यावरून दिसून येईल."

प्रकरण विसावें

स्वातंत्र्य व न्याय ह्यांचें मण्डन

नीतिशास्त्रावरील आपले ग्रंथ मध्यें अडचण न येतां आपल्याला तयार करतां येतील अशा आशेनें तो त्या कामास लागला होता, पण मध्येंच त्याचा पुष्कळ वेळ भलत्याच कामीं खर्च होऊन त्या बाबतींत त्याची निराशा झाली. घर घेण्याच्यासंबंधानेंच त्याला फार त्रास झाला. शिवाय इव्हिनिंग पार्ट्यांचीं आमंत्रणें तो आज कित्येक वर्षें स्वीकारीत नसतां आतां स्वीकारूं लागला. आर्थीनियम क्लबाच्या कारभारांताहि तो आतां पुनः लक्ष घालूं लागला. तद्वतच १८९० च्या जानेवारींत, जपानी प्रधान सरदार केन्टारो क्यानेको हा त्या क्लबाचा सन्माननीय सभासद निवडिला जावा ह्या कामीं त्यानें खटपट केली. ह्या वेळापासून त्या दोघांची प्रत्यक्ष ओळख होऊं लागली. स्पेन्सरच्या ग्रंथांची ओळख त्यानें बऱ्याच वर्षांपूर्वीं केलेली होती, आणि जपानी राज्यव्यवस्था सुधारण्याच्या कामीं तो व कौन्ट ईटो पांच वर्षेंपर्यंत गुंतले असतां त्यांनीं त्या ग्रंथांचें अध्ययन केलें होतें. पुढच्या वर्षीं जपानास परत गेल्यावर क्यानेकोनें

यूरोपांतील पार्लमेंतीय व्यवस्था जपानमध्यें सुरू करतां येतील किंवा नाहीं ह्या बाबतींत स्पेन्सरचा सल्ला विचारिला.

ता० २९ दिजंबर १८८९ रोजीं त्यानें त्याचा मित्र रिचर्ड पॉटर यास असें लिहिलें:—" मी तुला नवें वर्ष सुखाचें जावो असें इच्छितों, आणि तुझें दुखणें पुन: परतलें आहे त्यांतून तूं लवकर उठावेंस अशी इच्छा प्रदर्शित करितों. तुझ्या कुटुंबांतील कोणत्या तरी माणसाच्या पत्रांतून तुजबद्दलची खबर मला कळत असते, त्यांत तुझी प्रकृति अद्यापि अशक्तच आहे हा जरी असमाधानकारक भाग असतो, तरी तूं आपली वृत्ति उल्लसित राखिली आहेस, हा समाधानकारक भाग दिसतो. इतकी सुखाची वृत्ति असणें ही अत्यन्त महत्त्वाची गोष्ट आहे. इतके दिवस केवळ समता व समाधानवृत्तिच तूं केवळ राखिली आहेस असें नाहीं, तर पुष्कळांना आरोग्यांत जितका आनंदितपणा वाटतो त्याहून रोग्याच्या स्थितींत तूं ज्यास्त आनंदानें राहिला आहेस, ही गोष्ट शंभरांत एकास, किंवा कदाचित् हजारांत एकास देखील साध्य होत नसते ह्या बाबतींत व कौटुंबिक परिस्थितीच्या बाबतींत मला तुझा हेवा वाटतो."

ता० १० मे १८९० रोजीं जेम्स स्किल्टन नांवाच्या एका अमेरिकन गृहस्थास त्यानें असें लिहिलें:—" गत कालांत ज्यांनीं कल्पनांच्या प्रसारार्थ आपलें आयुष्य खर्चिलें आहे, त्यांना पुष्कळ त्रास झाला आहे, आणि ते जिवंत असतां त्यांची किंमत फारशी कोणीं ओळखलेली नाहीं. त्यांच्या वांट्यास काय आलें हें पाहतां मीं आपल्यास अत्यन्त सुदैवाचा मानणें गैर होणार नाहीं. माझ्या ग्रंथकर्तृत्वाच्या पहिल्या अर्ध्या अमदानींत जरी माझें पुष्कळ नुकसान झालें, आणि मला फारसें उत्तेजन मिळालेलें नाहीं, तरी पुढच्या अर्ध्या अमदानींत तें नुकसान भरून आलेलें आहे; आणि हल्लीं

जो मला फायदा होत आहे, आणि लोकांच्या पसंतीचे पुरावे ज्यास्त ज्यास्त वरचेवर मिळत आहेत, त्यांनीं माझ्या मनांत समाधानापलीकडची मनोवृत्ति उत्पन्न झाल्यास तें योग्यच होईल. ”

त्यानें शिरावर घेतलेल्या एकंदर उद्योगांमध्यें ‘ वर्णनात्मक समाजशास्त्र ’ तयार करण्याचा उद्योग अत्यन्त निराशाजनक झालेला होता. पण त्यांत देखील दुःखांत सुख त्याला कधीं कधीं झालेलें होतें. उदाहरणार्थ, वर्नर नांवाचा इंग्लिशांचा व्यापारी वकील चीन देशांत असून त्यानें चिनी लोकांबद्दलचा त्या शास्त्राचा भाग बिनखर्चानें तयार करण्याचें शिरावर घेतलेलें होतें, आणि जरी कामाची दगदग, थकवा आणणारी हवा, व वाईट प्रकृति इत्यादि अडचणी त्याच्या मार्गांत होत्या, तरी त्यानें तें काम नेटानें चालविलें होतें; आणि ही गोष्ट स्पेन्सरला फार उत्साहजनक वाटत होती.

‘ आकाशविषयक ज्ञानवत्ता ’ नांवाचा एक निबंध १८८३ सालापासून अर्धवट पडला होता तो त्यानें ह्या वर्षीं पुरा करून ‘ माइंड ’ नामक शास्त्रीय मासिकासाठीं पुरा तयार केला. निबंधसंग्रहाची अखेरची आवृत्ति काढण्यासाठीं “ गानाचा उद्गम व व्यापार ” ह्याला एक पुरवणी तयार केली, आणि तीहि त्याच मासिकांत प्रसिद्ध केली. ह्याच सुमारास मिस् कान्स्टन्स नेडन नामक एका बाईनें “ अनुमति आणि निष्पत्ति ” नांवाचा एक ग्रंथ तयार केला होता, त्याची एक प्रत त्याजकडे आली. त्यावरून स्त्रियांच्या बौद्धिक शक्तीच्यासंबंधानें त्याचे आज पुष्कळ वर्षें बनलेले दृढ समज पुनः व्यक्त करण्यास त्यास संधि सांपडली. तें त्यानें रॉबर्ट लेविन्स नामक गृहस्थास ता० १० जून १८९० रोजीं लिहिलेल्या पत्रांत ह्याप्रमाणें व्यक्त केलें:—“ (स्त्रियांमध्यें) फारकरून ग्राहकबुद्धि व नूतनशोधबुद्धि ह्यांचें साहचर्य नसतें, पण ह्या बाईमध्यें त्या दोन्ही बुद्धि सारख्याच मोठ्या होत्या. विस्तृत

ज्ञान आणि मोठी तत्त्वज्ञानविषयक शक्ति ह्यांचा हा असा संयोग जार्ज इलियट खेरीज इतर कोणत्याहि स्त्रीच्या ठिकाणीं झालेला मला माहीत नाहीं..... हें जरी मी म्हणतों, तरी त्याबरोबर असें म्हटल्यावांचूनहि माझ्यानें रहावत नाहीं कीं, स्त्रियांच्या ठिकाणीं मानसिकशक्तींची इतकी मोठी वाढ कांहीं अंशीं नियमास सोडूनच असते, आणि ती झाल्यानें इंद्रियव्यापारविषयक खर्चाचा बोजा त्यांच्यावर असा कांहीं पडतो कीं, तो त्यांना कमज्यास्त भयंकर नुकसानाविना सहन करतां येत नाहीं; आणि ही गोष्ट इतर असल्या स्त्रियांप्रमाणें तिच्या उदाहरणतांहि दिसत होती."

ह्याच सुमारास आपले मलबारी शेट ह्यांनीं बालविवाहपद्धतिसंबंधानें त्याचें मत विचारलें, तेव्हां त्यानें त्यांस ता० २० जुलई १८९० रोजीं असें लिहिलें:—" हिंदुस्थानच्या स्थितीची माहिती जरी मीं मुळींच करून घेतलेली नाहीं तरी तुम्हीं उपस्थित केलेल्या प्रश्नांसारखे प्रश्न हातांत घेण्याच्या कामीं आंग्लोइंदियन आधकाऱ्यांना अडचण कां वाटतें हें मला समजूं शकतें. ज्या जातीचें शील व मनोविकार आपल्यास बऱ्याच अंशांनी दुर्बोध आहेत अशा जातीच्या चालीरीतींत दुसऱ्या जातीनें हात घालणें गैरमुत्सद्दीपणाचें आहे असा जो त्या अधिकाऱ्यांचा समज झालेला आहे तो पुष्कळ अंशीं बरोबर आहे. एका लोकांना ज्या संस्था हितकारक ठरल्या त्या दुसऱ्या जातीलाहि तशाच ठरतील असें पुष्कळ जण गृहीत कारितात, पण ही चूक आहे; आणि ही चूक ध्यानांत असल्यामुळें हिंदुस्थान-सरकार ह्या बाबतींत हात घालीत नाहीं. तथापि, त्वद्देशीय लोकांच्या रूढीच्या संबंधानें सरकारची ही तस्टथ वृत्ति मर्यादेबाहेर जाण्याचा संभव आहे हें जें तुमचें मत तें मला मान्य आहे. विवाह म्हणजे करार आहे असें मानणें बरोबर आहे. करार म्हटला म्हणजे त्यांत करार करणाऱ्या माणसांचें अनिर्बंध अनुमत गर्भित होतें, आणि असेंहि गर्भित होतें

कीं, तो करार केल्यानें ज्या जबाबदाऱ्या त्यांच्या अंगावर येतात त्या त्यांस समजूं शकतील अशा वयाचीं तीं आहेत. हिंदुस्थानांतील रूढीमध्यें ह्या दोन अटींपैकीं एकहि अट पुरी होत नाहीं. त्यांच्यांत स्त्री-पुरुषें विवाह स्वैच्छिक करार करून करीत नाहींत आणि स्वैच्छिक करारहि करण्याच्या वयाचीं तीं असत नाहींत.

अशा स्थितींत हा करार झालाच नाहीं असें समजणें, आणि त्याच्या संबंधाच्या किंवा त्यापासून उत्पन्न होणाऱ्या कोणत्याहि बाबींत कांहींहि करण्याचें नाकारणें, एथपर्यंत सरकारानें मजल मारावी किंवा नाहीं हा एक विचारणीय प्रश्न आहे. असें करणें फार कडक होईल किंवा नाहीं हें माझ्यापेक्षां हिंदुस्थानांतील वस्तुस्थितीची ज्यांस अधिक माहिती आहे ते निश्चितपणें सांगूं शकतील."

ता० २२ आगस्ट १८९० रोजीं त्यानें प्रो० टिंडाल यास असें लिहिलें:—" सगळ्या उत्तर गोलार्धांत, किंवा निदान त्याच्या पूर्व अर्धांत, बहुतेक सर्वत्र जी वाईट हवा पसरली होती त्या हवेच्या समुद्रांत आल्प्स पर्वत तेवढा चांगल्या हवेचें बेट बनला असेल तर निराळें; नाहीं तर, मला वाटतें, तुझ्या त्या पर्वतावरील झोंपडींत कोंडलेलें राहून तुला कंटाळा आला असेल. माझी अशी कल्पना आहे कीं, माझ्या अंगीं निरुद्योगांत राहण्याची जी शक्ति आहे ती तुझ्यांत नाहीं, आणि त्यामुळें तुला जर बाहेर जातां आलें नाहीं तर, माझ्यासारखें इकडे तिकडे भटकून आपला मेंदू रिकामा ठेवण्याच्या ऐवजीं, कांहीं तरी करीत रहावें लागतें. नुक्तेंच माझे छोटे मित्र (मिसेस क्रिप्सचीं मुलें) मीं तीन आठवडेपर्यंत पुनः आणिले होते.... त्यांच्यापैकीं एक, दहा वर्षांची एक लहान मुलगी हाडाचीच चांगली आहे; आणि तिच्याविषयीं मीं ऐकिलें आहे अशा दुसऱ्या एका मुलीप्रमाणें (बहुधा टिंडालची मुलगी) मानवी

स्वभाव किती उत्तम बनूं शकेल हें तीं पुढें दाखवील अशी आशा उत्पन्न होते."

येशू ख्रिस्तास सुळावर चढविल्यानंतर तिसऱ्या दिवशीं तो उठला अशी गोष्ट बैबलांत सांगितली असून, ती इतिहासांतील अत्यन्त खात्रीची गोष्ट आहे असें डा० आर्नोल्ड म्हणत असे. ह्या गोष्टींची चर्चा आक्सफर्डमधील थोडीशी मंडळी करणार होती. पण त्यांस वाटलें कीं, आपण खिस्ती धर्मावर भरंवसा ठेवणारे असल्यामुळें ती खरी मानण्यास काय अडचणी आहेत हें आपल्या बरोबर लक्षांत येत नाहीं. म्हणून तिच्याबद्दल प्रामाणिक संशय घेण्यास मुख्य कारणें काय आहेत तें एका कागदावर नमूद करण्यास त्यांनीं स्पेन्सर यास सांगितलें. तेव्हां त्यांच्यापैकीं एक फ्रिमॅन्टल यास त्यानें ता० २९ आक्टोबर १८९० रोजीं असें लिहिलें:—" तूं व तुझा मित्र यांजवर 'समाजशास्त्राचें अध्ययन' हें पुस्तक वाचिल्याचा काय परिणाम झाला तें तूं मला कळविलेंस तिकडे सहजच माझें लक्ष्य वेधलें. त्याचे उद्देश केवळ सामाजिक व राजकीय होते, आणि धार्मिक बाबतींत त्याचा कांहीं प्रभाव पडेल हें माझ्या स्वप्नींहि नव्हतें.... आतां ख्रिस्ताच्या पुनरुज्जीवनाच्या हकीकतीबद्दल संशय घेण्यास प्रत्यक्ष कारणें दाखविणें जरी अशक्य आहे, तरी बरींच महत्त्वाचीं अप्रत्यक्ष कारणें तुला मी दाखवूं शकेन. मानवी साक्ष अत्यन्त अविश्वसनीय कशी असते हें दाखविणारीं गेल्या वीस वर्षांत घडून आलेलीं चार उदाहरणें मी माझ्या स्वतःच्या अनुभवावरून तुला देऊं शकतों. (तीं चार उदाहरणें हीं:—(१) तो ओडगर नांवाच्या गृहस्थाच्या स्मशानयात्रेस हजर होता; (२) तो फॉसेटचा स्मारक पुतळा अनावृत केला तेथें हजर होता; (३) लॉर्ड व लेडी डलहौसी यांच्या स्मशानयात्रेस हजर होता; (४) बर्मिंघाम एथील 'पायलर' पत्रांत त्यानें समा-

जशास्त्रावर आर्टिकलें लिहिलीं होतीं). ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहणारांच्या ह्या साक्षी आहेत, आणि सामान्यतः असला पुरावा अगदीं खात्रीचा समजतात. आणि हीं सर्व उदाहरणें माझ्या आयुष्याच्या केवळ एका चतुर्थांशांत घडून आलीं; आणि तीं अशा युगांत घडून आलीं आहेत कीं, ज्या युगांत दोन हजार वर्षांपूर्वीं लोक होते त्याहून कोणत्याहि गोष्टीकडे ज्यास्त बारीक नजरेनें पाहणारे व कमी भोळे बनलेले आहेत. मानवी साक्ष खोटी असते ह्याबद्दलचे अनुभव मलाच तेवढे आलेले आहेत असें मानण्यास ज्या अर्थीं मुळींच कारण नाहीं, त्या अर्थीं हें स्पष्ट दिसतें कीं, बाहेरून स्पष्ट दिसणाऱ्या पण वस्तुतः मुळींच स्पष्ट नसणाऱ्या पुराव्यांची किती तरी उदाहरणें रोज घडून येत असलीं पाहिजेत. असें जर आहे, तर (ख्रिस्ताच्या पुनरुज्जीवनाच्या बाबतींत) सृष्टिक्रमाचे हे जे भंग झाले म्हणून म्हणतात ते खरे समजण्यास ज्या पुराव्यावर तुम्ही विश्वास ठेवितां तो खरा असण्याचा संभव कितपत आहे ?"

स्वतंत्रता व मत्ता ह्यांचें संरक्षण करणारी एक मंडळी स्थापन झालेली होती, व ती सोश्यालिस्ट लोकांना अनुकूल असले कायदे करण्याच्या बेतांना प्रतिरोध करीत असल्यामुळें त्याची तिच्याशीं सहानुभूति होती. तथापि त्या मंडळाच्या सेक्रेटरीला १८९० च्या फेब्रुवारींत त्यानें असें लिहिलें कीं, " मी जरी तुम्हांस पैशाच्या रूपानें मदत करण्यास अगदीं तयार आहें, तरी मीं तसली मदत केली म्हणून तुमच्या मंडळाचा सभासद झालों असें लोकांस वाटूं नये अशी माझी इच्छा आहे. " पुढें ही मंडळी स्वतंत्रतेपेक्षां मत्तेचेंच संरक्षण करण्याची खटपट ज्यास्त करीत आहे असें त्यास वाटून तिच्यावरची त्याची श्रद्धा कमी झाली. पण ह्या वेळीं ती कमी झालेली नव्हती म्हणून म्युनिसिपालिट्यांच्या करांचीं वगैरे ओझीं वाढत आहेत असें पाहून त्यांला विरोध करण्याकरितां त्या मंडळाची म-

दत मिळविण्याची त्यानें खटपट आरंभिली. आणि त्यासंबंधानें ता० १० जून १८९० रोजीं लॉर्ड वेमिस यास असें लिहिलें:—" लंदनच्या लोकांवर कराचा बोजा फाजील पडलेला असल्यामुळें ते त्यास विरोध करावयास लवकरच लागतील अशी आशा मी आज कांहीं दिवस करीत बसलों आहें.....स्कूलबोर्ड व कौंटिकौन्सिल ह्यांची चळवळ हेन्री जॉर्ज यास योग्य दिसणाऱ्या दिशेनें चाललेली आहे. ती दिशा ही कीं, जमिनीच्या मालकांना हात धरून हांकून लावावयाचें नाहीं, तर कर फार बसवून त्यांस हांकून लावावयाचें. हल्लींचें हें सोश्यालिस्ट धोरण आणखी पुढें चालूं द्या, म्हणजे मत्तेचें सर्व उत्पन्न सार्वजनिक कर देण्यांत खलास होऊं लागेल. ह्या स्थानिक मंडळ्या हे जे फाजील कर बसवीत आहेत त्यांना स्वतंत्रता व मत्तासंरक्षक मंडळानें विरोध करण्यास सुरवात करावी असें वाटून मी हें पत्र तुला लिहीत आहें. "

ह्यानंतर एक दोन महिन्यांनीं सोश्यालिस्ट धोरणाविरुद्ध कांहीं निबंध वरील मंडळानें प्रसिद्ध करण्याचें मनांत आणून त्या बाबतींत स्पेन्सरची मदत मागितली. त्याप्रमाणें त्यानें त्या संग्रहास प्रस्तावना जोडण्याचें कबूल केलें आणि लॉर्ड वेमिसनें त्यांपैकीं एक निबंध लिहावा एतदर्थ ता० १४ नवंबर १८९० रोजीं त्यानें त्यास पुढील पत्र लिहिलें:—" सोश्यालिस्ट मतांविरुद्ध चळवळींत सामील होण्यास तूं ज्याअर्थीं मला आग्रह केलास, आणि तुझ्या आग्रहास मीं ज्या अर्थीं मान दिला, त्याअर्थीं तुला तसलाच आग्रह करण्याचा मला एकप्रकारचा हक्क आला आहे. वरील निबंधसंग्रहांत जें विवेचन होणार आहे त्याचें तात्पर्य एका लहानशा लेखांत तूं आणिलेंस तर मला फार आनंद होईल; त्यांत, एक सत्य लोक नेहमीं लक्ष्यांत घेण्यास चुकतात, त्यावर त्वां जोर द्यावा. तें हें कीं, व्यक्तिस्वातंत्र्य हिरावण्यासाठीं जें जें करावें त्यानें सोश्यालि-

झमला मदत होत असते; आणि म्हणून तशा गोष्टी वारंवार केल्यास सोश्यालिस्ट स्थिति उत्पन्न झालीच पाहिजे. लोकांच्या स्वातंत्र्यांत हात घालणाऱ्या प्रत्येक कृतीस टेंकू देणारे लोक नेहमीं तेवढ्या त्या कृतीचाच विचार करीत असतात; आणि अशा कृती दरवर्षीं करीत गेल्यानें जी स्थिति आपल्यास भयंकर वाटते म्हणून ते म्हणत असतात त्या स्थितीनजीक ते अधिकाधिक जात आहेत, ह्या गोष्टीकडे डोळेझांक करितात."

व्यक्तिस्वातंत्र्याची वकिली करण्याकरितां "स्वतंत्र जीवित" (Free life) नांवाचें एक वर्तमानपत्र काढावें असें ऑबेरॉन हर्बर्ट या नांवाच्या एका गृहस्थाच्या मनांत होतें; त्याबद्दल स्पेन्सर यास सहानुभूति वाटत होती, पण अशी भीति वाटत होती कीं त्यांत बरेंच नुकसान येईल, व थोड्या काळानें तें बंद करावें लागेल. म्हणून त्या बाबतींत त्यानें त्यास ता० १ जानेवारी १८९० रोजीं पुढील पत्र लिहिलें:—" वर्गणीदारांत अर्थात् त्वां माझें नांव घालावें. तथापि ह्यावरून तुझी सर्व योजना मला पसंत आहे असें मात्र समजूं नकोस. उदाहरणार्थ, आयर्लंदास स्वराज्य देण्याच्या मी अगदीं विरुद्ध आहें. एकंदर राष्ट्रें जीं बनलेलीं आहेत तीं शांततेच्या व न्यायाच्या पद्धतींनीं बनलेलीं नसून दांडगाई व अन्याय ह्यांच्या पद्धतींनीं बनलेलीं आहेत, आणि तीं दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें बनूं शकलीं असतीं असें मला वाटत नाहीं. एकदां संयोग बनले म्हणजे ते अन्यायानें बनले ह्या मुद्यावर ते मोडून टाकणें चूक आहे. तो पीछेहाटीचा मार्ग आहे, असें माझें मत आहे. गतकालावर पुनः मोहीम करणें, आणि त्या कालीं ज्या कांहीं वाईट गोष्टी झाल्या असतील त्या सर्व फिरविणें जर शक्य झालें, तर समाज एकदम विस्कळित पडतील."

ता० १६ जून:—" व्यक्तिस्वातंत्र्यास हातभार लावण्याच्या

कामीं कांहींहि करतां येईल याबद्दल माझी बहुतेक निराशा झालेली आहे. वस्तुस्थितीचा ओघ विरुद्ध दिशेनें फार झपाट्यानें फिरला आहे; आणि मला वाटतें, हा प्रवाह मोठा मोठा व ज्यास्त ज्यास्त जोराचाच होत जाईल, कारण सार्वजनिक साधनांच्या द्वारा होईल तितकें करून घेणें आपल्या फायद्याचें आहे असा ज्यांस भास होतो अशांच्या हातांत हल्लीं राजकीय सत्ता आहे; आणि ज्यांस सार्वजनिक अधिकार पाहिजे आहे ते सर्व त्यांच्या इच्छा पुऱ्या करण्यास अर्थात् झटतील."

ता० ९ आक्टोबरः—" मला अळमळीत वाटतें असें स्वरूप 'स्वतंत्र जीविता' ला येत आहे हें पाहून मला वाईट वाटतें. तूं जेव्हां आपली योजना तयार करून तें वर्तमानपत्र काढण्यास सुरवात केलीस, तेव्हां व्यक्तिस्वातंत्र्याच्या दिशेनें होणाऱ्या प्रत्येक प्रयत्नाशीं जरी माझी सहानुभूति असते तरी फार फलनिष्पत्तीची आशा मीं केली नव्हती; मला अशींहि भीति वाटत होती कीं, स्वैच्छिक करदानाबद्दलचें तुझें मत तुझें वर्तमानपत्र यशस्वी होण्याच्या बाबतींत फार विरुद्ध जाईल, आणि व्यक्तिस्वातंत्र्यविषयक सामान्य मताला बाध आणील.....तथापि ज्या अर्थीं तूं आपले प्रयत्न त्याच्या मूळ स्वरूपींच सुरू ठेविले आहेस, त्या अर्थीं ते होतील तितके यशस्वी करणें मला उत्तम दिसतें; म्हणून तुझ्या पत्राचें एकंदर स्वरूप पूर्वीं होतें त्याहून कमी आकर्षक हल्लीं दिसतें ह्याबद्दल मला वाईट वाटतें हें तुला कळवावेंशी मला स्फूर्ति होते. 'स्वतंत्र जीविता' चा गेला अंक दिसण्यांत पूर्वींहून कमी चित्ताकर्षक आहे, कारण त्यांत पोटविभाग व मथाळे दिलेले नाहींत. वास्तविकपणें आमचीं सामान्यतः सर्व वर्तमानपत्रें छपाईच्या बाबतींत अमेरिकन लोकांचें अनुकरण करीत असतां तुमचें पत्र विरुद्ध दिशेनें चाललें आहे, आणि आकर्षकपणाचीं सर्व अंगें झुगारून देत आहे."

ता० २२ आक्टोबर:—" मला वाटतें, ' स्वातंत्र्यनीति ' ह्या विषयावर एक निबंध तूं लिहित आहेस किंवा बहुधा लिहिला आहेस, आणि तो तूं सोश्यालिस्ट मताविरुद्ध प्रसिद्ध होणाऱ्या निबंधसंग्रहास तो जोडणार आहेस. स्वैच्छिक करदानाच्या संबंधानें तुझ्या परवांच्या एका पत्रांत तूं असें म्हणाला होतास कीं, त्याचें (स्वैच्छिक करदानाचें) मण्डन मी लवकरच करणार आहें; त्याचें स्मरण होऊन मला वाटतें, तें मण्डन कदाचित् ह्या निबंधांत त्वां केलेलें असेल; पण नसेल तर चांगलें. हीं तुझीं विशिष्ट मतें जर तुझ्या निबंधांत आलीं तर तीं अव्यवहार्य आहेत अशी टीका त्यांजवर खचीत होईल, आणि त्यांचा उपयोग एकंदर ग्रंथांत गोंविलेलीं मतें हाणून पाडण्याच्या कामीं केला जाईल....हल्लींचा मानवी स्वभाव हाडाचाच वाईट आहे, आणि हल्लींच्या मानवी स्वभावावरून बनवलेला कोणताहि समाज हाडाचाच वाईट असणार, हें तूं पुरेसें लक्ष्यांत घेत नाहींस असें मीं म्हटलें तर मला क्षमा करशील काय? मीं इतरत्र म्हटलेंच आहें त्याप्रमाणें, शिशाच्या उपजतबुद्धींतून सोन्याचें वर्तन उत्पन्न व्हावयाचें नाहीं; आणि हल्लीं माणसांच्या उपजतबुद्धी बऱ्याच अंशीं शिशाच्या आहेत. वर्षानुवर्ष आणि दिवसानुदिवस, माझी ज्यास्त ज्यास्त खात्री होत चालली आहे कीं विशिष्ट स्वभावाचीं माणसें विशिष्ट प्रमाणाच्याच स्वातंत्र्यास योग्य असतात, आणि त्यांस जर ज्यास्त स्वातंत्र्य दिलें तर तीं जुलमाचें दुसरें कांहीं स्वरूप तयार करून तें (स्वातंत्र्य) लवकरच गमावतील ही गोष्ट हल्लीं चाललीच आहे. निवडणुकीच्या संबंधाच्या कांहीं सुधारणांमुळें त्यांस (इंग्लिश लोकांस) उपयोग करण्याची शक्ति आहे त्यापेक्षां कांहीं ज्यास्त स्वातंत्र्यें प्राप्त झालीं आहेत, आणि याचा परिणाम असा झाला आहे कीं, कामकऱ्यांच्या जमाती, सोश्यालिस्ट पद्धति, तिला अनुकूल कायदे, अशा प्रकारचे जुलूम

ते आपल्यासाठीं बनवीत आहेत, आणि ह्यामुळें ते पूर्वींहून ज्यास्त किंवा निदान पूर्वींच्या इतक्या तरी दास्यांत जातील. त्यांचे स्वभाव अशा प्रकारचे असल्यामुळें, तूं जशा प्रकारची स्थिति असावी म्हणून म्हणतोस, तशा स्थितीला ते मुळींच योग्य नाहींत हें मला स्पष्ट दिसतें. आपखुशीनें कर देण्याइतकीं जेव्हां माणसें चांगलीं होतील, तेव्हां त्यांना सरकाराची जरूरच नाहींशी होईल."

वर सांगितलेला 'निबंधसंग्रह' 'स्वातंत्र्याकरितां एक विनंति' ह्या नांवानें १८९१ च्या प्रारंभीं प्रसिद्ध झाला, आणि त्याला जी प्रस्तावना स्पेन्सरनें लिहिली तीस "स्वतंत्रतेकडून गुलामगिरीकडे" असें नांव दिलें. ह्या प्रस्तावनेच्या कांहीं भागांच्या संबंधानें ग्लाडस्टननें लिहिलें कीं, "मला सर्व प्रस्तावना पसंत नाहीं, आणि त्यांतील एक कलमाची (कोणतें तें तूं सहज ताडशील) सुसंबद्धताहि माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. पण सामान्यत: मी असें सांगतों कीं, हें उत्कृष्ट विवेचन मी फार वाखाणणपूर्वक वाचिलें आहे, आणि मला अशी आशा आहे कीं, त्याच्याकडे सर्व लोक पुष्कळ लक्ष्य देतील, कारण तें तशाच योग्यतेचें आहे." ग्लाडस्टननें ज्या कलमास आपल्या पत्रांत उल्लेख केला आहे तें लिबरल पक्ष म्हणून ज्यास म्हणतात त्याच्या वर्तनाच्या संबंधाचें होतें. तें कलम ग्लाडस्टन यास पसंत पडूं नये याबद्दल स्पेन्सर यास आश्चर्य वाटलें नाहीं, पण त्याची संबद्धता त्याच्या लक्ष्यांत आली नाहीं याबद्दल त्यास आश्चर्य वाटलें. या ग्रंथावर झालेल्या फायद्याचा जो भाग स्पेन्सरच्या वांट्यास आला, तो त्यानें, त्या ग्रंथाच्या प्रती धर्मार्थ पुस्तकालयें व वाचनालयें यांस फुकट पाठविण्याकरितां, प्रकाशक मरे याच्या स्वाधीन केला.

अगदीं निरुपद्रवी म्हणून दिसणाऱ्या योजनांमध्यें देखील व्यक्तिस्वातंत्र्यास हात घातलेला त्याच्या नजरेस येत असे; मग तो हात मुख्य सरकारनें घातलेला असो, किंवा स्थानिक सरकारानें घातलेला

असो. उदाहरणार्थ, घरांतून चांगली हवा सोडावी एतदर्थ त्यांची सुधारणा करण्याची हालचाल करण्याच्या कामीं ऑबेरॉन हर्बर्टनें त्याची मदत मागितली असतां त्यानें त्यास ता० १४ मे १८९१ रोजीं असें लिहिलें:—" माझा समज असा आहे कीं शुद्ध बनलेल्या हवेंत श्वासोच्छ्वास केल्यानें जितकें नुकसान होतें, त्यापेक्षां अंगावर वाऱ्याचा झोत घेतल्यानें पडसें, सांधेदुखी वगैरे रूपांनीं फार ज्यास्त नुकसान होतें; म्हणून घरांतून हवा खेळण्याकरितां ज्या सामान्य खबरदाऱ्या हल्लीं घेतात त्यांचा ज्यास्त उपयोग केल्यानें हें नुकसान ज्यास्त होणार आहे; कारण ह्या खबरदाऱ्यांचा उपयोग प्रकृतीस धोका बसावा अशा रीतीनें करीत असतात..... पण ह्या संबंधाची खरी स्थिति कांहींहि असली, तरी एक गोष्ट अगदीं स्पष्ट आहे; ती ही कीं, तूं नाहीं म्हटलेंस तरी तुझ्या चळवळीचा उपयोग (लोकांच्या स्वातंत्र्यांत) सरकारचा हात ज्यास्त पडण्याच्या कामीं निखालस केला जाईल. म्हणून ह्या बाबतींत तुझ्याशीं मला सहक्रिया करतां येत नाहीं ह्याबद्दल वाईट वाटतें. "

राजकीय दृष्ट्या जी गोष्ट त्यास नापसंत असेल ती तशी म्हणण्यास ह्या रीतीनें शास्त्रीय तत्त्वांचा आधार मिळेल तेव्हां तो घेत असे. ह्याच तत्त्वाच्या आधारावर तो देवी टोंचून घेण्याच्या विरुद्ध होता, व पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषाच्या संबंधानें उपायांच्याहि तो विरुद्ध होता. मुलांना आईबापांनीं क्रूरतेनें वागवूं नये, एतदर्थ एक मंडळी स्थापन झाली होती, तिच्याविरुद्ध तो असल्याच मुद्यावर होता. त्याचें म्हणणें असें होतें कीं, अशा रीतीनें आईबापांच्यां कृतिस्वातंत्र्यास हात घातल्यास त्यांची मुलांच्या संबंधाची जबाबदारी कमी होण्याचा संभव आहे. ह्याच सुमारास त्यानें " न्यायतत्त्वें " हा ग्रंथ प्रसिद्ध केला, व त्यांत असलींच तत्त्वें गोंविलीं होतीं. "

या वर्षाच्या जून महिन्यांत आण्ड्र्यू कार्नेगी नामक प्रसिद्ध कोट्याधीशानें त्याला एक पहिल्या प्रतीचा पिआनो वाजा नजर केला; त्यासंबंधानें तो त्यास ता० २०जून१८९० रोजीं लिहितो:— "काल संध्याकाळीं मी आलों तेव्हां माझ्या खोलींत भिंतीला लागून सुंदर व मोठा पिआनो ठेविलेला पाहून मला आश्चर्य वाटलें, व मी गोंधळांतहि पडलों. कारण मी घरांतून निघालों तेव्हां तो तेथें नव्हता. कांहीं वेळ मी आश्चर्यांतच इतका गुंग झालों कीं, तो कोठून आला असेल ह्याबद्दल सुसंगत विचार माझ्या मनांत कांहींच येईना..... आतां, इतक्या सुंदर देणगीबद्दल मनःपूर्वक तुझे आभार मानण्यापलीकडे उघड मला कांहीं करतां येत नाहीं; ती देणगी नेहमीं माझ्या डोळ्यांपुढें राहिल्यामुळें सहज तुझी मला वरचेवर आठवण होणार आहे. संपत्तीचे उपयोग काय करावे ह्याबद्दलचीं तुझीं मतें मला नेहमींच पसंत पडलेलीं आहेत, पण तुझ्या मताप्रमाणें तूं वागल्यानें माझा स्वताचा फायदा होईल असें माझ्या मनांत कधींहि आलें नव्हतें. इतर सर्व विचार बाजूस ठेविले तरी, जो माणूस पुष्कळ द्रव्यसंचय करून त्याची मृत्युपत्रानें व्यवस्था करितो त्याला जें सुख होतें त्याच्या मानानें जिवंतपणीं तें द्रव्य वांटून दिल्यानें उच्च प्रतीचें कितीतरी समाधान वाटत असलें पाहिजे. ह्या सुखाचा इतक्या वारंवार व इतक्या मोठ्या प्रमाणावर आस्वाद घेण्याची तुला संधि सांपडते ह्याबद्दल तुला फार हेवा करण्यासारखें आहे. मी ऐकतों कीं उत्तम गाण्यांपैकीं कांहीं निवडक गाणींहि तूं लवकर पाठविणार आहेस; त्याबद्दलहि मी तुझे आभार मानितों."

१८९१ सालीं प्रो० टिंडालशीं त्याचा पुष्कळ पत्रव्यवहार झाला. तो हेझलमीर येथें 'हाइंड हेड हौस' नामक घरांत रहात असे. तेथें तो त्यास भेटावयास जाणार होता, पण तें फिसकटलें. त्यासंबंधानें त्यानें त्यास ता० २ फेब्रुवारी १८९१ रोजीं पुढील

पत्र लिहिलें:—" काल मीं हेझलमीर एथील स्टेशनमास्तरला असें लिहिलें कीं, ' एकाच्या गाडीला येऊन मी हाइंडहेड हौस एथें जाणार आहें, तर एक घोड्याची गाडी सांगून ठेव. ' पण तुला भेटण्यास घोड्याच्या गाडींतून चारदां, व आगगाडींतून दोनदां यावें जावें लागेल ह्या गोष्टीचा विचार करीत जेव्हां मी काल रात्रीं पडून राहिलों, तेव्हां मला अशी भीति उत्पन्न झाली कीं, ही मोहीम आपण केल्यास आपली प्रकृति पुनः बहुधा बरीच उलट खाईल. म्हणून आज सकाळीं ' गाडी नको ' म्हणून तार केली. आजारी पडून तुला पुनः हांतरूण धरावें लागलें आहे हें हर्स्टकडून मला कळलें, व त्याबद्दल फार वाईट वाटलें.........रोज एकच प्रकारचे पदार्थ खातां कामा नये इतकेंच नाहीं, तर ते तयार करण्यांतहि वैविध्य ठेविलें पाहिजे. "

ता० १ एप्रिल:—" सृष्टींतील कडे आणि प्रकृतिविषयक कडे ह्यांच्यांत फारच मोठा भेद आहे; आणि एकाद्याचें डोकें पहिल्या कड्यांवर स्थिर राहिलें तरी दुसऱ्यांवर तसेंच राहील असा नेम नाहीं (प्रो० टिंडाल आल्प्सपर्वताचे कडे चढून जाण्यांत फार पटाईत असे त्यास अनुलक्षून हें लिहिलेलें आहे). "

ता० २ एप्रिल:–" काल तिसऱ्या प्रहरीं हर्स्टनें तुझें कार्ड मला वाचावयास दिलें, आणि तुझी प्रकृति सुधारत आहे हें वाचून आह्मां दोघांसहि आनंद वाटला.....नंतर थोड्याच वेळानें, कांहीं अंशीं विनोदानें व कांहीं अंशीं गंभीरतेनें, कालच्या कार्डांतील सूचना मीं लिहिली. हें करण्याचें आज कित्येक दिवस माझ्या मनांत येत होतें, कारण माझी समजूत अशी झाली होती कीं तूं आपली प्रकृति बेताबाहेर धोक्यांत घालीत आहेस. "

ता० ४ जुलई रोजीं तो त्यास प्यूसी एथून लिहितो:—" दरवाजाबाहेर पडण्याइतकी तुझी प्रकृति सुधारली आहे, आणि मी

जसा उन्हाच्या दिवसाचा उपभोग घेत आहें तसा तूंहि घेत आहेस, अशी मी आशा करितों. एथें मी उघड्यावर बसलों असून वर लार्क पक्षी गात आहे, उन्हाचा ज्यास्त ताप होऊं नये म्हणून मीं छत्री उघडून धरिली आहे; आणि एक तरुण स्त्री लेखकाचें काम करीत आहे."

ता० १ सपटंबर रोजीं लंदनास परत जातांना, 'तुला भेटावयास येतों' म्हणून त्यानें टिंडाल यास लिहिलें, आणि त्याप्रमाणें तो त्यास हाइंडहेड एथें भेटावयास गेला. त्याच्या वरील पत्रांवरून त्याला स्वताच्या प्रकृतीबद्दल जशी काळजी वाटत असे, तशीच त्याच्या मित्रांच्याहि प्रकृतीबद्दल वाटे हें स्पष्ट दिसतें.

ता० ७ आक्टोबर १८९१ रोजीं तो रॉबर्ट बुचानन या कवीस लिहितो:—"तुझें 'औटकास्ट' हें काव्य मीं कालच संपविलें. अथपासून इतिपर्यंत मी फारच थोडीं पुस्तकें वाचितों, यावरून तुझें काव्य मला फार आवडलें असें अनुमान त्वां करावें. त्याचे पुष्कळ भाग फार सुंदर, व दुसरे पुष्कळ जोरदार आहेत, आणि एकंदरींत तुझ्या भाषावैविध्याची व अर्थप्राचुर्याची मी फार वाखाणणी करितों. तूं त्यांतील गोष्ट विविध बाजूंनीं व विविधस्वरूपीं मांडिली आहेस, हा त्याचा विशेष मला फार आवडतो. एक गोष्ट केली पाहिजे म्हणून मी प्रतिपादित असतों, ती तूं करतास तर बरें झालें असतें. ती ही कीं, प्रतिपाद्य विषय व मनोविकार जसा बदलत जाईल, तशी भाषासरणीहि बदलली पाहिजे, म्हणून तालबद्ध गद्यापासून तों अत्यन्त रसपूर्ण वीणाकाव्यापर्यंत ती चढत गेली पाहिजे. लांब काव्यें मला बहुधा कंटाळवाणीं भासतात, आणि हा कंटाळवाणेपणा एकच भाषासरणी आणि एकच वृत्त योजिल्यामुळें उत्पन्न होत असतो. तुझ्या प्रस्तुत काव्यांत भाषासरणीवैचित्र्य बरेंच आहे, पण वृत्तवैचित्र्य ज्यास्त पाहिजे होतें. कलेच्या दृष्टीनें देखील पाहतां, मी असें म्ह-

णतों कीं, (तुझ्या काव्यांमध्यें) पुनःपुनः तेंच तेंच सांगण्याकडे फार प्रवृत्ति दिसते, आणि विशेषतः वर्णनात्मक काव्यांमध्यें फारच दिसते. मला वाटतें, त्वां आपल्या विपुलोत्पादक कल्पनाशक्तीचा लगाम जरा ज्यास्त खेंचला पाहिजे........हल्लींच्या काळावर विनोदात्मक काव्य त्वां लिहावें असें माझ्या मनांत आहे. हल्लीं पुष्कळ गोष्टी सणसणीत निषेध करण्यासारख्या व अत्यन्त क्रुद्ध होण्यासारख्या होत आहेत, आणि हल्लींच्या ह्या स्थितीचें विवेचन करण्यास, मला वाटतें, तूं योग्य आहेस. विशेषेंकरून आमच्या धर्माधिकाऱ्यांच्या भिकार दंभाचा चांगल्या जोरानें कोणीं तरी योग्य माणसानें निषेध करावा, असें माझ्या मनांत येतें; कारण हे लोक ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वांचें आपण पालन करितों असें एकीकडे ढोंग करीत असून, बाह्य देशीं सारखे घाणेरडे प्रकार स्वतः करीत असतात, व उत्तेजीत असतात. ह्या सगळ्या कृतीला " पश्चात्ताप न पावणारा चोर " असें नांव देणें योग्य होईल, आणि हें त्यांच्या त्वां पदरांत घालावें अशी माझी इच्छा आहे. आमच्या राजकीय जीवितांत देखील, चांगला चाबूक ओढण्यासारख्या किती तरी गोष्टी होत आहेत. उदाहरणार्थ, निरनिराळ्या पक्षांच्या भांडणांत नीतीकडे लोक अगदीं दुर्लक्ष करितात, आणि आपल्या कृतीनें काय अनर्थ ओढवतील ह्याबद्दल पर्वा न करतां, राजकीय व सामाजिक पदवी प्राप्त व्हावी म्हणून आपल्या दृढ समजुतींस एकीकडे गुंडाळून ठेवितात. त्वां ह्या गोष्टीचा विचार करावा अशी माझी इच्छा आहे. "

ह्यापूर्वीं कांहीं दिवस बुचाननें ' न्यायतत्त्वें ' ह्या ग्रंथावर लिहिलेला अभिप्राय वाचून त्यानें त्यास असें लिहिलें होतें:—" ख्रिस्ती लोकांच्या दंभाचा निषेध करण्यास तूं ह्या प्रसंगाचा फायदा घेतलास ह्याबद्दल मला आनंद वाटतो; कारण हे लोक आपल्या धर्मा-

च्या तत्त्वांनुसार आपण वागतों अशी सारखी वल्गना करीत असतात, आणि जगाच्या सर्व भागांत रोज तीं तत्त्वें पायाखालीं तुडवीत असतात. ह्या लोकांपुढें असा आरसा धरण्याची, आणि जे आपणास ख्रिस्ती म्हणवितात ते नीतिदृष्ट्या अधर्मी आहेत असें दाखविण्याची प्रत्येक संधि तूं साधिशील (आणि असे प्रसंग पुष्कळ येतात) अशी मी आशा करितों. "

१८८९ च्या अखेरीस ऑबेरॉन हर्बर्टनें जेव्हां त्यास 'सोश्यल स्टॅटिक्स' ह्या ग्रंथाची नवी आवृत्ति काढण्याचें सुचविलें तेव्हां त्यानें त्यास असें कळविलें होतें कीं, त्या ग्रंथाचा जो पद्धतशीर भाग आहे त्याचें सुधारलेलें व पूर्ण प्रगल्भ असें विवरण 'न्यायतत्त्वें' ह्या ग्रंथांत येणार आहे. त्या पुस्तकाच्या बाकीच्या भागाबद्दल त्यानें अशी योजना केली कीं, त्यांतील जो भाग राखण्यासारखा असेल तो, व " नागरिक व सरकार " हें चोपडें हीं दोन एकत्र प्रसिद्ध करावयाचीं. त्याप्रमाणें, 'न्यायतत्त्वें' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्याबरोबर हा जोड-ग्रंथ छापण्याची त्यानें तजवीज केली.

त्याचें मूलवय व तारुण्य ह्यांशीं त्यास जोडणारी एकच कडी आतां राहिली होती; ती त्याची चुलती आना ही होय. तिला त्यानें आगस्टमध्यें लिहितांना, आपला मित्र रिचर्ड पॉटर अत्यन्त अशक्त झाला असल्याचें कळविलें, आणि अर्ध्या शतकाहून अधिक वर्षांचा स्नेह लवकरच तुटणार ह्याबद्दल त्यानें दुःख प्रदर्शित केलें. हा स्नेह वास्तविक प्रेम आणि परस्परांबद्दल मान्यताबुद्धि ह्यांवरून कायम राहिलेला असून मतसादृश्यावर अवलंबून नव्हता. कारण पॉटरला तात्त्विक विचारांची मुळींच अभिरुचि नव्हती, आणि स्पेन्सरचीं धर्मविषयक मतें त्यास मुळींच मान्य नव्हती. पॉटरसाहेब ता० १ जानेवारी १८९२ रोजीं निवर्तला.

१८९१ अखेर (ता० २८ दिसेंबर) लहानपणच्या आठव-

णींचें त्याची चुलती (टॉमस स्पेन्सरची बायको) आन हीस त्यानें असें पत्र लिहिलें:—" मिसेस जोस हिच्या पत्रावरून नाताळच्या दिवशीं मला अशी एक गोष्ट सुचली कीं, ती ऐकणें तुला कदाचित् आवडेल. गेल्या उन्हाळ्यांत आण्ड्र्यू कार्नेगीनें एक फार सुंदर पियानो बाजा मला नजर केला होता; आणि माझें तुजबद्दलचें स्मरण पुनः जिवंत करण्यासाठीं मीं त्याचा उपयोग कसा केला हें तुझ्या बहुधा लक्ष्यांत यावयाचें नाहीं. विवाहोत्तर प्रवासामध्यें जेव्हां तूं डार्बीस आलीस, आणि जेव्हां मी कदाचित् नऊ किंवा दहा वर्षांचा होतों, तेव्हां जॉन काकाकडे एका सायंकाळीं मी गेलों असतां तूं पियानोवर बीट होवेनचें एक गाणें वाजविलें होतेंस. तें गाणें माझ्या लक्ष्यांत तेव्हांपासून सारखें राहिलेलें आहे, आणि तें मला नेहमीं फार आवडलेलें आहे. म्हणून नाताळच्या दिवशीं तुझें अगदीं पहिलें स्मरण म्हणून तें मिस् बेकरकडून मीं वाजवून घेतलें. त्यावरून स्काटच्या वेव्हर्ली नामक कादंबरीचें " त्यास साठ वर्षें झालीं " हें जें दुसरें नांव त्याची मला आठवण झाली. तेव्हांपासून किती तरी गोष्टी होऊन गेल्या आहेत, आणि त्यांची आठवण करूं लागल्यास ती कशी अगदीं शून्य झाल्यासारखी दिसते !"

प्रकरण एकविसावें

समाजोत्क्रान्तींत परोपकाराचा प्रभाव

" नीतितत्त्वें " ह्या ग्रंथाचे निरनिराळे भाग क्रमानें प्रसिद्ध झाले नाहींत. त्यांतील " आधारस्तंभ " हा भाग १८७९ त त्यानें प्र-

सिद्ध केला होता, आणि त्यास कारण तो क्रमानें तयार करूं म्हट-ल्यास आधींच कदाचित् आपली प्रकृति बिघडेल अशी त्यास भीति वाटत होती हें झालें होतें. नंतर दहा वर्षांनीं 'समाजशास्त्र' बाजूस ठेवून त्यानें "न्याय" हा भाग हातीं घेतला. ह्या विषयांवरील लोकमत किती अपक्क व भलतेंच आहे हें दाखविण्यास त्या दहा वर्षांत पुष्कळ गोष्टी झाल्या होत्या. शिवाय, "सोश्यल स्टॅटिक्स"मध्यें प्रदर्शित केलेलीं त्याचीं कांहीं मतें बदललीं होतीं, व तो बदल या ग्रंथांत दर्शविणें सोयीचें होतें. म्हणून त्यानें तो १८९१ त प्रसिद्ध केला; आणि नंतर बाकीचे भाग हातीं घेतले. तदनुसार "नीतिशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त" आणि "आत्मनीतीचीं तत्त्वें" हे भाग जून १८९२ मध्यें त्यानें प्रसिद्ध केले, आणि "निवृत्त्यात्मक परोपकार" व "प्रवृत्त्यात्मक परोपकार" हे पुढच्या वर्षीं त्याच सुमारास काढिले.

हा समग्र ग्रंथ पूर्ण झाला तेव्हां त्यांतील व त्याच्या इतर ग्रंथांतील सूत्रवत् वाक्यें जूलिआ जिंजेल नांवाच्या एका बाईनें निवडून काढिलीं, व 'सूत्रें' म्हणून छापिली. ही कृति त्यास फार आवडली.

त्याच्याशीं घरगुती कामासंबंधानें किंवा व्यवहारासंबंधानें ज्यांचा संबंध येईल, त्यांनीं त्याच्या जीवितक्रमाविषयींच्या गोष्टी त्यास न विचारतां प्रसिद्ध केल्यास त्यास तो विश्वासभंग म्हणून वाटत असे, हें त्याचा पूर्वींचा एक सेक्रेटरी हडसन यास त्यानें ता० २७ मे १८९२ रोजीं लिहिलेल्या पत्राच्या पहिल्या प्याऱ्यावरून दिसून येतें. तें पत्र असें:—"कांहीं दिवसांपूर्वीं 'आरीना' मासिकांतील तुझ्या लेखाचे उतारे जेव्हां "रिव्ह्यू ऑव्ह रिव्ह्यूज" या मासिकांत मीं पाहिले, तेव्हां ही गोष्ट मला पसंत नाहीं असें तुला लिहिण्याचें माझ्या मनांत आलें होतें; आणि तुला मी आपलें असें

मत प्रदर्शित करणार होतों कीं, माझ्या चरितांतील ह्या गोष्टी माझ्या संमतीशिवाय त्वां प्रसिद्ध करावयास नको होत्या. पण मीं तसें लिहिलें नाहीं. आणि आतां, इथाका एथें तूं दिलेल्या व्याख्यानाची हकीकत " पॉप्युलर सायन्स मंथली " ह्या मासिकांत वाचून तुला उलट दिशेनें लिहिण्याकडे माझ्या मनाचा कल होतो; कारण मला असें वाटतें कीं, पूर्वीं जें मी नापसंतीच्या रूपानें लिहिणार होतों तें आतां मला जें पसंतीच्या रूपानें म्हणावयाचें आहे त्यानें बुजून गेलें आहे.....संघटनात्मक मीमांसेचें स्वरूप व संबंध तुझ्या लक्ष्यांत इतके पूर्ण आलेले आहेत हें वरील तुझा लेख वाचीपर्यंत मला माहीत नव्हतें. उत्क्रान्तिमताचा उद्गम व वाढ इतक्या स्पष्ट रीतीनें मांडून, आणि डार्विनशीं माझा संबंध काय आहे ह्याबद्दलच्या चुकीच्या समजुती शक्य तितक्या रीतीनें दुरुस्त करून, तूं खरोखरच माझी चांगली कामगिरी बजाविली आहेस. "

१८९२ च्या प्रारंभीं नेमस्त पक्षानें, लंदन कौंटी कौन्सिल या स्थानिक सभेचा सभासद होण्यास उमेदवार म्हणून पुढें येण्यास त्यास विनंति केली, आणि त्या सभेच्या बैठकीस नियमानें हजर राहण्याचें वचन आह्मी तुजजवळ मागणार नाहीं असें त्यास सांगितलें. पण आपलें काम व आपली प्रकृति हीं लक्ष्यांत घेतां आपल्याला उमेदवार होतां येत नाहीं, असें त्यानें त्यांस कळविलें. तो म्हणाला कीं, " एकाद्या वादविवादांत भाषण न करतां तो पुरा होईपर्यंत सभेंत मी बसलों तरी तेवढ्यानें एक महिना मी दुखणाईत पडेन. "

देशाच्या ज्या भागांतून आगगाडीचा रस्ता जाईल तेथील रहिवाशांना तिचा त्रास होणार नाहीं अशी खबरदारी घेतल्याविना सरकारानें तिजबद्दलची परवानगी कंपनीस देण्याविरुद्ध तो असे.

असल्याच एका रस्त्यासंबंधानें ता० १ जून १८९२ रोजीं तो लार्ड वेमिसला लिहितोः—" 'सेंट जॉन्स वुड' मधून ही जी नवी आगगाडी व्हावयाची आहे तिच्या संबंधाच्या महत्त्वाच्या गोष्टी लिहून काढण्याचें मीं ठरविलें आहे. आज एक पिढी राज्यांतील प्रत्येक मोठ्या शहराचें रेलवेकंपन्यांनीं जें भयंकर नुकसान केलें आहे, तें मूढ इंग्लिश लोकांनीं मुकाट्यानें सहन केलें आहे; तें नुकसान आगगाड्यांच्या शिट्यांनीं किंचाळून रात्रंदिवस जो शांतताभंग केला आहे तो होय. इंग्लिश लोकांची बुद्धि बैलाच्या बुद्धीसारखी मंद असल्यामुळें त्यांनीं मुकाट्यानें असें गृहीत केल्यासारखें दिसतें कीं, रेलवे कंपन्या, आणि खाजगी कारखानदार देखील यांना हवा तितका गोंगाट हवे तितके वेळां आणि हवा त्या वेळीं करण्याचा हक्क आहे. लाखों लोकांच्या हक्कांवर हे जे रोजचे हल्ले चाललेले आहेत,—ज्यांपासून कांहींकांचें भयंकर नुकसान होतें आणि त्रास तर सर्वांसच होतो—ते एकदम बंद केले पाहिजेत, मग त्यामुळें त्या कंपन्यांची मोठी गैरसोय होवो किंवा नुकसान होवो. पण खरोखर त्यांची गैरसोय किंवा नुकसान होण्याचें कारण नाहीं. हा भयंकर त्रास अगदीं विनाकारण आहे, इतकेंच नव्हे, शिटच्या फुंकण्याच्या ऐवजीं सिग्नल हालवून ही गोष्ट ज्यास्त चांगल्या रीतीनें व बहुतेक मुळींच त्रास न होतां, करतां येण्यासारखी आहे."

लॉर्ड वेमिसनें पट्टी देणाऱ्या लोकांच्या संरक्षक मंडळाच्या वार्षिक सभेचें अध्यक्षस्थान पत्करण्याबद्दल केलेल्या विनंतीस 'नाहीं' म्हणून म्हणतांना तो त्यास पुनः लिहितोः—" पट्टया देणारांना चळवळ करावीशी वाटूं लागेपर्यंत, सोश्यालिस्ट पंथाकडे (लोकमताचा) जो ज्यास्त ज्यास्त कल होत चालला आहे त्याला आळाबंदा घालण्यास बहुतेक कांहींच करतां येणार नाहीं, हें जें तुझें मत तें मला अगदीं कबूल आहे. पण दुर्दैवानें इंग्लिश लोक, आणि मुख्यत्वें-

करून मध्यमवर्गांतील इंग्लिश लोक, इतके मूढ आहेत कीं, त्यांना सामान्य सिद्धान्त काढतां येत नाहींत. त्यांच्या हिताहिताशीं संबंध असलेल्या विशेष गोष्टीनें ते कदाचित् हालचाल करण्यास तयार होतील, पण त्यांना एखाद्या सामान्य धोरणानें जा म्हणून सांगितल्यास तें त्यांच्यानें सारखें व्हावयाचें नाहीं. कारण त्यांच्या दुबळ्या कल्पनाशक्तींत तसें करण्याचे फायदे शिरूं शकत नाहींत. "

प्रथम व्यक्तींविरुद्ध आणि अखेरीस समाजाविरुद्ध ज्यांचा उपयोग करतां येईल असे अधिकार विशिष्ट लोकांच्या मंडळाच्या हातांत देण्याच्या तो अगदीं विरुद्ध असे, ही गोष्ट बझर्ड नामक एका साहेबास लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसून येते. दायांचें मंडळ बनविण्याबद्दल सनद मागण्याकरितां पार्लमेंताकडे अर्ज होत होता त्यावर त्या साहेबानें ह्याची सही मागितली होती. स्पेन्सरचें पत्र ता० १९ मार्च १८९२ चें असून असें आहे:—" तुझ्या विनंतीला मान देतां येत नाहीं ह्याबद्दल मला फार वाईट वाटतें, पण माझ्या चांगल्या बनलेल्या मतांविरुद्ध गेल्या खेरीज मला तसें करतां येत नाहीं. हल्लीं (तुम्हीं) मनांत आणिलेली (दायांचें मंडळ बनविण्याची) योजना जेथें संपावी म्हणून (तुमचा) उद्देश आहे तेथेंच जर संपली, तर तिला मी प्रत्यवाय घेणार नाहीं, पण मला पक्की खात्री वाटते कीं, तेथें ती संपणार नाहीं, तर आणखी संघटना व प्रतिबंध ह्यांचा ती ओनामा बनेल; आणि शेवटीं असा कायदा उत्पन्न होईल कीं, सर्टिफिकिटाशिवाय कोणत्याहि पैसे घेऊन काम करणाऱ्या दाईनें आपला धंदा करतां कामा नये; आणि व्यक्तिस्वातंत्र्यावरील ह्या बंधनाच्या मी जोरानें विरुद्ध आहें. मी आज पुष्कळ वर्षें पाहात आहें कीं, कांहीं फेरबदल (सरकारानें) करावे, व लोकांना वाटावें कीं ते उद्दिष्ट ठिकाणीं थांबतील, पण त्या फेरबदलांमुळें त्यांच्याहून ज्यास्त मोठ्या फेरबद-

लांची उत्पत्ति व्हावी.....दाईला सर्टिफिकेट द्यावयास लाविल्यानें तिला आपल्या धंद्याच्या विशिष्ट ज्ञानाची माहिती आहे एवढेंच काय तें दिसून येईल. त्यावरून ती रोग्यांशीं सहानुभूति दाखवील किंवा नाहीं, आणि त्याच्याकडे सारखें लक्ष्य ठेवील किंवा नाहीं, ह्याबद्दल कांहीं दिसून येणार नाहीं.....हल्लीं सर्वांना (परीक्षारूप) सारख्या चरकांतून काढण्याचें वेड सर्वत्र पसरलें आहे, व तें अत्यन्त अनर्थावह आहे असें मला वाटतें. सारखेपणानें मरण उत्पन्न होतें, आणि वैविध्यानें जीव उत्पन्न होतो; म्हणून सारखेपणा उत्पन्न करण्याबद्दलच्या सर्व चळवळींना मी विरोध करीत असतों. ”

‘ होमरूल ’ किंवा स्वराज्य मिळेपर्यंत पार्लमेंताच्या कामास अडथळा आणण्याचें जें धोरण आयरिश सभासदांनीं स्वीकारिलेलें होतें त्याच्याच विरुद्ध तो होता असें नाहीं, तर आयर्लंदास स्वराज्यदानाच्याहि तो विरुद्ध होता. उदाहरणार्थ, ता० २७ मे १८९२ रोजीं तो लार्ड डिसार्ट यास लिहितो:—“ तूं आयरिश स्वराज्यवादी झाला आहेस हें वर्तमानपत्रांतून वाचून मला वाईट वाटतें. मी लहान होतों तेव्हां, स्वराज्य सर्वच लोकांना चागलें होय, असें माझें निःसंशय मत होतें, पण निरनिराळ्या पायऱ्यांवर असलेल्या समाजांसंबंधानें माहिती मिळविण्यांत मीं आपलें आयुष्य खर्च केलें असल्यामुळें माझ्या मनांत अगदीं निश्चित बदल झाला आहे. संस्था वाईट किंवा चांगल्या ठरणें हें त्या त्या संस्थांखालीं राहणाऱ्या लोकांच्या स्वभावावर अवलंबून असतें. ”

ता० ३ जून—“(आयरिश स्वराज्यविषयक) राजकीय प्रश्न, त्याच्यावर कांहीं न लिहितां, तसाच ठेवणें मला भाग आहे, पण शिकागो एथें न्यायदान कसें होतें ह्याबद्दलच्या एका अमेरिकन लेखांतून नुक्तेच घेतलेले कांहीं उतारे मी तुजकडे सोबत पाठवीत आहें; त्यावरून जेथें राजकीय व्यवस्थांना योग्य असें लोकांचें शील

नसेल, तेथें त्यांची किंमत फार अल्प असते ह्या पूर्वी दाखविलेल्या सत्याचें उदाहरण तुझ्या लक्ष्यांत येईल. ”

१८६९ त ‘ राजकीय वस्तुपूजा ’ या नांवाचा एक लेख त्यानें लिहिल्यापासून एक बेत त्यानें केलेला होता. तो हा कीं, आजपावेतों पार्लमेंतानें जे कायदे पसार केले आहेत ते सर्व अशा रीतीनें एकत्र करावयाचे कीं, ते केव्हां व कशाकरितां पास केले होते, कोणत्या वाईट गोष्टी त्यांच्या योगानें निवारावयाच्या होत्या, त्या निवारण्याकरितां त्यांच्यांत काय कलमें घातलीं होतीं, त्यांचे काय परिणाम झाले, आणि ते रद्द करण्यास काय कारणें दाखविलीं, ह्या सर्व गोष्टी दिसून याव्या; कारण त्याचें असें मत होतें कीं, असल्या सविस्तर जंत्रीपासून फारच मोठा फायदा होईल. वडस्वर्थ डानिस्थोर्प नांवाच्या गृहस्थानें या दिशेनें एक यत्न केला होता, पण ती गोष्ट समाधानकारक रीतीनें पुरी होण्यास कोणीं तरी खर्च पुरवावयास पुढें येणें जरूर होतें. ह्या कामीं त्याला जरूर ती द्रव्याची मदत मिळेल म्हणून स्पेन्सरला आशा होती; पण ती निष्फळ झाल्यामुळें तो बेत फिसकटला. तथापि तो सोडून देण्यास तो किती नाखुश होता हें त्या गृहस्थास त्यानें पाठविलेल्या पुढील पत्रांवरून दिसून येतें. ता० ३० मे १८९२:—“ हीं नमुन्याचीं पानें तांबड्या शाईनें तूं केलेल्या दुरुस्त्यांसहित व पुरवण्यांसहित पुनः त्वां लिहून काढावीं अशी माझी इच्छा आहे. ह्या दुरुस्त्या करण्याला जो ज्यास्त खर्च येईल तो सोसण्यास मी अगदीं तयार आहें, कारण त्या कोष्टकांचा पुरा केलेला नमुना आपल्याजवळ असावा अशी माझी फार इच्छा आहे. तो पुरा झाला म्हणजे आणखी एक महत्वाची गोष्ट मला त्यांत घालावयाची आहे; पण ती मीं तुला पूर्वी सांगितली आहे असें मला वाटत नाहीं; ती विषयसूचि ही होय; तीं अशा रीतीनें तयार करावयाची कीं, कोणत्याहि विशिष्ट विष-

यांवरील पार्लमेंताचे कायदे त्या त्या भागाखालीं, पोटभागाखालीं, व पोटपोटभागाखालीं सहज सांपडावे. मला काय पाहिजे आहे तें सोबत पाठविलेल्या रेखाटणीवरून तुला दिसून येईल."

ता० १७ जूनः—" कोष्टकाच्या पहिल्या प्रुफाबद्दल मी तुझे आभार मानितों. मला वाटतें, फर्मा मोडण्यापूर्वीं कांहीं जादा प्रुफें त्वां घेऊन ठेवणें बरें..... अजूनहि (ती जंत्री छापण्याची) कांहीं तरी तजवीज कदाचित् करतां येईल या आशेनें हें मी सुचवितों. ही गोष्ट उघड उघड इतकी महत्त्वाची आहे, व ती इतकी बोधप्रद व उपयुक्त होईल कीं, तिची आस्था असलेल्या लोकांपुढें जर ती योग्य रीतीनें मांडिली, तर जरूर ती रक्कम जमवतां येईल..... ह्या अखेरच्या प्रतींपैकीं एक कार्नेगीकडे पाठविणें गैर होणार नाहीं; मात्र तिजबरोबर जादा कोष्टकें, आणि सूचिपत्राचा उपयोग कसा करावयाचा ह्याबद्दलचें कांहीं स्पष्टीकरण, हीं त्यास पाठवावीं. माझी अशी इच्छा आहे कीं, ही गोष्ट तूं सूचनेवरून करीत आहेस, आणि ती मला अत्यन्त महत्त्वाची वाटते, असें त्वां लार्ड वेमिस व अर्ल पेम्ब्रोक यांस बोलावें. मेहरबानी करून छापखान्याचें बिल पाठीव."

पूर्वींप्रमाणें या वर्षीं त्यानें मिनर्टहेजन नांवाच्या बाईचीं मुलें कांहीं दिवस आपल्याकडे आणिलीं होतीं तीं परत पाठविल्यावर ता० २० आगस्ट १८९२ रोजीं तो तीस लिहितोः—" तुझें पत्र पाहून आणि तुम्हां सर्वांना मुलें फार सुधारलेलीं दिसलीं हें वाचून, मला आनंद झाला. एथें तीं असतांना आह्मां सर्वांना तीं सुधारलेलींच दिसलीं. त्यांच्या कपड्यासंबंधानें मी एक सूचना करूं काय ?.... सर्व अंगावर सारखे कपडे न घातल्यानें शरीराच्या भिन्न भिन्न भागीं भिन्न भिन्न रीतीनें रुधिराभिसरण होऊन फारच नुकसान होत असतें. याचें कारण अगदीं

उघड आहे. हृत्कमल आणि रक्तवाहिन्या यांचें जाळें ही एक बंद केलेली पोकळी असून तिच्या भिंती रबरासारख्या दाबल्या-पसरल्या जाणाऱ्या आहेत म्हणून या पोकळीच्या एकाद्या भागाच्या भिंती जर आंवळल्या गेल्या, तर त्यांतील रक्तास कोठें तरी जाणें भाग पडतें, आणि म्हणून तें त्या पोकळीच्या दुसऱ्या कोणत्या तरी भागांत जोरानें जातें. ही आंवळ जर मोठी असून मोठ्या भागांवर पसरलेली असेल, तर तिजमुळें न आंवळलेल्या रुधिरवाहिन्यांवर (रक्ताचा) दाब मोठा पडतो; आणि त्यांपैकीं एकादी जर दुबळी असेल तर ती प्रसरण पावते, आणि त्यामुळें त्या ठिकाणीं रक्त सांठतें. थंडी आणि त्यामुळें उत्पन्न झालेली आंवळ हीं जर पुष्कळ काळ सुरू राहिलीं, तर ह्या रक्त सांठण्यानें मोठें नुकसान होतें, कांहीं उदाहरणांत अत्यन्त नुकसान होतें. सामन मासे धरण्याकरितां जे पाण्यांतून जातात ते जर अत्यन्त बळकट नसले, तर त्यांच्यावर त्याचा जो परिणाम होतो त्यावरून हें दिसून येतें. हा परिणाम मीं स्वतः अनुभविला आहे, कारण तेणेंकरून माझ्या मेंदूंत ज्यास्त रक्तसंचय होतो.....माझा मित्र प्रो० सेलर याला माझ्यासारखीच डोक्याची व्यथा असल्यामुळें त्यानेंहि मासे धरतांना पाण्यांतून चालण्याचें सोडून दिलें आहे, कारण त्याच्या योगानें त्याच्या छातींत एकदम धडधडूं लागे.....ह्या दाबानें शरीराच्या अंतरिंद्रियांतील रुधिरवाहिन्या फाजील ताणल्या जातात, आणि त्यांतील कांहीं वाहिन्या इतरांहून ज्यास्त दुर्बल असल्यास, त्यांचे व्यापार कमज्यास्त प्रमाणानें अनियमित बनतात. ह्यामुळें एका प्रकारच्या उदाहरणांत—आणि अत्यन्त सामान्य उदाहरणांत—श्वासोच्छ्वास करणाऱ्या नळ्यांच्या पापुद्र्यांचें प्रसरीभवन होतें, आणि त्यामुळें पडसें व कफ ह्यांची उत्पत्ति होते; पण इतर प्रकारच्या उदाहरणांत पोषक नलिकेंत हें फाजील प्रसरण उत्पन्न होतें, आणि त्यामुळें आंत-

ड्याच्या संबंधाचा कांहीं बिघाड उत्पन्न होतो.....अंगावर कपडे घालतांना ही गोष्ट ध्यानांत ठेवावयाची कीं, शरीराच्या सर्व भागांना सारखी ऊब मिळावी..... माझ्या ह्या लांब व्याख्यानावर मला माफी कर, पण जेथें जेथें, मला जें अनर्थावह म्हणून वाटतें, तें दिसेल तेथें तेथें तें दुरुस्त करण्याचा यत्न करण्याचें मला टाळवत नाहीं. "

जपानमध्यें जे फेरफार चालले होते, त्यांच्यासंबंधानें, इंग्लंदांत राहणारे किंवा इंग्लंद पहावयास आलेले तेथील मुत्सद्दी, त्याचा सल्ला घेत असत. पौर्वात्य सुधारणा व पाश्चात्त्य सुधारणा एकत्र केल्या असतां त्यामुळें धोके उत्पन्न होण्याचा संभव आहे अशी त्यास शंका वाटत असे. ज्या लोकांना राजांच्या स्वैच्छिक सत्तेची संवय लागलेली आहे, त्यांना एकदम लोकनियंत्रित राजकीय सत्ता देणें धोक्याचें आहे असें त्यास वाटे. शिवाय परराष्ट्रांना जपानच्या कारभारांत हात घालूं देणें त्याला पसंत नसे. ह्या वेळीं जपाननें अर्थात् रशियावर जय मिळविलेला नव्हता. म्हणून त्याला अशी भीति वाटत होती कीं, चीननें तह वगैरे करून आपल्या देशांत परकीयांना जसा पाय ठेवण्यास आधार दिला आहे, तसा जपान देईल, व त्यामुळें जपानचें नुकसान होईल.

या गोष्टींच्या संबंधानें तो केन्टारो क्यानेको ह्या जपानी मुत्सद्यास ता० २१ आगस्ट १८९२ रोजीं लिहितोः—" इंग्लंदांतील तेव्हांचा जपानी वकील मोरी यानें जपानकरितां तयार केलेल्या राज्यपद्धतीचा मसुदा जेव्हां मला दाखविला, तेव्हां मीं त्यास फार सावधगिरीचा सल्ला दिला. तो ह्या मुद्यावर कीं, जपानी लोकांस आजवर स्वेच्छाचारी अमलाची संवय असल्यामुळें त्यांस लोकनियत राज्यपद्धतीची संवय एकदम लागणें शक्य नाहीं. मला वाटतें माझ्या उपदेशाकडे (तुमच्या मुत्सद्यांनीं) योग्य लक्ष दिलें नाहीं; आणि जपानांतील सद्यःस्थितीबद्दल ज्या हकीकती माझ्या कानीं

येतात त्यांवरून पाहतां, एकदम मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य उपभोगावयास लागल्याचे परिणाम हल्लीं तुमच्या अनुभवास येत आहेत.

ता० २३ आगस्टः—" गेल्या रविवारीं तुला लिहिल्यानंतर मला पुनः असें सुचलें कीं, तुमच्या जपानी काराभाराबद्दल, व तुमची राज्यपद्धति बरोबर न वठवल्याबद्दल, जें मीं म्हटलें होतें, त्याला अनुलक्षून सावधगिरीची नीति तुम्हीं गिरवावीशी मला वाटते, त्यासंबंधानें निश्चितरूपानें तुला लिहावें. मोरीला मीं अशी सल्ला दिली होती कीं, योजिलेल्या नव्या संस्थांचें कलम (एका झाडावर दुसऱ्या झाडाचें करितात त्याप्रमाणें) होईल तितकें जुन्या संस्थांवर करावें; असें कीं, तेणेंकरून जुनें सूत तुटूं नये; म्हणजे, जुन्या संस्था अजीबाद मोडून त्याच्याऐवजीं नव्या संस्था तुम्हीं स्थापूं नये, तर जुन्या संस्थांमध्यें हळू हळू ज्यास्त ज्यास्त फेरबदल करीत जावें. हें कशा रीतीनें करावें हें सुचविण्याइतकें मीं त्या गोष्टीचें विवेचन त्या वेळीं केलें नव्हतें, पण तें करण्याचा फार सुलभ मार्ग आहे असें आतां माझ्या लक्ष्यांत येतें. मी समजतों कीं, तुमच्या जपानांत कौटुंबिक संघटनेची जुनी सरणी अद्यापि जिवंत आहे..... कौटुंबिक किंवा पितृशासनरूप संघटनेखालीं बहुधा असें घडत असतें कीं, प्रत्येक समूहांत सर्वांत वडील असा एक कौटुंबिक पुरुष असतो, व तो त्या समूहाचा शास्ता अधिकारी असतो. या अधिकाऱ्याच्या हातीं पुष्कळ ठिकाणीं स्वेच्छाचारी सत्ता असून ती पहिल्या व दुसऱ्या पिढीचे सर्व वंशज (मुलगे व नातू) कांकूं न करतां मानीत असतात. तुमच्या नव्या राजकीय संस्था बनविण्यांत या संघटनेचा उपयोग तुम्हीं करावा. तुमच्या प्रतिनिधिसभेचे सभासद निवडण्याचा अधिकार या पितृशास्त्याकडे किंवा समूहमुख्यांकडे तेवढाच असावा. ....यापासून कित्येक फायदेशीर परिणाम उत्पन्न होतील. पहिला

हा कीं, तुमचीं (पार्लमेंताचे सभासद) निवडणारीं मंडळें संख्येनें पुष्कळ कमी होतील, आणि त्यामुळें त्यांची व्यवस्था ज्यास्त चांगली ठेवतां येईल. दुसरा हा कीं, प्रत्येक समूहाच्या घटकांचीं जीं अनेक जहाल मतें असतील त्यांचा बऱ्याच अंशीं एकमेकांशीं संक्षेप जाईल, आणि तीं मतें पितृशास्त्याच्या द्वारा व्यक्त व्हावयाचीं असल्यामुळें बऱ्याच अंशीं नेमस्त बनतील, आणि त्या पितृशास्त्यावर त्याच्या वंशजांच्या मतांचें कांहीं तरी वजन पडेल. तिसरा व मुख्य फायदा हा कीं, हे पितृशास्तेरूपी मतदार सगळे वृद्धमाणूस असल्यामुळें, त्यांच्या समूहांतील त्यांच्यापेक्षां वयानें लहान असणाऱ्या घटकांपेक्षां त्यांचा कल आहे तें राखण्याकडे ज्यास्त असेल, म्हणजे, अविचारी फेरबदलांना ते अनुकूल नसतील. जपानी लोकांना स्वतंत्र संस्थांची मुळींच संवय नसल्यामुळें त्या निःसंशय चांगल्या चालावयाच्या नाहींत; आणि त्यांना तुम्हीं हळूहळू योग्य बनलें पाहिजे हें जें तत्त्व मीं प्रतिपादिलें आहे त्याला अनुसरून मी असें सुचवितों कीं; तीन किंवा चार पिढ्यांपर्यंत समूहाच्या ह्या पितृशास्तेरूपी मुख्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या सभेला आपल्या तक्रारी सांगण्याचा तेवढा अधिकार असावा, त्या तक्रारी मोडण्यास उपाय करण्याचा, किंवा काय उपाय करावे हें सुचविण्याचा देखील, अधिकार नसावा. आमच्या प्रतिनिधि–सभांना त्यांच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर असाच (मर्यादित) अधिकार होता.....तीन चार पिढ्या दुःखें निवेदन करण्यापलीकडे ह्या मंडळांना निरधिकार ठेविल्यानंतर, पुढच्या तीन चार पिढ्यांना एवढाच अधिकार द्यावा कीं त्यांनीं लार्डांची सभा व बादशाह ह्यांना उपाय तेवढे सुचवावे. अशी स्थिति कित्येक पिढ्या चालल्यानंतर मग त्यांना लार्डांची सभा व बादशाह ह्यांच्यासारखा कायदे करण्याचा पूर्ण अधिकार द्यावा. राजकीय सत्तेचा उपयोग करण्यास जें दीर्घ

शिक्षण पाहिजे तें अशा व्यवस्थेनें (तुमच्या लोकांना) मिळेल, आणि हल्लीं जे तंटे चालले आहेत त्यांचा संभव नाहींसा होईल. "

हीं दोन पत्रें कौंट ईटोकडे पाठविण्याची परवानगी मागून केन्टारो क्यानेकोनें त्यास असें कळविलें कीं, " तुझ्या व इतरांच्या सल्लयास अनुसरून जपानी शासनघटना जुनें राखण्याच्या तत्त्वावरच बनवलेली आहे. जपानचा विचार युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांशीं पूर्वीं केलेले तह सुधारून परकीयांना व त्यांच्या भांडवलाला सर्व जपानी साम्राज्य खुलें करण्याचा आहे; पण (१) जमीन धारण करणें, (२) खाणी चालविणें (३) आणि किनाऱ्यावरील व्यापारांत अंग घालणें, ह्यासंबंधानें त्यांच्यावर काय प्रतिबंध घालावे ह्यासंबंधानें पुष्कळ मतभेद आहे. परकीयांमध्यें व जपान्यांमध्यें विवाहसंबंध होऊं द्यावे किंवा नाहीं ह्यासंबधानेंहि आमच्या विद्वानांमध्यें व राजकारणी पुरुषांमध्यें बराच खल सुरू आहे. हा प्रश्न अत्यन्त बिकट प्रश्नांपैकीं एक आहे, आणि तो समाजशास्त्रवेत्त्यांचा असल्यामुळें तुझ्या मताप्रमाणें त्याचा निकाल आह्मी करूं; तेव्हां त्यासंबंधानें तुझें मत मी विचारूं काय ? "

ह्यावर ता० २६ आगस्ट १८९२ रोजीं स्पेन्सरनें त्यास असें लिहिलें:—" नवीन नेमिलेला मुख्य प्रधान कौंट इटो ह्याला माझ्या दोन पत्रांचीं भाषान्तरें पाठविण्याचा तुझा विचार अगदीं समाधानकारक आहे. त्या गोष्टीस मी आपली अनुमती फार खुशीनें देतों. आणखी जे प्रश्न तूं विचारतोस त्यासंबंधानें प्रथम मी सामान्य उत्तर असें देतों कीं, जपानचें धोरण शक्य तितकें अमेरिकनांना व युरोपियनांना दोन हात दूर ठेवण्याचें असावें. तुमच्याहून ज्यास्त प्रबळ जातींपुढें तुमची स्थिति नेहमीं धोक्याची राहील, म्हणून परकीयांना तुम्हीं होईल तितका कमी पाय शिरकूं द्यावा. मला असें वाटतें कीं. जिन्नसा आणि कल्पना ह्यांच्या

अदलाबदलीला—म्हणजे, भौतिक व मानसिक उत्पन्नांच्या आयात-निर्यातीला, अत्यावश्यक तेवढे (त्यांच्या) दळणवळणाचे प्रकार तुम्हीं चालूं देणें तुमच्या फायद्याचें होईल. इतर जातींच्या लोकांना आणि विशेषतः ज्यास्त प्रबळ जातीच्या लोकांना, हे उद्देश साधारण जरूर असतील त्याहून ज्यास्त हक्क (तुम्हीं) देऊं नयेत. युरोप व अमेरिका ह्यांच्याशीं केलेले तह सुधारून परकी लोक व परकी भांडवल ह्यांना सर्व साम्राज्य खुलें करण्याचा तुमचा विचार दिसतो. पण मला हें धोरण अत्यन्त घातुक वाटतें..... एकदां विशेष जातींपैकीं एकादीला तुम्ही पाय ठेवण्यास थारा द्या, म्हणजे निःसंशय (योग्य) कालानें त्या जातीचें अतिक्रमणाचें धोरण सुरू होईल, आणि त्यामुळें जपानी लोकांशीं तिच्या टकरा सुरू होतील. ह्या टकरा म्हणजे जपानी लोकांनीं केलेले हल्ले असून त्यांजबद्दल सूड घेतला पाहिजे असें स्वरूप (त्या जातीकडून) त्यांस दिलें जाईल; नंतर मग संबंधानुरूप, अमेरिकेंतून किंवा युरोपांतून (तुमच्या देशीं) फौजा पाठविल्या जातील; तुमच्या मुलखाचा कांहीं भाग घेतला जाईल, आणि (आमची) वसाहत करण्यास म्हणून तो आम्हांस द्या अशी परकीयांची तुमच्यावर मागणी होईल; आणि ह्यापासून, अखेरीस, सगळें जपानी साम्राज्य काबीज होऊन जाईल. मला वाटतें, हा परिणाम कोणत्याहि स्थितींत टाळण्यास तुम्हांस फार जड जाईल, पण मीं दर्शविले आहेत त्यांपलीकडे परकीयांस तुम्हीं कोणतेहि विशेष हक्क दिल्यास, तुम्ही तो (परिणाम) उघडच सुलभ करून टाकाल.

अशा रीतीनें दिग्दर्शन केलेल्या सामान्य सत्यास अनुसरून, तुझ्या पहिल्या प्रश्नास असें उत्तर देतों कीं, परकीयांना जमिनीची मालकी धारण करण्याचा मज्जाव असावा इतकेंच नाहीं, तर त्यांस कांहीं मुदतीनेंहि ती वहिवाटूं देऊं नये; त्यांस केवळ राहिवाशी म्हणून (तुम्हीं तुमच्या देशांत) राहूं द्यावें. दुसऱ्या प्रश्नासंबंधानें मी निश्चितपूर्वक असें

सांगतों कीं, सरकारच्या मालकीच्या, किंवा सरकार चालवीत असलेल्या, खाणी चालविण्याची परकीयांना मनाई करा. कारण ह्या ठिकाणीं त्या चालविणारे अमेरिकन किंवा युरोपियन लोक आणि (जपानी) सरकार ह्यांजमध्यें मतभेदाचीं कारणें उत्पन्न होण्याचा संभव उघड उत्पन्न होईल, आणि हीं मतभेदाचीं कारणें लगेच भांडणाचीं कारणें बनतील; आणि त्या खाणी चालविणारे युरोपियन किंवा अमेरिकन लोक जें मागणें त्यासंबंधानें करीत असतील, तें तुम्हीं कबूल केलेंच पाहिजे असें (तुम्हांस) म्हणण्याकरितां ते आपआपल्या सरकाराकडे मागणी करितील. कारण सुधारलेल्या राष्ट्रांची अशी प्रवृत्ति आहे कीं,आपले बाहेर देशीं असलेले मुनीम किंवा वसाहतवाले जे म्हणतील तें खरें मानावयाचें. मीं दर्शविलेल्या धोरणास अनुसरून किनाऱ्यावरील व्यापार देखील तुम्हीं आपल्या स्वताच्या हातांत ठेविला पाहिजे, आणि तो करण्याची परकीयांस मनाई केली पाहिजे. एकच गोष्ट तुम्हीं कबूल करावी म्हणून जें मीं वर दर्शविलें आहे त्यांत हा किनाऱ्यावरील व्यापार उघडच येत नाहीं, कारण जिन्नसांची आयात-निर्यात होण्यास ह्या सवडीची जरूर नाहीं. इतर ठिकाणांहून जपानास (त्यांतील बंदरीं) आणलेले जिन्नस त्या देशाच्या अंतर्भागीं पसरण्याचें काम जपानी लोकांच्याच हातांत ठेवणें योग्य आहे, आणि तें परकीयांच्या हातीं देऊं नये, कारण तें त्यांच्या हातीं दिल्यास त्यासंबंधी अनेक व्यवहार होतील, ते भांडणें व त्यापासून होणारीं अतिक्रमणें ह्यांचीं हीं उपस्थित होण्याचीं, तितकीं द्वारें बनतील. परकी व जपानी लोक ह्यांच्यामधील विवाहासंबंधाचा जो तुझा राहिलेला प्रश्न त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, विचारदृष्ट्या त्याचें उत्तर पाहूं लागल्यास, त्यांत मुळींच अडचण नाहीं. असल्या विवाहास तुम्हीं सक्त मनाई करावी. हा प्रश्न मुळांत समाजशास्त्राचा नाहीं, तर जीवशास्त्राचा प्रश्न

आहे. मनुष्यांतील असले विवाह आणि प्राण्याप्राण्यांमधील असले संबंध ह्या दोहोंवरून असा विपुल पुरावा सांपडतो कीं, संलग्न होणाऱ्या उपजाती जेव्हां विशिष्ट अल्प अंशाहून ज्यास्त परस्परभिन्न असतात, तेव्हां त्यांच्या संयोगाचे परिणाम एकंदरींत नेहमींच वाईट होतात. मी आज पुष्कळ वर्षें ह्या संबंधाचा पुरावा पहात आहें, आणि माझी ही दृढ समजूत अनेक दिशांनीं गोळा केलेल्या अनेक पुराव्यांवरून बनलेली आहे. ह्या दृढसमजुतीचा गेल्या अर्ध्या तासांतच मीं पडताळा पाहिला आहे. कारण हल्लीं मी खेडयांत ज्या गृहस्थाकडे रहात आहें त्यास घोडे, गाई, बैल व मेंढया ह्यांसंबंधाची व त्यांच्यांतील उपजातींमधील संयोगांची फार माहिती आहे; त्याला विचारिलें असतां तो माझी ही समजूत बरोबर आहे म्हणून सांगतो. कारण तो असें म्हणतो कीं, मेंढयांच्या ज्या पोटजाती परस्परांपासून फार भिन्न असतील त्यांपैकीं एका जातीच्या मेंढीला दुसऱ्या जातीच्या मेंढयापासून पोरें झाल्यास दुसऱ्या पिढीस त्यांच्यांत वाईट परिणाम उत्पन्न होतो; म्हणजे, त्यापासून त्यांच्या गुणविशेषांची भलतीच भेसळ बनून जाते, आणि अगदीं अव्यवस्थित अशी शरीरघटना उत्पन्न होते. आणि तीच गोष्ट मानवी प्राण्यांमध्यें उत्पन्न होते. ही गोष्ट हिंदुस्तानांतील युरेशियन लोक आणि अमेरिकेंतील मिसळ जातींचे लोक ह्यांच्या उदाहरणावरून व्यक्त होते. ह्याचें इंद्रियविज्ञानदृष्टया असें कारण दिसतें कीं, कोणतीहि प्राण्याची उपजाति पुष्कळ पिढयांच्या अवधींत आपल्या विशिष्ट जीविताला शरीरघटनाविषयक कांहीं विशिष्ट अनुरूपता संपादिते, आणि दुसऱ्या प्रत्येक उपजातीचेंहि तसेंच होतें. ह्याचा परिणाम असा होतो कीं, परस्परांपासून फार भिन्न असलेल्या, व फार भिन्न जीवितसरणींना योग्य बनलेल्या, पोटजातींच्या घटना जर आपण मिसळल्या, तर जी घटना उत्पन्न होते ती त्या दोहोंपैकीं कोणत्याच

जातीच्या जीवितसरणीला योग्य बनत नाहीं; म्हणजे, ती घटना योग्य रीतीनें काम करीत नाहीं, कारण ती कोणत्याच परिस्थितिविशेषाला योग्य बनलेली नसते. म्हणून जपानी लोकांचीं परकीयांशीं लग्नें होण्यास सक्त मनाई करा. चिनी लोक अमेरिकेंत शिरण्याविरुद्ध अमेरिकेंत जे कायदे झाले आहेत ते वर दाखविलेल्या कारणांकरितां अगदीं मला पसंत आहेत, आणि मला अधिकार असता तर मीं ते आणखी कडक केले असते; कारण तसें न केल्यास दोन गोष्टींपैकीं एक झाली पाहिजे. चिनी लोकांस अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर येऊं दिल्यास, व ते अमेरिकनांशीं अमिश्रित राहिल्यास, गुलामांच्या नाहीं तरी गुलामासारख्यांच्या स्थितींत ते राहिले पाहिजेत, अथवा त्यांशीं मिसळल्यास वाईट अशी मिश्र जात बनली पाहिजे. कांहीं झालें तरी ते मोठ्या प्रमाणावर आले असल्यास मोठा सामाजिक गोंधळ उत्पन्न झालाच पाहिजे, आणि सरतेशेवटीं सामाजिक विस्कळितपणा उत्पन्न झालाच पाहिजे. अमेरिकन किंवा युरोपिअन जातींची बरीच मिसळ जपान्यांशीं झाल्यास तीच गोष्ट अवश्यमेव उत्पन्न होईल. एवंच तुझ्या लक्षांत येईल कीं माझा सल्ला सर्व दिशांनीं सावधगिरीचा आहे, आणि प्रारंभीं मीं म्हटलें तसेंच शेवटीं म्हणतों कीं, " इतर जातींना होईल तितकें दोन हातांवर ठेवा. "

१८९२ च्या दिजंबरांत लंदन सोडून बाहेर जाण्यापूर्वीं नीतिशास्त्राचीं शेवटचीं प्रकरणें तो लिहित होता असें ता० ४ दिजंबर १८९२ रोजीं फ्रेडरिक हारिसनला त्यानें लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसतें. तें असें:—" हक्स्लेला तूं दिलेल्या उत्तराच्या कांहीं भागांवरून कांहीं आत्यन्तिक प्रश्नांसंबंधानें तुझ्या–माझ्यांत, माझी कल्पना होती त्याहून ज्यास्त मतैक्य पाहून, मला अचंबा वाटला. ....मी नीतिशास्त्राचें शेवटचें प्रकरण लिहीत आहें.....मी अली-

कडे इतका आजारी आहें कीं, गेल्या पंधरवड्यांत मला माझें काम अगदींच बंद ठेवावें लागलें आहे, पण बिछान्यावर पडलों असतां, संघटनात्मक तत्त्वमीमांसेच्या ह्या शेवटच्या प्रकरणांत प्रदर्शित करावयाच्या विचारांचीं केव्हां केव्हां मी टिपणें करीत आहें. ह्या वाक्यांपैकीं अत्यन्त अर्थप्रचुर वाक्यें ह्या शेवटच्या प्रकरणाच्या शेवटच्या कलमापैकीं आहेत. त्यांपैकीं तीन प्रस्तुत विषयाशीं संबद्ध अशीं आहेतः–(१) " जनकत्वाचा रूपान्तर पावलेला मनोभाव असा कीं त्यामुळें मूल व नातवंड एवढ्यांबद्दलच काळजी वाटते असें नाहीं, तर पुढच्या पिढ्यांबद्दल देखील–म्हणजे, आपल्या दूरवरच्या वंशजांना उत्पन्न करणारे व त्यांची तरतूद करणारे जे भविष्यत् काळचे बाप त्यांच्याबद्दल देखील आस्था वाटते. " (२) " आपणाला असें म्हणतां येणार नाहीं काय कीं खऱ्या हितकर्त्याची अत्यन्त उच्च महत्त्वाकांक्षा माणूस बनवण्याच्या कामास हातभार —मग अत्यन्त अल्प हातभार कां असेना—लावण्याची असेल ? " (३) " जें अत्यन्त दूरचें जीवित त्यांस कधीं उपभोगावयास सांपडावयाचें नाहीं, तर दूरच्या पिढ्यांनाच सांपडेल, त्याचें विचारपर्वताच्या शिखरांवरून निरीक्षण करीत असतांना, त्याकडे प्रगति करण्याच्या कामीं आपण वर्तनानें किंवा उपदेशानें मदत केल्याचें ध्यानांत येऊन त्यांस शांत सुखाचा आस्वाद मिळेल. " हीं टिपणें तुझ्याकडे पाठविण्याचें एक कारण हें कीं, तीं मीं न पाठविल्यास, मीं तीं मतें तुझ्या लेखांतून चोरून घेतलीं असें तुला माझा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर वाटेल; आणि मीं म्हटलें त्याप्रमाणें दुसरें कारण हें कीं, त्यावरून, माझी कल्पना होती त्याहून ज्यास्त मतैक्य तुझ्यामाझ्यांत दिसतें. तुझ्यामाझ्यांत मुख्य भेद उघडच नांवांत आहे. मी समाविष्ट कल्पना व मनोभाव नीतिशास्त्राचे म्हणून समजतों. तूं ते धर्मविषयक म्हणून समजतोस.....ही गोष्ट तूं उघड

ध्यानांत घेत नाहींससें दिसतें कीं, नीति व धर्म हीं मुळांत एक असून प्रारंभापासून विभिन्नीकरण पावत आहेत, आणि अर्वाचीन काळीं अगदीं भिन्न झालीं आहेत, आणि एवंच नीति ऐहिकस्वरूप बनत चालली आहे (ही गोष्ट ख्रिस्ती धर्म शिकविणारांमध्यें देखील दिसते, कारण ते, न समजतां, धर्मापासून नीति ज्यास्त ज्यास्त भिन्न करीत आहेत); आणि तूं असेंहि अनुमान काढीत नाहींस, कीं, धर्म व नीति पुनः कधीं एक व्हावयाचीं नाहींत. तूं हीहि गोष्ट कबूल करीत नाहींस कीं, ज्या अर्थीं धर्माचा अर्थ 'कल्पित मानवधर्म (विशिष्टशक्तीवर विश्वास)' असा मुळांत असे, त्या अर्थीं ही धर्माची मानवधर्मविशिष्टता जेव्हां हळूहळू नाहींशी होत जाते, तेव्हां तो अज्ञात व ज्ञानातीत शक्तीवरील विश्वास म्हणून कायम राहतो. वर मीं म्हटलें त्याप्रमाणें हा भेद एकंदरींत बहुतेक नांवाचा भेद आहे; मात्र तुझ्यामाझ्यांत फरक इतकाच आहे कीं, ह्या अज्ञातशक्तीची ज्ञानवत्ता नित्य होत राहील असें मी म्हणतों, आणि ती तशी होत राहील असें तुला वाटत नाहींसें दिसतें."

नाताळ सुरू होण्यापूर्वीं तो सेंट लिओनार्ड्स् एथें गेला, आणि त्यापुढें त्यानें लंडनांत हिंवाळा कधींच घालविला नाहीं. तेथून ता० १७ जानेवारी १८९३ रोजीं त्यानें सर विल्यम फ्लावर यास असें पत्र लिहिलें:—"ओवेनच्या स्मारकाच्या कमिटीला मला मिळतां येत नाहीं ह्याबद्दल मला वाईट वाटतें. माझ्या मार्गांत दोन अडचणी आहेत. आज पुष्कळ दिवस माझें असें मत झालें आहे कीं स्मारकें करण्याचा प्रघात बेताबाहेर जात आहे, आणि त्यास विरोध करणें जरूर आहे........दुसरी अडचण ही कीं, ओवेननें जरी बऱ्याच गोष्टी केल्या आहेत असें म्हणतां येईल, तरी एक विशेष मला अवश्य वाटतो तो त्याच्यांत नव्हता, तो हा कीं तो प्रामाणिक नव्हता. त्याला जें खरें वाटेल तें तो मोकळ्या मनानें बोलून दाखवीत नसे, तर शा-

खज्ञ मंडळ व धार्मिक मंडळ या दोघांनाहि तो खुश करण्यास पहात असे. असें माझेंच मत नाहीं, तर, मला वाटतें, पुष्कळांचें आहे."

ह्या गोष्टीसंबंधानें आणखी कांहीं विचार केल्यावर त्याचें मत बदललें, आणि त्या कमिटींत आपलें नांव घालण्याची त्यानें सर विल्यम फ्लावर यास विनंति केली.

तो जसा वृद्ध होत चालला तसें इंग्लंदांत व इतरत्र राजकीय व सामाजिक गोष्टींना भलतेंच धोरण लागलेलें पाहून त्याचें असमाधान वाढत चाललें. उदाहरणार्थ, ता० ३० जानेवारी १८९३ रोजीं तो जॉन टिंडाल यास लिहितोः—" पार्लमेंत उघडून राष्ट्रीय अपक्रान्तीची (आयरिश स्वराज्याची) योजना काय पुढें येते इकडे तूं निःसंशय उत्सुकतापूर्वक व काळजीपूर्वक पहात आहेस. सोश्यालिस्ट मतें, क्रान्तिकारक विचार, आणि अनेक वेडचा कल्पना व संहारक कृती ह्यांनीं आपल्या ह्या जगाची काय विलक्षण स्थिति झाली आहे! माणसांवर योग्य राजकीय ओझीं न लादतां त्यांना राजकीय सत्ता देण्याचे काय परिणाम होतील ह्याबद्दलचीं १८६० सालापासून जीं भविष्यें मी करीत आहें, तीं माझा अजमास होता त्याहून अधिक लवकर खरीं ठरत आहेत."

ता० ३ एप्रिल—" तुझ्यासारखाच मी जगाकडे विस्मितदृष्टीनें पाहतों; मात्र जगावर जीं भयंकर संकटें येत आहेत त्यांचा अनिवार्यपणा आज पुष्कळ दिवस माझ्या मनांत आलेला आहे; पण तूं व मी तीं पहाण्यास जगणार नाहीं. प्रत्यक्ष संकटापात येण्यापूर्वीं आपण त्यांतून निघून जाऊं ही गोष्ट सुदैवाची आहे—' सुदैवाची ' म्हणण्यास मला हरकत दिसत नाहीं."

ता० २ मार्च १८९३ रोजीं तो फॉक्सबोर्न यास लिहितोः—" क्वीन्सलण्डच्या ह्या विभागणीबद्दल " मूळ रहिवाशांची संरक्षक मंडळी " हिनें कांहीं केलें आहे काय ? खरोखरच तिनें याचा चांगला

सणसणीत विचार केला पाहिजे. विभागणीच्या ह्या सूचना उसांची लागवड करणारांकडून येत आहेत हें पहिल्यापासून स्पष्ट दिसत आहे; त्यांचा उद्देश कनक लोकांना (तेथील मूळच्या लोकांना) पाहिजे तसे वसाहतींत आणतां यावें, आणि त्यांस गुलाम बनवतां यावें, हा आहे. त्या लोकांना करार करून आणावयाचे, आणि (मळेवाल्यांनीं त्यांना अन्यायानें वागविल्यास त्यांस) मॅजिस्ट्रेटांकडे तक्रार करावयास द्यावयाची, आणि अशा रीतीनें त्यांचें जुलमापासून रक्षण करावयाचें असें जें म्हणतात त्यांत कांहींच अर्थ नाहीं.

मला वाटतें, आह्मी आफ्रिकेंतील गुलामगिरी नाहींशी करण्याचें ढोंग करीत असतां दुसऱ्या नांवानें आस्ट्रेलियांत ती स्थापण्याची खटपट करीत आहों."

नेहमींप्रमाणें उन्हाळ्याकरितां लंदनांतून बाहेर गेल्यावर प्यूसी एथून ता० १८ मे १८९३ रोजीं तो सर जॉन लब्बक (हल्लींचा लॉर्ड एव्हबरी) यास लिहितोः—"तुझ्या निमंत्रणाबद्दल मी तुझा फार आभारी आहें. पण माझ्या वरच्या पत्त्यावरून मी तुझ्याकडे येण्यासारख्या अंतरावर नाहीं हें तुझ्या लक्ष्यांत येईल. माझा एक जुना मित्र एथून ब्रुसेल्स एथें (इंग्लंदांतून बेल्जममध्यें) सकाळीं एकास भेटावयास गेला आणि तसाच परत आला, पण त्याच्यावर मला ताण करवेल अशी आशा तूं क्वचित्‌च करीत असशील.....मला वाटतें कीं आतां आपला "एक्स्" क्लब मेला असल्यामुळें आपली अकस्मात्(आथीनियम) क्लबांत गांठ पडली तर पडली, नाहीं तर गांठ पडण्याचा फारच अल्प संभव दिसतो. अशी स्थिति नसती तर बरें असें मला फार वाटतें."

तेथूनच ता० २९ मे १८९३ रोजीं तो जॉन हॉक यास लिहितोः—"तूं म्हणतोस त्याप्रमाणें जुगार खेळणें व पण लावणें ह्यांचा निषेध मीं जोरानें केला असल्यामुळें तुझ्या मंडळाला कांहीं मदत

करणें मी आपलें कर्तव्य समजतों, कारण त्याचा हेतु ह्या दोन गोष्टी नाहींशा करण्याचा नसला, तरी (त्या नाहींशा होणें अशक्यच आहे) कमी करण्याचा दिसतो; म्हणून मी ह्या पत्राबरोबर वर्गणीचा चेक पाठवितों....ह्या मंडळाचा उपाध्यक्ष म्हणून माझें नांव देण्यास मीं एरवीं आक्षेप घेतला नसता; पण तुमच्या मंडळांत इतके धर्माधिकारी असल्यामुळें मीं आपलें नांव त्यांत घातल्यास मजवर प्रतिकूल टीका होण्याचा संभव आहे. अशा ह्या साहचर्यास माझी हरकत आहे असें मुळींच नाहीं, आणि ज्याचीं धर्मविषयक मतें त्यांच्या मतांहून इतकीं उघड उघड भिन्न आहेत त्याच्याबरोबर काम करण्याइतके उदारमनाचेहि ते (धर्माधिकारी) कदाचित् असतील. पण दुसऱ्या एकासंबंधानें मला आलेल्या अनुभवावरून असे वाटतें कीं, माझ्या हेतूंचा प्रतिकूल अर्थ केला जाण्याचा संभव उत्पन्न होईल. जमीन धारण करण्याच्या संबंधाच्या माझ्या मतांत जो बदल झाला आहे तो जमीनदारवर्गाशीं सख्य करण्याकरितां मीं केला आहे असा आक्षेप मजवर आलेला आहे; आणि मला निःसंशय असें वाटतें कीं, तुझ्या सूचनेनुरूप इतक्या धर्माधिकाऱ्यांसमवेत मीं उपाध्यक्षपणा स्वीकारल्यास मीं त्या वर्गाची मर्जी संपादन करण्यासाठीं तसें केलें असें म्हणावयास कांहीं लोक चुकावयाचे नाहींत."

त्यास जशी साम्राज्य–हांव नको होती तशीच खिलाडूपणाचीहि हांव नको होती; म्हणून 'ग्रेटर ब्रिटन' नांवाच्या पत्रांत सगळ्या ब्रिटिश साम्राज्याचे शारीरिक खेळ करवावे अशी सूचना येऊन त्याबद्दलच्या कमिटीचा सभासद होण्याचें त्यास विचारिलें असतां त्यानें तें साफ नाकारिलें, व त्यासंबंधानें त्याचा प्रवर्तक आस्ट्ले कूपर यास ता० २० जून १८९३ रोजीं असें लिहिलें:—"मला वाटतें मला तुझी सूचना मान्य करतां येत नाहीं, आणि त्याचें का-

रण हें कीं तुम्ही जी मंडळी स्थापूं पहात आहां तिच्या हेतूबद्दल मला जबर शंका येते. ग्रेटब्रिटन व तिच्या वसाहती यांचें संयुक्त मंडळ बनल्यास, मला वाटतें, त्याचा परिणाम असा होईल कीं तेणें-करून वसाहतींना अतिक्रमण करण्यास उत्तेजन सांपडेल, आणि त्या हल्लींपेक्षांहि ज्यास्त प्रांत गिळंकृत करूं लागतील, आणि पैशाची व लष्कराची मदत करण्याबद्दल मातृदेशावर त्या सारख्या मागण्या करीत राहतील."

ता० २८ जून:—"तुझ्या उत्तरावरून मीं दाखविलेला आक्षेप दूर होतो, पण मीं न दाखविलेला दुसरा एक आक्षेप दूर होत नाहीं. माझें आज पुष्कळ दिवस असें मत बनलेलें आहे कीं, आपल्यांत खिलाडूपणा फाजील झाला आहे, आणि त्यांत व्यक्ति आपल्या जीविताचा फारच भाग घालवितात, आणि लोक त्याचें फारच स्तोम करितात, म्हणून हल्लींपेक्षांहि त्याचें देव्हारें ज्यास्त माजेल अशी तूं योजिली आहेस तसली कोणतीहि गोष्ट करण्याच्या मी विरुद्ध आहें. मी आज जवळ जवळ पन्नास वर्षें लंदनांत राहिलों असून युनिव्हर्सिट्यांची होड्यांची शर्यत पाहण्यास एकदां देखील गेलों नाहीं; आणि लार्डांच्या चौकांत एकहि क्रिकेट–म्याच पाहावयास गेलों नाहीं; आणि गेलीं पुष्कळ वर्षें मीं मुद्दामच असें करण्याचें टाळिलें आहे; हें तुला मीं सांगितलें म्हणजे तुझ्या लक्ष्यांत येईल कीं, माझी यासंबंधाचीं जीं मतें आहेत त्यावरून तूं सुचवितोस तसलें सहाय्य मला तुजला करतां येत नाहीं."

प्रकरण बाविसावें

कांहीं महत्त्वाचे वादविवाद

१८८९ च्या पावसाळ्यांत तो अशा एका वादांत शिरला कीं तेणेंकरून त्याच्या कामांत व्यत्यय येऊन कित्येक महिने त्याचें जी-

वित कटु झालें इतकेंच नाहीं, तर सरासरी चाळीस वर्षांच्या एका स्नेहांत कांहीं दिवस भंग पडला. ती कथा अशी:—जॉन मोर्ले (हल्लींचे लार्ड मोर्ले) यानें न्यूकासल एथें आपल्या मतदारांची एक सभा भरविली असतां एका मतदारानें देशांतील सर्व जमीन राष्ट्रीय करावी असें सुचविलें, आणि आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ स्पेन्सरचें मत काढून दाखविलें. तें ' सोश्यल स्टॅटिक्स ' या ग्रंथामध्यें आलें होतें. ही बातमी ता० ९ नवंबर १८८९ च्या ' टाइम्स ' मध्यें वाचून स्पेन्सरनें ता० ७ नवंबर रोजीं त्या पत्रास असें लिहिलें कीं, "तें पुस्तक चाळीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेलें असून त्यांतील सामान्य तत्त्वें जरी आपल्यास अद्यापि मान्य आहेत, तरी त्यांवरून काढिलेल्या कित्येक सिद्धान्तांसंबंधानें आपला मतबदल झालेला आहे. त्या ग्रंथांत जमिनीच्या प्रश्नाची चर्चा अशा समजुतीवर केलेली होती कीं, तो प्रश्न पुष्कळ पिढ्या पुढें येण्याचा संभव नाहीं; पण तेथें असेंहि दाखविलें होतें कीं, तो जेव्हां पुढें येईल तेव्हां जमीनदाराच्या नुकसानभरपाईचें काम मोठें भानगडीचें होईल. समाजघटनेच्या निरनिराळ्या प्रकारांचा आलीकडे जो मीं विचार केला आहे त्यावरून हीं १८५० त प्रसिद्ध केलेलीं माझीं मतें कांहीं अंशीं दृढ झालीं आहेत, आणि कांहीं अंशीं बदललीं आहेत. यापुढें काय होईल याबद्दल माझें निश्चित मत कांहींच बनलेलें नाहीं. या अनिश्चितपणाचें कारण असें आहे कीं, ह्या गोष्टीच्या संबंधानें नैतिकदृष्ट्या आवश्यक दिसणाऱ्या गोष्टी, आणि राजकीय व अर्थशास्त्रदृष्ट्या आवश्यक दिसणाऱ्या गोष्टी ह्यांचा मेळ कसा बसवावा हें माझ्या लक्षांत येत नाहीं. " वरील सभेंत त्या मतदारानें असेंहि म्हटलें होतें कीं, एक अन्याय दूर करण्यासाठीं कधीं कधीं दुसरा अन्याय करावा लागतो असेंहि स्पेन्सरचें मत आहे. यासंबंधानें ता० ११ नवंबर रोजीं ' टाइम्स'ला पुनः पत्र लिहून त्यानें असें म्हटलें कीं,

" गेल्या चाळीस वर्षांत मीं लिहिलेलें सगळें ज्याअर्थीं मला आठवत नाहीं, त्याअर्थीं मीं वरच्यासारखें मत कोठेंच प्रदर्शित केलेलें नाहीं असें म्हणणें असुरक्षित होईल. पण माझा समज असा आहे कीं, असें मीं कोणत्याच संबंधानें म्हटलेलें नाहीं, आणि जमिनीच्या मालकीच्या प्रश्नाच्या संबंधानें तर खचीत म्हटलेलें नाहीं. माझ्या मतांत बदल झाला आहे तो एवढाच कीं, समाजानें जमिनीची मालकी पुनः आपल्या हातीं घेतल्यास ती अर्थशास्त्रदृष्ट्या फायदेशीर होईल अशी माझी १८५० त कल्पना असून आतां माझें असें मत बनलेलें आहे कीं, हल्लींच्या मालकांच्या हक्कांकडे योग्य लक्ष देऊन ती स्थापिल्यास (आणि तसें केलें पाहिजे असें मीं नेहमींच प्रतिपादिलेलें आहे) त्यापासून गैरफायदा होईल. "

आतां ह्या वादांत प्रो० हक्स्ले शिरला आणि ता० १२ नवंबर रोजीं त्यानें ' टाइम्स ' ला असें लिहिलें कीं, " (स्पेन्सरची) ' केवल नीति ' आणि ' केवल राजनीति ' हीं दोन्हीं ज्यांस समजत नाहींत असे बरेच लोक आहेत, आणि त्यांच्या नांवानें मी ह्या वादांत शिरत आहें. माझें आज पुष्कळ दिवस असें मत बनलेलें आहे कीं, लोकांचीं अन्यायाचीं कृत्यें जुन्यापुराण्या व केवळ तार्किक अशा प्रमाणांनीं योग्य ठरविण्याचे यत्न करणें हें हल्लींच्या काळचें मोठें राजकीय अनिष्ट होय. माझी खात्री आहे कीं, माझा मित्र स्पेन्सर ह्या कलास कधींच उत्तेजन द्यावयाचा नाहीं. " ह्यावर ता० १५ नवबंर च्या ' टाइम्सांत ' स्पेन्सरनें असें लिहिलें कीं " जमिनीच्या प्रश्नांच्यासंबंधानें हक्स्लेचा व माझा कोणत्या बाबतींत मतभेद आहे हें माझ्या लक्षांत येत नाहीं. " असें म्हणून नंतर हक्स्लेनें ' केवल राजनीतीवर ' जी टीका केली होती तिजसंबंधानें असें म्हटलें:—" राजकारणी माणूस सामाजिक ध्येयांची कितीहि टर करो, त्याला मुकाट्यानें ती ध्यानांत घेतल्याखेरीज प्रगतीकडे ए-

कहि पायरी जातां यावयाचें नाहीं. प्रो० हक्स्ले अशी तक्रार करितो कीं, प्रत्येक प्रत्यक्ष उदाहरणांत काय करावें हें केवल राजनीति आपणास दाखवीत नाहीं; यावर माझें एवढेंच म्हणणें आहे कीं, हें त्याचें म्हणणें, इंद्रियविज्ञानविषयक सामान्य सत्यावरून, जखम कशी धुवावी, किंवा कायमच्या फुगलेल्या अशुद्धरक्तवाहिन्यांना कोणता उपाय करणें उत्तम होईल हें मला समजत नाहीं, अशी तक्रार एकाद्या डाक्टरानें करण्यासारखेंच आहे. ''

' हें माझें ह्या वादासंबंधानें शेवटचें पत्र होय ' असें त्यानें त्या पत्रांत कळविलें असल्यामुळें हक्स्लेनें ता० १८ रोजीं त्यास दिलेल्या प्रत्युत्तरास त्यानें उत्तर दिलें नाहीं. त्या प्रत्युत्तरांत त्यानें असें म्हटलें होतें कीं, " जमिनीच्या प्रश्नाच्या बाबतींत आमचा मतभेद काय आहे हें स्पेन्सरच्या लक्ष्यांत न येणें ही विलक्षण गोष्ट आहे ", आणि इंद्रियविज्ञानविषयक कोटिक्रमाच्या संबंधानें असें म्हटलें होतें कीं, " त्याची निवड करण्यांत स्पेन्सरनें योग्य शहाणपणा दाखविला नाहीं. त्याची विचारसरणी व माझी विचारसरणी ह्यांमध्यें केवढा खाडा आहे ह्याचें ज्यास्त चांगलें उदाहरण स्पेन्सरला निवडतां आलें नसतें. जेव्हां इंद्रियविज्ञान, ओषधिविज्ञान आणि आरोग्यविज्ञान पूर्ण शास्त्रें बनतील, तेव्हां ह्या शास्त्रांच्या मूलतत्त्वांवरून वैद्यानें प्रत्यक्ष उदाहरणांत काय करावें हें समजेल ह्याबद्दल मला संशय वाटत नाहीं. पण तो सुदिन अद्यापि आलेला नाहीं. आणि हल्लीं जर डाक्टरानें मूलतत्त्वांवरून सिद्धान्त काढून रोगांवर उपचार करणें असुरक्षितपणाचें आहे, तर जो ग्रंथकार काळजीपूर्वक निरीक्षण आणि अनुभव ह्यांच्या आधारावर रचलेले व कितीहि मर्यादित असले तरी सुरक्षित अशा प्रयोगांचें धोरण न घेतां, ज्या सांखळ्यांच्या कोणत्याहि कडीची शाबुती किंवा मजबुती प्रयोगतः पहातां येत नाहीं अशा, गृहीत तात्त्विक नीतिविषयक गोष्टींवरून काढलेल्या सिद्धा-

न्तांच्या लांब साखळ्यांवर अवलंबून राहतो, त्यास काय म्हणावें ? ”

“ ‘ एक अन्याय दूर करण्याकरितां कधीं कधीं दुसरा अन्याय करणें जरूर असतें ’ हें मत आपल्यास मान्य नाहीं असें तूं अद्यापि म्हटलें नाहींस ”, अशी फ्रेडरिक ग्रीनवूडनें स्पेन्सर यास आठवण दिल्यावरून त्यानें ता० १९ नवंबरच्या ‘ टाइम्सांत ’ असें लिहिलें:— “ हें करणें, इतकें मीं म्हटल्यावर जरूर आहे असें मला वाटलें नाहीं. पण ज्याअर्थीं त्यास तें जरूर वाटतें त्याअर्थीं मी तें मत माझें नाहीं म्हणून सध्यांच्यासंबंधानें व गतकालाच्या संबंधानेंहि मोठ्या खुशीनें म्हणतों. प्रो० हक्स्लेशीं माझा वादविवाद चालविण्याची मला इच्छा असती तरी, तो त्याच्या पत्रानें बंद झाला आहे. त्या पत्रावरून मला असें समजतें कीं, हल्लीं माहीत असलेलीं इंद्रियविज्ञानाचीं तत्त्वें औषधोपचार करण्याच्या कामीं कांहींच मार्ग दाखवीत नाहींत, आणि म्हणून माझा कोटिक्रम खुंटून जातो. ” ता० २७ नवंबर रोजीं त्यानें पुनः असें लिहिलें:—“ माझ्या माथीं मारिलेल्या वेड्या कल्पना नाकारल्याखेरीज परवांचा वादविवाद मला बंद करतां येत नाहीं.....आपल्या हालचाली ध्येयाच्या दिशेनें व्हाव्या, आणि उलट दिशेनें होऊं नयेत, एतदर्थ नजरेपुढें ध्येय ठेविलें पाहिजे ही सूचना म्हणजे तें ध्येय एकदम अमलांत आणण्याचीच सूचना होय, असें हक्स्ले म्हणतो ! ”

अशा रीतीनें या दोघांमध्यें उत्पन्न झालेला हा स्नेहव्यत्यय पाहून त्यांच्या निकट मित्रांस फार काळजी उत्पन्न झाली, आणि विशेषतः प्रो० टिंडाल, सर जोसेफ हूकर, डा० हर्स्ट, आणि ‘ एक्स ’ क्लबाचे इतर सभासद, ह्यांना झाली. प्रोफेसर हक्स्लेला ह्या परिणामाचें आश्चर्य वाटलें, कारण खाजगी रीतीनें व प्रसिद्ध रीतीनें आपण पूर्वीं म्हटल्यापेक्षां ह्या वेळीं कांहीं ज्यास्त कटु म्हटलें आहे, असें त्याच्या ध्यानांत आलें नव्हतें.

यासंबंधानें ता० २९ नवंबर १८८९ रोजीं प्रो० टिंडालनें स्पेन्सर यास असें लिहिलें:—" हा वर्तमानपत्रांतील वादविवाद मला व माझ्या बायकोला दुःखाला कारण झाला आहे असें तूं खास समज. तो सुरू झाल्यापासून पुष्कळवेळां माझ्या मनांत असें आलें कीं, मी तुझ्या संनिध असतों तर बरें झालें असतें, किंवा तूं व हक्स्ले मजसंनिध असतेत तर त्याच्याहूनहि बरें झालें असतें. जराशी खुबी आणि नेमस्तपणा यांनीं तुमच्यामधील मतभेद—जर मुळीं मतभेद असेल तर—सहज काढून टाकतां आला असता. सरकारकडे जमिनीची मालकी असल्यास अनर्थ कोसळेल, असें जेथें तूं म्हटलें आहेस तो तुझ्या पहिल्या लांब पत्राचा अखेरचा भाग जेव्हां मीं वाचिला, तेव्हां मीं मोठ्यानें म्हटलें, " शाबास, स्पेन्सर ! " पण सगळें पत्र वाचून पाहतां, तूं आपला सुसंबद्धपणा दाखविण्याकरितां फाजील उत्सुक आहेस असें मला दिसलें. तुझे जे गुण सर्व जग कबूल करितें त्यांवर अवलंबून, तुझ्या ह्या मतांच्या तुकड्यांच्या व कपटच्यांच्या संबंधानें, मला वाटतें, तूं असें म्हटलें पाहिजेस कीं, " मरो ती सुसंबद्धता ! "....सार्वजनिक दृष्टीनें पाहतां, आणि वादविषयक प्रश्नांच्याच संबंधानें पाहतां, मला हक्स्लेचीं पत्रें उत्कृष्ट वाटलीं. दुसऱ्या एका दृष्टीनें, मला वाटतें, ही गोष्ट त्यानें ज्यास्त स्पष्टपणें लक्ष्यांत घ्यावयास पाहिजे होती कीं, आपण सामान्य सामनेवाल्याशीं हा वाद करीत नसून आपल्याकडून वाखाणणी व प्रेम करून घेण्याचा ज्याला निःसंशय हक्क आहे अशा मित्राशीं तो करीत आहों. वास्तविक स्थितीवरून न्याय्य ठरेल त्यापेक्षां फारच ज्यास्त मर्यादेबाहेर जगापुढें सामनेवाले म्हणून तुम्हीं दोघांनीं उभें रहावेंत, ही अत्यन्त शोचनीय गोष्ट होय. तूं राजकीयविषयक मूलतत्त्वांचा विचार करितोस; तो सध्याच्या प्रश्नांच्या संबंधानें विचार करितो, म्हणजे, प्रत्यक्ष व्यवहार करणाऱ्या मुत्सद्याच्या नीतीला विशिष्ट स्वरूप दे-

णाऱ्या प्रश्नांचा तो विचार करितो. ह्यांमध्यें अनिवार्य असा विरोध कांहींच नाहीं. "

स्पेन्सरनें जर आपणास कोंडून घेण्याच्याऐवजीं व कोणासहि भेटावयास न जाण्याच्या ऐवजीं आपल्या मित्रांशीं ह्या बाबतींत बोलणें केलें असतें, तर लवकरच त्याच्या व हक्स्लेच्या स्नेहांत पडलेला हा खंड भरून आला असता. त्याची तेढी काढून टाकण्यासाठीं एक्स् क्लबाचे दुसरे सभासद पुढें आले; पण त्यांची मध्यस्थी कबूल करण्याच्या ऐवजीं स्पेन्सरनें त्या क्लबांतून आपलें नांवच काढून घेतल्याबद्दल पत्र लिहिलें, पण तें सर जोसेफ हूकरच्या सल्ल्यावरून त्यानें पाठविण्याचें ठेविलें. प्रो० हक्स्ले त्याच्याशीं समेट करण्यास अर्ध्या अधिक रस्त्यावर येण्यास अगदीं कबूल होता. कारण स्पेन्सरनें वाचावें ह्या हेतूनें सर जोसेफ हूकरला पत्र लिहून त्यांत त्यानें असें कळविलें कीं, "स्पेन्सरची थट्टा करावी असा आपला मुळींच उद्देश नव्हता; स्पेन्सरनें जी दिशा पत्कारिली ती पाहून आपल्यास अत्यंत आश्चर्य व दुःख वाटलें; जरूर असेल तर सर्व चूक आपल्या पदरांत घेण्यास, आणि माझा दुष्ट हेतु मुळींच नव्हता असें स्पेन्सरला आश्वासन देण्यास, मी तयार आहें; आणि मीं माझें उत्तर विनाकारण कटु केलें होतें असें त्यास वाटत असल्यास मला त्याबद्दल अत्यन्त खेद वाटतो." अशा रीतीनें हक्सलेनें पुढें केलेला हात स्पेन्सरनें कवटाळिला नाहीं हीं दुःखाची गोष्ट होय. ह्या त्याच्या कृतीच्या संबंधानें स्पेन्सरनें ता० ९ दिजंबर रोजीं टिंडालला असें लिहिलें:—" माझ्या ठिकाणीं मनाची स्थिति काय उत्पन्न झाली आहे ती तूं व क्लबाचे इतर सभासद यांना पूर्णपणें निःसंशय समजत नाहीं. कारण माझ्या मतांच्या संबंधानें हक्सलेनें जें जें म्हटलें तें कमजास्त प्रमाणानें अगदीं भलतेंच होतें, आणि कांहीं बाबतींत अक्षम्य रीत्या भलतेंच होतें.....ह्याचा परिणाम माझ्या मनावर असा

झाला आहे कीं, त्यायोगानें उत्पन्न झालेले विचार व चिडीच्या गोष्टी माझ्या मेंदूंत गिरणींतल्यासारख्या रात्रंदिवस गरगर फिरत राहिल्या आहेत, आणि त्या थांबविण्याची शक्यता दिसत नाहीं."

ता० १२ दिजंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितो:—"'टाइम्स'-मधील वादविवादानें ज्या स्थितीप्रत गोष्टी आल्या आहेत, त्या स्थितींत मला त्या तशाच ठेवतां येत नाहींत, आणि म्हणून त्या कांहीं-अंशीं सरळ करण्याकरितां, आणि झालेलें नुकसान थोडच्या अंशानें भरून काढण्याकरितां, मी 'नाइन्टीन्थ सेंचरी' करितां एक छोटा लेख तयार करीत आहें."

नव्या वर्षाबरोबर ह्या वादास नवें स्वरूप आलें. त्यासंबंधानें ता० ८ फेब्रुवारी १८९० रोजीं तो टिंडाल यास लिहितो:—" मी तुजकडे 'डेली टेलीग्राफ' पत्राचा ता० ८ फेब्रुवारीचा अंक पाठवितों, त्यांत तुला दिसून येईल कीं, मला आणखी एका भलत्याच आरोपाविरुद्ध स्वसंरक्षण करावें लागलें आहे. एखाद्यास असें वाटलें असतें कीं, मला इतका त्रास दिल्याबद्दल आणि त्याबद्दल आपली खंती दर्शविल्यानंतर, हक्स्ले लागलाच पुनः तसें करण्यास तयार होणार नाहीं; पण "नाइन्टीन्थ सेंचरी" च्या चालू अंकांतील त्याच्या लेखाच्या प्रास्तविक भागांत निःसंशय मजकडेच रोंखलेली अशी एक अगदीं विनाकारण थट्टा करून, शिवाय "डेली टेलिग्राफ" च्या अडीच लाख वाचकांमध्यें हा कुत्सित आरोप त्यानें पसरिला आहे." ही कथा अशी होती:—

हक्स्लेनें "नाइन्टीन्थ सेंचरी" मध्यें रूसोच्या सोश्यालिस्ट कल्पत्यांवर टीका केली होती; आणि तिजवर रॉबर्ट बुचानन यानें ता० २३ जानेवारीच्या 'डेली टेलीग्राफ' मध्यें प्रतिकूल टीका केली होती. ता० २७ रोजीं दुसरें एक पत्र लिहून त्यांत त्यानें स्पेन्सरसंबंधानें असें म्हटलें कीं, " जे लोक चांगल्या व तात्त्विक अर्थीं सोश्यालिस्ट

आहेत, आणि जे केवळ कम्युनिस्ट लोकांप्रमाणें, ज्यांनीं जमिनींत वगैरे पैसे घातलेले आहेत त्यांचे शत्रू नाहींत, अशांपैकीं स्पेन्सर हा एक आहे." ता० ३ फेब्रुवारी रोजीं तिसरें पत्र लिहून त्यानें हक्स्लेच्या ता० २९ व ३१ जानेवारी रोजीं त्या वर्तमानपत्रांत आलेल्या पत्रांवर टीका केली. यांपैकीं पहिल्या पत्रांत (ता० २९ जानेवारीच्या पत्रांत) स्पेन्सरच्या राजकीय तत्त्वमीमांसेवर हक्स्लेनें टीका केली होती, आणि असें म्हटलें होतें कीं, "हा प्रमाणस्थापित रानटी निर्दयपणा" (स्पेन्सरची राजनीति) जर सारखा व्यवहारांत आणिला असता, तर कामकरी वर्गांना जीवनार्थ कलहांत एकमेकांशीं लढावें लागलें असतें, आणि सरकाराकडे त्यांच्या होद्याचें (ते ज्या हौद्यांत लढत असतील त्याचें) रक्षण करण्याचें तेवढें काम आलें असतें. एकाद्यास (खाण्याच्या) पावाबद्दल जर कांहीं मोबदला द्यावयास नसेल, तर मी नव्हे तर (स्पेन्सरादि) जहाल व्यक्तितत्त्ववादी असें म्हणतील कीं, 'त्याला उपाशीं मरूं दे.' सरकारानें जर त्यास मदत केली, तर मी नव्हे तर ते म्हणतील कीं, 'सरकार आपल्या अधिकाराबाहेरचें काम करीत आहे'; त्या गरीब माणसास जर कोणीं खाजगी रीतीनें मदत केली, तर मी नव्हे तर ते त्या दात्यावर असा आरोप करितात कीं, 'हा योग्यतमांच्या तगावांत हात घालीत आहे.' रॉबर्ट बुचाननें माझे डोळे उघडिले तोंपावेतों मी वेडेपणानें असें समजत होतों कीं, स्पेन्सरला जर एकाद्या आरोपाबद्दल चीड येत असेल तर तो कोणत्याहि प्रकारें किंवा स्वरूपीं सोश्यालिस्ट आहे ह्या आरोपाबद्दल होय. बुचाननें 'नागरिक विरुद्ध सरकार' हा लेख वाचिला आहे किंवा नाहीं कोण जाणें." असें त्या पत्रांत म्हणून त्या पुस्तकांतील कांहीं निवडक उताऱ्यांना त्यानें उल्लेख केला.

राबर्ट बुचाननच्या ता० ३ फेब्रुवारीच्या "डेली टेलिग्राफ"

मधील पत्राबद्दल स्पेन्सरनें त्यास ता० ९ रोजीं पुढील पत्र लिहिलेः— "'डेली टेलिग्राफ'ला त्वां पाठविलेलें पत्र आज पोहोंचलें, त्याजबद्दल मी तुझा आभारी आहें. ह्या व ह्याच्या अगोदरच्या पत्रांत हा प्रश्न हातीं घेऊन तूं आपलें औदार्ययुक्त शौर्य व्यक्त केलें आहेस. रविवारीं तुझें माझें भाषण चाललें असतां वादविषयक प्रश्नाबद्दल मीं तुझ्याशीं विशेष विवेचन केलें नाहीं.....तथापि मला असें वाटतें कीं तूं माझ्या मतांचें जें 'डेलिटेलिग्राफ' मध्यें प्रदर्शन केलें आहेस तें मला सर्वांशीं मान्य करतां येत नाहीं असें तुला प्रामाणिकपणें सांगणें उचित होय. "उच्चतर सोश्यालिस्ट मतें" ह्या शब्दांचा नेहमींहून भिन्न अर्थ घेतल्याविना ते माझ्या मतांना कसे लावतां येतील याची मला शंका येते. जी (समाजघटना) आपणास हल्लीं माहीत आहे, आणि जिच्याबद्दल कदाचित् आपल्यास हल्लीं कल्पना करतां येते, अशा कोणत्याहि सामाजिक घटनेपासून अत्यन्त भिन्न अशी सामाजिक घटना भविष्यत् काळीं उत्पन्न होईल असें मी समजतों हें खरें आहे.....पण माझें असें मत आहे कीं, चढाओढ आणि करार हीं शेवटपर्यंत कायम राहिलीं पाहिजेत, आणि त्यांचा अनिर्बंध व्यापार चालविण्याला अडथळा करणारीं कोणतींहि (द्रव्यविषयक वगैरे) समविभजनें अनिष्टकारक झालींच पाहिजेत. माझ्या राजकीय जीविताच्या प्रारंभापासून मी सार्वजनिक शिक्षणाचा विरोधी असून अजू हि तसाच आहें, ह्या गोष्टीवरून देखील तुला दिसून येईल कीं, जीवितसंग्रामाकरितां समाजघटकांना तयार करणें समाजाचें कर्तव्य आहे, हें तुझें मत मला मान्य होणें शक्य नाहीं. तें कर्तव्य सर्वांशीं आईबापांचें आहे असें मी समजतों.....माझ्या पूर्ववयांत मानवी प्रगतीचा जरी मला विशेष भरंवसा वाटत होता, तरी मला आतां ज्यास्त असें वाटूं लागलें आहे कीं, मानवी स्वभाव जसा सुधारत जाईल, तशीच ती प्रगति होत जाईल, त्याहून

ज्यास्त जलद होणार नाहीं; आणि ही सुधारणा फार मंद रीत्या होत असून ती पुष्कळ पुष्कळ पिढ्यांनींच बनून येणार आहे. आजपर्यंत जे संप झाले आहेत व हल्लीं होत आहेत, त्यांतील कामकऱ्यांच्या वर्तनाकडे जेव्हां मी पाहतों; मी जेव्हां त्यांचा सरसकट जुलूम, आणि स्वातंत्र्याच्या खऱ्या कल्पनेचा त्यांच्या ठिकाणीं दिसणारा पूर्ण अभाव, हीं ध्यानांत घेतों; तेव्हां मला निःसंशय असें वाटतें कीं, त्यांच्या फायद्यासाठीं कोणतीहि नवी घटना बनविल्यास तिला ते लवकरच निष्ठुर अशा स्वेच्छाचारी घटनेचें स्वरूप देतील."

"प्रमाणस्थापित रानटी निर्दयपणा" (Reasoned savagery) हे हक्स्लेचे शब्द उसने घेऊन त्या मथळ्याखालीं स्पेन्सरनें ता० ८ फेब्रुवारी रोजीं "डेली टेलिग्राफ" ला एक पत्र लिहिलें आणि त्यांत असें दाखविलें कीं, "आज सरासरी पन्नास वर्षें मी असें प्रतिपादन करीत आलों आहें कीं, जीवनार्थ कलहामध्यें जीं दुःखें (व्यक्तींस) होत असतात, तीं खाजगी सहानुभुतीनें जी मदत (कोणास) करावीशी वाटेल तिच्या योगानें कमी करणें योग्य आहे. ह्या मतास "प्रमाणस्थापित रानटी निर्दयपणा" हें नांव देणें योग्य आहे कीं काय हें प्रत्येकास समजण्यासारखें आहे."

आपण आपला सर्व जन्म प्रत्येक प्रकारचा जुलूम व अन्याय ह्यांचा उदाहरणानें व उपदेशानें निषेध करण्यांत घालविला असतां आपल्यावर क्रूर व्यक्तिवादाचा आरोप यावा, आणि आपल्या मतांस "प्रमाणस्थापित रानटी निर्दयपणा" हें नांव मिळावें, हे विचार मनांत येऊन स्पेन्सर यास आपल्यावर अन्याय पाखाडिला जात आहे असें किती वाटत असलें पाहिजे हें ध्यानांत आणिल्याशिवाय, त्याला हक्स्लेचा इतका राग कां आला होता हें ध्यानांत यावयाचें नाहीं. शिवाय, हक्स्लेचा व त्याचा इतके दिवसांचा स्नेह असल्यामुळें हें जें स्नेहाविरुद्ध असें कृत्य दिसत होतें तें त्यास विशेषच

लागलें असलें पाहिजे म्हणून मित्रांच्या मध्यस्थीचा या वेळीं उपयोग झाला नाहीं, व त्यांनींहि ती करण्याचें सोडून दिलें. पुढें त्याचा त्याचा पूर्ववत् स्नेहसंबंध १८९३ च्या अखेरपावेतों पुनः जमला नाहीं.

त्या वर्षाच्या मे–जूनच्या सुमारास ' उत्क्रांत व नात ' नांवाचा हक्सलेचा लेख प्रसिद्ध झाला. त्यासंबंधानें स्पेन्सर जेम्स स्किल्टन यास ता० २९ जून १८९३ रोजीं लिहितो:–" हक्सलेच्या ' उत्क्रान्ति व नीति ' ह्या निबंधावर टीका करण्याचा तूं विचार करीत आहेस ह्याबद्दल मला आनंद वाटतो.....वास्तविकरीत्या पाहतां, उत्क्रान्तिमताच्या उच्चतर योजनांच्या संबंधानें त्यानें तें मत (उत्क्रान्ति मत) ह्या लेखानें झुगारून दिलें आहे; आणि अशी विचित्र गोष्ट गृहीत केली आहे कीं, सेंद्रियसृष्टीकडे त्या मताची योजना करतां तें व्यक्तींमधील कलहास त्याच्या क्रूरपणाच्या स्वरूपीं तेवढें लागू आहे, आणि सामाजिकघटनेची वाढ, किंवा ती वाढ चालली असतां माणसांच्या मनांत होणारे फेरबदल, ह्यांस तें मुळींच लागू नाहीं.....' आपणास विश्वविषयक सरणीविरुद्ध झगडलें पाहिजे किंवा ती दुरुस्त केली पाहिजे ' असें जें तो म्हणतो, त्यांत तो अशी गोष्ट गृहीत करितो कीं, विश्वविषयक सरणींत अंतर्भूत न होणारें असें कांहीं आमच्यामध्यें (माणसांमध्यें) आहे, आणि अशा रीतीनें, मनुष्य व सृष्टि परस्परांच्या विरुद्ध आहेत, ही जी धर्माधिकाऱ्यांची जुनी समजूत, तिजकडे वस्तुतः त्याची पीछेहाट झालेली आहे. आतां उत्क्रान्तीकडे कोणत्याहि सयुक्तिक व व्यापक दृष्टीनें पाहिल्यास असें व्यक्त होतें कीं, सामाजिक उत्क्रमण चाललें असतां माणसाच्या मनाला शिक्षण मिळून त्यास असें स्वरूप येतें कीं, तेणेंकरून जीवनार्थ अनिर्बंध कलह चालावा हा जो विश्वविषयकसरणीचा भाग त्याला आळा पडतो." (स्पेन्सरच्या म्हणण्याचें तात्पर्य असें कीं, माणसामध्यें प्रवृत्त्यात्मक व निवृत्त्यात्मक परोपकारबुद्धि उत्क्रांति-

नियमासच अनुसरून उत्पन्न झालेली आहे, व तिचा उपयोग त्यानें केल्यानें जीवनार्थ कलहाची तीव्रता कमी होते.)

हा विषय स्वतः हातीं न घेण्याचा स्पेन्सरनें बेत केला होता, पण ता० २२ जुलईच्या ' आर्थीनियम ' पत्रांत हक्स्लेच्या वरील निबंधावर अभिप्राय आल्यामुळें त्यानें आपला बेत फिरविला, आणि ता० ९ आगस्ट रोजीं त्या पत्रांत त्यानें ' उत्क्रान्तिविषयक नीति ' ह्या मथळ्याखालीं एक पत्र लिहिलें. त्याच्या शेवटीं आपल्यामध्यें व हक्स्लेमध्यें मतैक्याचे आठ मुख्य मुद्दे त्यानें दाखविले, आणि असें म्हटलें कीं, " ह्यावरून, उघडच, नीतिविषयक आपलीं मतें माझ्या तद्विषयक मतांच्या विरुद्ध मांडण्याचा हक्स्लेचा उद्देश नसावा, आणि ज्या ग्रंथांत मीं नीतिविषयक मतें प्रतिपादिलीं आहेत तो ग्रंथ (' न्यायतत्त्वें ' हा ग्रंथ) त्याच्या हातांत वरील व्याख्यान (वरील निबंध प्रथम व्याख्यानरूपानें लोकांपुढें आलेला होता) देण्यापूर्वीं एक पंधरवडा पडलेला असल्यामुळें ही गोष्ट ज्यास्तच उघडपणें अशक्य दिसते. " यावर आपल्या नीतिग्रंथांतील मतें हक्स्लेनें न सांगतां उचलून घेतलीं, असा ह्या म्हणण्याचा त्यानें (हक्स्लेनें) अर्थ केला आहे असें त्याच्या कानीं आल्यावरून, त्यानें त्याला त्या पत्राची नक्कल पाठवून छोटी सही करून त्यावर तारीख न घातलेल्या कांहीं ओळी लिहिल्या. तेव्हां त्यावर हक्स्लेचें तृतीय पुरुषीं उत्तर आलेलें पाहून स्पेन्सर अचंब्यांत पडला, आणि " अशा रीतीनें ती नक्कल पाठविण्यांत तुझा अपमान करण्याचा माझा मुळींच उद्देश नव्हता, आणि तूं माझे विचार चोरून घेतले आहेस असें म्हणण्याचाहि त्या पत्रांतील अखेरच्या वाक्याचा उद्देश नव्हता ", असें त्यानें त्यास कळविलें. ह्यावर दोघांचीं समजावणीचीं उत्तर–प्रत्युत्तरें होऊन शेवटीं पुनः स्नेह जमण्याचा मार्ग खुला झाला, आणि ता० २४ आक्टोबर १८९३ रोजीं हक्स्लेनें त्यास असें लिहिलें:—

" तूं आजारी आहेस असें ऐकून मला फार वाईट वाटतें, (तुझें) मन किंवा शरीर ह्यांच्या चलबिचली कमी करण्यासाठीं माझ्या हातून कांहीं होण्यासारखें असल्यास तें मी आनंदानें करीन. आपण वृद्ध माणसें आहों. आणि वृद्ध मित्रहि असलों पाहिजे. आपल्या वितुष्टाबद्दल मला नेहमींच दुःख होत आहे. तें आतां आपण नाहींसें करूं या. माझ्यासंबंधानें मी असें म्हणतों कीं, माझ्या तोंडून निघालेली किंवा माझ्या हातून घडलेली कांहीं गोष्ट अन्यायाची झालेली असेल, किंवा तशी ती दिसली असेल, तर मला त्याबद्दल वाईट वाटतें. "

यावर ता० २६ आक्टोबर रोजीं त्यानें हक्स्लेस असें लिहिलें:— " तुझें सहानुभूतियुक्त पत्र आज सकाळीं मला मिळून त्यानें माझें फार समाधान झालें. आपणा दोघांचाहि अंतकाळ समीप येत चालला आहे..... आणि आपल्यापैकीं जो कोणी मागें राहील त्यास, ४० वर्षांच्या स्नेहांत कायमचें वितुष्ट आलें हा विचार मनांत येऊन वाईट वाटलें असतें. सुदैवानें तुझ्या दयाळू उद्गारांनीं ती भीति आतां कायमची टळली आहे, व निकट स्नेहसंबंध पुनः स्थापन झाले आहेत."

' गोंधळलेला तत्त्ववेत्ता ' ह्या लेखांत जमिनीच्या प्रश्नाच्या संबंधानें स्पेन्स च्या निरनिराळ्या उद्गारांचें परीक्षण करीत असतां हेन्री जार्जनें (हा अमेरिकन ग्रंथकार होता.) असा फाजीलपणा केला कीं, स्पेन्सरचें या बाबतींत झालेले मतबदल त्यानें अयोग्य हेतूंनीं केलेले आहेत असा त्यानें त्याजवर आरोप आणिला, कारण त्यानें असें म्हटलें कीं, उच्च वर्गाची मेहरबानी संपादण्यासाठीं स्पेन्सरनें आपलीं पहिलीं एतद्विषयक मतें झुगारिलीं आहेत. त्याच्या शीलावर केलेला हा हल्ला स्पेन्सरला अर्थात् फार लागला. त्यासंबंधानें त्याचा न्यूयॉर्क एथील मित्र जेम्स स्किल्टन याला ता० ६ जानेवारी १८९३ रोजीं पत्र लिहून त्यानें असें कळविलें कीं, " ह्या

लेखाकडे मी स्वतः लक्ष्य देण्याचें नाकारितों, पण माझ्या अमेरिकन मित्रांना वाटल्यास त्यांनीं हा प्रश्न हातीं घ्यावा, आणि त्याच्या ह्या बेअब्रू करणाऱ्या विधानाचा समाचार घ्यावा. ह्या कामीं त्यांस मदत करण्यासाठीं मी कांहीं गोष्टीं एथें नमूद करितों, त्यांचा त्यांनीं योग्य वाटेल तो उपयोग करावा. पहिली गोष्ट ही कीं, त्याच्या लेखांत अनेक अगदीं खोटे आरोप गर्भितरीत्या केलेले असून दोन प्रत्यक्ष असत्य विधानें आहेत.....पैकीं पहिलें त्याच्या प्रस्तावनेंत आहे; त्यांत तो म्हणतो कीं, खाजगी मत्ता या दृष्टीनें जमिनीकडे पाहवें असें म्हणून, (जमीनदारांच्या मालकीच्या हक्कांत समाजानें) हात घालणें न्यायाचें होणार नाहीं असें जे म्हणतात त्यांच्या बाजूस मी निश्चितपणें गेलेलों आहें. (पण) अशा प्रकारचें कांहींच म्हटलेलें नाहीं. मी नेहमीं असें प्रतिपादीत आलों आहें कीं, जमिनीवरील सर्व समाजाचा जो हक्क तो कायम आहे, आणि तो कधीं नाहींसा करतां यावयाचा नाहीं; मात्र त्याबरोबर मीं असेंहि म्हटलें आहे कीं, अनेक पिढ्यांनीं मेहनत करून जमिनीला जी किंमत आणून दिली आहे तिजबद्दल योग्य भरपाई केल्याविना समाजाला जमीन न्याय्य रीतीनें परत आपल्या ताब्यांत घेतां यावयाची नाहीं. “ सोश्यल स्टॅटिक्स ” मधील माझें एतद्विषयक मत आणि हल्लींचे तद्विषयक माझें मत ह्यांत एवढाच फरक आहेः--त्या ग्रंथांत मीं मुकाट्यानें असें गृहीत केलें होतें कीं, अशी नुकसानभरपाई केल्यास समाजास एकंदरींत फायदा होईल. पण अलीकडे या गोष्टीचा ज्यास्त काळजीपूर्वक विचार करतां माझा असा समज झाला आहे कीं, (जमीनदारांस) योग्य मोबदल्यासारखें कांहीं देऊं म्हटल्यास एवढी मोठी रक्कम समाजास खर्च करावी लागेल कीं, तो व्यापार एकंदरींत नुकसानीचा होईल. आणि शिवाय माझें असें मत बनलें आहे कीं, सार्वजनिक कारभार हपी-

सरी दोषांनीं पूर्ण भरलेला असल्यामुळें, हल्लींच्या जमिनीच्या खाजगी कारभारापेक्षां त्यापासून ज्यास्त अनिष्टें उत्पन्न होतील..... दुसरें असत्य विधान २०१ पानावर आहे; तें असें:-जमिनीवरील खाजगी मत्तेचें संरक्षण करणाऱ्या सभेचा डायरेक्टर म्हणून हर्बर्ट स्पेन्सरचें नांव राष्ट्रांतील बहुतेक ड्यूकांच्या नांवांबरोबर झळकत आहे..... माझ्या माहितीप्रमाणें अशी सभा मुळींच नाहीं. जिला त्यानें उल्लेख केला आहे ती जर ' स्वतंत्रता व मत्तासंरक्षक मंडळी ' च असेल, तर त्या सभेचा मी सभासद नाहीं. ' पट्ट्या देणारांची संरक्षक सभा' जर त्याच्या मनांत असेल तर ती जमीनरूपी मत्ता संरक्षिण्यासाठीं नसून, जमीन वापरणारांचे हक्क संरक्षण्याकरितां आहे, आणि कौंटी कौंसिल त्यांच्यावर ज्या फाजील मागण्या करितें त्यांस आळाबंदा घालण्यासाठीं मीं तिच्यांत प्रवेश केला आहे......मी जमीनदार वर्गांशीं सामाजिक संबंध (जेवणाखाणाचे वगैरे) ठेवीत असतों असें जें तो म्हणतो, त्याला हें पुरेसें उत्तर आहे कीं, अमेरिकेस मी जाऊन आल्यापासून माझी सारखी इतकी अशक्त प्रकृति राहिलेली आहे कीं, मला समाजांत (जेवावयास वगैरे) जातां येत नाहीं. गेल्या दहा वर्षांत उल्लेखिलेल्या वर्गांशीं मीं एकदां देखील सामाजिक दळणवळण केलेलें नाहीं. माझ्या हेतूंच्या संबंधानें मि० जॉर्जनें केलेल्या अनेक आरोपांना उत्तर देण्याकरितां मीं कांहीं गोष्टी एथें नमूद करितों, त्यांवरून तो म्हणतो त्याच्या अगदीं उलट हेतू दिसून येतात. त्यांतील पहिल्या गोष्टी द्रव्यविषयक फायद्यासंबंधाच्या आहेत. ब्रौनिंगच्या काव्यांतील " मूठभर चांदीसाठीं त्यानें आह्मांस सोडिलें " हें वाक्य त्यानें आपल्या लेखास मुख्य मथाळा म्हणून घातलें आहे. आतां माझ्या कारकीर्दींत प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टी अशा आहेत:-१८५० ते १८६० या पहिल्या दहा वर्षांत मीं प्रसिद्ध केलेल्या प्रत्येक पुस्तकांत माझें नुकसान झालें; कारण, उत्पन्न झालेले पैसे छापण्याचा

खर्च भरून येण्याइतके देखील नव्हते. पुढच्या सरासरी दहा वर्षांत माझ्या पुस्तकांच्या विक्रीचे पैसे इतके अल्प येत होते कीं, त्यांतून माझे जरूरीचे खर्च देखील भागत नसत, म्हणून माझ्या अल्प मत्तेंत सारखा हात घालावा लागे, आणि अशा रीतीनें मी आपलें दिवाळें काढण्याच्याच पंथास लागलों, आणि शेवटीं, ग्रंथ प्रसिद्ध करणें अगदींच बंद केलें पाहिजे अशी मला (ग्राहकांस) नोटीस द्यावी लागली. या नोटिशीचा एक परिणाम असा झाला कीं, अमेरिकेंत मजसाठीं पैसे गोळा झाले. नंतर थोड्या काळानें जेव्हां ही लाट फिरली आणि माझे ग्रंथ फायदेशीर होऊं लागले, तेव्हां मीं काय केलें ? जितक्या काटकसरीनें राहतां येईल तितक्या काटकसरीनें राहून राहील ती शिल्लक वर्णनात्मक समाजशास्त्र तयार करण्याकडे व छापण्याकडे मीं खर्च करूं लागलों, आणि हा माझा क्रम बारा वर्षें चालू होता; आणि शेवटीं वर्षानुवर्षें जाणूनबुजून पैसे खाड्यांत घातल्यामुळें माझें तीन ते चार हजार पौंड नुकसान झालें (मुदलावरील व्याज ध्यानांत घेतल्यास चार हजारांहून जास्त होय). शेवटीं मीं तें काम बंद केलें तें केवळ ह्या प्रमाणावर आणखी पैसे गमवावयाचें मला सामर्थ्य नव्हतें म्हणूनच नव्हे, तर त्या ग्रंथांची मुळींच चहा होईना म्हणूनच होय. मूठभर चांदीला जो भुलणारा असेल त्याचा हा क्रम खचीत नव्हे ! त्याच्या मथाळ्याची दुसरी ओळ "आपल्या कोटास एक फीत लावण्यासाठीं" अशी आहे. हा उतारा मला पदव्यांची हांव आहे असें दर्शविण्यासाठीं दिलेला दिसतो; तसा तो असेल, तर सर्वांना माहीत अशा वस्तुस्थितीशीं असा कोणताच आरोप ह्याहून जास्त असंबद्ध असूं शकणार नाहीं..... मी राजकीय मरातब मिळवूं पाहतों असें तो म्हणतो. ठीक, पण असें जर असेल, तर हल्लीं ज्या मार्गांनीं तो मी मिळवूं पहात आहें, त्यांहून जास्त मूर्खपणाचा मार्ग मला खचीत पसंत क-

रतां आला नसता..... (' समाजशास्त्राचें अध्ययन ' ह्या माझ्या ग्रंथांत) अशास्त्रीय मनाचा मासला म्हणून त्या वेळचा मुख्य प्रधान ग्लाडस्टन ह्याचें मीं उदाहरण दिलें आहे, आणि अलीकडे मुख्य प्रधान लॉर्ड सालसबरी ह्याला, त्याच्या कोटिक्रमाची थट्टा करण्याकरितां मीं निवडिला आहे. एवंच, सरकार जे मानमरातब देतें ते मिळविण्यासाठीं, ज्या दोन माणसांच्या हातीं ते देण्याचें होतें, त्यांजबद्दल मी अपमानपूर्वक बोललों आहें ! "

जॉर्जच्या पुस्तकाचा प्रकाशक केगनपॉल यास त्यानें ता० १० जानेवारी १८९३ रोजीं असें लिहिलें:—" हेन्री जॉर्जचें गोंधळलेला तत्त्ववेत्ता." हें पुस्तक तूं प्रकाशित केल्याची आज सकाळची जाहिरात आहे. तूं त्या पुस्तकाकडे पाहिलें आहेस काय ? तुला फारसें पाहणें नको. मलपृष्ठावरील ब्रौनिंगमधील उतारा वाचिलास तरी पुरे. त्यामध्यें गर्भित केलेल्या सादृश्याला काय आधार आहे ह्याचा निर्णय करण्याइतकी बहुधा तुला माझ्या कारकीर्दीची माहिती आहे. तर त्या पुस्तकाचा प्रकाशक म्हणून त्याच्याशीं संबंध ठेवणें तुला इष्ट वाटतें काय ? "

ता० १२ जानेवारी रोजीं तो त्याच्या उत्तरावर लिहितो:— " विचारयुक्त टीका मग ती कितीहि कडक असेना, तिला मी प्रत्यवाय घेतों असें दाखविणारें माझ्या पत्रांत कांहींहि नव्हतें. माझा पूर्वेतिहास तुला माहीत असतां, माझ्या मतांवर हल्ला करण्याच्या मी विरुद्ध आहें असें त्वां गृहीत करावें ह्याचें मला आश्चर्य वाटतें. पण मीं त्या पुस्तकास " विस्तृत बदनामी " असें नांव दिलें होतें; आणि मला वाटलें, बदनामी करणाऱ्या विधानांचा प्रसार करण्याच्या कामीं द्वारभूत होणें तुला कदाचित् आवडणार नाहीं."

ता० १ मार्च १८९३ रोजीं तो जेम्स स्किल्टनला लिहितो:— " तूं पुष्कळ अंशीं किंवा मुख्यत्वेंकरून सामान्य प्रश्नाकडे पाह-

तोस, पण मला तो (प्रस्तुत वादाच्या संबंधानें) मुळींच महत्त्वाचा वाटत नाहीं. " संघटनात्मक तत्त्वमीमांसा " स्वताची काळजी करण्यास समर्थ आहे..... जमिनीच्या प्रश्नाचीहि गोष्ट अशीच आहे. त्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीच्या संबंधानें हेन्री जॉर्जशीं वादांत शिरण्याचें माझ्या कधींच स्वप्नीं आलेलें नाहीं..... मला ज्या प्रश्नाशीं कर्तव्य आहे तो केवळ व्यक्तिविषयक होय, म्हणजे जी (माझी) नीच बदनामी तो माणूस पसरीत आहे, त्यासंबंधानें माझें बोलणें आहे, आणि ती हाणून पाडण्याकरतां कांहीं करणें जरूर आहे किंवा नाहीं एवढाच काय तो (आपल्यापुढें) प्रश्न आहे."

त्याची अशी इच्छा होती कीं, आपण स्किल्टनला कळविलेल्या गोष्टी बरोबर आहेत, अशी एक हून ज्यास्त असामींची खात्री मिळावी. त्या इच्छेस अनुसरून जॉर्जनें आणिलेल्या आरोपांना न्यूयॉर्कमधील त्याच्या मित्रांपैकीं कांहींनीं मिळून उत्तर तयार केलें, आणि ता० १२ नवंबर १८९४ च्या " ट्रायब्यून " च्या अंकांत प्रसिद्ध केलें. तें त्यास इंग्लंदांत मिळाल्यावर त्यासंबंधानें ता० २९ नवंबर १८९४ रोजीं तो स्किल्टन यास लिहितो:—" ह्या जॉर्जविषयक कामांत तूं इतके श्रम घेतलेस त्याबद्दल मी तुझा आभारी आहें. ही व्यवस्था करण्याच्या मार्गांत कांहीं अडचणी होत्या त्या सुदैवानें आतां सर्व टळल्या आहेत, आणि अखेर परिणाम माझ्या इच्छेप्रमाणेंच झाला आहे. आतां मि० जॉर्जनें कांहींहि म्हटलें तरी त्याची जी ही फजिती झाली आहे ती मला वाटतें, नाहींशी व्हावयाची नाहीं..... आतां हेन्री जॉर्ज व त्याचीं मतें ह्यांचा समाचार घेऊन, त्याच्यावर ब.जूनें हल्ला करण्याचें तुझ्या मनांत येत असेल, तर बेलाशक' कर, पण जर तो तूं केलास तर माझें नांव किंवा मतें त्यांत न आणण्याबद्दल मेहरबानीकरून काळजी घे. त्यांत कोणत्याहि रीतीनें गुंतलें जाण्याची माझी इच्छा नाहीं."

ता० १३ दिजंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः–" थोड्या दिवसांपूर्वीं मीं असें ठरविलें कीं, अमेरिकेंतील ह्या घाणेरड्या प्रकरणाचा शेवटचा निकाल लावण्याकरितां, ह्या पत्राबरोबर पाठविलेल्या प्रस्तावनेंत उल्लेखिलेलें चोपडें तेथें छापणें बरें, कारण त्यांत जॉर्जला प्रत्यक्ष उत्तर दिलेलें नसून अप्रत्यक्ष रीत्या त्यानें केलेल्या आरोपांचा समाचार घेतलेला आहे. पण त्यानंतर माझें असें मत झालें आहे कीं, असें करणें शहाणपणाचें कदाचित् होणार नाहीं, कारण तें चोपडें तो म्हणतो तें सर्व जरी खोडून काढील, तरी आणखी शिव्या देण्यास त्यास त्यांत मजकूर सांपडेल. म्हणून तुझें व तुझ्याबरोबर सह्या करणाऱ्या इतरांचें ह्या मुद्यावर मत घेण्याकरितां ती प्रस्तावना मी तुजकडे पाठवीत आहें.....ह्यावरून तुला दिसून येईल कीं, हा वादविवाद पुढें चालविण्याची मि० जॉर्जला संधि देण्याच्या कामीं मी जरासा कांकू करितों, आणि त्यामुळेंच त्याच्याशीं स्वतंत्ररीत्या लढाई करण्याच्या तुझ्या बेतासंबंधानेंहि मी जरा कचरतों. "

ता० २४ दिजंबरः—" हेन्री जॉर्जच्या संबंधानें कोणता मार्ग स्वीकारणें उत्तम होईल, ह्याबद्दल माझीं पुनः दोन मतें झालीं आहेत. मि० जॉर्जच्या विरुद्ध (आपण) कितीहि जोरदार खटला तयार केला, तरी तो वाद करीत, आणि असंबद्ध गोष्टींसंबंधानें असंबद्ध प्रश्न काढीत व वाढवीत राहीलच. म्हणून शहाणपणाचा मार्ग हा आहे कीं, त्याच्यावर एक चांगला डाव करावा, आणि थांबावें. जमीनदारांची जमीन समाजानें घ्यावयाची असेल तर त्यांची नुकसानभरपाई केलीच पाहिजे असें मीं जें म्हटलेलें आहे, त्यास " प्रगति व दारिद्र्य " ह्या त्याच्या ग्रंथांत त्यानें मुळींच उल्लेख केलेला नाहीं असें मला वाटतें; आणि हा माझा अंदाज जर खरा असेल, तर हा मुद्दा त्याच्याविरुद्ध त्वां काढावा. "

ता० १२ जानेवारी १८९५:–" खऱ्याखुऱ्या लढाईत लबाड्या

आणि फसवेगिऱ्या हीं लढाईचीं अगदीं योग्य हत्यारें म्हणून समजलीं जातात. एका कामकरी मंडळवाल्याच्या भाषणांत कांहीं काळापूर्वीं मीं वाचिलें कीं, ते लोक आपल्या मालकांशीं आपले संबंध लढाईचे आहेत म्हणून समजतात, आणि म्हणून सामान्यतः गुन्हेगारीचीं म्हणून समजलीं जाणारीं कृत्यें (त्यांच्या विरुद्ध करणें) योग्य मानितात. मि० जॉर्जचें व जमीन राष्ट्रीय करूं पहाणारांचें निःसंशय असेंच मत आहे. आणि म्हणून स्वोद्देशासिद्ध्यर्थ सर्व नैतिकबंधन झुगारण्यास ते तयार आहेत. हें सध्यांचें कृत्य त्यानें अशाच मुद्यावर केलें आहे, व तें त्याच्या इतर सर्व कृत्यांशीं जुळतेंच आहे. आमच्या ह्या देशांतहि ह्याच मुद्यावर तसलीं कृत्यें होत आहेत. ' डेली क्रॉनिकल ' मधील पत्रव्यवहार व तुजकडे पाठविलेलें चोपडें पुनः छापूं नको म्हणून मीं तुला जरी लिहिलें, तरी मला न विचारतां तूं तें स्वतंत्र छापिलें आहेस.....एकंदर जमिनीच्या प्रश्नावर एक लहानसा ग्रंथ माझ्या मतांच्या आणखी स्पष्टीकरणार्थ म्यां लिहावा, ह्या तुझ्या सूचनेला मला रुकार देतां येत नाहीं. कारण सामान्य सामाजिक तत्त्वांच्या आधारें माणसांचे जमिनीशीं संबंध काय येतात, ह्यासंबंधानें मला म्हणावयाचें होतें तें मीं सर्व आधींच म्हटलेलें आहे. "

वरच्या पत्रांत उल्लेखिलेलें चोपडें " जमीन परत करणारी मंडळी " नांवाच्या सभेनें तयार केलें होतें, आणि त्यांत " सोश्यल स्टॅटिक्स " व " जस्टिस " ह्या त्याच्या ग्रंथांतील उतारे, त्याच्या संमतीनें, समोरासमोर दिलेले होते.

हें प्रकरण एथें मिटलें असतें, पण ग्यारिसन नांवाच्या गृहस्थानें न्यूयॉर्कमध्यें ता० ६ जानेवारी १८९५ रोजीं एक व्याख्यान दिलें त्यावरून तें पुनः उद्भवलें. त्यासंबंधानें स्पेन्सरनें ता० २२ जानेवारी १८९५ रोजीं विल्यम यूमन्स यास (डा०

यूमन्सचा भाऊ) असें लिहिलें:–" स्किल्टननें मला ग्यारिसनच्या व्याख्यानाची जी हकीकत पाठविली आहे तिजकडे पाहतां, मी आपल्या मूळ समजुती बदलिल्या आहेत अशी तिकडील लोकांची समजूत झालेली दिसते, व ती काढून टाकणें जरूर आहे असें मला स्पष्ट वाटतें. जमिनीच्या मालकीच्या संबंधानें मीं आपली मतें बदलेलीं आहेत असें गृहीत करून, त्या आधारावर जॉर्जच्या सर्व शिव्या व हें व्याख्यान रचलेलें आहे, पण तद्विषयक माझीं मतें बदलेलीं नसून, जमिनीची मालकी समाजानें हातीं घेणें अर्थशास्त्रदृष्ट्या फायद्याचें आहे किंवा नाहीं ह्यासंबंधानेंच माझें मत बदलेलें आहे. ही गोष्ट स्पष्टपणें सिद्ध केल्यास, जॉर्जच्या शिडांतून वारा काढून घेतल्यासारखें होणार आहे. म्हणून ही गोष्ट ज्यांत सिद्ध केली आहे अशा एका पत्राचा मसुदा ह्या पत्रासोबत मी तुजकडे पाठवितों; आणि तें न छापण्यास प्रबल कारण तुला दिसलें तर गोष्ट निराळी; नाहींतर, तूं किंवा डा० जेम्स, किंवा स्किल्टन यांनीं तें ' ट्रायब्यून ' मध्यें इतरत्र किंवा शक्य किंवा असल्यास पुष्कळ वर्तमानपत्रांत, छापिल्यास मला आनंद होईल. "

स्किल्टन व यूमन्स यांच्या सल्ल्यानें हें पत्र जमिनीच्या प्रश्नांवरील चोपड्याची प्रस्तावना म्हणून छापिलें; आणि ह्यापुढें जॉर्जच्या म्हणण्याकडे त्यानें मुळींच लक्ष दिलें नाहीं.

तिसरा वाद व्यक्तिसंपादित विशेष वंशपरंपरेनें संक्रान्त होतात किंवा नाहीं ह्यासंबंधानें डाक्टर वीसमन ह्या जर्मन शास्त्रवेत्त्याशीं झाला. ह्यासंबंधानें ता० ६ मार्च १८९० च्या ' नेचर ' पत्रांत त्यानें असें म्हटलें कीं, " व्यक्तिसंपादित विशेष वंशपरंपरा संक्रान्त होत नाहींत असें जे म्हणतात त्यांनीं, डार्विननें ह्यासंबंधानें गोळा केलेला सर्व पुरावा कुचकामाचा आहे, असें प्रथम सिद्ध केलें पाहिजे. " ह्यावर प्रो० रे लांकास्टर यानें ता० २७ मार्चच्या ' नेचर '

मध्यें असें लिहिलें कीं, " जीवशास्त्रज्ञांनीं डार्विननें दिलेल्या उदाहरणांचा अगोदरच निकाल लाविलेला आहे; आणि ही गोष्ट ज्या ग्रंथांत केलेली आहे तो स्पेन्सरच्या पाहण्यांत आला नाहीं ही अत्यन्त दुर्दैवाची गोष्ट होय. " यासंबंधानें हावर्ड कॉलिन्स यास स्पेन्सर ता० १ एप्रिल १८९० रोजीं लिहितो:—" ' उपयोग आणि उपयोगाभाव ह्यांचे वंशपरंपरागत परिणाम ' ह्या विषयावर, किंवा " नैसर्गिक निवड बंद होणें " (panmixia) हें (पुरुषांच्या स्तनासारख्या) उपयोगांत न आणिलेल्या इंद्रियांचा आकार कमी होण्यास जे पुरें कारण समजतात त्यांच्यापुढें एक कोडें मांडण्याकरितां, ' नेचर ' पत्रास एक लहानसें पत्र मीं लिहिलें आहे.

पाळींव बनलेल्या पुष्कळ प्राण्यांचे कान लोंबते असतात हें उदाहरण मीं (त्या पत्रांत) घेतलें आहे. मीं दाखविलें आहे त्याप्रमाणें, ह्या गोष्टीच्या संबंधानें पहिल्या ज्या मुद्यावर जोर द्यावयाचा तो हा कीं, पाळींव प्राण्यांमध्यें व्यक्तीच्या तगावासाठीं एखाद्या इंद्रियाच्या पोषणांत काटकसर करणें महत्त्वाचें बनेल अशा रीतीची स्वाभाविक किंवा कृत्रिम निवड चालत नाहीं, आणि, वास्तविक रीत्या, उपयोगांत न आणिलेल्या इंद्रियांत कमीपणा उत्पन्न होईल अशी पोषकद्रव्यांची काटकसरीची वांटणी झाल्यामुळें मुळींच व्यक्ति तगाव धरीत नाहींत. ह्याशिवाय, दुसऱ्या ज्या मुद्यावर जोर द्यावयाचा तो हा कीं, हे स्नायु (कानांचे) इतक्या अत्यन्त लहान आकाराचे असतात कीं, त्यांच्या पोषणांत कितीहि काटकसर केल्यानें, जीवनार्थ कलह ज्यांस करावा लागतो आणि पोषकद्रव्यांच्या काटकसरीच्या विभजनानें ज्यांचा फायदा होतो, त्या प्राण्यांचेंहि जिणें तेणेंकरून बदलत नाहीं. ह्या शेवटच्या मुद्यावर विशेष जोर देण्यासाठीं, गाईमध्यें कान हालवणाऱ्या स्नायूंचीं वजनें काय आहेत तीं कोणी पाहील व सांगेल तर चांगलें. "

त्याला आपल्या ह्या म्हणण्याचें मण्डन जीवशास्त्रज्ञांशींच करावें लागलें असें नाहीं, तर इतरांशींहि करावें लागलें. उदाहरणार्थ, ग्लासगो युनिव्हर्सिटीचा रेक्टर या नात्यानें १८९१ च्या नवंबरांत बाल्फोर यानें केलेल्या भाषणांत असें म्हटलें कीं, "मानवविषयक आपल्या क्लृप्तींच्या प्रत्येक शाखेंत 'संपादित विशेषांची संक्रान्ति' ही गोष्ट स्पेन्सरनें इतकी सारखी लाविलेली आहे कीं, ती जर चुकीची ठरली तर त्याचें नीतिशास्त्र, मानसशास्त्र, आणि मानवशास्त्र हीं सर्व उलथून पडतील असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं." तेव्हां त्याच्या व्याख्यानांतील ह्या व इतर मुद्यांना उत्तर द्यावें किंवा नाहीं, व दिल्यास कोणत्या स्वरूपानें द्यावें, ह्यासंबंधानें त्याचा हावर्ड कॉलिन्सशीं पुढील पत्रव्यवहार झाला:—

ता० ३० नवंबर १८९१:—"सेंद्रिय उत्क्रमणाचीं उपपादक कारणें" ह्याची एक प्रत बाल्फोरकडे मीं पाठविली आहे. 'दाढ' ह्या विषयावरील तुझें चोपडें 'संपादित विशेषांची संक्रान्ति' ह्या विषयाशीं संबद्ध म्हणून त्याजकडे पाठविलेंस तर कसें ?"

ता० ६ दिजंबर:—"बाल्फोरच्या विरुद्ध जे मुद्दे काढावयाचे आहेत ते सांगतांना तुझ्या कोटिक्रमाच्या दिशा काय आहेत त्या दिसाव्या एतदर्थ त्यांचे मथाळे देण्यापलीकडे कांहीं करूं नको."

ता० ७ दिजंबर:—बाल्फोवरील तुझ्या आर्टिकलाबद्दल मी कांकूं करीत आहें. तूं काढिलेल्या मुद्यांपैकीं बरेच चांगले आहेत, जरी मीं स्वतः काढिले असते असे दोन तूं गाळिले आहेस. पण त्यास निरुत्तर करील अशा रीतीनें उत्तर द्यावयाचें नसेल तर न दिलेलेंच बरें, आणि म्हणून मला वाटतें मीं त्याची (आर्टिकलाची) बरीच बारीक रीतीनें छाननी करणें जरूर आहे. पण तसें करण्याला मला जरूर ती शक्ति नाहीं..... शिवाय त्यावरून वादविवाद सुरू व्हावयाचाच. उदाहरणार्थ, लिली तुजवर शस्त्र उचलील, आणि सरतेशे-

वटीं मला वादांत शिरावें लागेल. म्हणून मला सुरक्षित मार्ग असा दिसतो कीं, ' बाल्फोरपुढें कांहीं प्रश्न ' मांडावे, व त्या लेखास तोच (' बाल्फोरकरितां कांहीं प्रश्न ') मथळा द्यावा. "

ता० १२ दिजंबर:—" अनिष्ट करण्याचा मोह जसा टाळावा लागतो तसा कधीं कधीं इष्ट करण्याचाहि टाळावा लागतो, आणि ह्याचें प्रस्तुत उदाहरण बाल्फोरला उत्तर देण्याचा मोह मीं टाळिला हें होय. तो फार जोरदार मोह आहे, आणि आज दोन वर्षें माझ्यावर सारखे हल्ले होत असल्यामुळें जरासा सणसणीत वाद करणें मला फार बहारीचें वाटलें असतें. "

ता० २२ जानेवारी:—" नुक्तेंच ' आथीनियम'च्या एका सभासदानें एका डाक्टरानें केलेले कांहीं नवीन शोध मला कळविले; त्यांवरून, मला वाटतें, असें दिसतें कीं, इतर लोकांपेक्षां क्केकरपंथीय लोकांत रंगविषयक अंधत्व जास्त दिसून येतें, आणि त्या विषयावर त्यानंतर विचार करतां मला असें आठवलें कीं, इतर लोकांपेक्षां क्केकर लोकांना गाण्याचा कान कमी असतो, असें बहुधा डार्लिंग्टन एथें कोणीं शोधून काढिलें होतें. आतां ह्या दोन गोष्टी जर सिद्ध करतां आल्या, तर त्यांवरूनच उपयोगाभावाचे परिणाम वंशपरंपरा संक्रान्त होतात हें सिद्ध होणार आहे. (तेव्हां) ह्या दिशेनें तूं खटपट करून पहा. "

' दाढ ' ह्या विषयावरील कॉलिन्सचें वर सांगितलेलें चोपडें स्पेन्सरच्या सांगण्यावरून त्यानें तयार केलें होतें. तें प्रसिद्ध करण्यापूर्वीं त्याचें संक्षिप्त सार काढून तें त्यानें 'नेचर' पत्रास पाठविलें होतें, पण त्या पत्रानें त्याजवर कांहींच अभिप्राय दिला नाहीं. त्यावरून ह्या बाबतींत संपादक पक्षपात करीत आहेत कीं काय असा स्पेन्सर यास संशय आला, व त्यानें तो व्यक्त केला म्हणून पुढें खुद्द त्या चोपड्यावर जेव्हां (ता० ६ आगस्ट १८९१ रोजीं)

अभिप्राय आला, तेव्हां आपण पक्षपात करीत नाहीं असें संपादकानें म्हटलें. १८९२ च्या आक्टोबरांत ' नेचर ' च्या ह्या एकपक्षीय धोरणासंबंधानें पुनः आपला असंतोष स्पेन्सरनें व्यक्त केला, आणि म्हटलें कीं, " मी ही गोष्ट इतकीच राहूं देणार नाहीं; आणि पुरावा दाबून टाकण्याची ही प्रवृत्ति कायम राहिल्यास मीं ती उघडकीस आणण्यास सोडणार नाहीं, मग त्याचें प्रायश्चित मला काय पडेल तें पडो. " ह्यासंबंधानें त्यानें त्या पत्राचा संपादक प्रसिद्ध ज्योतिःशास्त्रज्ञ नार्मन लॉकीयर यास ता० १९ नवंबर १८९२ रोजीं असें लिहिलें:—" ' उपयोग व वंशपरंपरासंक्रान्ति ' यावरील यासोबत पाठविलेलें कॉलिन्सचें पत्र तूं वाचिलें नाहीं, आणि तूं नव्हे तर तूं तें ज्याच्याकडे अभिप्राय देण्यासाठीं पाठविलेंस त्यानें तें नाकारिलें, असें मीं समजून चालतों. तें महत्त्वाचें पत्र आहे, कारण त्यांत काळजीपूर्वक केलेल्या शोधांपासून निष्पन्न झालेले सिद्धान्त गोंविलेले आहेत. आणि त्यांचा ज्या प्रश्नाशीं संबंध आहे तो प्रश्न शास्त्रज्ञ ज्यांचा हल्लीं विचार करीत आहेत त्यांपैकीं अत्यन्त महत्त्वाचा आहे; कारण मानवी स्वभावघटना, मानवी प्रगति, आणि मानवी कायदे, यांच्याबद्दलच्या मूलभूत भावनांशीं त्याचा संबंध आहे. आज कित्येक दिवस अशी गोष्ट उघड दिसूं लागली आहे कीं, ह्या प्रश्नावरील वादाची विशिष्ट बाजू जे घेतील त्यांच्यावर मेहरनजर करावयाची असें ' नेचर ' पत्राचें धोरण बनलें आहे..... कर्मधर्मसंयोगानें येत्या सोमवारीं मीं एक पत्र लिहावयास सुरुवात करणार असून त्यांत या गोष्टीचा माझ्या मतें निर्णायक असा नवा पुरावा मी देणार आहें, आणि अर्थात् माझा उद्देश तें ' नेचर ' पत्रास पाठविण्याचा होता. पण सद्यःस्थितींत तसें करण्यांत अर्थ दिसत नाहीं, आणि म्हणून लोकांमध्यें तो पुरावा निराळ्या रूपानें मला पसरावा लागेल. "

ता० २३ दिजंबर रोजीं पुन: पत्र लिहून कॉलिन्सचें पत्र नाकारण्याकरितां संपादकानें दिलेल्या कारणांचें त्यानें परीक्षण केलें. संपादकानें तसें करण्याकरितां दिलेल्या कारणांपैकीं मुख्य कारण हें होतें कीं, " व्यापारविभिन्नतेमुळें कांहीं जातींत दाढांच्या आकारांत झालेल्या फरकासंबंधानें कालिन्सनें दाखविलेले आधार पुरेसे नाहींत. " स्पेन्सरच्या मतें हा पुरावा मान्य करण्यास पुरेसा जोराचा होता. इकडे त्यानें एतद्विषयक सामान्य प्रश्नाचें विवेचन करण्याची तयारी चालविली होतीच. त्यासंबंधानें " कॉन्टेम्पोररी रिव्ह्यू"च्या संपादकास ता०२१ नवंबर १८९२ रोजीं त्यानें असें लिहिलें:—" मी एक आर्टिकल लिहिण्याचा विचार करीत आहें, त्यांत नैसर्गिक निवडीचीं कांहीं अंगें ज्यास्त निश्चित विचार करण्यासाठीं पुढें आणण्याचा माझा हेतु आहे, आणि त्यांत मी असें दाखविणार आहें कीं, ही नैसर्गिक निवड एकटीच घेतल्यास सेंद्रिय उत्क्रमणाच्या सर्व गोष्टींची उपपत्ति लावण्यास ती अगदीं अपुरी आहे. ह्याबद्दलच्या तीन कारणांपैकीं दोन मीं अगोदरच दर्शविलेलीं आहेत; पण आतां मीं त्यांचें ज्यास्त विस्तृत विवेचन करण्याचें आणि जे नैसर्गिक निवड पुरेशी समजतात त्यांस आव्हान करण्याचें योजिलें आहे; आणि मला ह्या ज्या दुर्लंघ्य अडचणी वाटतात त्यांची वासलात तुम्ही कशी लावतां असें त्यांस मी विचारणार आहें. तिसरें कारण अगदीं नवें आहे, आणि तें नुक्तेंच माझ्या ध्यानांत आलें आहे. "

ह्याबरहुकूम " नैसर्गिक निवडीचा अपुरेपणा " म्हणून एक लेख त्या मासिकाच्या फेब्रुवारी व मार्च १८९३ ह्या दोन महिन्यांच्या अंकांत प्रसिद्ध झाला. त्यामुळें आर्गाइलच्या ड्यूकाचा त्याच्याशीं पत्रव्यवहार प्रथम सुरू झाला. त्याच्या पत्रास ता० ८ मार्च १८९३ रोजीं त्यानें असें उत्तर लिहिलें:—" तुझें ता० ४ चें गोड शब्दांनीं लिहिलेलें पत्र पाहून मी उपकारी झालों आहें, आणि तुझें,

सर्वांशीं नाहीं तरी कांहीं अंशीं, माझ्याशीं मतैक्य आहे हें पाहून मला संतोष वाटतो. तुझी माझी गांठ पडल्याची तूं मला आठवण देतोस त्याचें मला स्मरण आहे, तरी तूं म्हणतोस तेथें व त्या वेळीं तुझी गांठ पडल्याचें मला स्मरत नाहीं. मला वाटतें, ग्लाडस्टन हार्लेस्ट्रीटमध्यें रहात होता तेव्हां ती पडली होती..... "कॉन्टेम्पोररी"मधील लेखास थोडचाशा पुरणिका जोडून पुढच्या महिन्यास तो छापून इंग्लंद, युरोप व अमेरिका एथें चोहोंकडे पसरण्याचा माझा हेतु आहे. नीग्रो लोकांच्या उदाहरणाकडे माझें लक्ष्य लाविल्याबद्दल त्यांपैकीं एका पूरणिकेंत मी तुझे आभार मानूं काय ? योजित पूरणिकांपेकीं एकींत तुझ्या पत्रांत ज्या मुद्यांवर टीका केलेली आहे त्यांचा विचार मी करणार आहें. म्हणजे, नैसर्गिक निवडीबद्दलच्या समजुतीच्यासंबंधानें जीवशास्त्रज्ञांमध्यें असलेल्या गैरसमजास त्यांत मी उल्लेख करणार आहें, आणि असें दाखविणार आहें कीं, एका (खऱ्या) अनुमानावरून दुसरें एक खोटें अनुमान काढून प्रत्यक्ष निरिक्षणावरून सिद्ध होणाऱ्या कांहीं गोष्टी ते शास्त्रज्ञ खाट्या ठरवूं पहात आहेत. (मीं) सांगितलेल्या दोन कारणांनींच उत्क्रमण–मताची उपपत्ति लागण्यास अनेक अडचणी येतात हें मला अगदीं मान्य आहे, पण आणखी एक कारण पुढें आणण्यास मी कचरतों, कारण जे प्रश्न न उकलणारे म्हणून दिसतात, ते (ते उकलण्याची) सरणी दाखविल्यानें एकदम कसे उकलतात हें मला ठाऊक आहे."

स्पेन्सरच्या वरील लेखानें ह्या विषयावर जोराचा वादविवाद सुरू झाला. ता० १९ फेब्रुवारी १८९३ च्या 'नेचर'च्या अंकांत डा० चामर्स मिचेल यानें असें दाखविलें कीं, "'नैसर्गिक निवडीची बंदी' (paumixia) एतद्विषयक वीसमनचें म्हणणें स्पेन्सरला बरोबर समजलें नाहीं. त्या मताचा, 'लहान लहान पोट-उपजातींची निवड,'

हा अर्थ नसून ' विशेष लहान किंवा विशेष कच्च्या पोटजातींच्या विध्वंसाची बंदी ' हा आहे. " एप्रिलच्या ' कान्टेम्पोररी रिव्ह्यू'त रोमानीसनें असें दाखविलें कीं, " एतद्विषयक जुनें मत व नवें मत ह्यांमधील भेद स्पेन्सरच्या लक्षांत आलेला नाहीं; जुनें मत ' निवडीची उलट ' असें होतें, आणि नवें मत ' निवडीची बंदी किंवा निवड बंद होणें ' असें आहे; आणि ह्या दोन्हींमुळें अवनति (पूर्वींहून हलक्या दर्जाच्या प्राण्यांची उत्पत्ति) होत असते. " यामुळें प्रो० रोमानीसशीं पुढें कांहीं महिने स्पेन्सरचा पत्रव्यवहार झाला, पण त्यामुळें त्या प्रश्नाचा ज्यास्त उलगडा मुळींच झाला नाहीं.

स्पेन्सर इकडे ' प्रो० वीसमनच्या क्लप्तचा ' म्हणून एक नवें आर्टिकल तयार करीत होता; तें ' कान्टेम्पोररी रिव्ह्यू'च्या मे महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालें, आणि पूर्वींच्या लेखांची पूरणिका म्हणून तें त्यानें पसरून दिलें. त्याच्यावर प्रो० टिंडालनें असा अभिप्राय दिला कीं, " त्यांत तूं जोराचा कोटिक्रम केलेला आहेस, पण ह्या वादांतून तूं एकदां मोकळा होशील तर बरें असें मला वाटतें. "

सर एडवर्ड फ्राय यानें ' ब्रिटिश शेवाळी ' म्हणून एक ग्रंथ लिहिला होता त्याची एक प्रत स्पेन्सरकडे पाठविली, आणि असें म्हटलें कीं, " ह्या शेवाळी उत्पन्न होण्याच्या निरनिराळ्या पद्धतींकडे पाहतां त्यावरून प्रो० वीसमनची क्लप्ति खोटी ठरण्यास जबर पुरावा सांपडतो. " त्यावर ता० ७ जून १८९३ रोजीं त्यानें त्यास असें लिहिलें:—" तुझें पत्र व त्याबरोबर आलेला ग्रंथ ह्यांबद्दल मी तुझा फार आभारी आहें. त्यांत गोंविलेल्या गोष्टी ' कॉन्टेम्पोररी'मधील लेख लिहितांना मला माहीत असत्या तर त्यांचा मला फार उपयोग झाला असता. मला असें दिसतें कीं वीसमनच्या क्लप्तीची वासलात लावण्यास तेवढ्याच पुरे आहेत; ती क्लप्ति जीवशास्त्रज्ञांनीं मान्य केली हें त्यांस मोठें लांछन आहेसें मला वाटतें.

सामान्य जीवघटक द्रव्यापासून भिन्न असें बीजघटक द्रव्य आहे, ही (वीसमनची) क्लृप्ति मला निवळ खोटी भासते; तिची आवश्यकता मुळींच नसून प्रत्यक्ष गोष्टींचा पुरावाहि तिच्या अगदीं विरुद्ध आहे; आणि शेवाळ्यांच्या ठिकाणीं दिसणारे जे चमत्कार त्यांवरून अगदीं स्पष्ट रीत्या असें दिसतें कीं, जीवघटक द्रव्य एकच असून त्यास योग्य परिस्थितींत ठेविलें म्हणजे तें ज्या जीवाचें असेल तो जीव तें उत्पन्न करितें; या योग्य परिस्थितींपैकीं एक अशी आहे कीं, शरीरघटक द्रव्याचें फारसें विभिन्नीकरण झालेलें नसावें. "

वीसमनच्या बाजूनें प्रो० रोमानीस जुलैच्या " कान्टेम्पोररींत " पुनः पुढें आला, आणि आपल्या लेखाचें प्रुफ त्यानें स्पेन्सरकडे पाठविलें, तेव्हां त्याजबरोबर छापण्यास त्यानें एक टीप लिहून पाठविली. प्रो० मार्कस हार्टलॉग यानें त्याच अंकांत वीसमनविरुद्ध एक लेख लिहिला, आणि आल्फ्रेड रसेल वॉलेस यानें या विषयावर एक लेख " फार्टनाइटलीं " त लिहिला होता त्यावरहि त्यानें त्यांत टीका केली. वालेसच्या मताच्या संबंधानें हार्टलॉगला स्पेन्सरनें अगोदरच (ता० ९ मे १८९३) असें लिहिलें होतें:—' फॉर्टनाइटली'मधील वॉलेसच्या लेखाकडे तूं पाहिलेंस काय ? तो जें अर्थविहीन लिहीत आहे त्याचें मला आश्चर्य वाटतें. वादाचा प्रश्न काय आहे हें समजण्यास तो अक्षम आहे. त्या लेखांत एके ठिकाणीं त्यानें (आमची) सर्व गोष्ट कबूल केल्यासारखी केली असून त्यानें तसें केलें आहे हें त्याच्या लक्ष्यांत आलेलें दिसत नाहीं. हें तरी निदान त्याच्या निदर्शनास चांगलें आणून दिलें पाहिजे; कारण त्यानें अशा रीतीनें जणूं काय आत्महत्त्या केली असल्यामुळें समाचार घेण्यास एक प्रतिपक्षी तेवढा कमी झाला आहे. "

आतां, " नैसर्गिक निवडीचा पूर्ण पुरेपणा " ह्या नांवाचा लेख लिहून प्रो० वीसमन स्वतः ह्या वादांत शिरला. त्यांतील प-

हिल्या भागांत स्पेन्सरला उत्तर दिलेलें असून तो सपटंबरच्या 'कॉन्टेम्पोररीं'त प्रसिद्ध झाला, आणि दुसरा भाग आक्टोबरांत प्रसिद्ध झाला. 'तुझ्या मनांत त्यास उत्तर द्यावयाचें नसल्यास मी देतों', असें हार्टलॉगनें स्पेन्सरला लिहिल्यावरून त्यास त्यानें ता० २२ सपटंबर १८९३ रोजीं उत्तरीं असें लिहिलें:—“ मीं वीसमनचा समाचार न घेतल्यास तूं घेण्यास तयार आहेस ह्याबद्दल मी तुझा आभारी आहें. पण मींच स्वतः त्याला उत्तर देण्याचें ठरविलें आहे, आणि हल्लींच तें तयार करण्यांत गुंतलों आहें.....तथापि तूं हा विषय मनांत ठेविल्यास, आणि तूं दिग्दर्शन केलें आहेस तो कोटिक्रम घालून लेख बनवण्यास तयार असल्यास, बरें होईल. असला लेख तूं लिहिल्यास, 'समाज करून राहणाऱ्या कीटकांच्या विशिष्टीभवनांची उपपत्ति, तीं विशिष्टीभवनें नैसर्गिक निवडीमुळें झालीं आहेत अशीच काय ती लावतां येते' अशी कबुली देऊं नको. (कारण) त्यांची इतर रीतीनें उपपत्ति लावतां येते असें प्रतिपादन मी करीत आहें.”

स्पेन्सरनें वीसमनला दिलेलें उत्तर १८९३ च्या दिजंबरच्या 'कान्टेम्पोररीं'त प्रसिद्ध झालें, आणि १८९३ च्या आक्टोबरांत “वीसमनचें मत—पुनः एकवार” म्हणून दुसरा एक लेख त्यानें लिहिला. त्याची एक प्रत डेव्हिड शार्पला त्यानें पाठविली, तेव्हां त्यानें त्यास ता० २८ आक्टोबर १८९४ रोजीं असें लिहिलें:—

“'वीसमनचें मत—पुनः एकवार' याची निराळी प्रत मला पाठविलीस त्याबद्दल मी तुझा फार आभारीआहें; त्यांतील हर्टविगसंबंधाची शेवटच्या पानावरील पूरणिका मीं पूर्वीं पाहिली नव्हती, ती मला फार चांगली व चित्तवेधक वाटते. पुनरुत्पादनाच्यासंबंधानें उत्क्रान्तिवादी शेवटीं जें मत बनवतील, तें वीसमनच्या अगदीं उलट असेल. मला वाटतें, वीसमनबद्दल तुला आतां ज्यास्त त्रास करण्याचें

कारण नाहीं. लवकरच त्याच्या क्लृप्तीवर कोणीहि विश्वास ठेवीत नाहींसा होईल असें मला वाटतें. ज्या भयंकर ' क्ष 'ला (अज्ञात गोष्टीला) आपण ' वंशपरंपरा ' म्हणून म्हणतों त्याची खरी कल्पना उत्पन्न करण्याचा तिच्यांत यत्न केलेला होता ही तिची किंमत होती. माझ्या मतें तुझ्या कामाचा सर्वांगसुंदरपणा उत्पन्न होण्यास आणि त्याच्या कायमच्या किंमतींत भर पडण्यास वीसमनला उलथून पाडण्याची जरूर नाहीं, तर तुझ्या मूळच्या रेखाटणींत निरिंद्रिय आणि सेंद्रिय यांच्या संबंधांवर जें प्रकरण लिहिलें पाहिजे म्हणून तूं म्हणत होतास तें लिहिणें जरूर आहे. "

जीवशास्त्राचा अभ्यास करणारांस वीसमनचें मत शाळांतून शिकवूं लागले होते, आणि तें खरें धरून त्याच्या आधारावर नवे शास्त्रीय तर्क बसवूं लागले होते; म्हणून प्रो० बर्डान सॅण्डर्सन ह्यानें ह्या विषयावर एक पत्र लिहून त्यांत ह्या गोष्टीचा निषेध केला. तेव्हां स्पेन्सरनें त्यास ता० १० नवंबर १८९४ रोजीं असें लिहिलें:—" वीसमन प्रकरणासंबंधानें तुझें सहानुभूतियुक्त पत्र पाहून मला फार संतोष झाला. ज्याच्या मताला एवढी मोठी किंमत आहे अशा तुझ्यासारख्या माणसानें माझ्या मतांशीं सामान्य ऐक्य व्यक्त करावें ह्याचें मला मोठें समाधान वाटतें. वीसमनच्या क्लृप्तीबद्दल जीवनशास्त्रज्ञांनीं दाखविलेली मान्यता पाहून मला जसें आश्चर्य वाटलें आहे तसा रागहि आला आहे. ती क्लृप्ति केवळ अगदीं तर्करूप आहे, आणि तिची सिद्धता करील अशी एकहि पुराव्याची गोष्ट माझ्या मतें तरी तिच्यांत नाहीं, ह्या गोष्टी ध्यानांत आणतां, जे लोक कदाचित् बहुतेक शास्त्रज्ञांपेक्षां प्रत्यक्ष पुराव्यावर ज्यास्त अवलंबून राहतात त्यांनीं (जीवनशास्त्रज्ञांनीं) ती इतकी सामान्यपणें मान्य करावी ही मोठ्या अचंब्याची गोष्ट आहे."

वीसमनवादांत प्रयुक्त केलेल्या ' संपादित ' शब्दाच्या अर्था-

संबंधानें सर एडवर्ड फ्राय यानें ता० १ नवंबर १८९४ च्या ' नेचर'पत्रांत एक पत्र प्रसिद्ध केलें होतें, त्यास अलक्षून त्यानें त्यास ता० ३ नवंबर १८९४ रोजीं असें लिहिलें:—" तूं हा विषय हातीं घेतला आहेस आणि प्रयुक्त केलेल्या शब्दांच्या व्याख्या छानन्याच्या कामीं आपल्या पुष्कळ दिवस उपयोगांत आणिलेल्या विचारशक्तीचा उपयोग केला आहेस, आणि तद्विषयक जो विचार-गोंधळ हल्लीं चालला आहे तो नजरेस आणून दिला आहेस, ह्याचा मला आनंद वाटतो. ' संपादितविशेष ' हा शब्द अलीकडे थोड्या वर्षांत प्रचारांत आल्यापूर्वीं मी स्वतः ' व्यापारोत्पन्न फेरबदल ' हा शब्द नेहमीं योजीत असें; आणि डार्विनच्या मतप्रकाशनापूर्वीं लिहिलेल्या " मानसशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथांत व्यापारोत्पन्न फेरबदलाची वंश-परंपरा संक्रान्ति होऊन उत्क्रान्तिविषयक चमत्कार उत्पन्न होतात असें मीं म्हटलेलें आहे. मला वाटतें ही शद्बयोजना नव्या शद्बयोजने-पेक्षां अधिक चांगली आहे, कारण तिच्यायोगानें अनेक गैरसमज निवारिले जातात; आणि म्हणून संक्षेपासाठीं मीं नवी शब्दयोजना स्वीकारिली ह्याबद्दल आतां मला खेद वाटतो. "

स्पेन्सरचा ह्या वादाशीं जो संबंध येत होता त्याच्या दृष्टीनें पाहतां हा वाद आतां मिटला होता. प्रो० वीसमननें १८९५ च्या सपटंबरच्या " कॉन्टेम्पोररीं " त " वंशपरंपरा—पुनः एकवार " म्हणून एक लेख लिहिला तेव्हां स्पेन्सरनें त्याच मथाळ्याखालीं आक्टोबर महिन्याच्या अंकांत एक पत्र प्रसिद्ध केलें, आणि त्यांत त्यानें हा वाद आणखी चालवण्यांत अर्थ नाहीं हें जें वीसमनचें म्हणणें तें बरोबर आहे म्हणून म्हटलें. तो म्हणाला, असें मी म्हणतों ह्याचें मुख्य कारण हें कीं, जुन्या क्लृप्त्यांतील व्यंगें काढून टाकण्यासाठीं वीसमन नव्या नव्या क्लृप्त्या रोज आणीत आहे. म्हणून ज्यास्त प्रश्न न विचारण्याविषयींची त्याची सूचना मी आनंदानें मान्य

करितों; आणि प्रारंभींच अत्यन्त मुद्याचा प्रश्न जो मीं विचारिला त्याला अद्यापि मुळींच उत्तर मिळालेलें नाहीं हें लक्ष्यांत घेऊन मी ही सूचना ज्यास्तच खुशीनें मान्य करितों."

ह्याप्रमाणें ह्या प्रश्नाच्यासंबंधानें जीवशास्त्रज्ञांमध्यें मतभेद झालेला आहे, आणि दोन्ही बाजूंस नामांकित जीवशास्त्रज्ञ आहेत. ह्या स्थितींत कोणाचें म्हणणें खरें हें सामान्य माणसांस ठरविणें अशक्य आहे. तथापि बीजघटक सूक्ष्म पिशव्या शरीरघटक सूक्ष्म पिशव्यांहून अगदीं भिन्न असतात, असें जरी वीसमन म्हणतो तरी, शरीरघटक सूक्ष्म पिशव्यांचा बीजघटक सूक्ष्म पिशव्यांवर मुळींच परिणाम घडत नाहीं असें नाहीं, ही गोष्टहि तो कबूल करितो; आणि शरीरघटक सूक्ष्म पिशव्यांमध्यें बीजघटक द्रव्य कांहीं तरी कदाचित् असेल हीहि गोष्ट तो मान्य करितो, ह्या गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. आणि त्यावरून जीवानें आपल्या आयुःक्रमांत संपादिलेलें इंद्रियव्यापार वगैरेदिकांचे विशेष वंशपरंपरेनें संततींत संक्रान्त होतात हें जें स्पेन्सरचें मत तें ज्यास्त बरोबर असावें असें वाटण्याकडे अधिकृत माणसाच्या मनाचा कल झाल्यास त्यांत नवल नाहीं.

प्रकरण तेविसावें

संघटनात्मक तत्त्वमीमांसेची पूर्तता

त्याच्याकडे नव्या ग्रंथाच्या नजर प्रती कोणाकडून आल्या म्हणजे त्याच्या मतापैकीं ह्या किंवा त्या मताचें स्पष्टीकरण करण्यास त्यास संधि सापडत असे. उदाहरणार्थ, होरेस सील नामक गृह-

स्थानें " सरकारच्या हात घालण्याचें स्वरूप " नांवाच्या आपल्या पुस्तकाची एक प्रत त्यास १८९३ सालीं पाठविली असतां तो त्यास ता० ११ जुलई १८९३ रोजीं लिहितो:–" तुझ्या छोटचा ग्रंथाच्या प्रतीबद्दल मी तुझा फार आभारी आहें. मला वाटतें, सामाजिक सहक्रिया आणि सरकारचा (समाजाच्या कामांत) हात ह्या ज्या दोन गोष्टी परस्परभिन्न आहेत त्या तूं दोन्ही एक समजला आहेस, आणि शिवाय सरकारनें हात घालणें कोणत्या कार्यासाठीं अत्यन्त आवश्यक आहे आणि कोणत्या कार्यासाठीं नाही हें तूं लक्ष्यांत घेतलें नाहींस, असें मीं म्हटलें तर मला क्षमा करशील काय ? प्राणिकोटीमध्यें सरकारच्या हात घालण्याच्या सारखें कांहीं असतें म्हणून जें तूं बरोबररीतीनें दाखविलें आहेस,: आणि त्यापासून तेथें फायदा झाल्याचीं जीं उदाहरणें तूं दिलीं आहेस, तीं अशीं आहेत कीं, त्यांत व्यक्तिशरीराला परिस्थितिवर कार्य करावयाचें असतें, आणि ह्या कामाकरितां (राष्ट्राच्या इतर राष्ट्राशीं होणाऱ्या व्यवहारांत) सरकाराची हातघालणी, म्हणजे सगळ्या समाजाच्या अधिकारांचें एके ठिकाणीं केंद्रीभवन, आवश्यक आहे; पण अंतःपोषण चालविण्याकरितां समाजघटकांच्या व्यवहाराच्या बाबतींत ह्या केंद्रीभवनाची आवश्यकता नाहीं, व त्यापासून फायदाहि नाहीं. पूर्वीं मुख्यत्वेंकरून, (व हल्लीं कांहीं अंशीं,) समाज इतर समाजांना लुटण्याच्या क्रिया करीत असत; तसल्या कामाला व्यक्तीनें सरकारचें अंकित असणें जरूर असतें, आणि ह्या क्रिया ज्या मानानें जोरांत असतील त्या मानानें हा अंकितपणाहि ज्यास्त ज्यास्त असला पाहिजे; पण समाज जसजसे शांतिशील होत जातात, आणि त्यांचे उद्योग जेव्हां केवळ समाजांतल्या समाजांत होऊं लागतात, तेव्हां वरील आवश्यकता कमी होत जाते, आणि व्यक्तींची व्यवस्थित किंवा अनतिक्रमणरूप सहक्रिया होण्यास जरूर तेवढा व्यक्तींचा

सरकारावर अंकितपणा कायम राहतो. सोश्यालिझम किंवा समाजकृत व्यवस्था ह्याविरुद्ध जी इन्डिव्हिज्युआलिझम किंवा व्यक्तिव्यवस्था, ती म्हणजे व्यक्तीनें एकटें रहावयाचें (समाज करून रहावयाचें नाहीं) असें जें तूं गृहीत केलें आहेस तो तुझा अगदीं गैरसमज आहे. त्याबरोबर (व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर व्यक्तींचें) संकीर्ण प्रकारचें परस्परावलंबन येऊं शकतें व येतेंहि. "

आर्थर स्टानार्ड नांवाच्या बाईनें ' एका बिशपाचा आत्मा ' नांवाची एक कादंबरी लिहून तिची एक प्रत त्याजकडे पाठविली. तेव्हां तो तीस ता० ६ आक्टोबर १८९३ रोजीं लिहितोः–" तुझ्या कादंबरीच्या प्रतीबद्दल मी तुझे आभार मानितों. तुझ्या पुस्तकाचा उद्देश त्यांतील शेवटच्या थोड्या कलमांवरून मी ताडितों. तुझें माझें मतैक्य होईल असा अंदाज तूं करणार नाहींसच. रूढ धर्ममत असें प्रतिपादितें कीं, विश्वांत जी सत्ता आपल्यास प्रादुर्भूत होते तिनें कोट्यवधि माणसें उत्पन्न केलीं असून त्यांतील पुष्कळांनाच (ख्रिस्ती नाहींत त्यांना) कायमच्या यातना भोगण्याची सजा दिली आहे. अत्यन्त घोर अपराधाबद्दल देखील एका माणसानें दुसऱ्या माणसास जर सतत यातनांची शिक्षा दिली, आणि त्याच्या वेदनांकडे स्वस्थपणें तो पाहत राहिला, तर मला तो भयंकर वाटेल. आतां (ह्या ठिकाणीं) माणसाच्याऐवजीं जर देवाची कल्पना केली, आणि एका वेदना भोगणाराबद्दल कोट्यवधि तशा (वेदना भोगणाऱ्या) माणसांची कल्पना केली, तर वरील माझा मनोभाव कां बदलावा (कमी व्हावा) हें मला समजत नाहीं; तो न बदलतां उलट ज्यास्त कडक होईल."

सामाजिक रोगांना लोक रामबाण औषधें सुचवितात त्यांची परीक्षा तो नेहमीं प्रत्यक्ष अनुभव आणि मूलभूत तत्त्वें ह्यांच्या दृष्टीनें करीत असे, आणि असें दाखवीत असे कीं, हीं औषधें अगदीं नि-

रुपयोगी आहेत, किंवा केवळ जरासा आराम देणारीं आहेत, किंवा उलट रोग वाढवणारीं आहेत. यासंबंधानें लोकांचे डोळे उघडण्याकरितां, तो ऑबेरॉन हर्बर्ट या मुत्सद्याला वरचेवर आग्रह करीत असे; उदाहरणार्थ, ता० ७ नवंबर १८९३ रोजीं तो त्यास लिहितो:—" " अनुभव मूर्खांना शहाणे करीत नाहींत " या विषयावर तूं एकादा लेख लिहिलास तर बरें होईल. उदाहरणार्थ, ' जिवंत राहण्यापुरता मजुरीचा दर ' (कामकऱ्यास) दिला पाहिजे असें लोक म्हणतात, जणूं काय हा उपाय कित्येक शतकांपूर्वीं करून पाहून टाकून दिलेला नाहीं ! तद्वतच, ज्यांना उद्योग नसेल त्यांना तो द्यावा असेंहि म्हणतात, जणू काय, इलिझाबेथच्या कारकीर्दीपासून आजतागायत भिकाऱ्यांच्या कामकरी–गृहांत हा उपाय योजून पाहिलेलाच नाहीं, व तो अगदीं फोल ठरलेला नाहीं ! तेव्हां हे मथाळे घेऊन (त्यांवर) तूं एकादा निबंध लिहिशील तर बरें. "

१८९४ च्या जानेवारींत तो त्यास पुनः लिहितो:—" हल्लीं स्वप्रयत्नांच्या स्वाभाविक फलापासून कोणाचीच तृप्ति होत नाहीं. तर प्रत्येकास, दुसऱ्या कोणाच्या तरी खर्चानें स्वताची स्थिति सुधारावी, असे वाटतें. हा नैतिक अपराध आहें, आणि ज्या समाजांत तो होत असेल त्याला त्याबद्दल शिक्षा भोगावी लागेल. "

ता० १२ दिजंबर १८९३ रोजीं तो मॉनक्यूर कॉन्वे यास लिहितो:—" ' ओपन कोर्ट ' पत्रांतील ' स्वातंत्र्या ' वरील तुझा पहिला लेख आतांच मी वाचीत आहें, आणि तो वाचून मला फार समाधान होत आहे.....लोकांना स्वातंत्र्याचीं तत्त्वें समजत नाहींत असें तूं त्यांत दाखविलें आहेस तें बरोबर आहे. पण ह्या तुझ्या भावनेंत, मला वाटतें, एक उणेपणा आहे. लोकांना स्वातंत्र्याची खरी कल्पना नसण्याचें कारण त्यांच्या ठिकाणीं स्वातंत्र्याचा मनोभाव नाहीं हें होय. ह्या बाबतींत तत्त्वांशीं जुळणारें शील

असल्याविना त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं, म्हणजे तें स्वातंत्र्य प्रतिपादिण्यास प्रवर्तविणारी मनोवृत्ति माणसांत पाहिजे, आणि आपल्या किंवा लोकांच्या स्वातंत्र्यावर कोणीं हल्ला केल्यास त्यास क्रोध चढला पाहिजे. माणसांस एकाद्या तत्त्वाशीं अनुरूप असे मनाचे उमाळे असल्याविना, त्यांस तें तत्त्व समजत असलें तरी त्याबद्दल ते पर्वा करीत नाहींत. असला उमाळा असावा तितका बळकट असला म्हणजे, जुलमी व्यक्ति किंवा जुलमी बहुमत ह्यांनीं व्यक्तीच्या कृतींत हात घातल्यास त्यास विरोध करण्याची (माणसाची) प्रवृत्ति होते; पण हल्लीं, योग्य मनोभावाच्या अभावीं, पाहिजे त्या बाबतींत ' अमुक कर ' म्हणून व्यक्तीला सांगण्याचा बहुजनाला अधिकार आहे ही भिकार खोटी समजूत बहुतेक सर्वत्र दृष्टीस पडते..... बहुमताला अमर्याद अधिकार आहे, ही भोळी (खोटी) समजूत नाहींशीं करणें हें राजनीतीच्या क्षेत्रांतील दुसऱ्या कोणत्याहि कामापेक्षां ज्यास्त महत्त्वाचें काम आहे."

आपलें काम पुरे करण्याबद्दलची त्याला ह्या सुमारास बळकट आशा मुळींच नव्हती; उलट त्यानें एका मित्रास असें कळविलें कीं, त्याची पूर्तता होणें संभवनीय दिसत नाहीं. अशा मानाच्या स्थितींत, रोमानीसनें, " पुढच्या वर्षाचें माझ्या (रोमानीसच्या) नांवचें व्याख्यान देशील काय ? " म्हणून जेव्हां त्यास विचारिलें, तेव्हां " मी जर तें देण्याचा यत्न केला, तर बहुधा प्लाटफार्मवरच मरेन " असें त्यानें त्यास लिहिलें यांत आश्चर्य नाहीं. आक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या एका शास्त्रीय मंडळानें रॉबर्ट बॉइलच्या नांवचें व्याख्यान देण्याची जेव्हां त्यास विनंति केली, तेव्हां त्याची मनोवृत्ति अशीच होती. इतक्यांत प्रो॰ टिंडालच्या मरणाची वार्ता आली, ती ऐकून त्याच्या मनाला जो धक्का बसला त्याच्या योगानें त्याचा वरील संशय ज्यास्तच बळकट झाला. त्यासंबंधानें ता॰ ६ दिजंबर १८९३ रोजीं तो मि-

सेस टिंडाल हीस लिहितोः--" काल सकाळीं डॉ० टिंडालच्या मरणाची जेव्हां दुःखकारक वार्ता आली तेव्हां मला केवढा धक्का बसला हें तुला सांगण्याची जरूरी नाहीं. त्याच्या मरणामुळें तुला जें दुःख होणार त्यांत ही एक विवेक करण्यासारखी गोष्ट आहे कीं, तो आज इतके दिवस इतक्या वेदना सोशीत होता व जीवास इतका कंटाळला होता; आणि दुसरी गोष्ट ही कीं त्याला मरण इतकें अकस्मात् व वेदना न होतां आलें. त्याच्या अंतकालाच्यासंबंधानें त्याची स्थिति खरोखरच स्पृहणीय होती. माझें काम जर पुरें झालें असतें, तर मीहि अशाच शांत रीतीच्या तात्कालिक मरणास फार खुशी झालों असतों. पण मला चांगलें माहीत आहे कीं, असल्या प्रसंगीं समाधानाच्या शब्दांचा कांहीं उपयोग होत नाहीं, आणि दुःखशांति होण्यास कांहीं कालच निघून गेला पाहिजे. "

पिशाचक्लृप्ति व इतर विषय यांची चर्चा ज्यांत केली आहे असा एक ग्रंथ प्रसिद्ध ग्रंथकार आण्ड्र्यू लँग प्रसिद्ध करणार आहे अशी जाहिरात या सुमारास लागली होती. त्यासंबंधानें ता० २१ फेब्रुवारी १८९४ रोजीं तो त्यास लिहितोः—"टायलरचें मत आणि माझें मत हीं मुळांत अगदीं परस्परविरुद्ध आहेत. त्याच्या मतें आत्म्यावरील विश्वास हा मूळ आहे, आणि पिशाचक्लृप्ति त्यावरून उत्पन्न झालेली आहे..... टायलरनें नकळत आपली जुनी समजूत टाकून दिली आहे. पण पिशाचक्लृप्ति हें धर्मविषयक कल्पनांचें मूळ आहे ही समजूत एकाहून अधिकांनीं पूर्वीं सूचित केली आहे असें दाखवतां येईल. "

ता० २६ फेब्रुवारीः–" तुझी समजूत किंवा अर्धवट समजूत हिच्यावर टीका म्हणून मला तुला असें सुचवूं दे कीं, खरा पुरावा मिळणें ही मोठी अडचण आहे. कारण लोक निरीक्षणें व विधानें

फार निष्काळजीनें करीत असतात, आणि दुसऱ्यानें सांगितलेलें पुनः सांगण्यांत फारच निष्काळजी दाखवीत असतात.....उदाहरणार्थ, मजविषयीं असे प्यारे वरचेवर माझ्या पाहण्यांत येतात कीं, त्यांपैकीं पुष्कळ अगदीं मूर्खपणाचे असतात, आणि पुष्कळ अगदीं निराधार असतात. एका अमेरिकन रिपोर्टरानें मी नेहमीं पांढरे पायमोजे घालतों म्हणून माझें वर्णन केलें. पण तसले पायमोजे मीं जन्मांत वापरलेले नाहींत. एकानें असें म्हटलें कीं, मी नेहमीं हातांत छत्री घेत असतों, आणि ती चांगली जाड असते. आज पुष्कळ वर्षें मीं पायीं मुळींच गेलेला नाहीं. आणि गेलोंच तर पाऊसच पडत असेल किंवा पडण्याचा संभव असेल, तेव्हांखेरीज कधीं छत्री घेतलेली नाहीं. आणखी (हे बातम्या पसरणारे) असें म्हणतात कीं, मी एकटा जेवीत असतों, आणि इतरांबरोबर जेवणें मला आवडत नाहीं. पण वास्तविक गोष्ट ह्याच्या अगदीं उलट आहे. मला एकट्यानें जेवणें मुळींच आवडत नाहीं. एका बाईनें मला विचारिलें कीं, मी पाव व काफी यांच्यावर राहतों हें खरें काय? पण तें अगदीं खोटें आहे. मी आपला उद्योग प्रत्येक दहा मिनिटास बदलतों काय, असें मला एकानें विचारिलें. ह्यास कांहीं थोडासा आधार होता, पण फारच थोडा. एक प्यारा मीं असा वाचिला कीं, एका प्रसंगीं माझ्या बहिणीचीं मुलें मला आवरतां येईनात. पण मला एकच बहीण होती, व ती दोन वर्षांचीच होऊन वारली.....अशा एकना दोन, अनंत गोष्टी आहेत. आतां अशा प्रकारचीं निष्काळजीपणानें केलेलीं विधानें जर आपल्या पाहण्यांत येतात, आणि अमुक मनुष्य अमुक ह्यांच्या संबंधानें देखील चुका आढळून येतात, तर ज्यांस दैविक चमत्कार म्हणून म्हणतात त्यासंबंधाच्या पुराव्यांवर कसा विश्वास ठेवावा? बहुतेकाना जें दृष्टीस पडेल तें खऱ्या रीतीनें वर्णितां येत नाहीं, आणि बहुतेकांना त्यांस जें कोणीं सांगि-

तलें असेल तें खऱ्या रीतीनें पुनः सांगता येत नाहीं. म्हणून मीं असें समजतों कीं, ह्या सर्व गोष्टींच्या संबंधानें म्हणतात तो चमत्कार खरा असण्यापेक्षा, (त्याबद्दलचा पुढें आलेला) पुरावाच अविश्वसनीय असेल, ही गोष्ट ज्यास्त संभवनीय होय. शिवाय, ' कावळा बसणें व डाहाळी मोडणें ' कधीं कधीं एकसमयावच्छेदेंकरून होतात, हा जो काकतालीय न्याय तोहि ध्यानांत आणिला पाहिजे, कारण तो ह्या बाबतींत महत्त्वाचा आहे. व्यक्तींना घडणाऱ्या लाखों गोष्टींपैकीं आणि समाजाच्या घटकांस घडणाऱ्या कोट्यवधि गोष्टींपैकीं कांहींचे एकमेकींशीं विलक्षण मेळ बसणार, हें खचीत आहे. हे (अकल्पित) मेळ आपण समजतों त्याहून ज्यास्त वरचेवर बसत असतात. मी आपल्या स्वताच्या चरित्रांतून असलीं कित्येक अत्यन्त विलक्षण उदाहरणें तुला सांगूं शकेन. "

ता० २८ फेब्रुवारीः—" होय, हा प्रश्न आकड्यांचाच आहे. ' अ 'ला स्वप्न पडतें कीं आपणास ' आ ' भेटतो; पण तो कांहीं भेटत नाहीं, आणि त्याबद्दल ' अ ' स कांहींच वाटत नाहीं. अशा हजारों गोष्टी दर रात्रीं घडतात. अशा दहा लाख गोष्टी घडल्या म्हणजे कोणत्या तरी ' अ ' ला कोणता तरी ' आ ' भेटतो; ती गोष्ट त्यास अजब वाटते, वत्याबद्दल तो बकवा करूं लागतो. एवंच मेळ बसले नसतील त्यांच्या खुणा रहात नाहींत, आणि बसले असतील त्यांच्या आठवणी कायम राहतात. "

अमेरिकन तत्त्वज्ञ जॉन फिस्क यानें यूमन्सचें चरित्र लिहून तें स्पेन्सरला अर्पण केलें होतें; त्यासंबंधानें ता० २७ मार्च १८९४ रोजीं तो त्यास लिहितोः—" तुझ्या अर्पण—लेखांतील सहानुभूतिपर शब्दांबद्दल मी तुझे आभार मानितों; तूं तें मला किंवा दुसऱ्या कोणाला अर्पण करशील अशी मला कल्पनाच नव्हती. तशी कल्पना असती तर मी त्याच्या बहिणीचें नांव सुचविलें असतें (तें तिला

अर्पण करावें अशी सूचना केली असती); कारण तिनें इतकीं वर्षें त्याची एकनिष्ठपणें नोकरी केली होती. यूमन्सचें नांव जसें होणें योग्य होतें तसें या ग्रंथानें होणार आहे. मानवजातीसाठीं स्वताला इतका झिजविणारा तिचा (मानवजातीचा) नोकर क्वचितच सांपडतो."

ह्या सालीं (१८९४ त) त्याची स्थिति एकंदरींत असमाधानकारक होती. त्याचे मित्र व ओळखी वर्षाला वीस याप्रमाणें हें जग सोडून चालले होते. त्याची घरची स्थितिहि सुखाची नव्हती. ज्या दोन बाया त्यानें घरांत ठेविल्या होत्या त्यांचें याचें जमत नाहींसें झालें होतें. तो आज चारपांच वर्षें उन्हाळ्यांत विल्ह प्रांतांत प्यूसी एथें जात असे, तसा या वर्षीं गेला असतां तेथें त्यास बरें वाटलें नाहीं. म्हणून तो तेथून जुलईत परत येऊन पुनः एकदोन महिने मार्गेट एथें गेला. तेथून ता० १७ सपटंबर १८९४ रोजीं प्रसिद्ध समाजसुधारक जॉर्ज होलियोक यास तो लिहितोः–" ज्या अर्थीं सरकारी सोश्यालिस्ट पद्धति आणि सरकारानें हात घालणें ह्यांच्या मी अगदीं विरुद्ध आहें, त्या अर्थीं ज्या औद्योगिक घटनेनेंच समाजसुधारणा होण्याची आशा दिसते तिला उत्तेजन देण्यासाठीं केलेल्या सर्व यत्नांना उत्तेजन देणें माझें कर्तव्यसें मला वाटतें. मला तुमच्या यत्नापासून फार चांगली फलनिष्पत्ति होईल असा भरंवसा वाटत नाहीं, कारण उच्च प्रकारच्या औद्योगिक संबंधांना थोडेच लोक योग्य दिसतात. पण तें कसेंहि असले तरी, तुम्ही करतां आहां तो प्रयोग सुलभ करण्यास होईल तें केलें पाहिजे, आणि म्हणून मी तुजकडे दोन गिन्या वर्गणी म्हणून पाठवितों."

ता० १७ सपटंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—" मला माझी टिमकी वाजविलेली आवडत नाहीं, आणि आलीकडे हा उपद्रव मला फार सोसावा लागत आहे.....कित्येक आईबापें मुलांना क्रूर रीतीनें वागवीत असतात; त्यांजपासून संरक्षण करणाऱ्या मंड-

ळीकरितां एक सभा कांहीं दिवसांपूर्वीं भरली होती, ती खाजगी समजून तिला मी हजर राहिलों, आणि लोकांच्या आग्रहावरून चार शब्द बोलिलों; पण पाहतों तो दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत ते छापून आले. तेव्हां, " फार विचार न करतां मी बोललों " असें मला स्पष्टीकरण करावें लागलें. एका ज्यू लोकांच्या मासिकाच्या चिथावणीवरून, रशियांत होणाऱ्या छळाबद्दल मीं तिटकारा व्यक्त केला, कारण अविचारानें मीं अशी कल्पना केली कीं, त्याची (माझ्या बोलण्याची) फारशी प्रसिद्धि होणार नाहीं. पण तें या देशांतच नव्हे तर युरोपांतील इतर देशांतहि कांहीं पत्रांनीं उतरून घेतलें, आणि रशियांतहि तें जाऊन पोहोंचलें आणि तेथें माझ्या नांवाचा ओरडा झाला; पण असा उद्देश माझा मुळींच नव्हता.

गतवर्षीं जुगारप्रतिबंधक सभेकडे एक लेख पाठविण्याचा मला कोणीं आग्रह केला, आणि ' समाजशास्त्राचें अध्ययन ' या ग्रंथांत जुगाराचा मीं जोरानें निषेध केलेला असल्यामुळें मला तो मान्य करणें भाग वाटलें; पण त्या लेखाबरोबर पाठावलेल्या चिठीवर जरी ' खाजगी ' म्हणून लिहिलेलें होतें, तरी त्याचा गोषवारा, किंवा चुकीनें त्यांस जो त्याचा गोषवारा म्हणून वाटला तो, संध्याकाळच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला. शिवाय, जमिनीच्या मालकीच्या संबंधाच्या माझ्या मतांच्या भलत्याच प्रकारच्या वर्णनाचा मीं निषेध केल्यावरून ' डेली क्रॉनिकल ' पत्रांत तत्संबंधी वादविवादांत मला नुक्तेंच पडावें लागलें आहे हें तूं पाहिलेंच असशील..... ह्या अनेक गोष्टींवरून लोकांच्या मनावर असा ठसा उमटण्याचा संभव आहे कीं, जगन्मित्र म्हणून किंवा तसल्या कार्यांचा मदतकर्ता म्हणून जगापुढें येण्याचा माझा उद्देश आहे. पण लोकांना असें वाटावें हें मला अगदीं नको आहे. म्हणून मीं पत्रावर ' खाजगी ' म्हणून म्हटलें आहे तें त्वां लक्षांत ठेविलें पाहिजे, आणि तें प्रसिद्ध

करतां कामा नये; आणि मीं फंडाला वर्गणी दिली आहे ही गोष्टहि मेहेरबानी करून प्रसिद्ध करूं नको."

त्याच्या ग्रंथांचा जर्मन भाषेंत तर्जुमा करणारा डा० व्हेटर १८९३ त मेला, आणि त्याच्या मागून तें काम प्रो० व्हिक्टर क्यारस करूं लागला. आगस्टे बर्डो हा जो त्याचा एक फ्रेंच भाषान्तरकार तोहि १८९४ अखेर निवर्तला. तेव्हां त्यानें त्याच्या बायकोस ता० २१ दिजंबर १८९४ रोजीं पुढील पत्र लिहिलें:— "कांहीं सांत्वन-पत्रें रीतसर म्हणून लिहिलेलीं असतात आणि कांहीं मनःपूर्वक म्हणून लिहिलेलीं असतात; माझें प्रस्तुतचें पत्र दुसऱ्या वर्गांतील आहे म्हणून समज. आज पुष्कळ वर्षें बर्डोसाहेबाची मी चहा करीत आलों आहें.....तो जेव्हां माझ्या निबंधांचें भाषान्तर करीत होता तेव्हां तें बरोबर व्हावें म्हणून तो किती खबरदारी घेत आहे हें माझ्या चांगलें प्रत्ययास आलें. त्या वेळीं जे गुणविशेष लहान कामासंबंधानें त्याच्यामध्यें दिसून आले ते नंतर मोठ्या कामासंबंधानें दिसून आले; आणि तो मोठा बुद्धिमान् व विद्वान् असल्यामुळें सरकारची महत्त्वाची नोकरी करता झाला. तो आणखी जगता तर फ्रान्सचीहि मोठी कामगिरी करता; त्या कामगिरीस त्याच्या अकालिक मृत्यूमुळें फ्रान्स मुकलें ह्याबद्दल फ्रेंच लोकांप्रमाणें मलाहि वाईट वाटतें."

जी "कायद्यांची नोंद" तो व मि० डानस थोर्प यांनीं मिळून १८९२ सालीं योजून सुरू केली होती ती शेवटास गेली नाहीं याबद्दल त्यास वाईट वाटत होतें. १८९४ अखेर दुसरा एक तसला यत्न करण्यास परिस्थिति अनुकूलशी दिसली म्हणून तो त्या साहेबास ता० ११ नवंबर १८९४ रोजीं लिहितोः—"इंग्लिश बोलणाऱ्या राष्ट्रांच्या कायद्यांची तारतम्यानें नोंद करण्याची इलबर्टनें (इलबर्ट बिल म्हणून जें बिल लॉर्ड रिपनच्या वेळेस प्रसिद्धीस आलें

त्याचा कर्ता) जी योजना केली आहे, तिच्याबद्दल वर्तमानपत्रांत आलेले अभिप्राय तूं वाचिलेच असशील. इंग्लिश कायद्यांची प्रारंभापासून नोंद करण्याची जी आपली योजना तिच्याशीं ही इतकी सदृश आहे कीं, आपली ती आधींची योजना प्रसिद्ध करणें इष्ट दिसतें. मीं असा विचार केला आहे कीं, 'टाइम्स' ला पत्र लिहून तूं व मीं या बाबतींत काय केलें आहे त्याचें वर्णन करावें, आणि जीं कोष्टकें आपण तयार केलीं होतीं त्यांच्या छापिलेल्या प्रुफांचा नमुना बरोबर पाठवून द्यावा. श्रीमान् लोकांना स्वतः एकादें काम योजून करण्याची शक्ति मुळींच कशी नाहीं, आणि नेहमींच्या सार्वजनिक औदार्याच्या गोष्टींखेरीज दुसऱ्या कसल्याहि उदार कृत्यांची त्यांस कल्पना कशी होत नाहीं, ह्याच्यावर कांहीं विनोदपर टीका त्या पत्रांत मी गोंवणार आहें."

ता० १८ नवंबरः—"सरकारानें दिवाणी न्याय फुकट द्यावा हें मत मीं पुष्कळ दिवसांपूर्वीं प्रतिपादिलें आहे ही जी गोष्ट तिला उल्लेख करण्यास तुला माझी परवानगी आहे. 'न्याय' ह्या ग्रंथांत ह्या मताचें प्रतिपादन व मंडन मीं केलेलें आहे."

ता. २३ नवंबरः—"नीतितत्त्वें" ह्या ग्रंथांत दर्शविल्याप्रमाणें दिवाणी न्यायाची जबाबदारी जर राष्ट्रानें आपल्या शिरावर घेतली तर हल्लींची पद्धति अगदीं बदलावी लागेल हें मी घेऊन चालतों. नंतर सरकार केवळ न्यायाधीशाच्या स्थितींतच राहणार नाहीं,तर तें स्वतः (खटल्यांची) चवकशी करणारें बनेल. कोणीं कांहीं अतिक्रमण केलें किंवा करार पुरा केला नाहीं, अशी तक्रार स्थानिक अधिकाऱ्याकडे आली म्हणजे पहिली गोष्ट कदाचित् त्यास ही करावी लागेल कीं, कोणी नेमलेला अधिकारी दोघां वादीप्रतिवादींनीं भेट घ्यावयास, त्यांचीं बोलणीं ऐकावयास, आणि त्यासंबंधाचा कायदा त्यास स्पष्ट करून सांगण्यास पाठवावयाचा. दहांपैकीं

नऊ खटल्यांत चूक झाली आहे किंवा नाहीं ही गोष्ट स्पष्टच असेल, आणि म्हणून ह्या अधिकाऱ्याच्या मतावरून कज्जा बहुधा मिटेल. ज्या ठिकाणीं अशा रीतीनें कज्जा मिटणार नाहीं, किंवा तो कसा मिटवावा ह्याबद्दल ह्या अधिकाऱ्यासच संशय येईल, तेथें त्याच्याहून श्रेष्ठ अधिकाऱ्याकडे तो खटला जाईल, त्याला तो कनिष्ठ अधिकाऱ्यासमक्ष समजाविला जाईल, व तो श्रेष्ठ अधिकारी स्वतः त्या पक्षकारांची त्या तंट्यासंबंधानें उलट तपासणी करील. त्यानें निकाल दिल्यानंतर देखील जर एकादा पक्षकार तो मान्य करणार नाहीं, तर त्याच्या पुढील काम सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं त्याच्याच खर्चानें चालेल; म्हणजे, जेथें त्यानें स्पष्ट कायद्याचा भंग केला असेल, तेथें त्यानें खर्च द्यावा, आणि जेथें कायद्याचा अर्थ स्पष्ट नसेल तेथें देऊं नये. कायद्याच्या अंमलबजावणींतील ह्या फेरबदलाबरोबर कायद्यांत देखील असा फरक केला पाहिजे कीं, तो व्यापक व निश्चित बनावा. कायद्यांचा प्रबंध स्पष्ट व सयुक्तिकरीत्या बनविला असेल तर तेवढ्यानेंच बरींच अतिक्रमणें बंद होणार आहेत. आणि स्पष्ट कायद्याच्या भंगांची व्यवस्था वर सांगितल्याप्रमाणें दुखावलेल्या पक्षकारास खर्च पडल्याविना झटझट व्हावयास लागली म्हणजे, असले भंग फार कमी होऊं लागतील."

ता० २९ नवंबर:—" दिवाणीन्यायाच्या अंमलबजावणविरील माझ्या मतासंबंधानें मेहरबानी करून कांहीं म्हणूं नको. "

ता० १९ जानेवारी १८९९—" तुझ्या नव्या खंडाच्या प्रतीबद्दल (व्यक्तिवादविषयक निबंधमाला) तुझे आभार मानितों....."

प्रो० हेन्री डूमंड यानें स्पेन्सरच्या लेखांचें आपण अध्ययन करणारे आहों असें प्रसिद्धपणें कबूल केलेलें होतें म्हणून १८९४ च्या सपटंबरच्या ' फॉर्टनाइटलीं ' त त्यानें स्पेन्सरचीं मतें चोरून घेतल्याचा, व त्याच्या खोट्या शास्त्रीय बाण्याचा, जेव्हां प्रसिद्ध का-

दंबरीकार मिसेस लिनलिन्टननें निषेध केला, तेव्हां लोकांस आश्चर्य वाटलें. पण ही गोष्ट तिनें त्याच्याच (स्पेन्सरच्याच) सांगण्यावरून केलेली होती. कारण तीस तो ता० ६ जून १८९४ रोजीं लिहितो:—" ' माणसाची उन्नति ' ह्या आपलया नुक्त्या प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांत प्रो० ड्रमंड यानें मोठा नवीन शोध केल्याचा आव घालून, आणि अधिकारपूर्वक स्वरानें, परोपकार हें एक सामाजिक उत्क्रमणाचें कारण मीं व इतर उत्क्रान्तिवाद्यांनीं ध्यानांत घेतलें नाहीं असें म्हणून, आह्मांस शिकविण्याचा आव घातला आहे.....त्यास उत्तर देण्याचें स्वतः अंगावर घेण्याची मला इच्छा नाहीं, पण माझ्याकरितां जर तें काम कोणी अंगावर घेईल, तर मला आनंद होईल, आणि हें काम माझ्याऐवजीं कोण करील ह्याचा विचार करतां मला तुझी लेखनशैली जोरदार आणि वर्णनशैली हुबेहुब असल्यामुळें उत्क्रान्तिमताचें स्पष्टीकरण व दृष्टान्तीकरणहि चांगलें करून शिवाय तें तूं चटकदार व ठसकदार रीतीनेंहि करूं शकशील."

ता० ३ सपटंबर:—" तुझा लिखित निबंध जेव्हां मीं परत केला तेव्हांच तो मला जोरदार व इष्टकार्यकर वाटला, आणि तो आतां छापलेला वाचून पाहतां, ज्यास्तच जोरदार व इष्टकार्यकरसा मला दिसतो..... ' स्टॅण्डर्ड ' पत्रांत त्यावर आर्टिकल आलें आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, आणि प्रो० ड्रमंडचाच केवळ नव्हे, तर अर्धवटशास्त्रीय असे हे विचार किंवा विकार आधाशीपणानें गिळणाऱ्या लोकांचाहि त्या लेखानें त्यांत जो निषेध केला आहे तो मला पसंत वाटतो."

ब्रिटिश शास्त्रीय सभेचा अध्यक्ष या नात्यानें आक्सफर्ड एथें लार्ड सालसबरीनें संभाषण केलें होतें; त्या संभाषणास उत्तर देण्यास कोणास तरी लावण्याची त्यानें खटपट केली, पण त्या कामीं त्याला

वरच्याइतकी सिद्धि आली नाहीं. त्यासंबंधानें ता० १० आगस्ट १८९४ रोजीं तो आल्फ्रेड रसेल वॉलेस यास लिहितोः—" तुझा माझा कांहीं मुद्यांसंबंधानें मतभेद असल्यास पुष्कळ मुद्यांसंबंधानें मतैक्य आहे; आणि दोन विभिन्नीभवन पावणाऱ्या व्यक्तींची गांठ पडण्याच्या त्या संभवनीयतेच्या आधारावर नैसर्गिक निवडीच्या पद्धतींचें जें भलतेंच वर्णन त्यानें (लार्ड सालसबरीनें) केलें आहे, तें अयुक्तिक आहे ह्यासंबंधानें आपलें खचित मतैक्य आहे. त्यानें केलेलें मूर्खपणाचें वर्णन चवाठ्यावर आणणें जरूर आहे, कारण त्यामुळें पुष्कळ लोकांचा गैरसमज होईल. तें वर्णन 'पेलमेल' पत्रानें आधींच स्वीकारिलें आहे. हें काम हातीं घ्यावें असें मला स्वताला फार वाटतें, पण उघडउघड तें तुझें काम आहे. मेहरबानी करून 'टाइम्स' ला पत्र लिही, आणि असें स्पष्ट करून दाखीव कीं, योग्यतमाची निवड किंवा तगाव तो म्हणतो त्याप्रमाणेंच अवश्यमेव घडत नाहीं. प्रारंभीं तूं असें दाखविलेंस तर ठीक पडेल कीं, आपण व्हालंटीर सेनेचा कर्नल असून कायमच्या सैन्याची पाहणी करीत आहों असें म्हणून जरी त्यानें आपल्या भाषणास सुरवात केली आहे, तरी लवकरच तो कायम सैन्याच्या कर्नलाच्या दिमाखानें व्हालंटीर सैन्याची पाहणी करण्यास व त्यांच्या चुकांची थट्टा करण्यास लागला आहे. ह्याबद्दल त्याचा चांगला समाचार घेतला पाहिजे. दुसऱ्याहि कांहीं मुद्यांच्या संबंधानें त्याचीं मतें दुरुस्त करण्यासारखीं आहेत, पण हा मुद्दा मुख्य आहे."

त्याच संबंधानें ता० १ आक्टोबर १८९४ रोजीं तो हक्स्लेस लिहितोः—" लार्ड सालसबरीचा समाचार कोणीच घेत नाहीं काय? नैसर्गिक निवडीच्या संबंधाचा त्याचा जो इतका मूर्खपणाचा कोटिक्रम तो टाइम्समध्यें खोडून काढण्यास कांहीं दिवसांपूर्वीं मीं वॉले-

सला लिहिलें होतें, पण त्यानें सबब सांगितली कीं मला दुसरीं कामें आहेत. त्या सभेमध्यें त्याचे आभार मानण्याच्या सूचनेस तूं टेंका दिला असल्यामुळें, मला वाटतें, (त्याच्याविरुद्ध) तुझें तोंड बंद झालें आहे. (पण) धर्मसंस्थांकडे ओढा असलेले लोक आनंदानें टिऱ्या बडवीत आहते, व हवेंत टोप्या उडवीत आहेत, म्हणून ह्या सरदारबुवांच्या कोटिक्रमांतील चूक व मूर्खपणा त्यांस दाखवून त्यांस जरा शुद्धीवर आणणें, मला वाटतें, जरूर आहे. मी जरी वृद्ध व अशक्त झालों आहें, तरी असें करावेंसें मला फार स्फुरण होतें, आणि त्याबरोबरच अनेक महत्त्वाच्या गोष्टी जातां जातां सांगण्यासारख्या असल्यामुळें असें स्फुरण ज्यास्तच होतें. ”

यावर ता॰ ३ आक्टोबर १८९४ रोजीं हक्स्लेनें त्यास असें लिहिलें:—“ येत्या नवंबरांत ‘ नेचर ’ पत्राची जी अर्धी जुबिली व्हावयाची आहे तिच्याकरितां मी कांहीं लिहीत आहें; आणि मुख्य मुद्यांवर जी कबुली त्यानें (लार्ड सालसबरीनें) दिली तिच्यावर आक्सफर्ड एथें जितका जोर मला देतां आला त्याहून ह्या लेखांत जरा ज्यास्त देतां येईल. पण त्याच्या नैसर्गिक निवडीच्या व इतर बाबतींतलि टीकांसंबंधानें म्हणशील, तर त्यांच्यावर दारूगोळा खर्च करण्याइतकी त्यांची योग्यता आहे किंवा काय ह्याबद्दल मला खरोखरच शंका आहे. पण (ह्या बाबतींत) तुझें मत जर निराळें असेल तर पुढें सरसावण्यास कचरूं नको. सद्गुणाचें बक्षीस जरी मला मिळणार नाहीं, तरी त्याला योग्य असल्याचें मीं आक्सफर्ड येथें दाखविलें. (‘लार्ड सालसबरी’वर चुरचुरीत टीका करण्याचा मोह टाकून मोठें आत्मसंयमन मीं प्रदर्शित केलें.) तेथें त्याच्या कोटिक्रमाच्या चिंधड्या करण्याचा मोह मला केवढा पडला असेल, ह्याची तुला कल्पना होईलच. पण मी (आभारविषयक सूचनेस) टेंका देणारा असल्यामुळें मला तसें करतां येईना, म्हणून

मीं मोह आवरून, ज्या कबुल्या त्यानें अंधक रीतीनें दिल्या होत्या त्या उजेडांत आणून प्रतिपक्षाचें (त्याच्या पक्षाचें) होईल तेवढें नुकसान केलें. ”

अशा रीतीनें या प्रश्नावर लिहिणारा त्यास कोणीं न मिळाल्यामुळें तो कदाचित् गप बसला असता, पण लार्ड सालसबरीच्या भाषणाचें फ्रेंच भाषान्तर करून तें फ्रेंच आकाडेमीस कोणीं नजर केलें म्हणून “ उत्क्रान्तिवर लार्ड सालसबरी ” (‘ उत्क्रान्तिविषयक लार्ड सालसबरीचे विचार ’) या नांवाचा लेख लिहून त्यानें प्रसिद्ध केला. तो फ्रेंच पंडितांना सर्व मुद्यांवर योग्य असा वाटला, आणि त्याचेंहि भाषान्तर प्रो० प्रेरियरनें करून त्या सभेस नजर केलें.

ता० २३ आक्टोबर १८९४ रोजीं तो मिसेस टिंडालला लिहितो:—“ सेंट लिओनार्ड्स् एथें पनः जाण्याची तयारी मी करीत आहें.....त्या ठिकाणीं येऊन होईल तितके दिवस मजपाशीं राहण्याची मेहेरबानी तूं करावीस अशी माझी इच्छा आहे. जॉर्ज इलियटचा नवरा मि० क्रॉस याची बहीण मिस् क्रॉस हिला मी तेथें बोलावण्याचा विचार करीत आहें. ती फार गोड स्वभावाची व बुद्धिमान् स्त्री असून तिनें एक सुंदर गोष्ट लिहिली आहे, व आणखी तिनें लिहाव्या अशी ती आहे. मिस् जिजेल नांवाची आणखी एक पाव्हणी मी बहुधा बोलावणार आहें, ती ग्लूस्टर शायरमधील एक बाई असून, मला माहीत नसतां माझ्या लेखांतून तिनें सूत्रांचा खंड तयार केला.

लाव्हेली नांवाच्या एका फ्रेंच लेखकाला त्याचीं मतें बरोबर न समजून त्यांचा त्यानें विपर्यास केला होता. त्यासंबंधानें त्याच्या चरित्रकारास ता० ७ जानेवारी १८९५ रोजीं तो लिहितो:—“ माझीं मतें व त्याचीं मतें ह्यांच्यामधील विरोधावर तूं टीका केली आहेस. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, माझीं मतें काय आहेत हें

लाव्हेलीला कधींच समजलें नव्हतें. इतर पुष्कळांप्रमाणें माझ्या मताचा एक भाग त्यानें ध्यानांत घेतला, आणि त्याच्याशीं संबद्ध असे दुसरे भाग ध्यानांत न घेतां कांहीं सिद्धान्त ठरविले. जीवनार्थ कलह व योग्यतमांचा टिकाव हे समाजांत चालूं द्यावे, आणि प्रत्येकास दुसऱ्याच्या कृतिक्षेत्रांत हात घालण्याची बंदी करण्यास जरूर तेवढींच नियंत्रणें त्यांजवर सरकारानें घालावीं, आणि ते (कलह व टिकाव) कमी करण्याच्या भानगडींत सरकारानें पडूं नये, असें माझें मत आहे; म्हणून, इतर पुष्कळांप्रमाणें त्यानें आपली अशी समजूत करून घेतली कीं, ते कोणींच (खाजगी रीत्या व्यक्तींनीं) कमी करूं नये असें माझें मत आहे......मला असें वाटतें कीं, वरील गोष्टींचा (कलह व टिकाव यांचा) जितका परिहार करणें योग्य व अवश्य आहे तितका स्वैच्छिक परोपकारानें (लोकांच्या खाजगी औदार्यानें) साध्य होणार आहे. सरकाराचें सार्वत्रिक श्रेष्ठत्व माझ्यासारखेंच त्यालाहि नको असून तो त्याचा निषेध करीत असे, पण परोपकारदृष्टया सरकारानें लोकांच्या कामांत हात घालण्यची जी नीति तो हवी म्हणत होतासें दिसतें त्या नीतिपासूनच तें श्रेष्ठत्व उत्पन्न होतें हें त्याच्या लक्ष्यांत आलें नाहीं."

ता० १० जानेवारी १८९९ रोजीं तो जेम्स स्किल्टन यास लिहितो:—" समाजाच्या भविष्यत् स्थितीविषयीं माझ्या डोक्यांत कांहीं योजना आहे असें जर तुला वाटत असेल, तर ती अगदीं चूक आहे. समाजघटना सुधारण्याकरितां तिजवर उत्क्रान्तिविषयक तत्त्वांचा प्रयोग करणें ही जी व्यावहारिक समाजशास्त्राची तुझी कल्पना ती माझ्या डोक्यांत मुळींच नाहीं. मला ज्या एका गोष्टीविषयीं भरंवसा वाटतो ती एवढीच कीं, राष्ट्राराष्ट्रांमधील वैरें आणि तज्जन्य लढाया बंद होईपर्यंत समाजघटनेचे उच्चतर नमुने उत्पन्न होऊं शकणार नाहींत.....तुझा शिकविण्यावर भरंवसा आहे,

पण माझा नाहीं. लोकांना कोणती वर्तनरेषा सयुक्तिक आहे हें दाखविल्यानें त्यांचें वर्तन सुधारेल असें तुला वाटतें; पण मला असें मुळींच वाटत नाहीं. माणसें विचारी प्राणी आहेत असें सामान्यतः समजतात, पण तशी तीं मुळींच नाहींत. माणूस हा उपजबुद्धि, मनोविकार, व मनोभाव, ह्यांचा एक जुडका असून ते (मनोविकार वगैरे) प्रत्येकीं आपली तृप्ति करून घेण्यास पहात असतात, आणि त्यांपैकीं जे प्रबळ असतील ते विचारशक्ति ताब्यांत घेऊन आपल्या कार्यासाठीं तिचा उपयोग करीत असतात, आणि इतर सर्व मनोविकारांना व मनोभावांना अधिकारापासून दूर ठेवितात.....सामाजिक व्यवस्थेच्या कडक बजावणीखालीं मानवी स्वभाव हळूहळू बदलण्याखेरीज भविष्यत् काळाविषयीं दुसरी कांहीं आशा नाहीं. त्याचें आवश्यक साधन शिक्षण नव्हे तर क्रिया हें साधन आहे. पिढ्यानुपिढी प्रामाणिक व सहानुभूतिपर वर्तन करावयास लागणें हीच एक (तें बनून येण्यास) अत्यावश्यक गोष्ट आहे. शीलामध्यें पुरेसा बदल एका वर्षांत, पिढींत किंवा शतकांत होणार नाहीं. शिक्षण जें कांहीं करूं शकेल—समाजशास्त्राच्या तत्त्वांच्या ज्यास्त ज्यास्त प्रसारानें जें कदाचित् होऊं शकेल--तें पीछेहाटीच्या क्रियेला आळाबंदा पडणें एवढेंच होय. व्यक्तिजीवितावरून जें सादृश्य ध्यानांत येतें तें यथार्थ होय. (ज्याप्रमाणें) व्यक्तिविषयक वाढ व घटना यांचा क्रम आपल्यास फारसा बदलतां येणार नाहीं—वाढीच्या पायऱ्या फारशा अलीकडे आपल्यास ओढतां येणार नाहींत, (त्याचप्रमाणें समाजविषयक वाढ व घटना यांचा क्रम आपल्यास बदलतां येणार नाहीं.) पण ज्या वर्तनक्रमानें (व्यक्तीच्या व समाजाच्या) रुग्णावस्था व त्याबरोबर येणाऱ्या नीच अवस्था उत्पन्न होतात, त्यांना ज्ञानानें बराच आळाबंदा घालतां येईल. ज्या कोणास समाजप्रगति व्हावी अशी इच्छा असेल त्यानें असें दाखविण्याच्या कामीं आप-

त्या शक्ती खर्च कराव्या कीं, युद्धरूपी चळवळी व त्यांना योग्य अशी समाजघटना जोंपावेतों चालू आहे, तोंपावेतों सामाजिक जीवितांत मुळापासूनचा व कायमचा कांहीं फेरबदल करतां येणारनाहीं."

ता० २ फेब्रुवारी:—"समाजप्रगतीची खरी क्लृप्ति ही हालचालीचें (समाजसुधारणेचें) कारण नसून तें केवळ तिचें तेल (वंगण) आहे, म्हणजे त्याच्या योगानें केवळ घर्षण (समाजप्रगतीस होणारें विघ्न) नाहींसें होतें. हालचाल उत्पन्न करणारी शक्ति म्हटली म्हणजे माणसांच्या उपजतबुद्धि व मनोभाव ही आहे, आणि ती बुद्धि व ते मनोभाव कांहीं क्लृप्तीनें बदलावयाचे नाहींत.

तुला वाटतें, मजपाशीं कांहीं महत्त्वाची गोष्ट सांगावयासारखी आहे, आणि ती मीं सांगितल्यानें आगामी विपत्ति टळण्यासारख्या आहेत. मला एकच गोष्ट सांगावयाची आहे, ती ही कीं, "प्रामाणिक बना: आपले हक्क संभाळून लोकांचेहि योग्य हक्क संभाळा." स्वताचा फायदा खेरीज करून बाकी सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करणें हे तुमच्या (अमेरिकनांच्या) हल्लींच्या स्थितीचें व आगामी संकटांचें कारण आहे. तुमच्या स्थितीच्या संबंधानें कांहीं वर्षांपूर्वीं मीं असें म्हटलें होतें कीं लुच्च्या लोकांची वाखाणणी करणें हा एक तुमच्या समाजांत घातुक अवगुण आहे, आणि मला वाटतें मीं असें म्हटलें होतें किंवा गर्भित केलें होतें कीं, ज्या लोकांत लुच्चे लोकांबद्दल वाखाणणी असेल ते फशीं पडतील. शिक्षणानें अमेरिकन समाजांत एतद्विषयक अधिक योग्य कल्पना स्थापिली जाईल असें तुला वाटत असल्यास त्यासंबंधानें माझें अगदीं भिन्न मत आहे. तुमच्या हल्लींच्या स्थितींत तुम्हांस कोणी शिकवावयास लागल्यास तुमचे लोक त्याचें म्हणणें ऐकणार नाहींत. त्यांनीं ऐकिलें तरी त्यांची खात्री होणार नाहीं. आणि त्यांची खात्री झाली तरी त्यावरून त्यांच्या वर्तनांत सांगण्यासारखा फरक व्हावयाचा नाहीं.

माणसें ठळक मनोवृत्तींच्या अमलाखालीं असलीं म्हणजे त्यांच्याशीं कितीहि विचारशक्ति लढविली तरी त्यांचें वर्तन बदलणार नाहीं."

ता० २८ जानेवारी १८९९ रोजीं ह्याचसंबंधानें तो कॉससाहेबास लिहितो:—" तुझी बहीण माझ्यापाशीं असतांना असें बोलली होती कीं, तुझ्या मतें अमेरिकेंत लवकरच एक मोठा आपात घडणार आहे, व तिच्या सांगण्यावरून तूं तो पैशाच्यासंबंधानें समजतोस असें मीं ताडलें होतें. मी देखील तेथं आपात घडेल असें समजतों, पण तो द्रव्यापेक्षां समाजविषयकच ज्यास्त असणार. कदाचित् त्यांपैकीं एक दुसऱ्यास कारणीभूत होईल. तेथें भयंकर अनर्थापात घडणार ह्याबद्दल मला काडीचीहि शंका नाहीं. लुच्च्या घमंडानंदनांची वाखाणणी आणि व्यापाराविषयक सार्वत्रिक नैतिक ढिलाई ह्यांचे दूरवरचे व दूरवर पसरलेले परिणाम अमेरिकन लोक भोगूं लागले आहेत."

ता० ३१ मे १८९९ रोजीं तो मिसेस टिंडाल हीस लिहितो:—" मूलतत्त्वांच्या दृष्टीनें पाहतां वस्तुस्थिति अशी आहे:—माणसांवर जबर सामाजिक घटनेचें जें बंधन होतें त्यांतून गेल्या थोड्या पिढ्या ते मुक्त झालेले आहेत. आपण स्वतंत्रतेच्या स्थितीस पात्र नाहीं असें ते जलद सिद्ध करून दाखवीत आहेत, आणि न समजतां ते आपल्यासाठीं असा जुलूम तयार करीत आहेत कीं, तो त्यांस पाहिल्या इतकाच किंवा त्याहूनहि ज्यास्त बंधनांत टाकून देईल."

ता० २२ जून:—"आयर्लंदांत जशी न्यायाची अंमलबजावणी अयोग्य रीतीनें होत असते, तशीच इंग्लंदांतहि होऊं घातली आहे."

इटालियन सोश्यालिस्ट प्रो० फेरि यानें सोश्यालिस्ट मताच्या मंडनार्थ आपलें मत पुढें आणिलें आहे असें त्यास समजल्यावरून, त्यानें रागानें निषेधपर पत्र ता० १२ जून रोजीं लिहिलें व तें 'लारिफार्मा' नामक इटालियन पत्रांत प्रसिद्ध झालें. तेव्हां स्पेन्सरचा गै-

रसमज झाला आहे असें प्रो० फेरीनें त्याच पत्राच्या ता० १९ च्या अंकांत प्रसिद्ध केलें, आणि म्हटलें:—" सोश्यालिस्ट मताच्या पक्षपात्यांमध्यें वर्तमान तत्त्ववेत्त्यांपैकीं सर्वांत मोठ्याचा समावेश करण्याचें कोणींहि सोश्यालिस्टनें कधींहि स्वप्नीं आणिलें नाहीं..... पण हर्बर्ट स्पेन्सरचीं स्वताचीं मतें आणि सार्वत्रिक उत्क्रान्तीच्या प्रत्यक्ष क्लृप्तीपासून तर्कशास्त्रदृष्ट्या सिद्ध होणाऱ्या गोष्टी ह्यांमध्यें भेद करणें जरूर आहे. ती क्लृप्ति जरी त्यानें इतरांपेक्षां ज्यास्त चांगल्या रीतीनें वाढवून दाखविलेली आहे, तरी इतर तत्त्ववेत्त्यांच्या मेहनतीनें तिचा जो अमर्याद प्रसार होत आहे त्याविरुद्ध त्यानें सरकारापासून बिल्ला घेतलेला नाहीं. माझ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत मीं असें म्हटलें होतें कीं, स्पेन्सर व डार्विन अर्ध्या रस्त्यांत थांबले आहेत, आणि म्हणून त्यांच्या मतापासून तर्कशास्त्रदृष्ट्या निष्पन्न होणाऱ्या सिद्धान्तांप्रत ते पोंहोचले नाहींत."

ह्या वर्षाच्या जून महिन्याच्या " फॉर्टनाइटलीं " त " बाल्फरचें तर्कशास्त्र " या नांवाचें एक आर्टिकल त्यानें लिहिलें होतें, आणि तें निबंधसंग्रहाच्या पुढच्या आवृत्तींत घालण्याचा त्याचा बेत होता. पण १८९७ च्या नवंबरांत पुनः प्रसिद्ध करण्यासाठीं राखून ठेविलेल्या त्या आर्टिकलाच्या प्रतीवर त्यानें अशी टीप मारून ठेविली:—" माझी तजबीर काढून सार्वजनिक संग्रहालयाला नजर करण्याच्या कामीं मनःपूर्वक मदत करून त्यानें (बाल्फोरनें) जें उदात्त वर्तन केलें आहे, त्यामुळें मीं असें ठरविलें आहे कीं मीं हें आर्टिकल पुनः प्रसिद्ध करणें सदभिरुचीस धरून होणार नाहीं. "

ह्या वेळीं जर्मन बादशहानें त्यास कला व शास्त्र ह्यांची एक सन्मानदर्शक पदवी देऊं केली; ती नको म्हणून ता० १ जून १८९५ रोजीं कळवितांना त्यानें इंग्लंदांतील जर्मन वकिलास असें लिहिलें:— " आपल्या राजेसाहेबांनीं कला व शास्त्रें एतद्विषयक बहुमानाची

पदवी मला दिल्याचें ता० ३१ मेचें (तुमचें) पत्र आलें तें पावलें. ही गोष्ट ऐकून सहजच मला फार समाधान वाटतें. गेल्या पंचवीस वर्षांत निरनिराळ्या प्रसंगीं मला अर्पण केलेल्या पदव्या मीं नाकारिलेल्या आहेत; म्हणून ही पदवी स्वीकारणें माझ्या दृढ मतांच्या विरुद्ध होईल इतकेंच नाहीं, तर ज्या विद्वान् मंडळांच्या पदव्या मीं पूर्वीं नाकारिल्या आहेत त्यांचा तेणेंकरून एकप्रकारचा अवमान केल्यासारखा होईल. जरी हल्लींचा पदवदिाता पूर्वींच्या पदवीदात्यांहून निराळ्या प्रकारचा आहे, तरी पूर्वीं त्या मीं नको म्हटल्याचीं कारणें कायमच आहेत. तीं कारणें काय आहेत तें १८८३ च्या मे महिन्यांत फ्रेंच आकाडेमीला पाठविलेल्या पत्रांत मीं व्यक्त केलेलीं आहेत. म्हणून मला देऊं केलेल्या पदवीची किंमत जरी मी कमी समजत नाहीं, तरी पूर्वींचाच वर्तनक्रम कायम ठेवणें, आणि म्हणून ती नको म्हणणें मला भाग पडत आहे."

अशाच प्रकारच्या पदव्या आस्ट्रियाचा बादशाह व बुडापेस्ट एथील युनिव्हर्सिटी यांजकडून आल्या होत्या; पण त्याहि अर्थात् त्यानें नाकारिल्या.

ता० ५ जून १८९९ रोजीं मिसेस् टिंडालकडून त्यास असें पत्र आलें:-" तुझ्या लहानपणच्या दिवसांच्या संबंधानें एक बाई काल मला असें सांगत होती कीं, स्पेन्सर इंजिनियरीचें काम करीत होता तेव्हां चरबीच्या मेणबत्त्या खात असे, असें माझा बाप मला सांगत होता; " व त्यावरून तिनें असें अनुमान काढिलें आहे कीं, ह्यामुळेंच तुझा मेंदू बळकट झाला ! असली हास्यकारक बातमी प्रथम कोणीं कशी पसरिली कोण जाणें. "

त्यावर तो तीस ता० ६ जून रोजीं लिहितो:—" तूं जी विलक्षण गोष्ट मला लिहिलीस तिजबद्दल मी तुझे आभार मानितों. माझ्याबद्दलच्या असल्या गोष्टी इतक्या पसरलेल्या आहेत

कीं त्या एकत्र गोंवून त्यांचा एक लहानसा ग्रंथच मला बनवतां येईल. त्या गोष्टींपैकीं कांहींचा उगम मला लावतां येण्यासारखा आहे, पण कांहींचा मुळींच लागत नाहीं. ही जी अत्यन्त वेडी गोष्ट तूं मला कळविलीस, ती ह्या दुसऱ्या वर्गापैकीं आहे. आणि जिला मजबद्दल खरी माहिती असण्याचा पुष्कळ संभव आहे अशा एका बाईपासून तूं ती ऐकिलीस ही विशेषच चमत्कारिक गोष्ट होय. ”

१८९५ च्या उन्हाळ्यांत प्यूसी एथें न जातां तो वेस्टरहॅम एथें जून १९ च्या सुमारास गेला. तो तेथें जाऊन फार दिवस झाले नाहींत तोंच प्रो० हक्स्लेच्या मृत्यूची वार्ता त्याच्या कानीं आली व ती ऐकून त्याला जबर धक्का बसला. त्यासंबंधानें ता० २ जुलई रोजीं तो मिसेस हक्स्लेला लिहितोः—“ तो आजारांतून उठण्याची आशा जर नाहींशीं झाली होती, तर अलीकडे त्याला ज्या वेदना सोसाव्या लागत होत्या तशा वेदनांत त्यानें आणखी दिवस जगणें क्वचितच इष्ट झालें असतें, आणि तुझ्या दुःखाचें कांहींसें परिमार्जन करण्यास हा एक विचार त्वां मनांत आणण्यासारखा आहे. ह्याहून ज्यास्त व ज्यास्त टिकाऊ समाधान तुला वाटण्यास असें कारण आहे कीं, त्याची जीवित–सरणी नमुनेदार होती; म्हणजे, नवरा, बाप, नागरिक व शिक्षक ह्या सर्व दृष्टींनीं त्याचें वर्तन इतरांनीं कित्ता घेण्यासारखें होतें. ”

मृत्यूमुळें त्याच्या मित्रांच्या व ओळख्यांच्या मंडळांत जे हे सारखे खंड पडत चालले होते, त्यांत लार्ड पेम्ब्रोकच्या मरणानें आणखी एक भर पडली; आणि त्याचें शील व उद्देश हीं दोन्ही त्यास फार पसंत असल्यामुळें त्यास विशेष वाईट वाटलें. आजपर्यंत लेडी पेम्ब्रोकचा व त्याचा पत्रव्यवहार बहुधा राजकीय किंवा शास्त्रीय प्रश्नांच्या संबंधानें होत असे, पण आतां तो अगदींच निराळ्या विषयांवर होऊं लागला. आतां त्यांत जीवित व मन ह्यांचें स्वरूप,

द्रव्याचें क्षुद्रत्व, मनकवडेपणा, मरणोत्तर जीवित, इत्यादि विषयांचें विवेचन होऊं लागलें. तें करतांना, कधीं कधीं आपण फार खोल-पाण्यांत शिरत आहों, असें तिला वाटे. उदाहरणार्थ, एके ठिकाणीं ती असें म्हणत्ये :– " वर्तमानकालीन तत्त्ववेत्त्यांतील अग्रणीपुढें मी लहान तोंडीं मोठा घांस घेत नसलें म्हणजे पुरे." तीस तो ता० २६ जून १८९९ रोजीं लिहितो:—" तूं जे मोठाले प्रश्न उत्पन्न केले आहेस त्यांजवर, मला शक्ति असती तर, विस्तृत विवेचन मीं आवडीनें केलें असतें. काळोखांत सारखें चांचपटत राहिल्यानें सरतेशेवटीं आपणास (विश्वांतील महागूढ उकलण्याचा) मार्ग सांपडेल अशी आशा मला करतां येत नाहीं, कारण (तें उकलण्यास) जरूर ती कल्पना बनवण्यास मानवी बुद्धि असमर्थ आहे असें मीं समजतों. ....मला असें वाटतें कीं, आमच्या मनाच्या घटनेनें ज्या मर्यादा घालून दिल्या आहेत त्यांना नमून राहणें, आणि आपणास वस्तु जशा ज्ञात होतात तशा त्या वस्तूंच्या मागें जें आहे त्याबद्दलच्या आपल्या अज्ञानांत होईल तेवढ्या समाधानवृत्तीनें राहणें, हाच उत्तम मार्ग आहे. अन्तिम गूढासंबंधानें माझा स्वताचा मनोभाव असा झाला आहे कीं, अलीकडे कांहीं वर्षें, अनंत पोकळीचा विचार मनांत आणण्याचा यत्न देखील भीतीचा कांहीं मनोभाव मनांत उत्पन्न झाल्याशिवाय मला करतां येत नाहीं; म्हणून नेहमीं तो विचार टाळण्याचा यत्न मी करीत असतों."

ता० ५ जुलई:—"(तूं केलेल्या) व्यापक प्रश्नाचें पत्रांतून विवेचन करतां येण्यासारखा तो नाहीं, तथापि जीवित ही सरणी नसून " वस्तु " आहे हें जें तूं गृहीत करितेस त्याबद्दल तुला संशय उत्पन्न करील अशा एका गोष्टीचा विचार करण्यास तुला मी एथें सुचवितों. जंतुशास्त्रज्ञांना ही गोष्ट चांगली माहीत आहे कीं, जलजीवांपैकीं कांहीं सूक्ष्म प्रकारचे जीव, उदाहरणार्थ, राटिफर

नांवाचे प्राणी, ते धुळीचे कण दिसतील इतके सुकवितां येतात, आणि एकंदर जीवविषयक प्रादुर्भावांच्या संबंधानें जरी ते तेव्हां मृत असतात, तरी पुनः, त्यांना कदाचित् कित्येक वर्षांनीं, पाण्याचा योग्य पुरवठा झाला म्हणजे तें ते ओढून घेतात, आणि आपलीं जीवितें पुनः सुरू करितात. आतां जीवित म्हणजे एक सरणी होय, असें जर आपण समजलों, तर ही गोष्ट कशी होते हें आपल्या ध्यानांत येतें, पण जीवित म्हणजे वस्तु होय असें समजण्यास ती गोष्ट आपल्यास कळत नाहींशी होते. तथापि हा कोटिक्रम एथें आणखी न वाढवितां मी अखेरीस एवढेंच सांगतों कीं, ही एकंदर गोष्ट मुळांत न उकलणारें एक गूढ आहे, आणि टेनिसन जीस " महत्तर आकांक्षा " म्हणून म्हणतो ती धारण करण्याच्या संबंधाचा तुझ्या मनाचा कल माझ्या बरोबर लक्ष्यांत येतो."

ता० ९ नवंबर:—" (ह्या महागूढाच्या संबंधानें तुझे तर्क काय होतात ? असा), तर्कांच्या संबंधानें तूं जो प्रश्न केलास त्याबद्दल मी असें सांगतों कीं, तर्क करीत बसण्याचें मीं अगदीं सोडून दिलें आहे, कारण वस्तुविषयक गूढाचा जितका ज्यास्त विचार करावा तितकें तें गूढ ज्यास्त गूढ होत जातें. पुष्कळ वर्षांपूर्वीं लिहिलेल्या एका निबंधाच्या शेवटीं मीं असें म्हटलें होतें कीं "मानवी ज्ञानवत्ता जशी वनस्पतीच्या व्यापारांच्या शब्दांनीं प्रदर्शित करतां येत नाहीं, तशीच अन्तिम शक्ति मानवी ज्ञानवत्तेच्या शब्दांनीं प्रदर्शित करतां येत नाहीं. " आणि, अर्थात् तेथें जें अन्तिम शक्तीविषयीं मीं म्हटलें आहे तें अन्तिम सरणीलाहि तितकेंच लागू आहे. पोकळी अनंत आहे किंवा नाहीं ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न केल्यास दोन्हीकडूनहि विचाराच्या अशक्यता उत्पन्न होतात, ह्या एका गोष्टीवरून देखील एवढें दिसून येतें कीं, वस्तूंच्या वास्तवि-

कत्वाबद्दल कोणतेंहि तर्क आपण केले तरी त्यांचा वास्तविक सत्याशीं कांहींहि संबंध असूं शकणार नाहीं."

ता० १९ जानेवारी १८९६:—"घडलेली गोष्ट म्हणजे काय हें जाणण्याची शक्ति शास्त्रज्ञांस तेवढी दिलेली आहे, असें प्रो० ओवेनला म्हणतांना ऐकलेलें मला स्मरतें, आणि माझा अनुभवहि तसाच आहे. बहुतेक लोक इतके विवेकबुद्धिविहीन असतात कीं, त्यांस योग्य पुरावा व अयोग्य पुरावा ह्यांच्यांतील भेद कळत नाहीं. अस्वाभाविक म्हणून ज्या चमत्कारांस म्हणतात त्यांचें जेव्हां गतकालीं मीं परीक्षण केलें, तेव्हां ज्या कल्पनांचा पुरावा बनतो त्यांच्यासंबंधाच्या लोकांच्या कल्पना मला इतक्या सैल आढळून आल्या कीं, मीं त्या गोष्टीकडे लक्ष्य देण्याचें अगदीं टाकून दिलें.....असल्या (अस्वाभाविक) गोष्टींचें परीक्षण करणाराचे अंगीं विशेष गुणसंचय असला पाहिजे. त्याच्या ठिकाणीं शास्त्रीय ज्ञान असून कार्यकारणसंबंधानें निश्चित कल्पना पाहिजे, आणि शिवाय मानवी स्वभावाचें ज्ञान असून मानवी हेतु व वर्तन हीं त्याच्या झटकन् ध्यानांत आलीं पाहिजेत. बहुतेक लोक ह्यांपैकीं ह्या किंवा त्या गुणांत कमी असतात. त्यांपैकीं शेवटच्या गुणांत मानवी हेतु व वर्तन झटकन् ध्यानांत आणण्यांत मी स्वतः कमी असल्यामुळें ज्या प्रादुर्भावास नियमबाह्य म्हणून म्हणतात, ते खरेखोटे पहाण्यासाठीं जे प्रयोग करून दाखवितात ते पहाण्यास मी गेलों तर, माझा जो समज तेथें बनेल त्यावर मी भरंवसा ठेवणार नाहीं. लोकांच्या कृति, मनोविकार, मनांतील बेत इत्यादिकांचें जलद निरीक्षण करण्यांत मी इतका कमी आहे कीं, मी अशा ठिकाणीं सहज फसून जाईन. पण माझा स्वतःचा अनुभव असा आहे कीं, विलक्षण काकतालीय न्यायाच्या गोष्टी इतक्या वरचेवर घडून येत असतात कीं, कधीं कधीं अद्भुत म्हणून दिसणाऱ्या ज्या गोष्टी घडून येतात त्यांचा त्यावरून चांगला

उलगडा लागतो. अनेक तऱ्हांनीं नुकसानकारक अशा काकतालीय न्यायाचे पुनःपुनः अनुभव आल्यामुळें मलाहि केव्हां केव्हां दैविक कारणावर विश्वास ठेवण्याचा मोह उत्पन्न झालेला आहे.....आणि स्वाभाविक कार्यकारणपरंपरेविना मला विचारच करतां येत नाहीं इतकी बळकट त्या परंपरेविषयीं जर माझी खात्री नसती, तर केवळ अनुभवजन्य अनुमानावरून माझा बहुधा दैविक कार्यकारण-परंपरेवर विश्वास बसला असता. आणि अर्थविहीन काकतालीय न्याय किती वरचेवर घडतात, व ते किती आश्चर्यकारक असतात, हें दाखविणारे तद्विषयक अनुभव जर मला आलेले नसते, तर दैविक उपपत्तीवर विश्वास ठेवण्याचा मला ज्यास्त मोह झाला असता.....आतां अर्थविहीन काकतालीय न्याय जर इतके वरचेवर होत असतात, तर कधीं कधीं अर्थयुक्त काकतालीय न्याय घडलेच पाहिजेत. त्या काकतालीय न्यायांतील घटक गोष्टी एकमेकांशीं कांहीं अर्थप्रचुर रीतीनें संबद्ध असतात, आणि ते (काकतालीय न्याय) जेव्हां घडून येतात तेव्हां त्यांच्या सादृश्यावरून ते आपलें लक्ष्य ओढून घेतात, आणि त्यांचें कांहीं तरी दैविक कारण असेल असें वाटूं लागतें. वर सांगितलेली दैविक उपपत्ति मीं जी स्वीकारली नाहीं त्यास हाहि विचार कारण झालेला आहे."

ता० २१ जानेवारीः—"दैविक चमत्कार होत असतात, आणि वस्तुक्रमामध्यें दैविकरीत्या भानगड उत्पन्न होते, ह्या गोष्टीवर विश्वास ठेवणें मला जर भागच पडलें, तर माझ्या स्वताच्या अनुभवावरून मला असें अनुमान करणें भाग पडेल कीं, वस्तूंच्या मुळांत असलेली शक्ति दुष्ट आहे.

मी जर बरा असतों.....तर ईस्टबोर्न एथून परत जातांना तूं मला भेटावयास आल्यानें मला आनंद झाला असता, पण दुर्दैवानें स्वतः बोलण्यानें जितका मला त्रास होतो, तितकाच दुसरें बोललेलें ऐक-

ण्यानेंहि होतो.....पण कदाचित् तूं परत येण्याच्या सुमारास मी हल्लींपेक्षां बराच सुधारेन, आणि तसें झाल्यास, तूं सांगतेस ते अनुभव मी आनंदानें ऐकेन. "

ह्यानंतर ह्या विषयावर लेडी पेम्ब्रोकचें मे महिन्यांत एकच पत्र आलें त्यांत ती म्हणते:—" परवां आपलें जें संभाषण झालें (हें बहुधा वर उल्लेखिलेलें असावें) तें ऐकून मीं कसून विचार करण्याचें सोडून दिलें आहे असें तुला कदाचित् वाटेल. " असो. ही बाई ता० ३१ आगस्ट १८९६ रोजीं वारली. स्पेन्सरची दुसरी स्नेहीण पोर्टस्मथची डावेजर कौंटस हीहि त्याच दिवशीं वारली. ती आज पुष्कळ वर्षें त्याच्यावर सारखी ममता करीत असे. आणि त्याच्या शीलाची ती सारखी वाखाणणी करीत असे. तिचा मृत भाऊ कर्नार्व्हनचा अर्ल याच्या निबंधाच्या पुनरावृत्तीची प्रत त्याजकडे पाठवितांना ती असें लिहिती झाली:—" तुझा त्याचा कांहीं बाबतींत कदाचित् मतभेद असेल. कदाचित् त्याचें तुझें पुष्कळ बाबतींत मतैक्य असेल. पण न्याय व सत्य यावर तुमचें दोघांचेंहि उदात्त प्रेम होतें याबद्दल मात्र काडीभरहि संशय नाहीं. "

सात वर्षांपूर्वीं मिलेसपुढें तजबीर काढून घेण्यासाठीं बसण्याची त्यास केलेली विनंती ज्या कारणांवरून त्यानें नाकारिली होती, त्याच कारणांवरून आतां (१८९५ च्या जुलईत) माल्युअर हामिल्टन याजकडून तजबीर काढून घेण्याची विनंती त्यानें अमान्य केली. पुढ- ता० ११ दिजंबर रोजीं, (प्रसिद्ध चितारी) वॉट्स याकडून त्याची तजबीर काढवून राष्ट्रीय तजबीरसंग्रहाला अर्पण करावी, अशी जेव्हां कॉलिन्सनें " टाइम्स"मध्यें सूचना केली, तेव्हां दुसरे दिवशीं त्यानें त्यास असें लिहिलें:—" तुझें ' टाइम्स'मधील कालचें पत्र पाहून मी दचकून गेलों.....तें जोरदार रीतीनें लिहिलेलें आहे, आणि त्यांतील मुद्दा खुबीदार रीतीनें मांडिलेला आहे.

त्यांत जी मागणी केलेली आहे ती पाहून बहुतेक लोक फार चकित होतील, आणि ती वेडेपणाची आहे, असें त्यांस निःसंशय वाटेल. पण मला भीति वाटते कीं, त्यांत जो उद्देश तूं प्रदर्शित केला आहेस, तो बहुधा तडीस जाणार नाहीं.....वॉट्सचें आतां इतकें वय झालें असल्यामुळें तो माझी तजबीर काढण्यास बहुधा तयार होणार नाहीं." त्यासंबधानें त्यानें 'टाइम्स'लाहि ता० १४ दिजंबर रोजीं असें लिहिलें कीं, "कालिन्सनें हें पत्र आपणास न सांगतां लिहिलें व प्रसिद्ध केलें, आणि म्हणून त्यांतील सूचनेबद्दल मला मुळींच जबाबदार धरूं नये." पुढें ता० १७ दिजंबर रोजीं त्यानें कॉलिन्सला लिहिलें:—"तजबिरीच्या बाबतींत मेहेरबानी करून ह्यापुढें कांहीं करूं नको. मला वॉट्सची महती मुळींच वाटत नाहीं, आणि म्हणून तो (तजबीर काढण्यास) कबूल झाला तरी तजबीर काढून घेण्यास मी कबूल होणार नाहीं." वॉट्साहि त्या गोष्टीस कबूल नव्हता; कारण त्यानें कॉलिन्सला लिहिलें कीं, 'स्पेन्सरची तजबीर काढण्याचा मीं यत्न केल्यास तो बहुधा फिसकटेल.'

ह्या वर्षीं "शास्त्रांमध्यें समाजशास्त्राचें स्थान" नांवाचा निबंध प्रो० लेस्टरवार्ड यानें लिहिला, तेव्हां त्यासंबधानें स्पेन्सरनें त्यास ता० १९ सपटंबर १८९९ रोजीं असें लिहिलें:—"तुझ्या निबंधाची प्रत मला आतांच मिळाली, व तो पाहतां त्यांतील कांहीं विधानें मला आश्चर्यकारक वाटलीं. (१) मला वाटतें "शास्त्राची जनिति" हा माझा निबंध तूं वाचिला नाहींस; नाहींतर, कॉम्टेच्या वर्गीकरणांत शास्त्रक्रम त्याच्या जनितीप्रमाणें लाविलेला आहे, असें तूं म्हणता नसतास.....(२) परंतु "स्पेन्सरनें काम्टेची पद्धति ढासळून टाकण्यास जरी इतके यत्न केले तरी आपल्या संघटनात्मक तत्त्वमीमांसेंत शास्त्राची मांडणी करतांना त्यानें तीच

पद्धति स्वीकारिली आहे ", असें विधान तूं केलें आहेस तें वाचून मला ज्यास्तच आश्चर्य वाटलें. आतां यासंबंधानें पहिली गोष्ट ही कीं, ' शास्त्राची जनिति ' ह्या माझ्या निबंधाकडे जर तूं पाहिलेंस तर तुझ्या लक्ष्यांत येईल कीं, तर्कशास्त्र व गणित हीं समाविष्ट करणारा शास्त्रांचा " तात्त्विक " हा पहिला विभाग, आणि यंत्र-शास्त्र, भौतिकशास्त्र, आणि रसायनशास्त्र हीं समाविष्ट करणारा " तात्त्विकमूर्त " हा दुसरा विभाग, ह्यांना संघटनात्मक तत्त्वमी-मांसेंत मुळींच जागा नाहीं.....पण ही गोष्ट वगळली तरी दुसरी गोष्ट अशी आहे कीं, संघटनात्मकमीमांसेंत येणारीं शास्त्रें काम्टेच्या सर-णीशीं अगदीं विरुद्ध आहेत. " आदितत्त्वां "च्या मूळच्या प्रस्ता-वनेंत संघटनात्मक तत्त्वमीमांसेची जी रेखाटणी मीं दिली आहे, तिजकडे जर तूं पाहिलेंस तर तुला दिसून येईल कीं, आदितत्त्वांचा विषयानुक्रम आणि " जीवशास्त्रा " चा विषयानुक्रम यांच्या-मध्यें एक टीप अशी घातली आहे कीं, " योग्य क्रमानें पाहतां, आदितत्त्वें हीं प्रथम निरिंद्रिय सृष्टीस लावून दाखविलीं पाहिजे होतीं, पण हल्लींचीच योजना फार व्यापक असल्यामुळें तो भाग गाळला आहे. " अशा रीतीनें मीं दोन खंड गाळले; एक ज्योतिःशास्त्रा-वरील खंड आणि एक भूगर्भशास्त्रावरील खंड. अंगावर घेतलेल्या खंडाखेरीज हे लिहिणें जर मला शक्य झालें असतें, तर ती माला अशी झाली असती:-" ज्योतिःशास्त्र, भूगर्भशास्त्र, जीवशास्त्र, मानस-शास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र. " आतां, ह्यांपैकीं दुसरा व चवथा का-म्टेच्या वर्गीकरणांत मुळींच आलेला नाहीं. पण (३) ति-सरी गोष्ट ही कीं, माझ्या " शास्त्रांच्या वर्गीकरणांतील " ति-सऱ्या कोष्टकाकडे तूं पाहिल्यास त्यावरून तुला असें दिसून येईल कीं, संघटनात्मक तत्त्वमीमांसेचा क्रम काम्टेच्या क्रमाशीं जुळत नाहीं, आणि मीं केलेल्या " वर्गीकरणांत " दिलेल्या क्रमाशीं जुळतो."

या वर्षाच्या नवंबर महिन्याच्या " रिव्ह्यू आव्ह रिव्ह्यूंत ग्रांट आलेननें स्पेन्सरचें संक्षिप्त चरित्र रेखाटलें. तें वाचून ता० १८ नवंबर १८९५ रोजीं त्यानें त्यास असें लिहिलें:—" तूं नेहमींप्रमाणें अत्यन्त स्पष्टवक्तेपणाची व जोमदार टीका केली आहेस— एका अर्थी फाजील जोमदार टीका केली आहेस, कारण मीं अमुक अमुक केलें आहे असें जें तूं पुष्कळ म्हटलें आहेस, तें वाचून कांहींकांच्या मनांत कदाचित् मला प्रतिकूल असा मनोविकार उत्पन्न होईल. " मी असें म्हणतों ह्याचें एक कारण हें कीं, काल रात्रीं आथीनियम क्लबांत जेव्हां तूं माझ्या मीमांसेचें केलेलें विवरण मीं वाचिलें, तेव्हां मला देखील एकप्रकारचा असा संशयितपणा उत्पन्न झाला कीं, जणूं काय तूं म्हटलें आहेस तें सर्व खरें नसेल. यावरून सामान्य वाचकाच्या डोळ्यांपुढें तूं माझी किती उज्ज्वल प्रतिमा उभी केली आहेस, हें तुझ्या लक्ष्यांत येईल. माझ्या असें लक्ष्यांत येतें कीं, एका बाबतींत तूं तुझा मोठेपणा मला दिला आहेस. वाढ आणि पुनरुत्पादन यासंबंधाच्या कलमांत माझ्या मतप्रदर्शनापेक्षां तूं नुकत्याच प्रतिपादिलेल्या मतांचें ज्यास्त प्रदर्शन केलें आहेस. त्यांत तूं म्हटलें आहेस तें अगदीं बरोबर आहे. तें हें कीं, व्यक्तिदेहासारखी आपली घटना उत्पन्न करतां येते ह्या गोष्टीपेक्षां, त्यास सदृश घटना उत्पन्न करतां येतात ह्या गोष्टींत, अन्तिम गूढ ज्यास्त आहे. "

त्याचा अगदीं लहानपणचा मित्र मि० जॉर्ज होलम १८९६ च्या प्रारंभीं मरण पावला. तेव्हां ता० ८ फेब्रुवारी १८९६ रोजीं तो त्याचा मुलगा चार्लस होलम यास लिहितो:—" पुष्कळ वर्षें जगून पंगूपणा आला, व त्यापासून त्रास होऊं लागला, म्हणजे मग ते अखेरचे दिवस नकोसे होतात, कारण मग माणसास कांहीं करतां येत नाहीं, आणि दुःखाशिवाय दुसऱ्या कशाचा अनुभव येत नाहीं.

असें झालें म्हणजे मरण आल्याबद्दल फारसें वाईट वाटत नाहीं. तूं, तुझी आई, व बहिणी यांना तुझ्या बापाशीं (तुमच्या जीवितांचा) हा शेवटचा दुवा तुटल्याबद्दल जें वाईट वाटावयाचें त्यांत हा विचार मनांत येऊन कांहीं समाधान होण्यासारखें आहे. शिवाय तुम्हांला कायमच्या समाधानाची गोष्ट ही आहे कीं, त्याचें जीवित नमुनेदार असें होतें. उत्साह व मोठी स्वाभाविक बुद्धि यांबरोबर, सर्व उच्चशीलाचें मूळ जी सहानुभूति, ती त्याच्यामध्यें फार मोठ्या प्रमाणावर होती..... मी जो वांचलों तो त्याच्यामध्यें ही प्रबल सहानुभूति होती म्हणूनच वांचलों." (त्यानेंच त्यास लहानपणीं बुडतांना वांचविलें होतें.)

ता० २० फेब्रुवारी १८९६ रोजीं तो (त्याच्या मीमांसेचें एक उत्कृष्ट विवरण करणारास) हेक्टर म्याक्फर्सन यास लिहितो:—"तीन महिने ब्रायटन येथें राहून काल मी परत आल्यावर कार्लाइलवरचें तुझें लहानसें पुस्तक मला मिळालें.....तूं तें ज्या पद्धतीनें लिहिलें आहेस ती इतर चरित्रकारांनीं उचलण्यासारखी आहे; म्हणजे, त्यांत शुद्ध प्रशंसा केली नसून त्याचे दोषहि तूं दाखविले आहेस. तुझ्यासारख्या मजशीं इतकी सहानुभूति असणाऱ्या माणसावर, मजशीं इतका विरोध करणाराचें चरित्र लिहिण्याचें काम पडावें हें चमत्कारिक आहे. तो मजशीं इतका विरोध करी कीं, त्यानें मला "अमेय गर्दभ" (immeasurable ass) असें म्हटल्याचें माझ्या नजरेस आलें होतें."

ता० २८ फेब्रुवारी:—"तुझ्या कार्लाइलवरील छोट्या ग्रंथाचा बराच मोठा भाग मीं लक्षपूर्वक वाचिला. त्याच्यांत कथन, स्पष्टीकरण, स्वभाववर्णन व गुणदोषविवेचन ह्यांचा चांगला संयोग झालेला आहे; आणि ह्या संयोगानें थोडक्यांत त्या माणसाची निश्चित कल्पना (वाचकास) होते. तूं त्याचें गुणदोषविवेचन अगदीं

न्यायानें केलें आहेस—मला वाटतें, औदार्यानें केलें आहेस. त्याचे कमी आकर्षक स्वभावविशेष तूं ठळकरीतीनें मांडिलेले नाहींस. त्याचा अत्यंत अहंमन्यतेचा स्वभाव, मला वाटतें तूं अधिक स्पष्ट रीतीनें दर्शवावयास पाहिजे होता, आणि त्याला माणसांना स्वेच्छेनें वागविणारांबद्दल (क्रॉमवेल, फेडरिक ध ग्रेट इत्यादिकांबद्दल) जी सहानुभूति वाटे, ती तो स्वतः जुलमी होता म्हणून वाटे हेंहि दाखवावयास पाहिजे होतें."

ता० २० मार्चः—"मजवर एक पुस्तक लिहिण्याच्या तुझ्या विचाराबद्दल तुझे आभार मानितों. असें पुस्तक कोणीं लिहिलें तर मला तें फार आवडेल, आणि निःसंशय तूं तें चांगलें लिहिशील.

पण कार्लाइलवरील तुझ्या छोट्या ग्रंथास चांगलें यश आलें म्हणून माझ्यावरील ग्रंथास येईल, हें तुझें अनुमान जरा फाजील आशायुक्त दिसतें. चरित्र व तत्त्वविवेचन हीं लोकांच्या आवडीच्या दृष्टीनें पाहतां, परस्परविरुद्ध टोंकांला आहेत. सामान्य बुद्धीच्या माणसाचे चरित्रापासून (चरित्रवाचनापासून) बिनश्रमानें पुष्कळ मनोरंजन होत असतें. आणि तत्त्वविवेचनापासून पुष्कळ श्रमानें मुळींच रंजन होत नाहीं."

स्पेन्सरला दशांकी (metric) पद्धति आज पुष्कळ दिवस नापसंत झालेली होती; पण तो प्रश्न हातीं घेण्याचा जानेवारी १८९६ पावेतों त्यास प्रसंग आला नव्हता. त्या वेळीं लार्ड कोल्व्हिननें त्या पद्धतीला अनुकूल मत दिल्यामुळें त्यानें त्यास त्यासंबंधानें एक लांब पत्र लिहिलें. नंतर वर्षासवावर्षानें 'टाइम्स'ला त्या पद्धतीविरुद्ध चार पत्रें (ता० ४, ७, ९, २९ एप्रिल १८९६ रोजीं) त्यानें लिहिलीं, आणि नंतर तीं चोपड्याच्या रूपानें एकत्र छापून त्याच्या प्रती इंग्लिश कामन्स सभेच्या व अमेरिकन कॉंग्रेसच्या सभासदांकडे पाठवून दिल्या.

या सुमारास त्याची संघटनात्मक तत्त्वमीमांसा पुरी होण्याच्या बेतांत आली होती, त्यासंबंधानें यूमन्सची बहीण त्यास ता० २० फेब्रुवारी १८९६ रोजीं लिहितेः—"तुझें अनुपम काम आतां संपत आलें आहे. तूं किती तरी लोकांवर धैर्य व चिकाटी दर्शविली आहेस ! तुला स्वताबद्दल फार अभिमान वाटला पाहिजे. या पूर्ततेच्या समयीं एडवर्ड (तिचा मृत भाऊ) जिवंत असता, तर किती बहार झाली असती ! तुझें काम तुला तडीस नेतां येणार नाहीं अशी १८६९ त जेव्हां त्यास भीति उत्पन्न झाली, तेव्हां त्यास जी फार काळजी उत्पन्न झाली तिचें मला किती तरी चांगलें स्मरण आहे. "असें झालें तर (तुझें काम तडीस गेलें नाहीं तर) तुला तें सहज करवेल काय ?" असें जेव्हां मीं त्याला विचारिलें, तेव्हां तो म्हणाला, "मला वाटतें, तसें झाल्यास तो मरून जाईल." पण तुला यशःप्राप्ति व्हावी याबद्दल एडवर्डला इतकी कळकळ वाटत असे कीं, त्यापेक्षां ज्यास्त कळकळ काय ती तुझ्या आईबापांनाच वाटत असेल. आणि दुःखाची गोष्ट ही कीं, तो मेला त्या वेळीं तुझें काम पुरें होण्याचा संभव फारच अल्प होता."

असो. सरते शेवटीं त्यानें स्वताला आक्रमण्यासाठीं जो लांब रस्ता आंखून ठेविला होता, त्याच्या दुसऱ्या टोंकास तो जाऊन पोहोंचला तेव्हांचा त्याचा सेक्रेटरी ट्रौटन यानें त्या प्रसंगाचें असें वर्णन केलें आहेः—"ज्या औद्योगिक संस्था पुऱ्या केल्यानें स्पेन्सरची तत्त्वमीमांसा पुरी झाली त्या ग्रंथांचे शेवटचे शब्द जेव्हां त्यानें मला (लिहून काढण्यास) सांगितलें, तेव्हां तो ७६ वर्षांचा होता; ज्यास्त यथार्थ रीतीनें बोलावयाचें असल्यास, ती आगस्ट १८९६ ची तेरावी तारीख होती. आपल्या खुर्चीवरून हळू हळू उठून, आनंदानें प्रफुल्लित वदन करून त्यानें टेबलावरून मजकडे हात केला, आणि ह्या शुभ गोष्टीच्या संबंधानें आह्मीं हातांत हात

घातले. " ज्या कामासाठीं मी जगलों आहें तें काम मीं पुरें केलें आहे " एवढेंच तो मला म्हणाला, आणि पुनः खालीं बसला. त्याचा उल्लसितपणा त्या क्षणापुरताच होता, आणि लागलाच त्याचा चेहरा नेहमींप्रमाणें पुनः शांत दिसूं लागला. "

प्रकरण चोविसावें

अभिनन्दनें

संघटनात्मक तत्त्वमीमांसेचा शेवटचा खंड जेव्हां प्रसिद्ध झाला, तेव्हां स्पेन्सरचें सहानुभूतिपूर्वक इतकें अभिनन्दन झालें कीं, तितकें फारच थोड्यांचें होतें. त्याच्याच देशांतून केवळ नव्हे तर इतर पुष्कळ देशांतून, त्याच्या अनुयायांकडूनच केवळ नव्हे तर ज्यांस उत्क्रान्ति-मत मान्य नव्हतें अशांकडूनहि, अत्यंत प्रशंसापर उद्गार निघूं लागले. त्याची जी स्तुति लोक करूं लागले ती त्याच्या केवळ लोकोत्तर बुद्धिमत्तेबद्दलच नव्हती; तर त्याच्या नैतिक शीलाबद्दल म्हणजे ज्या त्याच्या उच्च व अढळ निश्चयबुद्धीनें त्यास इतकीं वर्षें सांवरून धरिलें होतें, आणि बहुतेक दुर्लंघ्य म्हणून दिसणाऱ्या अडचणींतहि अन्तिम साध्याकडे त्याची दृष्टि निश्चल ठेविली होती, त्या त्याच्या निश्चयबुद्धीबद्दलहि लोक त्याची फार स्तुति करूं लागले. ह्या अभिनन्दनप्रसंगीं माणसाच्या विचाररूप एकंदर निर्भींत त्यानें जी भर घातली होती, ती लोकांनीं मोकळ्या मनानें कबूल केलीच; पण अखिल मनुष्यतेचे उद्देश शुद्ध करण्यासाठीं, आणि तिची नीतिमत्ता दृढ करण्यासाठीं, त्यानें जें कांहीं केलें होतें तें त्यांनीं ह्याहूनहि ज्यास्त मोकळ्या मनानें कबूल केलें.

त्याची जी वाखाणणी झाली ती पाहून जरी तो संतुष्ट झाला तरी त्यास आपली फाजील प्रसिद्धि नको होती. म्हणून तो आपली मुलाखत कोणास घेऊं देईना. त्यासंबंधानें त्यानें लंदनांतील एका वर्तमानपत्राच्या संपादकास असें लिहिलें:—"हल्लींच मीं लोकांपुढें फार आलेलों आहें, आणि आपली ज्यास्त प्रसिद्धि करून घेण्यासासाठीं स्वत: कांहीं करणें मला मुळींच आवडणार नाहीं. स्वत:विषयीं व स्वताच्या कामाविषयीं स्वत: बोलणें मला नेहमींच नको असून हल्लींच्या प्रसंगीं तर विशेषच नको आहे. तद्वतच पुढें दिजंबरांत बाल्फोर व मोर्ले जेव्हां त्यास भेटावयास आले, तेव्हां त्यांच्या भेटीपासून जरी त्यास फार आनंद वाटला, तरी ती गोष्ट वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होऊं नये म्हणून "तिजबद्दल कोणापाशीं बोलूं नका", अशी ताकीद त्यानें आपल्या घरांतल्या माणसांस देऊन ठेविली.

स्पेन्सरची तजबीर काढून राष्ट्रीय संग्रहालयांत ठेवावी अशी कॉलिन्सनें कांहीं महिन्यांपूर्वीं जी सूचना केली होती ती जरी फुकट गेली, तरी त्यानें निराश न होतां ता० १७ नवंबर रोजीं 'टाइम्स'-मध्यें ती पुन: पुढें आणिली. त्याचा परिणाम असा झाला कीं, लागलींच त्या कामाकरितां एक कमिटी नेमिली गेली. तिचा अध्यक्ष सर जोसेफ हूकर हा असून,आर्गाइलचा ड्यूक, मि०बाल्फोर, डा० बॅस्टिअन, मि० लिओनार्ड कोर्टने, मि० फ्रान्सिस गाल्टन, प्रो० रे लॅन्कास्टर, मि० जॉन मोर्ले, सर फ्रेडरिक पोलक, मि० लेस्ली स्टीफेन, व प्रो० जेम्स सलि, हे सभासद होते; आणि कॉलिन्स सेक्रेटरी होता. तिजसंबंधानें स्पेन्सरनें ता० २ दिजंबर १८९६ रोजीं कालिन्सला याप्रमाणें लिहिलें:—"टाइम्समध्यें केलेल्या सूचनेला फारसें उत्तेजन मिळणार नाहीं असें समजून तिजबद्दल आजपर्यंत मीं कांहीं म्हटलें नव्हतें. ह्यूज पण मला सांगतो कीं, तूं व प्रो०

सलि कमिटी बनविण्याच्या खटपटींत आहां, पण कशासाठीं तें तो सांगत नाहीं. दहा दिवसांपूर्वीं मीं असें ऐकिलें होतें कीं, प्रो० सलि मला अभिनंदनपर मानपत्र देण्यासाठीं खटपट करीत आहे; ती त्यासंबंधानेंच आहे. ती खटपट जर ह्या दुसऱ्या गोष्टीच्या संबंधानें असेल, तर सरासरी आठ वर्षांपूर्वीं असलीच सूचना पुढें आली असतां काय झालें तें तुला कळविणें, मला वाटतें, माझें कर्तव्य होय. ....वर सांगितल्यासारखी माझी समजूत झाल्यामुळें मीं तुला इतके-दिवस लिहिलें नाहीं; ह्यामुळें कदाचित् तूं फुकट श्रम घेतले असशील अशी मला भीति वाटते; पण तसे तूं घेतले नाहींस अशी मी आशा करितों. ”

ह्या कमिटीनें त्याच्या मनाची शंका निघून जाईपर्यंत थांबण्याच्याऐवजीं एक अभिनन्दन-पत्र तयार केलें, व त्याच्यावर सह्या मिळविल्या, आणि तें तत्त्वमीमांसेचा शेवटचा खंड प्रसिद्ध झाल्यानंतर सरासरी एका महिन्यानें त्यास नजर केलें. तें त्यास नजर करण्याचें काम सर जोसेफ हूकर याजकडे संपविलें होतें, व त्यानें अर्थात् फार आनंदानें केलें. मानपत्र ता० १६ दिजंबर १८९६ चें असून असें होतें:—“प्रिय महाराज, आह्मीं खालीं सही करणार तुमची “संघटनात्मक-तत्त्वमीमांसामाला” पुरी झाल्याबद्दल तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. आह्मां सर्वांस तिच्यांतील सिद्धान्त जरी सारख्या प्रमाणानें कबूल नाहींत, तरी तिच्यामध्यें ज्या मोठ्या बौद्धिक शक्ती दिसून येतात, आणि विचाराच्या इतिहासावर तिनें जो अत्यन्त मोठा परिणाम घडवून आणिला आहे, त्याबद्दल आमचें सर्वांचें मतैक्य आहे; तद्वतच आज इतकीं वर्षें त्या शक्तींना योग्य अशा कार्याकडे एकनिष्ठपणें लावण्यास, आणि कितीहि अडचणी आल्या तरी एवढा मोठा व्यूह सिद्धीस नेण्यास ज्या उच्च नैतिक गुणांनीं तुम्हांस समर्थ केलें त्यांचाहि आमच्यावर कमी ठसा उमट-

लेला नाहीं. आमच्याप्रमाणें ज्या पुष्कळांचा आपल्या लेखांनीं फायदा होऊन आपल्याबद्दल सन्मानबुद्धि उत्पन्न झाली आहे, त्यांना आपली हुबेहुब तजबीर जवळ बाळगणें समाधानकारक वाटेल. म्हणून आह्मांस असें सुचलें आहे कीं, आपली तजबीर काढण्यास एकादा नामांकित चित्रकार लावण्याची आह्मांस परवानगी देण्याची आपल्यास विनंति करणें, आणि आमच्या स्वताच्या व आमच्या मागून येतील त्यांच्या फायद्यासाठीं आमच्या एकाद्या राष्ट्रीय संग्रहालयांत ती टांगणें, हें ह्या प्रसंगास योग्य होईल.

आह्मी आशा करितों कीं, जी विश्रान्ति घेण्यास आपण इतके लायख झाले आहां तिनें आपल्या कृतीस फायदा होईल, आणि आपलें काम पुरें केल्याच्या जाणीवेचा आपण पुष्कळ काळ उपभोग घेत रहाल."

ह्या मानपत्रावर सरासरी ७९ नामांकित गृहस्थांच्या सह्या होत्या. त्यासंबंधानें कॉलिन्स यास ग्लाडस्टननें ता० ३० नवंबर १८९६ रोजा असें लिहिलें:—" पुष्कळ सह्यांमध्यें आपली सही द्यावयाची नाहीं असा माझा पुष्कळ दिवसांचा नियम आहे, आणि हल्लींच्या ह्या प्रसंगीं प्रमुखत्वानें पुढें येण्याची माझी पात्रता आहे असें मला वाटत नाहीं. पण तुला योग्य वाटल्यास स्पेन्सरला जो विनंति तुम्ही करीत आहां ती पसंत असणारांमध्यें माझें नांव घालण्याची मी तुला विनंति करितों. कारण त्याच्या विलक्षण शक्ती, आणि त्याच्याहूनाहि ज्यास्त विरळ असें जें त्याचें पाणीदार व आत्मत्यागविशिष्ट शील, त्यांबद्दल त्याची जी इतकी वाखाणणी होत आहे ती अगदीं न्याय्यच आहे."

ह्या अभिनन्दनाबद्दल त्यानें ता० १९ दिजंबर १८९६ रोजीं हूकरला असें लिहिलें:—" जे अभिनन्दन करितात त्यांच्या नामांकितपणाच्या भूमितिश्रेढीनें त्यांची किंमत वाढते असें म्हणणें

योग्य होईल. तसें म्हटल्यास, निरनिराळ्या क्षेत्रांत इतकें उच्चस्थान धारण करणाऱ्या लोकांकडून येणाऱ्या अभिनन्दनसंचयानें मला अत्यन्त समाधान होणें साहजिक आहे. आणि माझ्या राहिलेल्या आयुष्यांत मला आरोग्य व सुखसंचय यांची प्राप्ति होवो, अशी जी इच्छा त्यांत प्रदर्शित केली आहे, तिजमुळें सहज मला त्याबरोबर समाधानाबरोबर आनंद वाटत आहे. आणखी जो माझा मान करण्यास तुम्ही तयार झालां आहां, त्यामुळें माझ्या मनांत कांहींसा झगडा उत्पन्न झाला आहे. आठ वर्षांपूर्वीं, वर्गणी करून मिलेसकडून तजबीर काढून घेण्यास मी तयार आहें काय, असें मला विचारिलें असतां मीं नाहीं म्हटलें होतें आणि त्याबद्दल अशीं कारणें दिलीं होतीं कीं, पसंतीचीं चिन्हें अर्पण करण्याकरितां वर्गण्या गोळा करण्याचा प्रघात बेताबाहेर गेला आहे, पुष्कळ प्रसंगीं नैतिक जोरा करून ज्या वर्गण्या गोळा करितात त्या मला मुळींच पसंत नाहींत, आणि माझ्या माहितींतील व गैरमाहितींतील मित्रांना मजसाठीं स्वताच्या पिशवीला चट्टा लावण्यास मी कबूल नाहीं. हीं कारणें कायम होतीं, आणि त्यांचा पगडा माझ्या मनावर असल्यामुळें ज्या गृहस्थानें हा (माझी तजबीर काढण्याचा) बूट प्रथम काढिला, त्यास त्या पत्राची एक प्रत मीं नुक्तीच पाठविली, आणि मला वाटलें कीं, एवढ्यावरच काम भागेल. पण ही सूचना किती लोकांना पसंत पडली आहे, आणि ज्या अनेक लोकांनीं तीसआपला टेकू दिला आहे ते किती नामांकित आहेत, हें मला तेव्हां ठाऊक नव्हतें. आतां विसंगतपणा दाखवून आपला आक्षेप काढून घ्यावा, किंवा ज्यांच्या योग्यता व पराक्रम ह्यांबद्दल मला इतकी सन्मानबुद्धि वाटते अशा इतक्या पुष्कळ गृहस्थांनीं मनःपूर्वक प्रदर्शित केलेल्या मनोभावाचा व इच्छांचा उद्धटपणें अव्हेर करावा, असें मला भाग पडल्याचें मला आढळून येतें. ह्या दोन मार्गांमध्यें वस्तुतः निवड

करण्यास सवडच नाहीं. इतक्या नामांकित सह्या करणारांनीं इतक्या सहानुभूतीनें केलेल्या विनंतीस मान देणें, आणि त्याबरोबर जो मान केला आहे त्याबद्दलची माझी पूर्ण जाणीव तुझ्या द्वारा त्यांना व्यक्त करून दाखविणें, मला भाग आहे. "

ह्यांप्रमाणें ह्यावेळीं जरी तो आपली तजबीर काढून घेण्यास कबूल झाला, तरी कांहीं दिवस विचार केल्यावर त्याबद्दल त्यास पुनः शंका उत्पन्न झाली. त्यासंबंधानें ता० ३० दिजंबर १८९६ रोजीं तो हूकरला लिहितोः—" तुझा प्रश्न सोपा आहे, पण त्याचें उत्तर तितकें सोपें नाहीं. सरासरी तीन महिन्यांपूर्वीं, अमेरिकेस जाण्याच्या अगोदर, (अमेरिकेंतील) पिटसबर्ग एथील विद्यासंस्थेला नजर करण्यासाठीं तजबीर काढून घेण्यास मीं बसावें, असा आग्रह कार्नेगीनें मला केला. मी खुशीनें कबूल झालों, आणि औलेस यानें माझी तजबीर काढावी, ही त्याची सूचना मीं मान्य केली..... पण एथें एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. हे प्रमुख कारागीर आपल्या कामाबद्दल भलत्याच रकमा मागतात, आणि ज्यांनीं मानपत्रावर सही केली आहे त्यांना जर तजबिरीचा खर्च सोसावयाचा असेल, तर प्रत्येकाच्या वांट्याला त्याचा बराच भाग येईल, आणि त्या गोष्टीस मी निःसंशय नाकबूल असणार. म्हणून मि० औलेस कार्नेगीकरितां जी तजबीर तयार करीत आहे तिची नक्कल त्यास करावयास तुम्हीं सांगणें योग्य होईल. तिची किंमत भारी होणार नाहीं." अशी तजवीज जरी त्यानें हूकरला सुचविली, तरी ती मान्य न करितां शेवटीं तजबीर तयार करण्याचें काम सर ह्यूबर्ट हरकोमर ह्या चित्रकाराकडे संपविण्याचें कमिटीनें ठरविलें.

मानपत्र मिळण्यापूर्वीं कांहीं दिवस त्यानें कार्नेगीला असें लिहिलें होतें कीं, " वर्गणीनें आपली तजबीर काढून घेण्याचें आपण नाकबूल केलें आहे. " तेव्हां आतां आपण होय कां म्हटलें हें

त्यास समजवण्याकरितां ता० ४ जानेवारी १८९७ रोजीं पुढील पत्र लिहिलें:—" मला आपलें म्हणणें सोडून द्यावें लागलें. मीं तुला लिहिल्यानंतर थोडे दिवसांनीं ऐंशीहून ज्यास्त सह्या असलेलें एक मानपत्र मला आलें; त्या सह्यांमध्यें राजकीय, शास्त्रीय, वाङ्मय-विषयक इत्यादि अनेक क्षेत्रांत नामांकित असलेल्या माणसांच्या सह्या होत्या, आणि मीं तजबीर काढून घेण्यास बसावें म्हणून त्यांत मला विनंति केलेली होती. इतके वजनदार असें मीं कांहींहि अपेक्षिलेलें नव्हतें, तेव्हां आपला निश्चय सोडून द्यावा, किंवा ज्यांस मान देण्यास मला प्रत्येक कारण आहे अशांचा सार्वजनिक व ठळक रीतीनें अवमान करावा, आणि "गैर रीतीचा व हट्टी" असा आपला निषेध करून घ्यावा, अशा संकटांत मी पडलों."

ह्या एकंदर प्रकरणासंबंधानें ता० ८ जानेवारी १८९७ रोजीं त्यानें कॉलिन्सला असें लिहिलें:—" म्हणतात त्याप्रमाणें, तूं एथून तेथवर विजेता झाला आहेस; म्हणजे तूं इतरांस जिंकलें आहेस आणि मलाहि जिंकलें आहेस. इतक्या अनिवार्य रीतीनें तूं मला तोंड वळवावयास लावशील, असें मला वाटलें नव्हतें. तथापि, जरी एका अर्थीं मी जित झालों आहें हें कबूल करणें मला भाग आहे, तरी ह्या पराजयांत एकप्रकारचें समाधान आहे, आणि दुसऱ्या बाजूनें थोडीशी भरपाईहि झाल्यासारखी आहे. अमेरिकनांनीं मजशीं केलेल्या वर्तनाशीं तुलना करून पाहतां माझ्या देशबांधवांनीं मजशीं जें आजपर्यंत वर्तन केलें आहे त्यामुळें आज पुष्कळ वर्षं माझा त्यांजविषयींचा मनोभाव फारसा स्नेहाचा नाहीं; आणि मी जो माझे (इंग्लिश लोकांकडून) मान करून घेण्यास तयार नव्हतों तो कांहीं अंशीं ह्यामुळेंच नव्हतों. मान देणें पुष्कळ लांबणीवर टाकिलें म्हणजे त्याची किंमत नाहींशी होते.....तथापि आतां ती गोष्ट (मला मान देणें ही गोष्ट) होऊन गेली आहे, आणि नीट रीतीनें झाली

आहे; आणि ती प्रथम तूं सुचविली असल्यामुळें व बऱ्याच अंशीं बनवून आणिली असल्यामुळें, मला तुझे मनःपूर्वक उपकार मानूं दे. निदान तूं तरी गुणग्रहण करण्याच्या कामीं कधींच दिरंगाई केलेली नाहींस. "

ह्याचसंबंधानें ता० ३ फेब्रुवारी १८२७ रोजीं तो बाल्फोर यास लिहितो:-" हावर्ड कॉलिन्सकडून मला असें कळतें कीं, अभिनन्दनपर मानपत्रावर वगैरे सही करणें ह्या पलीकडेहि तूं मला आपला ऋणी केलें आहेस. या कामीं तूं इतकी मदत केली आहेस कीं, ज्यास फुरसत असेल त्याच्याकडूनहि ती होती तर प्रशंसनीय म्हणून समजली गेली असती; ती तुझ्यासारख्या सार्वजनिक कामाचें एवढें ओझें वाहणारानें केली म्हणून ज्यास्त प्रशंसनीय होय, आणि ज्याचीं मतें महत्त्वाच्या बाबतींत माझ्याहून इतकीं भिन्न आहेत त्यानें केली ह्या दृष्टीनें त्याहूनहि ज्यास्त प्रशंसनीय होय. आणि खरोखरच्या सहानुभूतीखेरीज तिच्यांत दुसरा कांहीं हेतु नाहीं अशा रीतीनें ती तूं मुकाट्यानें केलीस, ह्यामुळें ती ज्यास्तच लोकोत्तर झाली आहे. म्हणून जे आभार मानणें मला आवश्यकच वाटतें, त्यांचा मेहरबानी करून स्वीकार कर. असल्याच परिस्थितींत मीं स्वतः काय केलें असतें हा विचार मनांत येऊन मला तुझ्या मदतीची ज्यास्तच किंमत वाटते. मी (असल्या परिस्थितींत) मुकाट्यानें होय म्हणणें ह्यापलीकडे गेलों नसतों. मीं आंग मोडून मदत करण्यास प्रवृत्त व्हावें इतकें माझें मन उदार झालें असतें असें मला वाटत नाहीं. हा कृतिभेद मतभेदाच्या माथीं मारण्यास जर मी शकलों असतों (मतभेदामुळें हा कृतिभेद उत्पन्न होतो असें जर योग्यरीत्या म्हणतां आलें असतें), तर माझ्या सामान्य मतांवरील माझा विश्वास ढळण्यास तें बरेंच मोठें कारण झालें असतें. पण (तुझ्या) स्वभावाचा नैसर्गिक श्रेष्ठपणा हें याचें (या कृति-

भेदाचें) खरें कारण होय असें मी समजतों." ह्या पत्राचा पहिला भाग त्यानें स्वहस्तानें लिहिला आहे, पण पुढें त्याच्यानें स्वतः लिहवेना, म्हणून पुढील भाग त्यानें सांगून दुसऱ्यानें लिहिलेला आहे.

मानपत्राच्या कामीं कॉलिन्स यास मदत करण्यास प्रो० जेम्स सलि यास ता० ६ फेब्रुवारी १८९७ रोजीं स्पेन्सरनें असें लिहिलें:- "ज्या गाष्टी मीं (ह्याच्या अगोदर) करावयास पाहिजे होत्या पण केल्या नाहींत, त्यांतील एक गोष्ट ही होय कीं, नुक्तेंच सहानुभूति व पसंती यांचें जें प्रदर्शन झालें त्यास हातभार लावण्याच्या कामीं तूं केलेल्या श्रमाबद्दल माझी कृतज्ञता प्रदर्शित करणारें पत्र तुला लिहिणें, ही होय. मीं " हातभार लावण्याच्या कामीं " असें म्हटलें; पण अभिनन्दनपर मानपत्राचा प्रथम बूट काढण्याच्या कामीं तूं जी खटपट केलीस ती ध्यानांत घेतां हे शब्द अपुरते दिसतात..... तूं जें कांहीं केलें आहेस त्या सगळ्याबद्दल मनःपूर्वक आभारप्रदर्शन केल्याखेरीज मला ह्या एकंदर गोष्टींची इतिश्री करतां कामा नये. आपण आपलें काम समाधानकारक रीतीनें केलें आहे, ह्या ज्ञानवत्तेंत लेखकाचें मुख्य समाधान असतें, हें तुला अनुभवानें ठाऊकच आहे; पण निवडक लोकांनीं त्याबद्दल पसंती व्यक्त केलेली पाहणें ह्यापासून होणारें समाधान वरील समाधानाच्या अगदीं खालोखालचें असतें."

केम्ब्रिज व एडिंबरो एथील युनिव्हर्सिट्यांनीं मानाच्या पदव्या स्वीकारण्याबद्दल पुनः या वेळीं त्यास विनंती केली; पण त्यानें होय म्हटलें नाहीं. डार्बी एथील म्युनिसिपालिटीनें त्याचा जन्म झाला त्या घरावर एक पाटी मारण्याची सूचना पुढें आणिली, पण ती अमलांत आली नाहीं; कां तें न कळे. पुढें १९०७ सालीं तेथील स्पेन्सर-सोसायटीनें संगमरवरी दगडाची एक पाटी तेथें बसविली. तजबीर काढण्यास बसण्याच्या संबंधानें पाहतां वरचेवर वेळा ने-

मल्या जात होत्या व चुकल्याहि जात होत्या. त्यामुळें १८९७ साल बहुतेक संपेपर्यंत त्या बाबतींत कांहीं झालें नाहीं. मात्र स्पेन्सरच्या नाखुशीमळेंच तें काम लांबणीवर पडत आहे अशा बातम्या पसरल्या. तेव्हां त्यासंबंधानें ता० ६ दिजंबर १८९७ रोजीं तो ब्रायटन एथून कॉलिन्सला लिहितोः—" मीं बसावयाचें नाकारितों असें म्हणणारा कोण वेडा आहे हा ? आज सहा आठवडे मीं ही खोली सोडिलेली नाहीं. माझ्या आपत्तीचा उपयोग मजवर हल्ले करण्याच्याच कामीं (लोकांनीं) करावा हें चांगलें नव्हे. हरकोमर एथें तीन दिवसांपूर्वीं आला होता, आणि प्रकाश चांगला असता, तर मी बिछान्यावर बसलों असतां तो माझे फोटो काढता. तो पुढच्या आठवड्यांत पुनः येणार आहे. "

ता० २३ दिजंबरः—" हरकोमर गेल्या आठवड्यांत येथें यावयाचा होता, पण पडसें—ताप आल्यामुळें आपण घरांत बसून असल्याचें त्यानें लिहिलें. काल तो आला, व त्यानें माझे पांच फोटो घेतले, आणि आणखी फोटो घेण्याकरितां तो उद्यां येणार आहे. तो फोटोवरूनच सगळी तजबीर तयार करण्याचें म्हणतो, पण ह्या गोष्टीस मला संमति देतां येत नाहीं. ती पुरी करण्यास कांहीं बैठकी झाल्याच पाहिजेत. तुझ्या पत्रांवरून दिसतें तशी माझ्यासंबंधानें प्रतिकूल समजूत करून घेणारा कोण मित्र आहे हा ?..... कांहीं दिवसांपूर्वीं तूं म्हणालास कीं, बसतों म्हणून वचन देऊन मी बसलों नाहीं.....पण ह्या विलंबाकरितां मीच जबाबदार आहें असें म्हणणें ही चूक आहे. गेल्या उन्हाळ्याच्या महिन्यांत मी बसूं शकलों असतों, पण तेव्हां हरकोमर बाहेर देशीं गेला होता..... काल रात्रीं मीं निजावयास जात होतों इतक्यांत तुझें पत्र आलें, आणि तें वाचून जो मला त्रास झाला त्यामुळें बराच वेळपर्यंत मला झोंप आली नाहीं. "

याचसंबंधानें सर जोसेफ हूकरला ता० २७ दिजंबर १८९७ रोजीं त्यानें असें लिहिलें:—" गेल्या तीन महिन्यांत मजपाशीं (लोकांनीं) केलेल्या चवकशांवरून व विधानांवरून असें दिसतें कीं, तजबीर काढण्याच्या कामीं झालेल्या दीर्घ विलंबावरून, मजविरुद्ध कांहींचें मत झालें आहे; कारण लोकांस वाटतें कीं, ह्या विलंबाचें कारण माझा विक्षिप्तपणा आहे.....वर्गणीनें काढिलेल्या तजबिरीमध्यें गर्भित होणारा उपकारीपणा मला आवडत नाहीं; आणि वर्गणी देणारांपैकीं कांहींजणांनीं जर ती मनःपूर्वक दिली नसेल, तर ह्या नावडीस ज्यास्तच कटु स्वरूप येतें.....माझी हल्लींची इच्छा अशी आहे कीं, हरकोमरची फी आपण स्वतः भरावी आणि वर्गण्या परत कराव्या; व त्याबरोबरच ह्या पत्राची एकेक प्रत पाठवावी. "

ह्यावर सर जोसेफनें त्यास ताबडतोब उत्तर लिहिलें, आणि वर्गणीदारांसंबंधानें तुझा त्याचा गैरसमज झाला आहे असें त्यास आश्वासन दिलें. तें मिळाल्यावर स्पेन्सरनें त्यास ३० दिजंबर १८९७ रोजीं पुनः पत्र लिहिलें:–" तुझें पत्र पावलें. त्याबद्दल फार फार आभार. तें वाचून माझ्या शंका नाहींशा झाल्या. मीं तुझीं आश्वासनें आनंदानें स्वीकारितों, आणि तुला विनंती करितों कीं, माझें पूर्वीचें पत्र कोणास दाखवूं नको. कॉलिन्सनें कित्येक प्रसंगीं जे उल्लेख केले, त्याचा मी भलताच अर्थ करीत होतों असें दिसतें. "

शेवटीं त्याची तजबीर १८९८ च्या फेब्रुवारींत पुरी झाली. तिजसंबंधानें ता० २ मार्च १८९८ रोजीं तो हूकरला लिहितोः— " कांहीं दिवसांपूर्वीं कॉलिन्सनें मला असें लिहिलें कीं, तजबीर अत्युत्तम व वर्णनीय बनली आहे, आणि ज्या अर्थीं ती काढून घेण्यांत तुझें इतकें अंग होतें त्या अर्थीं तुझें त्याबद्दल अभिनन्दन केलें पाहिजे. तो म्हणतो, हें अभिनन्दन करावयाचें तें मुख्यत्वेंकरून लोकांकरितां इतकें सुंदर कलेचें काम संपादन करून घेतल्याबद्दल केलें

पाहिजे, कारण त्याच दृष्टीनें तो मुख्यत्वेंकरून त्याच्याकडे पाहत आहे. हें त्याचें म्हणणें मला कबूल आहे, आणि मी खाजगी व सार्वजनिक दृष्ट्या आनंदानें तुझें अभिनन्दन करितों. ह्यासंबंधानें विलक्षण गोष्ट अशी दिसते कीं, ती तजबीर मला स्वतःला बहुतकरून दिसणारच नाहीं.....मला तिचा फोटो पाहूनच समाधान करून घ्यावें लागेल."

त्याप्रमाणें तिचा फोटो हरकोमरकडून जेव्हां त्याजकडे आला तेव्हां त्यानें त्यास १८ एप्रिल १८९८ रोजीं लिहिलें:—"तजबिरीच्या संबंधानें माझ्या मतापेक्षां माझ्या मित्रांचींच मतें ज्यास्त ग्राह्य समजलीं पाहिजेत.कारण आरशांत माणसाच्या चेहऱ्याच्या डाव्याउजव्या बाजू उजव्या डाव्या दिसत असल्यामुळें माणसास स्वताचा चेहरा बरोबर रीतीनें दिसत नाहीं. शिवाय तूं ज्या ठेवणींत ती काढिली आहेस त्या ठेवणींत माणसास स्वताचा चेहरा दिसणें अशक्य आहे. तथापि तूं काढिलेल्या चेहऱ्यांत एक गोष्ट माझ्या लक्ष्यांत येते; ती ही कीं, त्यांत माझ्या नाकाची गरुडी रेखाटणी जराशी फाजील ज्यास्त ठळक झाली आहे; डोक्याची ठेवण जशी त्यांत दाखविली आहे त्या ठेवणीला ती कदाचित् फाजील ठळक नसेल, पण नाकाच्या सामान्य आकाराच्या दृष्टीनें पाहतां ती फाजील ठळक आहे. ' सामान्य आकार ' मी यासाठीं म्हणतों कीं, दोन बाजूंनीं पाहतां माझ्या नाकाचा अगदीं एकच आकार दिसत नाहीं..... त्यांतील गोम अशी आहे कीं, मी जेव्हां लहान होतों,तेव्हां माझ्या लहान बहिणीनें जेवणांतील सुरीनें माझें नाक कापिलें होतें. त्या जखमेची खूण दिसण्यांत येत नाहीं, पण तिचा परिणाम असा झाला कीं, एका बाजूपेक्षां दुसऱ्या बाजूनें त्याची (नाकाची) रूपरेखा ज्यास्त पुढें आलेली दिसते, आणि त्यामुळें कांहीं ठिकाणांहून पाहतां तें गरुडी दिसतें, व कांहीं बाजूंनीं पाहतां दिसत नाहीं.

जेव्हां माझा फोटो घेतला तेव्हां ही गोष्ट मला स्मरली असती तर बरें झालें असतें, कारण मग हल्लींहून सरळ रूपरेखा येईल अशी बैठक मीं सुचविली असती, कारण मला रूपरेखा—ठेवण आवडत नाहीं.....मला वाटतें, एका मुख्य गोष्टींत तुला चांगलें यश आलें आहे, ती कोणती म्हणशील तर मुद्रा. विचारवंताला योग्य अशी दूरची टक तिच्यांत आहे, आणि ती समजदार टक आहे, आणि ती अर्थात् मी अयोग्य समजत नाहीं.....या बाबतींत तुला आलेलें यश फार महत्त्वाचें आहे. आणखी एक टीका मला सुचत आहे. दुर्दैवानें मी सकाळच्या डगल्यावरून बाहेर जाण्याच्या वेळचा झगा घातला होता, आणि तेणेंकरून माझें शरीर स्थूल आहे असा ग्रह उत्पन्न होत होता. खांदा आणि उजवा बाहू फार लांबवर पसरल्यामुळें ह्या ग्रहाला ज्यास्तच बळकटी आलेली आहे. शरीर व पोषाक ह्यांच्या ह्या मोठ्या विस्ताराचा एकंदर परिणाम असा झाला आहे कीं, शरीराच्या मानानें डोकें कांहींसें ठेंगू दिसतें ह्यावरून, (तजबीर पाहून) माझ्या मनावर ती लहान डोक्याच्या माणसाची असावी असा ठसा उमटतो. (आतां) माझें डोकें जरी विशेषतः मोठें नाहीं, तरी त्याचा घेर २२ इंच आहे, आणि मला वाटतें फोटो पाहणाराला तें ह्याहून लहान आहेसें वाटेल.

एवंच, तुझ्या लक्ष्यांत येईल कीं, ह्या ठिकाणींहि दोष काढण्याची जी माझ्या हाडीं खिळलेली संवय, तीच मी व्यक्त करून दाखवीत आहें. तथापि माझी अशी कल्पना आहे कीं, निरर्थक स्तुतीपेक्षां माझी ही निर्भीडपणाची टीकाच तुला ज्यास्त पसंत पडेल. कांहीं झालें तरी, ह्या तजबिरीसंबंधानें माझ्या मित्रांच्याकडे पाहून तुला पूर्ण समाधान मानण्यास हरकत नाहीं. ”

ता० ३० एप्रिल १८९८ च्या ‘ टाईम्स ’ मध्यें स्पेन्सरवर ह्या तजबिरीच्यासंबंधानें कडक टीका आली. तिच्यांत असें म्हटलें

होतें कीं, जें चित्र अत्युत्तम आलें पाहिजे होतें तें जर अगदीं उलट आलें असलें तर, तो कदाचित् त्याचा (हरकोमरचा) दोष नसेल; आणि असें म्हटलें होतें:—" त्याच्याकडून (स्पेन्सरकडून) योग्य बैठकी मिळविणें अशक्य होतें. त्याचे नामांकित चहाते, किंवा आपल्यामागें आपलें नांव रहावें हा विचार, किंवा असला दुसरा कोणताहि विचार ह्यांचा त्याच्यावर कांहींहि परिणाम झाला नाहीं." ह्यावर स्पेन्सरनें त्याच दिवशीं हर्कोमरला असें लिहिलें:—" टाइम्समध्यें मजवर जो अगदीं अयोग्य दोषारोप केला आहे तो कसा तरी खोडून टाकिला पाहिजे. तूं तें काम करशील किंवा मला केलें पाहिजे ?....ह्याचीं कारणें व त्यासंबंधाच्या इतर गोष्टी ह्या स्पष्टपणें सांगून तूं हा गैरसमज दूर करावा हें मला ज्यास्त आवडेल; पण तूं जर नाहीं म्हणालास, तर तें मला स्वत: करणें भाग आहे."

पण ह्या वेळीं हरकोमर इटालींत गेला होता; म्हणून स्पेन्सरनें 'टाइम्स' ला ता० ९ मे रोजीं स्वत: पत्र लिहिलें, आणि असें दाखविलें कीं, " वरील टीका करणारानें गांवबातमीवर विश्वास ठेविल्यामुळें त्याची चूक झालेली आहे.....ज्या अनेक नामांकित मित्रांनीं व इतरांनीं इतक्या समाधानकारक रीतीनें ह्यासंबंधानें आपल्या इच्छा प्रदर्शित केल्या होत्या त्यांची जर मीं अशी कल्पना करूं दिली कीं, मीं त्यांच्या इच्छांची इतकी अवहेलना केली आहे तर त्यांस आपला अनादर केल्यासारखें वाटेल हें मनांत येऊन मी ही गोष्ट एथें सांगत आहें."

कार्नेगीकरितां औलेस जी तजबीर तयार करणार होता, ती अद्यापि व्हावयाचीच होती. तीस सुरवात करण्यास, ही नाहीं तर ती, कांहीं तरी अडचण येत होती. जेव्हां औलेसला फुरसत असेल तेव्हां स्पेन्सर आजारी असल्यामुळें त्याला बसवत नव्हतें; आणि जेव्हां तो बरा असेल, तेव्हां त्या चित्रकारास दुसरें कांहीं काम

असे. शेवटीं त्यानें तजबीर काढल्याचा बेत अजीबाद सोडून देण्या-बद्दल औलेसला लिहिलें, व त्याला तें पसंत पडलें. कारण त्यानें त्यास लिहिलें कीं, " तजबीर काढण्यास बसण्यापासून अशक्त माणसास त्रास व्हावयाचाच व ताण पडावयाचाच, आणि तसें झालें म्हणजे तजबीर चांगली निघावयाची नाहीं. "

प्रकरण पंचविसावें

" जीवनशास्त्र " व " आदितत्त्वें " यांची सुधारणा

पुढची तरतूद अगोदरपासून करावयास लागावयाचें ह्या त्याच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून त्यानें १८९९ तच " जीवशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या कांहीं प्रतींच्या पानांतून कोरीं पानें घालण्याची तजवीज केली होती, आणि त्या शास्त्रांतील नूतन शोधांत पारंगत म्हणून ज्यांची शिफारस त्याच्याकडे आली अशा तरुण जीवशास्त्रज्ञांकडे त्या त्यानें पाठविल्या होत्या; आणि त्यांस असें सांगितलें होतें कीं, त्यांत नमूद केलेल्या गोष्टींचें तुम्हीं करून परीक्षण करावें, आणि त्यांवरून काढिलेलीं अनुमानें योग्य आहेत किंवा नाहीं हें पहावें. या रीतीनें त्यानें समाजशास्त्राचा शेवटचा खंड निघण्याच्या सुमारास जीवशास्त्राचे निरनिराळे भाग तपासून घेतले होते.

१८६७ सालीं त्यानें तो ग्रंथ पुरा केला तेव्हांपासून त्या शास्त्रासंबंधानें पुष्कळ नवीन शोध त्या शास्त्राबद्दल लागलेले होते, आणि त्याचे विचारहि मधून मधून चालतच असत. आलीकडील कांहीं वर्षांत ते जरा ज्यास्तच जोरानें सुरू झाले होते; उदाहर-

णार्थ, वीसमन बरोबर झालेल्या वादविवादांत जीवशास्त्रविषयक शोध करतांना कोणत्या पद्धतींचा स्वीकार करावा, आणि त्यांच्याकडे शास्त्रज्ञ बहुधा कोणत्या दृष्टीनें पहात असतात ह्यासंबंधाचीं त्याचीं पुष्कळ दिवसांचीं मतें प्रदर्शित करण्यास ह्या वेळीं त्यास चांगली संधि सांपडली. ह्यासंबंधानें त्यानें डा० विल्यम गॉबर यास असें लिहिलें कीं, " ह्या शास्त्रशाखेवर लिहिणाऱ्या बहुतेक लेखकांस व्यापक मतांचा मोठा बाऊ वाटतो, आणि म्हणून ते आपल्या विशिष्ट विषयांच्या व त्यांतील विशेष गोष्टींच्या पलीकडे कधीं जात नाहींत. " गणितशास्त्रज्ञांसंबंधानें त्याचें असेंच मत होतेंसें दिसतें, कारण त्यासंबंधानें ता० ३ डिसेंबर १८९९ रोजीं कॉलिन्सला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो:—" विचारशक्तीची वाण हा गणितज्ञांचा फार सामान्य विशेष दिसतो. त्यांच्या मनाची संवय अशी बनलेली असते कीं, संभाव्य पुराव्याचा विचार करण्याचा त्यांना प्रसंग आला म्हणजे त्यांस सयुक्तिक सिद्धान्त बसवतां येत नाहीं.....स्त्रीपुरुष–जातिविशेषानुरूप वंशपरंपरासंक्रान्ति कितपत मर्यादित होते ह्या प्रश्नासंबंधानें तूं चवकशी करशील तर बरें. मला नुक्तेंच असें सुचलें कीं, ह्याबद्दल पुष्कळ पुरावा मिळण्यासारखा असल्यामुळें निरनिराळ्या कुटुंबांतून आयुर्मर्यादा किती दिसते ह्याबद्दलची माहिती काढून, ह्या गोष्टीचा पडताळा पहावा. चवकशीअंतीं जर असें दिसून आलें कीं, ज्या कुटुंबांतील माणसें सामान्यत: नेहमींहून ज्यास्त लवकर मरतात त्यांतील नवरा आहे, आणि ज्यांतील माणसें एकंदरींत फार वृद्ध होऊन मरतात अशा कुटुंबांतील बायको आहे, तर स्त्रीपुरुषभेदानुसार वंशपरंपरा मर्यादित होत असल्यास त्या विवाहापासून होणाऱ्या मुली दीर्घायू असल्या पाहिजेत, आणि मुलगे अल्पायू असले पाहिजेत. ही चवकशी अगदीं करतां येण्यासारखी आहे, मग इतर पुराव्यावरून

ठरलेल्या सिद्धान्ताचा तिजवरून पडताळा पाहण्याच्या कामीं तिचा उपयोग होवो वा न होवो. ”

ता० ९ डिजंबर रोजीं तो त्यास पुनः लिहितोः—“ संभाव्य गोष्टींबद्दल विचार करतांना गणिताची पूर्व पक्षावरून (आधारभूत घेतलेल्या गोष्टींवरून) अनुमान काढण्यांत चूक होत नाहीं, तर आधारभूत गोष्टींची निवड करण्यांत चूक होते. पूर्वपक्ष खरोखर संमिश्र असतां तो सरल आहेसें तो गृहीत करितो, म्हणजे त्यांतील कांहीं घटकावयव तो लक्ष्यांत घेत नाहीं. त्याला अल्प व अगदीं निश्चित अशा पूर्वपक्षीय गोष्टींचा विचार करण्याची संवय असते, आणि ज्या ठिकाणीं ह्या गोष्टी पुष्कळ व अनिश्चित असतील तेथें ती संवय तो घेऊन जातो, आणि त्यांतील कांहीं गोष्टी घेऊन जणूं काय त्या सर्वच आहेत अशा रीतीनें त्यांचा विचार करूं लागतो, व त्या निश्चित आहेत म्हणून समजतो. ह्याचीं उदाहरणें लॉर्ड कोल्व्हिनच्या ठिकाणीं वरचेवर दिसून येतात.

ता० ९ डिजंबरः—“ आपल्या सभोंवतीं फाजील वस्तू जमूं द्यावयाच्या नाहींत अशी माझी नेहमीं इच्छा असते. मला नकोत अशीं पुस्तकें, मासिकें आणि पत्रें फार जमून मला नेहमीं त्रास देत असतात. तुला आठवत असेल कीं, पडदे लावून मी पुस्तकें दृष्टिआड करीत असतों, असें कीं त्यांच्यापासून जो घोंटाळा झाल्यासारखा वाटतो तो वाटूं नये. (‘ जीवशास्त्रा’चीं मध्यें कोरीं पानें घातलेली प्रत कॉलिन्सनें पाठविली होती तिला अनुलक्षून त्यानें हें लिहिलें होतें.)

ह्यावेळीं कोणीं अशी सूचना पुढें आणिली होती कीं, डौन येथील डार्विनचें घर कांहीं जीवशास्त्रविषयक शोध करण्याकरितां विकत घ्यावें, आणि रॉयल सोसायटीच्या एका कमेटीच्या देखरेखीखालीं तेथें प्रयोग करून वंशपरंपरासंक्रान्तिविषयक प्रश्नाची कसून

छाननी करावी. ही गोष्ट १८९६ अखेर फ्रान्सिस गाल्टननें स्पेन्सरला कळविली; तेव्हां तो त्यास ता० १६ जानेवारी १८९७ रोजीं लिहितो:—" तुम्हीं मनांत आणिलेले विचार मला वेडेपणाचे दिसतात. प्रत्येक गोष्ट तुम्हीं फाजील प्रमाणावर योजिली आहे. :विनाकारण पुष्कळ खर्च केल्यानें एकंदर योजनेस प्रारंभींच धक्का बसणार आहे. अशी वेडेपणाची गोष्ट तुम्ही कराल तर तुम्हांला सहाय्य करावेंसें मला वाटणार नाहीं. ज्या थोड्या गृहस्थांनीं ह्या गोष्टींत मन घातलें आहे त्यांनीं तीस लहान प्रमाणावर सुरवात करावी, उदाहरणार्थ, तीन चार एकर जमीन घेऊन तिच्यावर थोडचाशा स्वस्त्या लांकडी इमारती बांधाव्या.....मला वाटतें, जनावरें उत्पन्न करून विकणारांचें सहाय्य घेऊन उपयोग व्हावयाचा नाहीं. त्यांना योग्य अटी पाळावयास तुम्हांला लावतां येणार नाहीं, कारण ते (नरमाद्यांची) निवड करून आपल्याला पहावयाचे प्रत्यय सदोष करून टाकतील. "

" संघटनात्मक तत्त्वमीमांसा " पुरी झाल्याबद्दल जीं त्याचीं अभिनन्दनें झालीं त्यांवरून टीकेस सुरवात झाली; तिजपैकीं कांहीं टीका शोधकबुद्धीनें केलेली असे, व कांहीं द्वेषबुद्धीनें केलेली असे. त्यासंबंधानें त्याच्यामध्यें व ब्रामवेलबूथमध्यें १८९६ च्या दिजंबरांत कांहीं पत्रव्यवहार झाला. त्यांत बूथनें विसंगततेचा आरोप त्याजवर आणिल्यामुळें स्पेन्सरनें असें दाखविलें कीं, इतर गोष्टींप्रमाणें माझ्या मतांचीहि उत्क्रान्ति झाली आहे. त्यावर कॉलिन्सला पत्र लिहून त्यांत बूथनें असें प्रतिपादन केलें कीं, " स्पेन्सरनें महत्त्वाचे मतबदल इतके वारंवार व इतके मुळापासून केलेले आहेत कीं, ज्यांस विचारसरणीच्या हळूहळू होणाऱ्या साहजिक वाढी म्हणून म्हणतात त्यांपासून ते भिन्न आहेत. " तेव्हां त्यावर स्पेन्सरनें कॉलिन्सला ता० २९ जानेवारी १८९७ रोजीं असें लिहिलें:—

" बूथला सांग कीं, तो म्हणतो तें मुद्यास अगदीं सोडून आहे. आस्तिक्य–मत सोडून अज्ञेय–मत जें मीं स्वीकारिलें त्यास अनुलक्षून त्यानें विशेषतः वरील टीका केली आहे असें मी समजतों; पण तो मतबदल उत्क्रान्तितत्त्वमीमांसा सुरू करण्याच्या किंवा ती लिहिण्याचा विचार मनांत आणण्याच्या, पुष्कळ अगोदर झालेला होता, आणि उत्क्रान्तिमताशीं त्याचा कांहीं संबंध नव्हता. १८६० त मीं संघटनामीमांसेस सुरवात केली तेव्हांपासून या बाबतींत मुळींच माझा मतबदल झालेला नाहीं. जमिनीच्या प्रश्नाच्या संबंधानें झालेल्या ज्या मतबदलास तो उल्लेख करितो त्याचा उत्क्रान्तिमताशीं केवळ दूरचाच संबंध आहे, आणि शिवाय तो बदल तत्त्वाच्या संबंधाचा नसून, केवळ धोरणाच्या संबंधाचा आहे. "

१८९६ च्या अखेर ब्रुकलिन एथील नैतिक सभेमध्यें कोणीं असें म्हटलें कीं, सर विल्यम जोन्सच्या लेखांवरून वेदान्तमताचा परिणाम त्याच्यावर फार झालेला आहे. यावर त्यानें असें उत्तर दिलें कीं, " मला वेदान्त हें नांव देखील माहीत नसून जोन्सचा एकहि लेख मीं वाचिलेला नाहीं. "

स्पेन्सरच्या ग्रंथांचे फ्रेंच भाषेंत तर्जुमे करणारा डा० क्याझेलिस ह्यास "समाजशास्त्राच्या मूलतत्त्वां"च्या शेवटच्या भागाचें भाषान्तर करतांना एक आकस्मिक अडचण उत्पन्न झाली. त्यांतील एका कलमांत राजकीय दरोडे घालण्यांत इतर राष्ट्रांशीं चढाओढ करणें जरूर आहे, अशा प्रकारचें विधान तेथील (फ्रान्सांतील) परराष्ट्रीय प्रधानानें केलें, असें स्पेन्सरनें म्हटलेलें आहे. हें त्याचें विधान त्या देशांत पसरण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यास डा० क्याझेलिसचें मन तयार होईना म्हणून आज तीस वर्षेंपावेतों जें काम त्यानें स्पेन्सरला पसंत पडेल अशा रीतीनें केलें होतें

तें सोडणें त्यास भाग पडलें; आणि त्याबद्दल त्यास व स्पेन्सर या दोघांसहि फार वाईट वाटलें. तेव्हां त्यासंबंधानें स्पेन्सरनें ता० ६ दिजंबर १८९६ रोजीं त्यास पुढील पत्र लिहिलें:—" आतां तुझ्याकडून आलेल्या पत्रांतील तुझा निश्चय वाचून मला खाजगी व सार्वजनिक दोन्ही दृष्टींनीं फार वाईट वाटतें. तथापि, सर्व गोष्टींचें स्मरण करतां तुझ्या निश्चयाबद्दल मला फारसें आश्चर्य वाटत नाहीं.

पण पहिल्याप्रथम ही गोष्ट मला तुझ्या नजरेस आणिली पाहिजे कीं, एका पूर्वींच्या प्याऱ्यांत जगाच्या सर्व भागांत एतद्देशीय लोकांशीं होणाऱ्या इंग्लंदच्या वर्तनाचा मीं तितक्याच जोरानें व ज्यास्त सविस्तर रीतीनें निषेध केलेला आहे. दुसरी गोष्ट अशी दाखविली पाहिजे कीं, मी जर चुकत नसेन (एथें मजपाशीं तो ग्रंथ नाहीं) तर मी तेथें फ्रान्स देश इतर सुधारलेल्या देशांशीं राजकीय दरोडे घालण्यांत चढाओढ करीत आहे असें म्हटलें आहे; याचा उघड गर्भितार्थ असा आहे कीं, सर्वांनाच असा दोष देतां येण्यासारखा आहे. यावरून तुझ्या लक्षांत येईल कीं मीं जो गर्भित निषेध केला आहे, तो इतर युरोपियन राष्ट्रांपेक्षां फ्रान्सला ज्यास्त लागू आहे असें नाहीं, आणि इतरांना अन्याय केल्याखेरीज त्या राष्ट्राला मला योग्य रीतीनें वळवतां आलें नसतें. वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, सामाजिक व्यवहारांत माझे जे एकंदर मनोविकार आहेत त्यांमध्यें दुर्बल लोकांशीं सबल लोकांची जी रानटी वर्तणूक तिचा तिटकारा हा मनोविकार अत्यन्त जोरदार आहे.....माझ्या मतें जीं राष्ट्रें आपल्यास सुधारलेलीं म्हणून म्हणतात तीं ' गोरे रानटी ' ह्याहून ज्यास्त योग्यतेचीं नाहींत.....इतरत्र मी, युरोपियन राष्ट्रें हीं ख्रिस्ती नसून ख्रिस्त्यांचें त्यांनीं केवळ सोंग घेतलेलें आहे, असें म्हटलेलें आहे. पुष्कळ वेळां, खाजगी व्यवहारांत, ख्रिस्त्यांना खिस्ती धर्म स्वीकारण्यास लावण्याचा (खऱ्या ख्रिस्ती धर्माप्रमाणें वागावयास ला-

वण्याचा) यत्न मला करावा लागलेला आहे, पण त्यांत मला कधींहि यश आलेलें नाहीं. वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, लोक व धर्मोपदेशक आपला नांवाचा धर्म (शांतिशीलतेचा धर्म) नव्या करारांतून घेत असून खरा धर्म (युद्धशीलतेचा धर्म) होमर (प्रसिद्ध ग्रीक कवी–) पासून घेत आहेत.....बोलावयाचें एक व करावयाचें त्याच्या उलट, अशा प्रकारच्या ह्या त्यांच्या दंभामुळेंच मला नेहमीं राग येतो असें नाहीं, तर ही गोष्ट मानवी प्रगतीला अगदीं उलट आहे म्हणूनहि मला राग येतो; कारण ह्यापुढची सर्व प्रगति युद्धशीलतेचा क्षय आणि उद्यमशीलतेची वृद्धि ह्यांच्यावर अवलंबून आहे.....अशा प्रकारच्या मनोविकारांना शब्दांनीं व्यक्त करून आपल्या देशबांधवांस राग आणण्यास मीं कधीं कांकूं केलेलें नाहीं, आणि त्याच रीतीनें फ्रेंचांना राग आणण्यास मी मुळींच कचरत नाहीं. तथापि भाषान्तर करावयाचें किंवा मुळींच न करावयाचें असा जर प्रसंग असेल; म्हणजे, हें वाक्य प्रसिद्ध करून फ्रेंचांना राग आणण्यास जर कोणीच धजावत नसेल; तर तें गाळून, व त्या ठिकाणीं तें गाळल्याचें चिन्ह करून, ह्या अडचणींतून पार पडावें असें मी सुचवितों. " शेवटीं ह्या भागाचें व धंदेसंस्थांचें भाषान्तर करण्याचें दुसऱ्या एका फ्रेंच गृहस्थानें आपल्या शिरावर घेतलें.

"संघटनात्मक मीमांसे"च्या पूर्ततेची खूण म्हणून एक लेख आपल्या मासिकांत घालण्याची "नाइन्टीन्थ सेंचरी"च्या संपादकास इच्छा झाली, आणि तो लिहिण्याचें काम कोणाकडे द्यावें असें त्यानें स्पेन्सरला विचारिलें. स्पेन्सरनें प्रथम प्रो० मेसनचें नांव सुचविलें, आणि त्याच्यासंबंधानें संपादकास त्यानें असें लिहिलें:—"मला जी एकच अडचण वाटते ती त्याच्या माझ्या स्नेहासंबंधाची होय. तो आज पंचेचाळीस वर्षांचा माझा स्नेही आहे, आणि त्यामुळें त्याच्या मनांत मजबद्दल

कांहीं तरी पक्षपातबुद्धि उत्पन्न होण्याचा किंवा उत्पन्न झाली असेल असें इतरांस वाटण्याचा, संभव आहे. तथापि वास्तविक रीत्या मला असें वाटतें कीं, एकमेकांच्या मतांबद्दल आह्मांस जें वाटतें तें (स्पष्ट) बोलून दाखविण्यास तो व मी आह्मी दोघेहि तयार आहों, आणि मतभेद दर्शविल्यापासून आह्मास मुळींहि राग येत नाहीं. खरोखरच कांहीं दिशांनीं माझ्या मतांपासून त्याचीं मतें चांगलींच भिन्न असतील असें मला वाटतें. उदाहरणार्थ, सर्व प्रकारच्या बाबावाक्याविषयीं माझा जो अत्यन्त अनादर आहे त्यावर तो टीका करील, व त्याबद्दल मला वाईटहि वाटणार नाहीं; कारण हा विशेष मजमध्यें नसता तर मीं जें केलें आहे तें माझ्या हातून कधींच झालें नसतें. प्राचीन विचार व एकंदर प्राचीन जीवित ह्यांपासून निष्पन्न झालेल्या वस्तूंची मी कमी किंमत मानितों असें त्यानें म्हटल्यास तेंहि मी गैर समजणार नाहीं. शिवाय, इतिहासांतील व्यक्तिरूप अंगाकडे मी अगदीं दुर्लक्ष्य करितों, आणि इतिहासविषयक प्रस्तुत जी सामान्य कल्पना आहे तिजबद्दल मला फारच अल्प आदर वाटतो, ह्याहि गोष्टी टीका करण्यासारख्या आहेत. "

पण पुढें मेसननें तो लेख लिहावा किंवा नाहीं ह्याबद्दल स्पेन्सर यास शंका उत्पन्न झाली, व त्याच्याऐवजीं त्यानें आल्फ्रेड बेन (हा प्रो० आलेक्झांडर बेन नव्हे) ह्याचें नांव संपादकास सुचविलें, आणि त्यानें लिहिलेला लेख वाचावा, व पसंत असल्याचें त्याखालीं नमूद करावें ह्या शर्तीवर मी त्यास कबूल होईन असें संपादक म्हणूं लागला. पण ह्या शर्तीस स्पेन्सर कबूल होईना. तेव्हां संपादकानें ती अट मागें घेतली आणि लेख तयार झाला. पण तो तयार झाल्यावर (१८९९ त) संपादकानें त्यावर असा आक्षेप घेतला कीं तो लोकांस समजण्यासारखा नाहीं. ह्या मुद्यावर तो प्रसिद्ध न करणें गैर आहे असें स्पेन्सरला वाटलें; व त्यानें त्यास वारंवार तसें सां-

गितलें तरी तो प्रसिद्ध करण्यास कबूल होईना. ह्याचा स्पेन्सरला राग आला, आणि ही गोष्ट संपादकानेंच प्रथम काढिली असल्यामुळें विशेषच आला. तो सामान्य जनास समजण्यासारखा झाला पाहिजे अशी अट संपादक प्रथमच घालता, तर स्पेन्सर त्या भानगडींत मुळींच पडला नसता. असो. हा लेख पुढें तसाच राहिला.

हा लेख पुरा झाल्यावर, तो तयार करतांना बेनला कांहीं मुद्दे सुचले होते ते त्यानें त्यास कळविले, तेव्हां त्यास स्पेन्सरनें ता० २७ मार्च १८९९ रोजीं पुढील उत्तर लिहिलें:—" अन्तिम प्रश्न उकलण्याचा आपण यत्न करूं लागलों म्हणजे जो गोंधळ उत्पन्न होतो त्याचीं आणखी उदाहरणें तूं पुढें आणिलेले उत्तरविहीन प्रश्न हे होत. खुद्द कारण ही कल्पना सर्वांशीं सापेक्ष कल्पना आहे. आणि ती तशी असल्यामुळें चमत्कार आणि जें चमत्कारातीत आहे तें ह्यांच्यामधील संबंध दर्शविण्यास त्या शब्दाचा उपयोग करणें आपणास कितीहि जरूर असलें, तरी त्या संबंधास अन्तिमदृष्टया तो लागू नाहीं. आपल्या भावनेंत, कारणाचें अन्तिमदर्शक, प्रयत्नाची जाणीव, आणि प्रयत्नानें आपण उत्पन्न केलेला कोणताहि फेरबदल ह्यांमधील आपल्या ज्ञानवर्त्तेतील संबंध हें आहे. आणि हा जो आत्मविषयक संबंध तो कारणविषयक सर्व अनात्मविषयक संबंधाचें दर्शक चिन्ह म्हणून आपण योजितों; आणि ह्या मर्यादेपलीकडे जाण्याचा जेव्हां आपण प्रयत्न करितों, तेव्हां चमत्कार, आणि चमत्कारातीत जें आहे तें, ह्यांमध्यें संबंध बनवण्यास आपली विचारशक्ति धांवते, आणि तसें करतांना कारणाची हीच भावना अनिवार्य रीतीनें ती आपल्या बरोबर घेऊन जाते. पण अनिवार्य रीत्या ही चिन्हरूप भावना आहे, आणि अज्ञेयाचा कारण म्हणून विचार करण्यास जरी ती फार आवश्यक दिसते, तरी आपली कारणविषयक कल्पना मुळांत आत्मसंबंधी व दर्शकचिन्ह-

रूप असल्यामुळें ती वस्तुतः एथें लागू पडत नाहीं. पण ह्या च्यापेक्षांहि खोल असें एक ह्यास उत्तर आहे, तें हें कीं, ह्या ठिकाणीं स्पष्टीकरणाची कल्पनाच बरोबर नाहीं. ह्या गोष्टीचा विचार करतांना, प्रथम स्पष्टीकरणाची मला जरूरी वाटून त्याबरोबरच, कोणतेंहि स्पष्टीकरण (ह्या बाबतींत) शक्य नाहीं अशी खात्रीहि मला वाटलेली आहे; आणि त्यामुळें शेवटीं वरचेवर मला असें वाटलेलें आहे कीं, ह्या ठिकाणीं स्पष्टीकरणाची कल्पनाच असंबद्ध आहे. कारण स्पष्टीकरण म्हणजे काय ? तीहि शुद्ध सापेक्ष कल्पना आहे; कारण तिची जर फोड केली तर ' ज्यास्त विशिष्ट सत्याची ज्यास्त सामान्य सत्याच्या शब्दांनीं उपपत्ति लावणें ' असें तिच्यांत गर्भित होतें. आणि एका स्पष्टीकरणाच्या मागें दुसरें स्पष्टीकरण करीत जाण्यापासून, शेवटीं सर्व विशिष्ट सत्यांना अत्यंत सामान्य अशा सत्याच्या उदाहरणाचें स्वरूप येतें. पण आतां स्पष्टीकरणाची ही व्याख्या ज्ञेय आणि अज्ञेय ह्यांच्यामधील संबंधास जर आपण नेऊन भिडविली, तर काय होतें ? ह्या संबंधाचें स्पष्टीकरण करणें म्हणजे इतर संबंधांबरोबर हाहि संबंध ह्याहून ज्यास्त सामान्य संबंधांत समाविष्ट करणें होय; पण ज्ञेय आणि अज्ञेय ह्यांच्यामधील संबंधाहून ज्यास्त सामान्य किंवा व्यापक संबंध कोठें आहे ? मुळींच नाहीं. म्हणजे काय, तर, ह्या ठिकाणीं स्पष्टीकरणाची कल्पनाच असंबद्ध किंवा अप्रयुक्त ठरते. "

' राजकीय शास्त्राची ब्रिटिश लायब्ररी ' ह्या संस्थेच्या व्यवस्थापकांनीं, त्या संस्थेला ह्यानें आपले ग्रंथ नजर करावे, अशी जेव्हां ह्यास विनंती केली, तेव्हां ह्यानें धर्मार्थ लायब्रऱ्यांबद्दलचीं आपलीं सुप्रसिद्ध मतें पुनः सांगितलीं; आणि शिवाय त्या लायब्ररीचें देखील ह्या बाबतींतील धोरण चुकीचें आहे असें म्हटलें. तें पत्र ता० २४ मार्च १८९७ चें असून असें आहेः—" तुम्हीं

केली आहे तशा प्रकारच्या अनेक विनंत्या वेळोवेळीं मजकडे आलेल्या आहेत, आणि नेहमींच मीं त्या अमान्य केलेल्या आहेत. मला धर्मार्थ लायब्ऱ्या मुळींच नापसंत आहेत (यांत ब्रिटिश म्यूझियममधील लायब्ररीचाहि समावेश होतो), कारण मला वाटतें कीं, त्या एकंदरींत फायदेशीर न होतां नुकसानकारक होतात; उदाहरणार्थ, म्युनिसिपल व स्थानिक मोफत लायब्ऱ्याच पहा; त्या अभ्यासाच्या जागा बनण्याच्याऐवजीं भुसक्या कादंबऱ्या व कवडीमोल वर्तमानपत्रें वाचण्याचे आणि किरकोळ माहिती मिळविण्याचे अड्डे बनले आहेत. मोफत भोजनगृहें (अनछत्रें) जशीं मला पसंत नाहींत तशाच मोफत लायब्ऱ्या पसंत नाहींत. शरीराचें खाद्य जसें धर्मार्थ देऊं नये, तसें मनाचेंहि खाद्य देऊं नये. मोफत लायब्ऱ्या किंवा सरकारी शाळा यांच्या द्वारा दिलेलें शिक्षण सोश्यालिस्टांच्या कल्पनांपैकींच होय, आणि कोणत्याहि प्रकारच्या सोश्यालिस्ट घटनेच्या मी फारच विरुद्ध आहें. शिवाय तुम्हीं जो कार्यक्रम मला पाठविला आहे त्यांत अशी कल्पना गोंविलेली दिसते कीं, पार्लमेंतीय कागदपत्रें, कमिशनांचे रिपोर्ट, आणि निरनिराळे देश व वसाहती यांतील कारभारपद्धतीविषयीं कच्ची माहिती, इत्यादि सर्व दिशांनीं गोळा केलेल्या सर्व प्रकारच्या आधारांवर राजकीय शास्त्राचा पाया रचला पाहिजे. ह्याच्या उलट माझें असें मत आहे कीं, असल्या फाजील माहितीखालीं राजकीय शास्त्र घुसमटून जातें; कारण त्या शास्त्राचे सिद्धान्त बसविण्यास लागणारा पुरावा यापेक्षां जास्त ठळक व सुलभ प्राप्य असा आहे. सरकारी संस्था वाढवूं इच्छिणारे लोक या तुमच्या संस्थेचा उपयोग करितील. मला तिच्या मूळ कल्पनेबद्दल जी माहिती आहे आणि तिच्याबद्दल मला जें आतां दिसतें आहे त्यावरून मला खात्री वाटते कीं, तिचा उपयोग राज-

कीय शास्त्राच्या प्रसाराकडे न होतां राजकीय भोंदूपणाच्या प्रसाराकडे होईल. "

१८९८ सालीं रस्किन हॉल नामक संस्थेच्या संबंधानें त्यास जेव्हां अशीच विनंती केली, तेव्हां ती त्यानें अमान्य करतांना असें म्हटलें:—"(प्रसिद्ध चितारी) रस्किनचीं सामाजिक व्यवहारासंबंधाचीं मतें आणि बऱ्याच अंशीं त्याचीं कलाविषयकहि मतें ह्यांच्या मी फार विरुद्ध आहें. म्हणून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या त्याच्या मताच्या प्रसाराकडे तिचा कल आहे अशा कोणत्याहि गोष्टीस मदत करण्याचें नाकारणें मला भाग आहे."

स्पेन्सरसारख्या प्रचंड लिहिणाऱ्या माणसाच्या कांहीं एकेऱ्या मतांबद्दल गैरसमज होणें साहजिक आहे; पण त्याच्या मतांचें सामान्य धोरण देखील कित्येकांना अद्यापि समजत नसे, हें कीटिंग नामक साहेबास ता० १३ एप्रिल १८९७ रोजीं त्यानें दिलेल्या पुढील उत्तरावरून दिसतें:—" तुझें काम करील अशी कोणतीच एक सूत्रवत् गोष्ट तुला मला सांगतां येणार नाहीं असें मला वाटतें; कारण तुझी कल्पना आहे त्याहून माझीं मतें अगदीं उलट आहेत. हल्लीं सर्वत्र सर्व सारखें करण्याचें वेड पसरलेलें दिसतें; आणि शिक्षकांना एकाच स्थळीं शिकविणें हें त्या धोरणाच्याच दिशेनें आहे. सर्व घटना पाहतां वैविध्याचा कल जीविताकडे दिसतो, आणि सर्व सारखें करण्याच्या पद्धतीचा कल मृत्यूकडे दिसतो. शिक्षणाच्या पद्धतींत चढाओढ असणें अत्यन्त आवश्यक आहे, आणि म्हणून ही चढाओढ कमी करण्याकडे ज्याचा कल असेल तें अपायकारकच असलें पाहिजे. शिक्षकाच्या धंद्याला बंधनें घालण्याबद्दलची तुझी कल्पना माझ्या मतांच्या अगदीं उलट आहे. तसें करणें म्हणजे त्या धंद्यांत धंदे–जमातींचें तत्त्व घुसडणें होय–व्यक्तीच्या स्वातंत्र्यास बंधन घालणें होय. आणि तें ज्या सामान्य पद्धतींत समा-

विष्ट होतें त्या पद्धतीचाच मला अत्यन्त तिटकारा आहे. तुझ्या म्हणण्याचा असा रोंख दिसतो कीं, शिक्षकांची योग्यता वाढवून त्यांस हल्लींहून जास्त वेतन देण्याकरितां सामान्य व स्थानिक कर वाढवावे लागतील. आतां ही गोष्ट मला कितपत पसंत आहे हें तुला पाहणें असल्यास, मी तुला एवढेंच सांगतों कीं, माझ्या अगदीं लहानपणापासून तों आज तारखेपावेतों मी सर्व प्रकारच्या सरकारी शिक्षणाच्या विरुद्ध आहें."

१८९७ च्या मे–जून महिन्यांत पैसे देऊन राहणारा पाव्हणा या नात्यानें तो एका बाईकडे दोन आठवडे राहिला होता. पहिला आठवडा तेथें त्यास बरा गेला; पण नंतर थोड्या दिवसांनीं तो कंटाळला. ह्या अनुभवावरून त्यानें पुढील पत्र प्रसिद्ध कादंबरीकार मिसेस लिन लिंटन हीस बहुधा लिहिलें असावें. तें ता० १९ जून १८९७ चें असून असें आहेः—" मी तुला एक ग्रंथ लिहिण्यास सुचवीत आहें. तो तुझा शेवटचा उत्तम ग्रंथ म्हणून होण्यास हरकत नाहीं. तो " चांगल्या व वाईट स्त्रिया " हा होय. तूं स्त्रियांविरुद्ध पुरुषांची तरफदारी करितेस, असा तुझा लौकिक आहे. पण माझें मत असें आहे कीं, तुझा उद्देश, स्त्रियांना फार उच्च स्थानावर चढविण्याचा कल जो आज पुष्कळ काळपावेतों प्रबल झालेला आहे, त्यास आळाबंदा घालण्याचा आहे.....असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं, स्त्रियांची फाजील स्तुति करणें हें कवींचें मुख्य काम बनलेलें आहे, आणि बहुतेक स्त्रियांनीं ह्या धूपाचा (वृथास्तुतीचा) स्वीकार बहुधा जशाचा तसाच आनंदानें केलेला आहे; आणि ही गोष्ट इतकी सतत होत गेलेली आहे, आणि पुरुषांनीं ती इतकी वरचेवर मान्य केलेली आहे कीं, त्या योगानें लोकमत भलतेंच झालेलें आहे.....पुरुषांचे व स्त्रियांचे स्वभाव ह्या विषयावर नेहमीं चर्चा होत असते, पण ती अगदीं

कांहीं तरी असते, कारण तिच्यांत विषयाची फोड करणें आणि पुरावा गोळा केलेला असणें व त्यापासून निष्पन्न होणाऱ्या गोष्टींचें तोलन केलेलें असणें, वगैरे कांहीं दिसत नाहीं. तुला जर माझी सूचना कबूल असेल, तर वरील चवकशी कशा रीतीनें करावी, आणि वरील तुलना कशा पद्धतीवर कराव्या, ह्याबद्दल कांहीं सूचना मी फार आनंदानें करीन. " ह्या सूचनेपासून पुढें कांहीं निष्पन्न झाल्याचें दिसत नाहीं.

आलीकडे त्याला लंदनची हवा मानवत नाहींशी झाली होती, तरी तेथें त्याचें बहुतेक आयुष्य गेलेलें असल्यामुळें आणि तेथें त्याचे स्नेही असल्यामुळें तो तेथेंच चिकटून राहिला होता. पण अखेरीस १८९८ च्या आरंभींच ब्रायटन नामक समुद्रकांठावरील सुप्रसिद्ध हवेच्या ठिकाणीं तो रहावयास गेला, आणि लंदनांतील आपल्या मित्रांनीं तेथें खाणावळींतल्यासारखें रहावयास यावें अशी आशा प्रसिद्ध इतिहासकार लेके यास लिहिलेल्या एका पत्रांत त्यानें व्यक्त केली. त्याची निगा करण्यास व करमणूक करण्यास त्यानें दोन बाया मिळविण्याची जाहिरात देऊन खटपट केली. पैकीं एक बाई त्यास गाणीं गाऊन वाजवून दाखविणारी पाहिजे होती. त्याप्रमाणें त्यास बाया मिळाल्या, पण त्या वरचेवर बदलाव्या लागल्या; कारण यास पाहिजे तसे गुण त्यांच्यांत नव्हते. अखेरीस १८९९ सालीं त्यास मिस् की नांवाची हुशार गाणारी बाई आणि मिस् किलिक नांवाची घरांतील व्यवस्था पाहणारी बाई अशा मिळाल्या, व त्या त्याच्यापाशीं अखेरपावेतों राहिल्या. त्यांच्या विचारी व सहानुभूतियुक्त वर्तनामुळें त्याचीं अखेरचीं वर्षें सुखाचीं गेलीं.

१८९८ सालीं त्याच्या मतांबद्दलचीं एकाहून अधिक गैरकथनें केलेलीं उघडकीस आणण्याचा प्रसंग त्यास आला. पैकीं एक गैरकथन मॅलॉक याच्या प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाबद्दल ' लिटरेचर '

नामक साप्ताहिकांत आलेल्या एका प्याऱ्यांत केलेलें होतें. कारण त्यांत असें म्हटलें होतें कीं " समाजरूपी समूह जवळ जवळ सारख्या व्यक्तींचा बनलेला असतो, अशी ' समाज ' शब्दाची व्याख्या करून सद्यःकालीन अग्रणी तत्त्वविवेचक जी मुळांत चूक करीत असतात, तीस स्पेन्सर साहेबानें मूर्तस्वरूप देऊन पुनः जिवंत केलेलें आहे, हें मॅलॉक साहेब आपल्या लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत दाखविणार आहे." ह्याला आधारभूत असें वाक्य मॅलॉक यास आपल्या ग्रंथांत कोठें सांपडलें हें स्पेन्सरच्या लक्ष्यांत येईना. म्हणून त्यानें ता० ३० जानेवारी १८९८ रोजीं त्यास लिहिलें:—" पुष्कळ धुंडाळणी केल्यावर तूं ज्यास उल्लेख करितोस त्यांपैकीं एक वाक्य मला सांपडलें आहे, पण मला वाटतें कीं त्याचा संदर्भ पाहतां, तूं त्याचा अर्थ लावितोस तसा लावण्यास त्यांत कांहींच आधार नाहीं. तें वाक्य " समाजशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या पांचव्या पानावर आहे. त्यांत, प्रस्तावनेदाखल, समाज करून रहाणाऱ्या कीटकांनीं बनविलेले समाजरूपी समूह माणसांच्या समाजापासून भिन्न असतात असें दाखविलें आहे; पहिला भेद असा दाखविला आहे कीं कीटकांचा समाज वास्तविकरीत्या एक मोठें कुटुंब असतें; आणि असें म्हटलें आहे कीं, " त्यांचा समाज ज्यांचे आईबाप एकमेकांपासून वस्तुतः स्वतंत्र आहेत, आणि ज्यांचीं सामर्थ्यें जवळजवळ सारखीं आहेत, अशा व्यक्तींचा बनलेला नसतो." ह्या ठिकाणीं मानवी समाजाची कल्पना जर गर्भित असेल, तर ह्या शब्दांची उपपत्ति पहिल्या समाजापासून भिन्न म्हणून दाखविलेला जो समाज त्याच्यासंबंधानें दाखविली पाहिजे; आणि प्रयुक्त शब्दांचा अर्थ ह्या भेदांच्या दृष्टीनें केला पाहिजे. उदाहरणार्थ, मुंग्यांचा समाज पूर्ण नर व माद्या, कामकरी मुंग्या, व शिपाई मुंग्या इतक्या वर्गांचा बनलेला असतो, आणि हे वर्ग त्यांच्या शरीररचना

व सामर्थ्यें ह्या दोन बाबतींत एकमेकांपासून फार मोठ्या प्रमाणावर भिन्न असतात. उघडच, माझा उद्देश अशासारख्या समाजांच्या घटकांचीं जीं एकमेकांपासून ठळक रीतीनें भिन्न सामर्थ्यें, आणि मानवसमाजघटक व्यक्तींचीं जवळजवळ सारखीं सामर्थ्यें, ह्यांमधील भेद दाखविण्याचा आहे; आणि मुंग्यांच्या वर्गांमधील सामर्थ्यांचे हे जे फार मोठे भेद त्यांच्या मानानें माणसांमधिल सामर्थ्यभेद खचीतच लहान असतात; म्हणून मुंग्यांमधील राण्या, नर, शिपाई व कामकरी यांच्या अत्यन्त विसदृश सामर्थ्यांशीं तुलना करतां मानवी प्राण्यांचीं सामर्थ्यें जवळजवळ सारखीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा भेद दाखवितांनाच " जवळ जवळ सदृश" हे शब्द योजलेले आहेत, आणि त्या दृष्टीनें ' जवळ जवळ ' हा शब्द अगदीं न्याय्य आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे असें (मी तुझ्या ठिकाणीं असतों तर) खचीत वाटलें असतें. तूं लावितोस तो अर्थ निराधार आहे हें " समाजशास्त्राचें अध्ययन " यांतील ज्या वाक्यांस तूं उल्लेख करितोस त्याच्यानजीकच असलेल्या इतर वाक्यांवरून स्पष्ट आहे, आणि " समाजशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या मोठाल्या भागांवरून तो निश्चितपणेंच गैर ठरतो. " समाजशास्त्राचें अध्ययन " ह्या ग्रंथांतील " समाजशास्त्राचें स्वरूप " ह्या प्रकरणांतील विवेचनांत समाजघटकांमधील श्रेष्ठपणा व कनिष्ठपणा ह्यांचे परिणाम मीं पुरेसे लक्ष्यांत घेतल्याचें गर्भित होत आहे; कारण ज्यास्त शक्तिमान् व बुद्धिमान् माणसें सर्वांच्या वर जातात ह्या कारणांखेरीज तेथें उल्लेखिलेले भेद सिद्ध होणारच नाहींत. एवंच, ह्या ठिकाणीं देखील तूं केलेला अर्थ गर्भितरीत्या निषिद्ध ठरतो; आणि ' राजकीयसंस्था ' हा जो " समाजशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाचा पांचवा भाग, तो जर तूं पहाशील, तर त्या ठिकाणीं हा तूं केलेला अर्थ ह्याहूनहि ज्यास्त ठळक रीतीनें खोटा ठरविणारें असें लांबलचक निरूपण तुला आ-

ढळून येईल.....तद्वतच " नीतिशास्त्राचीं तत्त्वें " ह्या ग्रंथाच्या " न्यायतत्त्वें " ह्या भागांत तुला अनेक ठिकाणीं व अनेक तऱ्हांनीं असें म्हटलेलें आढळून येईल कीं, श्रेष्ठपणाला त्यापासून सहजगत्या उत्पन्न होणाऱ्या फायद्यांचा उपयोग होऊं दिला पाहिजे, आणि कनिष्ठपणाला त्यापासून उत्पन्न होणारीं अनेक नुकसानेंहि भोगावयास लाविलीं पाहिजेत. शिवाय, सोश्यालिस्ट लोकांचें जें ध्येय मला पसंत आहे असें तूं समजतोससें दिसतें, त्याचाहि निषेध त्या ग्रंथांत तुला आढळेल. "

ह्या पत्रानें मॅलॉकची समजूत पटली नाहींसें दिसतें; कारण त्यानें त्यास उलट असें लिहिलें:—" तुझ्या ग्रंथांत मोठ्या माणसाची क्लृप्ति (समाजांतील बुद्धीनें वगैरे मोठीं असलेलीं माणसें सर्व समाजास वळण लावीत असतात ही क्लृप्ति) उगीच कोठें कोठें सहजगत्या दिसते. तुला सोश्यालिस्ट लोकांशीं सहानुभूति वाटत नाहीं हें मला माहीत आहे, पण ज्या एकंदर कारणांनीं मोठ्या माणसाची उत्पत्ति होते, त्या कारणांतच त्यास (मोठ्या माणसास) गोंवून देण्याच्या तुझ्या पद्धतीमुळें सोश्यालिस्ट तत्त्वें प्रतिपादणारांना विरोध्यांवर हल्ले करण्यास पुष्कळ शस्त्रें सांपडलेलीं आहेत. " " नाइन्टीन्थसेंचरी"-च्या आगस्टच्या अंकांत त्यानें स्पेन्सरवर पुनः हल्ला केला, आणि म्हटलें कीं, " व्यक्तींचें वैसदृश्य ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे हें ध्यानांत घेण्यास चुकणें हें समाजशास्त्रज्ञ या दृष्टीनें स्पेन्सरमध्यें मोठें व्यंग आहे. मानवी विसदृशतेची ही महत्त्वाची गोष्ट सारखी लक्ष्यांत घेण्याच्या ऐवजीं स्पेन्सरनें सारखी आणि दिमाखानें आपल्या लक्ष्याच्या बाहेर ठेविलेली आहे. " ह्या टीकांना स्पेन्सरनें त्या मासिकाच्या पुढच्या महिन्याच्या अंकांत उत्तर दिलें.

दुसरें एक गैरकथन वस्तूंना जीव असतो ह्या मतासंबंधीं होतें, कारण हा त्या मताचा अभिमानी आहे असें ' लिटरेचर ' पत्रानें

म्हटलें होतें. ह्याचा निषेध त्यानें त्या साप्ताहिकाच्या ता० ९ फेब्रुवारीच्या अंकांत केला; आणि असें दाखविलें कीं, " ' समाजशास्त्राचे आधारस्तंभ ' ह्या भागांत आपण हें मत मुद्दाम त्यागिलें आहे इतकेंच नाहीं, तर एका लांब विवेचनाच्या निरनिराळ्या भागांत तें खोटें ठरविणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पुरावे आपण आपल्या समजुतीप्रमाणें दिले आहेत. " त्याच्या साप्ताहिकाच्या ता० १९ फेब्रुवारीच्या अंकांत ' धर्माची घडण ' ह्या ग्रंथांत आण्ड्रयू लँगला जी अडचण पडली होती ती दूर करण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यांत त्यानें असें म्हटलें:—" लोक असें म्हणतात कीं, निर्जीव वस्तू सजीव आहेत असें मानण्याकडे माणसाच्या मनाचा मूळचाच कल आहे. ह्यासंबंधानें मुख्य प्रश्न असा आहे कीं, सभोंवतालच्या वस्तूंची अशा प्रकारची कल्पना करण्याची प्राथमिक माणसामध्यें स्वाभाविकच प्रवृत्ति आहे कीं काय ? प्रो० टायलर म्हणतो, ' होय '; मी म्हणतों, " नाहीं. " हाच विषय जुलईंत त्याला पुनः हातीं घ्यावा लागला. कारण " स्पेक्टेटर"नें त्या सुमारास त्याच्यासंबंधानें असें म्हटलें कीं, " सृष्टींतील सर्व वस्तूंमध्यें माणसाचें सचेतन जीवित आणि स्वच्छंदी मनोविकार असतात ह्या सार्वत्रिक दृढ समजापासून किंवा मनोवृत्तीपासून देवभोळ्या कल्पना उत्पन्न झाल्या असें म्हणणारांपैकीं स्पेन्सर आहे. " तेव्हां त्यानें संपादकाला असें लिहिलें कीं, " माझा असा मुळींच समज नाहीं. ही समजूत मीं जोरानें त्यागिली असतां ती माझ्या माथीं मारण्याचें हें तुझें उदाहरण, इतर पुष्कळ उदाहरणांप्रमाणें, गैरसमज काढून टाकणें किती अशक्य आहे, हें स्पष्टपणें दाखवितें. "

ह्या वेळीं झालेलें युनायटेड स्टेट्स् व स्पेन यांमधील युद्ध पुष्कळ विचारी अमेरिकन लोकांना अन्यायाचें वाटत होतें; म्हणून त्यांच्यापैकीं एकजण मानक्यूर कॉन्वे यानें त्यासंबंधानें स्पेन्सरला असें विचारिलें

कीं, "नामांकित माणसांची अशी एक सभा बनवतां येईल किंवा नाहीं कीं ज्या सभेनें एकादें युद्ध सुरू होण्यापूर्वीं तें न्याय्य आहे किंवा अन्याय्य आहे हें ठरवावें ?" त्यावर त्यानें त्यास ता० १७ जुलई १८९८ रोजीं लिहिलें:— "तुझे मनोभाव व तुझे उद्देश याबद्दल मला सहानुभूति वाटते, पण तुझ्या आशांबद्दल मात्र वाटत नाहीं.....लोकांच्या हल्लींच्या वृत्तींत त्या दिशेनें कांहीं करतां येणार नाहीं.....तूं जशा प्रकारची सभा स्थापन करावी म्हणून म्हणतोस तिच्या सभासदांचें ऐकमत्य असलें तरी, ती केवळ मनोवृत्तींना फाजील महत्त्व देणारी, व स्वप्नसृष्टींत संचार करणारी आहे, अशी तिची थट्टा होईल. सार्वत्रिक अतिक्रमणप्रवृत्ति आणि सार्वत्रिक रक्तपात-लालसा यांच्यायोगानें सार्वत्रिक लष्करी जुलूम पुनः सुरू होईल आणि त्यांतून पुष्कळ पिढ्यांनीं कांहींतरी स्वतंत्रता कदाचित् पुनः उत्पन्न होईल."

ह्या परातिक्रमणप्रवृत्तीविरुद्ध आपला तिटकारा व्यक्त करण्याकरितां तिच्यावर कोणीं तरी एक कवन करावें अशी त्यास कांहीं वर्षांमागें इच्छा झाली होती; त्या इच्छेनें आतां पुनः उचल खाऊन त्यानें त्यासंबंधानें एक कवन करण्याकरितां ता० १ आक्टोबर १८९८ रोजीं स्कावेन ब्लंट या साहेबास लिहिलें; आणि आपली सूचना त्यास मान्य झाली असें पाहून त्यानें त्यास ता० ६ आक्टोबर रोजीं पुनः लिहिलें:—"तुझ्या पत्राबद्दल मी तुझा आभारी आहें. तुला माझी सूचना मान्य आहे हें पाहून मला मनापासून आनंद वाटतो..... मानवजातीच्या नजीकच्या भविष्यत् काळीं होणाऱ्या स्थितीबद्दल तरी माझ्या समजुती बहुतेक तुझ्यासारख्या निराशायुक्त आहेत. पण हल्लीं आपण पुनः रानटी बनत असून, तसे पुष्कळ काळ बनत राहूं, आणि आपली पुनः प्रगति होण्यास फारच दीर्घकाळ लागेल, असें जरी मला वाटतें, तरी माझें असेंहि

मत आहे कीं, असली प्रतिक्रिया खात्रीनें उत्पन्न होईल, आणि दूरच्या भविष्यत्काळीं इष्ट अशी स्थिति (माणसास) प्राप्त होईल; पण ती प्राप्त होण्यापूर्वीं, प्रगति व पीछेहाट असे हेलकावे पुन:पुन: पुष्कळ वेळां उत्पन्न होतील. माणसांची हल्लीं जशी स्थिति आहे तशासारखीच सरासरी दूरच्या भविष्यत्काळींहि राहील असें मला वाटत असतें तर सगळी मानवजात एकदम नष्ट झालेली मीं शांतपणें अवलोकिली असती. "

ता० ९ नवंबर रोजीं तो त्यास पुन: लिहितो:—" अल्पतम जाग्यांत मनोवृत्ति व कल्पना ह्यांची महत्तम राशि कशी घालावी, हा प्रश्न प्रत्येक लेखानें, व विशेषत: कवीनें सोडवावयाचा असतो, कारण काव्यविषयक योग्य कल्पना केली असतां, असें दिसतें कीं, काव्य हें (विचार व विकार यांचें) अशा प्रकारचें वाहन आहे कीं, त्यांत घर्षण कमींत कमी करावयाचें असतें, आणि अर्थात् जें जें फाजील असेल त्यानें घर्षण वाढत असतें. माझ्या वरचेवर असें मनांत येतें कीं, आमच्या बहुतेक सर्व कवींना, त्यांच्या काव्यांनीं जितकी जागा व्यापिली आहे तिच्या चतुर्थांश जागा जर कोणीं आंखून दिली असती, तर त्यांचा पुष्कळ फायदा झाला असता. एकंदरच कलेचीं कामें असल्या आळाबंधानें बहुधा ज्यास्त सुबक दिसतील. पुष्कळ बांधीव काम आणि कोरणीचें काम (बांधणीच्या किंवा कोरणीच्या) अतिरेकानें शिल्पकार बिघडून टाकितात, आणि बहुधा प्रत्येक चितारी आपल्या चित्रांत फाजील बारीकसारीक गोष्टी घालीत असतो..... कलेचें काम करणाराला (आपल्याला सुचलेली) प्रत्येक नवीन कल्पना इतकी चांगली दिसते कीं, ती (आपल्या कृतींतून) वगळण्याचा त्यास धीर होत नाहीं, आणि अशा रीतीनें आपल्या कृतीच्या विशिष्ट भागांच्या उठवणीकरितां आपली सगळी कृति तो मळमळीत करून टाकितो. "

ब्लंट साहेबानें ह्याच्या सूचनेप्रमाणें जेव्हां कवन तयार केलें तेव्हां त्यास स्पेन्सरनें ता० २३ जून १८९९ रोजीं असें लिहिलें:- " तुझें कवन तयार झालें आणि तें लवकर प्रसिद्ध होईल, हें ऐकून मला आनंद होतो. तूं तें थोड्या शब्दांत मला अर्पण करण्याचें योजिलें आहेस हा तूं मला मोठा मान देत आहेस, आणि ही तुझी विनंति मी आनंदानें मान्य करितों. पण तुझ्या काव्यांत जी कल्पना तूं विस्तृत रीतीनें मांडिली आहेस, ती तुला कोणीं सुचविली हें प्रास्ताविक शब्दांत दर्शवूं नको. ह्याचें कारण तुला समजेपर्यंत तुला ही माझी विनंति कदाचित् आश्चर्यकारक वाटेल. माझ्या सामान्य मतांचा धर्मविषयक मतांशीं पुष्कळ ठिकाणीं संबंध येत असल्यामुळें एथें व अमेरिकेंत दोन्ही ठिकाणीं मला शिव्या मिळालेल्या आहेत, आणि त्यामुळें ज्या सामान्य तात्त्विक मतांचें प्रतिपादन मीं केलेलें आहे त्यांच्या प्रसारांत अडचणी आलेल्या आहेत; आणि अनेक रीतींनीं माझ्या पुस्तकांचें वाचन व वजन हीं कमी झालीं आहेत. अशी स्थिति असल्यामुळें, पूर्वींपेक्षांहि ज्यास्त ज़ोरानें धर्माधिकाऱ्यांचा द्वेष मी जागृत करूं इच्छित नाहीं, आणि माझा धर्मविषयक मतांवरच केवळ नव्हे, तर त्यांपासून वास्तविक रीत्या भिन्न पण त्यांच्याशीं संबद्ध म्हणून समजल्या जाणाऱ्या माझ्या इतर मतांवर हल्ले आणूं इच्छीत नाहीं. हल्लीं जितका द्वेष मीं जागृत केलेला आहे त्याहून ज्यास्त द्वेष जागृत करूं नये अशी इच्छा माझ्या मनांत उत्पन्न होण्यास हीं—खाजगी नव्हत, तर सार्वजनिक—कारणें आहेत. उत्क्रान्तिविषयक मतांच्या प्रचारांत हल्लीं आहेत त्यांहून ज्यास्त अडचणी आणण्यापासून फायद्यापेक्षां नुकसानच ज्यास्त होणार आहे. "

१८९८-९९ च्या हिंवाळयांत मानसशास्त्राच्या सातव्या भागास दोन पूरक लेख त्यानें जोडिले; एक " कल्पनावाद व वस्तु-

वाद " या विषयावर, आणि दुसरा, प्रो० ग्रीननें १८७७ च्या दिजंबरांत कॉन्टेम्पोररी रिव्ह्यूंत केलेली टीका आतां पुन: छापिली होती त्यास उत्तरादाखल. ह्याशिवाय त्यानें आपल्या " कल्पनांची जनिति " असें एक प्रकरण लिहिलें. (तें ' समाजशास्त्राचीं तत्त्वें ' ह्या मराठी ग्रंथाच्या अखेरच्या दोन खंडांना पूरणिका म्हणून प्रसिद्ध झालें आहे.)

त्याच्या तत्त्वविषयक मतांच्या संबंधानें सार्वजनिक मताची जरी तो पर्वा करीत नसे, तरी त्याच्या शैलीवर कोणीं टीका केल्यास ती त्यास फार लागत असे, आणि त्याचें खाजगी जीवित व संभाषण कोणीं प्रशस्त करणें त्यास बिलकूल खपत नसे. पण असा एक प्रसंग १८९९ सालीं एका बाईनें आणिला. ती व तिचा बाप स्पेन्सर साहेबाच्या शेजारीं कांहीं दिवस रहात होती, आणि कांहीं दिवस त्या वेळीं तो काय म्हणतो व करितो त्याचीं टिपणें ती करून ठेवीत असे. आतां तीं टिपणें, हेक्टर म्याकफर्सन यास दहा गिनींस देण्यास ती तयार झाली, आणि त्यास तिनें असेंहि कळविलें कीं, तूं तीं न घेतल्यास मला तीं स्वतंत्ररीत्या प्रसिद्ध करणारा कोणीहि मिळेल. हें त्यानें स्पेन्सर यास कळविलें, तेव्हां त्या बाबतींत त्यानें वकिलाचें मत घेतलें; त्यावरून तिला तसें करण्याची बंदी करतां येत नाहीं असें त्यास समजल्यावरून आपण त्या टिपणांची दुसरी एकादी आवृत्ति छापणार नाहीं असा तिजकडून करार करून घेऊन म्याकफर्सनकडून त्यानें तीं विकत घेवविलीं. तीं वाचून पाहिल्यावर तो त्यास ता० २९ एप्रिल १८९० रोजीं लिहितो:—"तूं हा सवदा केलास तो तुझ्या अजमासापेक्षां ज्यास्त फायदेशीर आहे. ह्या टिपणांत पुष्कळ अगदीं खोटीं विधानें आहेत व तीं इतकीं खोटीं आहेत कीं तीं शुद्ध वेडेपणाचींच आहेत. उदाहरणार्थ, हें एक पहा:—" त्यास वरचेवर मार्लबरो हाऊसमध्यें

(प्रिन्स आव्ह् वेल्सच्या वाड्यांत) जेवणाचें निमंत्रण येई, पण तो कधीं जात नसे. " एकदा निमंत्रण अमान्य केल्यावर (माजी सप्तम एडवर्ड) प्रिन्स आव्ह् वेल्स पुनःपुनः बोलावील हें संभवतें तरी का ? हें विधान सपशेल खोटें आहे. दुसरें एक विधान असें आहेः—" ग्लॅडस्टन वरचेवर न्याहारीस येई, पण होमरूल बिल पुढें आणण्याच्या पूर्वीं; तद्वतच, जॉर्ज इलियट, डार्विन व टिंडाल." हेंहि अगदीं खोटें आहे. ग्लॅडस्टन खेरीजकरून न्याहारीच्या उपचाराची देवघेव मीं ह्या चवघांपैकीं कोणाशींच केली नाहीं; आणि (त्या देवघेवींत) तो माझ्याकडे न्याहारीस येण्याच्या ऐवजीं मीच त्याकडे तीनचारदां गेलों होतों.....पण मि० —च्या दिनचर्या-लेखांतील कांहीं उतारे (जे या टिपणांत दिले आहेत ते) बेअब्रू करणारेच आहेत. "

हीं टिपणें वाचून स्पेन्सरच्या मनांत प्रथम अशी कल्पना आली कीं, तीं प्रसिद्ध केल्यास तुझ्यावर खटलाच होण्याचा संभव आहे हें त्या बाईस आपल्या वकिलामार्फत कळवावें, पण मागाहून त्यानें तो विचार सोडून दिला.

ह्या वेळीं त्याचा मित्र ग्रांट आलेन ह्याच्या प्रकृतीबद्दल त्याला बरीच काळजी वाटूं लागली, आणि त्याच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून तो त्याच्या प्रकृति–बिघाडाचीं मूळ कारणें शोधूं लागला. आलेन त्याच्याकडे कांहीं दिवस भेटावयास आला असतां प्रकृतीची खबरदारी घेण्याबद्दल त्यानें त्यास आग्रहपूर्वक विनंत्या केल्या, आणि पुढें शास्त्रीयदृष्ट्या त्यानें काय केलें पाहिजे हें त्यास ता० २ जून १८९९ रोजीं एक पत्र लिहून कळविलें. तें पत्र असेंः—"तूं एथें कांहीं दिवस होतास त्यानें तुझ्या प्रकृतीस फायदा झाला हें तुझ्या बायकोकडून ऐकण्यास मला आनंद वाटतो. मी आशा करितों कीं, हळूहळू तुझ्या प्रकृतींत पूर्ण सुधारणा होईल. पण तशी ती होण्यास

तूं आपलें चर्वण सुधारलें पाहिजे.....मुलांना जर मला शिकवावयाचें असेल तर मी त्यांना ' चांगलें चर्वण करण्याचें महत्त्व ' या विषयावर एक धडाच देईन, आणि दृष्टान्तासाठीं मी एक खिळा व तितक्याच वजनाचा लोखंडाचा चुरा घेईन, नंतर ते (खिळा एका ग्लासांत व चुरा दुसऱ्यांत अशा रीतीनें) दोन ग्लासांत घालून त्यांत पाणी मिसळलेलें सल्फ्यूरिक आसिड ओतीन, आणि त्यांस तीं ग्लासें वरचेवर हलवावयास सांगेन, आणि त्यांच्या असें नजरेस आणीन कीं, लोखंडाचा चुरा त्या आसिडांत जरी जलद विरघळून गेला, तरी खिळा विरघळून जाण्यास सरासरी एक आठवडा लागेल. अन्नाचे लहान तुकडे करण्याचें महत्त्व यावरून त्यांच्या मनावर ठसेल. आतां तूं शास्त्रज्ञ असून तुझ्या ही गोष्ट लक्ष्यांत येऊं नये ह्याचें मला आश्चर्य वाटतें. " (मरणापूर्वीं थोडे दिवस ' चर्वण ' या विषयावर एक लहान निबंध सांगून तयार करावयास स्पेन्सरनें सुरुवात केली होती, पण तो पुरा करण्यास तो जगला नाहीं.)

पुढें आक्टोबरांत ग्रांट आलेन मरण पावला. तेव्हां स्पेन्सरला आपला एक अत्यन्त हुशार व उदार सहाय्यकारी गमावला असें वाटलें. नंतर १९०० च्या जूनमध्यें एडवर्ड क्लॉड यानें जेव्हां त्याचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें तेव्हां स्पेन्सर त्यास लिहितोः—" त्याचा चतुरस्रपणा पाहून मला वरचेवर आश्चर्य वाटत असे, आतां तूं त्याच्या चरित्रांतील सर्व गोष्टी एकत्र गोंविलेल्या वाचून, मला वाटतें कीं, मला आश्चर्य वाटे तें अपुरें होतें. मी त्याच्याबद्दल लिहिलें असतें, तर त्याची जी एकादी गोष्ट ताबडतोब लक्ष्यांत घेण्याची अत्यन्त जाडी शक्ति तिला त्याच्या इतर गुणांबरोबर उल्लेख केला असता. त्याचें तूं चरित्र लिहिलेंस तें योग्य केलेंस. "

ह्या वेळीं नैतिक व्याख्यानकारांकरितां एक फंड गोळा होत

होता, त्यासंबंधानें त्याचा प्रसिद्ध चरित्रकोशकार लेस्ली स्टीफेन याशीं पुढील पत्रव्यहार झाला; व तो फार बोधप्रद आहे. त्यावरून तो जरी आपल्यास आळशी म्हणवीत असे, आणि त्याला वाचनाचा जरी खराखुराच कंटाळा असे, तरी त्यास जी माहिती पाहिजे असेल तिजकडे त्याची नेहमीं नजर किती असे, व ती तो अविश्रान्त रीत्या गोळा करून ध्यानांत कशी ठेवीत असे, ह्या गोष्टींवर कांहीं प्रकाश पडतो. त्याचा एक मित्र म्हणत असे कीं, " स्पेन्सरला खाजवा कीं अज्ञान दृश्य झालेंच. " (या म्हणण्याचा आशय असा कीं स्पेन्सरचें ज्ञान केवळ वरवरचें आहे.) हें जरी एका अर्थीं खरें होतें, तरी विवेचक या नात्यानें तो फार उद्योगी असून त्याचें मन वस्तूंमधील संबंध ताडण्यामध्यें सारखें गुंतलेलें असे. हे संबंध त्यास पुरे माहीत झाल्यामुळेंच त्याच्या पुष्टीकरणार्थ लागणारी माहिती जणूं काय त्याच्या हाताच्या बोटावर असे, आणि ती तो योग्य रीतीनें वाचकांपुढें मांडूं शके. त्याचें ग्रंथलेखन जसें प्रचंड होतें, तसाच त्याचा पत्रव्यवहार प्रचंड होता. प्रस्तुत ग्रंथांत त्या पत्रव्यवहाराचा केवळ लहानसा भागच आलेला आहे. असो. त्याचें लेस्ली स्टीफेनला वरील बाबतींतील पहिलें पत्र ता० २८ जून १८९९ चें असून असें होतें:—" नीतिविषयक व्याख्यानकारांकरितां गोळा होणाऱ्या फंडाला मदत करण्याबद्दल जेव्हां मला विनंतिपत्र आलें, तेव्हां मीं त्यास वर्गणी देण्याचें लागलेंच ठरविलें. पण ' व्याख्यानकार निदान एकादी विश्वविद्यालयीन पदवी धारण करणारा पाहिजे ' असें जेव्हां मीं प्रकाशपत्रकांत वाचिलें, तेव्हां मी थबकलों. जॉन मिल्ल जर आज जिवंत असता व तरुण असता, तर त्यास ह्या अटीमुळें व्याख्यानकार होतां आलें नसतें. आणि मी जर तरुण असतों व नैतिक व्याख्यानकार होण्याचें मनांत आणिलें असतें तर मलाहि त्या जाग्याला उमेदवार म्हणून पुढें येतां आलें नसतें. "

यावर लेस्ली स्टीफेननें त्यास लिहिलें कीं, ' उमेदवारास विश्वविद्यालयीन पदवीच पाहिजे ' असें प्रकाशपत्रकांत नसून, पदवीधराच्या तोडीचें शिक्षण त्यास असावें असें आहे. त्यावर स्पेन्सर त्यास ता० ३० जून रोजीं लिहितोः—" मिल्लचें कसें झालें असतें हें मला माहीत नाहीं. मी एवढेंच म्हणूं शकतों कीं, मी जर तरुण असून उमेदवार म्हणून पुढें आलों असतों तर तुमच्या नियमांनीं मला खचीत नालायक केलें असतें. विश्वविद्यालयीन मानाच्या पदवीच्या तोडीचें शिक्षण मला मिळालेलें आहे असें मला दाखवितां आलें नसतें. इतकेंच नाहीं, तर विश्वविद्यालयाच्या कनिष्ठ पदवीच्या तोडीचें देखील शिक्षण दाखवितां आलें नसतें.

माझी अशी गोष्ट असल्यामुळें, मी सहजच तुम्हीं ठरविलेल्या कसोटीच्या विरुद्ध आहें. शिवाय माझ्या स्वताच्याच दृष्टीनें नव्हे, तर सामान्य दृष्टीनें देखील, विश्वविद्यालयांत शिक्षण झाल्यानें माणसाची योग्य तयारी होते, ही तुम्हीं गृहीत केलेली गोष्टच मला कबूल नाहीं. "

यावर लेस्ली स्टीफेन त्यास ता० १ जुलई रोजीं लिहितोः—" तूं म्हणतोस कीं तूं जेव्हां तरुण होतास तेव्हां विश्वविद्यालयाच्या कनिष्ठ पदवीच्या तोडीचें देखील शिक्षण (आपल्यास मिळालें असल्याचें) तुला दाखवितां आलें नसतें. हें तुझें विधान बरोबर नाहीं, असें म्हणणें माझ्या अधिकारांतलें नाहीं. तथापि मला खात्री वाटते कीं, तूं जेव्हां नैतिक प्रश्नांवर प्रथम ग्रंथ प्रसिद्ध केलेस तेव्हां असल्या विषयांवर तूं कसें तरी सामान्य सन्मान्य पदवीधरापेक्षां फारच श्रेष्ठ ज्ञान संपादिलेलें होतेंस..... "

यावर स्पेन्सर त्यास ता० २ जुलई रोजीं लिहितोः—" तूं गृहीत करितोस तें स्वाभाविकच आहे; पण तें अगदीं चुकीचें आहे. जेव्हां मीं ' सोश्यलस्टॅटिक्स ' लिहिलें तेव्हां तूं समजतोस तशी

माझी कांहींच तयारी नव्हती. जेव्हां वयाच्या तेराव्या ते सोळाव्या वर्षांपर्यंत मी आपल्या चुलत्याजवळ होतों तेव्हां मला भूमिति, बीजगणित, त्रिकोणमिति, यंत्रशास्त्र, आणि न्यूटनच्या ' प्रिन्सिपिया ' ग्रंथाचा पहिला भाग, इतकेंच येत होतें. यापेक्षां ज्यास्त विद्या मीं कधीं संपादिली नाहीं. आठ वर्षें मी इन्जियरीचें काम करीत होतों त्या दरम्यान मीं बहुतेक कांहींच वाचिलें नाहीं, माझ्या धंद्यासंबंधाच्या पुस्तकांतीलहि नाहीं. नेहमींप्रमाणें तेव्हांहि मीं दमदार वाचक नव्हतों, आणि कादंबऱ्या व प्रवासवर्णनें ह्यांखेरीज मी बहुधा कांहींच वाचीत नसें, तींहि पुस्तकें अल्पच वाचीत असें. वास्तविकपणें मीं स्वभावतःच आळशी आहें. ह्या सर्व अमदानींत कोणतेंहि गंभीर विषयावरील पुस्तक सारखें तासभर मीं वाचिलें असेल किंवा नाहीं, ह्याचा मला संशयच वाटतो. माझ्या ज्ञानाच्यासंबंधानें माझ्या स्थितीची तुला पुढील गोष्टीवरून कल्पना येईल. ' सोश्यलस्टॅटिक्स ' मीं लिहिलें तोंपावेतों माझ्या सगळ्या अमदानींत लॉकच्या ग्रंथाची एक प्रत माझ्या बापाच्या फळ्यांवर पडलेली असून मीं ती कधींहि वाचिली नाहीं; मीं ती कधीं खालीं काढिली असेल किंवा नाहीं, ह्याचीहि शंकाच आहे. इतर सर्व प्रकारच्या तात्त्विक ग्रंथांची हीच गोष्ट होय. बेकनचे निबंध खेरीज करून त्याचा कोणताहि ग्रंथ मीं वाचिला नाहीं. " सामाजिक इंद्रियजाल " ह्या विषयावर निबंध लिहितांना हॉबिसच्या तद्विषयक विलक्षण कल्पनेची सविस्तर माहिती मला करून घ्यावी लागली; पण तोंपावेतों त्याचे ग्रंथ मीं कधीं चाळिले नव्हते. राजनीति व नीतिशास्त्र ह्यांच्यासंबंधानेंहि माझें असेंच होतें. मीं ' सोश्यलस्टॅटिक्स ' लिहिलें तेव्हां, पेलीनें सोईचें मत प्रतिपादिलें आहे, ह्यापलीकडे मला त्याची कांहींच माहिती नव्हती; आणि बेन्थाम हा महत्तमसुखाच्या तत्त्वाचा प्रतिपादक आहे, इतकीच त्याच्याबद्दल मला मा-

हिती होती. मीं ज्या इतर नीतिविषयक लिहिणारांस तेथें उल्लेख केलेला आहे, त्यांची माहिती मला इतके तिकडे त्यांना केलेल्या उल्लेखांवरूनच झालेली होती. मी सरासरी तेवीस वर्षांचा असतां, मिल्लचें तर्कशास्त्रावरील पुस्तक नुक्तेंच प्रसिद्ध झालें होतें तें मीं हातीं घेतलें, आणि अनुमान–नमुन्यांवर त्यानें केलेली टीका मला बरोबर वाटली. मी चोवीस वर्षांचा असतां मला क्यांटचें भाषान्तर मिळालें, आणि त्याचीं पहिलीं थोडीं पानें मीं वाचिलीं. लागलेंच त्याचें काल व आकाश एतद्विषयक मत मला त्याज्य वाटल्यामुळें, मीं पुढें वाचिलें नाहीं. प्राचीन तात्त्विक लेखकांविषयीं माझें पूर्ण अज्ञान होतें. ‘ सोश्यलस्टॅटिक्स ’ प्रसिद्ध केल्यावर (१८५१ त) माझी ल्युइसशीं ओळख झाली, आणि त्याचा एक परिणाम असा झाला कीं, मीं त्याचा “ चारित्रात्मक तत्त्वज्ञानाचा इतिहास ” वाचिला; आणि नंतर (१८५२ त) जॉर्ज इलियटनें मला मिल्लचें ‘ तर्क-शास्त्र ’ नजर केल्यामुळें तें सबंद वाचिलें. ह्याचा एक परिणाम हा झाला कीं, ‘ वेस्टमिन्स्टर ’ मध्यें मीं त्याच्या मतावर हल्ला केला.

ह्यावरून व्यक्त होणाऱ्या उणीवा भरून काढण्यासाठीं मीं ते-व्हांपासून कांहीं केलेलें नाहीं. दोनदां किंवा तीनदां मीं प्लेटोचे ‘ सं-वाद ’ हातांत घेतले आहेत, पण कमज्यास्त त्रासानें लागलेच खालीं ठेविलेले आहेत. आणि आरिस्टॉटलबद्दल मला प्लेटोपेक्षांहि कमी माहिती आहे. “ ‘ सोश्यलस्टॅटिक्स ’ मध्यें ज्या इतक्या गोष्टी गोंविलेल्या आहेत त्या कोठून आल्या ? ” असें तूं मला विचारिलेंस तर त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, तें लिहिण्याची तयारी करीत असतां ज्या दिशांनीं सामान्य सिद्धान्त बनवण्यास मला सामग्री मिळेल असें वाटलें, त्या दिशांनीं मीं वाचिलें. इत-रांच्या सिद्धान्तांकडे मीं कधीं पाहिलें नाहीं. आणि ह्यावरून माझा कल दिसून येतो. आजतागायत मी एकंदर वस्तूंकडे आ-

पल्या स्वताच्या डोळ्यांनीं पाहिलें आहे, आणि दुसऱ्यांच्या डोळ्यांनीं नाहीं. मला वाटतें, मला जीं मतें प्राप्त झालीं आहेत, तीं, कांहीं अंशीं मी प्रत्यक्ष सृष्टीकडे गेलों आहें, आणि पूर्वींपासूनच्या समजांच्या भलत्याच ग्रहांपासून मुक्त राहिलों आहें, ह्यामुळें प्राप्त झालीं आहेत. थोडें वाचावयाचें, आणि पुष्कळ विचार करावयाचा, आणि तो प्रत्यक्षरीत्या प्राप्त करून घेतलेल्या गोष्टींविषयीं करावयाचा, असा माझा मार्ग होता, आणि तो मीं मुद्दाम बेत करून क्रमिलेला नसून आपेआप क्रमिलेला होता. कदाचित् हेंहि सांगणें इष्ट दिसतें कीं, मला नेहमीं जीवीतशास्त्राबद्दल आस्था वाटलेली आहे—भौतिक, मानसिक आणि सामाजिक जीवित. माझें मत असें आहे कीं, सर्व प्रकारच्या जीवितशास्त्रांचें अध्ययन करणें ही नीतिशास्त्र शिकविणारानें करावयाची खरी तयारी आहे. आणि हें जीवितशास्त्र पूर्वींच्या तद्विषयक कल्पनेप्रमाणें नव्हे, तर हल्लींच्या तद्विषयक कल्पनेप्रमाणें होय. तूं जर मला विचारिलेंस कीं, उमेदवारांविषयीं कोणती कसोटी आपण स्थापावयाची, तर त्याचें उत्तर मला देतां येत नाहीं. मी केवळ असा प्रश्न करितों कीं, कांहीं तरी कसोटी स्थापणें जरूर आहे कीं काय? कांहीं ठराविक इयत्ता न घालतां, प्रत्येक उमेदवाराकडे पाहून त्याच्याविषयीं मिळणाऱ्या माहितीवरून त्याची निवड करावयाची किंवा नाहीं हें ठरविणें योग्य नाहीं काय?"

मिसेस जोसेफाइन बटलर हिला ता ३ सपटंबर १८९९ रोजीं लिहिलेलें पुढील पत्र वाचण्यासारखें आहे. तें असें:—"नैतिक उद्देश साधण्यासाठीं जबरीचे मार्ग स्वीकारण्याविरुद्ध तूं व दुसरे कांहीं खटपट करीत आहेत, हें ऐकून मला आनंद वाटतो. असल्या विषयावर, संक्षिप्तरीत्या सांगतां, माझीं मतें अशीं आहेतः—"तात्कालिक मनांत आणिलेल्या परिणामांव्यतिरिक्त इतर सर्व परिणाम

लक्ष्यांत न घेतल्यामुळें राजकीय व सामाजिक व्यवहारासंबंधी सर्व विवेचन हल्लीं दूषित होत असतें. एकादें अनिष्ट बंद करण्याकरितां किंवा इष्ट साधण्याकरितां उत्सुक झालेलीं माणसें, आपण ज्या सरकारी साधनांचा उपयोग करणार त्यांचे इतर परिणाम काय होतील, किंवा दूरचे परिणाम काय होतील ह्याचा विचार करीत नाहींत. व्यक्तिवर्तनाचें नियंत्रण करण्याकरितां जसें एकेक नवें साधन स्थापावें, तसें दुसरीं तसलीं साधनें स्थापण्यास तें आधारभूत होतें, आणि प्रत्येक वर्षीं नवे उद्देश मनांत धरून जगन्मित्र नवीं जबरी करणारीं साधनें स्थापा, म्हणून म्हणत असतात, आणि अशा रीतीनें, त्यांपैकीं प्रत्येकजण आपली विशिष्ट योजना पुढें आणीत असतां, ज्या सामाजिक घटनेच्या नमुन्याबद्दल त्यांस मुळींच कल्पना नव्हती, असा नमुना हळूहळू स्थापला जातो, ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं. · कायदे करणारे, आणि ' कायदा करा ' म्हणून म्हणणारे, ह्यांनीं नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारखा उच्चतम उद्देश म्हटला म्हणजे, शील बनविणें हा असला पाहिजे. उच्च नमुन्याचे नागरिक स्वनियामक असतात, आणि ज्या नागरिकांचें नियमन बाह्य जोरानें करावें लागतें ते उघडच हलक्या नमुन्याचे होत. इतर सर्व प्राण्यांप्रमाणें माणसेंहि नेहमीं परिस्थितीशीं अनुरूप बनत जात असतात. जर पिढ्यानुपिढ्या त्यांचें सर्व प्रकारचें वर्तन त्यांस आपण कायद्यानें ठरवून द्यावयास लागलों, तर त्यांस प्रत्येक गोष्टींत सरकारी नियंत्रणाची ज्यास्त ज्यास्त जरूरी भासूं लागेल.....जगन्मित्र व इतर कायदे करणारे ह्यांना जें धोरण फार आवडतें दिसतें त्याचा अखेर परिणाम, प्राचीन पेरूमध्यें जशा प्रकारचा समाज होता तसा स्थापणें हा होणार आहे. तेथें प्रत्येक दहावा माणूस सरकारी कामगार असून तो बाकीच्या नवांचें नियंत्रण करीत असे. तें नियमन तेथें इतक्या थरास गेलें होतें कीं, प्रत्येक

व्यवस्था नीट चालली आहे कीं नाहीं, त्यांतील सामान चांगल्या स्थितींत आहे किंवा नाहीं, आणि मुलांची व्यवस्था नीट होत आहे किंवा नाहीं, हें पहाणारे असत; आणि त्या ठिकाणीं वर्तनाच्या ह्या सार्वत्रिक नियमनाचा परिणाम अशा प्रकारचें शील (तेथील लोकांमध्यें) उत्पन्न करणें हा झाला कीं, तें दुर्बल झालेलें राष्ट्र मूठभर स्प्यानिश लोकांपुढें पत्त्यांच्या घरासारखें खालीं आलें. ”

१८९९ च्या अखेरीच्या सुमारास “जीवशास्त्राच्या तत्त्वां” ची सुधारलेली आवृत्ति पुरी केल्यावर, “आदितत्त्वां” ची अखेरची आवृत्ति तयार करण्याचें काम त्यानें एकदम हातीं घेतलें. नव्या आवृत्तींत त्यानें पुष्कळ व महत्त्वाच्या सुधारणा केल्या असल्यामुळें त्यास अशी इच्छा झाली कीं, त्याचीं नवीं भाषान्तरें होतील तितकीं लवकर करवून घ्यावीं. त्याप्रमाणें जर्मन भाषान्तर पुरें झालें तेव्हां भाषान्तरकार प्रो० व्हिक्टर क्यारस यानें त्यास असें लिहिलें:—“आणि तुझ्या ग्रंथाचा पुनः तर्जुमा करण्याची तूं मला परवानगी दिलीस त्याबद्दल मला पुनः एकवार अत्यन्त मनःपूर्वक आभार मानूं दे. मला त्यापासून फारच आनंद झाला.” ह्याखालीं स्पेन्सरनें असें लिहिलें आहेः—“प्रो० क्यारस ह्याचें वय व विद्वत्ता हीं लक्ष्यांत घेतां ही सर्वांत मोठी शाबासकी मला मिळाली आहे.” ज्या तत्त्वामीमांसासरणीमध्यें तो आज चाळीस वर्षें गुंतलेला होता, तिजवर वयाच्या ऐंशीव्या वर्षीं हा शेवटचा हात मारतांना त्यास सामान्य समाधान वाटलें नसेल. आणि त्याच्या वाढदिवशीं त्याच्याकडे जगाच्या सर्व भागांतून जीं मनःपूर्वक अभिनन्दनें येऊन थडकलीं, त्यांनीं ह्या समाधानांत ज्यास्तच भर पडली असावी. त्यावर उत्तरादाखल त्यानें पुढील पत्र स्वहस्तानें लिहून शिळा-छापावर छापिलें, व प्रत्येक अभिनन्दकाकडे पाठविलें:—“ज्ञात व अज्ञात मित्रांचीं अभिनन्दनें वाहणारीं पत्रें व तारा काल व आज इतकीं आलीं

आहेत कीं, माझी प्रकृति चांगली असती तरी प्रत्येकास उत्तर देणें अशक्य झालें असतें. म्हणून इतरांबरोबर तुम्हांलाहि अशी विनंति करणें मला भाग आहे कीं, मेहेरबानी करून या पत्राचा स्वीकार करा; ज्यांत ज्यांनीं आपली सहानुभूति व्यक्त केली आहे त्यांचे मी आभार मानीत असून, माझ्या स्वताच्या देशबांधवांकडून व इतर राष्ट्रीयांकडून सहानुभूतीचीं जीं इतकीं व्यंजकें मला प्राप्त झालीं आहेत त्यांबद्दल मी मला वाटणारा मोठा आनंद व्यक्त करीत आहें."

ज्या कामाकरितां त्यानें एवढा मोठा आत्मत्याग केला होता, तें आतां पुरें झालें असल्यामुळें बाकीचें आयुष्य आपल्यास स्वस्थपणें घालवतां यावें, अशी इच्छा त्यास होणें स्वाभाविक होतें. पण तसें झालें नाहीं. ह्या वेळीं दक्षिण आफ्रिकेंत बोअर–युद्ध सुरू झालें होतें. त्याचा त्यास त्रास झाला. हें युद्ध सुरू होण्यापूर्वीं, ज्या धोरणामुळें लढाईचा रंग येत होता त्याचा त्यानें निषेध केला होता. आतां ही लढाई झाली तीस योग्य कारण होतें किंवा नाहीं ह्याबद्दल कोणाचें कांहींहि मत असलें, तरी त्याचें त्यासंबंधानें मत त्याच्या आजपर्यंतच्या सामान्य मतांस अनुसरून होतें ह्यांत बिलकूल शंका नाहीं. त्या लढाईविरुद्ध तयार केलेल्या पत्रकावर सही करण्यास प्रो॰ जेम्स सली यानें त्यास विनंति केली तेव्हां तो त्यास (ता॰ १० दिजंबर १८९९) लिहितोः—"(ह्या निषेधपत्रकांतील) " आह्मी " हे कोण ? अशा ठिकाणीं माझें नांव कोणाच्या नांवाबरोबर येणार आहे हें समजल्याशिवाय मला सही देणें आवडत नाहीं. शिवाय, मला वाटतें, हा निषेध असावा तितका जोरदार नाहीं, व असावा तितका स्पष्ट नाहीं.....त्यांत इतर गोष्टींबरोबर ह्या गोष्टींवर जोर दिला पाहिजे. (१) उटलंडर लोक (बोअर लोकांस) नको असणारे आगंतुक होते, आणि ज्या सामाजिकघटनेंत ते आगंतुकी करून गेले तिजबद्दल तक्रार करण्याचा त्यांस

हक्क नव्हता; कारण त्यांस न आवडेल तर तेथें रहाण्यास कोणीं सांगितलें नव्हतें. (२) ते सदोष ठरलेले राजद्रोही होते, कारण ज्या सरकारानें त्यांस येऊं दिलें, तें उलथून पाडण्याचा ते यत्न करीत होते.....राजद्रोह्यांना राजकीय सत्तेची मागणी करतां येत नाहीं. (३) आह्मी बोअर लोकांच्या ठिकाणीं असतों तर आह्मीं जें खचीत केलें असतें, आणि जें करतांना आह्मीं आपल्यास देशाभिमानी व फार प्रशंसनीय म्हणून मानिलें असतें त्याहून अधिक त्या लोकांनीं केलेलें नाहीं.....(९) इतर राष्ट्रें आह्मांस शिव्या देतात त्या बरोबर आहेत, कारण त्यांच्यापैकीं एकाद्यानें तसेंच केलें असतें, तर आह्मींहि त्यास शिव्या दिल्या असत्या; आणि रशिया फिनलंदमध्यें तसल्याच गोष्टी फार अधिक सौम्य रीतीनें करीत आहे तरी हल्लीं आह्मीं त्यास शिव्या देत आहों. ”

ता० २ जानेवारी १९०० रोजीं तो मार्क जज्ज ह्यास लिहितो:—“ गेल्या आठवड्यांत देवी टोंचण्याविरुद्ध मंडळीचा सेक्रेटरी, आणि दक्षिण आफ्रिकेंत तडजोड करूं पाहणाऱ्या कमिटीचा अध्यक्ष, ह्यांचा माझा पत्रव्यवहार झाला आहे, आणि आज ‘ स्पीकर ’ पत्राच्या संपादकाकडून मला अशी विनंती आली आहे कीं, ते जें करीत आहेत त्यांशीं मीं आपली सहानुभूति व्यक्त करावी. या सर्वांना मी अनुकूल उत्तर देत आहें. मी आतां जवळ जवळ ऐंशीं वर्षांचा झालों आहें, आणि हें मला ज्यास्त ज्यास्त स्पष्ट दिसूं लागलें आहे कीं, असल्या ह्या अनेक व्यग्रतांपासून मीं आपल्यास होईल तितकें दूर ठेविलें पाहिजे, कारण अद्यापि मला कांहीं करावयाचें आहे; आणि असें वाटल्यावरून ह्या लायसेन्सिंग रिफार्म लीगचा उपाध्यक्ष होण्याचें नाकरणें ज्यास्त बरें, असें मीं ठरविलें आहे.....तुझ्या प्रयत्नांना मी सिद्धि इच्छितों. ”

बोअर युद्धासंबंधाचें ‘ स्पीकर ’ पत्राचें धोरण जरी त्यास पसंत

होतें, तरी त्या पत्राची सोश्यालिस्टिक कलाची राजकीय मतें त्यास पसंत नव्हती; आणि त्यास सोश्यालिझमचा लढाईच्या इतकाच तिटकारा होता. लढाईवर जाणाऱ्या सैन्याला " मजूबाचें स्मरण ठेवा " (ह्या लढाईंत बूर लोकांनीं इंग्रजांचा पराजय केलेला होता) म्हणून ज्यांनीं ओरडून बजाविलें, त्यांच्या वृत्तीचा निषेध करणारें एक पत्र त्यानें ता० ९ फेब्रुवारी रोजीं " मार्निंग लीडर " नामक पत्राला लिहिलें, आणि त्यासंबंधानें सर एडवर्ड फ्राय यास दुसऱ्या दिवशीं असें लिहिलें:—" राजकीय व द्रव्यविषयक संस्थांनीं चेतविलेल्या लोकांच्या मनोविकारानें ज्या सकाळच्या दैनिकांनीं दक्षिण आफ्रिकेंतील आमच्या युद्धविषयक धोरणाविरुद्ध लिहिलें होतें, त्यांपैकीं एक खेरीजकरून बाकीच्यांचीं तोंडें (कोणीं) बंद करून टाकिलीं आहेत. जे लढाईंत निषेध करीत आहेत, आणि तीं दोन लोकसत्ताकें (ट्रान्सवाल व ऑरेंज रिव्हर फ्री स्टेट) स्वतंत्र रहावीं म्हणून इच्छीत आहेत त्यांचें मतप्रदर्शन करणारें "मार्निंग लीडर" एवढें एकच पत्र राहिलें आहे.....हा संग्रामरूपी ताप कमी करण्यास फारसें करतां येईल अशी आशाच करतां येत नाहीं, पण न्याय्य मनोविकारांबद्दल साधेल तितकी सहानुभूति उत्पन्न करून, आणि जे पवित्र न्यायदेवतेची थट्टा करीत आहेत त्यांचा निषेध करून, हल्लीं जी अगदीं अन्याय्य व्यवस्था अखेरीस होईल म्हणून भीति वाटत आहे, ती न होण्याचा मार्ग तयार करण्याच्या कामीं आपणास कांहीं तरी कदाचित् करतां येईल. म्हणून आधींच जीं मतें प्रदर्शित झालीं आहेत, त्यांत आपल्या मतप्रदर्शनाची भर घालून, तूं मदत करशील काय ? "

अशाच प्रकारचें पत्र त्यानें आक्सफर्ड एथील बेलियल कॉलेजचा मास्तर डा० एडवर्ड केर्ड यास पाठविलें.

याचसंबंधानें, पार्लमेंताचा सभासद व त्याचा स्नेही लिओ-

नार्ड कोर्टने बूर युद्धाच्या विरुद्ध असल्यामुळें मतदारास अप्रिय झाला होता; त्यास ता० २४ फेब्रुवारी १९०० रोजीं त्यानें असें लिहिलें:—"तूं आपल्या मतदारांशीं कसें वागावें, यासंबंधानें मीं तुला सूचना करणें जरा मूर्खपणाचेंच आहे असें तुला वाटेल. अगदीं निराधार असा एक समज उत्पन्न झाला आहे कीं, निवडणारांच्या ज्या भागानें पार्लमेंताच्या एकाद्या सभासदास निवडिलें असेल, त्यांचा तो प्रतिनिधि असतो, आणि जेव्हां त्या भागाला म्हणजे त्याला निवडणाऱ्या कान्सर्व्हेटिव्ह किंवा लिबरल सभेला, त्याचें धोरण नापसंत वाटतें, तेव्हां त्या सभेचा व लोकांचाहि असा समज होतो कीं, असें झाल्यास त्यानें राजीनामा देणें हें त्याचें कर्तव्य आहे. पण ब्रिटिश राज्यपद्धतींत किंवा प्रतिनिधिविषयक कल्पनेंत असें दाखविणारें काय आहे कीं, पार्लमेंताचा सभासद आपल्या निवडणारांचा एकादा भाग किंवा एकादा पक्ष ह्याचा प्रतिनिधि असतो. मला या विषयाची जी माहिती आहे तिजप्रमाणें पाहतां, प्रतिनिधिविषयक राज्यपद्धति पक्षविषयक कल्पनेस मुळींच ओळखीत नाहीं. पार्लमेंताचा सभासद, त्यास निवडणाऱ्या मंडळाचा आणि त्या गांवच्या सगळ्या मतदारमंडळाचा सभासद असतो, व त्याच्या कोणत्याहि विशिष्ट भागाचा नसतो..... म्हणून एकादी लिबरल किंवा कॉन्सर्व्हेटिव्ह सभा किंवा दुसरें एकादें संगनमत केलेलें मंडळ, हल्लींच्यासारख्या प्रसंगीं जेव्हां त्यास राजीनामा द्यावयास सांगतें, तेव्हां त्यानें त्यास द्यावयाचें योग्य उत्तर हें होय कीं, मी सगळ्या निवडणाऱ्या मंडळाचा प्रतिनिधि असल्यामुळें त्या सगळ्या मंडळानें मीं राजीनामा द्यावा अशी इच्छा प्रदर्शित केल्याविना, ती सूचना मला जमेस देखील धरतां येत नाहीं.

तुझ्या उदाहरणांत अशी बैठक मारून बसणें फायद्याचें होईल किंवा नाहीं हें मला सांगतां येत नाहीं, कारण कदाचित्

मतदार मंडळाच्या ज्या भागानें तुला निवडिलें, त्यापेक्षां बाकीचा त्या मंडळाचा भाग तुझ्याविरुद्ध ज्यास्तच असेल. तथापि मी हा भाग सर्व उदाहरणाला लागू असा सामान्य वर्तनमार्ग होय अशा दृष्टीनें तुला सुचवितों. "

प्रकरण सव्विसावें

त्याचा शेवटचा ग्रंथ

स्पेन्सरच्या वयाला आतां ऐंशी वर्षें झालेलीं असून त्यानें आपलें काम पुरें केलेलें असल्यामुळें आयुष्याचीं राहिलेलीं थोडीं वर्षें पूर्ण मानसिक विश्रान्तींत घालविण्याचा त्यास पूर्ण हक्क आलेला होता. पण त्याच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें हातांतील काम पुरें होण्यापूर्वीं तो नव्या कामाची योजना करून ठेवीत असे.त्याप्रमाणें १८९९च्या सपटंबरांत न्यूयार्कमधील आपल्टन साहेबाला त्यानें असें लिहिलें कीं, " आदितत्त्वांची " उजळणी मीं लवकरच संपवावी असें इच्छितों, कारण माझ्या मनांत आणखी काम हातीं घ्यावयाचें आहे. अजून माझ्यांत थोडीशी शक्ति राहिलेली आहे, आणि मला थोडेंसें लिहावयाचें आहे, त्याचा माझ्या मतें लोकप्रिय होण्यासारखा एक ग्रंथ बनवतां येईल. " पुढच्या वर्षीं त्यानें त्याच्याशीं पत्रव्यवहार करणाऱ्या एका गृहस्थास असें लिहिलें:— " मानसिक व्यासंग हा माझा द्वितीय निसर्ग बनून गेला आहे. पन्नास वर्षें लिहिण्यांत घालविल्यानंतर त्या संवयींतून आपणास सोडवून घेणें कठीण आहे. (माझ्या) कल्पना शब्दांनीं ग्रथित करण्याचें काम (मीं)

एकदम बंद केल्यास, (माझें) जीवित अगदींच उदास होऊन जाईल. ”

पण ग्रंथरचना न केल्यास आपला वेळ कसा जाईल अशी काळजी त्यास नको होती; कारण त्याचा पत्रव्यवहार वाढत चालला होता. त्याच्याशीं पत्रव्यवहार करणाऱ्यांपैकीं त्याच्याशीं प्रत्यक्ष परिचय नसलेले पुष्कळ असत; आणि त्यांच्यापैकीं बरेच जरी मनःपूर्वक माहिती मिळविण्यासाठीं त्यास लिहिणारे असत, तरी पुष्कळजण केवळ त्याचें हस्ताक्षर मिळवूं पहाणारेच असत. मला कांहीं तरी द्या, किंवा भेट द्या, असें म्हणणारांकडून पुष्कळ पत्रें त्यास येत असून, शिवाय ‘ हस्ताक्षर पाठवा ’, ‘ फोटो पाठवा ’, ‘ स्मरणीय वाक्यें पाठवा’ असें म्हणणारांचींहि पुष्कळ पत्रें त्यास येत. मुलांना कसें शिक्षण द्यावें, शाळांची घटना कशी करावी, किंवा वादविवाद–सभांची व्यवस्था कशी ठेवावी, असेंहि त्यास कित्येकजण विचारीत. आणि ‘ न्यूझीलंदमध्यें उद्योग मिळण्याचा संभव ’ ते ‘ इटालींतील सोडचिठ्ठीची पद्धति ’ एथपर्यंत सर्व प्रकारच्या विषयांवर त्याची सल्ला मागितली जाई. आमच्या ग्रंथावर अभिप्राय द्या, म्हणून त्या ऐंशी वर्षांच्या वृद्धास ग्रंथकार विनंति करीत इतकेंच नाहीं, तर त्याच्या पन्नास वर्षांवरच्या ग्रंथांतील हें किंवा तें वास्तविक वा काल्पनिक मत बरोबर कशावरून तें दाखीव, अशीहि त्यास पृच्छा करीत. कांहीं जण तर अशा प्रकारचीं पत्रें त्यास लिहीत कीं त्यांस उत्तरीं शिव्या देणेंच योग्य झालें असतें. पण तसें करण्याविरुद्ध स्पेन्सरचा स्वभाव व धोरण हीं दोन्हीं होतीं. कांहीं प्रकारच्या विनंत्या अशा असत कीं, त्यांस उत्तर न देणें हाच उत्तम मार्ग असे. उदाहरणार्थ, आपल्या ह्या देशांतील एका वाङ्मयात्मक संस्थेनें त्याचे सर्व ग्रंथ आपल्यास नजर करण्याविषयीं त्यास विनंति केली, तेव्हां त्यानें तीस काय उत्तर द्यावें बरें ? त्याला ज्याची मुळींच माहिती नाहीं, किंवा

ज्याच्यापाशीं खात्री–पत्रेंहि नाहींत, अशा एका हिंदु गृहस्थानें त्यास अशी विनंति केली कीं,दुष्काळानें माझ्या धंद्यास चट्टा बसला असल्यामुळें मला दोनशें पौंड उसने द्या; तेव्हां त्यानें त्यास काय उत्तर द्यावें ? सिरियांतील एका तरुणानें त्यास असें लिहिलें कीं, एक उन्हाळा आपल्या संगतींत घालवावा, आपल्याबरोबर फिरावयास जावें, आपलें भाषण ऐकावें, आणि आपण रोजच्या सामान्य व्यवहारांत कसे वागतां हें पहावें, अशी माझी इच्छा आहे; तेव्हां त्यानें काय उत्तर द्यावें ? सही किंवा हस्ताक्षर केवळ मिळवूं पहाणारांची जरी तो मुळींच कींव करीत नसे, तरी आपल्या मित्रांना किंवा दूरच्या वा जवळच्या आप्तांना हस्ताक्षर किंवा फोटो पाठविण्यास मात्र तो नेहमीं तयार असे.

निबंध लिहून पाठवा, किंवा प्यारे पाठवा, ह्या संपादकांच्या नेहमींच्या विनंत्यांखेरीज, आलीकडे त्यास नुकत्याच घडून आलेल्या किंवा येणाऱ्या विषेश गोष्टींवर विषेश लेख लिहिण्याबद्दल विनंत्या होत असत. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियांतील वसाहती संयुक्त होत होत्या त्यांस अभिनन्दनपर व उपदेशपर चार शब्द पाठीव, विसाव्या शतकांत माणसाचें मुख्य धोरण काय असावें तें कळीव, आगामी शतकांत मानवजातीस मुख्य सामाजिक किंवा राजकीय भीति काय आहे तें सांग, इंग्लिश बोलणाऱ्या स्त्रियांना नव्या शतकाचा संक्षिप्त निरोप पाठीव,–तुझा आवडता ग्रंथकार कोण, त्याचे कोणते ग्रंथ तुला विषेश प्रिय आहेत, व कां, तें सांग, दक्षिणआफ्रिकेंत शेवटीं व्यवस्था काय करावी ह्या प्रश्नाचें उत्तर दे, इत्यादि अनेक विनंत्या त्यास होत होत्या. पण त्याच्या वाढणाऱ्या वार्धक्यामुळेंच त्याला त्या मान्य करवत नव्हत्या असें नव्हे, तर दुसऱ्यानें सुचविलेल्या विषयावर लिहिणें, हें त्यास कधींच नको होतें.

१९०० सालचा उन्हाळा त्यानें ससेक्स प्रांतांत बेप्टन मुक्कामीं घालविला. त्यासंबंधानें त्याचा सेक्रेटरी म्हणतो, " ती फार मनोहर

जागा होती, आणि खेडेगांवांत राहण्याची ज्यास फार आवड आहे अशा स्पेन्सरसारख्या माणसास फार आवडण्यासारखी होती. त्यानें "अन्तिम प्रश्नांवर" जो विचार केला, आणि वार्धक्य वाढत चाललें असतां, "मदनसारिकेचें गाणें ऐकून सकाळीं पुनः कधीं उठेन काय?" (म्हणजे, पुढचा वसंत पहाण्यास मी जिवंत राहीन काय?) असा जो त्याच्या मनांत वरचेवर विचार येई, त्यास जें त्यानें शब्दांनीं ग्रथित केलें, तें ह्या ठिकाणींच होय."

एकाद्या विषयावर तोंडी वादविवाद करण्यापेक्षां पत्र लिहिणें त्यास अधिक सोपें वाटे, आणि त्याचें मुख्य कारण हें कीं, पत्र त्यास वाटेल तेव्हां लिहितां येत असे. तो वृद्ध होत चालला तसा उत्साहपूर्वक भाषणापासून त्यास ज्यास्त ज्यास्त त्रास होऊं लागला. त्याला निद्राभावहि ज्यास्त वरचेवर होऊं लागला; तथापि त्याची मूळची प्रकृति इतकी निकोप होती कीं, त्याचा डाक्टर त्यास म्हणे, "वृद्धवयाची छाया तुझ्यावर फारच अल्प पडलेली आहे." इतरांशीं तोंडी व्यवहार करण्यापासून त्यास आतां त्रास होत असे, म्हणून कोणीं लेखी रीतीनें सहानुभूतिप्रदर्शन केलें तर तें ज्यास्त आवडूं लागलें होतें. उदाहरणार्थ, १९०० च्या जुलईंत "सौथ प्लेस एथिकल सोसैटी" नामक नैतिक सभेनें जेव्हां त्यास अभिनन्दनपर पत्र पाठविलें, तेव्हां त्यास तें फार आवडलें व त्यानें तीस उत्तरीं असें लिहिलें:—"वृद्धवयाला अनुरूप जशीं दुःखें आहेत, तशीं सुखेंहि आहेत; आणि सुखांमध्यें तुम्हीं पाठविलेल्या मानपत्रांतील अभिनन्दनपर शब्द हे मोडतात. आपल्या कल्पनांचा विस्तार करण्यांत ज्यांनीं आपलें आयुष्य खर्चिलें आहे, अशा पुष्कळांना त्या कल्पना लोकांना पसंत पडलेल्या समजण्याचें समाधान प्राप्त झालेलें नाहीं. त्यांच्या कल्पनांची किंमत लोकांच्या लक्ष्यांत त्यांच्या मरणानन्तरच आली. मी ह्या बाबतींत ज्यास्त

भाग्यवान् आहें, आणि माझें काम पुरें करण्याइतका दीर्घ काल मी जगलों असून, त्याचा कांहीं परिणाम झाला आहे असें पाहण्याइतकाहि जगलों आहें. तुमचे ममतेचे शब्द आणि (मजविषयीं) सदिच्छाप्रदर्शन, ह्याबद्दल मी (तुमचा) आभारी आहें. "

दक्षिण आफ्रिकेंतील युद्ध व तें करण्यास लावणारें धोरण ह्यामुळें त्याच्या मनाचा किती उत्क्षोभ झाला होता हें तो जें पुस्तक लिहीत होता त्यावरून स्पष्ट दिसतें. कदाचित् त्याच्या सगळ्या आयुष्यांत दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें त्याच्या मनाची इतकी खोल चलबिचल झाली नसेल. " माझ्या देशाची मला लाज वाटते " असें तो आतां वारंवार म्हणूं लागला. आपल्या देशाला ही स्थिति आणण्यास टोरीपक्षाप्रमाणें लिबरल पक्षहि कारण झालेला आहे असें त्याचें मत होतें. ह्या व इतर कारणांवरून परातिक्रमणाविरुद्ध स्थापिलेल्या लिबरल लोकांच्या सभेला जाऊन मिळण्याचें त्यानें नाकारिलें, आणि तशी विनंती करणारांस (ता० २६ जुलई १९००) असें लिहिलें:---" हल्लीं ज्यांस लिबरल म्हणतात त्यांच्यामध्यें माझी गणना करून घेण्यास मी इच्छीत नाहीं. ज्या काळीं हें नांव प्रथम प्रचारांत आलें, त्या काळीं लिबरल लोक सरकारच्या सत्तेविरुद्ध व्यक्तीचें स्वातंत्र्य वाढविणारे असत; पण हल्लीं (लोककल्याणाच्या इच्छेनें जरी ते प्रेरित आहेत तरी) सामान्यतः ते सरकारची सत्ता सारखी वाढवीत आहेत, व व्यक्तिस्वातंत्र्य आकुंचित करीत आहेत. ह्या धोरणाचा मीं सर्वत्र आणि सर्वकाळ निषेध केलेला आहे, आणि म्हणून त्या मतापासून मी माघार खाल्लेली आहे असें अनुमान लोक काढितील अशी कोणतीहि गोष्ट मला आतां करतां येत नाहीं. "

बरें, लिबरल पक्षांतून जे निघाले होते अशा लिबरल युनिअनिस्टांनाहि जाऊन मिळण्याची त्यास इच्छा नव्हती. उदाहरणार्थ,

१९०१ च्या जून महिन्यांत त्यानें लंदनांतील एका पत्राच्या संपादकास पुढील मजकूर लिहिण्यास आपल्या सेक्रेटरीस सांगितलें:— " लिबरल युनिअनिस्ट जेव्हां लिबरल पक्षांतून निघाले तेव्हां ते अश्रान्त रीतीनें असें सांगत असत कीं, होमरूलचा प्रश्न खेरीज करून बाकीच्या सर्व बाबतींत आह्मी लिबरलच आहों; आणि त्या प्रश्नाचें जोंपावेतों प्राधान्य होतें तोंपावेतों त्या नांवास (" लिबरल युनिअनिस्ट " ह्या नांवास) चिकटून राहण्याचा त्यांस हक्क होता. पण त्यानंतर वस्तुथिति बदलली आहे, आणि 'युनिअनिस्ट' म्हणून राहण्यास त्यांस कारण राहिलेलें नाहीं..... हल्लीं त्यांच्यांत व लिबरल पक्षांत कांहीं साम्य नाहीं, आणि टोरी पक्षाशीं त्यांचें पूर्ण साम्य आहे. तर मग त्यांस नेहमींच कान्सर्व्हेटिव्ह किंवा टोरी म्हणून कां म्हणूं नये ? "

ता० १६ आगस्ट १९०० रोजीं त्यानें मान्क्यूर कॉन्वे यास असें लिहिलें:—" मानवी मत व मनोविकार ह्यांच्या लाटा किनाऱ्यास जाऊन आदळल्याविना त्यांस आळा घालतां येत नाहीं. मी पूर्वतर वयांत समजत होतों त्याप्रमाणें तूंहि (हल्लीं) असें समजतोससें दिसतें कीं, माणसें हीं विचारवंत प्राणी आहेत, आणि एकादी गोष्ट त्यांस सिद्ध करून दाखविली म्हणजे त्यांची खात्री होईल. पण सर्व पुरावा ह्याच्या उलट आहे. माणूस हा बळकट मनोविकारांचा जुडगा असून ते मनोविकार प्रत्येकीं, आपली तृप्ति करून घेण्यासाठीं त्याच्या बुद्धीचा उपयोग करीत असतात, आणि त्याचा परिणाम काय व्हावयाचा हें, कोणते मनोविकार (त्यावेळीं) प्रबल आहेत ह्यावर सर्व काळीं व सर्व स्थळीं अवलंबून राहतें. ज्या शक्तींच्या व मनोभावनांच्या योगानें माणसें मानवी प्राणी म्हणून ओळखिलीं जातात त्यांच्यापेक्षां ज्या ज्या शक्ती व भावना इतर प्राण्यांमध्यें असून त्यांच्यामध्येंहि आहेत त्यांच्याबद्दल गत-

पिढीपेक्षां हल्लींची पिढी ज्यास्त फुशारकी मारिते, म्हणजे आपण बुलडॉग कुत्र्यासारखे शक्य तितके झालों आहों, ह्याची हल्लींच्या पिढीस प्रौढी वाटते."

याचसंबंधानें ता० ९ सप्टंबर १९०१ रोजीं तो विल्फ्रिड ब्लंट यास लिहितो:—" ही भयंकर वस्तुस्थिति केव्हां संपणार ? पैशाची चांगलीच उणीव उत्पन्न होईल अशी मी अशा करितों, कारण युद्धानुकूल पक्षाच्या लोकांच्या पिशवीला धक्का बसण्याखेरीज दुसऱ्या कशानें त्यांचे डोळे उघडावयाचे नाहींत."

ह्याच सुमारास त्यानें लंदनांतील एका वर्तमान पत्राच्या संपादकाला प्रकाशनाकरितां नव्हे तर सूचनार्थ, असें लिहिलें:—" जमेका प्रकरणांत (हें प्रकरण पन्नास वर्षांपूर्वींचें होतें) आयर गव्हर्नराविरुद्ध चीफ जस्टिस कॉकबर्न यानें ज्यूरीला खटला समजावून सांगतांना जें म्हटलें, त्यांतलें एक कलम उतरून घेतल्यानें, दक्षिण आफ्रिकेंत आह्मीं जें करीत आहों त्याविरुद्ध एक चांगली कोटि लढवतां येणार आहे. त्या त्याच्या भाषणांत त्यानें जोरानें असें प्रतिपादिलें कीं, ' इंग्लिश राज्यपद्धति लष्करी कायदा म्हणून कांहींच ओळखीत नाहीं ' आणि असें म्हटलें होतें कीं, ' लष्करी कायद्याला स्वतंत्र आधार मुळींच नाहीं, तर जेव्हां कायद्याचें रक्षण करण्याचें नेहमींचें साधन पंगू होतें तेव्हांच तो कायदा अमलांत येतो; म्हणजे, वास्तविकरीत्या तो सामान्य कायद्याचा सशस्त्र नोकर आहे, आणि त्याचे हुकूम अमलांत आणण्यास नेहमींचा नोकर जेव्हां दुर्बल होतो, तेव्हां त्यांस बोलवीत असतात. माझ्या मतें ह्या त्याच्या म्हणण्यावर नेहमीं जोर देत रहावें."

ह्या सूचनेसंबंधानें ता० १० नवंबर १९०१ रोजीं तो मोर्ले साहेबास लिहितो:—" कांहीं दिवसांपूर्वीं पाठविलेल्या एका पत्राची मी तुला नक्कल सोबत पाठवितों; त्याचा उद्दिष्ट परिणाम झाला

नाहीं. तुला ती पाठविण्याचें कारण हें कीं, परवां तूं आपल्या एका भाषणांत लष्करी कायद्याच्या प्रश्नावर दुसऱ्या एका नामांकित कायदेपंडिताचा (क्यांबेलचा) उतारा दिला होतास; आणि पार्लमेंताच्या पुढच्या सेशनांत हा प्रश्न पार्लमेंतापुढें आणण्याचा तुझा विचार आहे असें मी ऐकतों; तसें जर असेल, तर क्यांबेलच्या मतास कॉकबर्नच्या मताचा दुजोरा देणें इष्ट होईल..... लष्करी कायद्याचा योग्य अर्थ ध्यानांत घेतां, जेव्हां पोलीस कमकुवत ठरतें, तेव्हां फौजेस बोलावणें आणि तिचें कडक शासन सुरू करणें ह्यापेक्षां त्याचा ज्यास्त अर्थ नाहीं; ही सर्व गोष्ट दिवाणी सत्तेच्या हुकमाखालीं होत असते, आणि त्या सत्तेनें आपला हुकूम रद्द केला म्हणजे ती बंद होते. "

' बुकमन ' नामक प्रसिद्ध वाङ्मयात्मक मासिकाच्या १९०१ च्या जानेवारीच्या अंकांत प्रो० नाइट यांचें स्पेन्सरवर आर्टिकल आलें, व तें त्यास फार आवडलें. त्याचा एकाहून अधिक बाबतींत मतभेद असल्यामुळें त्या आर्टिकलांतील सहानुभूतिपर व गुणाभिज्ञापर उद्गार त्यास ज्यास्तच मौल्यवान् वाटले, आणि त्यानें त्यास असें लिहिलें:—" (इतरत्र जरी नाहीं तरी) इंग्लंदांत (माझ्या तत्त्वमीमांसेच्या) पसंतीचे प्रादुर्भाव सामान्यतः इतके अळमळीत झालेले आहेत कीं, तूं दर्शविलेली पसंती अपवादरूप असल्यामुळें मला फार आनंद होतो. " याच वर्षाच्या (१९०१) मे महिन्यांत ब्रँटसीरो नामक एका इरोकॉइस [एक रानटी जात] माणसानें मोहॉक भाषेंत त्याच्या ' शिक्षण ' नामक ग्रंथाचें भाषान्तर करण्याची परवानगी मागितली, तेव्हां त्यास फार संतोष वाटला. तद्वतच ता० १८ मेच्या ' ब्लॅक ॲण्ड व्हाइट ' नामक सचित्र मासिकांत " व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींतील शेवटचा मोठा माणूस " म्हणून जेव्हां त्याच्यावर एक लेख आला, तेव्हां त्यांत

प्रदर्शित केलेली खोल व मनापासूनची सहानुभूति त्यास समाधानकारक वाटली.

पण ह्या सालीं ह्या गोष्टी जर त्यास सुखकारक अशा झाल्या, तर त्याचे मित्र डा० विल्यम यूमन्स, मि० जॉन फिस्क, राबर्ट बुचानन, इत्यादिकांचे मृत्यू त्याच्या दुःखास कारण झाले.

त्याच्या 'घटित गोष्टी व टीका–' 'Facts & comments' ह्या नवीन व अखेरच्या ग्रंथाची प्रगति कशी चालली होती हें ता० १७ मे १९०१ रोजीं रॉबर्ट गिफेन ह्या प्रसिद्ध आंकडेपंडितास त्यानें लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसतें:—" दहा कोटी पौंड राष्ट्रीय खर्चाचा प्रत्येक उत्पादक–व्यक्तीवर जो बोजा पडतो, तो ठोकळ रीतीनें—अर्थात् फारच ठोकळ रीतीनें काम करण्याच्या दिवसांच्या रूपानें सांगतां येणें (तुला) शक्य आहे काय?..... जे हातांनीं काम करीत असतात, किंवा त्यांचें (हातांनीं काम करणारांचें) नियमन करीत असतात, आणि ज्यांच्यावर जादा कर बसविल्यानें जादा कामाचा बोजा पडतो, त्यांना ह्यामुळें वर्षांतून किती ज्यास्त दिवस काम करावें लागतें हें काढतां येणें शक्य असल्यास त्वां काढावें, असें माझ्या मनांत आलें आहे. १० कोटी पौंड खर्चाचा ह्या लोकांवर किती जादा दिवसांच्या कामाचा बोजा पडतो, हें मला (माझ्या नूतन ग्रंथांत) सांगावयाचें आहे."

ही माहिती सर राबर्टकडून आल्यानंतर तो त्यास ता० २० मे रोजीं लिहितो:—" तुझी चिठी व टिपण ह्यांबद्दल मी तुझा फार आभारी आहें. त्यांत मला पाहिजे होती ती सर्व माहिती आहे. माझ्या कोटिक्रमाला ठोकळ अंदाजापलीकडे कांहीं शक्य नाहीं किंवा आवश्यकहि नाहीं. त्या कोटिक्रमाचा उद्देश असें दाखविण्याचा आहे कीं, इतिहासांतील सर्व उदाहरणांतल्याप्रमाणें, जे लोक इतर लोकांना गुलाम करितात ते स्वतः गुलाम बनतात."

ता० १९ जून १९०१ रोजीं तो मुख्य प्रधान मि० बाल्फोर यास लिहितो:—" कापीराइटचें बिल सोडून देण्याचा विचार तूं केला आहेस असें प्रसिद्ध झालें आहेसें मला वाटतें. १८७७ सालीं जें रॉयल कमिशन बसलें होतें त्यापुढें मीं साक्ष दिल्याला आज २४ वर्षें झालीं; आणि त्या कमिशननें ठरविलेल्या शिफारशींपैकीं एक ही होती कीं, हल्लीं कापीराइट आहे त्या ऐवजीं तो ग्रंथकाराच्या हयातींत व मरणोत्तर तीस वर्षें, असावा; आणि मला वाटतें नुकत्याच बसलेल्या कमिशनच्या रिपोर्टांत ही शिफारस बरोबर म्हणून म्हटलेली आहे, जरी ती हल्लीं पार्लमेंतापुढें असलेल्या बिलांत गाळलेली आहे. कापीराइटसंबंधी सर्व बारीक गोष्टींचा विचार ह्यापुढें करण्याचें ठरवून, त्याची कालमर्यादा तेवढी वाढविण्यासाठीं एक लहानसें बिल पुढें आणणें शक्य आहे किंवा नाहीं ? कुटुंबवान् गरजू ग्रंथकारांना ही गोष्ट फार महत्वाची आहे, कारण त्यांनीं आपल्या मुलांची चांगली तरतूद करून ठेवावयाची किंवा अल्प ठेवावयाची ह्याच्या संबंधाचा हा पुष्कळ अंशीं प्रश्न आहे.

मला ही गोष्ट खाजगी हिताहिताची नसून सार्वजनिक हिताची आहे. (कारण हा अविवाहित असून अर्थात् यास संतति नव्हती.) मी आपली मत्ता माझ्या मरणानंतर " वर्णनात्मक समाजशास्त्र " पुढें चालविण्याच्या कामाला लावून दिली आहे. ह्या कामाला जें उत्पन्न उपयोगीं पडणार त्याचाच माझ्या ग्रंथाचें उत्पन्न हा एक भाग होईल. हल्लींच्या कायद्याप्रमाणें ह्या उत्पन्नाचा बराचसा भाग माझ्या मरणोत्तर सात वर्षांनीं नाहींसा होईल. पण कापीराटचा हल्लींचा मुदतीचा कायदा बदलावा अशाविषयीं उत्सुक होण्यास मला आणखी एक कारण आहे. तें हें कीं, ज्या माझ्या ग्रंथांच्या पूर्ण आवृत्तींचा कापीराइट अस्तित्वांत असून अपूर्ण आवृत्तींचा संपला असेल, त्यांच्या त्या अपूर्ण आवृत्ती मरणोत्तर सात वर्षांनीं पाहिजे

त्यास करतां येतील..... ही गोष्ट मला अत्यन्त अनिष्ट वाटते. "

ता० १ जुलई १९०१ रोजीं प्रसिद्ध शिक्षणपंडित सर जोशुआ फिच ह्यास तो लिहितो:—"मी कांहीं लिहीत आहें त्यांत सर्व प्रकारच्या आमच्या शिक्षणसंस्थांत ज्या अनेक तऱ्हांनीं युद्धशील धोरण (म्हणजे लष्करी शासन, लष्करी शिक्षण इत्यादि) शिरत आहे, त्यांचें थोडक्यांत कथन करावयाचें आहे. तद्वतच, शिकविण्यांत एकीकरणाचा कल कसा वाढत आहे हेंहि मला दाखवावयाचें आहे. वैद्यकीच्या धंद्यांत परीक्षेची कांहीं सर्वत्र सारखी पद्धति सुरू करावी एतदर्थ कांहीं वर्षांपूर्वीं चळवळ होऊन तो कल व्यक्त झाला होता; पण पुढें त्या चळवळीचें काय झालें न कळे. तसेंच हल्लींच्या प्रधानमंडळाचें शिक्षणविषयक बिल जरी तत्पुरतें गाळलेलें आहे, तरी त्याच पद्धतीचें आहे, कारण शिक्षणाची स्कूलबोर्डाकडे व्यवस्था असल्यानें (शिक्षणपद्धतींत) जें थोडेंसें वैविध्य होतें, तेंहि त्यांत काढून घेतलेलें आहे. शिवाय जिकडे तिकडे, बहुतेक सर्वत्र, उपाध्यांचें अंग प्रविष्ट करून हें एकीकरण करण्याचा आणखी प्रयत्न होत आहे. खाजगी शाळांचा ज्यास्त ज्यास्त तोटा केल्यामुळें त्याहि बुडावयाच्या बेतांत येत आहेत, आणि त्याचाहि परिणाम हें एकीकरण ज्यास्त करणें हा होणार आहे. शिवाय, सार्वजनिक शाळांच्या (ह्या वस्तुतः श्रीमंतांच्या खाजगी शाळा आहेत.) हेडमास्तरांची सभा कांहीं दिवसांपूर्वीं भरली होती, आणि तेथें आपणांस एकप्रकारच्या सरकारी निमंत्रणाखालीं घालावें, असा कांहीं अर्ज करण्यांत आला. ह्याचाहि कल अर्थात् एकीकरणाकडे आहे. रेजिमेंटी व्यवस्था सुरू करण्याचा जो हा सार्वत्रिक कल त्याचीं उदाहरणें (नूतन ग्रंथांत) देण्याची माझी इच्छा आहे. "

हें पत्र पेटवर्थ एथून लिहिलेलें असून तेथून सपटंबरच्या प्रारंभीं

तो ब्रायटन एथें आला, आणि तेथें त्याला इतकी ज्यास्त शक्ति वाटूं लागली कीं, त्यानें लंडनमध्यें एक पंध्रवडा येऊन राहण्याचा विचार केला, पण त्याप्रमाणें करण्यास त्यास धीर झाला नाहीं.

सर जोसेफ हूकर, लॉर्ड एव्हबरी आणि स्पेन्सर एवढेच ' एक्स ' क्लबाचे सभासद आतां शिल्लक राहिले होते. पण ते आतां क्वचितच एकत्र जमत असत. प्रसंगवशात् त्यांचा पत्रव्यवहार मात्र होई. उदाहरणार्थ, ता० १६ नवंबर १९०१ रोजीं स्पेन्सर हूकर यास लिहितोः—" आमच्यामध्यें कोणताहि पत्रव्यहार झाल्यास पुष्कळ काळ लोटला आहे; मला वाटतें, दीड वर्ष झालें आहे. विनाकारण पत्रें लिहीत बसणें तुझ्या वयांत, आणि माझ्याहि वयांत, टाळणेंच इष्ट आहे; तथापि अनिवार्याशीं (वृद्धपणाशीं) चाललेल्या तुझ्या कलहांत तुझें कसें काय चाललें आहे, ह्याबद्दल तुझ्याकडून चार ओळी याव्या अशी माझी इच्छा आहे.....मी रोज गाडींत बसून जात असतों. आणि साधारणपणें बरेंच काम करीत असतों. "

सर जोसेफ हूकरनें उत्तरामध्यें असें म्हटलें कीं, " माझ्या जीवितावर तुझी मोठी पकड बसलेली आहे, व अद्यापिहि बसत आहे. " ह्यावरून त्यांच्यामधील स्नेहबंध किती बळकट होता हें स्पष्ट दिसतें.

संशयवाद्यानें धर्मावर विश्वास ठेवणाऱ्यांना काय सांगावें ह्या प्रश्नाचें नवीन ग्रंथांत उत्तर देण्याचा तो यत्न करीत होता, त्यासंबंधानें त्यानें मिसेस सिडने वेब हीस ता० १४ फेब्रुवारी १९०२ रोजीं लिहिलें:—" तुला पत्र लिहिण्यांत माझा मुख्य हेतु असें विचारण्याचा आहे कीं, तुझ्या धर्मविषयक दृढसमजामुळें-तुझ्या मनांत नरकासंबंधानें जे विचार (लहानपणीं) बिंबविलेले होते त्यामुळें—तुझ्या लहान वयांत तुला वरचेवर फार दुःख वाटत असे असें तूं मला एकदां सांगितलें होतेंस किंवा नाहीं ? आणि हें तुला वि-

चारण्याचें कारण असें आहे कीं, अज्ञेयवाद्याला इतरांशीं बोलतांना जी अडचण पडते, म्हणजे त्यांचे दृढसमज बदलण्याचा यत्न केव्हां करावा व केव्हां करूं नये ह्यासंबंधानें जी अडचण त्यास उत्पन्न होते, तिजवर मी चार शब्द लवकरच लिहिणार आहें. ह्यासंबंधाचीं नानाप्रकारचीं उदाहरणें असतात, आणि माझ्या मनांत प्रत्येक प्रकाराबद्दल थोडें थोडें सांगावयाचें आहे. मला वाटतें, धर्मविषयक बरीच निराशा आणि अनल्प वेड (धर्मनिष्ठांमध्यें) दृष्टीस पडत असतात, आणि दुसऱ्या पक्षाच्या (धर्मविहीन पक्षाच्या) विरुद्ध जें कांहीं म्हणत असतात, त्याविरुद्ध हें सर्व (धर्मनिष्ठांच्या बाजूचें) अनिष्ट दाखविण्यासारखें आहे. "

त्याचा हा ग्रंथ लंदन व न्यूयार्क एथें ता० २९ एप्रिल १९०२ रोजीं प्रसिद्ध झाला. त्याची एक प्रत प्रो० आलेक्झांडर बेन ह्यास त्याच तारखेस पाठविण्याची व्यवस्था करून त्यास तो लिहितो:—
" (तुझ्याकडचें) एकादें पत्र पकडण्याच्या आशेनें मी आपल्या गळास एका पुस्तकाचें आमिष लावीत आहें. ' घटित गोष्टी व टीका ' ह्याची प्रत तुला (आधींच) मिळाली असेल किंवा लवकरच मिळेल; तो माझा शेवटचा ग्रंथ असून तो ह्या दोन वर्षांत, रोजच्या दहा ओळी, ह्याप्रमाणें मीं लिहिला आहे. डंकन हा येथें भेटावयास येतो तेव्हां तुझी हकीगत सांगतो, त्याखेरीज आज पुष्कळ दिवस तुझा मुळींच समाचार मला कळलेला नाहीं. मला वाटतें कीं, तूंहि माझ्यासारखा पुष्कळ अशक्त झाला आहेस, पण अद्यापि दररोज गाडींतून जाऊं शकतोस. दुर्दैवानें मला तसें करतां येत नाहींसें झालें आहे. ' माइंड ' मासिकाची जी स्थिति झाली आहे ती पाहून तुला किती तिटकारा उत्पन्न होत असेल, ह्याचा विचार वरचेवर माझ्या मनांत येतो. त्याची स्थापना करून तूं स्वताच्या खर्चानें इतके दिवस तें चालविलेलें असतां, आतां तें जर्मन कल्पना-

वाद्यांचें मतप्रकाशक बनावें, हें पाहून तुला अत्यन्त चीड येत असली पाहिजे.....ह्या प्राचीन वेडानें (जर्मन तत्त्वज्ञानानें) आक्सफर्ड व केंब्रिज घेरून टाकिलीं आहेत. स्काटलंदविषयीं काय ? मला वाटतें, हेजेलचें (जर्मन तत्त्ववेत्त्याचें) हें मत तेथेंहि फार पसरलें आहे."

दुसऱ्या दिवशीं प्रो० मेसन यास त्यानें त्याच धर्तीवर असें लिहिलें:—" मला वाटतें, आक्सफर्ड व केम्ब्रिजप्रमाणें एडिंबरो एथेंहि हेजेलचें मत जोरांत आहे. इतर सर्व गोष्टींप्रमाणें तत्त्वज्ञानविषयक व इतर मतांना जीं अनिवार्य आंदोलनें उत्पन्न होत असतात, त्यांतील हें एक आहे. पण आमचा हा हेजेलमताभिमान, किंवा इंग्लंदचा जर्मन कल्पनावाद, वास्तविकरीत्या ज्यास रूढ धर्ममत म्हणून म्हणतात, त्याचें अखेरचें आश्रयस्थान होय. मीं कोठेंसें म्हटलें आहे त्याप्रमाणें अविश्वसनीय धर्ममतांना अकल्पनीय सिद्धांतांपेक्षां अधिक चांगला आश्रय कोणता मिळूं शकणार आहे ? "

ह्याच्या अगोदरच्याच दिजंबरांत त्यानें त्या मासिकाची वर्गणी बंद केली होती, व त्यासंबंधानें त्याच्या संपादकास पाठविलेल्या पत्रांत असें म्हटलें होतें:—" माझ्या मतांच्या अगदीं इतक्या विरुद्ध मतांचें प्रदर्शन करण्याकडे जें मासिक इतक्या पुष्कळ प्रमाणावर उपयोगिलें जात आहे, तें जगण्याच्या कामीं मीं मदत करावी अशी (तुम्हांस) अपेक्षाच करतां येत नाहीं. "

त्याच्या ८२ व्या वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदरच त्याचा शेवटचा ग्रंथ प्रसिद्ध झाला असल्यामुळें, त्या दिवसानिमित्त दरवर्षीं होणाऱ्या त्याच्या अभिनन्दनास ह्या वेळीं ज्यास्त जोर आला. उदाहरणार्थ, प्रो० हॉबहौसनें त्यास या प्रसंगीं असें लिहिलें:—" जरी, अरेरे ! चालू पिढी विक्षिप्त बनली आहे; आणि तुझ्या चांगल्या बियाण्यांतील कांहीं हवेंतील पक्ष्यांनीं खाऊन फस्त केलें आहे; आणि कांहीं नापीक खडकावर पडलें आहे; आणि काट्यांनीं दाबून

टाकिलें आहे; तरी त्यांतील पुष्कळ बीं चांगल्या जमिनीवर पडलें आहे, आणि त्यानें पुष्कळपट पीक उत्पन्न केलें आहे, आणि ज्यास्त अनुकूल ऋतूंत ह्याहूनहि ज्यास्त पीक उत्पन्न करील. "

यावर त्यास ता० ४ मे १९०२ रोजीं तो लिहितो:—" मी फार मनःपूर्वक सांगू शकतों कीं, माझ्या ८२ व्या वाढदिवसाच्या प्रसंगीं जीं पुष्कळ अभिनन्दनें मला आलीं, त्यांमध्यें तुझ्या अभिनन्दनाइतकें युक्त, आणि म्हणून इतकें आनंददायक, असें दुसरें कोणतेंच अभिनन्दन आलें नाहीं. व त्याबद्दल मी तुझे आभार मानितों. तूं म्हणतोस त्याप्रमाणें, मी ८२ वर्षें जगलों ही गोष्ट आनंद मानण्यासारखी आहे किंवा नाहीं ह्याबद्दल शंकाच आहे; पण अर्धशतकांपूर्वीं जें काम मीं मनांत योजिलें आणि लवकरच निश्चितपणें सुरू केलें, तें पुरें करण्याइतका मी जगलों, हें मला आनंदाचें कारण आहे, असें जें तूं म्हटलें आहेस, त्यांत तूं माझा मनोभाव पूर्णपणें व्यक्त केला आहेस.

फार महत्त्वाचे नव्हत असे माझे कांहीं अल्प उद्देश अद्यापि अपूरित राहिले आहेत; पण ते एकीकडे ठेवतां, जें करण्याचें मीं (अनेक वर्षांपूर्वीं) ठरविलें तें केल्याचें समाधान मला प्राप्त झालें आहे; मला वाटतें, हें समाधान दुर्मीळ आहे, आणि तुझ्या सहानुभूतीचें हें निदर्शक (पत्र) आल्यानें त्यांत (त्या समाधानांत) भर पडली आहे. तूं देखील अशा उद्देशसिद्धीसाठीं श्रम करीत आहेस कीं, तींत तुला प्रस्तुत वस्तुक्रम अडथळा करीत आहे; आणि आपण दोघांनींहि, ज्या दूरतरकालीं आतां केलेल्या सुयत्नांचे अत्यन्त अल्प तरी, कांहीं परिणाम उत्पन्न होतील, अशा कालाचें चिन्तन करून, स्वसमाधान करून घेतलें पाहिजे. "

एका पाकिटांत आपल्या केसांचा एक झुबका घालून त्यांत त्यानें पुढील टिपण घालून ठेविलें आहे:—" माझ्या ८२ व्या वाढदिवशीं

कापलेल्या माझ्या केंसांवर त्यांचा मूळचा कांहीं रंग अद्यापि कायम आहे. हें मी चष्म्याखेरीज, आणि चष्म्याची मुळींच जरूर न भासतां लिहीत आहें. "

प्रकरण सत्ताविसावें

त्याचे अखेरचे दिवस

" घटित गोष्टी व टीका " हा त्याचा शेवटचाच ग्रंथ होय असें निश्चितपणें प्रसिद्ध झालें होतें. ह्यामुळें आणि त्यांतील विषयवैविध्यामुळें व मतविरोध होईल अशा प्रतिपादनामुळें त्याजकडे लोकांचें नेहमींहून ज्यास्त लक्ष गेलें. प्रो० मेसननें त्यास असें लिहिलें कीं, " तें फारच वाचनीय व चित्ताकर्षक आहे; तथापि त्यांपैकीं पुष्कळ मतविरोध चेतविणारें असून त्याच्याविरुद्ध पुष्कळजण आपलें मत खचीत प्रदर्शित करतील. मुख्यत्वेंकरून युद्धविषयक प्रश्न आणि इतर प्रस्तुतकालिक प्रश्न ह्यांना अनुलक्षून मी हें म्हणतों. ह्या बाजूच्या संबंधानें कोठें कोठें मी विरुद्ध मतवाल्यांपैकीं आहें ह्याबद्दल, मला खात्री आहे कीं, तुला फारसा त्रास होणार नाहीं. " युद्धाच्या संबंधानें सर जोसेफ हूकर मतविरोध्यांपैकीं, किंवा कांहीं अंशीं त्यांच्यापैकीं, होता. प्रो० बेनचें असें मत पडलें कीं, विलक्षण बुद्धीचीं माणसें सरकारी धर्मखात्यांतच केवळ उत्पन्न होतात हें माथ्यू आर्नोल्डचें अयुक्तिक विधान खोडून टाकण्याचें जें त्यांत काम केलें आहे, तें योग्य व महत्त्वाचें आहे. ' टाइम्स'चें असें मत पडलें कीं, जोरदार, संमाननीय, व सुसंगत अशा कामाची जरी

ती (ह्या ग्रंथ) पूर्तता आहे, तरी त्यांत सारखी अहंपणाची छटा दिसत आहे, व ती क्षम्य म्हणतां येत नाहीं इतकी ठळक आहे. " वंशपरंपरा उपयोगसंक्राति ह्या विषयावर कांहीं प्रकाश " ह्या त्या ग्रंथांतील निबंधासंबंधानें त्या पत्रानें असें म्हटलें कीं, " त्यांत विपुल व योग्य अशा दृष्टान्तांची जादू भरलेली आहे, जिच्यांत स्पेन्सरवर कोणीं कधींच कडी केलेली नाहीं. " आणखी असें म्हटलें कीं, ज्यानें आपल्या पिढीवर खोल प्रभाव पाडिला आहे, त्याचे अगदीं आलीकडील शब्द मोजलेले, शांत, सम, आणि शांतियुक्त असते, तर ती गोष्ट आह्मांस विशेष आवडली असती. ह्या निबंधांपैकीं कांहींत हे गुण दिसत आहेत.....पण ह्या ग्रंथांतील पुष्कळच निबंधांत खाष्टपणाची तान व्यक्त होत आहे. " " कांहीं अमेरिकन भाषणसंप्रदाय " या त्या ग्रंथांतील निबंधाकडे युनैटेड स्टेट्स्मधील वाचकांचें सहजच विशेष लक्ष्य गेलें; आणि इंग्लंदांत इंग्लिश भाषेंत जे कांहीं अपभ्रंश शिरले आहेत ते चवाठ्यावर आणण्याबद्दल त्या निबंधाच्या शेवटच्या रकान्यांत स्पेन्सरनें केलेलें आव्हान त्यांनीं मोठ्या खुषीनें मान्य केलें. यूरोपांतील इतर देशांतून या ग्रंथाला नेहमींहून ज्यास्त मागणी आली, व त्यास एक कारण दक्षिण आफ्रिकेंतील युद्धाचा त्यांत केलेला निषेध हें होतें. कारण ह्या वेळेस इंग्लंड यूरोपांत सामान्यतः नावडतें झालें होतें. फ्रान्सांत तें पुस्तक इतकें प्रिय झालें कीं, त्याचीं तीन भाषान्तरें तेथें तयार झालीं. जर्मनीमध्यें एकाहून अधिक भाषान्तरें तयार झालीं. पण तेथें त्या सगळ्या ग्रंथांचें भाषान्तर न करतां त्यांतील कांहीं निवडक निबंधांचें व " नानाविध कुटके " (Various Fragments) ह्या ग्रंथांतील कांहींचें एकत्र करून छापिलें. इतालियन भाषेंत त्याचा तर्जुमा होतो किंवा नाहीं ह्याबद्दल एकवेळ शंका उत्पन्न झाली, कारण तेथील प्रकाशक ग्रंथकारांच्या हक्काकडे नेहमीं दुर्लक्ष्य करीत हें स्पे-

न्सरला आवडत नव्हतें. त्यास नफ्याची काळजी नव्हती, कारण त्या भाषान्तरापासून आपल्यास मिळणारा वांटा भाषान्तरकारास द्यावयास तो तयार झाला. रशियांत पुष्कळ वर्षें त्याच्या ग्रंथाचीं भाषान्तरें सर्वांत अगोदर होत होतीं, पण आलीकडे तो सर्व मनु बदलला होता; कारण रशियन अधिकाऱ्यांस त्याच्या पुस्तकांचा संशय येऊं लागला होता. ह्यासंबंधानें त्यांच्या अज्ञानाचें व चुकीचें 'टाइम्स' नें ता० २८ जुलई १९०३ च्या अंकांत चांगलें प्रदर्शन केलें. तेथील विश्वाविद्यालयांतील परीक्षेस बसणाऱ्या एका १९ वर्षांच्या उमेदवाराच्या बगलेंत 'समाजशास्त्रा'ची एक प्रत रस्त्यांत सांपडल्यामुळें त्याच्यावर सोश्यालिस्ट असल्याचा आरोप तेथील अधिकाऱ्यांनीं आणिला ! असें होतें तरी, फ्रेंच किंवा जर्मन भाषेंत हा ग्रंथ प्रसिद्ध होण्याच्या अगोदरच रशियन भाषेंत प्रसिद्ध झाला.

१९०२ च्या मे महिन्यांत तो ब्रायटन शहर सोडून खेडेगांवांत कांहीं दिवस रहावयास शेवटचा गेला. ह्या वेळीं तो सरे प्रांतांत ओकले मुक्कामीं गेला होता. ह्या त्याच्या फेरीपासून त्यास फार सुख झालें. तेथें गाणारे पक्षी फार होते त्यामुळें त्यास विशेषच आनंद झाला. एकदां थोडा वेळ उन्ह पडलें असतां सोप्यांत बसून ह्या पक्ष्यांचें गाणें ऐकत असतां तो असें म्हणालाः—"गेल्या सहा महिन्यांत मी याचीच अपेक्षा करीत राहिलों होतों." पण ह्याप्रमाणें तो ब्रायटन एथें नसल्यामुळें, ज्या पोर्ट्स्मथच्या डोवेजर कौन्टेसशीं त्याचा आज पुष्कळ वर्षें पत्रव्यवहार झाला होता, तीस प्रत्यक्ष पहाण्याचा आलेला योग फुकट गेला. म्हणून त्यासंबंधानें ता० ६ जून १९०२ रोजीं तो तीस लिहितोः—"मी फार दुर्दैवी आहें. कांहीं वर्षांपूर्वीं तूं 'अव्हेन्यूरोड'वर (लंदनांत) मी रहात असतां तेथें मला भेटावयास आलीस, पण मी घरांत नव्हतों. आणि आतां तूं ब्रायटनला येणार असून तेथेंहि मी नाहींच.....ह्या

आकस्मिक योगाभावाचा मला फार राग येतो, कारण तूं मजवर इतकी माया करीत असल्यामुळें तुला भेटावें असें माझ्या मनांत फार होतें. मला भीति वाटते कीं, तुझी माझी भेट होण्याची ही अखेरचीच संधि म्यां गमविली आहे, कारण मी आतां ८२ वर्षांचा असल्यामुळें माझ्या हयातींत तूं पुनः ब्रायटनला येण्याचा संभव फारच अल्प आहे."

त्याच तारखेस मिसेस ब्रे ह्या दुसऱ्या एका वृद्ध बाईला तो लिहितो:—"तुझ्या ८२ व्या वर्षीं मला माझ्या ८३ व्या वर्षीं तुझ्या हातांत हात घालूं दे. एवढ्या वयाबद्दल तुझें अभिनन्दन न करतां, मी तुझ्या हातांत हात घालण्याचेंच बोलतों, कारण वार्धक्य वाढत चाललें म्हणजे त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुर्बलता व थकवे हीं अशीं कांहीं असतात कीं, तीं (आपण जिवंत राहून) चालू राहणें हें अभिनन्दनाचें कारण नसतें.....मी ह्या ठिकाणीं तीन आठवड्यापूर्वीं येण्याचें साधिलें; हें ठिकाण सर्व प्रकारें सुंदर आहे, आणि एकंदरींत ह्या फेरबदलानें माझा फायदा होत आहे."

ह्या वेळींहि त्याच्याकडे लेख, निबंध, वगैरेबद्दल पुष्कळ मागण्या येत असत, आणि त्या विशेषतः मरहूम सातवे एडवर्ड यांच्या राज्याभिषेकाची जी तयारी चालली होती त्याबद्दल येत होत्या. पण त्या अर्थात् त्यास नाकाराव्या लागत.

दक्षिण आफ्रिकेंतील युद्ध संपून आतां शांतता झाली होती, आणि लढाईचीं फळें भोगण्याचा प्रसंग आला होता. त्या युद्धांत ज्यांचें नुकसान झालें होतें—मग ते बूर असोत किंवा ब्रिटन असोत-त्यांच्याबद्दल सर्व पक्षांच्या लोकांच्या मनांत सहानुभूति उत्पन्न झाली. ज्यांचें सर्वांत ज्यास्त नुकसान झालें होतें त्यांपैकीं 'आरेंज रिव्हर फ्री स्टेट' या संस्थानाचा माजी प्रेसिडेंट स्टेन हा एक होता, कारण आपल्या राष्ट्राचें (आरेंज फ्री स्टेटचें) स्वातंत्र्य ब-

चावण्याच्या कामीं केलेल्या त्याच्या अकटोविकट प्रयत्नांमध्यें याचें धन व आरोग्य ह्या दोहोंचीहि पूर्ण रांगोळी झाली होती. म्हणून तो उत्तम डाक्टरला आपली प्रकृति दाखविण्याकरितां यूरोपाकडे जाण्यास निघाला असतां, त्याच्या इंग्लंदांतील हितचिंतकांनीं आपल्या सहानुभूतीचें व पसंतीचें कांहीं निदर्शन त्याजकडे पाठविण्याकरितां जी खटपट चालली होती तींत प्रमुखत्व पत्करण्याबद्दल त्याच्या वतीनें स्पेन्सरच्या एका मित्रानें त्यास विनंति केली. तेव्हां ही गोष्ट अगदीं खाजगी ठेवावी, आणि ही सूचना करणाऱ्या मित्रानेंच तत्संबंधी सर्व पत्रव्यवहार करावा, ह्या अटीवर तो ह्या विनंतीस मान्य झाला, आणि त्यांची सहानुभूतिप्रदर्शक देणगी मि० स्टेन ह्याजकडे पाठवितांना त्यास त्यानें (ता० २ आगस्ट १९०२ रोजीं) असें लिहिलें:—“ इंग्लंदांतलि थोड्या मित्रांनीं आपल्या सहानुभूतीचें व उन्नत पसंतीचें सोबतचें निदर्शक तुजकडे पाठविण्याचें द्वार होण्याचा मान मला दिला आहे. माझ्याप्रमाणें त्यांनाहि असें वाटतें कीं, जो पक्ष आपणास बरोबर वाटेल त्याची बाजू संभाळण्यांत तुझ्याहून ज्यास्त ठळक दृढनिश्चय दाखविलेला ऐतिहासिक व्यक्तींमध्यें कोणीच नसेल. सत्ता, मत्ता, आणि आरोग्य ह्यांच्या ज्या त्यागामुळें तूं हल्लीं भोगीत आहेस तशा प्रकारची अत्यन्त दुर्बलावस्था तुला प्राप्त झाली आहे, त्यावरून माणसांमध्यें क्वचितच आढळणारें असें शौर्य तुझ्या ठिकाणीं असलेलें व्यक्त होतें, हें कबूल करणें शत्रूंना देखील भाग पडलें पाहिजे. मग तुझ्या मित्रांस तसें वाटल्यास नवल नाहीं. म्हणून ही आपली समजूत आणि त्याबरोबरच उत्पन्न होणारी साश्चर्य पसंती हीं जोरदार रीतीनें व्यक्त करण्याकरितां त्यांच्या तुजबद्दलच्या मोठ्या कळकळीचें सोबतचें दर्शक स्वीकारण्याविषयीं ते तुला विनंती करीत आहेत, आणि त्याबरोबरच अशी आशा करीत

आहेत कीं, आस्था आणि सहानुभूतिपूर्ण मित्रांची शुश्रूषा ह्यांच्या-योगानें तुला अजूनहि बरें वाटूं लागेल."

मि. स्टेन ह्याचे प्रामाणिक उद्देश, व जें त्यास बरोबर म्हणून वाटलें तें करण्यांत त्यानें केलेला दीर्घ आत्मत्याग ह्यांची ही त्याच्या मित्रांना पटलेली साक्ष त्यास फार समाधानकारक वाटली हें सांगणें नलगे. शिवाय ही देणगी स्पेन्सरच्या द्वारा आल्यामुळें त्यास तिची अधिकच किंमत वाटली, कारण लढाई होण्याच्या फार अगोदर-पासूनच स्पेन्सरचें नांव दक्षिणआफ्रिकेंत फार पूज्य बनलेलें होतें.

बूर लोकांच्या मदतीसाठीं फंड गोळा करण्याचा बूट या वेळीं निघाला होता. तो अमुक ठिकाणीं भरावा अशी जाहिरात केव्हां येईल याची वाट स्पेन्सर पहात होता. ती लवकर प्रसिद्ध होत नाहीं असें पाहून त्यानें ता० २४ आक्टोबर १९०२ रोजीं जनरल बोथा यास असें लिहिलें:—" बूर दुःखनिवारणफंडाची इंग्लंडांत जी व्यवस्था चालली आहे ती पाहून मला फार आश्चर्य वाटलें आणि फार दुःखहि वाटलें. आमच्यांत अशी म्हण आहे कीं, " लो-खंड गरम असेल तोंपावेतों ठोका; " पण ह्या फंडासंबंधाचें धोरण पहातां, " तें थंड होई तोंपावेतों थांबा " अशा प्रकारचें दिसतें.

चेंबरलेनशीं तुझी मुलाखत झाल्यानंतर लगेच, तीन किंवा पांच जणांची कमिटी नेमून, कोणत्या ब्यांकेंत वर्गणी भरावयाची त्याब-द्दल जाहिरात तुम्हीं दिली असती तर ज्यांची मदत करण्याची इच्छा केवळ कालावधीमुळें बहुतेक थंड झाली आहे अशा पुष्कळांनीं व-र्गणी दिली असती. आतां दोन महिने निघून गेले आहेत, आणि सहानुभूति वाटणाऱ्या लोकांच्या हातून कांहीं प्रत्यक्ष कार्य होण्या-पूर्वीं त्यांच्या मनोवृत्ति तुम्हीं निवूं दिल्या आहेत.....माझ्या मतें ही सर्व गोष्ट अत्यन्त अव्यवस्थित रीतीनें केली गेली आहे. म्हणून मी विनंति करितों कीं, जेव्हां एकाद्या मंडळीस वर्गणी गोळा क-

रावयाची असेल तेव्हां ती जशी व्यवस्था करिते, तशी करा. ”

इतका महत्त्वाचा वेळ फुकट घालविल्याबद्दल जनरल बोथालाहि वाईट वाटलें. पण अगदीं नवीन परिस्थितींत तो व त्याच्या बरोबरचे दुसरे बूर प्रतिनिधी असल्यामुळें व ते या कामीं अनभ्यस्त असल्यामुळें, त्यांना त्यांच्या इंग्लिश मित्रांच्याच धोरणानें वागावें लागत होतें, व ते या दिरंगाईस कारण झाले होते.

‘ रॅशनालिस्ट प्रेस आसोसिएशन ’ नामक एका विचारवादी मंडळानें “ आदितत्त्वां”च्या पहिल्या भागाची स्वस्त आवृत्ति काढण्याबद्दल त्यास या सुमारास विनंति केली; पण त्यानें ती नाकारिली, व त्याबद्दलचीं, प्रसिद्ध समाजसुधारक जार्ज होलिओक यास ता० २६ आगष्ट १९०२ रोजीं लिहिलेल्या पुढील पत्रांत कारणें दिलीं. तें पत्र असें:—“ आदितत्त्वां”चा पहिला भाग पृथक् वाचिल्यानें दोन अनिष्टें उत्पन्न होण्याचा संभव उत्पन्न होतो:—“(१) जे त्यांतील मताच्या विरुद्ध आहेत ते दुसरा भाग पहिल्या भागाच्या आधारावर रचलेला आहे असें समजून तोहि आपल्या मतांविरुद्ध तितकाच आहे असें अनुमान करितात, आणि म्हणून त्यांच्यापुढें सगळा ग्रंथ असला, तरी ते पहिल्या भागापलीकडे जात नाहींत. असें होतें ह्याबद्दल मजपाशीं प्रत्यक्ष पुरावा आहे. (२) जे तो सहानुभूतिपूर्वक वाचितात त्यांच्याकडून अगदीं चुकीचें असें अनुमान काढिलें जाण्याचा संभव आहे कीं, संघटनात्मक तत्त्वमीमांसेचें सार पहिल्या भागांत आलेलें आहे, आणि म्हणून तो वाचिल्यावर पुढें वाचण्याची जरूरी नाहीं. ‘ ज्ञेय ’ ह्या मथाळ्याखालीं प्रतिपादिलेल्या सामान्य वस्तुसरणीपासून पृथक्रीत्या ‘ अज्ञेय ’ हा भाग वाचकांपुढें मांडण्यापासून अन्य प्रकारचें एक अनिष्ट होणार आहे. ज्यांस रूढ धर्ममत झुगारून द्यावेंसें वाटतें, आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेला खड्डा भरून काढण्यास स्वाभाविक वस्तुक्रमाचें ज्ञान

ज्यांस झालेलें नसतें, ते एकप्रकारच्या अस्थिर समतोलाच्या स्थितींत असतात, आणि ह्या किंवा त्या धर्मभोळ्या समजुतीप्रत, आणि बहुधा रोमन क्याथलिक धर्माप्रत, ते परत जाण्याचा संभव असतो. ह्याचीं दोन उदाहरणें मला स्वतः माहीत आहेत. "

ह्यानंतर एक दोन महिन्यांनीं ' शिक्षणा ' ची सहा पेनी किमतीची आवृत्ति काढण्यास त्यानें खुशीनें संमति दिली. सरकारच्या नियंत्रणांतून शिक्षण मुक्त करण्यासाठीं नार्दबर्लेंद एथें स्थापिलेल्या मंडळालाहि ' सोश्यल स्टॅटिक्स ' मधील " राष्ट्रीय शिक्षणा " वरील प्रकरण छापून काढण्याची त्यानें परवानगी दिली.

ह्या वर्षीं तो जो तीन महिनेपावेतों खेडेगांवांत राहिला तेवढ्या मुदतींत त्याचा निरनिराळ्या प्रकारचा पत्रव्यवहार किती झाला हें पहातां आश्चर्य वाटतें. कारण त्याचें दौर्बल्य वाढत चाललें असून शिवाय हा उन्हाळा इंग्लंदांत हिंवाळ्यासारखाच भासत होता. ह्या संबंधानें त्याचा सेक्रेटरी म्हणतोः—" ह्या वेळीं शारीरिक दृष्ट्या तो पिचत चालला आहे असें निःसंशय दिसत होतें, आणि मानसिक दृष्ट्याहि तो पिचत होता; पण मानसिक शक्तींचा क्षय शारीरिक दौर्बल्यापेक्षां कमी ठळक दिसत होता, कारण शारीरिक दौर्बल्य आतां झपाट्यानें वाढत चाललें होतें. "

फ्रेंच तत्त्वज्ञ रूसो ह्याच्या मतांशीं स्पेन्सरच्या कांहीं मतांचें साम्य असल्यामुळें, त्यानें मनुष्य, समाज व शिक्षण एतद्विषयक आपलीं कांहीं मतें त्याच्यापासून घेतलीं, असें कोणी कोणी ध्वनित करीत असत. म्हणून रूसोवरील आपलें पुस्तक स्पेन्सरला अर्पण करण्याची परवानगी जेव्हां हडसननें मागितली, तेव्हां ती नाकारतांना त्यानें त्यास (ता० ७ जानेवारी १९०३ रोजीं) असें लिहिलें:— " तुझ्या कोणत्याहि सूचनेला ' नाहीं ' म्हणावयाचें मला वाईट वाटतें, पण तुझें रूसोवरील पुस्तक मला अर्पण करण्यास तुला सं-

मति देतां येत नाहीं. ह्यास अनेक संलग्न कारणें आहेत. दहा बारा वर्षांपूर्वीं ' टाइम्स'मध्यें हक्स्लेशीं झालेला वादविवाद तुला कदाचित् आठवत असेल.....त्यानें आपल्या एका पत्रांत असें विधान केलें होतें कीं, मी आपलीं राजकीय मतें रूसोपासून घेतलीं आहेत. तूं म्हणतोस तशा प्रकारच्या अर्पणानें ह्या अगदीं निराधार विधानाचा पडताळा लोकांस मिळाल्यासारखा वाटण्यास मदत होईल. त्याचें मुख्य राजकीय तत्त्व, मला ऐकून माहीत आहे त्या दृष्टीनें पाहतां, मला अगदीं नाकबूल आहे. माणसें प्रारंभीं सम होतीं असें त्यानें प्रतिपादिलें आहे म्हणून म्हणतात. हें म्हणणें मला अयुक्तिक दिसतें, आणि माझ्या मनांत असला समज मुळींच अंतर्भूत होत नाहीं; आणि जीवनार्थ कलह, व योग्यतमाचा टिकाव हें जें उत्क्रान्तिमत त्याच्याशीं तो अगदीं विसंगत आहे. 'माणसांची समता ' हें तत्त्व मीं प्रतिपादिलेलें नाहीं, तर " परस्परसंबंधी मर्यादांमध्यें आपआपल्या शक्तींपासून होईल तितका फायदा करून घेण्याच्या माणसांच्या हक्काची समता " हें तत्त्व मीं नेहमीं प्रतिपादिलेलें आहे.....ह्या दोन समतांचा हक्स्लेनें गोंधळ केला, आणि तो गैरसमज पसरून दिला; म्हणून तो आणखी पसरूं नये अशी मला उत्कट इच्छा आहे. मी तुला अशी विनंति करितों कीं, तुला जर माझ्या मतांना उल्लेख करण्याचा प्रसंग आला, तर ह्या भेदावर मुद्दाम जोर दे. "

वार्धक्योत्पन्न दौर्बल्यें जरी त्याच्या ठिकाणीं वाढत चाललीं होतीं, तरी सार्वजनिक कामांविषयींची त्याची आस्था अद्यापि कायम राहिली होती हें फ्रेडरिक हारिसन यास ता० ५ मार्च १९०३ रोजीं लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसतें:—" सरकारी धर्मसंस्था काढून टाकण्याच्या व त्या संस्थेला लावून दिलेलीं उत्पन्नें काढून घेण्याच्या संबंधानें पुष्कळ वर्षांपूर्वीं भरलेली सभा तुला आठवत अ-

सेलच; त्या सभेमध्यें ज्यांचे प्रतिनिधि होते, (आणि ज्यांत चेंबर्लेनहि होता,) त्यांचे उद्देश समाविष्ट करणाऱ्या बिलाचे मथाळे तयार करण्याचें काम तुजकडे दिलें होतें. मी समजतों कीं, ह्या बिलाच्या मसुद्याची छापील प्रत तुजपाशीं आहे. तो प्रश्न पुनः पुढें येत आहे, आणि ब्रायटन एथें फ्रीचर्चच्या संस्थांची जी सभा भरत आहे त्या सभेपुढें तो कदाचित् येईल. त्या कामीं पुढाकार घेणारांचीं मतें काय होतीं—आणि मला वाटतें अद्यापिहि आहेत—हें दर्शविणारा म्हणून हा कागद ह्या सभेच्या पुढाऱ्यांकडे तूं मांडिल्यास बरें होणार नाहीं काय ?.....मला असें स्पष्ट आठवतें कीं, धर्मसुधारणेनंतर धर्मसुधारणेला मिळालेली सर्व मत्ता त्या संस्थेकडेच रहावयाची होती; पण त्या सुधारणेपूर्वींची त्या संस्थेची सर्व मत्ता राष्ट्राकडे पुनः परत जावयाची होती, आणि सामान्यतः व ठिकठिकाणीं ठरेल त्या सामाजिक किंवा इतर कामांकडे ती लावावयाची होती. जे सरकारी धर्मसंस्था मोडूं पहात आहेत त्यांच्या मनांत त्या संस्थेची जुनी व नवी सर्व मत्ता काढून घ्यावयाची आहे, ही जी पुष्कळ पसरलेली घातुक व चुकीची समजूत ती घालवण्यास ही संधि चांगली आहे. "

ह्या सुमारास लंदन युनिव्हर्सिटीनें त्यास एल्. एल्. डी. ची पदवी देण्याचें मनांत आणिलें, व त्यास असें कळविलें कीं, ती पदवी प्रिन्स व प्रिन्सेस आव्ह् वेल्स ह्यांना आणि दुसऱ्या दोघांनाच द्यावयाची आहे. तेव्हां त्यासंबंधानें त्या युनिव्हर्सिटीच्या प्रिन्सिपालास त्यानें असें लिहिलें:—" लंदन युनिव्हर्सिटीच्या सेनेटासारख्या नामांकित मंडळानें मला जी पदवी देण्याचें मनांत आणिलें आहे, ती कोणत्याहि कारणांसाठीं मला स्वीकारतां येऊं नये याचें फार वाईट वाटतें. (पण यासंबंधानें) पहिली गोष्ट ही कीं, माझ्या प्रकृतीच्या स्थितीमुळें गेल्या आगस्ट महिन्यापासून मला

घराबाहेर पडतां आलें नाहीं..... माझ्याबद्दल कींव करून मी (पदवीदान–समारंभास) हजर नसलों तरी चालेल असें सेनेटनें ठरविलें तरी, एक अलंघ्य अडचण शिलक राहणारच आहे. (ती ही कीं,) सन्मानाच्या पदव्या वाङ्मय व शास्त्र यांना (यांचे व्यासंग करणारांना) जरी फायदेशीर दिसतात, तरी शेवटीं (त्या-त्यांस) हानिकारक होतात, ह्या समजानें आज तीस पसतीस वर्षें स्वदेशीय व परकीय युनिव्हर्सिट्यांनीं वेळोवेळीं मला देऊं के-लेल्या पदव्या मीं नाकारिलेल्या आहेत. म्हणून लंदन युनिव्हर्सिटीचें सेनेट जी पदवी मला देण्यास तयार होत आहे ती मीं आतां स्वी-कारिल्यास, ह्या अनेक ब्रिटिश व परकी युनिव्हर्सिट्या व अनेक यूरोपीय आकाडेम्या ज्या मला डाक्टर व सभासद ह्या पदव्या देणार होत्या, त्यांना झिटकारिल्यासारखें होईल; आणि ज्या कृतीनें त्यांचा अपमान केल्यासारखेंच होणार आहे, अशी कृति करण्यास सहजच माझें मन घेत नाहीं. (तुमच्या) सेनेटमधील नामांकित माणसांनीं देऊं केलेली पदवी मला ह्या रीतीनें नको म्हणावी लागत आहे ह्याबद्दल मला वाटणारा विषाद, हा प्रसंग विशेष प्रकारचा आहे हें ऐकून, अर्थात् ज्यास्तच वाढत आहे. ”

तो जरी स्वताला देऊं केलेले सन्मान स्वीकारण्यास नाखुश असे, तरी जे सन्मानास योग्य असतील त्यांचा सन्मान करण्याचें कोणीं योजिल्यास त्यांस मदत करण्यास तो नेहमीं तयार असे. म्हणून जॉर्ज होलिओक याचें त्याच्या ८६ व्या वाढदिवशीं जेव्हां अ-भिनन्दनार्थ स्वागत करण्याचें त्याच्या मित्रांनीं मनांत आणिलें, तेव्हां त्यानें त्यांतील पुढारी फ्लेचर स्मिथ यास असें लिहिलें (ता० २८ मार्च १९०३):—“ गेल्या आगस्टपासून मी घराबाहेर पडलों नाहीं, आणि मि० होलिओकला माहीतच आहे कीं, त्याच्या ८६

ह्या वाढदिवशीं जें स्वागत होणार आहे त्या प्रसंगीं मला हजर
रहातां येणार नाहीं. म्हणून त्यास माझी अंतःकरणपूर्वक संमति
दर्शविण्यापलीकडे मला कांहीं करतां येत नाहीं. त्याची
बुद्धिमत्ता मोठीच आहे, पण तिजविषयीं न बोलतां, त्याचें धैर्य,
प्रामाणिकपणा, सत्यवादीपणा, जगन्मित्रत्व, आणि अश्रांत दीर्घ
प्रयत्न, यांबद्दल मला फारच कौतुक वाटतें असें जोरानें म्हण-
ण्याची मला इच्छा आहे. मला वाटतें, ह्या गुणांचा असला समु-
च्चय फार दुर्मीळ आहे."

ह्या वर्षांतील त्याच्या वाढदिवशीं केलेल्या त्याच्या अभिनन्द-
नांना त्यानें जीं उत्तरें दिलीं, त्यांतील बहुतेकांत पुढील शब्द आ-
ढळतात:—" मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं, दुर्बळ वा-
र्धक्यांत आयुष्याची दोरी लांबत जाणें, ही गोष्ट अभिनन्दन करण्यासा-
रखी नसून कदाचित् अभिसांत्वन करण्यासारखी आहे. " पूर्वींच्या
हिंवाळ्यांत तो बहुतेक आपल्या खोलीबाहेरहि पडलेला नव्हता,
आणि वसंतऋतु आला तेव्हां खेडेगांवांत रहावयास जाण्याचा
विचार जरी त्यानें मनांत आणिला, तरी तेथें आपण जाऊन पों-
होचूं अशी आशा त्यानें एकदांच प्रदर्शित केली.

ह्या वेळासंबंधानें त्याचा सेक्रेटरी लिहितो:—" धंदेवाल्या दायां-
विरुद्ध त्याचा फार प्रतिकूल ग्रह असे, म्हणून अगदीं आवश्यक
झालें तेव्हांच तो आपली शुश्रूषा करण्यास असली एकादी दाई ठे-
वण्यास कबूल झाला. त्याचें शरीर जरी दुर्बल व अगदीं कृश झालें
होतें, तरी त्याचा नेहमींचा करारीपणा बहुतेक कायमच होता, आणि
त्यामुळें वैद्य व दाया यांना त्याच्याशीं व्यवहार करण्यास कठीणच
जात असे. अमुक अमुक रीतीनें वाग, म्हणून त्यास वैद्यानें सांगितलें
तर, तें त्याचें सांगणें बरोबर आहे किंवा नाहीं ह्याबद्दलहि तो संशय
व्यक्त करीत असे. तो आपल्यास दुसऱ्याच्या हातांत पूर्णपणें देऊं

शकत नसे. डाक्टरनें कांहीं उपचारयोजना केली तर तिचें कारण जाणण्याची त्यास इच्छा असे; म्हणून डाक्टरानें दिलेल्या औषधांत काय काय चिजा घातल्या आहेत व त्यांचे गुणदोष काय आहेत ह्यांबद्दल तो सविस्तर चर्चा करी, आणि त्यांचा उपयोग करणें त्याच्या कल्पनांना मानवलें नाहीं, तर तो तीं (औषधें) घेत नसे."

मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत स्मृतिभ्रंशाचीं व शब्दांनीं कल्पना व्यक्त करण्याच्या सामर्थ्याभावाचीं स्पष्ट चिन्हें त्याच्या मध्यें दिसूं लागलीं. ह्या स्थितींत तो असतां सेक्रटरीनें तार केल्यावरून डा० चार्लस बॅस्टियन त्यास पहाण्यास आला; पण कांहीं जीवशास्त्रविषयक प्रश्नांची चर्चा करण्यास तो आला आहे असें समजून, स्पेन्सरनें क्षुब्ध होऊन त्यास निघून जाण्याची विनंती केली. नंतर एक दोन दिवसांनीं जेव्हां त्याची प्रकृति पुनः सुधारूं लागली, तेव्हां त्याबद्दल त्यास पश्चात्ताप वाटला; आणि त्यानें त्याची माफी मागण्याबद्दल पत्र लिहविलें. आणि त्याचें जेव्हां त्यावर समाधानकारक उत्तर आलें, तेव्हां त्यास फार बरें वाटलें. अशीच आपल्या वैद्याची माफी मागण्याचा पुनः त्यास एकदा प्रसंग आला.

पण त्याची बरें होण्याची शक्ति अद्यापि विलक्षण होती. कारण थोड्याच दिवसांनीं तो इतका बरा झाला कीं, त्यास आपल्या विशेष निकट मित्रांशीं पुनः पत्रव्यवहार करतां येऊं लागला. उदाहरणार्थ, आर्डटार्निश एथील आपल्या बागेंतील फुलें मिस फ्लोरा स्मिथ हिनें त्यास पाठवून सोबत जेव्हां असा निरोप पाठविला कीं, "ज्या ठिकाणीं तुझ्या सहवासांत आह्मीं इतके सुखाचे दिवस घालविले तेथून हीं फुलें आलेलीं पाहून तुला सुख होईल असें मला वाटतें," तेव्हां त्या निरोपावर त्यानें सद्गदित होऊन असें उत्तर पाठविलें:—" टेंकड्यांवरील फुलें सामान्यतःच सुवासिक असतात हा एक सुखकारकपणा, आणि आर्डटार्निश एथील टेंकड्यांवरील तीं फुलें हा त्यांचा

विशेष सुखकारकपणा, असा दुबार सुखकारकपणा ह्या आर्डटार्निश एथील फुलांच्या सुवासावरून मला वाटला. तुझ्याप्रमाणें मलाहि त्यांजवरून पुष्कळ गत सुखाची आठवण होते, आणि ह्या दृष्टीनेंच तूं व तुझ्या बहिणी त्यांची इतकी किंमत समजतां हें ऐकून मला आनंद वाटतो, आणि ह्या सुखाच्या आठवणींत मी गतकालीं तेथें होतों ह्याबद्दल सुखकारकच विचार तुमच्या मनांत येतो हें पाहून मला संतोष होतो. ”

ता० ६ जून १९०३ रोजीं त्यानें सर जोसेफ हूकरला असें लि-
हिलें:—“ मि० स्कॉटच्या द्वारा तूं माझ्या प्रकृतीबद्दल ममतेनें
चवकशी केलेली पाहून मला अत्यन्त समाधान वाटलें. माणसाच्या
जीविताशीं असलेल्या (स्नेहाच्या) कड्या जशा (स्नेह्यांच्या
मृत्यूनें) कमी कमी होत जातात, तशी प्रत्येक कडीची किंमत
पूर्वींहून ज्यास्त होत जाते, आणि ती अद्यापि अस्तित्वांत आहे
ह्याचें कांहीं निदर्शक मिळालें म्हणजे त्यापासून पूर्वींहून ज्यास्त
आनंद होतो. म्हणून माझ्या अद्यापि टिकाव धरून राहि-
लेल्या अल्प मित्रमंडळाची पुनः नाडी एकादे वेळीं हातांत धरण्यास
मला फार आनंद होतो, आणि जो (तूं) इतकीं वर्षें मजशीं इ-
तक्या स्नेहानें वागलास त्या तुझी नाडी हातांत धरण्यास मला
विशेषच आनंद वाटतो. तुझी प्रकृति हल्लीं कशी आहे हें
दाखविण्यास तुझ्याकडून चार ओळी याव्या असें मी इच्छितों,
आणि लांबलचक पत्र न लिहिल्याबद्दल तूं जशी मला माफी कर-
शील, तशी मीहि तुला करीन. ”

यावर सर जोसेफनें उत्तरीं असें लिहिलें:—“ कायम असलेल्या सहानुभूतीचा हा पुरावा तुजकडून आल्याबद्दल मलाहि अत्यन्त संतोष वाटतो..... आपला जुना लाडका ‘एक्स्’ क्लब आमच्याबरोबरच झपाट्यानें शून्यबिंदूप्रत चालला आहे. ही किती चमत्कारिक गोष्ट

दिसते कीं, आम्ही तिघे (लार्ड एव्हबरी तिसरा) त्या क्लबाचे जे बरेच ज्यास्त वृद्ध घटक होतों, तेच सर्वांच्या मागें तगाव धरून राहिलों आहों. ''

ता० २९ जून १९०३ रोजीं स्पेन्सर मिसेस सिडने वेब हीस लिहितो:—"माझे मित्र माझ्याविषयीं मजशीं बोलत असतां वरचेवर असें म्हणतात कीं, मीं जें सर्व केलें आहे तें आठवण्याचें मला मोठें समाधान आहे, आणि मला जें सर्व सोसावें लागतें त्याचा भार फार कमी करणारें तें आहे. ही त्यांची चूक स्वाभाविक आहे, पण फार मोठी आहे. प्रसंगवशात्—कदाचित् आठवड्यांतून एकदां—मीं आजपावेतों साध्य केलेल्या गोष्टी माझ्या मनांत येतात, आणि नंतर दहा पंधरा मिनिटें मनांत राहतात, असें म्हणतां येईल; पण त्या ह्याहून ज्यास्त वेळ माझ्या ज्ञानवत्तेच्या घटक बनत नाहींत. वस्तुतः, गतगोष्टी त्या गतगोष्टीच होत. आणि लहान गतगोष्टींहून मोठ्या गतगोष्टी स्मृतीवर फारसा ज्यास्त प्रभाव चालवितात असें नाहीं.........तुला मजकडे वरचेवर थोडा थोडा वेळ येतां यावें इतकी तूं माझ्या संनिध रहात असतीस, तर किती बरें झालें असतें ! पण ज्या गोष्टींविषयीं आशा करतां येत नाहीं अशांपैकीं ती एक आहे. ''

ता० ८ जून १९०३ रोजीं आलेक्झांडर बेनकडून त्यास असें पत्र आलें होतें:—" तुझी प्रकृति सारखी अशक्तच राहिली आणि तूं बिछाना धरून आहेस, हें ऐकून मला फारच वाईट वाटतें. मी जितका व्यायामावर अवलंबून असतों, तितका तूं कधींच नव्हतास, तरी तुला फार अशक्तपणा व हलाकी वाटत असली पाहिजे. तुला अद्यापि प्रत्यक्ष वेदना कांहीं होत नाहीं, आणि जगांत घडणाऱ्या गोष्टींची चवकशी करावी असें तुला अद्यापि वाटतें, अशी मी मनःपूर्वक आशा करितों.....माझ्या लेखांची फार दिवस लां-

त्रणीवर पडलेली पुनरावृत्ति मी तुजकडे पाठवीत आहें.....माझ्या अंतःकरणपूर्वक सहानुभूतीचा स्वीकार कर."

यावर त्यानें त्यास ता० १३ जून रोजीं असें लिहिलें:—"तुझ्या अत्यन्त ममतापर सहानुभूतियुक्त पत्राबद्दल मी तुझे फारच पुष्कळ आभार मानितों, आणि मी वेदनेपासून मुक्त असेन ह्या तुझ्या आशेबद्दल आभारी होतों. परवांपर्यंत मला ह्यासंबंधानें हो-कारार्थी उत्तर देतां आलें असतें, पण आलीकडे वरचेवर पेटके येऊन माझें जीवित मला असह्य होऊं लागलें आहे. तुझे सहानु-भूतीचे उद्गार मनापासूनचे आहेत हें मला ठाऊक असल्यामुळें, ह्यावर ज्यास्त लिहून मी आपला जीव ज्यास्त धोक्यांत घालीत नाहीं."

हाच त्यांचा एकमेकांशीं शेवटचा पत्रव्यवहार झाला; कारण प्रो० बेन ता० १८ सपटंबर रोजीं वारला. ही गोष्ट त्याच्या बाय-कोच्या विनंतीवरून स्पेन्सर यांस कळवितांना प्रो० डेव्हिडसन्नें त्यास असें लिहिलें:—"मला आपल्या वतीनें असें लिहावेंसें वाटतें कीं, आलीकडे तुजविषयीं त्याच्या मनांत वरचेवर विचार येत असत, आणि तुझ्या आजारीपणाबद्दल तो वरचेवर आपली सहानुभूति व्यक्त करीत असे. त्याच्या इतरांबद्दलची काळजी वाहण्याच्या वृत्तीवरून त्याच्या अंतःकारणाचें दयालुत्व अखेरपर्यंत व्यक्त होत होतें."

यावर डेव्हिडसन यास स्पेन्सरनें ता० २२ सपटंबर रोजीं असें लिहिलें:—"मिसेस बेनचा जन्माचा सोबती गेला या दृष्टीनें तिज-बद्दल वाईट वाटणें योग्य आहे, पण एरवीं ही गोष्ट फार दुःख करण्यासारखी आहे असें मला वाटत नाहीं. त्यानें आपलें काम केलेलें होतें, आणि आपलें जीवित घालविलेलें होतें; आणि त्या जीविताचा जो भाग राहिलेला होता, तो तें सारखें सहन करीत रहावयाचें अशाच प्रकारचा होता. मी त्याचा हेवा करितों (त्याला

मरण आलें तसें मला येतें तर बरें) असें मी म्हणतों, यावरून तुला माझ्या मनोभावाचा अंदाज होईल. त्याचा स्वभाव सहानुभूतियुक्त होता असें जें तूं म्हणतोस त्याचा प्रत्यय कित्येक प्रसंगीं मला आला होता, आणि मला वाटतें, आलीकडे ही गोष्ट ज्यास्तच ठळक रीतीनें दिसावयास लागली होती. "

ता० १४ सपटंबर रोजीं मि० कार्नेगी यानें त्यास असें लिहिलें:—" तूं माझ्या विचारांत रोज येतोस, आणि " कां ? " हा सततचा प्रश्न पुढें येतो. मि० मोर्ले मजकडे एक दोन दिवसांत येणार आहे, आणि मला खात्री आहे कीं, नेहमींप्रमाणें तुझ्यासंबंधानें त्याचीं माझीं पुष्कळ भाषणें होतील. "

यावर त्यानें त्यास ता० १८ सपटंबर रोजीं असें लिहिलें:— " माणूस जसजसा वृद्ध होत जातो तसे ' हें कां ? ' ' हें कां ?' आणि ' हें कां ?' असे प्रश्न ज्यास्त ज्यास्त जोरानें सुचूं लागतात. धक्के न बसतां स्किबो एथें (कार्नेगीच्या ठिकाणीं) येण्याचें जर साधन असतें—स्पेन्सरचें (एक प्रसिद्ध विमान्या) विमान जर पूर्णपणास पावलेलें असतें (हल्लीं त्याची केवळ कल्पना करण्यापलीकडे जातां येत नाहीं)—तर मी तुझा फ्यूडल (लष्करी जमिनदारीचा) किल्ला (!) पहावयास जॉन मोर्लेबरोबर आनंदानें आलों असतों."

यापूर्वीं ता० १६ सपटंबर रोजीं मि० मोर्ले यास त्यानें असें पत्र लिहिलें होतें:—" कांहीं दिवसांपूर्वीं माझ्या अंत्यविधीसंबंधानें माझ्या मृत्युपत्राच्या एका व्यवस्थापकाबरोबर मी विचार करीत होतों, हें मीं तुला सांगितलें म्हणजे तुझ्या ध्यानांत येईल कीं, ह्या अवरोहणाचा शेवट (मृत्यु) फारसा लांब नाहीं असें मी समजतों. आणि तो (शेवट) लवकर होणार ह्याबद्दल मला समाधान वाटतें. ह्या शेवटाचा विचार मनांत येऊन मी तुला मजवर एक मेहरबानी करण्याची विनंती करितों. मी असें लि-

हून ठेविलें आहे कीं, जे रूढ धर्माला चिकटून राहिलेले आहेत अशांच्या प्रेतावर किंवा राखेवर जे विधि करितात त्यांची मीं (मृत्युपत्रांत) मनाई केली आहे. असें आहे तरी मला अगदीं मुकाट्यानें जाळावें हाहि विचार मला आवडत नाहीं; म्हणून एखादा मित्र त्या प्रसंगीं चार शब्द बोलल्यास मला आनंद होईल. माझ्या एकंदर मित्रांकडे पाहतां, त्यांमध्यें असले चार शब्द बोलण्यास तूं अत्यन्त योग्य आहेस असें मला वाटतें, याचें एक कारण तुझा माझा पुष्कळ दिवसांचा स्नेह हें होय. दुसरें कारण तुझे माझे मनोविकार सदृश आहेत हें होय, आणि तिसरें कारण आपण (दोघे) इतर लोकांपासून ज्या कल्पनांमुळें भिन्न दिसतों त्यांमध्यें सामान्य सादृश्य आहे, हें होय..... तूं मेहरबानी करून हें काम आपल्या अंगावर घेशील काय ? तूं जर ह्या गोष्टीस कबूल झालास तर अखेरचे शब्द तुझ्यासारख्या सर्वांशीं योग्य अशा माणसाकडून येतील ही ज्ञानवत्ता आतांपासून मरणापर्यंतचा जो अल्प काल त्यांत मला समाधानास कारण होईल."

ता० २९ सपटंबर—" वरील पत्र लिहिल्यानंतर, तूं माझ्या विनंतीस होय म्हणण्यास एक अडचण आहे असें मला सुचलें, व ती कदाचित् घातुकच होईल. तुझ्या पुढच्या (पार्लमेंटीय) निवडणुकीस कदाचित् त्यानें धोका येईल, आणि असें तुला वाटत असल्यास मेहरबानी करून असला धोका अंगावर घेऊं नको."

याच्या पहिल्या पत्रास ता० २६ सपटंबर रोजीं मोर्लेनें असें उत्तर लिहिलें:—" तुझें पत्र वाचून माझा काय मनोभाव झाला हें तुला सांगावयास नको. त्या पत्राचा प्रसंग व उद्देश ह्या दोहोंनीं माझें मन अत्यन्त सद्गदित झालें. मी जर तुझ्या मागें राहिलों, तर तुझ्या इच्छेप्रमाणें करीन ह्याबद्दल संशयच नको, आणि आपला दीर्घ स्नेह व कल्पनासाम्य ह्यांना तूं केलेल्या उल्लेखाबद्दल मी

तुझा आभारी आहे. तुझ्या स्नेहाची स्मृति मला सदैव राहील, आणि तुझ्या कल्पनांच्या धोरणाबाहेर मी कधींच जाणार नाहीं.

तुझें पत्र मला कार्नेगीच्या घरीं पोंहोचलें. त्यानें, शक्य असल्यास, आपलें स्मारक म्हणून तुला पसंत असतील अशा एक दोन गोष्टी तुजकडून काढण्यास मला विनंती केली, आणि त्या गोष्टींपैकीं जी अत्यन्त इष्ट दिसेल ती अस्तित्वांत आणण्यासाठीं योग्य वेळीं त्याच्यापाशीं पैसे मागण्याचा त्यानें मला अधिकार दिला.

तुझ्या मजवरील विश्वासाबद्दलच्या ह्या उच्च चिन्हाबद्दल माझ्या लाडक्या स्पेन्सरा, मी तुझा आभारी आहें. ''

ता० २६ सपटंबर (दुसऱ्या पत्राचें उत्तर):—'' ह्या अडचणीबद्दलचा विचार मनांत आणिलास हें अत्यन्त मोठ्या कळवळ्याचें काम केलेंस. पण (माझे मतदार) मित्र जरी पुरे प्रेसबिटेरियन आहेत, तरी माझें स्वातंत्र्य आकुंचित करण्याचा विचार ते मनांत आणतील असें मला वाटत नाहीं, आणि जर त्यांनीं आणिलाच, तर मी त्यांना विरोध करण्यास फारसा भिणार नाहीं. ''

ह्या दोन पत्रांपैकीं त्याचें पहिलें पत्र पोंहोचल्यावर स्पेन्सरनें त्यास दुसऱ्या दिवशीं असें लिहिलें:—'' तुझ्या संमतीबद्दल मी तुझे अत्यन्त मनःपूर्वक आभार मानितों, आणि तूं ती खुशीनें दिली आहेस अशाबद्दल मला संशय येणार नाहीं अशा रीतीनें ती दिल्याबद्दल मी तुझे ज्यास्तच आभार मानितों.....हल्लीं शेवटचे शब्द मला मुळींच सुचत नाहींत. पण जीवितास ओहोटी लागली आहे अशी वेळ इतक्यांतच आल्यास जे चेहरे पाहण्याची मला अत्यन्त उत्सुकता वाटेल त्यांपैकीं तुझा एक आहे. ता० क० १—पहिल्या पत्रांत एक नजरचूक झाल्यामुळें ज्याची जरूरी उत्पन्न झाली त्या माझ्या दुसऱ्या पत्रावरून तुझें उत्तर फिरविण्यास जर तुला अल्पतमहि कारण वाटलें, तर तसें बेलाशक कर. (पार्लमेंतांत

तूं निवडून आल्यानें) पार्लमेंतांतील तुझीं कांहीं भाषण गमावणें हें अनिष्ट दुसऱ्या अनिष्टापेक्षां (तूं माझ्या शवाच्या दहनाच्या वेळीं दोन शब्द न बोलणें या अनिष्टापेक्षां) मला अत्यन्त मोठें वाटतें. ता० क० २—कार्नेगीची विनंती त्याचें समाधान होईल अशा रीतीनें मान्य करण्याची मी आशा धरितों. "

यानंतर त्याची शक्ति झपाट्यानें कमी होऊं लागल्यामुळें बहुधा ही आशा पुरी झाली नाहीं. त्याला वार्धक्याचें ओझें इतकें जड वाटूं लागलें कीं, आतां त्याला कोणतीहि महत्त्वाची गोष्ट हातीं घेतां येत नाहींशी झाली. १९०४ च्या जानेवारींत " स्कूल " नांवाचें एक मासिक काढण्याचा कांहीं मंडळीचा विचार झाला होता, पण तें यशस्वी होवो अशी आशा प्रदर्शित करणें ह्या पलीकडे त्यासंबंधानें त्यास कांहीं करतां येत नसल्यामुळें त्याचा पुरस्कर्ता लॉर्ड म्याग्नस यास त्यानें ता० १२ आक्टोबर १९०३ रोजीं असें लिहिलें:—" शिक्षणाविषयींची जी कल्पना आज पुष्कळ दिवस माझे मनांत आहे, आणि जी माझ्या ग्रंथांत सर्वत्र गर्भित झालेली आहे, ती स्वीकारणाऱ्या मासिकाचें मीं सहजच मनःपूर्वक अभीष्टचिन्तन करण्यास कधीं चुकणार नाहीं. पण नागरिकांचें शिक्षण आणि जीविताकरितां तयारी हीं सरकारानें आपल्या शिरावर घ्यावीं असा माझा समज आहे, असें तुझ्या कार्यपत्रिकेच्या ज्या वाक्यसमूहांत दर्शविलें आहे तो वाक्यसमूह आक्षेप घेण्यासारखा, व मुळांतच शंका येण्यासारखा आहे. आतां सरकारचें हें कर्तव्य मुळींच नाहीं असें ज्या अर्थीं मीं प्रारंभापासून प्रतिपादिलें आहे, व अजूनहि प्रतिपादितों; आणि शिवाय चांगला नागरिक म्हणजे काय, आणि चांगला नागरिक कसा बनावा, हें अपल्या विचाराप्रमाणें ठरवून मुलांचे चांगले नागरिक बनविणें हें सरकारचें काम नव्हे, असेंहि ज्या अर्थीं मीं प्रतिपादिलें

आहे, त्या अर्थीं असें दिसतें कीं,आतांच दिलेल्या माझ्या संमतीला वस्तुतः (या तुझ्या विधानानें) हरताळ लागतो, (म्हणून) वरील वाक्यसमूहांतून " सरकार " हा शब्द गाळल्यास आणि अशा रीतीनें तुमचे विधानास स्वतः स्पष्ट सत्याचें स्वरूप दिल्यास मात्र, त्यास मी संमति देऊं शकेन. "

या सुमारास प्रसिद्ध इतिहासकार मि० लेकी मरण पावल्यामुळें त्याच्यामध्यें व त्याच्या वार्धक्यामध्यें जे थोडेसे दुवे राहिले होते त्यांतील आणखी एक तुटला, आणि ता० २९ आक्टोबर १९०३ रोजीं त्यानें त्याच्या बायकोस असें लिहिलें:—" मृतांबद्दलच्या स्तुतींमध्यें फार करून अप्रामाणिक विधानें भरलेलीं असतात, पण मी शरीरानें समर्थ असतों तर माझ्या आजाराच्या बिछान्यावरून ज्या अनेक गोष्टी मीं (त्याच्यासंबंधानें) सांगून लिहून काढिल्या असत्या त्यांत (खरी) प्रशंसापर नसती अशी एकहि मला सुचत नाहीं. मि० लेकी बुद्धिदृष्ट्या स्वच्छ विचारी असून नीतिदृष्ट्या अत्यन्त प्रामाणिक होता, आणि ऐतिहासिक सत्य प्रतिपादण्याच्या कामास तो वाहिलेला होता, ही गोष्ट प्रत्येकाप्रमाणें मलाहि ठळक रीतीनें दिसलेली आहे. दीर्घ सहवास तुटल्यानें उत्पन्न होणाऱ्या वेदना सहजच मोठ्या असल्या पाहिजेत. म्हणून मी प्रार्थना करितों कीं, आतांपर्यंतच्याप्रमाणें आतांहि माझ्या सहानुभूतीचा विचार कर. "

आज कांहीं दिवस आधीं व्यवस्था करून मग त्यास भेटावयास येण्याचें त्याच्या विशेष निकट स्नेह्यांनीं सोडून दिलें होतें, कारण कोणी आपणास भेटावयास यावयाचा आहे हा विचार देखील त्यास अस्वस्थ करीत असे, आणि ती भेट लांबणीवर टाकण्याची इच्छा त्यास होत असे. लवकरच मे महिन्यांत दिसलेलीं त्याच्या प्रकृतिसंबंधाचीं लक्षणें पुनः दिसूं लागलीं. नवंबरांत तर त्याची प्रकृति इतकी

बिघडली कीं, तो पत्राचीं उत्तरें बहुतेक पाठवीत नाहींसा झाला,
आणि जगांत काय चाललें आहे इकडे त्याचें लक्ष जाईनासें झालें.

ह्या वेळीं राष्ट्रांराष्ट्रांमधील शांतता कायम राखण्यासाठीं एक सभा
स्थापन झाली होती; तिचे उद्देश आपल्यास पसंत आहेत असें द-
र्शविण्याबद्दल त्यास वरचेवर विनंती केल्यावरून त्यानें तशा अ-
र्थाची चिठी ता २० नवंबर रोजीं सांगून लिहविली. यानंतर आ-
णखी एकाच पत्रावर त्यानें सही केली, तें ता० २६ नवंबरचें
असून मिसेस कोर्टने हीस लिहिलेलें होतें. कारण त्या बाईनें मि-
सेस स्टेनकडून आलेलें पत्र त्याजकडे पाठविलें होतें. त्या पत्रांत
मि० स्टेनच्या प्रकृतींत सुधारणा झाल्याची हकीगत लिहून, आणि
दक्षिण आफ्रिकेंत परत जाण्याची आशा प्रदर्शित करून, मिसेस
स्टेननें आणखी असें लिहिलें होतें:—" तेथें गेल्यावर देखील, आ-
मच्या अत्यन्त मोठ्या दुःखांत ज्यानें आमच्या मार्गांत इतका च-
कचकीत किरण पाडिला, आणि आह्मांस पुढच्या कालाविषयीं
आशायुक्त केलें, तो मोठा इंग्रज तूं आहेस अशा रीतीनें तुजबद्दल
प्रेमानें व पूज्यबुद्धीनें आपल्या मनांत विचार आणण्यास आह्मीं
विसरणार नाहीं. " पृथ्वीवर शांतता वाढावी, आणि जातीजातीं-
मध्यें सदिच्छावृद्धि व्हावी, हा जो त्याच्या मुख्य जीवितोद्देशांपैकीं
एक उद्देश· त्यासंबंधानें त्यानें शेवटीं ज्या दोन पत्रांवर सही केली
तीं हीं असावीं, हें खरोखर विलक्षण प्रकारें योग्य होतें.

नवंबरच्या शेवटच्या आठवड्यांत त्याची प्रकृति फारच बि-
घडली. आपल्या मरणसमयीं मिसेस सिड्नेवेब हजर असावी अशी
इच्छा त्यानें प्रदर्शित केली होती. म्हणून ता० ४ दिजंबर रोजीं
ती त्यास भेटावयास आली, पण त्या वेळीं त्यास कोणासहि भेट-
ण्याची उत्सुकता नाहींशी झाली होती; व आपणाकडे कोणीं येऊं
नये असें त्यास वाटूं लागलें होतें. मध्यें त्याची अलंघ्य इच्छा जोर

घेत असे; उदाहरणार्थ, मरणापूर्वीं एक दोन दिवस औषधाची गोळी तोंडांत घालण्याचा पुष्कळ वेळां त्यानें केलेला प्रयत्न फुकट गेलेला पाहून मिस किलिक जेव्हां त्याच्या मदतीस आली, तेव्हां त्यानें तिला नको म्हणून "मला मारून घेण्याचा तिरस्कार आहे" असें म्हटलें. दुसऱ्या एका प्रसंगीं त्याचा सेक्रेटरी मि० ट्रौटन यानें एका कागदावर त्याची योग्यस्थळीं सही यावी म्हणून जेव्हां तो कागद अमळ सरकविला, तेव्हां तो म्हणाला, "तूं काय करीत आहेस ? मी मरावयास टेंकलों आहें असें तुला वाटतें काय ?" मरणाच्या अगोदरच्या रविवारीं रात्रीं निरोप घेऊन जातांना मि० चार्लस होल्म जेव्हां त्यास असें म्हणाला कीं, "मी तुला उद्यां सकाळीं भेटावयास येईन" तेव्हां स्पेन्सरनें त्यास ताबडतोब असें उत्तर दिलें कीं, "कां नाहीं ? (अलबत)," आणि तें ऐकून होल्मला आश्चर्य वाटलें.

मि० ट्रौटन म्हणतो:—"सोमवारीं सर्व वेळ तो अर्धवट किंवा पूर्ण बेशुद्धींत होता, आणि एकदां अर्धवट शुद्धींत असतां त्यानें आपल्या बिछान्यापाशीं मला बोलविलें आणि आपला बहुतेक मांसविहीन झालेला हात पुढें करून अखेरचे शब्द उच्चारिले. त्यांची मांडणी नेहमींप्रमाणें बरोबर होती, पण ते अर्थविहीन दिसत होते, जरी कांहीं निश्चित अर्थ मनांत धरून त्यानें ते उच्चारिले असावे. ते शब्द हे होते:— "आतां ही गोष्ट मी माझी माझ्या मागें जे व्यवस्था करणारे आहेत त्यांच्या फायद्याकरितां करीत आहें; कारण माझा उद्देश असा आहे कीं, माझ्या मरणानंतर माझें शव जलमार्गानें पोर्टस्मथला न्यावें." त्याच संध्याकाळीं तो बेशुद्ध झाला, आणि त्याच स्थितींत मंगळवारीं (ता० ८ डिजेंबर १९०३ रोजीं) पहाटेस ४ वाजून ४० मिनिटांनीं त्यास शांतपणें मरण आलें. अशा री-

तीनें त्याचा अंत त्याच्या मित्रांच्या वासनांप्रमाणें, व त्याच्या स्वताच्या इच्छेप्रमाणेंच, झाला.

आपल्या शवाचें दहन कसें करावें यासंबंधानें त्याचे मरणोत्तर व्यवस्थापक मि० चार्लस होल्म व मि० फ्रॅंक लॉट यांना अत्यन्त निश्चित व सविस्तर अशा व्यवस्था त्यानें लिहून ठेविलेल्या आढळल्या. त्यानें असें लिहून ठेविलें होतें कीं, " शवावर माळा घालण्याची, आणि भपक्यासाठीं शवाच्या पेटीच्या बाजू उघडच्या ठेवण्याची जी हल्लींची चाल आहे, ती माझ्या शवाच्यासंबंधानें अनुसरूं नये. " त्याची अशीहि इच्छा होती कीं त्या वेळीं हजर असलेल्या लोकांनीं सुतकाचीं चिन्हें धारण करूं नयेत. मोर्ले हजर नसल्यास त्याचें काम लीओनार्ड कोर्टने यानें करावें असें त्यानें लिहून ठेविलें होतें. या वेळीं मोर्ले आगबोटींतून सिसिलीकडे चालला असल्यामुळें, त्यास तेथें येणें शक्य नव्हतें. म्हणून मि० कोर्टने एडिंबरो एथें राजकीय भाषणें करण्यास गेला होता त्यास विनंती करतां, ' दुसरा कोणी न सांपडल्यास मी येतों ' म्हणून त्यानें अभिवचन दिलें. लॉर्ड एव्हबरी यास येणें शक्य नव्हतें, आणि बाल्फोर यास महत्त्वाच्या राजकीय कामांमुळें हजर राहतां येईना. म्हणून आपली स्वताची सोय बाजूला ठेवून, कोर्टने त्वेरेनें एडिंबरोहून आला.

ता० १४ दिजंबर रोजीं त्याचें शव ब्रायटन एथून लंदनला आणिलें. तेव्हां ब्रायटनचा मेयर स्टेशनापर्यंत आपल्या हुद्याच्या पोषाकानें आला होता. लंदनांत व्हिक्टोरिया स्टेशनावर त्याचे थोडेसे मित्र गोळा झाले होते. लंदनमधून जी त्याची प्रेतयात्रा काढिली, तींत त्याचें शव घातलेली साधी प्रेतगाडी, आणि मागून तीन गाडया, इतक्याच काय त्या होत्या. ती रस्त्यांतून चालली असतां प्रस्तुत किंवा कोणत्याहि कालांतील अत्यन्त मोठ्या तत्त्ववेत्त्यांपैकीं एकाचा हा शेवटचा प्रवास होत आहे, हें थोडयांच्याच

ध्यानांत आलें असेल. त्याचें प्रेत जाळिलें तेथें त्याच्या नातेवाईकांखेरीज त्याच्या घरांतील माणसें, त्याच्या मालमत्तेचे व्यवस्थापक व ट्रस्टींपैकीं दोन, पुष्कळ निकट खाजगी स्नेही, वाङ्मय व शास्त्र यांचे नामांकित प्रतिनिधी, आणि कित्येक परदेशीय मित्र व शिष्य हजर होते. त्याच्या अत्यन्त प्रियमित्रांपैकीं थोडेसे त्यांच्या वार्धक्यामुळें हजर राहू शकले नाहींत.

जमलेल्या मंडळीपुढें मि० लिओनार्ड कोर्टने यानें पुढील संभाषण केलें:--" आज जें अत्यन्त सन्मान्य कर्तव्य मजवर येऊन पडलें आहे, तें करण्यास मी योग्य नाहीं. जे चार शब्द मी बोलणार आहें त्यांच्या प्रारंभीं ही गोष्ट अगदीं सरळ व प्रामाणिक रीतीनें कबूल करणें मला भाग आहे. हर्बर्ट स्पेन्सरच्या ग्रंथांचा कोणत्याहि योग्य अर्थीं मी अध्येता होतों असा हक्क मला सांगतां येत नाहीं. त्याच्या मोठ्या शिष्यमंडळापैकीं एक म्हणून मला ओळखा असेंहि माझ्या वतीनें मला सांगतां येत नाहीं. हें तुम्हांला माहीतच आहे कीं, हर्बर्ट स्पेन्सरची पहिली इच्छा आपणां सर्वांना माहीत व माननीय अशा एका दुसऱ्या माणसानें (मोर्लेनें) ह्या प्रसंगीं भाषण करावें, अशी होती. त्याची अनुमति त्यानें मागितली व मिळविली होती, आणि त्याचें भाषण मृताची कामगिरी व किंमत ह्यांचें योग्य स्मारक झालें असतें. पण चार वर्षें सारखें, व अखेरीस थकवा आणणारें, असें काम (ग्लाडस्टनचरित्र--लेखन) मि० जॉन मोर्लेनें केलेलें असल्यामुळें आरोग्य व शक्ति ह्यांच्या पुनःसंपादनार्थ भूमध्यसमुद्राच्या किनारीं तो निघाला आहे, आणि हर्बर्ट स्पेन्सरच्या मरणाची वार्ता त्याला सिसिलीच्या किनाऱ्यावर कळली. त्याचा थकवा निघून गेला आहे, त्याची नेहमींची कुवत त्यास पुनः प्राप्त झाली आहे, पण त्याला बलावण्याचा यत्न करणें बरोबर झालें असतें तरी आज त्यास एथें हजर राहणें अशक्य झालें असतें;

आणि मला असें सांगण्यांत आलें की, जॉन मोर्लेला जर स्वतः हजर राहतां आलें नाहीं तर मीं त्याच्या जागीं यावें, अशी इच्छा हर्बर्ट स्पेन्सरनें प्रदर्शित केली होती. हा निरोप मला चार दिवसां-पूर्वीं पाठविला तेव्हां मी उत्तरराजधानींत (एडिंबरो एथें) होतों. मी दुसऱ्या एका कृतिक्षेत्रांत गुंतलेलों व फार भिन्न विचारांत गर्क झालेलों होतों, पण असलें आव्हान मला नाकारतां येईना म्हणून मी एथें आलों; पण ह्या कामगिरीसंबंधानें बरोबर (ती बरोबर रीतीनें पार पडावी अशा) अप्रदर्शित वासना येतात त्यांची तृप्ति मला न करतां आ-ल्यास त्याबद्दल मी माफी मागतों. मृताचे आपण किती अत्यन्त ऋणी आहों ह्याची आनंदानें व कृतज्ञतेनें साक्ष देण्यासाठीं, शरी-रानें नाहीं तर आत्म्यानें; सर्व देशांतील शिकणारांचा व काम कर-णारांचा केवळ मोठा समुदाय आज एथें हजर आहे हें ध्यानांत आणतां मी खरोखर दडपूनच जातों. तथापि स्वविषयक व खाजगी संबंधाचे आणखी कांहीं शब्द बोलण्यास मला कचरतां कामा नये.

माझी हर्बर्ट स्पेन्सरशीं ओळख होऊन आज पुष्कळ वर्षें झालीं, आणि ज्या कुटुंबाचा तो नेहमींचा पाव्हणा व सन्मानित मित्र असे अशा कुटुंबांत प्रवेश करून माझी ओळख ज्यास्त निकट झा-ल्यास,आणि त्याच्याशीं दळणवळण ठेवण्याच्या संधी मला ज्यास्त वारंवार येऊन फलप्रद होऊं लागल्यास, विसांवर वर्षें होऊन गेलीं. त्या कुटुंबांतील स्त्रिया आज येथें हजर आहेत. ज्यांच्या अगदीं लहान-पणच्या स्मरणांत स्पेन्सरची व्यक्ति वसत आहे,ज्या त्याच्या डोळ्यां-खालीं मूलवयांतून मुलगी वयांत आल्या,आणि त्यांतून स्त्रीवयांत आल्या, आणि ज्यांस त्याचें मरण म्हणजे ज्या प्रौढ माणसांच्या सहवासांत त्या जन्मल्या त्यांच्यांतील अखेरच्याचें एथून प्रयाण आहे. त्यांच्या स्मृती कांहीं अंशीं माझ्या स्वताच्या स्मृती बनल्या आहेत, आणि अशा रीतीनें संपादिलेल्या अनुकूल स्थितींतच (त्याचा माझा)

स्नेह वाढला व सहानुभूति वृद्धिंगत झाली; ती सहानुभूति सार्वजनिक कामांच्या संबंधानें अगदीं अलीकडील कांहीं वर्षांत जितकी मोठी, जितकी जोराची व जितकी फलद्रूप झाली, तितकी पूर्वी केव्हांच झाली नव्हती. स्पेन्सरच्या जीविताचा शांतपणें विचार करणाराच्या मनांत येण्यास पहिला विचार, जें काम त्यानें आपल्यासाठीं योजून घेतलें त्याच्या विस्तृततत्वाबद्दल कुतूहलाचा, आणि त्यानें आपल्यास नेमून दिलेलें काम पुरें करण्यास तो जगला याबद्दल कृतज्ञतेचा, व हर्षाचाहि, असला पाहिजे. आपल्या शिरावर घेतलेल्या कामास आश्रय मागण्यासाठीं १८६० सालीं त्यानें जी त्याची रेखाटणी प्रसिद्ध केली ती पुष्कळांस, जीस मूर्त स्वरूप कधींच देतां येणार नाहीं अशा प्रकारची स्वप्नसृष्टिच भासली असली पाहिजे. त्याच्या चिकाटीच्या किंवा निश्चयाच्या भ्रंशाखेरीज ती योजना पुरी होण्यास किती तरी आकस्मिक अडचणी येण्याचा संभव होता आणि खरोखरच असलीं आकस्मिक अनिष्टें लवकरच त्याच्यापुढें दत्त म्हणून राहिलीं हें आपणांस ठाऊकच आहे. त्याच्या प्रकृतीचा एकप्रकारचा नाजूकपणा—ज्याबद्दल, स्पेन्सरचें दीर्घायुष्य मनांत आणतां, तो कदाचित् फाजील भीति बाळगीत होता असें वाटतें—त्याच्या कामाची प्रगति अगदींच बंद करण्याचा नाहीं तरी त्याच्यांत अडथळा आणण्याचा बाऊ दाखवीतच होता.

त्याला मिळालेला आश्रय त्याच्या कामाचा खर्च भागविण्यास अपुरा होता, आणि त्याचें द्रव्यसाधन अशा प्रमाणावर खर्च होऊं लागलें कीं, लवकरच तें अगदीं संपून जाईल असा रंग दिसूं लागला. हा दुसरा अडथळा पहिल्याहून ज्यास्त सुलभ रीतीनें दूर झाला. कारण हें काम लवकरच बंद केलें पाहिजे अशा अर्थाची जेव्हां त्यानें नोटीस काढिली, तेव्हां त्वरित जरूर तेवढी मदत आली. स्पेन्सरला माहीत होते त्याहून ज्यास्त वाचक व शिष्य त्याला आ-

थींच मिळालेले होते, आणि अटलांटिकाच्या पलीकडील (अमेरि- केंतील) मित्र त्याची काळजी दूर करण्यास पुरेशी रक्कम गोळा करण्यास एकत्र झाले. परिणामीं दिसून आलें त्याप्रमाणें, त्याच्या पुस्तकांची विक्री सारखी वाढत जाऊन त्यास लवकरच जरूर ती सर्व मदत मिळूं लागली, आणि त्याच्या विनंतीस अनुसरून त्यास जी विशेष मदत झाली तिची जरूरी भासत नाहींशी झाली.

पण ना बरी, ना वाईट अशी जी त्याची प्रकृति ती त्यास ह्या- हून ज्यास्त काळ राहणारी अडचण उत्पन्न करती झाली. त्याला दररोज थोडेच तास काम करणें भाग पडूं लागलें, आणि मध्यें मध्यें पुष्कळ दिवस तें अगदींच बंद ठेवण्याचे प्रसंग येऊं लागले. म्हणून आश्चर्य हें कीं, त्याच्या कामाचे बेताबेताचेच हप्ते त्याच्या हातून निघणें शक्य असतां, इतकें काम त्याच्या हातून झालें. या जोखमीच्या कामाची पहिली जाहिरात दिल्यापासून त्याचा शेव- टचा खंड निघेपर्यंत छत्तीस वर्षें लोटलीं हें खरें आहे. पण त्याच्या ग्रंथमालेंतील निरनिराळ्या खंडांत किती तरी विस्तृत चवकशी, किती तरी दृष्टान्तसमुच्चय, आणि किती तरी व्यापक सिद्धान्त दिसून येतात बरें ! सर्व इतिहास, सर्व शास्त्र, विचार व विश्वास ह्यांचीं सर्व विविध रूपें, व मानवी प्रगतीच्या सर्व सर्व पायऱ्यांवरील सर्व संस्था त्यानें एकत्र आणिल्या, आणि ह्या असंख्य आधारसमुच्चयांतून जगाच्या उत्क्रान्तीची एक सुसंबद्ध, उजेड पाडणारी, आणि सचेतन करणारी अशी क्लृप्ति बाहेर का- ढिली. पुष्कळ बाह्यतः भासणाऱ्या विसंवादांतून निघणारी ही सुसं- गतता, अनंत भोंवरे, प्रतिनिर्झर आणि पश्चात्प्रवाह ह्यांच्यांतून वाहणारी व त्या सर्वांस आपल्यांत ओढून घेणारी ही सर्वत्र एक असलेली हालचाल, तीच स्पेन्सरची मोठी कामगिरी होय; आणि तीच स्पेन्सरच्या एकामागून एक निघणाऱ्या ग्रंथांच्या वृद्धिंगत

होणाऱ्या वाचकवृंदास पूर्वी कधीं ध्यानांत न आलेली अशी प्रगतिविषयक भव्य व अभिजातकर कल्पना डोळ्यांपुढें आणण्याचा आनंद अनुभवण्यास समर्थ करती झाली. आलीकडील कांहीं वर्षांत ह्या मीमांसेच्या मर्यादितत्त्वाची कांहीं जाणीव जरी उत्पन्न झाली आहे, तरी त्यानें दिलेल्या उपपत्त्यांच्या, सिद्धतेंतील कांहीं पायऱ्यांच्या, अपुरेपणाची चेतना, व त्यांच्या संघटनेंत राहिलेल्या कांहीं खड्ड्यांची शंका जरी उत्पन्न झाली आहे, तरी सुधारलेल्या जगांतील सर्व विविध राष्ट्रांतून, आपला मोठा फायदा झाल्याबद्दलची, विचाराचें नवें क्षेत्र आक्रमिल्याची व आपलेसें केल्याची, आणि माणसाच्या शिक्षणांत व समाजाच्या विकासांत, कधीं गमाविल्या जाणार नाहींत अशा पाय ठेवण्यास कांहीं आधारभूत जागा संपादिल्याची, झालेली लोकांची खात्री जशीच्या तशीच कायम आहे. त्याच्या विवेचनाचा विस्तृत टापू, त्याच्या विवरणाचा जोरदारपणा, त्याच्या महाकल्पनेचा जबर आवांका आणि व्यापकपणा, ह्याबद्दलच्या आपल्या कुतूहलाच्या भरांत आपण हें कधीं विसरतां कामा नये कीं, त्याचा प्रधान व एकनिष्ठ उद्देश व्यावहारिक, सामाजिक, मानवी असा होता. आपल्या योजनेचे सर्व भाग पुरे करण्याइतकें आपलें जीवित बहुधा तगवणार नाहीं असें जेव्हां त्यास वाटलें, तेव्हां आपलें समाजशास्त्रविषयक विवरण मध्येंच अपुरें सोडून, तो व्यक्तिविषयक व राजकीय नीतीचे आधार योग्यप्रकारें निश्चित करण्याचा पुढील उद्योग अगोदर हातीं घेता झाला. सत्याच्या आधारभूत खडकांवर तिचा (दोन्ही प्रकारच्या नीतींचा) पाया रचणें हाच त्याचा पहिल्यापासून अन्तिम उद्देश होता. त्याच्या योजिलेल्या कामाच्या पहिल्या रेखाटणींत त्यानें तो दर्शविला होता, आणि त्याकरितां कराव्या लागणाऱ्या जंगलतोडणीखालींच (पूर्व तयारी करण्याच्या कामाखालींच)

आपण दडपून जाऊं अशी भीति जेव्हां त्यास उत्पन्न झाली, तेव्हां आपल्या योजनचा मुख्य उद्देश साधण्यासाठीं तें (जंगलतोडीचें) काम त्यानें (कांहीं वेळ) सोडून दिलें. त्याच्या पूर्वींच्या विवेचनाच्या मुख्य तत्त्वावरून हा शेवटचा प्रश्न सोडविण्याची किल्ली त्यास सांपडली. शक्तींच्या ज्या आपोआप होणाऱ्या जुळणीमध्यें सर्व विश्वविषयक हालचालींचें स्पष्टीकरण त्यास सांपडलें होतें तसल्याच जुळणीनें मनुष्यसमाजाची वाढ झाल्याचें त्यास आढळून आलें. ह्यावरून व्यक्तिस्वातंत्र्याच्या योग्यतेचें अतिशय मोठें स्तोम करणें, आणि एकाच्या (व्यक्तीच्या) वाढींत पुष्कळांच्या (समाजाच्या) नियमांनीं येणाऱ्या अडथळ्यास आपल्याकडून होईल तितका विरोध करणें आपणास भाग वाटूं लागावें ही गोष्ट स्पेन्सरच्या दृष्टीला अनिवार्यच दिसली. अन्तिम उत्क्रमणाचें खरें स्वरूप ह्या त्याच्या भावनेंत आहे ह्या दृढ समजुतीस आपणास चिकटून राहतां आलें, तरी ही गोष्ट आपण कबूल केली पाहिजे कीं, त्याचीं तत्त्वें समाजास त्याच्या सद्य:स्थितींत एकदम लावतां येतील ही गोष्ट स्पेन्सराच्याइतकी पूर्णपणें आपणांपैकीं पुष्कळांस मान्य करतां येणार नाहीं. (तथापि) आपण (हल्लीं) काय आहों हें जरी आपणांस केवळ अपूर्णपणें समजत आहे, आपण (पुढें) काय होऊं हें जरी अद्यापि आपणास समजत नाहीं, तरी जबरीविना पूर्ण (समाज) व्यवस्था आणि पूर्ण स्वातंत्र्ययुक्त (समाज) सेवा अन्तीं उत्पन्न होईल, असें मानण्यास आपल्यास हरकत नाहीं; आणि आपणास असेंहि प्रतिपादण्याची धिटाई करण्यास हरकत नाहीं कीं, तोंपावेतों हात घालणें हें प्रथमदर्शनीं तरी गैर दिसतें, आणि तें न्याय्य ठरविण्याचा बोजा अद्यापि उचलावयाचाच आहे. त्याच्या मतांतील प्रधान तत्त्वांना विरोधी भासणाऱ्या हालचाली (समाजांत) चालल्या आहेत असें पाहून स्पेन्सरला आलीकडे वाईट वाटत असे हें

खरें आहे; आणि ह्या ठिकाणीं तो मरणाच्या अगोदरच्या आठवड्यांत, त्याशीं प्रथम पूर्ण मतैक्य असलेल्या पण आलीकडे सोश्यालिस्ट बनत चाललेल्या एका मैत्रिणीशीं त्याच्या झालेल्या भाषणास उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाहीं. स्पेन्सर म्हणाला, " आपण (मताच्या बाबतींत) पृथक् झालों आहों, पण आपण जरी भिन्न दिशांनीं चाललों आहों, तरी एकाच उद्दिष्टाकडे चाललों आहों हें मी जाणतों. " ती म्हणाली, " होय, कालें करून सर्वांशीं तुझी नाहीं व सर्वांशीं आमची नाहीं अशी एकादी हा महाप्रश्न सोडविण्याची सरणी स्वीकारिली जाईल असें होण्याचा संभव आहे. " स्पेन्सरनें उत्तर केलें, " होय, असें कदाचित् होईल;" आणि अशा रीतीनें, नवीन कल्पनांचें ग्रहण करण्यास आणि सुधारणेच्या नव्या योजना स्वीकारण्यास तयार असें मन त्याच्या जीविताच्या शेवटच्या आठवड्यांतहि त्याच्या ठिकाणीं दिसून आलें. लवकरच " दोन मुष्टी पांढऱ्या धुळी" प्रत (राखे प्रत) पावणाऱ्या ह्या दीनशवानजीक एथें आपण उभे राहिलों असल्यामुळें, जीविताच्या निर्घृण गोष्टींचा उलगडा करण्याचा स्पेन्सरचा जो शेवटचा शूर प्रयत्न त्याजकडे नजर फेंकण्यासाठीं त्याच्याबरोबर जाण्याचा आपणास अनिवार्यच मोह होतो. आपल्या शेवटच्या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत अन्तिम प्रश्नाशीं त्यानें झगडा केलेला आहे, आणि " विश्वाच्या कोड्या"वरील आपला अखेरचा निकाल विवृत केला आहे. तो त्यांत म्हणतो, " अनंत विस्तार आणि नित्यस्थायी नियम यांनीं युक्त असें जें आकाश तें उत्क्रान्ति व निर्मिति ह्यांनीं आहेत तशा वस्तु बनविण्यापूर्वींपासून अस्तित्वांत आहे ह्या विचारानें आपण अगदीं भेदरूनच जातो ! " ह्याहून ज्यास्त प्रामाणिक अशी नोंद, ह्याहून ज्यास्त विलक्षण अशी कबुली, शक्य नाहीं. ह्या महाविश्वविस्तारांत माणसाचें स्थान कोणतें ? इतका पूर्ण व इतका जोरदार असा तो

(त्याचा) मेंदू व्यापार करण्याचा बंद झाला आहे. आतां (त्याच्या ठिकाणीं) ज्ञानवत्तेचा कांहींच प्रादुर्भाव दिसत नाहीं. ज्या इंद्रियावर ती ज्ञानवत्ता अवलंबून होती तें नष्ट झाल्यावर ती कायम राहूं शकेल काय ? गरीब बिचाऱ्या (शरीररूप) सांगाड्यांत जी व्यक्ति वसत होती, ती स्वतः अविनाश्य आहे असें कबूल करावयाचें कीं काय ? किंवा, ज्या अनंत, सर्वकाल अस्तित्वांत असणाऱ्या अविनाश्य शक्तीची ती एक जातां जातां निघालेली ठिणगी होती तिच्यांत ती पुनः जाऊन मिसळली, असें मुकाट्यानें मानणें आपणास भाग आहे काय ? जर ती भविष्यत्कालीं अविनाश्य असेल, तर ती जशी अस्तित्वांतून जाण्यास अक्षम आहे, तशीच ती पूर्वी अस्तित्वांत येण्यासहि तितकीच अक्षम झाली असली पाहिजे, नाहीं काय ? आमच्या गुरूस (स्पेन्सर यास) ते माहीत नव्हतें. (तें) तो सांगूं शकत नव्हता.

अखेरचें कोडें आमच्या प्रश्नास जुमानीत नाहीं. अज्ञाताचे विस्तार युगायुगांत आपणास कमी करतां येतील, पण आपण लावलेल्या अल्प शोधाच्या मानानें पाहतां, त्यांचें पूर्ण महत्त्व ध्यानांत घेऊनहि, जो विस्तार (अज्ञात असा) शिल्लक राहतो त्यानें आपण नेहमींच भेदरून गेलों पाहिजे. अज्ञेयाच्या कांहीं बारीक कडा अद्यापिहि कदाचित् आपल्यास ज्ञात होऊं शकतील, पण महा मुख्य गूढ आपल्या समजुतीच्या पलीकडचेंच आहे. तथापि दोन विचार ध्यानांत घेण्यासारखे आहेत. जरी जिच्यांत कोणासहि काम करतां येत नाहीं अशी रात्र येते, तरी दिवस आहे तोंपावेतों आपणास काम करतां येणार आहे. जर आपण काम करूं शकलों तर जें उदात्त आहे, जे स्फूर्तिकारक आहे, जें माणसाच्या जीविताला रुंद, खोल आणि बळकट करणारें आहे, त्याकरितां झटणें कसें तरी आपल्या शक्तींतील आहे. आपणास आपलें जी-

वित सर्वश्रेष्ठ अशा चांगल्याच्या सेवेस अर्पितां येण्यासारखें आहे. स्पेन्सरच्या जीविताकडे पाहतां आपणास असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, त्यानें अशा धर्तीवर उद्योग केला, आणि त्याच्या धर्म-विश्वासाहून ज्यास्त निश्चित धर्मविश्वासजन्य समाधानाचा उपभोग घेणाऱ्या कोणत्याहि माणसास जितक्या वास्तविकपणें व शूरपणें आत्मार्पण करतां येईल तितक्या वास्तविकपणें व शूर रीतीनें त्यानें आत्मार्पण केलें. ज्यानें केलेली कामगिरी कायम राहिली आहे, ज्याचे शब्द अजून बोलत आहेत, ज्याच्या प्रभावाची वाढ पिढी-ते पिढी अद्यापि जाऊं शकणार आहे, त्या ह्या आत्म्यास, तर मग, शब्दांच्या शक्य तितक्या पूर्ण अर्थीं " शुभास्ते पंथानः सन्तु " (Fare well) असें आपण म्हणण्यास हरकत नाहीं. "

त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं त्याची राख हायगेट एथील स्म-शानभूमीस नेली, आणि आज कित्येक वर्षें त्यानें तयार करून ठे-विलेल्या दगडी खोलींत सुरक्षित ठेविली. त्याच्या सूचनेप्रमाणें त्या खोलीवरील दगडावर त्याचें नांव, त्याचा जन्म व मृत्यु यांच्या तारखा, आणि त्याचें वय, एवढींच नोंदिलीं आहेत.

त्याच्या मृत्यूनें मोठीच हानि झाली असें सर्वत्रांस मनःपूर्वक वाटलें हें जगाच्या सर्व भागांतून आलेल्या पत्रांवरून व्यक्त झालें. इंग्लंदांतील व इतर देशांतील सभांनीं त्याच्या मृत्यूबद्दल उत्सुकतेनें खेद दर्शविण्यांत जणूं काय एकमेकांशीं प्रतिस्पर्धाच केली. इटली-मधून तर प्रतिनिधिसभा व प्रधानमंडळ ह्या दोघांनींहि दुखवट्याचे निरोप पाठविले.

प्रेतदहनाच्या समयीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें श्यामजी कृष्णवर्मा यानें हर्बर्ट स्पेन्सरच्या नांवानें वार्षिक व्याख्यानें होण्यासाठीं आ-क्सफर्ड युनिव्हर्सिटीला एक हजार पौंड नजर केले. त्याप्रमाणें १९०५ सालीं फ्रेडरिक हारिसन, १९०६ सालीं माजी ऑबेरॉन

हर्बर्ट, आणि १९०७ सालीं मरहूम फ्रान्सिस गाल्टन यांची व्याख्यानें झालीं. श्यामजी कृष्णवर्मा याच्या बेबंदशाहीस अनुकूल अशा राजकीय मतांमुळें, आक्सफर्ड युनिव्हार्सिटीनें ही रकम त्याची त्यास आतां परत केली आहे.

स्पेन्सरचें एकराष्ट्रीय किंवा अनेकराष्ट्रीय कांहीं योग्य स्मारक उभारून परवानगी मिळाल्यास तें वेस्टमिन्स्टर आबेमध्यें ठेवावें यासाठींहि इंग्लंदांत चळवळ झाली, आणि त्यासंबंधानें शास्त्रज्ञ, धर्माध्यक्ष, सरदार अशा पन्नाससाठ नामांकित गृहस्थांच्या सह्यांचें पुढील पत्र प्रो॰ मेल्डोला यानें ता॰ ३० एप्रिल रोजीं त्या देवळाच्या डीनकडे पाठविलें. “ मरहूम हर्बर्ट स्पेन्सर याचे कित्येक मित्र, चहाते आणि शिष्य यांचें, त्याचा तात्त्विक विषयांचा आमरण व्यासंग व सर्व जगांतील प्रस्तुतकालीन विचारांवर पगडा हीं ध्यानांत घेऊन ह्या देशांत कांहीं योग्य स्मारक करावें असें मत पडल्यामुळें, त्यांनीं असें ठरविलें आहे कीं, असें स्मारक (पुतळा) ठेवण्यास वेस्टमिन्स्टर आबे हें योग्य स्थळ होणार आहे. तत्त्वज्ञान, शास्त्र, व शिक्षण ह्यांच्या क्षेत्रांत स्पेन्सरच्या लेखांचा जो महत्त्वाचा व उत्तेजक परिणाम घडला आहे तो ध्यानांत घेऊन, आह्मां खालील सह्या करणाऱ्या लोकांस अशी विनंति आपल्यास करणें न्याय्य दिसतें कीं, ह्या उद्देशाकरितां अनेक राष्ट्रांचा फंड मिळून जमा झाल्यास आपण आबेमध्यें (स्मारकास) जरूर तेवढी जागा द्यावी. ”

वरील पत्रावर सह्या करणारांमध्यें डेव्हन शायरचा ड्यूक, लार्ड एव्हबरी, लार्ड रे, लार्ड हॉबहौस, हावर्ड कॉलिन्स, एडवर्ड क्लॉड, लिओनार्ड कोर्टने, फ्रान्सिस डार्विन, सर ग्रांट डफ, फ्रान्सिस गाल्टन, हाल्डेन, डा॰ हूकर, नार्मन लॉकीयर, विल्यम हगिन्स, प्रो॰ मार्शल, मायकेल फॉस्टर, जेम्स वार्ड, इत्यादि सुप्रसिद्ध गृहस्थ होते.

ह्या पत्रास वेस्टमिन्स्टर आबेच्या डीनकडून ता॰ १७ जून

१९०४ चें पुढील उत्तर प्रो० मेल्डोलाकडे आलें:—" मरहूम हर्बर्ट स्पेन्सर याचें स्मारक वेस्टमिन्स्टर आबेमध्यें करण्यासाठीं तूं जेव्हां प्रथम खाजगी रीतीनें मजकडे आलास, तेव्हां पूर्वक्रमानुसार मीं असें उत्तर दिलें कीं, ह्या विनंतीस जे आधार असतील ते सांगून जर मजकडे रीतसर विनंती आली, आणि त्याजवर जर थोडच्या वजनदार लोकांच्या सह्या असल्या, तर त्याचा खोल विचार करणें माझें कर्तव्य होईल. तुझ्या धोरणासाठीं मीं तुला असेंहि म्हटलें होतें कीं, पुढील दोन प्रश्नांच्यासंबंधानें तुमच्याकडून माझी खात्री होणें जरूर आहे:—(१) आपल्या देशबांधवांच्या स्मारकासाठीं आबेमध्यें ज्या फार थोड्या रिकाम्या जागा शिलक आहेत त्यांतील एक त्याला देणें योग्य होईल इतक्या महत्त्वाची भर हर्बर्ट स्पेन्सरनें इंग्लिश विचारांत (तत्त्वज्ञानांत) घातली आहे काय ? (२) हर्बर्ट स्पेन्सरचें ख्रिस्ती धर्माच्यासंबंधानें त्याच्या लेखांत व्यक्त झालेलें मतधोरण शत्रुत्वापेक्षां त्रिशंकुत्वाचें ज्यास्त आहे, आणि त्याचें स्मारक एका ख्रिस्ती देवळांत ठेवणें अयोग्य होणार नाहीं अशा प्रकारचें आहे, असें योग्य रीतीनें म्हणतां येईल काय ? मीं आणखी असें म्हटलें होतें कीं, ह्या दोन मुद्यांसंबंधानें निकाल केल्यानंतर, मी स्वत: आपल्याच विचाराच्या धोरणानें (ह्या बाबतींत) सर्वांशीं जाणार नाहीं, जे तज्ज्ञ म्हणून समजले जातात अशा माणसांचीहि मी मदत (सल्ला) घेईन.

आतां जें पत्र तुमच्याकडून मजकडे आलें आहे, त्यांत हर्बर्ट स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानविषयक आमरण व्यासंगास आणि सर्व जगांतील प्रस्तुतकालीन विचारावरील त्याच्या पगडच्यास तुम्हीं उल्लेख केला आहे, आणि तत्त्वज्ञान, शास्त्र, व शिक्षण ह्यांच्या क्षेत्रांतील स्पेन्सरच्या लेखांच्या उत्तेजक परिणामाच्या आधारावर प्रस्तुत विनंति केली आहे. मला वाटतें, उत्क्रान्तीची सामान्य कल्पना सर्व लोकांच्या

मनाला परिचित करून देण्यामध्यें आणि ती कल्पना मोठ्या धै-
र्यानें मानवी विचार व क्रिया ह्यांच्या विविध खात्यांना लावण्या-
मध्यें त्यानें जी कामगिरी बजाविली आहे ती विशेषतः ध्यानांत
घेतां, तुम्हीं स्पेन्सरच्या कामाची अशी जी पसंती दर्शविली आहे
ती बहुतेक सर्वांना मान्य होईल. परंतु, मी पाहतों कीं, तात्त्विक
विचार करणारा या नात्यानें स्पेन्सरला उच्चस्थान मिळालेलें आहे
किंवा मिळेल असें (तुम्ही) स्मारकवाले म्हणत नाहींत. तत्त्वज्ञानां-
तील किंवा भौतिक शास्त्रांतील कोणत्या महत्त्वाच्या पराक्रमाशीं
किंवा विचारामध्यें घातलेल्या कोणत्या कायमच्या भरीशीं त्याचें
नांव संलग्न झालेलें आहे, असें जेव्हां मी विचारितों तेव्हां मला
समाधानकारक उत्तर मुळींच मिळत नाहीं. त्याच्या तात्त्विक संघ-
टनोविरुद्ध अत्यन्त कडक टीका झालेली आहे, आणि भौतिक व
आध्यात्मिक ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांवरील त्याचीं जीं मतें
त्यांवर तज्ज्ञांनीं कडक आक्षेप घेतलेले आहेत. तो आपल्या पिढी-
मध्यें उच्चस्थानापन्न झाला होता, व मोठ्या प्रमाणावर विचारो-
त्तेजक होता, हें खरें आहे. पण त्याची कामगिरी जर टिकाऊ
दर्जाची नसेल, तर जो (वेस्टमिन्स्टर आबेमध्यें पुरून घेण्याचा)
राष्ट्रीय सन्मान हल्लीं अनिवार्य करणास्तव फारच थोड्या लोकांस
दिला जातो, त्याला ह्या विशेषांवरून त्याचा उच्चतम हक्क पोहों-
चत नाहीं; आणि मि० स्पेन्सरनें जे सिद्धान्त स्थापन केले आहेत
त्यांना भविष्यत्कालीं खात्रीनें मान्यता मिळेल, असा पुरावा मला
शोधांतीं सांपडलेला नाहीं. इतकें म्हटल्यावर, ज्या तत्त्वज्ञानें
ख्रिस्ती धर्म आपल्या :विचारसंघटनेंतून मुद्दाम गाळिला त्याचें
स्मारक ख्रिस्तीपूजेचें स्थान ह्या दृष्टीनें वेस्टमिन्स्टर आबेमध्यें करूं
देणें योग्य होईल किंवा नाहीं, ह्या प्रश्नांत शिरण्याची जरूरी नाहीं.
कदाचित् हें एथें सांगणें बरोबर होईल कीं, धर्मविषयक मतांत

ज्यांचा मोठा मतभेद आहे असे कित्येक लोक ह्या प्रश्नास एकमतानें नकारार्थीं उत्तर देत आहेत. पण याबरोबरच हेंहि कबूल करण्याची माझी इच्छा आहे कीं, धर्ममतांविरुद्ध त्याचा पूर्ववयांत जो जलालपणा होता, तो त्याच्या " आत्मचरिता " च्या अखेरच्या पृष्ठांकडे पाहतां, ठळकरीत्या कमी झालेला दिसतो.

वर दिलेल्या कारणास्तव, नामांकित गृहस्थांच्या शिफारशीनें मजकडे आलेली ही सूचना नाकारणें मला भाग पडत आहे. ज्यांस मीं केलेला हा निकाल चुकीचा वाटेल त्यांनीं त्याबद्दल मला ह्या मुद्द्यावर क्षमा करावी म्हणून विनंति करितों कीं, जर मी चुकलों असन तर एक मोठी जबाबदारी बजावण्यामध्यें सावधगिरीच्या बाजूनें मी चुकलों आहें, आणि अशा प्रकारच्या बाबतींत झालेली चूक पुढच्या एकाद्या पिढीस सन्मान्य रीतीनें दुरुस्त करतां येईल (त्याचें स्मारक ठेवण्याची परवानगी देतां येईल). मी विनंती करितों कीं, मेहरबानी करून हें उत्तर (तुझ्या द्वारा आलेल्या) पत्रावर सह्या करणारांकडे पोंचतें करावें. "

तात्त्विक विचार करणारा ह्या नात्यानें स्पेन्सरला उच्चस्थान मिळालेलें आहे किंवा नाहीं ह्याबद्दल वरील पत्रांत डीन रॉबिन्सननें जो कोटिक्रम केला आहे, त्यासंबंधानें एवढें म्हणणें पुरे दिसतें कीं, वर ज्या अनेक शास्त्र, तत्त्वज्ञान व वाङ्मय ह्यांतील नामांकित गृहस्थांचीं नांवें सांगितलीं आहेत त्यांना आपली विनंति विशेष विचार करण्यासारखी आहे किंवा नाहीं हें पूर्णपणें माहीत होतें, आणि त्याचें स्मारक ठेवून घेण्यास वेस्टमिन्स्टर आबे योग्य स्थान होईल असें जें त्यांनीं म्हटलें होतें, तें विचारपूर्वक, प्रामाणिकपणानें आणि कांहींच किंतु मनांत न बाळगतां म्हटलें असलें पाहिजे. डीनसाहेबांचा हा निकाल योग्य समजणें त्या वेळीं जर लोकांना कठीण गेलें, तर तें त्यानंतर ज्यास्तच कठीण झालें आहे-

कारण १९०४ च्या मे महिन्यांत "जो राष्ट्रीय सन्मान हल्लीं अनिवार्य कारणास्तव फारच थोड्या लोकांस दिला जातो" त्याला एका तत्त्वज्ञाचा उच्चत्तम हक्क डीननें जर नाकबूल केला, तर १९०५ च्या आक्टोबर महिन्यांत एका नटाचा (सर हेन्री आयर्व्हिंग याचा) तसला हक्क त्यास कबूल झाला. ह्यावरून, 'इंग्लंदांत तत्त्वज्ञानाची किंमत फार थोडी समजतात', अशी जी जर्मन तत्त्वज्ञ हेजेल टीका करीत असे, ती वावगी म्हणतां येत नाहीं.

जे ख्रिस्तीधर्माचा बाणा करितात व आपणास ख्रिस्ती म्हणवितात त्यांचींच स्मारकें वेस्टमिन्स्टर आबेमध्यें ठेवावीं किंवा नाहीं ह्या प्रश्नाची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे, व आह्मांस त्याची आवश्यकताहि नाहीं; पण ख्रिस्ती लोकांना ख्रिस्तीधर्मांत नेण्यासाठीं हर्बर्ट स्पेन्सर यास आपलें काम वरचेवर बाजूस ठेवणें आपलें कर्तव्यसें वाटत असे ह्या गोष्टीची प्रस्तुत ग्रंथाच्या वाचकांस आठवण देण्याची जरूरी दिसत नाहीं. शिवाय त्याचें स्मारक वेस्टमिन्स्टर आबेमध्यें ठेवण्याची त्याच्या मित्रांनीं व चाहात्यांनीं उदार व शुद्ध मनानें केलेली ही खटपट त्याला स्वताला पसंत पडली असती किंवा नाहीं ह्याबद्दल संशयच वाटतो. त्याचें स्मारक ह्या भूतलावावरील प्रत्येक विचारी माणसाच्या अंतःकरणांत नेहमींच कायमचें होणार आहे, आणि मूर्त स्मारकाहून ह्या अमूर्त स्मारकाचीच किंमत किती तरी अधिक आहे.

प्रकरण अठ्ठाविसावें

निरिंद्रिय उत्क्रान्ति

निरिंद्रिय सृष्टीला उत्क्रान्तिमत कसें लागू पडतें ह्याबद्दल गत प्रकरणांतून बहुतेक कांहींच सांगितलेलें नाहीं. स्पेन्सरनें आपल्या योजनेंतून हा भाग गाळिला होता, ह्यास एक कारण त्याशिवायहि त्यानें रेखाटलेली योजना फारच विस्तृत होती, हें होतें; आणि दुसरें कारण, सेंद्रिय सृष्टीची उपपत्ति लावणें त्याहून ज्यास्त महत्त्वाचें त्यास वाटत होतें हें होतें. हीं दोन कारणें जरी योग्य आहेत, तरी सृष्टीच्या त्या भागालाहि उत्क्रान्तीचीं तत्त्वें जर स्पेन्सरनें रीतसर लावून दाखविलीं असतीं तर तें सर्वांसच आवडलें असतें. आणि कांहीं लोक त्यानें तसें न केल्याबद्दल त्यास दोषहि देतात. पण अर्थात् तें बरोबर दिसत नाहीं.

शिवाय निरिंद्रिय सृष्टीला त्यानें आपलीं तत्त्वें मुळींच लावून दाखविलीं नाहींत हेंहि म्हणणें चुकीचेंच आहे. तो आपली संघटनात्मक मीमांसा लिहीत असतां त्या छत्तीस वर्षांत हा विषय तो आपल्या विचारांत वरचेवर घेत असे इतकेंच नाहीं, तर आपली त्या मीमांसेची योजना प्रसिद्ध करण्यापूर्वीं देखील दोनदां त्या विषयाकडे तो वळला होता. म्हणून त्यासंबंधाचा त्याचा जो पत्रव्यवहार उपलब्ध आहे त्याचा समावेश स्वतंत्ररीत्या या प्रकरणांत करूं.

प्रथम जेव्हां तो इंजिनियरीमध्यें शिरला, तेव्हां त्याच्या धंद्याच्या विषयाखेरीज दोन शास्त्रीय विषयांचा तो विचार करावयास लागला होता ज्योतिःशास्त्र, व भूगर्भशास्त्र. त्यानें आपल्या बापास १८३८ ते १८४१ या दरम्यान लिहिलेल्या पत्रांत ज्योतिःशास्त्रविषयक

प्रश्नांची चर्चा वरचेवर केलेली आढळते. भूगर्भशास्त्राचा विषय त्यानें मनःपूर्वक १८४० त हातीं घेतला, आणि तो ज्या वेळीं आगगाडीच्या रस्त्यांच्या पहाण्या करण्यांत गुंतला होता, त्या अमदानींत त्याला त्या विषयाची प्रत्यक्ष माहिती करून घेण्याच्या पुष्कळ संधि सांपडल्या. कार्बनयुक्त थर पृथ्वीच्या पोटांत बनत असतां पृथ्वीच्या वातावरणांतून जो कार्बन पृथक् झाला, त्यामुळें त्या वातावरणांत उत्पन्न झालेल्या फेरबदलाचे आपले तर्क त्यानें 'फिलॉसॉफिकल मागाझीन' नामक एका तत्त्वज्ञानविषयक मासिकांत १८४३–४४ सालीं गोंवून दिले. त्याच मासिकांत १८४७साली त्यानें "पृथ्वीचा आकार तिच्या मूळच्या द्रवस्थितीची साक्ष मुळींच देत नाहीं" अशा अर्थाचा एक निबंध प्रसिद्ध केला. १८९१च्या मे–जूनच्या सुमारास तेजोमेघघटक द्रव्यांच्या संबंधाची एक क्लृप्ति तो तयार करण्यांत गुंतला होता. सर जॉन हर्शेल व प्रो० एअरी यांना त्यानें पत्रें पाठवून असें विचारिलें होतें कीं, "तेजोमेघघटक द्रव्यांचें घनीभवन चाललें असतां त्याला प्रदक्षिणारूप गति कां प्राप्त झाली पाहिजे हें कोणीं दाखविलें आहे काय?" त्यासंबंधानें त्यानें आपल्या बापास असें लिहिलें:— "त्यांच्या उत्तरांवरून असें दिसतें कीं, माझी कल्पना नवी आहे; म्हणून मला वाटतें, प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचा शोध मीं लाविलेला आहे. मी त्याजवर एक लेख "फिलॉसॉफिकल मागाझीन" कडे लिहून पाठवीन." तथापि एकदम मासिकाकडे धांव घेण्याची घाई त्यानें केली नाहीं; कारण, 'मी लवकरच तो पुरा करणार आहें' असें जरी त्यानें आपल्या बापास १८९२ सालीं लिहिलें, तरी त्यानंतर "मानसशास्त्राचीं तत्त्वें" लिहिण्यांत तो गुंतला असल्यामुळें, आणि पुढें त्याची प्रकृति बिघडल्यामुळें त्यानें तें काम कित्येक वर्षें तसेंच ठेवून दिलें. पुढें १८९८ च्या वसंतांत त्यास निश्चित स्वरूप येऊं लागलें. त्यासंबंधानें त्या वर्षाच्या मे महिन्यांत

तो आपल्या बापास लिहितोः—" 'तेजोमेघविषयक क्लृप्ति' सुंदर रीतीनें आकारास येत आहे. त्या निबंधांत नवें असें पुष्कळ दिसेल, आणि मला वाटतें त्यांतील कोटिक्रम निर्णायक बनेल. त्यांतील नवीन नवीन गोष्टींवर माझें व डा॰ टिंडालचें बोलणें झालें, कारण त्या गोष्टी भौतिक शास्त्राच्या आधारावर लिहिलेल्या होत्या. तो माझे सर्व सिद्धान्त बरोबर आहेत असें म्हणतो; तो जरी ते सर्व कबूल करण्यास तयार नाहीं, तरी ते कडक विचारान्तीं ठरविलेले आहेत, व प्रसिद्ध करण्यास अगदीं योग्य आहेत, असें त्याचें मत आहे."

तो लेख प्रसिद्ध झाल्यानंतर कांहीं महिन्यांनीं तो लिहितोः—" त्याला सर्वत्र अनुकूल अभिप्राय मिळत आहेत, आणि तो बेडन पॉवेलचा म्हणून समजला जात आहे." १८५९ च्या प्रारंभींचे कांहीं महिने " अयुक्तिक भूगर्भशास्त्र " हा लेख " युनिव्हर्सल रिव्ह्यू" ह्या मासिकासाठीं तयार करण्यांत त्यानें घालविले. " तेजोमेघविषयक क्लृप्ति " ह्या निबंधाचा मूळ उद्देश जसा असें सिद्ध करण्याचा होता कीं, लॉर्ड रॉस ह्याच्या दुर्बिणींतून दिसणाऱ्या चमत्कारांवरून काढिलेलीं अनुमानें सर्व (तेजोमेघ तारापुंजच आहेत अशा प्रकारचीं) चुकीचीं आहेत, तसा " अयुक्तिक भूगर्भशास्त्र " ह्या निबंधाचा उद्देश भूगर्भशास्त्रज्ञांच्या कोटिक्रमांतील विसंगत प्रकार दाखविण्याचा होता. त्याची कल्पना अशी होती कीं, निरिंद्रिय उत्क्रान्तींचे हे जे दोन भाग त्यांच्यावर हे दोन निबंध लिहिल्यामुळें, जी त्याची तत्त्वमीमांसाविषयक योजना हळूहळू ज्यास्त विस्तृत व निश्चित होत होती, तिला फार मदत झाली. १८५८ च्या पहिल्या पहिल्या महिन्यांत रेखाटलेल्या रूपरेखेंत पहिल्या खंडांत " ज्ञेय " व " अज्ञेय " हे दोन भाग आल्यावर " ज्योतिर्विषयक

उत्क्रमण " व " भूगर्भविषयक उत्क्रमण " असे दोन भाग याव-याचे म्हणून दाखविलेलें होतें.

ह्या पहिल्या खंडाच्या दुसऱ्या एका रूपरेखेंत ह्या तिसऱ्या व चवथ्या भागांतील विषय ज्यास्त विस्तृत रीतीनें असे दिलेले आहेत:- भाग ३—**ज्योतिर्जनितीचीं तत्त्वें.** प्रकरण १. प्राथमिक विश्वजनित्या. २. उत्क्रमणाचे विचारदृष्ट्या संभव. ३. तेजोमेघ कोठें आहेत ? ४. तेजोमेघ काय आहेत ? ५. धूमकेतू. ६. सूर्य व ग्रह ह्यांच्या गती. ७. सूर्य व ग्रह ह्यांचीं विशिष्ट आकर्षणें. ८. सूर्य व ग्रह ह्यांचें उष्णतामान. ९. आपली तारकामाला. १०. भविष्यत् स्थिति.: भाग ४—**भूगर्भजनितीचीं तत्त्वें.** प्रकरण १. अग्निजात विकास. २. जलजात विकास. ३. भूगोलविषयक विकास. ४. वातावरणविषयक विकास. ५. रासायनिक विकास.

ह्यानंतर दोन वर्षांनीं प्रसिद्ध केलेल्या रेखाटणी—पत्रकांत ज्योतिर्विषयक व भूगर्भविषयक उत्क्रमण जें त्यानें गाळिलें त्यांत त्याचा उद्देश ह्या विषयांचा विचार मुळींच करावयाचा नाहीं असा नसून जीवित, मन, समाज व नीति ह्यांचें जितकें सविस्तर विवेचन करावयाचें, तितकें त्यांचें करावयाचें नाहीं, असा होता. हें विवेचन करतांना स्पष्टीकरणाचा कोणता मार्ग त्यानें स्वीकारिला आहे, हें " आदितत्त्वें " या ग्रंथाच्या वाचकांस माहीतच आहे. कारण " शक्तीचें रूपान्तर व समीभवन ", " गतीची दिशा ", आणि " गतीची तालबद्धता " ह्यांच्या कार्यांचा विचार सेंद्रिय व सेंद्रियोत्तर रूपान्तरांच्या संबंधानें करण्यापूर्वी ज्योतिर्विषयक व भूगर्भविषयक रूपान्तरांसंबंधाचीं त्यांचीं उदाहरणें त्या ग्रंथांत त्यानें दिलेलीं आहेत. " उत्क्रान्तीचा नियम ", " समस्वरूपाची अस्थिरता ", " परिणामांचें बहुलीभवन ", " विभक्तीकरण ", आणि " समतोलन " ह्या प्रकरणांतहि तोच मार्ग त्यानें स्वीकारिलेला आहे

" अपक्रान्तीचा " विचार करतांना सहजच उलट क्रम स्वीकारिलेला आहे. हीं सर्व प्रतिपादनें एकत्र केल्यास, त्यास पुरेसा वेळ, शक्ति, व ज्ञान उपलब्ध झालीं असतीं तर " ज्योतिर्जनितीचीं तत्त्वें ", आणि " भूगर्भजनितीचीं तत्त्वें " हीं कशीं बनलीं असतीं ह्याची स्थूल कल्पना आपल्यास होण्यासारखी आहे.

" विद्युत् म्हणजे काय आहे ? " या मथळ्याचें त्याचें एक पत्र ता० १९ नवंबर १८६४ च्या " रीडर " पत्रांत प्रसिद्ध झालें. त्यासंबंधानें पुढें नऊ वर्षांनीं (ता० १२ नवंबर १८७३ रोजीं) डा० यूमन्स यास लिहितांना त्यानें असें म्हटलें आहे:---" हें पत्र लिहावयास सुरवात केल्यावर विद्युद्विषयक जी क्लृप्ति " रीडर " मध्यें मीं प्रतिपादिली आहे व " निबंधसंग्रहां " त प्रसिद्ध केली आहे, तिचा एक फांटा ह्या इतक्या दीर्घ कालानें मला सुचला आहे. म्हणून मी त्यास एक ताजा-कलम तयार करण्यांत गुंतलों आहें; तें छापिल्यावर टिंडाल व इतर तज्ज्ञ यांस तें दाखवीन, आणि तें त्यांनीं चुकीचें न ठरविल्यास, ' निबंधसंग्रहा'च्या अमेरिकेंतील आवृत्तीस जोडण्याकरितां त्याची एक प्रत तुला पाठवीन. "

हें त्याचें ताजा कलम वाचिल्यानंतर प्रो० टिंडाल त्यास लिहितो:— " मीं तुझा निबंध बारीक दृष्टीनें वाचण्यापेक्षां चाळून पाहिला आहे. त्यांत नेहमींची खोल दृष्टि व्यक्त होत आहे; पण तो आहे तसा प्रसिद्ध न करण्याचा सल्ला मीं तुला दिल्यास तूं मला माफ करशील काय ? त्याचा उद्देश मोठा महत्त्वाकांक्षेचा आहे, आणि मला स्पष्टपणें वाटतें, तो साध्य झालेला नाहीं. तूं जर तो केवळ " तर्क " म्हणून छापिशील, आणि " स्पष्टी " करण म्हणून नव्हे, तर मुळींच नुकसान होणार नाहीं. पण मला वाटतें, तो हल्लींच्या स्वरूपीं प्रसिद्ध केल्यास नुकसान होईल. माझ्या मनांत वरचेवर तुला असें सांगण्याचें आलें होतें कीं, " शक्तीचें नित्यस्था-

यित्व " वगैरे तुझीं प्रकरणें मला समाधानकारक कधींच वाटलीं नाहींत. एक अस्पष्ट, आणि मी कबूल करितों कीं, मला अगदीं असमाधानकारक वाटणारें, असें पुस्तक तूं आपल्यास मार्गदर्शक म्हणून घेतलें आहेस. तुझ्या ग्रंथाचा अर्ध्याहून मोठा भाग मला इतक्या लोकोत्तर योग्यतेचा वाटतो (कारण त्यांत आपले उत्तम विचार अत्यन्त विशद भाषेंत तूं गोंविले आहेस) कीं, ज्या प्रकरणांस मीं उल्लेख केला आहे तिकडे तूं केलेल्या संक्रमणाबद्दल मला ज्यास्तच वाईट वाटतें. मला वाटतें, तीं पुनः लिहिलीं पाहिजेत असें माझें मत तुला कांहीं दिवसांपूर्वीं मीं कळविलें होतें.

अणूंना हालविल्यानें दूर स्थळीं आकर्षण व उत्सारण कशीं उत्पन्न होतील ह्याबद्दलचा तूं विचार केला असल्यास, त्या विचारापासून काय निष्पन्न झालें हें त्वां सांगितलें पाहिजे. तूं ह्या प्रश्नाचा विचार जर केला नसशील, तर, मला वाटतें, विद्युद्विषयक मुख्य चमत्काराकडे तुझें दुर्लक्ष झालेलें आहे. मला कामाची गर्दी आहे, आणि म्हणून मी थोडक्यांत लिहीत आहें. तूं मला माझ्या स्पष्टवक्तेपणाबद्दल क्षमा करशीलच. प्रतिपक्षाला जय मिळविण्याची संधि येईल असें, तुझें नांव घातलेलें कांहींहि प्रसिद्ध झाल्यास मला खचीत फार वाईट वाटेल. "

यावर ता० २२ दिजंबर १८७३ रोजीं स्पेन्सरनें त्यास असें लिहिलें:—" हें ताजा कलम आहे तसें छापणें अनिष्ट आहे ह्याबद्दल तुझ्याशीं माझें पूर्ण मतैक्य आहे. खरोखरच त्याच्यावर टीका होऊन मला तें सुधारावें लागेल ह्या अजमासानेंच मीं तें लिहिलें. माझा स्पष्ट उद्देश असा होता (पण माझ्या लक्षांत येतें कीं मीं तो ज्यास्त स्पष्ट करावयास पाहिजे होता) कीं, तीं क्लृप्ति केवळ ' तर्क ' म्हणूनच पुढें आणावी; कारण भौतिकतत्त्वांशीं ती इतकी सुसंगत दिसते कीं, ती विचार करण्यास योग्य अशी दिसते, आणि

समाधानकारक अशा दुसऱ्या एखाद्या स्पष्टीकरणाच्या अभावीं विशेषतःच योग्य दिसते. क्लार्क माक्सवेलकडून मला दुसरें एक पत्र आलें आहे; अणुविषयक गतींवरील त्यांतील मतें पाहून मी दचकून गेलों आहें; त्याजबद्दल तुझ्याशीं बोलण्याची मला फार इच्छा आहे. ही मतें तुझीं आहेत म्हणून मी समजत होतों, व सामान्यतः पुष्कळांचीं आहेत म्हणून समजत होतों, त्यांपासून मला तीं भिन्नशीं दिसतात. " शक्तीचें नित्यस्थायित्व " ह्या प्रकरणासंबंधाच्या तुझ्या पुनः सूचनेबद्दल मी तुझे आभार मानितों. तुझ्या पसंतीस पडेल असें त्यास रूप देण्याची मी उमेद बाळगितों. तें व त्याच्या पूर्वींचीं दोन प्रकरणें मी पुनः तयार करीत आहें. "

प्रो० क्लार्क म्याक्सवेल ह्याजकडे तो निबंध पाठवितांना, तेजोमेघविषयक घनीभवनासंबंधाच्या स्पेन्सरच्या मतांसंबंधानें प्रो० किंग्डन क्लिफर्ड याजपाशीं प्रो० म्याक्सवेलनें काढिलेल्या एका उद्गारास उल्लेख केलेला असावासें वाटतें; कारण तो उत्तरीं स्पेन्सर यास ता० ९ दिजंबर १८७३ रोजीं असें लिहितोः—" तेजोमेघांच्या घनीभवनासंबंधानें प्रो० क्लिफर्डला मीं काय म्हटलें होतें तें सर्व मला आठवत नाहीं. मला वाटतें तें तुझ्या " आदितत्त्वां"च्या जुन्या आवृत्तींतील एका प्याऱ्यासंबंधानें होतें, आणि त्यानंतर तुझ्या ग्रंथाशीं अंमळ ज्यास्त परिचय केल्यावरून मी असें समजलों कीं, तुझ्या स्वताच्या मनांत जी उत्क्रान्ति–सरणी चालली आहे तिचें तें तितक्यापुरतें स्वरूप आहे. गणितज्ञांनीं आपले विचार नेहमीं एकाच मार्गांनीं केले असल्यामुळें त्यांच्या विचारक्षेत्रास त्यांनीं एकप्रकारच्या आगगाडीच्या मार्गजालाचें (उभें) स्वरूप दिलें आहे, आणि त्यामुळें आडव्या प्रदेशांतील तर्कांकडे त्यांचें दुर्लक्ष होण्याचा संभव असतो. जो कोणी एकादी सरणी बनविण्याचा यत्न करितो त्यास त्याची ती सरणी त्याच्या भोंवतीं वाढण्याचें, आणि

तो चाळीसांचा होण्यापूर्वीं त्यास तिनें गुरफटून टाकण्याचें क्वचि-
तच बंद करतां येतें. म्हणून तीस आकारपूर्ण बिलोरी खड्यांचें
(कठीण, न लवणारें) स्वरूप येण्यास अडथळा करण्यासाठीं कांहीं
तरी द्रव्य तिच्यांत टाकणें आणि अशा रीतीनें ती सरणी स्वरूपा-
न्तर पावण्यास क्षम (लवचीक) ठेवणें, शहाणपणाचें असतें. मला
वाटतें, मेणबत्त्या करणारे ह्यासाठीं आर्सेनिकचा (विषारी द्रव्याचा)
उपयोग करीत असतात.....पण तूं आपल्या एकंदर तत्त्वमीमांसा-
सरणीच्या उत्क्रमणसरणीस खो न घालतां तिच्या भागाचे खडे ब-
नण्याच्या पद्धतीस आळा घालूं शकतोससा दिसतोस, आणि म्ह-
णून तुझ्या विशिष्ट विधानांपेक्षां तुझ्या सामान्य योजनेस मी फारच
ज्यास्त महत्त्व देतों. ”

यानंतर कांहीं महत्त्वाच्या प्रयोगांचें वर्णन करून प्रो० म्याक्सवेल
आणखी म्हणतो:—“ मी ज्या अर्थीं पाहतों कीं, तूं आपली श-
ब्दयोजना नेहमीं सुधारीत आहेस, त्या अर्थीं अणुविषयक गतींच्या
नामाभिधानाच्यासंबंधानें माझ्या कल्पना मी तुझ्यापुढें मांडितों. ”
यारीतीनें त्यानें लक्षण केलेला एक शब्द अणूचा ‘ उत्क्षोभ ’ रूपी गति
हा होता, आणि तिचें लक्षण त्यानें असें केलें होतें:—“ ही गति म्ह-
णजे जिच्या योगानें अणुसमूहाच्या सामान्य वेगापासून प्रत्येक अ-
णूचा वेग भिन्न होतो ती. ”

“ उत्क्षोभ ” (agitation.) ह्या शब्दावर स्पेन्सरनें केलेली
कांहीं टीका प्रो० म्याक्सवेल यास मिळाल्यावर त्यानें त्यास ता० १७
दिजंबर १८७३ रोजीं पुनः लिहिलें—“ अणूची स्थानिक हालचाल
त्याच्या शेजारच्या अणूंच्या संबंधानें निराळी दाखविण्याकरितां
“ उत्क्षोभ ” शब्दाचा उपयोग मी या कारणासाठीं करितों कीं, तुझ्या-
प्रमाणेंच माझ्यामतें ‘ उत्क्षोभ ’ शब्दांत तालबद्धतेची कल्पना आल्यास
फारच अल्प येते. एकंदरींत गतीचा मार्ग जितका एका दि-

शेनें असेल तितका विरुद्ध दिशेनें जर असला, तर जी गति लहानशा पोकळींत होत असेल ती सर्व तालबद्ध होईल. पण तालबद्ध या शब्दाबद्दल माझी कल्पना आहे त्याप्रमाणें त्या शब्दांत जर केवळ उलटसुलट अदलाबदलच गर्भित होत नसेल, पण नियमितता व कालिकता (कांहीं कांहीं कालानें पुनःपुनः होणें) हींहि येत असतील, तर 'उत्क्षोभ' या शब्दांत तालबद्धतेची कल्पना येणार नाहीं, व हेंच व्यक्त करण्याचा माझा उद्देश होता. मोठें शास्त्रीय इष्ट हें आहे कीं, (शास्त्रीय भाषेंत) 'अल्प' अर्थाचा शब्दसमूह असावा, म्हणजे विशिष्ट गोष्ट एक मोठ्या वर्गांतील आहे ह्याहून ज्यास्त अर्थ ज्यांचा नाहीं असे ते शब्द असावे. प्रकाशाच्या आंदोलनविषयक कल्पींत अशा शब्दांची फार जरूरी आहे; ती अशासाठीं कीं, प्रयोगानें जें सिद्ध झालें असेल तें पूर्ण रीतीनें दर्शविलें जावें, आणि जी केवळ कल्पना असेल तिचा त्यांत मुळींच समावेश होऊं नये."

यावर ता० ३० दिजंबर १८७३ रोजीं स्पेन्सरनें त्यास असें लिहिलें:—"'उत्क्षोभ' या शब्दांत तालबद्धतेची कल्पना येत नाहीं म्हणून तूं मुद्दाम त्या शब्दाची योजना केलीस हें ऐकून मी जरासा दचकलों हें मला कबूल केलें पाहिजे. कारण अणूंच्या सापेक्षगतींना त्या सर्व या दृष्टीनें तालबद्धता नसते, ही गोष्ट तूं मुकाट्यानें धरूनच चालशील असा मला बहुतेक मुळींच अंदाज नव्हता. जेव्हां अणूंचें अनियमित रीतीनें संकलन होऊन त्यांचा घनपदार्थ बनतो, तेव्हां त्यांच्या परस्परांवरील क्रियांमुळें उत्पन्न होणारे ताण इतके विविध असतील कीं, गतींच्या मोठाल्या अनियमितता उत्पन्न होतील, अशी कल्पना करण्यास असणाऱ्या कारणांचा जोर मी पूर्णपणें लक्ष्यांत घेतों; आणि, खरोखरच, विद्युद्विषयक माझ्या कल्पींच्या पहिल्या भागांत, घनपदार्थांतून जाणाऱ्या प्रकाशाच्या किरणांचें पृथक्करण

होऊन पडणारे पट्टे सारखे कां दिसत रहातात, ह्याचें तें एक संभाव्य कारण आहे असें मीं दर्शविलें आहे. पण ही गोष्ट कबूल करतांहि तिला (त्या कल्पनेला) कमीपणा आणणारे दोन विचार मला दिसतात. जें व्याख्यान तूं मजकडे मेहेरबानीनें पाठविलेंस त्यांत दर्शविल्याप्रमाणें जर निरनिराळ्या वजनांच्या अणूंना वायुस्थितींत निरनिराळे स्वतंत्र गतिवेग असतील; तर, असें झालें पाहिजे नाहीं काय कीं जेव्हां असे निरनिराळ्या रीतींनें चलन पावणारे अणू एकत्र होऊन त्यांचे घनपदार्थ बनतील, तेव्हां त्यांचे प्रकृतिस्थित (हाडचेच) चलनभेद त्यांच्यांत दिसतच रहावे ? असले प्रकृतिस्थित भेद कांहींहि कार्य उत्पन्न केल्याशिवाय नाहींसे होणें शक्य नाहीं; आणि ते जर नष्ट होत नाहींत, तर जे दोन घनपदार्थ त्यांचे बनतील त्यांच्या उत्क्षोभगतींमध्यें वैशिष्टिक भेद उत्पन्न झाले पाहिजेत नाहीं काय ? म्हणजे, तद्घटक स्थानिक गतींच्या कालिकतासंबंधानें ते दोन उत्क्षोभ परस्परभिन्न झाले पाहिजेत नाहीं काय ? वरच्या कल्पनेस कमीपणा आणणारा दुसरा विचार मला सुचतो तो हा:—जरी अनियमित रीतीनें संकलीभवन पावून घन झालेल्या अणूंना ताणांच्या अनियमिततांमुळें कमज्यास्त घोंटाळ्याच्या गती प्राप्त होतील असें संभवनीय दिसतें, तरी आपणांस असें म्हणतां येणार नाहीं काय कीं, बिलोरी खड्याप्रमाणें जेव्हां त्यांचें ‘ नियमित ’ संकलन होऊन घनपदार्थ बनेल, तेव्हां त्यांच्यावर “ नियमित ” ताण बसून त्यांच्या नियमित गती होऊं लागतील ? बिलोरी खड्याची घटना व रचना ह्यांवरून असें गर्भित होत नाहीं काय कीं, त्यांचे सर्व घटक अशा समस्वरूप परिस्थितींत असतात कीं त्यांच्या गतीहि समस्वरूप असाव्या ? ”

“विद्युत् म्हणजे काय आहे ? ” ह्या निबंधाच्या ताज्या कलमांत, प्रो० टिंडाल, प्रो० क्लार्क म्याक्सवेल व इतर ह्यांच्या तोंडी

व लेखी टीकांच्या धोरणानें त्यानें सुधारणा केली. त्यांतील क्लृप्ति त्यांस संमत झाली नाहीं ही गोष्ट कबूल करूनहि त्याचें असें मत झालें कीं, ती बरोबर ठरण्यासारखी नाहीं असें त्यांजकडून सिद्ध झालेलें नाहीं. म्हणून त्यानें तो केवळ 'तर्क' म्हणून प्रसिद्ध केला, आणि ह्या टीकांवरून सुचणारे विचार ज्यांत घातले आहेत असें एक दुसरें ताजा कलम पहिल्या ताजाकलमास जोडून दिलें.

सूर्याच्या घटनेवर १८६९च्या प्रारंभीच्या दिवसांत त्यानें 'रीडर'मध्यें एक निबंध प्रसिद्ध केला होता, तो विषय १८७४ मध्यें पुनः पुढें आला. त्यासंबंधानें ता० १६ आक्टोबर १८७४ रोजीं तो यूमन्स यास लिहितोः—"प्रॉक्टरनें "कॉर्नहिल" च्या गेल्या अंकांत, सूर्य हा पोकळ गोल आहे, ह्या तुमचा (अमेरिकन) ज्योतिर्विद् यंग यानें बसविलेल्या सिद्धान्ताकडे लोकांचें लक्ष लावण्याची खटपट केली आहे. "सूर्याची घटना" ह्या माझ्या निबंधांत जे कोटिक्रम लढविले आहेत तेच पुष्कळ अंशीं त्यानें लढविले आहेत; पण ज्या विशिष्ट सरणीनें घनीभवन पावणाऱ्या द्रव्यांचें त्याचें (सूर्याचें) वितळलेलें कवच बनतें तिच्यासंबंधानें ते कोटिक्रम सुधारण्याचा आज एक वर्ष मी विचार करीत आहें. घटनेच्या प्रारंभीं वर्णिलेल्या पद्धतीस क्लार्क म्याक्सवेलनें क्लिफर्डला सांगितलेल्या यांत्रिक अडचणी आहेत. पण संकलन होत जाईल तशीं सारखीं वर जाणारीं व सारखीं घनीभवन पावणारीं जी वाफ व (नंतर) धातुरूप पाऊस हीं द्रव्यें, त्यांच्या संकलनसरणीचे परिणाम पुढें पुढें काय होतील हें पाहतां पाहतां, कवचघटनेच्या संबंधानें मीं जो एक सिद्धान्त काढिला आहे, त्यास ज्या तज्ज्ञ माणसांशीं मीं त्या विषयाची चर्चा केली आहे त्यांनीं अद्यापि मुळींच आक्षेप घेतलेला नाहीं. पण त्या क्लृप्तीचा जो हा विशिष्ट भाग सुधारणें जरूर आहे तो एकीकडे ठेवतां, सूर्याची घटना व सूर्यामध्यें चालू असलेली प्र-

गति ह्यासंबंधाच्या प्रो० यंगच्या कल्पना, मीं ज्या प्रतिपादिल्या होत्या, त्याच तत्त्वतः आहेत."

ज्या विशिष्ट पद्धतीनें संकलीभूत द्रव्यांचें वितळलेलें कवच बनतें त्यासंबंधाचे त्याचे कोटिक्रम सुधारण्याच्या कामास तो लागलाच लागला. त्याप्रमाणें सुधारलेल्या क्लप्तीचा छापील प्रूफ त्यानें क्लार्क म्याक्सवेलकडे पाठविला; त्यानें त्या क्लप्तीचीं मुख्य अंगें आपणास बरोबर समजलीं नाहींत असें कबूल करूनहि असें दाखविण्यास कारणें पुढें आणिलीं कीं, "घनरूप, द्रवरूप व वायुरूप अशा आपल्याहून कमी घनतेच्या केंद्रीभूत कंदाचा आधार असलेलें द्रवकवच स्वरूपतः अस्थिर असतें." प्रो० म्याक्सवेलचें हें पत्र ता० १७ दिजंबर १८७४ चें असून त्याजवर स्पेन्सरनें पेन्सिलीनें असें लिहून ठेविलेलें आहे:—"हा कोटिक्रम वाचून माझी प्रथम अशी खात्री झाली कीं, माझी क्लप्ति टिकाव धरणारी नाहीं. पण पुढें आण्ड्रयूनें वायूंच्यासंबंधाच्या केलेल्या शोधांवरून जेव्हां असें गर्भित होऊं लागलें कीं, एकादा वायु द्रवापेक्षां घन झाला तरी वायुस्वरूपीं राहू शकतो, तेव्हां मीं आपली क्लप्ति पुनः स्वीकारिली."

त्याच्या ग्रंथांचीं फ्रेंचमध्यें भाषान्तरें करणारा डा० क्याझेलिस याच्याशीं केलल्या पत्रव्यवहारांत ह्या मुद्यास उल्लेख केलेला आहे. उदाहरणार्थ, ता० १० मे १८७९ रोजीं तो त्यास लिहितोः— "तेजोमेघविषयक क्लप्ती" वरील माझ्या निबंधांतील कांहीं भागांऐवजीं पुढच्या आवृत्तींत घालावयाच्या कांहीं नव्या रकान्यांचीं प्रुफें ह्यासोबत मी पाठवीत आहें. त्यांपैकीं एक रकाना एक क्लप्ति सोडून देण्याबद्दलचा आहे, कारण ती टिकाव धरण्यासारखी नाहीं असें प्रो० क्लार्क म्याक्सवेलनें मला स्वच्छ सिद्ध करून दाखविलें आहे. टेटच्या किंवा कदाचित् सर विलियम टॉम्सनच्या गणिताच्यासंबंधाच्या तुझ्या प्रश्नासंबंधानें मी तुला आपलें स्मरण

ताजें केल्यावर लवकरच लिहीन, तोंपावेतों असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, तें मला अगदीं न तगाव धरणारें दिसतें, ह्याचें कारण त्याच्यांत ज्या गोष्टी प्रारंभींच गृहीत केल्या आहेत त्या अगदीं निराधार आहेत इतकेंच नाहीं, तर अत्यन्त असंभाव्य आहेत."

ता० २० जुलई—" पृथ्वी व सूर्यमाला ह्यांच्या वयाच्यासंबंधाच्या सर विल्यम टॉम्सनच्या सिद्धान्ताविरुद्ध हक्सलेनें ज्या व्याख्यानांत टीका केली आहे तें मीं परवां तुजकडे पाठविलें. ह्यापूर्वीं माझ्या मनांत तुला पत्र लिहून त्याच्या गृहीत गोष्टींवरून काढिलेलें अनुमान त्याज्य ठरविण्यास, किंवा कदाचित् त्या गृहीत केलेल्या गोष्टीच त्याज्य ठरविण्यास मला काय कारणें दिसतात तें मी तुला कळविणार होतों."

ता० ८ मार्च १८७६—" १८६२ च्या मार्चच्या " म्याकमिलन्स म्यागाझीन"मध्यें सूर्याच्या उष्णतेवर लिहिलेल्या सर विल्यम टॉम्सनच्या निबंधास मीं परवां उल्लेख केला. त्या निबंधाचा उद्देश असें दाखविण्याचा आहे कीं, भूगर्भशास्त्रज्ञांच्या अनुमानास जितक्या काळाची जरूरी आहे तसल्या कोणत्याहि काळापर्यंत सूर्य हल्लींच्या प्रमाणानें उष्णतादान करीत असेल हें शक्य नाहीं. तो निबंध वाचीत असतां त्याच्या कोटिक्रमांत जी चूक माझ्या लक्षांत आलेली मला आठवते ती ही:—" हल्लींच्या प्रमाणावर जरूर त्या काळपर्यंत उष्णतादान झालें नसेल हा सिद्धान्त त्यानें ज्या गणितानें केला आहे तें करतांना त्यानें मुकाट्यानें असें गृहीत केलें आहे कीं, सूर्याचा आकार हल्लीं आहे तशासारखाच सरासरी पूर्वीं असावा; पण तेजोमेघ-कल्पनेवरून असें व्यक्त होतें कीं, सूर्याच्या घनीभवनाचें हल्लींचें प्रमाण त्यास प्राप्त होण्यापूर्वीं पुष्कळ काळ पावेतों तो हळूहळू मोठ्या आकारापासून आकुंचन पावत होता, आणि सर्वकाळ उष्णतादान करीत होता. हेल्महाल्ट्झनें असें ग-

गणित केलें आहे कीं, तेजोमेघविषयक क्लृप्तीप्रमाणें सूर्यमालाघटक द्रव्य वरुणाच्या प्रदक्षिणामार्गापर्यंत ज्या वेळीं पसरलें होतें त्या वेळापासून त्याची दृश्य गति कमी होत जाऊन त्यांतून इतका उ-ष्णतासंचय निघून गेला आहे कीं, हल्लीं सूर्यापाशीं उत्सर्जन कर-ण्यास जितका उष्णतासंचय आहे त्याच्या ४९८ पट तो होता. आतां ज्या अर्थीं ह्या संकलीभवनाचा व उष्णतादानाचा बराच भाग ज्या कालांत सूर्याचा गोळा पृथ्वीच्या प्रदक्षिणामार्गाच्या मर्यादां-तून आंत आंत येत होता त्या कालीं खर्च होऊन गेला असला पाहिजे; आणि ज्या अर्थीं ह्या कालाच्या अलीकडील सर्व टप्प्यां-वर (समजा, बुधाच्या प्रदक्षिणामार्गापर्यंत सूर्य पसरला होता त्या वेळापासून) पृथ्वीला आपला संकलित आकार प्राप्त झाला आहे असें आपल्यास गृहीत करतां येईल; त्या अर्थीं हें स्पष्ट आहे कीं, सूर्याच्या आकुंचनाच्या बाकीच्या सर्व काळीं पृथ्वीला त्याचीं उ-ष्णतादानें प्राप्त होत असलीं पाहिजेत, जरी ह्या दूरवरच्या काळीं हीं उष्णतादानें हल्लींहून फारच कमी कडक असलीं पाहिजेत, त-थापि ज्या अर्थीं तीं हल्लींच्या मानानें पृथ्वीशीं फारच मोठा कर्ण करणाऱ्या फारच मोठ्या पृष्ठभागावरून होत असलीं पाहिजेत, त्या अर्थीं पृथ्वीला प्राप्त होणारी एकंदर उष्णता हल्लींच्याइतकीच किंवा त्याहूनहि ज्यास्त असली पाहिजे. हल्लींच्या दुप्पट सूर्याचा व्यास असतां हल्लींच्याइतकीच उष्णता प्राप्त होण्यास उष्णतादा-नाचें प्रमाण हल्लींच्या एकचतुर्थांश पुरे झालें असतें, आणि त्यानें साडेपांच अंशांचा कर्ण केला असतां तितकीच उष्णता मिळण्यास हल्लींच्या एकशतांश उष्णतादान पृथ्वीच्या पृष्ठभागास पुरें हो-ईल, ह्या गोष्टी ध्यानांत घेतां, ही गोष्ट अगदीं शक्य दिसते इत-केंच नाहीं, तर तेजोमेघविषयकक्लृप्तीच्या आधारावर अगदीं निश्चित दिसते कीं, सूर्याचा आकार ह्या सर्व कालीं जवळजवळ हल्लींच्या एव-

ढाच होता ही गोष्ट गृहीत करून गणित केल्यावर जितका काला-वधि दिसतो त्याहून फारच दीर्घतर कालांत जीविताला पुरेशीं प्रकाश व उष्णता सूर्यापासून पृथ्वीस प्राप्त होत आहेत."

पृथ्वीच्या व सूर्यमालेच्या वयाच्या संबंधाच्या भौतिकशास्त्रज्ञ व भूगर्भशास्त्रज्ञ ह्यांच्यामधील वादाचें स्वरूप आलीकडे बदललें आहे. थोड्यावर्षांपूर्वींपावेतों सूर्याचें उष्णतामान वायुरूप द्रव्याचें संकलीभवन आणि उल्कापतन ह्यांवरच अवलंबून आहे अशी कल्पना होती. सर विल्यम टॉम्सननें असा अंदाज केला होता कीं, सूर्य सरासरी दोन किंवा तीन कोटी वर्षें उष्णतादान करीत आहे, आणि म्हणून भूगर्भशास्त्रज्ञांनीं (भूगर्भास प्रस्तुत स्वरूप येण्यास लागणाऱ्या) वेळाविषयीं आपल्या मागण्या त्या मर्यादेंत आणिल्या पाहिजेत. पण रेडियम् धातूच्या उष्णतादानाच्या संबंधाच्या आलीकडच्या शोधांवरून असें दिसतें कीं, सूर्यापाशीं उष्णतेचीं आणखी साधनें आहेत. म्हणून सूर्याच्या उष्णतेच्या अस्तित्वाचा काल हवातितका वाढवतां येण्यासारखा आहे, निदान पांच किंवा सहाशें कोटी वर्षांचा काल भूगर्भांतील हल्लींचे फेरफार होण्यास व सजीव वस्तूंची उत्पत्ति होण्यास लागला असेल असें जें भूगर्भशास्त्रज्ञ म्हणतात तितका तो वाढवतां येण्यासारखा आहे.

मूल द्रव्यांच्या घटनेच्या संबंधानें स्पेन्सरचीं मतें काय होतीं हें पुढील पत्रव्यवहारावरून दिसतें. उदाहरणार्थ, "जीविताचे आरंभ" नांवाचें पुस्तक त्यावेळीं नुक्तेंच प्रसिद्ध करणारा डा० चार्ल्स् बॅस्टियन यास तो ता० २९ नवंबर १८७८ रोजीं लिहितो:—"सरासरी चार पांच वर्षांमागें एका रविवारीं तिसऱ्या प्रहरीं तूं व मी एकत्र लॉकॉयरला भेटावयास गेलों होतों..... आह्मीं कांहीं वेळ त्याच्या प्रयोगशाळेंत त्याच्याशीं गप्पा ठोकिल्या, आणि प्रकाशकिरणांचें पृथक्करण ह्या विषयाकडे आमचें भाषण वळलें..... ह्या

भाषणाची तुला कांहीं आठवण आहे काय ? आणि प्रकाशपृथक्-रणविषयक चमत्कारांवरून ज्या गोष्टी व्यक्त होतात त्यासंबंधानें मीं एकादें मत प्रदर्शित केलेलें तुला आठवतें काय ? प्रत्येक मूल-द्रव्याच्या प्रकाशपृथक्करणानें पडलेल्या पट्ट्यांत कमजास्त मानानें पु-ष्कळ रेषा दिसतात ह्यावरून अवश्यमेव काय अनुमान निघतें म्ह-णून मीं म्हटलें होतें, आणि एकाद्या मूलद्रव्याच्या प्रकाशपट्ट्यामध्यें कांहीं परिस्थितींत जो फेरबदल होतो त्यावरून काय अनुमान निघतें म्हणून मीं म्हटलें होतें, तें तुला आठवतें काय ?....आपण जेव्हां तेथून निघालों तेव्हां, चालतां चालतां, तुझ्या ग्रंथांत जीं मतें प्रद-र्शित केलीं होतीं त्यांशीं मी जें म्हणत होतों त्याचा संबंध काय होतो यासंबंधानें आपलें कांहीं बोलणें झालें, आणि मी असें म्ह-णालों कीं, तुझें जर तसें मत असतें तर आपलें (त्या ग्रंथांतील) स्पष्टीकरण कांहींसें मागें जाऊन तूं सुरू केलें असतेंस. ”

यावर डा० बॅस्टियन त्यास ता० २७ नवंबर रोजीं लिहितोः—

“ तूं ज्या सहलास उल्लेख करितोस तें सहल, आपलें लॉकायरला भेटावयास जाणें, आणि उष्णतामानाच्या निरनिराळ्या स्थितींत वगैरे ज्यांस आपण मूलद्रव्यें म्हणून नांव देतों त्यांचे निरनिराळे रंगपट्ट यांसंबंधाचें त्याच्या प्रयोगशाळेंत आपलें भाषण झालें होतें ही गोष्ट, हीं सर्व मला अगदीं चांगलीं आठवतात. त्यानें नुक्तच्याच केलेल्या प्रयोगांपासून निष्पन्न झालेल्या गोष्टींविषयीं लॉ-कायरनें आपल्यास सांगितलें, आणि त्या पुराव्याच्या अर्थाच्या संबंधानें, आणि रंगपट्टाच्या रूपान्तरांना त्यानें जो उल्लेख केला त्यासंबंधानें तूं कांहीं मत प्रदर्शित केलेंस तेंहि मला आठवतें, पण दुर्दैवानें यापलीकडे मला कांहीं स्मरत नाहीं.. त्यानंतर झा-लेल्या ज्या संभाषणास तूं उल्लेख करितोस तें मला आठवतें, आणि मला ठाऊक आहे कीं लॉकायरशीं झालेल्या संभाषणावरून निघा-

लेले सिद्धान्त, ज्यांस मूलद्रव्यें म्हणतात तीं स्वतः उत्क्रमणानें उत्पन्न झालेलीं आहेत ह्या मतास, अनुकूल होते. ”

वरील पत्रव्यवहारावर स्पेन्सरनें असें लिहून ठेविलें आहे:—“ रंगपट्टांच्या फेरफारांवरून मूलद्रव्यें संयुक्त आहेतसें दिसतें अशाबद्दल जे विचार लॉकॉयरनें केले, ते तसा समज मीं प्रदर्शित केल्यावरून केले ह्यासंबंधाचा हा पत्रव्यवहार आहे. ” मूलद्रव्यांच्यासंबंधाचें हें मत १२ वर्षांनीं पुनः पुढें आलें. त्यासंबंधानें ता० ३० मे १८९१ रोजीं हेन्री कनिंघामनें त्यास लिहिलें:—“ कांहीं दिवसांपूर्वीं क्रूककडे मीं गेलों असतां त्यानें मेहरबानी करून मूलद्रव्यांच्या घटनेच्या संबंधानें आपली क्लृप्ति मला स्पष्ट करून सांगितली; तीं द्रव्यें त्याच्या मतें उत्क्रमणरूप विभक्तीकरणानें झालेलीं आहेत. या प्रश्नासंबंधानें प्रयोग करण्यांत आज कित्येक वर्षें त्यानें घालविलीं आहेत, आणि यिट्रियमसारख्या विरळ मात्यांच्या किरणपृथक्करण यंत्राखालील अवस्थांवरून ह्या मतांना बळकट पुष्टी येते. कारण पुष्कळ वेळ चालविलेल्या पृथक्करणावरून यिट्रियमचे भिन्नभिन्न प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात, आणि निरनिराळ्या (समजा) गाईंमध्यें जसे फरक असतात, तसे त्यांजमध्यें दिसतात. आतां उघडच एकादा नमुना एकदां पक्क झाला म्हणजे नमुन्याचें चिरस्थायित्व या तत्त्वास अनुसरून धातूंस निरनिराळीं रूपें देणें अशक्य दिसतें, जसें एकाद्या प्राथमिक नमुन्याकडे परत गेल्याशिवाय, तो म्हणतो त्याप्रमाणें, गाईचा घोडा करतां यावयाचा नाहीं. मी म्हणालों, हे प्रयोग तुला फार चित्तवेधक वाटतील, कारण तूं आपल्या एका ग्रंथांत ह्या मताचें स्पष्टपणें पूर्वदिग्दर्शन केलें आहेस. क्रूक्स म्हणाला, “ होय तें खरें, आणि त्याचीं मतें माझ्या कित्येक व्याख्यानांत मीं वाचून दाखविलीं आहेत. ”

क्रूक्सचीं एतद्विषयक व्याख्यानें वाचून स्पेन्सरनें कनिंघामला असें

लिहिलें कीं, “ माझें आज पुष्कळ दिवस जें मत बनलेलें आहे त्याचा ह्यावरून ताळा पडतो, आणि माझी कल्पना होती त्याहून किती ज्यास्त पूर्णपणें संयुक्तद्रव्याची जनिति उत्क्रमणरूप आहे हें दिसून येते. उपजाती व पोटप्रकार यांच्या जनितीसारखेंच ह्याहि क्षेत्रांत झालेलें पाहून अद्भुत चमत्कार वाटतो.” आणि ता० ८ जून १८९१ रोजीं क्रूक्सला त्यानें असें लिहिलें:—“ तुझीं मतें—आणि विशेषतः उपजाती व पोटभेद यांच्या उत्पत्तीच्या संबंधाचीं मतें—ह्या क्षेत्रांत माझ्या स्वप्नींहि नव्हतें इतकी उत्क्रान्ति–कल्पना पुढें गेलेली दाखवितात. ” सृष्टपदार्थविज्ञान आणि रसायन या दोन शास्त्रांत आलीकडे जी प्रगति झालेली आहे तिच्या दृष्टीनें जर “ आदितत्त्वें ” पुनः लिहिलीं गेलीं, तर तो ग्रंथ त्याच्या अगदीं अखेरच्या आवृत्तींहूनहि पुष्कळ बाबतींत भिन्न होईल. हल्लींच्या प्रगतीच्या मानानें पाहतां, सृष्टपदार्थविज्ञानावरील पुस्तक, लेखकानें प्रुफें तपासून परत केल्यानंतर, एका आठवड्यांत जुनें बनतें. निरिंद्रिय उत्क्रमणाची आपली रूपरेखा तेव्हांच्या ज्ञानास अनुसरून आहे, आणि त्यांत जशी भर पडत जाईल तशी ती बदलावी लागेल, हें स्पेन्सरला ठाऊक होतें. त्यानें आपल्या वेळच्या रसायन व पदार्थविज्ञान शास्त्रांचा पूर्णपणें किंवा नेहमींच बरोबर उपयोग केला नाहीं असें जरी क्षणभर कबूल केलें, तरी आलीकडील कांहीं अत्यन्त महत्त्वाचे असे त्या शास्त्रांतील शोध त्यानें त्या वेळेसच अंधक रीत्या वर्तविले होते ह्यांत शंका नाहीं. ज्यांस मूलद्रव्यें म्हणतात तीं उत्क्रमणानें बनलेलीं आहेत ही क्लप्ति चाळीस वर्षांपूर्वीं अगदीं नवीन व चकित करणारीच होती. हल्लीं ती सर्वसंमत झालेली आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. हल्लीं परमाणु अविभाज्य नाहींत असें कोणी समजत नाहीं इतकेंच नाहीं, तर ज्यास परमाणु म्हणून म्हणतात त्यांत सूक्ष्मतर कण किती असतील ह्याचे अंदाज

हल्लीं करूं लागले आहेत, आणि त्यांच्यामध्येंहि जीवनार्थ कलह चालत असून त्यांच्यापैकीं जे अस्थिर तोल असतील ते उलथून पडतात, आणि जे स्थिर तोल असतील ते तगाव धरून राहतात, अशीं वर्णनें हल्लीं वाचण्यांत येऊं लागलीं आहेत. सारांश, सेंद्रिय सृष्टींतील उपजातींप्रमाणें परमाणुहि उत्क्रमणानें बनलेले आहेत, म्हणजे, प्रतिस्पर्धा आणि योग्यतमांचा तगाव ह्यानेंच त्यांची उत्पत्ति झालेली आहे.

१८८० च्या जुलईत डा० यूमन्सच्या पत्रांत मि० मोल्टनशीं गांठ पडल्याचा तो ह्याप्रमाणें उल्लेख करितो:—" त्यानें मला असें सांगितलें कीं आकाशांतील गोलांच्या अंतर्घटनेच्या संबंधानें माझ्या क्लृप्तीचा ताळा पडेल असा एक शोध आलीकडे लागलेला आहे. तो शोध ब्रिस्टल एथील एका प्रो० रामसे नामक मोठ्या निष्णात प्रयोगशास्त्रज्ञानें केलेला आहे. त्यानें रॉयल सोसैटीपुढें एक निबंध वाचिला, त्यांत वायुरूप स्थितींतून घनस्थितींत होणाऱ्या संक्रमणासंबंधी प्रयोगांनीं निष्पन्न झालेल्या गोष्टी त्यानें सांगितल्या; त्यांवरून असें स्पष्ट झालें कीं द्रवाइतकाच वायु दाट होईल इतका दाब त्याजवर घातला म्हणजे त्या दोघांमधील भेदरेषा हळू हळू अंधुक होते, आणि धुक्यांमध्यें तिचा अंत होतो, आणि सरतेशेवटीं तो द्रव आणि वायु हे एकत्र मिसळून त्यांच्यांतील भेद दिसत नाहींसा होतो. आणि मोल्टननें ही गोष्ट माझ्या लक्षांत आणून दिली कीं, सूर्य व ग्रह ह्यांच्या वायुरूप केंद्रस्थ भागांसंबंधानें माझी जी कल्पना ती ह्यावरून अगदीं योग्य ठरते, खरोखर बहुतेक आवश्यकच ठरते. ह्याचा परिणाम हा होईल कीं तेजोमेघविषयक क्लृप्तीवरील निबंधांतील जो भाग मीं खोडून टाकिला होता तो पुनः मला बदलावा लागेल, आणि त्यांतील कांहीं भाग पूर्वीं होता तसा पुनः घालावा लागेल, आणि बाकीचा भाग अशा रीतीनें सुधारावा लागेल कीं त्यांत ही नवीन सिद्ध झालेली गोष्ट तिच्या कारणांसहित गोंविली जावी."

तेजोमेघाविषयक क्लृप्तिवरील त्याच्या निबंधाची जितके वेळां त्यास पुनःपुनः सुधारणा करावी लागली, तितके वेळां दुसऱ्या कोणत्याच निबंधाची करावी लागली नाहीं. १८८३ च्या प्रारंभीं ' निबंधसंग्रहा'ची पुनरावृत्ति काढण्याची संधि साधून त्यानें त्यांत पुनः सुधारणा केली. त्यासंबंधानें तो डा० यूमन्स यास ता० ८ मार्च १८८३ रोजीं लिहितो:—" तेजोमेघाविषयक क्लृप्ती"वरील निबंधांतील सुधारलेले भाग अखेरीस मी तुला आज पाठवीत आहें. ते तयार करण्यांत मला अत्यन्त श्रम झालेले आहेत, आणि ते एकदाचे पुरे झाले याबद्दल मला मनःपूर्वक आनंद वाटत आहे.

हा इतका त्रास मला पडण्याचें एक कारण असें झालें कीं, मीं त्यांच्यावर कित्येकांकडून टीका करून घेतल्या आहेत, आणि बारीकसारीक बाबतींत त्यांचा फायदा घेतला आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, हा माझा तर्क योग्य आहे ह्याबद्दल मला अगदीं खात्री वाटूं लागली आहे. उघडच एका क्लृप्तीविरुद्ध दुसरी क्लृप्ति अशापैकींच ही गोष्ट आहे; आणि त्यांतील भौतिक कोटीक्रम टिकाव धरण्यास योग्य आहे म्हणून कबूल केल्यास तिला जितका चांगला आधार देतां येण्यासारखा आहे तितका दिल्यासारखा होतो. "

१८८९ च्या अखेरीस त्यानें पुनः त्या निबंधांत सुधारणा केली व भर घातली, कारण तेव्हां तो ' निबंधसंग्रहा'ची अखेरची आवृत्ति काढीत होता. त्याच्या प्रती त्यानें टीका करण्याकरितां लार्ड रेले, सर विल्यम टॉमसन (नंतरचा लार्ड केल्व्हिन), डा० ऐझाक रॉबर्टस, लार्ड क्रॉफर्ड, मि० हगिन्स, आणि प्रो० डेवार, डार्विन, विल्यमूसन, फ्रांकलण्ड व टिण्डाल इतक्या नामांकित शास्त्रज्ञानांकडे पाठविल्या. त्यावर ता० १ जानेवारी १८९० रोजीं त्यास सर विल्यम टॉम्सन लिहितो:—" ज्यास द्रव्याची " प्राथ-

मिक " स्थिति म्हणून तिची कल्पना करतां येईल अशा कोणत्याहि गोष्टीविषयीं मी जेव्हां विचार करण्याचा यत्न करितों तेव्हां माझी मति अगदीं कुंठित होते. पूर्वग अवस्थांविषयीं आपल्यास हवातसा विचार करतां येतो आणि बऱ्याच खात्रीनेंहि करतां येतो. पण ज्ञातनियमानुसार जी स्थिति कोणत्याहि पूर्वतर स्थितीच्या अभावांतून येऊं शकते अशा स्थितीची, किंवा परमाणूंना रूपान्तरप्राप्ति होऊन व्यवस्थित विश्वाच्या उत्क्रमणास आरंभ होईपर्यंत गत अनंत कालांत अस्तित्वांत असलेल्या अव्यवस्थित विश्वाची, कल्पना मला करतां येत नाहीं. असें आहे तरी द्रव्याच्या प्राथमिक स्थितीची आवश्यकता आपणास भासते. मीं जेव्हां याचा विचार केला आहे तेव्हां असंयुक्त पृथक् परमाणु हीच द्रव्याची प्राथमिक स्थिति असा त्याजविषयीं माझ्या मनांत विचार आलेला आहे. पण ही स्थिति गृहीत करतां, पूर्णपणें निश्चित अशा गणितांवरून आपल्यास असें दिसतें कीं, असंयुक्त परमाणूंच्या स्थितींतून रासायनिक संयोगाची स्थिति प्राप्त होतांना उत्पन्न होणारी उष्णता गुरुत्वाकर्षणापासून उत्पन्न होणाऱ्या उष्णतेच्या मानानें " फार अल्प " आहे. "

यावर ता० ३ जानेवारी १८९० रोजीं सर विल्यम टॉम्सन यास तो लिहितोः—" तुझी टीका इतक्या स्पष्ट विस्तारानें ज्यांत केली आहे अशा तुझ्या कालच्या पत्राबद्दल मी तुझा फार आभारी आहें. पण, तुझे उपकार मानतांच, तुला इतका त्रास घ्यावयास लाविल्याबद्दल मला वाईट वाटतें असें मला तुला सांगूं दे. तूं इतक्या विस्तारानें लिहिशील अशी मला कल्पना नव्हती; नाहीं तर माझ्या सदसद्विवेकबुद्धीनें मला तुला लिहूंच दिलें नसतें, कारण ज्यास वेळाचें इतकें मोल आहे त्याचा इतका वेळ घेणें मला आवडलें नसतें; कारण पत्रव्यवहारामुळें किती महत्त्वाचीं कामें बाजूस रहातात हें मला स्वताच्या अनुभवानें माहीत आहे. तुझें म्हणणें माझ्या

बरोबर लक्ष्यांत आलें, व त्याचें धोरण मला पूर्णपणें मान्य आहे; आणि विशेषत: पूर्वीं जी गोष्ट माझ्या लक्षांत आली नव्हती ती आतां आली आहे; ती ही कीं, द्रव्याच्या अन्तिम घटकांमध्यें रासायनिक संयोग होऊन उत्पन्न झालेली उष्णता गुरुत्वाकर्षणानें उत्पन्न झालेल्या उष्णतेच्या मानानें अल्प आहे. असल्या अन्तिम घटकांच्या संयोगांनीं गमाविलेल्या उष्णतासंचयाची त्यांच्या सामान्य गुरुत्वमध्याकडे होणाऱ्या गतीनें गमाविल्या जाणाऱ्या उष्णतासंचयाशीं तुलना करावयास येण्याच्या अगोदर त्यांपैकीं प्रत्येकाच्या अंगीं असलेला अणुविषयक गतिसंचय अत्यन्त मोठा असला पाहिजे. तथापि, मला वाटतें, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, ज्या वेळीं तेजोमेघघटक द्रव्य वरुणाच्या प्रदक्षिणामार्गापर्यंत पसरलें होतें, त्या काळीं अशा प्रकारच्या पूर्वतर संयोगांनीं जर मोठें उष्णतामान उत्पन्न केलें असतें, तर, घनीभवनानें हल्लींच्या सूर्याचा गोळा बनण्यास लागणारा काळ बराच वाढला असता. तुझ्या सेक्रेटरीनें तुझ्या विनंतीवरून पाठविलेल्या तुझ्या निबंधाच्या प्रतीबद्दल मी तुझा फार आभारी आहें. त्यांत माझें चित्त वेधणारें पुष्कळ विवेचन आहे असें मी पाहतों. मला भीति वाटतें कीं त्यांतील बरेंच माझ्या समजुतीच्या आटोक्याबाहेरचें आहे; कारण माझें गणितज्ञान कधींच फारसें विस्तृत नसून हल्लीं त्याजवर गंज चढलेला आहे."

याच्यापूर्वीं कांहीं वर्षें त्यानें प्रो० टिंडालला असा आग्रह केला होता कीं, "काम व स्थान ह्यांत बदल करण्यासाठीं म्हणून पृथ्वीच्या अंतर्भागाचा सामान्य प्रश्न त्वां हातीं घ्यावा. आलीकडे पृथ्वीच्या निरनिराळ्या व दूरवरच्या भागीं जे भूकंप व ज्वालामुखी–स्फोट झाले आहेत (आणि त्यांतील कांहीं बहुतेकांशीं किंवा सर्वांशीं एकसमयावच्छेदेंकरून झालेले आहेत) ते, पृथ्वी ही तिख्यासारखी घट्ट आहे हें जें टामसनचें मत, त्याशीं अगदीं विसंगत

आहेतसें मला वाटतें. हा घट्ट गोळा आणखी आकुंचन पावून ते होतात एवढेंच कारण टामसन दाखवूं शकतो, पण माझ्या मतें त्यावरून सर्व गोष्टींचें स्पष्टीकरण होत नाहीं."

याचसंबंधानें ता० २३ जून १८९० रोजीं तो प्रो० जड्ड यास लिहितो:—"यांत्रिक दाबांखालीं खडकांत झालेले रासायनिक बदल" या विषयावर 'केमिकल सोसायटी' पुढें तूं दिलेल्या व्याख्यानाचा "नेचर" मध्यें आलेला रिपोर्ट मीं फार लक्षपूर्वक वाचिला. विशेषत:ज्या प्याऱ्यांत तूं असें सांगितलें आहेस कीं, मेरेकेनाईट नांवाची जी ज्वालामुखीजन्य कांच आहे तीस आंच लाविली असतां ती फुगते,आणि १८८३च्या ज्वालामुखी स्फोटाच्या वेळीं क्रॅकाटावच्या ज्वालामुखींतून बाहेर पडलेली तपकिरी रंगाची कांच तीस आंच लाविली असतां मूळच्या आकाराच्या कित्येक पट फुगते आणि तिचा जो पदार्थ बनतो तो सूक्ष्मदर्शक यंत्रानें व नुसत्या डोळ्यांनींहि पाहिला असतां त्या मोठ्या स्फोटाच्यावेळीं इतक्या मोठ्या प्रमाणावर बाहेर पडलेल्या 'प्यूमिस' नांवाच्या घट्ट, हलक्या स्पंजासारख्या पदार्थापासून भिन्न दिसत नाहीं, तो प्यारा मला विशेष आकर्षक वाटला. १८६८ च्या स्फोटाच्या वेळीं व्हेसुव्हिअस पर्वतावर जाऊन आल्यावर ज्वालामुखींच्या स्फोटाच्यासंबंधानें कांहीं सिद्धान्त मीं बसविले होते त्यांची त्यावरून मला आठवण होते. हे सिद्धान्त ज्यांत थोडक्यांत प्रतिपादिले आहेत असा कांहीं वर्षांपूर्वीं मीं लिहिलेला लेख तुजकडे या सोबत पाठवीत आहें. त्यांत जरी तसें सांगितलें नाहीं (कारण त्या सहलाच्या हकीकतीला ती एक केवळ टीप जोडिलेली आहे.) तरी प्युमिस दगडाची घटना ही एक पुरावा म्हणून त्या वेळेस मला सुचलेली होती; कारण पाण्याची मुक्तता, आणि दाब कमी झाल्यामुळें पुन: वायुरूप धारण करणें, ह्यांच्या योगानें वर वर्णिलेले परिणाम उत्पन्न होऊन, शिवाय, पु-

ष्कळ ठिकाणीं सूक्ष्म–पिशवीयुक्त पदार्थाचे मोठाले गोळे उत्पन्न होतील. त्यांतील समाविष्ट पाणी केवळ यांत्रिक रीत्या पसरलेलें आहे किंवा स्फटिकरूपी आहे, किंवा रासायनिक रीत्या संयुक्त झालेलें आहे, ह्याचा आपल्या क्लृप्तीस बाध येत नाहीं. तें कसेंहि असून त्यास वायुरूप प्राप्त झाल्यास त्याचे परिणाम वर वर्णिल्यासारखे होतील. पण तुला हें पत्र लिहिण्यांत माझा ज्यास्त विशिष्ट हेतु हें तुजकडून समजून घेण्याचा आहे कीं, क्राकाटावमध्यें जो अनर्थापात घडून आला (ज्वालामुखी डोंगराचा महास्फोट झाला) तसल्या अनर्थापातांची अत्यन्त सयुक्तिक अशी उपपत्ति काय आहे? त्याचा शोध करण्याकरितां नेमिलेल्या कमिटीच्या रिपोर्टांत असलेल्या सिद्धान्तसमुच्चयाकडे पाहतां, समुद्र चालून आल्यामुळें तो स्फोट झाला असें त्यांनीं म्हटलेलें पाहून मला आश्चर्य वाटतें; म्हणजे, त्यांच्या म्हणण्याचा भाव असा दिसतो कीं, ज्वालामुखीच्या तोंडांतून आलेल्या वितळलेल्या दगडांच्या (लाव्हाच्या)मोठ्या संचयाची क्रिया झाली असतां (तो अनर्थापात उत्पन्न करण्यास) पुरेशी शक्ति उत्पन्न होईल. ही गोष्ट संभवनीय आहे काय? ही सहक्रिया तें पाणी व तो लाव्हा यांचा जेथें संयोग होईल तेवढ्या पृष्ठभागापुरतीच होईल. त्यापासून उत्पन्न झालेली जी वाफ तीस शेजारच्या वितळलेल्या द्रव्याच्या घनीभवनानें ताबडतोब धक्का बसल्यामुळें एवढा मोठा गोळा (डोंगर) ती कशी हालवूं शकेल? पहिली गोष्ट ही कीं, (डोंगराच्या पोटांत) पुरेसा पाण्याचा प्रवेश कसा शक्य दिसतो? लाव्हाच्या गोळ्याच्या दाबाहून त्याच्या पाण्याचा ज्यास्त दाब असेल तरच त्याचा प्रवेश होईल; पण लाव्हाचा कांहीं भाग समुद्राच्या सपाटीच्यावर पसरलेला होता. त्या दोघांच्या विशिष्ट गुरुत्वाकर्षण शक्ति पाहतां, लाव्हाच्या बाजूनें ज्यास्त द्रव्यजन्य दाब नसला तरी, असला प्रवेश शक्य दिसत नाहीं. दुसरी गोष्ट ही कीं,

ह्या यांत्रिक अडचणींखेरीज पाण्याचा प्रवेश व प्रसार यांना ध्यानांत येण्यासारखा अवधि लागल्यामुळें त्यापासून कल्पिलेला परिणाम कसा उत्पन्न होईल हें माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. मला असा संभवच ज्यास्त दिसतो होता कीं, प्रथम उत्पन्न झालेल्या वाफेनें स्थानिक फटी उत्पन्न होतील, आणि त्यांतून वाफ निघून गेल्यामुळें पुरेशी वाफ उत्पन्न झाली तरी तिचा पुरेसा संचय जमणार नाहीं.

उलटपक्षीं, वरच्या क्लप्तींत गर्भित झाल्यासारखी, आणि तूं केलेल्या शोधांची जी गोळाबेरीज दिली आहे तिच्यांत गर्भित झाल्यासारखी, वस्तुस्थिति जर आपण कल्पिली, तर जे निरनिराळे परिणाम दृष्टीस पडतात त्यांचा हिशेब लावण्यास पुरेशी, आणि जसली पाहिजे तसल्या प्रकारचीं, शक्ति आपल्यास सांपडते. ह्या क्लप्तीप्रमाणें ज्वालामुखींतील वितळलेल्या द्रव्याचा कित्येक हजार फूट उंच स्तंभ त्याच्या शंकूच्या (ज्वालामुखी शंकाकृति असतात.) मध्यभागीं बनून त्यांत पाणी असतें, व त्या वितळलेल्या द्रव्याच्या स्तंभाच्या वरच्या भागाजवळ तेवढी त्यास वाफेची स्थिति प्राप्त होते, कारण तेथें दाब एकंदरींत कमी असतो. अशी कल्पना करा कीं, ज्वालामुखीच्या शंकूच्या खालच्या भागाजवळ कोठें तरी त्याच्यांतील लाव्ह्याशीं संपर्क झाल्यामुळें त्याच्या कुशीचा बराचसा भाग पातळ झालेला आहे; आणि सामान्यतः होतें त्याप्रमाणें (त्या पातळ भागाच्या) एका फटींतून लाव्ह्याचा लहानसा प्रवाह बाहेर पडण्याच्या ऐवजीं तो भाग एकदम फुटतो, आणि बऱ्याच एकर जाग्यावर ढांसळून पडतो; तर मग काय झालें पाहिजे ? जो लाव्हा जोरानें बाहेर येतो त्यांतून सर्वत्र त्यांतील पाणी व कार्बानिक आसिड ह्यांजवरील दाब निघाल्यामुळें ते वायुरूप बनले पाहिजेत. त्यांमुळें शंकूमध्यें उंच गेलेला लाव्ह्याचा स्तंभ कदाचित् एक दोन हजार फूट एकाएकीं पडून गेला पाहिजे, आणि ज्वालामुखीच्या खालच्या

भागांत भरलेल्या सर्व लाव्ह्यावरील दाब निघून गेला पाहिजे. अशा रीतीनें त्याच्या प्रत्येक भागांत कोंडून राहिलेलें पाणी व कार्बोनिक आसिड हीं मुक्त झालीं पाहिजेत, आणि कदाचित् घनद्रव्यगोळा अर्धा मैल एकदम उडून गेला पाहिजे. अशा रीतीनें उत्पन्न होणारे सर्व परिणाम स्वाभाविकरीत्या उत्पन्न झालेले दिसतात. शंकूच्या बाजू एकदा तिराळल्या म्हणजे जोरानें बाहेर पडणाऱ्या वायूंचा जबरदस्त जोर त्यांजवर पडल्यामुळें त्या बहुधा तुटून पडतील आणि त्यांतील बराच भाग जोरानें उडून जाईल. वितळलेल्या द्रव्याचे जे भाग ज्वालामुखीच्या तोंडाच्या जवळच असल्यामुळें, वर जाऊन फुटणाऱ्या फुगाऱ्यांच्या रूपानें ज्यांच्यांतील पाणी व कार्बोनिक आसिड ह्यांचे बरेच भाग निघून गेले होते त्यांवरील दाब पूर्णपणें निघून गेल्यामुळें ते बेतानेंच पसरतील, आणि अशा रीतीनें त्यांपासून प्यूमिस दगडाचे पोकळ पिशव्यांचे गोळे बनतील, आणि असले पुष्कळ गोळे बाहेर फेंकले गेल्यामुळें क्रॅकाटावजवळ समुद्र जसा आच्छादून गेला तसे शेजारचे प्रदेश त्यानें आच्छादून जातील. दुसऱ्या व्यासंगांमुळें भूगर्भशास्त्रविषयक क्लृप्त्यांची माहिती करून घेण्यास मला फुरसत मिळालेली नाहीं; तशी मिळाली असती तर अशा प्रकारच्या उपपत्त्या आधींच लाविलेल्या आहेत कीं काय हें मला कळलें असतें; पण असल्या उपपत्त्या माझ्या दृष्टीस न आल्यामुळें मला तूं नुकत्याच दिलेल्या व्याख्यानांच्या संबंधावरून असें विचारावेंसें वाटतें कीं, ह्या प्रश्नासंबंधानें सध्यांची मतस्थिति काय आहे ?"

ह्यावर प्रो० जड्डनें त्यास ता० २९ जून १८९० रोजीं असें लिहिलें:—" फार तप्त झालेल्या खडकांत पाण्याचे मोठाले संचय (बाहेरून) शिरल्यामुळें ज्वालामुखीस्फोट उत्पन्न होतात असें जरी थोडेसे भूगर्भशास्त्रज्ञ अजून प्रतिपादितात, तरी पुष्कळ—मला

वाटतें निम्मेहून अधिक—असें समजतात कीं, वितळलेल्या गोळ्याच्या मध्यभागीं जलवात व इतर वायू हळूहळू मोकळे होऊन वास्तविक ज्वालामुखीचा स्फोट करीत असतात." हें मत अर्थात् स्पेन्सरच्या म्हणण्यास पुष्टि देणारें होतें.

पृथ्वीच्या वयाच्या संबंधानें सर विल्यम टाम्सन (लार्ड केल्व्हिन) यानें केलेल्या गणिताबद्दल त्याला पुनः संशय प्रदर्शित करावासा वाटला, आणि त्यासंबंधानें ता० १ आक्टोबर १८९४ रोजीं त्यानें हक्स्लेस लिहिलें:—" पृथ्वीच्या वयाच्या संबंधानें तुझ्यामधील व लार्ड केल्व्हिनमधील वादाच्या संबंधानें हल्लीं कांहीं कोणीं म्हटलें आहे काय? मी त्याच्या निबंधांच्या पुनरावृत्तीची प्रत मागवण्याचा विचार करीत आहें, पण त्यानें आधारभूत धरलेल्या कांहीं गोष्टी मान्य करण्यासारख्या नाहींत असा माझ्या मनावर ठसा राहिलेला आहे, जरी तो अंधक अंधक आहे. माझी कल्पना अशी आहे कीं, संशयास्पद अशा कांहीं गोष्टी गृहीत करून त्यांवरून गणितदृष्ट्या विचार करण्याविषयीं, आणि त्यावरून जे सिद्धान्त निघतील ते खात्रीचेच म्हणून म्हणण्याविषयीं त्याची प्रसिद्धि आहे; आणि सामान्य जनाची गणितासंबंधानें अशी कांहीं भोळी समजूत आहे कीं, गणितदृष्ट्या स्थापन झालेला सिद्धान्त ते अलबत खरा म्हणून समजतात, आणि त्याच्या आधारभूत गोष्टी खऱ्या असण्यावर त्याचें याथार्थ्य अवलंबून असतें हें विसरतात."

ह्यावर हक्स्लेनें ता० ३ आक्टोबर रोजीं असें लिहिलें:—" केल्व्हिननें व मीं कांहीं प्रगति केलेली मला दिसत नाहीं. खडकांतून प्राचीन प्राणी व वनस्पति ह्यांच्या सांपडणाऱ्या अवशेषांवरून उत्क्रान्तीची गोष्ट सिद्ध झाल्यामुळें तिला किती वेळ लागला हा प्रश्न अगदीं दुय्यम महत्त्वाचा आहे."

जार्ज डार्विन ह्याच्या सल्ल्यानें " पृथ्वीचें थंड होणें " ह्या वि-

षयावर " नेचर " पत्रास १८९५ च्या प्रारंभीं त्यानें एक पत्र लिहिलें होतें तें तयार करण्याकरितां त्यानें वरील माहिती हक्स्लेला विचारिली होती. तें पत्र वाद माजूं नये एतदर्थ त्यानें लागलेंच परत घेतलें, पण तें असें होतें:—" ज्यास उच्च गणितविषयक कोटिक्रमाच्या शृंखलेवर टीका करण्याचें सामर्थ्य नाहीं तो ज्या आधारभूत गोष्टींपासून त्या कोटिक्रमास सुरुवात केलेली असेल त्या बरोबर आहेत किंवा नाहीं ह्याबद्दल मत बनविण्यास असमर्थ नसेल. असल्या आधारभूत गोष्टी गणितविषयक कदाचित् नसतील; आणि तसें असल्यास गणितज्ञास त्यांजबद्दल विशेष अधिकार दाखवतां येणार नाहीं; त्यानें गृहीत केलेल्या गोष्टींवर टीका करण्यास गणितज्ञांहून इतरांस मोकळीक रहाते. अशा रीतीनें या गोष्टीकडे पाहून लॉर्ड केल्व्हिनच्या गणिताबद्दल आणि तो व प्रो० पेरी यांच्यामध्यें असलेल्या वाद–प्रश्नाबद्दल एक सूचना करण्याचा मी धीर करितों.

पहिल्याचा कोटीक्रम व दुसऱ्याची टीका ह्यांचा पृथ्वीच्या पोटांत झालेल्या व्यापारसरणींशींच संबंध आहे. एकानें एक प्रकारची आंतर–घटना गृहीत केली आहे, आणि खोल खोल अंतरावर ज्यास्त होणाऱ्या उष्णतामानावरून पृथ्वी थंड होण्यास लागणाऱ्या वेळाविषयीं अनुमान काढिलें आहे. दुसऱ्यानें पृथ्वीच्या अंतर्घटनेच्या संबंधानें गृहीत केलेल्या गोष्टी बरोबर आहेत किंवा नाहीं ह्यासंबंधानें प्रश्न उत्पन्न केला आहे, आणि त्यावरून काढिलेल्या अनुमानांच्या संबंधानें संशय व्यक्त केला आहे. पण दोघांनींहि असें गृहीत केलेलें दिसतें कीं, पृथ्वीच्या गोलाच्या बाहेरची स्थिति हल्लीं आहे तशीच पूर्वींपासूनहि चालत आलेली आहे. पृथ्वीचा गोळा आणि त्याचा घन किंवा द्रव पृष्ठभाग ह्याचें गतकालीन उष्णतामान कांहींहि असो, त्याची उष्णता पोकळींत निघून जाण्यास हल्लीं जीं सौकर्यें आहेत तींच पूर्वींहि होतीं असें त्यांनीं गृहीत केलें आहे. ही गृहीत गोष्ट नि:-

संशय म्हणून मान्य करणें भाग आहे काय? तिजबद्दल संशय घेण्यास आपल्यास आधार नाहीं काय? ती मुळींच खरी नाहीं असें अनुमान देखील आपणास करतां येण्यासारखें नाहीं काय? ज्या-अर्थीं पृथ्वीची हल्लीं अस्तित्वांत आलेली उष्णता, आणि कोटिक्रमानें क-ल्पिलेली गतकालीन फारच ज्यास्त उष्णता, ह्यांचा एरवीं हिशेब लागत नाहीं, त्या अर्थीं असें प्रतिपादन आह्मांस करतां येईल कीं, तेजो-मेघविषयक—क्लप्तिच (किंवा कोणत्या तरी रूपीं प्रस्तुत असलेल्या द्रव्याची क्लप्ति) त्याचें स्पष्टीकरण करीत असल्यामुळें तिचें ह्या लोकांकडून मुकाट्यानें ग्रहण केलें जात आहे; आणि असें म्हण-ण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं, तुम्हांस जर तेजोमेघविष-यक क्लप्ति (किंवा पसरलेल्या तुकड्यांची क्लप्ति) नाकबूल क-रावयाची असेल तर ती सर्वांशीं नाकबूल केली पाहिजे. प्रारंभींची वायुरूप स्थिति (अगदीं मूळची किंवा आघातानें उत्पन्न झालेली) प्रस्तुत प्रश्नाशीं प्रत्यक्ष संबद्ध नाहीं म्हणून एकीकडे ठेवून, हल्लीं पृथ्वीचें कपर ज्यांचें मुख्यत्वें बनलेलें आहे तीं मूलद्रव्यें ज्या स्थितींत आक्सिजनशीं असंयुक्त होतीं त्या स्थितीप्रत आपण एकदम आलों, तर असें अनु-मान काढतां येईल कीं, त्या वेळचे असंयुक्त आक्सिजन व इतर वायु यांचें त्यावेळीं फार विस्तृत वातावरण बनलें असलें पाहिजे, आणि असल्या वातावरणांतून घनीभूत वाफांचा आकार असलेले कांहीं संयुक्त वायु त्यांत असल्यास विशेषतःच उष्णतेचें विसर्जन किंवा नि-घून जाणें अत्यन्त मंदरीत्या होत असलें पाहिजे. पण इतकेंहि मागें न जातां प्रस्तुतविषयक प्रचलित (लॉर्ड केल्व्हिनचा) सिद्धान्त अमान्य करण्यास पुरेसें कारण सांपडण्यासारखें आहे. पृथ्वी-चा देह पूर्वींपासून घनद्रव्याचा बनलेला आहे,—हल्लीं आपणास माहीत आहे तशा घनद्रव्याचा नसला तरी घनता आणि उष्णतानयन-शक्ति ह्या बाबतींत तशासारख्याच द्रव्याचा बनलेला आहे,—ही

(केल्व्हिननें) गृहीत केलेली गोष्ट आपण मान्य करूं या. उघडच, आपण (पृथ्वीच्या पोटांत) खालीं उतरूं तसें जें वाढतें मान दिसतें त्यावरून काढलेल्या अनुमानांतच अशी समजूत गर्भित होते कीं, पृष्ठभागाचें घटकद्रव्य एका कालीं आंतील द्रव्याइतकें उष्ण नसलें तरी पुष्कळ उष्ण होतें. कल्पना करा कीं, त्याचें उष्णतामान सेंटिग्रेड उष्णतामापक यंत्रानें १९२ अंश होतें अशा काळाप्रत आपण गेलों. त्या उष्णतामानीं पाणी पांच (नेहमींच्या व आणखी चार) वातावरणांच्या दाबाखालीं कढूं लागतें. ह्यावरून गर्भितार्थ असा निघतो कीं, पृथ्वीचें पाणी किंवा त्यांतील कांहीं भाग, पृथ्वीच्या पृष्ठभागावर द्रवस्थितींत राहाण्यास शंभर फूट द्रवरूपजलाहून अधिक जलाइतका वायुरूप पाण्याचा संचय अस्तित्वांत असला पाहिजे; म्हणजे, अडीच वातावरणांचा सामान्य दाब गृहीत करतां, वाफेचा थर ७०००० फुटांहून अधिक खोल, किंवा तेरा मैलांहून अधिक, असला पाहिजे; ही अंदाजलेली खोली, बाहेरच्या भागाचें मोठें प्रसरण व अनिश्चित मर्यादा हीं ध्यानांत घेतां, वास्तविक खोलीहून फार कमी असली पाहिजे. पाण्याचा हा मोठा गोळा पारदर्शक वायूच्या स्वरूपानें होता अशी कल्पना केली तरी उष्णतेच्या पोकळींत होणाऱ्या विसर्जनास त्यावेळीं अत्यन्त मोठा अडथळा होत असला पाहिजे; कारण निघून जाणारी उष्णता पाण्याच्या वाफेनें गिळून टाकण्याचें मान त्यावेळीं फार मोठें असलें पाहिजे. पण पाणी त्यावेळीं सर्वांशीं किंवा प्राधान्येंकरून पारदर्शक वायूच्या स्थितींत असण्याचा संभव नाहीं. तें पुष्कळ अंशीं फारच खोल अशा घन मेघाच्या स्थितींत असलें पाहिजे. ह्यापासून गर्भितार्थ असा निघतो कीं, पृथ्वीच्या तप्त पृष्ठभागाला लागून एक पारदर्शक थर होता, आणि त्याचा वरच्या पृष्ठभागाशीं घनीभवन होऊन पाऊस बनत होता. अशा परिस्थितींत उष्णताविसर्जन प्रवाहांच्या द्वारा झालें

पाहिजे; म्हणजे ते प्रवाह वर वाहून, प्रसरण पावून, त्यांचें उष्णतामान कमी होऊन, बाह्यभागीं त्यांचें घनीभवन होऊन, मग त्यांच्यांतील उष्णता पोकळींत निघून गेली असली पाहिजे. ह्यावरून आपण असा सिद्धान्त काढिला पाहिजे नाहीं काय, कीं ह्या कालीं पृथ्वीचें थंड होणें हल्लींच्या मानानें लहान प्रमाणावर चाललें होतें?

अशा रीतीनें उदाहृत केलेल्या पायऱ्यांवर पृथ्वीच्या कपरांतील बदल प्रथम केवळ अग्निजात असून मागून जलजात बदल सुरू होऊन त्यांचयांत संकीर्णता उत्पन्न झाली पाहिजे; आणि त्याची हल्लींची स्थिति ज्या भूगर्भविषयक व्यापारसरण्यांनीं उत्पन्न झाली त्यांस सुरुवात झाली असेल. पण हवेंतून पाणी बहुतेक पूर्णपणें खालीं पडण्यास आणि हवेंतील ढगांचा विस्तृत थर नाहींसा होण्यास लागणाऱ्या अत्यन्त दीर्घ कालांत उष्णतेच्या विसर्जनाचें मान हल्लींच्या मानानें लहानच असलें पाहिजे हें उघड आहे, आणि तें हळू हळू वाढत गेलें असलें पाहिजे, आणि शेवटीं हल्लींच्या पुष्कळ वेळां मेघविहीन असलेल्या, आणि बहुतेक वेळां थोडेंच पाणी असलेल्या हवेंतून ज्या मानानें उष्णता निघून जाते तशासारखें मान स्थापन झालें असलें पाहिजे. ह्या कालांत भूगर्भविषयक बदल जोरानें चालले असतील, आणि जीवविहीन थरांची विस्तृत रांग बनण्यास वेळ मिळाला असेल. हा वेळ किती असेल हें समजण्यास आंतील उष्णतामानाच्या हल्लींच्या प्रमाणावरून कांहींच मार्ग दिसत नाहीं. हवेचें उष्णतामान १०० अंशांखालीं गेलें तेव्हां जीवविषयक बदलांची लांब व संकीर्ण शृंखला उत्पन्न होणें शक्य झालें असेल. कांहीं सूक्ष्मतम जंतु त्या उष्णतामानीं, किंवा जराशा ज्यास्त उष्णतामानीं जरी राहू शकतात, तरी त्या वेळीं जीवारंभ झाला असेल असें अनुमान आपल्यास करतां येत नाहीं, कारण प्रकाशाचें साधन त्या वेळेस कदाचित्

नसेल. समुद्रांचें उष्णतामान तेव्हां शंभर अंशांचें असतां मुळींच प्रकाश जाऊं नये इतका जाड जरी ढगांचा थर नसेल, जरी समुद्राच्या तळीं जितका अंधार असतो तितका तेव्हां वर नसेल (आणि समुद्रतळीं अशा अंधारांत देखील सूक्ष्मतम जंतूच केवळ नव्हतं, तर त्यांच्याहून बऱ्याच वरच्या दर्जाचे जंतूहि राहतात), तरी (जीवांस) प्रकाश आवश्यक नव्हता असें गृहीत करतां येणार नाहीं, असें (आह्मांस) प्रतिपादतां येईल; कारण समुद्रतळीं समुद्राच्या पाण्यांत पोषकद्रव्य असल्यामुळें जीव राहूं शकतात, जें पोषकद्रव्य कांहीं ठिकाणीं आणि कांहीं काळीं प्रकाशाच्या मदतीनें ' क्लोरोफिल ' नामक वनस्पतींना हिरवा रंग देणाऱ्या द्रव्यानें कार्बानिक आसिडचें पृथक्करण करून उत्पन्न केलेलें आहे. तथापि असें अनुमान योग्य रीतीनें काढतां येईल कीं, आकाशांत सर्वत्र पसरलेल्या ढगांतून थोडासा प्रकाश यावा इतकी जेव्हां शंभर अंशांखालीं पृथ्वी थंड झाली तेव्हां जीवित शक्य झालें असेल, आणि हल्लींच्या प्रमाणासारख्या प्रमाणावर थंड होण्याचा व्यापार जेव्हां चालत नव्हता तेव्हां जीवविषयक बदल सुरू झाले असतील, आणि हल्लींच्या मानासारखें मान प्राप्त होण्यापूर्वीं त्या बदलाच्या पुष्कळ प्राथमिक पायऱ्या होऊन गेल्या असतील. ह्यावर कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, आंतील उष्णतामानाच्या चढत्या प्रमाणावरून काढिलेलें अनुमान स्वतंत्र आहे, आणि पृथ्वीच्या वातावरणांतील फेरबदलांकडे लक्ष न देतां बरोबर समजतां येण्यासारखें आहे; तर त्यास असें उत्तर देतां येण्यासारखें आहेः—आपण असें गृहीत करूं या कीं, एका काळीं पृथ्वीच्या गोळ्यासभोंवतीं उष्णता किंवा प्रकाश आपल्यांतून अगदी न जाऊं देणारें आवरण होतें. तेव्हां तिचें उष्णतामान तिच्या पृष्ठभागीं व मध्याशीं एकच असेल, आणि तिच्या

वयाचें ज्यांच्यावरून अनुमान करतां येईल असे उष्णताविषयक आधार मिळणार नाहींत; म्हणजे, ती याच स्थितींत अनंतकाल होती असें अनुमान काढण्यास कांहींच प्रत्यवाय येणार नाहीं. आतां कल्पना करा कीं, हें अगदीं मधून प्रवाह चालूं न देणारें आवरण निघालें, आणि पृथ्वी आच्छादनविरहित झाली. तर तेव्हां सुरू झालेलें शीतीभवन (थंड होत जाणें) हल्लीं उष्णतामानाचें जसें चढतें मान दृष्टीस पडतें तशासारखें कालेंकरून उत्पन्न करील. पण ह्या चढत्या मानावरून निघणारे जे आधार त्यांवरून पूर्वीं किती काळ-पर्यंत उष्णता निघून जाण्यास प्रतिबंध झाला होता हें समजावयाचें साधन सांपडावयाचें नाहीं. पृथ्वीच्या वयाबद्दल त्यावरून कांहीं अनुमान काढिल्यास तें भ्रामक होईल. आणि उष्णतादानाच्या पूर्ण बंदीपासून उष्णतादानास पूर्ण परवानगीपर्यंतच्या फेरबदलासंबंधानें जर हें कबूल केलें पाहिजे, तर हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, मोठ्या बंदीपासून लहान बंदीपर्यंत हळू हळू बदल झाला असें म्हटल्यास तेंहि त्या अनुमानास सदोष करील. उष्णतादानाला जेव्हां अल्प अडथळा आहे तेव्हांचें चढतें मान त्याला जेव्हां मोठा अडथळा होता तेव्हांच्या काळास लाविल्यास तें भ्रामक होईल.

ही एकंदर गोष्ट आतां थोडक्यांत आलंकारिकरीत्या सांगूं:—" पृथ्वीच्या अंगावर एकदां फार जाड कांबळें होतें; तें फार दीर्घकालाच्या अवधींत झिजून पातळ होत गेलें आहे, अशी वास्तविक स्थिति असतां, हें कांबळें पूर्वींपासून नेहमींचेंच पातळ आहे असें गृहीत करून त्या उष्णताविषयक आधारस्तंभांवरून तिच्या वयाबद्दलचा जर कोणीं अंदाज केला, तर तो निदान फार संशयास्पद होईल हें उघड आहे."

तेजोमेघविषयक कल्पनेंत, १९०० सालीं "आदितत्त्वां"ची शे-

वटची आवृत्ति तयार करतांना, अखेरची भर त्यानें घातली. " आदितत्त्वां " ची ही आवृत्ति काढिल्यावर एक दोन महिन्यांनीं तो त्या विषयाकडे वळला, आणि " वायुरूप तेजोमेघांची जनिति " नामक एक लहानसा निबंध त्यानें लिहिला.

" संघटनात्मकमीमांसें"त निरिंद्रिय उत्क्रान्तीचें विस्तृत विवेचन करण्याचें गाळल्याबद्दल प्रोफेसर वार्ड यानें ' फार्ट नाइटली रिव्ह्यू'त टीका केली होती. त्यास स्पेन्सरनें एप्रिल १९००च्या मासिकाच्या अंकांत असें उत्तर दिलें:—" निरिंद्रिय उत्क्रान्तिविषयक दोन खंड मीं गाळिले या गोष्टीस तो पुनः उल्लेख करितो, आणि असें प्रतिपादितो कीं, ह्या गाळण्यामुळें मीं काढिलेल्या सिद्धान्तांची इमारत दूषित झाली आहे. सेंद्रिय व सेंद्रियोत्तर उत्क्रान्तिविषयक खंड पुरे होणें अशक्य आहे असें बहुतेकांस वाटत होतें; आणि त्यांच्या आधीं जर निरिंद्रिय-उत्क्रान्तिविषयक खंड मीं काढिले असते तर तें अगदींच अशक्य झालें असतें. पण प्रो० वार्ड म्हणतो कीं, निरिंद्रिय उत्क्रान्तीचें विवेचन करणाऱ्या भागाच्या अभावीं बाकीच्या भागास योग्य आधारांची वाण अत्पन्न झाली आहे, व त्याची किंमत मुळींच नाहींशी झाली आहे. एवंच, एक गोष्ट करून पाहणें निरुपयोगी होतें; दुसरी गोष्ट करून पाहणेंहि निरुपयोगी होतें; म्हणून कांहींच करावयास नको पाहिजे होतें. अगदीं प्रारंभींच्या पायऱ्या गृहीत ठेवणें, आणि रासायनिक द्रव्यें आपणांस माहीत आहेत तशीं घेऊन उत्क्रमणाच्या पुढच्या पायऱ्यांचा एका नियमानुसार मागमोस लावणें, हें, त्याच्या मतें, बरोबर नव्हतें. आणि नंतर मीं जेव्हां त्याच्या असें नजरेस आणिलें कीं, हा खड्डा अगदींच रिता ठेविलेला नाहीं, तर " आदितत्त्वां"मध्यें निरिंद्रिय उत्क्रान्तीचें संक्षिप्त विवेचन करून शिवाय रासानिक द्रव्यें उत्क्रान्त झालेलीं आहेत ह्याबद्दल पांच प्रका-

रचे पुरावे मीं दिले आहेत, तेव्हां "एका अल्पायुषी निबंधाच्या (हे प्रो० वार्डचे शब्द आहेत.) तीनच पानांत मीं ते दिलेले आहेत अशी तो त्याजवर घमेंडीनें टीका करून त्यांस एकीकडे सारितो!"

माझे आजपर्यंतचे ग्रंथ.

☞ किमती न दिलेल्या ग्रंथांच्या प्रती शिल्लक नाहींत

१. नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें. २. न्यायतत्त्वें किं. २ रु. ३. ज्योतिर्विलास किं. १॥ रु. ४. संसारसुख किं. १॥। रु. ५. शास्त्ररहस्य. ६. आत्मनीतीचीं तत्त्वें आणि परोपकार. ७. नीतिसिद्धान्त किं. १॥। रु. ८. धर्ममीमांसा–नैसर्गिक धर्म आणि भौतिक धर्म. ९. राजनीतीचीं मूलतत्त्वें किं. ३॥ रु. १०. अज्ञेयमीमांसा. ११. धर्ममीमांसा–पितृमूलक धर्म आणि आध्यात्मिक धर्म किं. २॥ रु. १२. जीवनशास्त्र. १३. [illegible]मीमांसा–पूर्वार्ध किं. [illegible] रु. १४. भारतवर्षीय भूवर्णन. १५. [illegible]मीमांसा–उत्तरार्ध. १६. जीवित कर्तव्य किं. २॥ रु. १७. [illegible] राज्याचा इतिहास किं. [illegible] रु. १८. आत्मविद्या किं. २॥ रु. १९. समाजशास्त्राचे मूलसिद्धान्त. २०. समाजशास्त्राचे [illegible] सिद्धान्त व गृहसंस्था. २१. जननमरणमीमांसा किं. २॥। रु. २२. राजकीय संस्था किं. २॥ रु. २३. निबंधरत्नमाला किं. २॥ रु. २४. विधिसंस्था व धर्म[illegible] संस्था किं. २॥ रु. २५. उद्योगसंस्था व धंदेसंस्था किं. २॥ रु. २६. सुख आणि शांति किं. [illegible] रु. २७. मानसशास्त्राचीं मूलतत्त्वें. किं. २॥ रु. २८. मानसशास्त्राची घटना. २९. जीवित यात्रा किं. २॥ रु. ३०. हर्बर्ट स्पेन्सर यांचें चरित्र व पत्रें किमत २॥ रु.

बळवंत गणेश दाभोळकर, प्रकाशक.

४६८ नारायण पेठ, पुणें सिटी.